
# "अच्युतराव कोल्हटकर"

## स्मारकग्रंथ —

७५३९
स. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्रं. नं. २०८



REFBK-0004352

[ किंमत १॥ रु. ]

# "अच्युतराव कोल्हटकर"

## स्मारकग्रंथ

—भाग १ ला—

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि. नं. २८
ता. २५/५/33
ठा. मुं.

—संपादक—

अनंत हरि गद्रे.

नों. क्र. ६०३२

प्रकाशकः—अनंत हरि गद्रे, निर्भीडकचेरी, मुंबई नं. ४.

मुद्रकः नरहर रामचंद्र जोशी. मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई नं. ४.

REFBK-0004352

किंमत फक्त १॥ रुपया.

८३५२

## अच्युतरावांचें तुरुंगांतून पाठविलेलें आज्ञापत्रः—

श्री. अनंतराव गद्रे, यांस—

वि. वि. आपण दोन तासांच्या नवीन नाट्यकृतींची जी पद्धति स्वीकारलीत ती पाहून कोणाहि नाट्यप्रेमी व्यक्तीस आनंदच होईल. आपली तिसरी व चौथी कृती ('घटस्फोट' व 'कुमारी १९३१') यांवरून समाजांतील प्रचलित प्रश्न सोडविण्याची आपली इच्छा स्पष्टपणें दिसून येते आणि त्यामुळें नाटकदृष्ट्या समाजास जो फायदा होणें इष्ट असतें, तो होऊन आपल्या नाट्यकृतींविषयीं जास्त जास्त उत्सुकता लोकांच्या अंःतकरणांत उत्पन्न होईल.

सध्यांच्या राजकीय परिस्थितीच्या आन्दोलनांत मला मुंबईच्या बाहेर स्वराज्याश्रमांत किती महिने अगर वर्षे रहावें लागेल, हें आज सांगतां येणार नाहीं, यासाठीं आपणांस अशी मुद्दाम विनंति करावयाची आहे कीं, नाट्यसंमेलनाची बैठक कधींहि न चुकेल अशी आपण व्यवस्था करावी. वस्तुतः आपणांस नाट्यविषयाची अतिशय कळकळ असल्याकारणानें आणि आपणांस सहाय्य करण्यास जिवाभावाची मित्रमंडळी असल्यामुळें त्याबद्दलची आठवण करण्याची जरुरीच नाहीं. तथापि प्रेमामुळें आपणांस ही विनंति केलेली आहे. वर सांगितलेल्या काळांत आपली नवी नवी नाट्यकृति पाहण्याचा सुयोग मिळणार नाहीं. तरीहि मित्रमंडळीचे डोळे म्हणजे आपलेच डोळे असतात, ही गोष्टहि तितकीच खरी आहे.

"तिरंगी झेंडा" हि जास्त जोरास लागेल असें करावें. श्री. खंडेराव त्रिलोकेकर यांच्या "एकनाथ विरुद्ध राजवाडे" या लेखमालेचे लेखांक आपण आतांपर्यंत जसे शुद्ध छापलेत, तसेच पुढें अखेरपर्यंत छापल्यास, मराठी भाषेंतील आद्यग्रंथ, किंबहुना मराठी भाषेची भगवद्गीता, जी ज्ञानेश्वरी तिच्यासंबंधानें एका विवक्षित विषयाचा उहापोह करण्यास उत्कृष्ट साधन निर्माण होईल. आचार्य राजवाडे आणि तद्विरोधक मंडळी या दोघांच्याहि दृष्टीनें श्री. त्रिलोकेकर यांची लेखमाला अत्यंत महत्वाची आहे व तिचें श्रेय आपणांस लाभावें, हीं माझी बलवत्तर इच्छा आहे.

मुंबई.
ता. २३–२–१९३१.

आ.
A. B. Kolhatkar.

# स्मारकग्रंथाची रचना !

दे. भ. अच्युत बळवंत कोल्हटकरांसारख्या अष्टपैलु लेखकाच्या, शंभर जागीं विखुरलेल्या, नानाविध लेखांची निवड करून अवघ्या तीनशें पानांचा स्मारकग्रंथ तयार करावयाचा म्हणजे फार कठीण काम आहे, याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हाला या स्मारकग्रंथाची रचना करतांना आला हें आम्हीं प्रारंभींच सांगून ठेवतों. त्यांच्या वाङमयसेवेचा व्याप केवढा प्रचण्ड होता याची थोडीशी कल्पना या ग्रंथांत अन्यत्र दिलेल्या यादीवरून कोणालाहि येईल. एवढी प्रचण्ड वाङमयसेवा करणारे अचाट बुद्धिसामर्थ्याचे अष्टपैलु लेखक मराठी भाषेंत तरी फार थोडे झाले आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांच्या सरस आणि चटकदार लेखणींतून उतरलेले लेख अगदीं निवडून निवडून छापूं म्हटलें तरी हजारों पृष्ठें सहज व्यापून टाकतील !

अच्युतरावांच्या लेखनांतील पहिली महत्त्वाची गोष्ट म्हणजे चटकदारपणा ! ते हिंदुधर्माची मीमांसा सांगोत कीं ज्योतिषाची चर्चा करोत, ते राजकारणाचा उहापोह करोत कीं समाजसुधारणेची दिशा दाखवोत, ते रुक्ष विषयावर लिहोत कीं काव्यासारख्या नाजुक विषयाच्या तारा छेडोत, त्यांच्या सर्व प्रकारच्या लेखांत एकजात चटकदारपणा भरलेला आढळतो. मग जर कां त्यांच्या लेखांचा विषय देशप्रेम, धर्मसेवा, स्वातंत्र्यपूजन, काव्यविवेचन अशासारखा असेल तर त्या लेखाच्या चटकदारपणाला सीमाच उरत नाहीं ! मग ते गोड कल्पनांचा पाऊस काय पाडतील, नाजुक भावनांचीं कारंजीं काय उडवितील, भाषाविलासाची नयनाल्हादक आतपबाजी काय रंगवितील, ते स्वतः किती रंगतील आणि वाचकांना कसे रंगवितील याचा सुमारच नसतो ! ते एकदां स्वातंत्र्यप्रेमाच्या, देशप्रेमाच्या व धर्मप्रेमाच्या विषयावर लिहूं लागले म्हणजे असें कांहीं रसाळ लिखाण लिहितात कीं त्यांच्या लेखनांत खुद्द सरस्वतिदेवीचाच नृत्यविलास चालला आहे कीं काय असा भास होतो !

अच्युतरावांच्या कोठल्याहि विषयावरील लिखाणांत प्रामुख्यानें स्वातंत्र्यदेवीचा जयजयकार आढळतो. त्यांचे राजकीय लेख, त्यांचे धर्मविषयक लेख,

त्यांचे परमेश्वरविषयक लेख, त्यांचे श्रीशिवाजीमहाराज, श्रीसमर्थ रामदास आणि लो. टिळकांवरील लेख हे तर ओतप्रोत स्वातंत्र्यदेवीच्या जयजयकारानें भरलेलेच आहेत पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांच्या नाटकांतून, कादंबऱ्यांतून आणि पहिली रात्र, दुसरी रात्र अशा प्रणयकथांतूनहि हाच स्वातंत्र्यदेवीचा जयजयकार दुमदुमून गेलेला आढळतो ! कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि कै. प्रो. अण्णासाहेब परांजपे यांच्या नंतर स्वातंत्र्यदेवीचा कट्टर उपासक म्हणून अच्युतरावांच्याच नांवाचा कोणालाहि अभिमानानें उल्लेख करावा लागेल.

प्रस्तुत स्मारकग्रंथांतील लेखांची निवड करतांना मुख्यतः आह्मी हीच दृष्टि ठेवलेली आहे. या ग्रंथाच्या प्रारंभीं दिलेली त्यांच्या हातची प्रस्तावना, लेखसंग्रहाच्या प्रारंभींचें त्यांच्या हातचें स्वर्गीय मंगलाचरण आणि ग्रंथांतील सुविचारांचा केवळ पंधरा कलमांत संकलित केलेला त्यांच्याच हातचा दिव्य आणि स्फूर्तिदायक समारोप, या सर्वांवरून वाचकांची खात्री होईल कीं, अच्युतरावांना देशसेवेव्यतिरिक्त अन्य विचार सुचत नव्हता, धर्मप्रेमाशिवाय अन्य भावना त्यांच्या हृदयांत वास करीत नव्हती आणि स्वातंत्र्यदेवतेच्या आराधनेशिवाय इतर गोष्टींना त्यांच्या सागरासारख्या अफाट अंतःकरणांत सुद्धां ठाव मिळालेला नव्हता.

परमेश्वरावर तर त्यांची निष्ठुर निष्ठा होती. पण त्याच्या खालोखाल ते आपल्या प्रिय मातृभूमीलाच मानीत असत ! त्यांचीं हिंदमातेच्या वैभवाचीं लडिवाळ वर्णनें वाचून ज्याचें हृदय पवित्र भावनांनीं उचंबळून येणार नाहीं असा वाचक सांपडणेंच शक्य नाहीं. त्यांना हिंदुधर्माचा तर अपरंपार अभिमान होता. त्यांनीं आपल्या मुलाला लिहिलेल्या मरणापूर्वीच्या अगदीं अखेरच्या पत्रांतहि हाच धर्माभिमान उत्कटपणें दिसून येतो. हजारों मैलांवर आफ्रिकेसारख्या दूर देशांत रहाणाऱ्या मुलाला लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं स्वतःचें कुशल कळविलेलें नाहीं कीं मुलाचें कुशल विचारलेलें नाहीं ! त्यांनीं त्या पत्रांत–अगदीं अखेरच्या पत्रांत– हिन्दुधर्माच्या श्रेष्ठतेचेंच वर्णन केलेलें आहे ! अच्युतराव ते हे ! त्यांना धर्मप्रेमाशिवाय, देशप्रेमाशिवाय आणि स्वातंत्र्यप्रेमाशिवाय दुसरें कांहीं दिसत नव्हतें, दुसरें

कांहीं रुचत नव्हतें कीं दुसरें कांहीं सुचत नव्हतें ! देशप्रेम हेंच त्यांच्या जीवनाचें मर्म, धर्मप्रेम हीच त्यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता आणि स्वातंत्र्यप्रेम हेंच त्यांच्या चरित्राचें उच्च ध्येय !

अच्युतरावांच्या लेखनांतील हे सद्‌गुण ज्यांत अंतर्बाह्य भरून राहिलेले आहेत अशाच मोठ्या व छोट्या लेखांची निवड या स्मारकग्रंथांत आम्ही मुद्दाम केलेली आहे. प्रथम आम्ही त्यांचे परमेश्वरविषयक लेख दिले असून त्यानंतर पूर्वजविषयक, राष्ट्रपुरुषविषयक, साहित्यविषयक आणि विविधता-विषयक असे लेख निवडले आहेत; पण त्या सर्वांत अच्युतरावजींचें स्वर्गीय स्वातंत्र्य-प्रेमच अनुस्यूत झालेलें वाचकांना आढळून येईल ! असा वीर-वृत्तीचा स्वातंत्र्यभक्त महाराष्ट्रांत जन्मल्याबद्दल आम्हांला अत्यानंदच झाला पाहिजे.

श्रीशिवाजीमहाराज, श्रीसमर्थ रामदास आणि लो. टिळक यांच्यावरील त्यांच्या अत्युत्कट प्रेमाची गोष्ट तर बोलावयासच नको ! शिवाजीमहाराज आणि समर्थ यांच्यासंबंधानें त्यांनीं जे अनेक लेख लिहिले आहेत त्यांत त्यांच्या हृदयांतील सर्व पवित्र भावना उत्कटतेनें उचंबळून आलेल्या दिसतात ! आज-पर्यंत जगाच्या इतिहासांत श्रीशिवाजीमहाराजांपेक्षां अधिक थोर असा कोणी झालाच नाहीं असें आपलें स्पष्ट मत त्यांनीं जागोजाग लिहून ठेवलेलें आहे. रामदासस्वामींचा उल्लेख तर ते 'पहिला बोल्शेव्हिक' म्हणजे देशसेवक म्हणूनच करीत असत ! आणि या दोन श्रेष्ठ विभूतींचे गुण लोकमान्य टिळकांत उतरलेले होतें असें त्यांनीं एकदां नव्हे, दोनदां नव्हे तर हजारदां लिहून ठेवलेलें आहे. लो. टिळकांवरील त्यांच्या हातचे रसाळ मृत्युलेख वरील विधानाला उत्तम पुष्टिच देतील ! अच्युतरावांनीं लिहिलेले टिळकांचे मृत्युलेख वाचीत असतांना सहृदय वाचकाला दहादां तरी डोळ्यांत डोकावणारे अश्रू पुसून पुढचा मार्ग आक्रमावा लागेल अशी आम्ही स्वानुभवावरून ग्वाही देतों। त्यांनीं लिहिलेला 'लोकमान्यमय स्पेशल अंक' तर सर्व दृष्टींनीं अपूर्व असाच आहे. एका टांकानें, एका बैठकींत लिहिलेला, इतका हृदयस्पर्शी, इतका हृदयद्रावक आणि इतका हृदयंगम जंगीच्या जंगी लेख जगावरील कुठल्याहि वाङ्मयांत आढळेल कीं नाहीं याविषयीं बळकट शंका वाटते. हा लेख वाचीत असतांना वाचकांनीं लक्षांत ठेवलें पाहिजे तें हें कीं सदर लेख अच्युतरावांनीं एका टांकानें व एका

बैठकींत, कुठल्याहि संदर्भग्रंथाचा काडीइतकाहि आधार न घेतां लिहिलेला आहे! या एकाच जंगी लेखावरून त्यांच्या अपूर्व टिळकभक्तीविषयीं कोणाचीहि खात्री झाली पाहिजे असें आम्हांस वाटतें. त्याशिवाय या लेखावरून त्यांच्या अपूर्व लेखनसामर्थ्याची आणि अपूर्व भाषाप्रभुत्वाविषयींची खात्री पटेल ती निराळीच! या लेखांत त्यांनीं सुंदर उपमा, मोहक अलंकार, हृदयंगम भाषाविलास आणि हृदयाला जाऊन भिडणारी वर्णनशैली यांची तर एकजात रेलचेल उडवून दिली आहे. "टिळकांचें स्फूर्तिदायक चरित्र 'मी' लिहीन" अशी त्यांच्या लेखणीची खुमखुम् होती आणि तें चरित्र जर त्यांच्या हातून लिहिलें गेलें असतें तर...पण...

टिळक! टिळक! टिळक! अच्युतरावांनीं टिळकांपेक्षां अधिक मान दुसऱ्या कोणा पुढाऱ्यास दिलाच नाहीं! 'विवेकानंद कीं टिळक?' असा प्रश्न मुद्दाम उपस्थित करून त्यांनीं आम्हांला 'टिळकच हवेत' असें उत्तर दिलें आहे व त्यांनीं दुसऱ्या एका लेखांत 'गांधीजींचे खरे गुरु टिळकच!' असा आपला टिळकभक्तीचा शिक्कामोर्तब उठविला आहे!

अच्युतरावांचें अंतःकरण सागराप्रमाणें अगाध आ[णि] नभोवितानाप्रमाणें विशाल होतें ही गोष्ट त्यांच्या डॉ. भांडारकर, मनोरंजनचे मित्र इ. लेखांवरून उत्कृष्टपणें नजरेस येते. त्यांचे टीकालेख जसे वज्राप्रमाणें कठोर असत तसेच त्यांचे गुणदिग्दर्शक लेख कुसुमाप्रमाणें कोमल असत! ते गुणांचा अभिमान धरीत—त्यांना कसल्याहि प्रकारचा भेदभाव माहीतच नव्हता! दे. केळकरांचें त्यांच्या हातचें अपूर्व गुणवर्णन (पा. ६१) कोणालाहि विस्मितच करील!

त्यांच्या विविध लेखांची मौज तरी अशीच विलक्षण आहे. वत्सलावहिनीच्या पत्रांपैकीं खास अच्युतरावांच्या हातचीं पत्रें कोणतीं याची अजून पुरी छाननी व्हावयाची आहे. तरी ज्यांबद्दल शंका नाहीं अशीं त्यांचीं दोन पत्रें या स्मारकग्रंथांत आम्ही नमुना म्हणून दिलीं आहेत. त्याशिवाय त्यांची सोमवारची कहाणी तर फार सुरस आहे. त्यांचा 'बोंबाबोंब' हा लेख त्यांच्या अत्यंत मार्मिक निरीक्षणाचीच साक्ष देतो! इतका 'मर्मभेदक' लेख आमच्या तरी पाहण्यांत नाहीं. 'मराठी काव्याची प्रभात' हा लेख त्यांच्या

नितांत रम्य वाङ्मयदृष्टीची जागती निशाणीच होय. त्यांचे भविष्यावरचे व इतर विषयांवरचे लेखही असेच चटकदार व सहजसुंदर वठलेले आहेत.

या ग्रंथाच्या अनुक्रमणिकेंतील छोटचा व मोठचा लेखांची यादी पाहणारास अवघ्या तीनशें पानांत आम्ही किती कसोशीनें अनेक लेखांना कोंबून भरलें आहे त्याची प्रचीति येईल. सर्व लेखांतून अच्युतरावांच्या रोमरोमांत मुरलेलें स्वातंत्र्यप्रेम वाचकांना दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं !

'त्या पैशावर थू: !' आणि 'संदेशचें धोरण' हे लेख म्हणजे तर त्यांच्या अपूर्व जीवनक्रमाच्या चाव्याच आहेत! त्यांच्या हृदयकपाटांतील प्रेमाची श्रीमंती लुटावयास या चाव्यांचा उत्कृष्ट उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं.

अशा प्रकारें या स्मारक-ग्रंथांतील लेखांची कसोशीनें निवड करून त्या लेखांतून अच्युतरावांचें हृदय दृग्गोचर होईल अशी ग्रंथाची रचना केलेली आहे. आमच्या स्वाधीन करण्यांत आलेल्या तीनशें पृष्ठांत इतर भरताडीचा मजकूर घुसूं नये ह्मणून आह्मी प्रस्तावनेपासून तों समारोपापर्यंत शक्य तितके अच्युतरावांच्याच हातचे लेख दिले आहेत. त्यांच्या प्रचंड साहित्यसेवेची जी प्रचण्ड यादी आह्मी दिली आहे तीवरून त्यांचें सार्वजनिक चरित्रहि चाणाक्ष वाचकांना आकलितां येईल ! प्रचंड वाङ्मयसेवा आणि या वाङ्मयसेवेमार्फत स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म आणि सर्वेश्वर यांचें निर्लेप आणि निर्लोभ पूजन हेंच अच्युतरावांचें चरित्र ! हें पूजन करीत असतां त्यांनीं तुरुंगवास तर पत्करला, छळ तर सोसले, आपत्तींचे तडाखे तर हंसत्या मुद्रेनें सहन केले आणि 'पैशावर थू: !' करून त्यांनीं उपभोगांनाहि तुच्छ लेखलें ! हेंच अच्युतरावांचें उज्ज्वल चरित्र !

याशिवाय आणखी विस्तृत असेंहि त्यांचें चरित्र लिहितां येईल पण तें या स्मारकग्रंथांत देण्याचें आह्मी मुद्दामच टाळलें आहे. कारण त्यांचें सत्य चरित्र लिहिण्याचा काळ अजून आलेला नाहीं आणि शिवाय आज आह्मांला कोणतेहि वादग्रस्त विषय उकरून काढून स्मारकग्रंथाच्या पवित्र कार्याला गालबोट लावावयाचेंहि नाहीं.

या लहानशा ग्रंथावरून अच्युतरावांच्या प्रचण्ड दीर्घोद्योगाची व त्यापेक्षांहि प्रचंडतर वाङ्मयसेवेची वाचकांना अंधुक कल्पना जरी आली तरी आमच्या

श्रमांचें सार्थकच होणार आहे. याच एका बलवत्तर इच्छेनें आह्मी या तीनशें पानांत शक्य तितके अधिक लेख–बंदुकींत ज्याप्रमाणें ठांसून ठांसून दारू भरतात त्याप्रमाणें–ठांसून कोंबले आहेत. पृष्ठें थोडीं असलीं तरी वाचकांना त्यांत उत्कृष्ट काव्याचे, नाजुक भावनांचे, उत्कट प्रेमाचे, रम्य कल्पनांचे मनोहर विलास आढळतील आणि भावी पिढीला व लेखकवर्गाला सदर ग्रंथ मार्गदर्शक होऊन वाचकांचीं मनें देशप्रेमाच्या, धर्मनिष्ठेच्या आणि स्वातंत्र्य-प्रीतीच्या परममंगल भावनांनीं उचंबळून येतील !

शेवटीं आह्मांला, अच्युतरावांना नितांत प्रिय असलेल्या महाराष्ट्राला एकच खडखडीत सवाल विचारावयाचा आहे कीं ' तुह्मी असल्या रत्नाचा अभिमान धरणार कीं रत्नाला गारगोटी समजून त्याचा..." पण नको, असला अमंगल विचारच नको ! मांगल्याचीच शपथ, पुण्याईचीच आणभाक कीं महाराष्ट्रदेवीच्या कंठांतील हें अपूर्व रत्न आह्मी मोठ्या प्रेमानें शिरींच धारण करणार !

हे सर्व लेख आतां गतेतिहासाच्या सदरांत गेले असून वाचकांनीं ते राजकारणाच्या दृष्टीनें न वाचतां निर्मळ वाङ्मय या दृष्टीनेंच वाचावे अशी आमची सूचना आहे.

अच्युतरावांनीं स्वतःच्या दिव्य शब्दांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत ह्मट-ल्याप्रमाणें आतां तरी त्यांचे तेजस्वी विचार जगत्कटाह दुमदुमवून टाकतील आणि भाषासौंदर्य व विचारसौंदर्य यांनीं नखशिखान्त नटलेलें, सर्वांनाच एकजात मान्य होणारें व रसिकांना तोषविणारें हें वाङ्मय परमोच्च स्थानीं विराजमान होईल अशी आम्ही उमेद बाळगतों.

सत्याचा सदभिमानी,

**अनंत हरि गद्रे.**

निर्भीड–कचेरी,
मुंबई नं. ४.
ता. १५–६–३३.

# आभारप्रदर्शन.

एकाएकीं त्यांच्या काय मनांत आलें तें देव जाणे, पण धाकटा भाऊ समजून माझ्यावर प्रेम करणारे, माझ्या हरएक कृतीविषयीं प्रेमळ मित्राप्रमाणें अभिमान बाळगणारे आणि मला गुरूप्रमाणें भासणारे दे. भ. अच्युतराव कोल्हटकर यांनीं स्वर्गाची पायरी चढण्याच्या अगोदर फक्त तीन महिने, तुरुंगांतूनच मला एक 'संदेश' पाठविला आणि जसा एकादा वडीलधारा माणूस मृत्यूला कवटाळण्यापूर्वी आपल्या प्रपंचाची निरवानिरव करून ठेवतो त्याप्रमाणें त्यांनीं अमुक अमुक गोष्टी 'तुम्ही करा' म्हणून आज्ञा केली.

पण तें आज्ञापत्र पाठविल्यावर अच्युतराव थोड्याच दिवसांत तुरुंगांतून सुटून आले आणि मलाहि 'सुटलों एकदांचा' असें वाटलें. पण दैवगति कांहीं विचित्र होती. 'क्रॉनिकल'मार्फत 'संदेश' पत्र नव्या जोमानें निघण्याची सर्व तयारी पुरी होत आली असतांच, निर्घृण काळानें अचानक छापा घालून त्यांना स्वर्गलोकांत ओढून नेलें, आणि त्यांच्या सार्‍या इच्छा तशाच अपूर्ण राहिल्या! त्यांच्या या इच्छा पुर्‍या करून दाखविणें मला कांहीं शक्य नाहीं. एकतर त्यांचें प्रचण्ड बुद्धिवैभव माझ्याजवळ नाहीं आणि दुसरें असें कीं वाटेल त्या आपत्ती कोसळल्या तरी त्या हंसतमुखानें सहन करण्याचें अपूर्व योगसामर्थ्य मला साध्य झालेलें नाहीं. तुम्हीं कांहीं म्हणा, तुम्ही कितीहि खिजवा, तुम्ही अगदीं निर्भेळ काकदृष्टीनें 'साहेबां'चे कितीहि दोष काढून दाखवा, तरीपण त्यांच्या भव्य चरित्राकडे पाहिलें, त्यांच्या बुद्धिवैभवाचें डोळे दिपविणारें अजब तेज आठवलें, आपत्तींना तोंड देतां देतां तोंडावर हास्य विलसित ठेवण्याचें त्यांचें अचाट मन:सामर्थ्य मनांत आणलें, म्हणजे मनाची अशी खात्री पटते कीं हा कोणीतरी श्रेष्ठ ('भ्रष्ट' म्हणा हवेंच तर!) योगिराज स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा यांची फलाशारहित सेवा करण्यासाठीं आपल्या प्रिय महाराष्ट्रांत जन्माला आलेला होता! अशा योगिराजानें मनांत आणलेल्या व शेवटीं अतृप्त राहिलेल्या इच्छा पूर्ण करणें हें काम अत्यंत दुर्घट होय!

असें असलें तरी माणसानें प्रयत्नांची कांस न सोडतां देव बुद्धि देईल त्याप्रमाणें, अल्प म्हणा कीं स्वल्प म्हणा, कार्य करीत राहिलेंच पाहिजे ! या कामीं मला दुसऱ्याहि अनेक मित्रांचें साह्य झालेलें आहे आणि त्या सर्वांचे आभार मानण्यासाठींच मी लेखणी हातांत घेतली आहे.

या कामीं जें प्रोत्साहन मला मिळावयाला पाहिजे होतें तें अच्युतरावजींचे सुपुत्र श्री. कुसुमाकरपंत यांनीं आनंदानें दिलें ही गोष्ट मला कृतज्ञतापूर्वक नमूद केली पाहिजे. अच्युतरावजींचे मित्र व चहाते श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर, सरदार बाळासाहेब घोरपडे, पांडुरंगपंत भागवत, देशदास रानडे, दत्तोपंत नेरॉय, नरहरपंत जोशी, सोमणशास्त्री, दत्तोपंत सारोळकर, 'रत्नाकर' चे चालक अप्पासाहेब गोखले, गोपाळराव ओगले, गजाननराव माडखोलकर, तळावडेकर, आत्मारामपंत भट, अप्पासाहेब कोल्हटकर, गोपाळराव अधिकारी, नारायणराव खरे, मामा दीक्षित, बाळ मास्तर, भाई सामंत, शिंदेमास्तर, वि. वि. जोशी इत्यादींनीं जें मनःपूर्वक साह्य केलें त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. अच्युतरावांचें प्रेमळ गुणसंकीर्तन करणाऱ्या सर्व थोर मंडळीचे आभार मला मानलेच पाहिजेत. लो. ना. बापूजी अणे यांच्या शुभसंदेशाचा तर मला बॉम्ब गोळ्याप्रमाणेंच उपयोग झाला. त्यांच्या पत्रानें सर्व संकटांच्या क्षणार्धांत चिंध्या उडाल्या हें पाहून कांहीं कांहींनीं तर तोंडांत बोटें घातलीं ! अच्युतरावांच्या पुण्याईचा जोर विलक्षण खरा ! आणि खरें सांगावयाचें म्हणजे हें सारें अच्युतरावांच्या पुण्याईमुळेंच झालें. अशा त्या थोर पुण्यपुरुषाचें पुण्यस्मरण करून व चुकून ज्यांचे आभार मानावयाचे राहिले असतील त्या सर्वांचे क्षमायाचनापूर्वक पुनः पुनः आभार मानून हें आभारप्रदर्शन आटोपतों.

निर्भीड कचेरी,
मुंबई नं. ४.

सर्वांचा नम्र सेवक
**अनंत हरि गद्रे.**

८७८ ११ ८०८ ९५७१३३

# अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ. |
|---|---|---|
| | प्रास्ताविक चर्चा | २ ते ३१ |
| | कोल्हटकरांचे लेख:— | |
| १ | मंगलाचरण | ३२ |
| २ | गोविन्द गोविन्द | ३३ |
| ३ | लोकांतील लोकमान्य | ३७ |
| ४ | पूर्णावतार श्रीकृष्ण | ४४ |
| ५ | श्रीरामजन्म | ४७ |
| ६ | पुण्डलीक वरदे हरि विठ्ठल | ५१ |
| ७ | शिवाजीचा लोकोद्धार | ५६ |
| ८ | विसरूं नको | ६२ |
| ९ | बोला, जय जय रघुवीर समर्थ | ७१ |
| १० | महाराष्ट्रास स्वातंत्र्याचा संदेश | ७९ |
| ११ | स्वातंत्र्याचा प्रचंड उत्सव | ८१ |
| १२ | स्वराज्य स्थापा ! स्वराज्य स्थापा | ८४ |
| १३ | स्वराज्याचीं साधनें | ८६ |
| १४ | हें हिमतबाजांचें काम आहे | ८८ |
| १५ | हिमतीनें पुढें चला | ९० |
| १६ | ॐ भवति भिक्षां देहि | ९३ |
| १७ | शेवटची वेल सुकली | ९७ |
| १८ | विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक | १०९ |
| १९ | सोन्याचा दिवस | ११९ |
| २० | डॉ. भांडारकर दीर्घायुषी होवोत ! | १२९ |
| २१ | गांधी मुंबईत आले | १३३ |
| २२ | दादाभाई बना ! | १३५ |
| २३ | कै. गोपाळ कृष्ण गोखले | १३८ |
| २४ | लोकमान्यांचा स्वर्गवास | १४२ |

२५ **लोकमान्यमय स्पेशल अंकः**—शोकाचा अग्नि, महाराष्ट्रांतील हाहाःकार, गडकऱ्यांना परत बोलवा, स्वर्गातील सुरसुंदरी, गॉड ईज वीपिंग, टिळकांचें अद्वितीयत्व, टिळक आणि पक्षभेद, अनावर शोक, लोकमान्यांसाठीं रडा, महाराष्ट्राची अब्रू, प्रतिपक्षी रँ. परांजपे, प्रतिपक्षी रा. कोठारी, प्रतिपक्षी सर नारायण, खांदेकरी टिळक, लोकमान्य पदवी, तरवारीचे कोयते, महर्षी रानडे, रानड्यांचें गुरुत्व, विष्णुशास्त्री चिपळूणकर, चिपळूणकरांच्या कार्याचा पसारा, अपूर्व अभिमान, टिळक व आगरकर, म्हातारचळ कीं पोरखेळ, टिळकांचें अफाट चरित्र, टिळक व पिकेटिंग, स्वराज्याची चळवळ, टिळक व नाटयकला, टिळक व संस्कृत भाषण, टिळकांचें औदार्य, टिळकांचें अलौकिक धैर्य, रँडसाहेबांचें प्रकरण, टिळक व भानु, टिळक व लंगोटीवाले, टिळकांवरील खटला, चणे खावे लोखंडाचे, ताई महाराज प्रकरण, फौजदारी खटला, परमेश्वराची कृपा, टिळकांचा हीरोचा पार्ट, सुरतेची कॉंग्रेस, टिळकांची हुकमत, टिळकांचें हायकोर्टातील भाषण, सहा वर्षांची शिक्षा, टिळक कुठें सांपडतील, कावळा स्पर्श करीना, पांच पांडव, टिळकांची अखेरची इच्छा. ... ... ... १४७ ते २०२

२६ मनोरंजनचे मित्र ... ... ... २०३

२७ स्वामी श्रद्धानंदांचा जयजयकार ... ... २०८

२८ मरण म्हणजे मृत्यु नव्हे ... ... २१३

२९ त्या पैशावर थूः ! ... ... ... २१६

३० संदेशचें धोरण ... ... ... २१९

३१ जय जय रघुवीर समर्थ ... ... २२९

३२ मराठी काव्याची प्रभात ... ... २३३

३३ सौ. वत्सलावहिनीचें पत्र ... ... २४८

३४ मुंडावळी बांधून बसले ... ... २५३

३५ सोमवारची कहाणी ... ... ... २५८

३६ ज्योतिषविद्या आणि भविष्यकथन ... ... २६४

| | | |
|---|---|---|
| ३७ | लालबदामची तिर्री ... ... ... | २७४ |
| ३८ | कोळसा, लोखंड, आणि बर्फ ... ... | २८० |
| ३९ | गणेश–पुराण ... ... ... | २८४ |
| ४० | माधवश्रमांत शिवाजी ... ... ... | २८९ |
| ४१ | तरुण मनुष्या ऊठ ... ... ... | २९४ |
| ४२ | राजसंन्यास व त्याचा कर्ता ... .... | २९६ |
| ४३ | नवरा–बायकोमधील नोटीस ! ... ... | २९८ |
| ४४ | चहा, चिवडा, चिरूट ! .... ... | ३०० |
| ४५ | बोंबाबोंब ! ... ... ... | ३०२ |
| ४६ | पहिली रात्र ... ... ... | ३०४ |
| ४७ | दुसरी रात्र ... ... ... | ३०५ |
| ४८ | त्याचीच जात श्रेष्ठ ... ... ... | ३०६ |
| ४९ | तोच मनुष्य धन्य ... ... ... | ३०७ |
| ५० | महात्मा गांधींचा जयजयकार ... ... | ३०८ |
| ५१ | कवितेचा कैवारी ... ... | ३१२ |
| ५२ | कोण पाहिजे ? टिळक कीं विवेकानंद ... | ३१४ |
| ५३ | वाघिणीचे जाळींत ... ... ... | ३१६ |
| ५४ | समारोप ... ... ... | ३१९ |

त्याशिवाय मधून मधून दिलेले छोटे उतारे:–

अस्पृश्यता काढून टाका ! (पा. ४३), घारीसारखे चपळ बना ! (पान ४७), तात्यासाहेब केळकर (पान ६१), पैसा नको स्वराज्य पाहिजे ! (पा. ७८) मी कधींहि भिणार नाहीं ! (पान ९६), गरिबांना विसरले ! (पा. १०८), राजसंन्यासाची गोड कल्पना (पा. ११८), दिवाळीचीं कडबोळीं (पा. १२८), आनंदाची गोष्ट (पा. १३१), कुजक्या नारळांची खैरात (पा. १३४), मानवजातीचे सम्राट् (पा. १४१), दिवाळीचीं कडबोळीं (पा. २०२), दिवाळीचीं कडबोळीं (पा. २०७), टिळकांचा टिळकपणा (पा. २१२), कडवे बोल (पा. २१५), कडवे बोल (पा. २२८), कडवे बोल (पा. २३२), महाराष्ट्राची जबाबदारी (पा. २५२). लो. टिळकांच्या कीर्तीचें कारण (पा. २६३), जगांत वागावें कसें ? (पा. २७९), जगांतली गंमत ! (पा. २८३), अधःपात कां करून घेतां ? (पा. २८८), आमचें ब्रीद ! (पा. ३११).

# कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकरांच्या स्मारकग्रंथाला

# * अच्युतरावांचीच प्रस्तावना !

" मनुष्यानें स्वत:संबंधानें मरेपर्यंत लिहूं नये ! तो जेव्हां मरणाच्या द्वारीं उभा राहील त्याच वेळेस स्वत:च्यासंबंधानें कांहींतरी लिहिण्याचा त्याला अधिकार पोंचतो; तोंपर्यंत पवित्र उपदेश, श्रेष्ठ कार्य आणि उच्च ध्येय हीं नजरेपुढें ठेवून त्यानें श्रम करीत रहावें हेंच उत्तम ! आणि मरणाच्या वेळीं तरी त्यानें कां लिहावें ? तर ज्या न्यायशील जनतेपुढें तो उभा असतो आणि ज्या जनतेच्या चरणसेवेचा सुखास्वाद त्याला मरेपर्यंत मिळण्याचा संभव असतो त्या जनतेचें, त्या जनतारूपी जनार्दनाचें, दर्शन त्याला पुन्हां घडणार नसतें म्हणून ! आणि त्याहि वेळीं तो जर तेवढेंहि न बोलेल तर उत्तमच ! ज्यानें सर्व जन्म कर्तव्याचरणांत घालविला आणि मरायच्या वेळेलासुद्धां ज्यानें आत्मसमर्थन केलें नाहीं ! वाहवा ! त्याची योग्यता काय विचारायची आहे ? सर्व जन्म दुसऱ्यांच्या इच्छा तृप्त करून स्वत:च्या थोरवीसंबंधानें चकार शब्दहि न काढणारा कल्पवृक्षच तो ! आणि आम्हीं म्हणतों कीं मनुष्यानें स्वत:संबंधानें चार शब्द तरी काढण्याची जरूर काय ? त्यानें जर सत्कृत्यें केलेलीं असलीं तर तीं सत्कृत्यें इतकीं वक्तृत्ववान् होतील कीं नारदाच्या ब्रह्मवीण्यावरील बोलांप्रमाणें तीं सर्व जगत्कटाह दुमदुमवून टाकतील ! "

---

* संदेश ३१ मार्च १९२०, ' नाटक झालें जन्माचें ' ह्या लेखांतील उतारा. हा उतारा म्हणजे जणूं काय त्यांनीं स्वत: कमाई करून ठेवलेल्या वाङ्मयधनाचें मृत्युपत्रच होय. इतकें सुंदर मृत्युपत्र आजपर्यंत कोणीहि लिहून ठेवलेलें नाहीं ! स्मारकग्रंथ म्हणजे तरी काय ? वाङ्मयाची तिजोरीच ! अर्थात् या तिजोरीच्या प्रदर्शनाला वरील तेजस्वी विचारांपेक्षां अधिक तेजस्वी प्रस्तावना दुसरा कोण लिहूं शकेल ? —संपादक.

# कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकरांच्या वाङ्मयसेवेचा प्रचंड व्याप

## वृत्तपत्रें, मासिकें व मालाः—

( १ ) साप्ताहिक **शुभसूचक** (लेखक सन १९०६); (२) साप्ताहिक **देशसेवक** ( संपादक सन १९०७ व १९०८ ); (३) मासिक **श्रुतिबोध** (संपादक सन १९१२ ते १९१४); (४) मासिक **उषा** (संपादक सन १९१३); (५) दैनिक **संदेश** (संपादक सन १९१५ ते १९१८); (६) दैनिक **मेसेज** (संपादक सन १९१७); (७) दैनिक **संजय** (संपादक सन १९१८); (८) दैनिक **संदेश** (संपादक सन १९१८ ते १९२१); (९) दैनिक **इंदुप्रकाश** (प्रमुख लेखक सन १९२१); (१०) साप्ताहिक **सुदर्शन** (प्रमुख लेखक सन १९२१ व १९२२); (११) साप्ताहिक **टिळक** (प्रमुख लेखक सन १९२२); (१२) दैनिक **वन्दे मातरम्** (लेखक सन १९२२ ); (१३) दैनिक **संदेश** (संपादक सन १९२३); (१४) साप्ताहिक **युगांतर** (संपादक सन १९२४); (१५) साप्ताहिक **चाबूक** (संपादक सन १९२४); (१६) साप्ताहिक **रणसंग्राम** (प्रमुख लेखक सन १९२४); (१७) दैनिक **स्वातंत्र्य** (प्रमुख लेखक सन १९२४, नागपूर); (१८) साप्ताहिक **विदूषक** (लेखक सन १९२०); (१९) साप्ताहिक **चाबूकस्वार** (संपादक सन १९२५ ते १९२७); (२०) साप्ताहिक **संदेश** (संपादक सन १९२७); (२१) दैनिक **संदेश** (संपादक सन १९२८); (२२) दैनिक **राष्ट्रमत** (संपादक १९२९); (२३) दैनिक **संदेश** (संपादक सन १९२९ व १९३०); (२४) दैनिक **दैनिकवृत्त** (लेखक सन १९३०); (२५) दैनिक **डेली न्यूज** (लेखक सन १९३०); (२६) **महाराष्ट्र-मंगलमाला** (संपादक सन १९३०); (२७) दैनिक **प्रभात** (प्रमुख लेखक सन १९२९ ते १९३१).

## नाटकेंः—

(१) **विवेकानंद** (प्रकाशित); (२) **नारिंगी निशाण** (प्रकाशित); (३) **ताई तेलीण** (अप्रकाशित); (४) **वट्ट्या बोळ** (अप्रका-

शित); (५) **चांदविबि** (अप्रकाशित); (६) **देवी अहिल्या** (अप्रकाशित); (७) **तिनें काय सांगितलें?** (अप्रकाशित); (८) **सौख्यसोपान** (प्रकाशित); (९) **मस्तानी** (प्रकाशित); (१०) **नूतनचंद्र** (अप्रकाशित); (११) **इश्श मेलं पुणें!** (अपूर्ण).

**कादंबऱ्या:—**

(१) **इंग्रजांचा पराभव** (प्रकाशित); (२) **लोकमान्यांच्या समाधीपुढें** (प्रकाशित); (३) **साधु कीं सैतान?** (अपूर्ण); (४) **चोरून चुंबन** (अपूर्ण); (५) **नर्सची करुण कहाणी** (अपूर्ण).

**गोष्टी:—**

(१) **पहिली रात्र**; (२) **दुसरी रात्र**, (३) **विसकटलेली वेणी**, (४) **रंगीला रसूल** (सरकारजमा), (५) **कोल्हापूरच्या अक्कासाहेब**, (६) **गुलाबी विधवा**, (७) **भोळा साम्ब**.

**इतर पुस्तकें:—**

(१) **चोरी कशी करावी?**, (२) **संक्रान्तीचा तिळगुळ ऊर्फ सर्वधर्मांची परिषद्**, (३) **सौ. वत्सलावहिनींचीं पत्रें**, (४) **भगतसिंगाचें चरित्र** (सरकारजमा), (५) **बाबू गेनू चरित्र**, (६) **नाना फरारीचा पोवाडा** (सरकारजमा.)

**प्रस्तावना:—**

(१) **सम्राट् अशोक**—कादंबरी, (२) **भस्मासुर**—कादंबरी (३) **दर्यादौलत**—नाटक (४) **जेधे-जवळकर**—चरित्र.

वरील यादीवरून कोणालाहि दे. भ. अच्युतराव कोल्हटकरांनीं केलेल्या प्रचंड वाङमयसेवेच्या प्रचंड व्यापाची कल्पना येईल अशी आशा आहे. हेंच त्यांचें खरें स्फूर्तिदायक चरित्र होय.

**याशिवाय** अच्युतरावांनीं 'चित्रमयजगत्', 'मासिक मनोरंजन', 'मौज', 'करमणूक' इत्यादि नियतकालिकांतून धर्म, राजकारण व साहित्य यांवर अत्यंत चटकदार निबंध लिहिले आहेत ते निराळेच. भावी चरित्रकारांनीं या सर्वांची जंत्री काळजीपूर्वक करणें आवश्यक होय. येथें दिलेली यादी अपुरी आहे हें आम्हीं मुद्दाम नमूद करून ठेवतों. **—संपादक.**

सं.
ता.


# अच्युत.

[ भूपती खरे ते०—या चालीवर ]

धनविभवसुखावरि सुखें तिलांजलि सोडी
कामिनीसुताच्या मायापाशा तोडी
आयुष्य-जीवना स्वजनहितार्थी झिजवी
सर्वस्व सर्वथा स्व-देशचरणीं वाही
लेखणी चंचला ज्योति । तळपली
वैखरी शारदामूर्ति । प्रगटली
ती अनलज्वालास्फूर्ति । विलसली
हृत्कमल जयाचें अफाट गगना दिपवी
तो 'अच्युत' जगतीं खराच अ-च्युत राही ॥ १ ॥
पारतंत्र्य-नरकामधुनि मुक्त होवोनी
उत्कर्ष-हिमाचलिं शोभो भारतजननी
ही ज्वलित मनीषा वसे रोमरोमांत
त्यापरीच उज्वल कृती घडे दिनरात
दे स्व-देशसेवक-वेष । जीवना
'प्रभु एक आपुला देश । अन्य ना'
कथियेला हा सन्देश । निज जना
धैर्याचा मेरू परम संकटांमाजीं
तो 'अच्युत' जगतीं खराच अ-च्युत गाजी ॥ २ ॥

नागपूर,
सोमवार, ता. ५ जून १९३३ } आनंदराव कृष्णाजी टेकाडे.

# अच्युतरावजींचें मराठी हस्ताक्षर.

## MILLHANDS MILLS SCHEME.

### (THE BABOO GENU MILLS.)

*President:—*
Dr. R. K. Gevande.

*General Secretary:—*
D. N. Surve.

*Secretaries:—*
S. N. Modak.
K. D. Shinde

Khatav Makanji Wadi, BOMBAY, No. 4.
&
Mongini Building, Church Gate
Street, Fort, BOMBAY.

Date 2nd June 1931.

My dear [illegible]:—

शतशः आशीर्वाद. विशेष.

(१) हिंदुस्थान कोणाचे? ह्याविषयीं हिंदुधर्मी [illegible]
निर्विवादपणें
[illegible] बोलतो आहे [illegible] प्रसार करणें [illegible]
[illegible] मराठ्याचें हित आहे [illegible] हिंदुधर्माचा
प्रसार करणें [illegible] आजूबाजूच्या
[illegible]
नाही. १९२८ हिंदुस्थानच्या [illegible] आ-
[illegible] आहे! [illegible] कांग्रेस-
ने आपण हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी [illegible]
की कोण आहे? [illegible] आणि [illegible]
[illegible] हिंदू [illegible] - व हिंदू मराठी [illegible]
[illegible] आहे [illegible]

# अच्युतरावांनीं आपल्या मुलास लिहिलेलें
# शेवटचें पत्र.

Bombay
Date–2nd June 1931.

My Dear बन्याबापू:—

अनेक आशीर्वाद विशेष.

( १ ) दुसऱ्या कोणत्याहि धर्मापेक्षां हिन्दुधर्म हा निर्विवाद रीत्या चांगला आहे, व त्याचा प्रसार करणें ह्यांत खरोखरीच जगाचें हित आहे. हिन्दुधर्माचा प्रसार करणें ह्यांत मनाचा आकुंचितपणा मुळींच नाहीं. उलट हिन्दुधर्माच्या प्रसारामुळें जगाचा आकुंचितपणा जाण्याचा सम्भव आहे. कॉंग्रेसनें आपण हिन्दु, मुसलमान, ख्रिश्चन, पार्शी, ह्यांपैकीं कोणत्याहि धर्माची नाहीं असें म्हणण्यापेक्षां स्वतःस हिन्दुधर्माची व हिन्दुमताची संस्था म्हटलें असतें तरी कॉंग्रेसला कोणत्याहि प्रकारें कमीपणा आला नसता ! उलट कॉंग्रेसच्यामुळें हिन्दुसमाजांतील हिन्दुधर्माविषयींचा तीक्ष्ण अभिमान कमी झालेला आहे तो वाढीस लागला असता, हिन्दुधर्माविषयींचा बाणा बाणला असता, हिन्दुधर्माच्या अडचणीच्या काळांत त्याचे शिरावर जो एक गुप्त ठोसा कॉंग्रेसनें दिलेला आहे, तो दिला गेला नसता व आजच्यापेक्षां कॉंग्रेसला जास्त Solidarity आली असती ! सध्यां थोडीशी अशी स्थिति आहे कीं, सर्वांशीं समेटाचा प्रयत्न करून हिन्दुसमाज हा जो कॉंग्रेसचा मुख्य बालेकिल्ला, तो कॉंग्रेसनें डळमळीत करून टाकलेला आहे व त्याचे ऐवजीं नवीन कोणताहि जोरदार किल्ला उभारलेला नाहीं ! कांहीं मुसलमान व पार्शी जरी कॉंग्रेसमध्यें आज झळकत असले तरी त्यांचा पक्ष जोरांत नाहीं, व ह्यांपैकीं कित्येक लोक केवळ धर्माच्याच दृष्टीनें कॉंग्रेसमध्यें आलेले आहेत !

( २ ) पुष्कळ लोकांना स्वतःला हिन्दु म्हणवून घेण्यास फार लाज वाटते. त्यांना असें वाटतें कीं, हिन्दु म्हणविणें वाईट–त्याच्यापेक्षां “ हिन्दी ” म्हणवून घ्यावें. परन्तु ही त्यांची चूक आहे ! स्वतःच्या देशांत त्या

देशाचा म्हणवून घेणें ह्यांत कांहींच चूक नाहीं ! इंग्लण्डमधील मनुष्यास इंग्लिशमन म्हणवून घेणें ह्यांत कमीपणा वाटत नाहीं ! पण आपण मात्र स्वतःस हिन्दु म्हणवून घेण्यास भितों, व त्याचे ऐवजीं "हिन्दी" असें मुळमुळीत अपभ्रष्ट रूप घेतों.

( ३ ) वस्तुतः हिन्दु असें म्हणवून घ्यायला आपण भ्यायला नको—एवढेंच केवळ नव्हे—तर सर्व जगांतील लोकांना आपण "हिन्दु" करवून घेतलें पाहिजे—हिन्दु म्हणवून घेण्यांत त्यांना आनन्द वाटायला लावलें पाहिजे. कारण हिन्दुधर्म हा सर्व जगाच्या कल्याणाचा धर्म आहे. त्याच्याच प्रसारांत जगाचें हित आहे.

( ४ ) कारण हिन्दुधर्म हा ( १ ) स्वातंत्र्याचा धर्म आहे, तो ( २ ) टॉलरेशनचा धर्म आहे—( तो कुणाच्याहि मताकरितां त्याचा छळ करीत नाहीं), ( ३ ) तो ज्ञानाचा धर्म आहे, ( ४ ) तो मानवी सुस्थितीचा ( well-being ) धर्म आहे, ( ५ ) तो Character ( शीलवान्-पणाचा ) चा धर्म आहे, व तो विश्वप्रेमाचा आणि विश्वप्रगतीचा धर्म आहे. ह्या धर्मासारखा दुसरा धर्म एकहि नाहीं व म्हणूनच तो इतका दीर्घ टिकलेला आहे ! यापुढेंहि जोंपर्यंत ह्या पृथ्वींत एकतरी समंजस मनुष्य शिल्लक राहील तोंपर्यन्त ह्या धर्मास धोका नाहीं !

( ५ ) दुर्दैवानें हिन्दुधर्म म्हणजे काय ह्याची खरी व यथार्थ कल्पना फारच थोड्यांना आहे ! त्यांना असें वाटतें कीं, एकादशीला उप-वास केला म्हणजे हिन्दुधर्म झाला—त्यांना असें वाटतें कीं, मांसाशन केलें नाहीं म्हणजे हिन्दुधर्म झाला ! पण खाणें पिणें अथवा बाह्यविधि ह्यांत हिन्दुधर्म मुळींच नाहीं ! हिन्दुधर्माचा आत्मा स्वातंत्र्य, स्वास्थ्य व ज्ञान हा आहे. It is the religion of liberty, well-being and knowledge. आणि म्हणूनच तो जगाच्या स्वीकाराला पात्र आहे.


( ६ ) ह्या सम्बंधानें एका निबन्धांत मी नुकतेंच सविस्तर विवेचन केलेलें असून त्यांत हिन्दुधर्माची व्याख्या ठरविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तो निबन्ध आज बुकपोष्टानें मी तुझ्याकडे पाठवीत आहें. तो तू त्यांत दोष काढण्याच्या दृष्टीनें वाचावास व त्या विषयावर जास्त विचार करा-

वास म्हणून मी आज तुझ्याकडे पाठवीत आहें ! कारण ही माण्डणी शक्य तितकी निर्दोष व्हावी व त्यांत कोणासहि आक्षेप काढतां येऊं नयेत, अशी माझी इच्छा आहे. कारण " हिन्दुधर्म " म्हणजे काय हें एकदां ठरलें म्हणजे त्याची सेवा कशी करायची—व जगांत त्याचा प्रसार कसा करायचा—ह्याचा विचार करतां येईल. पुढील[1] पत्रांत मी हिन्दुधर्माच्या आजपर्यन्त झालेल्या व्याख्या लिहीन व त्याचें जास्त विवेचन करीन ! एकदां हिन्दुधर्म म्हणजे काय हें ठरलें कीं बाकी पुढील कार्य, त्याचा प्रसार कसा करावा हेंच राहील. आ.

A. B. Kolhatkar.

१ हाय ! हाय ! अच्युतरावांचें हें शेवटचेंच पत्र असल्यामुळें 'पुढील पत्र' हा शब्द तसाच पत्रांत राहून गेला !

## अच्युतरावांच्या इंग्रजी हस्ताक्षराचा नमुना.



थोर पुढाऱ्यांनीं आणि थोर विद्वानांनीं प्रांजल मनानें केलेलें

# अच्युतरावांचें गुणसंकीर्तन.

( कै. अच्युतराव कोल्हटकरांच्या थोरपणाविषयीं बहुधा कोठेंच दुमत आढळत नाहीं. कोणाच्या मनांत तशी अंधुकहि शंका असेल तर त्यानें याखालीं दिलेलीं थोरथोर पुढाऱ्यांचीं व विद्वानांचीं पत्रें वाचावीं. या पत्रांतून अच्युतरावांच्या अंगीं वास करणाऱ्या बहुतेक सर्व गुणांचें संकीर्तन आढळेल. 'पांचामुखीं परमेश्वर' वास करतो असें म्हणतात—मग तोच न्याय या पत्रलेखकांच्या बाबतींत लागू करायला काय हरकत आहे? लो. ना. बापूजी अणे हे आज आपल्या हिंदुस्थान देशाचे अनभिषिक्त राजेच असल्यामुळें त्यांच्या पत्राला अर्थात्च अग्रपूजेचा मान देण्यांत आला आहे. )

## लो. ना. बापूजी अणे यांचें पत्र.

अनंतराव गद्रे यांनीं कै. वा. अच्युत बळवंत कोल्हटकर यांचे त्रोटक निवडक लेख प्रकाशित करण्याचें काम अंगावर घेतलें हें पाहून मला अतिशय आनंद होत आहे. रा. अच्युतरावजी कोल्हटकर यांचा दर्जा मराठी वाङ्मयांतील उत्कृष्ट लेखकांतसुद्धां बराच वरच्या प्रतीचा आहे हें कोणाही निरभिमानी व पूर्वग्रहविरहित वाचकास मान्य होईल. मराठी वाङ्मयांत त्यांनीं वैविध्य व वैचित्र्य आणण्याचे अनेक प्रयत्न केले व त्यांत प्रशंसनीय यश संपादन केलें. उत्कृष्ट कल्पना व ललित रचना यांनीं त्यांचे लेख खुलविले जात असल्यामुळें वाचकांचीं मनें ते सहज वेधून घेतात. 'वत्सलावहिनींची पत्रें' ही कोणत्या रसिकाच्या स्मृतींतून नष्ट होतील? अशा एका प्रतिभासंपन्न दांडग्या लेखकाच्या

कृती इतस्ततः विखुरलेल्या आहेत. त्या एकत्र करून ग्रंथरूपानें उपलब्ध होणें अवश्य आहे. असला ग्रंथ भावी मराठी ग्रंथकारांस अनेक रीतीनें साहाय्यक होईल यांत संशय नाहीं. रा. गद्रे यांनीं या बाबतींत उद्योग सुरू करून ते मित्रऋणच फेडतात असें नसून एकप्रकारें मराठी वाङ्मय-ऋणाचीही फेड करीत आहेत असें मला वाटतें. त्यांनीं हें काम अंगावर घेतल्याबद्दल सर्व मराठी वाचक त्यांचे आभारी होतील व सर्वांकडून या कामांत त्यांना यश येण्याकरितां अवश्य तें साह्य मिळेल अशी उमेद आहे.

पुणें, ता. १३–५–३३ **माधव श्रीहरी अणे.**

---

# धर्मवीर डॉ. मुंजे यांचें पत्र.

मुंबई ता. ७–६–३३

रा. रा. संपादक 'अच्युतराव कोल्हटकरस्मारकग्रंथ' यांस—

सा. न. वि. वि.—

आपण कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकर यांचे लेख छापण्याचें जें काम हातीं घेतलें आहे तें अत्यंत स्तुत्य आहे. अच्युतराव कोल्हटकर हे अत्यंत विद्वान् व प्रतिभाशाली लेखक होते. त्यांचे लेख भावी पिढीस स्फूर्तिदायक व मार्गदर्शक होतील यांत बिलकुल शंका नाहीं. आपण हा उद्योग हातीं घेऊन भावी पिढीला कल्याणप्रद होणारें कार्य करीत आहां आणि म्हणून सर्वांनीं या कार्यास मदत केली पाहिजे असें मला वाटतें. कळावें. ही वि. आपला.

**बा. शि. मुंजे.**

---

## प्रो. दत्तो वामन पोतदार यांचें पत्र.

१८० शनवार, पुणें.
मिती—वैशाख, व. ६ शके १८५५.
तारीख १४–५–१९३३.

श्री. मित्रवर्य अनंतराव गद्रे यांसी कृ. सा. न. वि. वि.—

रा. अच्युतराव कोल्हटकर यांचें वाङ्मय विविध व अफाट आहे, त्यांत कांहीं भाग तर मराठी वाङ्मयांत केवळ अपूर्व आहे आणि तो चिरंतन राहील असा आहे. प्रतिभेचा एक प्रलोभनीय विलास म्हणून अच्युतरावांचें लिखाण विशिष्ट प्रसिद्धि पूर्वींच पावलें आहे. तें लिखाण एकत्र प्रसिद्ध होईल तर मोठी उणीव भरून निघेल; न होईल तर मोठा उणेपणा राहून जाईल आणि शिवाय एका प्रतिभासंपन्न लेखकासंबंधांत कृतघ्नपणाचा दोष पदरीं येईल.

अच्युतरावांची लेखणी सामर्थ्यवान् व बहुरंगी होती. त्यांचे अनेक लेख अद्यापि वारंवार आठवतात. तेव्हां आपण तें काम हातीं घेतल्याबद्दल मी आपणांस धन्यवाद देतों. आपण अंगीकृत कार्य तडफेनें पार पाडाल अशी माझी खात्री आहे. आपणांला उत्तम यश चिंतितों. ग्रंथ लवकरच पहाण्यास मिळेल अशी उमेद बाळगतों. कळावें. ही विनंति.

**दत्तो वामन पोतदार.**

## प्रो. श्री. नि. चाफेकर यांचें पत्र.

रा. रा. अनंत हरि गद्रे यांस——सा. न. वि. वि.

कै. अच्युतराव कोल्हटकर यांचें स्मारक म्हणून त्यांच्या अनेकविध लेखांचा एक संग्रहात्मक ग्रंथ प्रसिद्ध करण्याची जी महत्त्वाची कामगिरी तुम्हीं आपल्या शिरावर घेतली आहे ती फार इष्ट, अवश्य व अभिनंदनीय आहे यांत शंका नाही.

आधुनिक महाराष्ट्राच्या दुसऱ्या पिढीतील खऱ्या राष्ट्रीय वृत्तीच्या, कर्तृत्ववान व प्रभावशाली वक्तृत्वगुणसंपन्न अशा तरुण देशसेवकांपैकीं कै. अच्युतराव कोल्हटकर हे एक प्रमुख होते. शिवाय स्फूर्तिदायक, ओजस्वी व विविधांगरम्य अशा वाङ्मयनिर्मितीच्या बाबतींत त्यांचें लेखनकार्य मराठी भाषेस अपूर्व भूषणरूप चिरस्थायी व महत्त्वाचें आहे, याविषयीं कोणाचा मतभेद होईल असें मला वाटत नाहीं.

तसेंच, साधारण जनतेच्या मनोवृत्तीचीं मर्मे बरोबर ओळखून, त्यांच्या अनुरोधानें, निरनिराळ्या संगानुसार, अनेक लहान मोठ्या गंभीर किंवा ललित व खेळकर विषयांवर चटकदार असून उद्बोधक अशा कल्पकतेनें व विविध विलासात्मक लेखनशैलीनें लेख लिहून " दैनिक वर्तमानपत्रें " वाचनीय व लोकप्रिय करण्याची त्यांची हातोटी तर केवळ अनन्यसाधारण होती हीही गोष्ट सर्वश्रुतच आहे. तेव्हां अशा अष्टपैलु व प्रतिभासंपन्न लेखकाच्या निवडक वाङ्मयाच्या संग्रहद्वारा त्याचें वाङ्मयरूप स्मारक यथाशक्य चिरस्थायी करणें हें महाराष्ट्रीयांचें केव्हांहि कर्तव्यच होतें. तें कर्तव्य बजाविलें जाण्याचा सुयोग, तुमच्या प्रस्तुत 'स्मारकग्रंथा'च्या उपक्रमानें कै. अच्युतरावांच्या दुसऱ्या वार्षिक स्मृतिदिनापर्यंत कां होईना, तरी पण, इतक्या लवकरच येत आहे ही मोठ्या समाधानाची व आनंदाचीच गोष्ट होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

विशेषतः या कर्तव्यपूर्तीचें आद्यश्रेय, कै. अच्युतरावांच्या विषयीं जिव्हाळ्याचा स्नेहादर बाळगणारे आणि त्यांच्या अनेकविध लेखनप्रवृत्तीचें यथार्थ स्वारस्य व रहस्य समजणारे अशा तुमच्या सारख्या, महाराष्ट्रजनतेस पूर्ण परिचित व प्रिय अशा चतुर संग्राहक मित्रास लाभत आहे हा सुयोगहि वाचकवर्गाच्या दृष्टीनें तितकाच आनंददायक व स्पृहणीय ठरल्यावांचून रहाणार नाहीं अशी माझी खात्री आहे.

म्हणून याच पत्रद्वारें, ' रा. गद्रे यांच्या प्रस्तुत प्रयत्नास–कै. अच्युतराव कोल्हटकरांच्या स्मारकग्रंथास–सर्व महाराष्ट्रजनतेनें भरपूर आर्थिक आश्रय देऊन त्यांच्या श्रमाचें व कर्तव्यबुद्धीचें योग्य चीज करावें, आणि स्वतःही कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्यासारख्या एका उज्ज्वल लेखन-

शैलीच्या व प्रतिभासंपन्न वाङ्मयसेवकाची स्मृति व कृति यथाशक्य चिरस्थायी करण्याच्या बावतींतील आपलें कर्तव्य अंशतः तरी बजाविल्याचें श्रेय संपादन करावें ' अशी मी सर्वांस प्रेमाग्रहाची विनंति व शिफारस करितों. क. लो. अ. ही विनंति आ.

पुणें, ४–६–३३ श्री. नि. चापेकर

# वीर वामनराव व दे. भ. वामणगांवकर यांचें पत्र.

श्री. अनंतराव गद्रे यांसः—

सा. न. वि. वि.

आपण व आपल्या स्नेही व सहकारी मंडळींनीं कै. अच्युतरावांसारख्या एका सर्वश्रेष्ठ वाङ्मय–सेवकास मराठी साहित्यांत सदैव स्मृतिरूपानें कायम ठेवण्याची योजना आरंभली आहे ती सर्वथैव अभिनंदनीय आहे. कै. अच्युतराव ह्यांच्या कार्याचा व्याप फार मोठा होता. तथापि मराठी साहित्यलेखकांत त्यांचा दर्जाहि श्रेष्ठच. त्यांच्याइतका रसाळ, कल्पक व तांतडीनें लिहिणारा लेखक महाराष्ट्रांत आमच्या परिचयांत तरी नाहींच. कै. अच्युतरावांनीं आपल्या लेखणीनें महाराष्ट्र हालविला, त्यास हंसविलें व रंगविलें. अशा लेखकाची स्मृति महाराष्ट्र–वाङ्मयांत जागृत राहणें अवश्य आहे. कै. विष्णुशास्त्री, कै. आगरकर व कै. शिवरामपंत परांजपे ह्यांची निरनिराळ्या तऱ्हेनें जशी महाराष्ट्र–वाङ्मयांत योग्यता सिद्ध आहे, तद्वतच कै. अच्युतरावांनीं सुद्धां आपलें स्वतंत्र गुरुपद महाराष्ट्रांत प्रस्थापित केलें आहे. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांनीं मराठीस नवा पोशाख चढवून नवें राजपद अर्पण केलें. कै. आगरकरांनीं तिला आपल्या तार्किक पद्धतीनें अधिक खुलविलें. कै. शिवरामपंतांनीं तिला हांसवून मर्मभेदक बनविलें आणि कै. अच्युतरावांनीं तिला निव्वळ दरबारीच ठेवलें नाहीं, निव्वळ पंडितांच्याच मांडीवर खेळूं दिलें नाहीं, तर पंडितांपासून तों सामान्यांपर्यंत सर्वांना सारखें रंगतां येईल असा तिला रंग दिला व आपला

स्वतंत्र दर्जा कै. अच्युतरावांनीं प्रस्थापित केला. अशा अद्वितीय लेखकाचे लेख ग्रंथरूपानें नवीन पिढीच्या पुढें येणें अवश्यच होतें. तें कार्य आपण हातांत घेतलें व त्याचा पहिला भाग प्रसिद्ध करण्याचें ठरविलें ह्याबद्दल आपलें अभिनंदन करणें अवश्य आहे. कै. अच्युतरावांचें वाङ्मय नवीन पिढीस स्फूर्ति देवो व मराठीवर तिच्याकडून असेच नवनवे अलंकार चढोत अशी आमची परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

आपले स्नेहांकित,

उमरावती. } **ना. रा. वामणगांवकर.**

ता. ३१।५।३३. } **वामन गोपाळ जोशी.**

---

# दे. भ. डॉ. सावरकर यांचें पत्र.

ॐ गिरगांव, मुंबई.

ता. १९-५-३३.

श्री. अनंतराव गद्रे यांस सप्रेम सा. न. वि. वि.—

आपण कै. श्री. अच्युतराव कोल्हटकर यांचें निवडक वाङ्मय अेकत्र करून तें भागशः प्रसिद्ध करण्याचा जो उद्योग चालविला आहे, तो अत्यंत स्तुत्य तर आहेच; परंतु अत्यंत आवश्यकहि आहे. अच्युतरावांचें वाङ्मय प्रसिद्ध करून आपण वैयक्तिक रीतीनें मित्रसेवा तर साधालच; परंतु त्या वाङ्मयाला वर्तमानपत्री वहात्या प्रवाहांतून काढून, चिरकाल टिकणाऱ्या ग्रंथरूपी सरोवरांत सोडून राष्ट्रीय-वाङ्मयाचीहि सेवा साधाल यांत मला तिळमात्र शंका नाहीं. कारण, कै. श्री. अच्युतरावांनीं मराठी वाङ्मयाची अितकी विविध प्रकारची तेजस्वी सेवा केली आहे कीं ती आपल्या महाराष्ट्राच्या पिढ्यानुपिढ्या डोळ्यांसमोर राहिली पाहिजे. अितकी अचाट कल्पना, अितका भाषाविलास, अितकी प्रतिभा आधुनिक कालांत अेक कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि दुसरे कै. काळकर्ते शिवरामपंत परांजपे यांच्या मागून फारच थोड्यांनीं दाखविली आहे.

तेव्हां असलें हें कै. अच्युतरावांचें युक्त स्मारक करण्याचें ठरवून आपण वैयक्तिक आणि राष्ट्र–वाङ्मयात्मक, असल्या दोन्ही ऋणांतून वव्हंशीं मुक्त व्हाल, असा मला भरंवसा आहे.

हा प्रयत्न आपल्या हातून शक्य तितक्या लवकर पुरा होवो व बृहन्म-हाराष्ट्र आपल्या परिश्रमाचें चीज करो असें इच्छून हें पत्र पुरें करतों.

आ. स्ने.

**ना. दा. सावरकर.**

# दे. भ. गोपाळराव ओगले यांचें पत्र.

नागपूर ता. ४–६–३३

सा न. वि. वि.––

सुप्रसिद्ध देशभक्त व प्रतिभाशाली लेखक कै. अच्युतराव कोल्हटकर यांची दुसरी पुण्यतिथी ता. १५ जून रोजीं येते. त्या दिवशीं ‘ मौज ’ पत्राचे जनक श्री. अनंत हरि गद्रे हे त्यांच्या विषयींचा स्मारकग्रंथ मुंबईस मोठ्या समारंभानें प्रसिद्ध करणार आहेत. वृत्तपत्रकार आणि ग्रंथकार या दोन्ही नात्यांनीं अच्युतरावांनीं मिळविलेला लौकिक सर्वश्रुतच आहे. दैनिक वृत्तपत्राचा व्यवसाय हा महाराष्ट्रांत बुडित समजला जात असे. पण कै. अच्युतराव यांनीं आपल्या अद्वितीय लेखनचापल्याच्या जोरावर तो लोकप्रिय आणि यशस्वी करून दाखविला. वर्तमानपत्रांतून, विशेषत: दैनिकांतून प्रकाशित होणारे लेख वाङमयगुणांनीं कितीहि मंडित असले, तरी ते सकाळीं उमलून संध्याकाळीं कोमेजणाऱ्या फुलांप्रमाणें, लवकरच स्मृतिशेष होऊन जातात. त्या दृष्टीनें कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्या निवडक लेखांचें संकलन होणें अत्यंत अवश्य होतें. तसा प्रयत्न श्री. अनंतराव गद्रे हे करीत आहेत, ही आनंदाची गोष्ट होय. कै. अच्युतराव कोल्हटकर यांच्या या स्मारकग्रंथाला भरपूर लोकाश्रय मिळेल अशी आम्हांला खात्री वाटते. कळावें. ही वि. आ.

**गोपाळ अनंत ओगले.**

अच्युतरावांच्याच तेजस्वी शब्दांत त्यांच्याच ग्रंथाचें

# मंगलाचरण.[१]

## * पाक परमेश्वरा !

पवित्र कोण ? पाक परमेश्वरा, पवित्र कोण ? तूं पवित्र—एक तूं पवित्र ! आणि तुझ्याचबरोबर आम्हां सर्वांची जन्मदात्री ही आमची हिन्दमाता पवित्र ! तूं जितका पवित्र, तितकीच ही पवित्र ! तूं अपरम्पार पवित्र ! हीहि अपरम्पार पवित्र ! पाक परमेश्वरा, हिंदमाता ही तुझीच मूर्ति, ही तुझीच स्फूर्ति, ही तुझीच कार्य-पूर्ति ! परमेश्वरा, तुझें कार्य इथें पुरें झालें ! विश्वमया, वेदमया, विद्यामया, सर्व जगताला चैतन्य आणण्याचें जें तुझें कार्य तें ह्या हिंदमातेच्या स्वरूपांत परिपूर्ण झालें ! तूं अगोचर पण ह्या हिन्दमातेच्या आकृतींत तूं गोचर झालास. तूं असंवेद्य पण ह्या हिंदमातेच्या स्वरूपांत तूं स्वसंवेद्य झालास. तूं अदृश्य, अस्पृश्य, अनधिवेश्य, पण ह्या हिन्दमातेच्या स्वरूपांत दृश्य, स्पृश्य व अधिवेश्य झालास. ह्या वेळीं तुकारामाची भक्ति आम्हांला दे व हिन्दमातेचे चरण आम्हांला भक्तीनें कवटाळूं दे ! ह्या वेळी मीराबाईची प्रीति आम्हांला दे, आणि

---

१ कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकरांच्या स्मारकग्रंथाचें मंगलाचरण त्यांच्याशिवाय दुसरा कोण लिहूं शकेल ? अच्युतरावजींचा खालील लेख इतका पवित्र आहे कीं तो वाचून ज्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रूंच्या धारा वहाणार नाहींत, ज्याच्या श्रद्धायुक्त हृदयांत पवित्र विचारांचें थैमान सुरू होणार नाहीं असा वाचक सांपडणेंच शक्य नाहीं. अच्युतरावांच्या तेजस्वी वाङ्मयसंग्रहाला इतकें सुंदर मंगलाचरण लाभलें हें आम्ही परम भाग्यच समजतों. हें मंगलाचरण वाचा आणि पवित्र विचारगंगेंत यथेच्छ अवगाहन करा.

* संदेश ता. २२ सप्टेंबर १९२८.

हिन्दमातेच्या वक्षःस्थलांत आम्हाला प्रीतीनें शिरूं दे ! ह्या वेळीं जनाबाईची वृत्ति आम्हांला दे आणि आमच्या सर्व वृत्ती तदाकार करुन हिन्दमातेच्या स्वरूपांत आम्हांला तदाकार होऊं दे.

घालीन लोटांगण । वन्दीन चरण ॥
डोळ्यांनीं पाहिन । रूप तुझें ॥

असें नामा म्हणून गेला. परमेश्वरा, पाक परमेश्वरा, ती वृत्ति–ती वृत्ति आम्हांला दे, आणि ह्या हिन्दमातेच्या चरणकमलाशीं आमचें सर्व कांहीं इतकें एकरूप होऊं दे कीं आमचें शरीर तिच्या चरणकमलाशिवाय निराळें राहूं नये !

होय असेंच कर, पाक परमेश्वरा, असेंच कर. परमेश्वरा, आम्हां सर्वांचीं हृदयें एकरूप कर, आणि त्यांचीं हिन्दमातेच्या चरणींचीं नूपुरें बनव ! आमचीं सर्वांचीं मस्तकें एकत्र जोड आणि त्यांचीं हिन्दमातेच्या चरणींची जोडवीं बनव ! आमचे सर्वांचे मेंदु एकत्र मिळव आणि त्यांची मेन्दी बनवून हिन्दमातेच्या चरणांना लाव ! आमच्या नयनांचीं तेजें एकत्र करून हिन्दमातेच्या नखांना चमकदारपणा आण ! आमच्या दिलांची दिलसफाई करून त्यांच्या सुसंगत संगीत ध्वनींत आमच्या मातेच्या पैजणांची रूम्झुम् ओत आणि आमचीं सर्वांचीं लाल रुधिरें एकत्र करून आमच्या हिन्द जननीचे चरणतल असे लालबुन्द दिसूं देत कीं जणूं कांहीं नुक्तेंच समुद्रांतून रविबिम्ब वर येऊं लागलें आहे; जणूं कांहीं हिन्दी महासागराचा प्रत्येक जलकण आपला नीलिमा टाकून गुलशन् गुलाब बनलेला आहे, जणूं कांहीं कमलासना कमलेनें हिंददेवीच्या अभिनंदनार्थ दशदिशांच्या चिपनळया करून त्यांत रंगपंचमीचे आनंदी रंग भरलेले आहेत!

आणि म्हणून, आणि म्हणूनच बरें हिंदभूमिके, तुझा नकाशा तांबड्या रंगानें रंगत असतो ! इतर साऱ्या देशांचे रंग निराळे, पण तुझा रंग तांबडा ! आफ्रिका हिरव्या कुंचल्यानें रंगवीत असतील, तिबेटावर उदी ब्रश मारीत असतील, सर्व एशिया पिवळया झाडूनें झिडकारित असतील, पण हिंदभूमिके, तुझा नकाशा तांबडा ! हिन्द हा एशियाचा एक भाग आहे. हिमालयाच्या कुन्तलांतून गंगा, सिन्धु, सरस्वतीसारख्या शुभ्र किंवा नील सरिता ह्या भूमीचें हृदय आर्द्र करीत आहेत, हिच्या प्रमाणेंच त्रिकोणी बंगल्यांत बसविलेली आफ्रिका हिरवा साज सजवून जगाच्या पुढें साजरी दिसत आहे, आणि तरीहि हिन्दभूमिके, तुझा नकाशा तांबडाच ! पिवळया एशियाचा हा तांबडा पदर, पिवळया

एशियाचा हा तांबडा कांठ, पिवळया एशियाची ही तांबडी किनार—काय ही अपूर्व शोभा ! कमलानने, कमलासने लक्ष्मी, तुझ्या वस्त्र-भांडारांतील हा पिवळा शालू कोणी चोरून नेऊं नये म्हणूनच हा हिमालयाच्या माचव्यावर ठेवण्याचा तुझा बेत होता काय ? तुम्हां देवतांना देखील असला बंदोबस्त करावासा वाटतो ना ? देवतांना देखील चोरांचा उपद्रव भिववतो का ? खरोखर, स्वर्गांत देखील चोर असतात काय ? कीं ते स्वर्गांत चोरून गेलेले असतात ? मृत्युलोकांत चोरांचें वण्ड फार म्हणून कोणी स्वर्गाची इच्छा करीत असतात, पण स्वर्गांतहि जर चोरच असतील अथवा सारा स्वर्ग जर चोरांनींच भरून गेला असेल तर पण्डित जगन्नाथराय ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें—'अवनीतलमेव साधु मन्ये' (हा भूलोकच चांगला)—त्या इंद्र लोकांत विलास करण्याची आम्हांला सुतराम् इच्छा नाहीं.

आणि खरोखरच तसें आहे. हिंददेवी, आम्ही जर तुझे होऊं तर तुझ्यापाशीं एवढीं वैभवें आहेत कीं त्या वैभवांपुढें सारा स्वर्ग ठेंगणा दिसेल. तूं वैभवशाली आहेस. हिंदुस्थान ह्या नांवांतच अपूर्व जादु आहे. ह्या जादूमुळें स्वर्ग, मृत्यु, पाताळ ह्या लोकत्रयींमधील जीव मोहून गेलेले आहेत ! राणी सेमीरामीस हिची शेवटची इच्छा ही कीं मी हिन्दु-स्थानाचा कबजा घेईन ! आतां जिंकायला कांहीं उरलें नाहीं म्हणून ढळढळ् रडत बसणारा सिकंदर, पण त्याचीहि इच्छा ही कीं मी हिंदुस्थान कबजांत ठेवीन ! एवढे प. पू. पंचम जॉर्ज—कीं इराणच्या बरणींतील बिस्किटां-प्रमाणें त्यांच्या खजिन्यांत कोहिनूर भरलेले आहेत—पण त्यांचा खरा कोहिनूर म्हणजे हिन्दुस्थान हाच ! राजमुकुटांतील दहा कोहिनूर ढांसळले तरी ते त्याची परवा करणार नाहींत, पण त्यांतून जर हिंदुस्थान ढांसळला तर पांचीं खंडें त्रिखंड शोधून जिवाचें रान केल्यावांचून त्यांच्या जिवाला चैन पडणार नाहीं !

बा परमेश्वरा, असला हा हिन्दुस्थान तूं आम्हांला फुकट दिलेला आहेस. ज्या हिन्दुस्थानकरितां, शिकंदर बादशहाला समरकन्दापासून कंदाहारपर्यंतचा मुलूख तुडवावा लागला, तो हिन्दुस्थान देश तूं आम्हांला फुकट दिलेला आहेस. ज्या हिन्दुस्थानाकरितां गझनीच्या महंमदाला अठरा वेळां पहाडी शिपाई गारद करून घ्यावे लागले, तो हिदुस्थान तूं आम्हांला फुकट दिलेला

आहेस ! परमेश्वरा, ही तुझी केवढी कृपा--केवढी रहीम--केवढी उदारता--केवढी मेहेरबानी ! केवळ आम्हीं येथें जन्माला आलों म्हणून हा हिन्दुस्थान आम्हांला मिळाला ! केवळ जन्माच्या हक्कानें आम्हांला हा हिन्दुस्थान प्राप्त झाला ! फक्त जन्मामुळें हें वैभव आमचें ठरलें ! परमेश्वरा ! हे तुझे केवढे उपकार ! काय तुझा हा थोरपणा ! काय तुझी ही दातृत्वशक्ति ! तुझ्या अंतःकरणाला बांक नाहीं--तुझ्या औदार्याला धाक नाहीं--पवित्र परमेश्वरा, तुझ्याइतका कोणी पाक नाहीं !

आतां आमचें एकच कर्तव्य कीं आम्हीं तुझे होऊं आणि हें तुझें पवित्र दान आम्ही संभाळूं ! आम्ही हिन्दुस्थान सुखी करूं ! हिन्दमातेचे आम्हीं पुत्र आहोंत--आम्हीं हिन्दुस्थान सुखी करूं ! प्रीतीच्या नद्या कराव्या लागल्या, भावनांचे डोंगर रचावे लागले, श्वासोच्छ्वासांचे भाते फोडावे लागले तरी आम्हीं हिंदुस्थान सुखी करूं ! हिन्दुस्थान सुखी करण्याकरितां सर्वस्वाचें दान करावें लागलें, तारुण्याचीं भांडारें खुलीं करावीं लागलीं, सुखासमाधानावर तुळशीपत्र ठेवावें लागलें, कुल–कुटुम्बाची ताटातूट झाली, जगांतील हरएक आपत्ति येऊन कोसळली, तरी आम्हीं हिन्दुस्थान सुखी केल्याखेरीज राहणार नाहीं. पाक परमेश्वरा, तुझें पाक निशाण, पाक परमेश्वरा, तुझी पवित्र नामगर्जना, पाक परमेश्वरा, तुझ्यावरील अढळ निष्ठा आणि निर्विकल्प प्रेम हीं आमचा हेतु सफल करण्यास पुरेशीं आहेत ! ही पहा, तुला साक्षी ठेवून हिन्दुस्थान सुखी करण्याची आम्ही शपथ घेतों. जर आम्हीं तरुण असूं तर हिंदुस्थान सुखी करूं ! जरी आम्हीं वृद्ध असूं तरी हिन्दुस्थान सुखी करूं ! आईबापांची शपथ कीं आम्ही हिन्दुस्थान सुखी करूं ! कुलदेवतेची शपथ कीं आम्हीं हिन्दुस्थान सुखी करूं ! वंशवेलीची शपथ कीं आम्ही हिन्दुस्थान सुखी करूं ! जातपातीची शपथ कीं आम्हीं हिदुस्थान सुखी करूं ! कृष्णाकावेरीची शपथ कीं आम्हीं हिंदुस्थान सुखी करूं ! खाल्लेल्या अन्नाची, प्यालेल्या पाण्याची, चाललेल्या जमीनीची व चाखलेल्या फलमूलांची शपथ कीं आम्हीं हिन्दुस्थान सुखी करूं ! श्रीशिवाजी महाराजांची शपथ कीं आम्हीं हिंदुस्थान सुखी करूं !

# * गोविन्द गोविन्द । मना लागलिया छन्द ॥

**गोविन्द गोविन्द मना लागलिया छन्द ॥**
**मग गोविन्द ते काया भेद नाहीं देवा तया ॥**

अभंग साधा आहे. त्यांत पेंचपाच कांहींएक नाहीं. पण त्यांत फार मोठा अर्थ भरलेला आहे! थोर पुरुषांचें असेंच असतें. ते साधे शब्द बोलतात. त्यांचा अन्वय, त्यांचा अर्थ, अगदीं सोपा असतो. पण त्यांतील खरा अर्थ मात्र फार गंभीर असतो. त्याचा अर्थ केव्हां कळतो? थोर पुरुषांच्या मनांतील अर्थ आपल्या मनांत केव्हां उतरतो? आपलें मन थोर पुरुषांच्या मनाच्या बरोबरीनें लावावें तेव्हां! साध्या गायनवादनविद्येंत आपण असें पाहतों कीं, एका वादनयंत्रांतील स्वर दुसऱ्या वादनयंत्रांत उतरायला एकाची तार दुसऱ्याच्या बरोबर लावावी लागते. एक वीणा दुसऱ्या वीणेस आपले स्वर तेव्हांच देते कीं, जेव्हां दुसरी वीणा तिच्या बरोबरीनें आपल्या तारा लावते त्यावेळीं, इतर वेळेला नाहीं. तारांत समस्थिति नाहीं, तर स्वरांत समगुणत्वहि नाहीं. समस्थिति ही एका वाद्ययंत्राची दुसऱ्या वाद्ययंत्राशीं संबंध ठेवण्याची पहिली अट आहे. एका वाद्ययंत्रांत दुसऱ्या वाद्ययंत्राचे गुण हवे असतील, तर पहिल्याबरोबर दुसऱ्याच्या तारा लावा. महापुरुषाच्या मनाचा अर्थ तुमच्या मनांत उतरावा अशी इच्छा असेल तर महापुरुषाच्या मनाच्या मधुरकोमल तारांबरोबर तुह्मीं आपल्याहि मनाच्या तारा लावा.

थोर पुरुषांच्या मनांतला अर्थ जर तुम्हांस हवा असेल, तर थोर पुरुषांचें मन जितकें थोर असेल तितकें तुम्ही आपलेंहि मन थोर करा. तुम्हीं त्यांच्या मनापेक्षां आपलें मन कमी थोर ठेवाल, तर थोर पुरुषांच्या अभिप्रायाचें मर्म तुमच्या मनांत उतरणार नाहीं. सुवर्णपात्रांतील दुग्ध सुवर्णपात्रांतच ओतून घेतलें पाहिजे, हिऱ्याचा खडा रत्नांच्याच कोंदणांत बसविला पाहिजे, स्वर्गांतील अमृत देवांच्याच मुखांत पडलें पाहिजे, कर्पूराचें धवलत्त्व शंकरा-

* संदेश, १७ जुलै १९२०.

ऱ्याच अंगीं उतरलें पाहिजे, धवल कीर्तीचा शेला वीरांच्याच खांद्यावर ठेवला पाहिजे, तें पवित्र भगवन्नाम नारदांच्याच ब्रम्हवीणेंतून प्रस्फुट झालें पाहिजे. अहाहा, काय तो आनंद–तें पवित्र भगवन्नाम नारदांच्या ब्रम्हवीणें-तून –अहाहा, काय तो आनंद–होय, खरें आहे. तें पवित्र भगवन्नाम नार-दांच्याच ब्रम्हवीणेंतून प्रस्फुट झालें पाहिजे. योग्याला योग्यच योग्य ! आपलें मन थोर करा, आणि मग थोर पुरुषांच्या मनांतील आशय ओळखा.

वाक्य अगदीं साधें ! त्याचा अर्थ कांहींएक अवघड नाहीं. पण त्याचा अर्थ फारच खोल आहे. किती साधें वाक्य पहा–

**गोविंद गोविंद मना लागलिया छंद ॥**
**मग गोविंद ते काया भेद नाहीं देवा तया ॥**

ह्यांत काय अवघड आहे ? ह्याचा अन्वय असा कितीसा घोंटाळयाचा आहे ? कुठला घोंटाळा ? एखाद्याला वाटेल कीं याला अन्वयच नाहीं. जसें एखा-द्यानें सरळ गद्यांत एखादें वाक्य उच्चारावें, तशांतलें हें वाक्य आहे. एखादा चवथ्या इयत्तेंतला बच्चा म्हणेल कीं, डेप्युटी परीक्षा घ्यायला येतात तेव्हां यापेक्षां अवघड वाक्य आम्हांला घालतात. हें किती सोपें वाक्य ? ह्याचा अन्वय मी सहज लावीन ! ह्याचा अर्थ तर मी चुटकीसरसा सांगेन.

आणि जसें या बालाला वाटतें त्याप्रमाणें आपणांपैकीं प्रत्येक मनुष्यालाहि वाटतें. पण हें 'वाटणें' खोटें आहे. ह्या वाक्याचा अर्थ सरळ असला तरी उथळ नाहीं आणि सोपा असला तरी क्षुद्र नाहीं. तुम्ही संसारी साधा-रण माणूस आहांत ना ? तर ह्यापेक्षां उच्च दर्जावर जा. आपला क्षुद्रपणा विसरा, आपला साधारण दर्जा एके बाजूस ठेवा. उच्च व्हा, त्यापेक्षां उच्च व्हा. असे उच्च होत होत, एक क्षणभर, एक अर्धा क्षण, एक पाव क्षण जरी तुम्हीं त्या मनःस्थितींत जाल–कीं ज्या स्थितींत हें वाक्य उच्चारतांना तुकाराम होता–तरी ह्या वाक्याच्या गंभीर अर्थाचा तुमच्या मनांत एकदम प्रकाश पडेल. मग तुम्हाला आनंद होईल. मग तुम्हीं हर्षानें नाचाल. मग तुम्ही सौख्यभरानें निर्भर नृत्य करायला लागाल.

गेल्या जून महिन्याच्या पंधराव्या तारखेस, कीं ज्यावेळीं संदेश एकवर्ष संपवून नव्या वर्षांत गेला, त्याच वेळीं ह्या आनंदांत डुंबायचा व त्याच वेळीं ह्या आनंदांत वाचकांना डुंबवायचा त्याचा विचार होता.

**गोविंद गोविंद मना लागलिया छंद ॥**
**मग गोविंद ते काया भेद नाहीं देवा तया ॥**

काय हें उमद्या विचारांचें सुग्रास भोजन ! खरोखर हा पाक तुकारामासारख्या थोर विभूतीनींच करावा. उच्च विचारांच्या वेलदोड्यांनीं घवघवलेलें हें सुवासिक अन्न तयार करणारे पाकाचार्य काय घरोघर पडलेले आहेत ? असे कुठले घरोघर पडायला ? तुम्हीं " मुलांचा महाराष्ट्र " उलगडा नाहींतर " थोरांचा महाराष्ट्र " उलगडा, असले पाकशास्त्रज्ञ सगळ्या इतिहासांत दहापांचच सांपडतील. तुम्हीं ज्ञानेश्वरापासून रामदासापर्यन्त पुढें पानें चाळा, नाहींतर रामदासापासून ज्ञानेश्वरापर्यन्त मागें पानें चाळीत या, असे ज्ञानवाढपी, असे सुविचारपाकज्ञ फार थोडे आहेत. त्यांच्या नांवांनीं एका हाताचीं पांच बोटें मिटवावीं लागलीं तर भाग्य. दोन्ही हातांचीं पांच पांच बोटें मिटवावीं लागलीं तर ? तर भाग्य विचारायलाच नको. त्या भाग्याला उपमाच नाहीं.

ह्या भाग्याच्या अमृतोदधीमध्यें, आम्हीं वाचकांना मंगल स्नान घातलें, तरच ते आमचे वाचक आणि आम्हीं त्यांचे सेवक. हें नसेल तर त्यांनीं आमची सेवा काय घ्यावी व आम्ही तरी त्यांची सेवा काय करावी ?

**तरिच जन्मा यावें, दास वाचकांचे व्हावें, ॥**

वर्तमानपत्रानें तरच जन्माला यावें कीं, जर त्यानें सुविचारकुसुमांच्या कुंड्या वाचकांच्या बगीच्यांत लावाव्या, सुविचार–सुधेचे हंडे वाचकांच्या **मंदिरांत ठेऊन** द्यावे. संदेश असा गर्व बाळगतो कीं, **संदेश ही सेवा आहे, संदेश हा हुन्नर नव्हे.** ज्या दिवशीं संदेशच्या जीवावर नांव मिळवावें, संदेशच्या जीवावर देहाच्या मृत्तिकेचीं चीजें करावीं अशी इच्छा उत्पन्न होईल, त्या दिवशीं धिक्, धिक् तें जीवन ! संदेशच्या रूपानें तरच जन्माला यावें कीं सद्विचारांचीं नीरांजनें जनतादेवीच्यापुढें तेववावीं, सद्विचारांच्या तुलसी जनतारूपी जनार्दनाला वहाव्या, सद्विचारांचें मधुस्नान, आणि सद्विचारांचें घृतस्नान घालीत राष्ट्रवृन्दावनांतील वाचकवृन्दाची अर्चा करावी !

ज्या दिवशीं संदेशला नूतन वर्ष लागलें, त्या दिवशीं हें सर्व करायची इच्छा होती ! पण त्या वेळेला कुठली इतकी उसंत ? त्या वेळीं वादविवादाचे

झंझावात इतक्या भयंकर जोरानें वाहात होते कीं, तेथें सुविचारांचीं सर्वच नीरांजनें विझून जातील कीं काय असें वाटत होतें! पण गेली, ती काळवेळ निघून गेली. सुविचारमंदिराला भीति दाखवणाऱ्या त्या विजा कडाडल्या पण कुंठित होऊन परत निघून गेल्या—आतां संदेशच्या वाचकांनों, तुमची सेवा, आणि आमचे श्रम! तुमचे पदरज आणि आमचें राजकीय ध्येय! तुमच्या आकांक्षा आणि आमची तत्परता!

आणि त्यांतीलच हें प्रथम पुष्प आपले चरणीं वहातों कीं, मनाला मोठें करा आणि मग मोठ्या पुरुषांचीं मनें ओळखा. महाराष्ट्र मोठा करण्याचा हाच उपाय आहे, दुसरा नाहीं. असल्या परिस्थितीकडे पाहिलें अथवा नुसतें चालू जग घेतलें, तर मनुष्याचें मन इतकें क्षुद्र होतें कीं तो क्षुद्रपणा हेंच त्याचें जीवन, हाच त्याचा हव्यास, हेंच त्याचें ध्येय असें त्याला वाटूं लागतें. पण ज्याप्रमाणें मनुष्याच्या प्रवासांत त्याला जागें करायला कोस—अर्धाकोस चिरेबंदी खुणा करून ठेवलेल्या असतात, त्याप्रमाणें मानवी आयुष्याच्या प्रवासांत थोर पुरुषांच्या भव्य आकृति ह्या आयुष्याला जागृत करण्यासाठीं जागोजागीं मांडलेल्या असतात. सध्यांच्या जगांत तन्मय होऊन गेलें ह्मणजे त्या मॉण्टेग्यू-सुधारणा, ते इलेक्शनचे नियम, ती निवडणुकींची धांदल, ती स्पेशल कॉंग्रेसची घाई, ती अध्यक्षांची निवडणूक, ह्यांतच मन इतकें गर्क होण्याचा संभव आहे कीं, ह्यापलीकडे कोणतेंहि कर्तव्य दिसूंच नये, इतकी मनाची अधोगतीहि कदाचित् होण्याजोगी आहे. परंतु असा ज्यावेळीं प्रसंग येईल, त्यावेळीं ह्या परिस्थितीच्यावर दहा हात मन उंच केलें पाहिजे व थोर पुरुषांच्या मनाशीं आपल्या मनाचे वाद्यतंतु लावून त्यांच्या विचारांशीं समरस झालें पाहिजे. महाराष्ट्रांतील थोर पुरुष, महाराष्ट्रांतील संत, महाराष्ट्रांतील वीर हे फार उच्च विचारांचे होते. त्यांचीं ध्येयें फार थोर होतीं. त्यांचे आनंद अत्यंत श्रेष्ठ प्रतीचे होते. पक्ष, पार्टी, निवडणूक, दिवाण, कौन्सिल—हर हर! किती तुच्छ गोष्टी ह्या!! ते महाराष्ट्रीय, थोर महाराष्ट्रीय, ह्या कस्पटांच्या फार वरतीं होते. गोविंद, गोविंद, असा त्यांच्या मनाला छंद लागलेला होता. त्यांची कुडी गोविंदाकरितां होती, त्यांचीं मनेंहि गोविंदाकरितांच होतीं, त्यांचीं आयुष्यें सर्व गोविंदाकरितां, त्या एकट्या गोविंदाकरितां होतीं. ह्या गोविंदांतून भक्तीचा ओहोळ निघाला, धर्माचा झरा फुटला, राजकारणाचीं कारंजीं उडालीं, संसाराच्या नद्या खवळल्या, इतिहासाचे उदधी हेलावले! तो गोविंद, तो गोविंद ह्या महाराष्ट्रांत पुन्हा नाचेल काय?

# लोकांतील लोकमान्य.*

अबीर गुलाल मोरे । मुखपर डालो ॥
है रंगमें झकझोरी । कान्हा नयनोंके खेलुंगी होरी ॥

श्रीकृष्णासारखा लोकप्रिय पुरुष या हिंदुस्थानांत काय, परंतु सर्व जगांतहि दुसरा कोणीहि होऊन गेला नसेल ! लोकसमाजाचें तनमनधन ज्यानें सर्वस्वी वेधून घेतलेलें आहे, लोकांच्या हृदयांत जो रात्रंदिवस उभा आहे, लोकांच्या हृदयाशीं ज्याच्या सद्गुणांचा संबंध जडून गेलेला आहे, ज्याचेकरितां लोक अगदीं सतृष्ण नेत्रांनीं वाट पहात आहेत, जो थोडासा दृष्टीआड झाला कीं, ज्याच्या दर्शनाकरितां लोकांना तळमळ लागून राहिलेली आहे, लोकांचा आनन्द आणि लोकांचा परमानन्द म्हणजेच जो, असा लोकप्रिय पुतळा जगांत जर कोणी उत्पन्न झाला असेल, तर तो श्रीकृष्ण हाच होय. आजपर्यंत लोकप्रिय व्यक्ति या जगांत फारच थोड्या होऊन गेल्या, असें कबूल करावें लागेल. लोकप्रिय व्यक्ति ही अशी वस्तु खरोखरच नाहीं कीं, जी प्रत्येक देशाच्या इतिहासांत प्रत्येक शतकामध्यें सांपडते. खरीं लोकप्रिय माणसें अतिशय विरळ असतात. तीं केव्हां तरी कोणत्या तरी शतकांत उत्पन्न होतात. ज्याप्रमाणें राष्ट्रोद्धारक, रणधुरंधर, राजकारणपटु, तत्वज्ञानी, धर्मकर्ते, समाजनियामक, सत्त्वधीर असे पुरुष कालयंत्रानुसार कोणत्या तरी शतकांत कोणत्या तरी राष्ट्रास लाभतात, त्याचप्रमाणें लोकप्रिय पुरुषांचेंहि आहे. आजपर्यंत मनु एकच होऊन गेला, आल्फ्रेड राजा एकच झाला, नेपोलियन एकच उपजला, तानसेन एकच नांवलौकिकास आला, बिरबल एकच ऐकण्यांत आला व चाणक्य एकवारच दिसला, तसेंच लोकप्रिय पुरुषांचेंहि आहे. ज्याप्रमाणें, वाण्याचीं दुकानें प्रत्येक राष्ट्रांत असावयाचींच, ज्याप्रमाणें प्रत्येक शतकांत गहूं–हरभरे पिकावयाचेच, अथवा ज्याप्रमाणें प्रत्येक देशांत नद्या व सरोवरें असावयाचींच, त्याप्रमाणें प्रत्येक देशांत व प्रत्येक शतकांत कोणी ना कोणी लोकप्रिय पुरुष उत्पन्न व्हा

* संदेश ता. २ सप्टेंबर १९१५.

व्हावयाचा अशी जर कोणाची समजूत असेल, तर ती चुकीची आहे. लोकप्रिय पुरुष जगाचे इतिहासांत फारच दुर्मिळ आहेत. श्रीकृष्ण हा या हिंदुस्थानांत पहिला ‘ लोकप्रिय ’ पुरुष उत्पन्न झाला व जगाच्या इतिहासांत तोच पहिला व शेवटचाच असेल.

ही लोकप्रियता संपादन करण्याकरितां श्रीकृष्णांनीं काय केलें? अथवा लोकप्रियता संपादन करण्याकरितां काय करावें लागतें? जगांत मोठे लोक कांहीं थोडे असतात असें नाहीं. विद्वान्, विचारी, शूर, मुत्सद्दी असे लोकहि पुष्कळ होऊन जातात. हे सर्व नामांकित असतात. इतिहासावर त्यांनीं आपली नाममुद्रा करून ठेवलेली असते. त्यांना जग भितें, नमतें, पूज्य मानतें, पण त्यांना लोकप्रियता खात्रीनें मिळेलच असें मात्र नाहीं. मनुष्य पूज्य असतो, परंतु तो लोकप्रिय असतोच असें नाहीं. जगाच्या कल्याणाकरितां स्वतःचा बळी दिलेल्यांचीहि पुष्कळ उदाहरणें आहेत. त्यांचेकरितां जगानें आपले दुःखाश्रु गाळलेले असतात, परंतु जगानें आपल्या प्रेमाचा प्रसाद त्याला दिलेलाच असतो असें नाहीं. जग आपलें प्रेम फार थोड्या व्यक्तींना देतें. प्रेम अर्पण करण्यांत जग फार कंजुष आहे. तें एखाद्यास आपली सन्मानबुद्धि, आपला पूज्यभाव, आपला आज्ञाधारकपणा, आपली सेवा ह्यांपैकीं काय वाटेल तें अर्पण करील. परंतु जर त्यानें त्याच्या प्रेमाचीही मागणी केली, तर जग म्हणेल कीं, भाई ! ही माझी देणगी वाटेवर पडलेली नाहीं, ती फार महाग आहे. ती मी एकदां श्रीकृष्णाला दिली होती. माझेजवळ तूं दुसरें काय हवें तें माग. परंतु माझें प्रेम अर्पण करण्याचा अधिकार माझा मलाच असूं दे.

छेः, जग ह्मणतें, माझें प्रेम मी इतक्या सहजासहजीं कुणासहि देणार नाहीं. तुह्मी मला हंसवा, मी तुम्हांला शाबास म्हणेन; तुम्ही मला भिववा, मी तुम्हांपुढें प्रणिपात करीन; तुम्हीं मला जिंका, मी तुमचा गुलाम बनेन; तुम्ही मला तुडवा, मी तुम्हांला शरण जाईन; तुम्ही मला आनंदांत लोटा, मी तुमचे उपकार मानीन; तुह्मी मला उत्कर्षास चढवा, मी तुमचें स्मरण करीन; अथवा तुम्हीं मला उद्धरा, मी तुम्हांस देव मानीन; परंतु माझ्या प्रेमाची तेवढी गोष्ट काढूं नका. तेथें माझ्या हृदयाशीं संबंध येतो. तेथें

माझा मी मालक आहें. ती देणगी माझ्या अधिकारांतली आहे. हा माझा हक्क कोणी हिरावून घेऊं नका. माझ्या प्रेमाचा वर्षाव, जो श्रीकृष्ण माझ्या प्रेमाच्या पसंतीस उतरेल त्याचेवरच मी करीन, इतरांवर करणार नाहीं.

हिंदुधर्मांतील दशावतारांचीच गोष्ट घ्या. मत्स्यापासून कलंकीपर्यंत हिंदुधर्मातील सर्व अवतार त्या जगदुद्धारक परमेश्वराचेच आहेत. जो परमेश्वर मत्स्य बनला, तोच वामन झाला व तोच कलंकीहि होणार आहे. परंतु जगाला हें कांहींएक कळत नाहीं. इतक्या शोधांत जग कधींहि शिरत नाहीं. जग असें म्हणतें कीं राम आणि कृष्ण हे एकच असोत, बुद्ध हा परमेश्वराचाच अवतार असो अथवा तोच परमेश्वर पुढें कलंकी बनून घोड्यावर बसो, परंतु माझें प्रेम केवळ त्या कान्ह्यावर आहे. तेंच सांवळें रूप मला आवडतें. त्याची तीच काळी घोंगडी मला हवीशी वाटते. त्याच्या त्या मुरलीवरच माझें प्रेम आहे. कन्हय्या, तूं एक क्षणभर दृष्टीआड हो कीं आम्हीं विरहसागरांत बुडालोंच.

" तव कथामृतं तृप्तजीवनं." हे नन्दाच्या आनन्दा, तुझ्या गुणांच्या स्मरणांत माझ्या सुखाची आवड आहे, माझें सुख तेथें रमतें, माझें सुख तेथें कृतार्थता पावतें, माझ्या सुखाला तेथें सौख्यपणा येतो. तूं माझी आनंद-लहरी आहेत. तूं माझा प्यारा आहेत. तूं माझें समाधान आहेस. माझ्या हृदयवल्लरीची डहाळी तुझ्या स्मरणानें पुष्पित होते. माझें हृदय तुझ्या-मुळें हेलावतें, तुझें नांव उच्चारलें मात्र, कीं माझ्या अंत:करणाचें लोणी होऊन जातें. श्याम! कितीं तूं चांगला, किती गोड, किती आनंदवर्धक! तूं परमेश्वर अस, नाहींतर परब्रह्म अस, निर्गुण अस, नाहींतर मायातीत अस, मी तुला एवढेंच ओळखतों कीं जणूं काय तूं म्हणजे माझें हृदयच कुडींतून काढून बाहेर ठेवलेलें आहे. नको, कन्हय्या! माझेपासून लांब जाऊं नकोस. तूं गेलास म्हणजे माझीं आंतडीं तुटतात. माझ्या प्राणांना कोणी काढण्या लावल्या कीं काय असा भास होतो. तूं लांब गेलास म्हणजें असें होतें कीं " जीवनावेगळी मासोळी, तैसा तुका तळमळी."

श्रीकृष्णावर जगाचें प्रेम किती होतें, ह्याचें वर्णन करणेंच अशक्य आहे. ह्या प्रेमाला उपमाच देतां यावयाची नाहीं. त्याची कल्पना द्यावयास

शब्दच सांपडावयाचे नाहींत. परब्रह्माचें वर्णन करतां करतां ब्रह्मदेव सुद्धां थकले असें ह्मणतात, परंतु एक वेळ त्या शब्दातीताचेंहि वर्णन शब्दांत आणतां येईल, परंतु श्रीकृष्णावर जगाचें प्रेम किती होतें ह्याचें वर्णन करतांना शब्दांची संपत्ति तुटपुंजीच ठरेल. कालिदास, जगन्नाथ, किर्लोस्कर, रवींद्र हे जे प्रेमाचें वर्णन करण्यांत गाजले ते कवी सुद्धां श्रीकृष्णावरील लोकप्रेमाचें वर्णन करण्याची पाळी आली असतां, आपण हरलों' असें तावडतोब कबूल करतील, आणि आपली लेखणी श्रीकृष्णाच्याच प्रेमसमुद्रांत फेंकून देतील. श्रीकृष्णाच्या प्रेम-जलौघानें यमुना तुडुंब भरून गेलेली आहे. मथुरेला प्रेमपूर आलेले आहेत, वृन्दावन हेलावून गेलेलें आहे, द्वारकेचें बेट बनलें आहे आणि सर्व जगांत प्रेमसागर भरतीला चढलेला आहे. श्रीकृष्णाच्या नांवांतील प्रेमाची मापणी, महत्वाकांक्षी पुरुषाची अचाट हांव अथवा कवीची विशाल कल्पना ह्यांना सहस्रांशानें तरी करितां येईल काय ?

श्रीकृष्ण इतके विलक्षण लोकप्रिय होते कीं, कोणाची त्यांचेवर भक्ति नव्हती असें नाहींच. ज्ञानानें, युक्तीनें, शहाणपणानें, सामर्थ्यानें त्या वेळच्या दुसऱ्या कोणत्याहि पुरुषापेक्षां ते जास्त होते. परंतु इतकें असूनहि त्यांचा स्वभाव इतका साधा होता कीं कोणाला त्यांचेपासून तुटकपणा वाटतच नसे. श्रीकृष्णाचें बालपण गवळ्यांच्या पोरांत गेलें, आणि त्यांचें राजकारण पांडवांनां सुखी करण्यांत खर्च झालें. परंतु ह्या सर्वांत एक गोष्ट दृष्टीस पडते ती ही कीं, जेथें जेथें श्रीकृष्ण गेले, तेथें तेथें ते अत्यंत लोकप्रिय झाले. श्रीकृष्णांच्या सहवासानें गोकुळांतील पोरें वेडावून गेलीं, श्रीकृष्णाशिवाय गुरें हंबरेनात, श्रीकृष्णाशिवाय वासरें पाणी पीईनात, श्रीकृष्णांचें दर्शन झालें नाहीं तर गोकुळवासी जनांना चैन पडत नसे. श्रीकृष्णांनीं ल्हानपणीं खूप खोड्या केल्या, दुधाच्या खूप चरव्या फोडल्या, गोकुळांतल्या गवळ्यांना व गौळणींना तितक्यापुरता त्रासहि झाला असेल. परंतु त्या खोड्या इतक्या लाडिकपणाच्या होत्या कीं त्यामुळें हें नंदाचें मूल सर्वांना आवडतें होऊन बसलें. गवळी व गवळणी यांचे थवेच्या थवे सकाळ झाली कीं, नंदाच्या दाराशीं कृष्णाचीं गाऱ्हाणीं सांगण्याकरितां जमत असत. परंतु ह्या 'समरी' खटल्यांत न्यायाधीश यशोदा, आरोपी कृष्ण व फिर्यादी गौळणी ! त्या सर्वांचें

असें एक चमत्कारिक मत असे कीं त्यामुळें आरोपीला आपले गुन्हे करण्यास जास्त उत्तेजनच येई. गोकुळांतील गुन्हे वस्तुतः पाहतां इतके लोकप्रिय होते कीं ते गुन्हे, लाडिकपणाचीं तीं कृत्यें, जर एखादे दिवशीं श्रीकृष्ण न करते तर, जितक्या त्वेषानें गोकुळांतील मंडळी गुन्हा केल्याबद्दल यशोदेच्या दरबारीं कृष्णावर तुटून पडत, तितक्याच त्वेषानें श्रीकृष्णानें गुन्हे करण्याचें सोडल्याबद्दल त्यांचेवर फिर्याद घेऊन आली असती. ह्याचें प्रत्यंतरहि पुढें लौकरच आलें. एक दिवस चेंडुफळी खेळतां खेळतां, चेंडू यमुनेच्या डोहांत पडला व तो शोधण्याकरितां उडी टाकलेला कृष्ण कालियाशीं युद्ध खेळतांना कांहीं काल अदृश्य झाला. झालें, "गोकुळीं झाली आरोळी। कृष्ण बुडाला॥" आणि मग सर्वांच्याच तोंडचें पाणी पळालें. त्याच्या सवंगड्यांना वाटले कीं, आपल्यावर कृष्णानें खेळांतलें राज्य आणलेलें पुरवलें, परंतु त्यानें आणलेला हा विरह नको. गोपींना वाटलें कीं आपल्या घागरी फोडलेल्या पत्करल्या, परंतु कृष्णविरहानें आपलीं हृदयें फुटावयास नकोत. गवळी म्हणाले कीं, आमचा गोरस चोरीला गेलेला पत्करला, परंतु तो दुष्ट कालिया कृष्णाचा अपहार न करो ! इतकें तें सर्व गोकुळ श्रीकृष्णप्रेमानें कृष्णमय झालेलें होतें. कृष्णाच्या मातुलमंदिराकडून जेव्हां अक्रूर त्याला न्यावयास आला, तेव्हां तर गोकुळांतील यच्चयावत् जीवांना आपले प्राण हरण करण्याकरितां कृतांतच आलेला आहे असें वाटलें. खरोखर ह्या जगांत कोणी कांहीं प्रमाणानें, कोणी कांहीं प्रमाणानें लोकप्रिय झालेले असतील, परंतु कृष्णाइतकी लोकप्रियता कधींच कोणास लाधली नसेल.

श्रीकृष्ण मथुरेंत गेले तरी तेथेंहि त्यानीं आपल्या गुणांचें वेड लावलेंच. श्रीकृष्ण मथुरेंत गेले ते जेते, राज्यकर्ते, सिंहासनाधीश, अशा नात्यानें गेले. परंतु श्रीकृष्ण हे लहानपणीं गोकुळांत जितके प्रिय, तितकेच ते राज्यकर्ते असतांहि मथुरेंतील लोकांना लोकप्रिय झाले. मथुरेंत आल्यानंतर श्रीकृष्णाच्या खासगी परिस्थितींत वास्तविक पाहतां जमीन-अस्मानाचें अंतर पडलें होतें. ते पूर्वीं गवळी होते, आतां राजे झाले होते; पूर्वीं ते चेंडूफळीशीं खेळत होते, आतां राज्यांतील शत्रूशीं दोन हात करण्याचा त्यांचेवर प्रसंग आला. परंतु श्रीकृष्ण दोन्ही ठिकाणीं सारखेच कसास उतरले. एवढेंच नव्हे तर पूर्वी गोकुळांत असतां त्यांनीं जितक्या शिताफीनें दहींदूध

चोरलें तितक्याच लीलेनें मथुरेच्या गादीवर बसल्यानंतर त्यानीं प्रजेचें मन चोरलें. मथुरेच्या गादीवर असतांना गोकुळांतील वेडपीं पोरें कौतुकानें मथुरेस येत व श्रीकृष्णाला पाहून 'हा पहा आपला कन्हैय्या' असे उद्गार काढीत. श्रीकृष्णांना तें ऐकून मौज वाटे. त्या पोरांना काय माहीत कीं, जितक्या सफाईनें त्यांच्या लगोऱ्या श्रीकृष्ण उलथून पाडीत, तितक्याच सफाईनें ते शत्रूचीं कारस्थानेंहि उलथून पाडीत असत !

श्रीकृष्ण मथुरेहून द्वारकेस गेले तरी तेथेंहि लोकप्रियता त्यांचेकरितां तयारच. रुक्मिणीनें त्यांना अतिशय काकुळतीनें पत्र पाठविलें कीं, वाटेल तें करा, पण मला आपली राणी म्हणून घेऊन जा. श्रीकृष्णांनीं सत्यभामेशींहि विवाह केला. श्रीकृष्णाच्या अंत:पुरांत आणखी सोळासहस्र स्त्रिया होत्या असें म्हणतात. परंतु प्रत्येकीचें श्रीकृष्णावर इतकें प्रेम होतें कीं, जणुं कांहीं ती एकटीच श्रीकृष्णाची पत्नी आहे. भामेनें श्रीकृष्णाला दान देण्यास काढलें तेंहि ह्याच उद्देशानें कीं श्रीकृष्ण जन्मोजन्मीं पति मिळावा. कांहीं लोक असे असतात कीं त्यांच्या वर्तनांतील एकेक बाजू चांगली असते. कित्येकांचें खाजगी वर्तन अत्यंत चोख असतें, परंतु त्यांच्या सार्वजनिक वर्तनाकडे ढुंकूनहि पाहतां येत नाहीं. आषाढी एकादशीला ते रताळींसुद्धां खावयाचे नाहींत, पण सार्वजनिक कामांत येतील तितके पैसे खाण्याची त्यांची तयारी. कांहीं लोक सार्वजनिक कामांत मोठे राष्ट्रधुरीण, परन्तु त्यांचें खाजगी वर्तन बाहेर काढण्याची त्यांच्या स्नेह्यांनासुद्धां लाज वाटावयाची, मग त्यांची स्वत:ची काय कथा ? सार्वजनिक व्याख्यानपीठावर त्यांना पाहिलें तर विश्वबंधुत्त्व, समता, इत्यादि कल्पनांना पूर आलेला दिसावयाचा, पण खासगी वर्तनांत कोणी आपल्या आईला ठोक देतो तर कोणी आपल्या बायकोलाच टाकून देतो, असे प्रकार दृष्टीस पडतात. परंतु श्रीकृष्ण सर्व ठिकाणीं सारखेच प्रिय होते. श्रीकृष्ण गोकुळांत असतांना लोकप्रिय संवगडी होते, मथुरेंत असतांना ते लोकप्रिय द्वारकाधीश होते, सुदामऋषीचे ते अत्यंत प्रिय बालमित्र होते, रुक्मिणीचे अत्यंत प्रिय पति होते, अर्जुनाचे अत्यंत प्रिय गुरु होते, व द्रौपदीचे ते अत्यंत प्रिय बंधु होते. 'प्रिय' या शब्दाशिवाय श्रीकृष्णाचे चरित्रांत दुसरें कांहींच दिसावयाचें नाहीं.

असा हा प्रेमाचा पुतळा होता. श्रीकृष्णाचे ठिकाणीं लोकप्रियता कडें-लोटास गेली होती. इतका लोकप्रिय पुरुष मागें कधीं त्रिभुवनांत झाला नाहीं, व पुढें कधींहि होणार नाहीं. श्रीकृष्ण दर्जानें 'राजा' होते, परंतु ते 'राजा' कसले ? त्यांच्या स्वरूपानें लोकच सिंहासनावर बसलेले होते, असें म्हटलें तरी चालेल. श्रीकृष्णांच्या अपरंपार लोकप्रियतेमुळें लोकांना, आपण व आपला राजकर्ता हे कोणी भिन्न भिन्न आहेत असें वाटतच नसे. कोणाला वाटे आपला बापच राज्यावर आहे, कोणाला वाटे आपला मित्रच राज्यावर आहे, कोणाला वाटे आपला जांवई राज्यावर आहे, अशा रीतीनें राजाचें राज्यकर्तृत्व व प्रजेचें सत्तावृत्तित्व ह्यांचा अत्यंत मधुर संगम श्रीष्णाचे कारकीर्दीत झाला. कारण श्रीकृष्ण राजांतील राजे व लोकांतील लोकमान्य होते. हे श्रीकृष्णा, हे लोकांतील लोकमान्या, तुझी गोकुळाष्टमी कुंजवनांतील गाईवासरांप्रमाणें हिंदुस्थानच्या लोकांत आनंदी-आनंद उत्पन्न करो व तुझ्या पवित्र ओष्ठांतून उच्छ्वसित झालेल्या गीतेचें मर्म सर्व जगास अनंत कालपर्यंत सन्मार्गाकडे प्रवृत्त करो !

---

## अस्पृश्यता काढून टाका !

—अस्पृश्यता हा रोग आहे. हें राष्ट्रीय पातक आहे. ही 'अस्पृश्यता' काढून टाका. 'अस्पृश्यां' ना देवळें, विहिरी, धर्मशाळा यांत खुशाल येऊं द्या.

इतका पवित्र हिन्दुस्थानदेश कीं जेथें गंगा, कृष्णा, गोदावरी, यमुना इत्यादि पवित्र नद्या वाहतात तेथें जर 'अस्पृश्यां'ची अस्पृश्यता जाणार नाहीं, तर ती जाणार तरी कोणत्या देशांत ?

इतका पवित्र हिन्दुस्थानदेश कीं ज्यांत व्यास, वाल्मिक, वसिष्ठ, विश्वा-मित्र, ह्यांसारखे तपोधन होऊन गेले—तेथें जर 'अस्पृश्यां' ची अस्पृश्यता जाणार नाहीं, तर ती जाणार तरी कोणत्या देशांत ?

इतका पवित्र हिन्दुस्थानदेश कीं ज्यांत परमेश्वरानें दहा अवतार धारण केले, आणि आपल्या पवित्र चरणांचा स्पर्श ह्या देशांतील भूमीस केला—तेथें जर 'अस्पृश्यां' ची अस्पृश्यता जाणार नाहीं तर ती जाणार तरी कोणत्या देशांत ?

[सं. ५ नो. १९२२.]

---

# * पूर्णावतार श्रीकृष्ण.

जगत्प्रभु परमेश्वर ह्याचे जे अवतार हिंदुधर्मशास्त्रान मानलेले आहेत, त्यांतील पूर्णावतारांपैकीं श्रीकृष्ण हा एक होय हें सर्वांस माहित आहेच. श्रीकृष्ण हा पूर्णावतार कां व इतर अवतार हे अंशावतार कसे ह्यासंबंधानें इतरत्र जीं कारणें दिलेलीं आहेत, त्यांचा विचार आज आम्हांस कर्तव्य नाहीं. आम्हीं काल श्रीकृष्णाचें लोकप्रियत्व दाखविलें, त्या दृष्टीनेंच आम्हीं श्रीकृष्णाच्या पूर्णावताराचें वर्णन करणार आहोंत. श्रीकृष्णाइतकें लोकप्रियत्व दुसऱ्या कोणाचेहि अंगीं नसेल, इतकेंच नव्हे तर " शैले शैले न माणिक्यं " हा सिद्धांत जसा खरा आहे, तितकाच प्रत्येक शतकांमध्यें लोकप्रिय पुरुष निर्माण होत नसतात हा सिद्धांत खरा आहे. आपण इतिहासाचें अवलोकन केलें तर आपणांस असें दिसून येईल कीं, एखाद्या राष्ट्राचे इतिहासांत शतकेंच्या शतकें निघून गेलीं तरी ज्यास खरोखर रीत्या लोकप्रिय म्हणतां येईल असा पुरुष उत्पन्न होत नाहीं. खरा लोकप्रिय पुरुष जन्मास येणें म्हणजे राष्ट्राचें परमभाग्य होय आणि आम्हांस ह्या गोष्टीचा अत्यंत आनंद होतो कीं, सर्व जगांतील अत्यंत लोकप्रिय पुरुष 'लोकमान्य श्रीकृष्ण' आमचे हिंदुस्थानांत जन्माला आला.

श्रीकृष्ण लोकोत्तर रीतीनें लोकप्रिय होते याचें मुख्य कारण हें कीं ते पूर्णावतार होते. श्रीकृष्ण अमुक एक नव्हते असें नाहींच. श्रीकृष्ण गोकुळांतील गवळ्यांना किती प्रिय होते, श्रीकृष्ण गोपींना किती आवडत असत, एकीकडे नन्द–यशोदा व दुसरीकडे वसुदेव–देवकी ह्यांची कृष्णावर किती वात्सल्य–प्रीति होती, द्रौपदीस श्रीकृष्ण कसा पाठीराखा वाटत असे, बळिरामदादा कितीहि रागावले तथापि कृष्णाचे शहाणपणावर त्यांचा कसा विश्वास होता, श्रीकृष्णावर अर्जुनाची कशी निःस्सीम भक्ति होती, उद्धवाची श्रीकृष्णावर कशी अढळ श्रद्धा होती, रुक्मिणीनें श्रीकृष्णच पति पाहिजे असा कसा हट्ट धरला, सत्यभामेनें श्रीकृष्णास दान देऊन टाकतांनासुद्धां श्रीकृष्ण जन्मोजन्मीं लाभावे अशी कशी इच्छा केली, दारिद्र्यानें गांजल्यावर

---

* संदेश ता. ३ सप्टेंबर १९१५.

सुदामऋषी श्रीकृष्णांकडे कसे आले व कुब्जेनेंहि श्रीकृष्णावरच कसा भाव ठेवला हें पाहिलें म्हणजे श्रीकृष्णाच्या 'पॉप्युलॅरिटी' चीं बीजें कशीं सर्वत्र पसरलेलीं होतीं हें लक्षांत येतें. लोकप्रियतेचीं बीजें इतक्या जागीं पेरलेलीं असल्यावर त्यांना एकदम फुलें येऊन श्रीकृष्णाचे शीर्षावर लोकप्रियतेचा अदृष्टपूर्वक वर्षाव झाला तर त्यांत कांहींएक आश्चर्य आहे काय ?

परंतु ज्या गोष्टींतून श्रीकृष्णांच्या लोकप्रियतेचा प्रबल प्रवाह फोंफावत बाहेर पडला, त्याच गोष्टीवरून त्यांचें पूर्णावतारत्वहि सिद्ध होतें. श्रीकृष्ण हे पूर्णावतार होते ह्याचें कारण, श्रीकृष्णांना अज्ञात, दुर्गम अथवा अनाचरित असें कांहीहि नव्हतें. सर्व अवस्थेंत सर्व प्रतीच्या लोकांबरोबर तन्मयत्वानें वर्तण्यास श्रीकृष्ण तयार होते. ह्याच गुणांमुळें प्रत्येकास ते आत्मीय वाटत असत. इकडे गोपालांचेबरोबर लगोऱ्या मांडण्यासहि तयार, इकडे गोपींच्याबरोबर फुगड्या खेळण्यासहि तयार; इकडे

**तोम् तनतन वाजवि वेणु ।**
**भंवताल्या चरती धेनु ॥;**

इकडे द्रौपदीकरितां लुगड्यांचे वस्ते घेऊन पळण्यास तयार; इकडे कंस-चाणूर ह्यांचे मस्तकावर गदाप्रहार करावयास तयार, इकडे भीतीनें पळावयास तयार; इकडे पूतनचें स्तनशोषण करून तिला मारावयास तयार, इकडे जरासंधाचे सांधे निखळण्याची तयारी; इकडे पांडव–कौरवांत सन्धि करावयास पहिला पाय, इकडे भगवद्गीतेसारखें अनुपम तत्त्वज्ञान शिकवावयास तयारी; इकडे द्रौपदीचे जोडे उचलण्याची सिद्धता, इकडे मथुरेच्या सिंहासनावर आरूढ होण्याची तयारी; इकडे धर्मराजाच्या यज्ञांत पत्रावळी काढण्याचीहि तयारी ! इतकी ज्या पुरुषाचे अंगांत परोपकारिता व भव्यता, त्याचेवर देव-मानव, यक्षकिन्नर, पशुपक्षी, तरुपाषाण, सजीव–अजीव हे सर्व निःसीम प्रीति करूं लागले तर त्यांत नवल कोणतें ?

आम्ही श्रीकृष्णास पूर्णावतार म्हणतों ह्याचें कारण मानवदेह घेतला असतांनासुद्धां ते कांहीं नव्हते असें नाहींच. पोरांत पोर, मुलांत मुलगा, वेड्यांत वेडा, मुत्सद्यांत मुत्सद्दी, शूरांत शूर,तत्वज्ञान्यांत तत्वज्ञानी. ह्यापेक्षां ह्या जगांत पूर्णता ती कोणती असणार ? आणि इतकी पूर्णता अंगीं

असल्यावर त्याचेवर कोण प्रेम नाहीं करणार ? व्दापार युगांतील ज्ञात्या लोकांना श्रीकृष्णासारखा पुढारी मिळाला म्हणूनच भारतीय युद्धासारखा प्रचण्ड कलि तेथें माजला असूनहि हृया देशाचा निभाव लागला. मथुरेंतील यमुनापुलीनांनों, द्रौपदीचे साहृचार्थ धाईनें निघालेलीं पुण्य पदें तुम्ही अवलोकन केलीं होतीं. खरोखर, आम्हीहि हृया विसाव्या शतकापर्यंत जन्मास येण्याचें लांबीवर टाकण्याऐवजीं यमुनातटावरील असाच एक वाळूचा कण बनलों असतों तर किती चांगलें झालें असतें !

श्रीकृष्णाच्या पूर्णावतारास पूर्णता येण्यास जें मुख्य कारण झालें तें श्रीकृष्णाचें सामर्थ्य हें होय. हृया सामर्थ्याच्या योगानें त्यांच्या इतर गुणांना शोभा आली व त्यांना आपल्या भक्तांचें कल्याण करावयास सांपडलें. श्रीकृष्ण नाना फडणीसांसारखे मुत्सद्दी असते, राजापुरकर कंपनीइतके नाचांत प्रवीण असते, डेक्कन जिमखान्याइतके खेळण्यांत पटाईत असते, अथवा प्रो. कर्व्यांइतके स्त्रियांचे हितकर्ते असते, तरी जर त्यांचें अंगांत सत्वसामर्थ्य नसतें तर त्यांची ही सर्व पूर्णता अगदीं निरुपयोगी झाली असती. परंतु त्या काळच्या सर्व पुरुषांत श्रीकृष्ण हे अत्यंत सामर्थ्यवान् असल्यामुळें त्यांची पूर्णता विश्वाचें हित करण्यास समर्थ झाली. श्रीकृष्णांच्या सत्वसामर्थ्यास त्यांच्या बाहुसामर्थ्याचीहि अतिशय जोड मिळाली. ज्यावेळीं कौरव पांडवांचें युद्ध उद्भवून दोन्हीं दळें परस्परांशीं दंड थोपटून उभीं राहिली, त्यावेळीं दुर्योधन व अर्जुन हृयांपैकीं प्रत्येकजण श्रीकृष्णाचें साहृय मागण्याकरितां त्यांचेकडे गेला. हृयांपैकीं अर्जुन हा विनयानें त्यांचे पायाकडे बसल्यामुळें श्रीकृष्णांची दृष्टि त्याचेकडे प्रथम गेली हें खरें, तथापि श्रीकृष्णांचे अंगांत दुर्योधन व अर्जुन हृया दोघांहि पराक्रमी पुरुषांना प्रशंसनीय वाटण्याजोगें किती सामर्थ्य होतें हें हृयावरून स्पष्ट दिसतें.

परंतु श्रीकृष्णाची पूर्णता सर्व विश्वास जी अभिवादनीय झाली, त्याचें जें अगदीं सर्वात महत्वाचें कारण होतें तें हें कीं श्रीकृष्णाचे अंगांत अपूर्व स्वार्थत्याग होता. श्रीकृष्ण हे कंसचाणूर इत्यादि राक्षसांचें कन्दन करण्याजोगे, शकटासुराला मारण्याइतके, कालेय सर्पाला तुडविण्याइतके

अथवा जरासंधाला उडविण्याइतके प्रबळ होते खरे, तथापि ते आजन्म पांडवांचे मांडलीकच राहिले. श्रीकृष्णाचे जागीं जर एखादा भोंदु गुरु असता तर अर्जुनाच्या भक्तीचा फायदा घेऊन व द्रौपदीसारख्या भोळ्या स्त्रीला फसवून त्यानें केव्हांच इंद्रप्रस्थ नगरींत ‘सम्राट्’ ह्मणून आपलें ठाणें दिलें असतें. परंतु श्रीकृष्णांनीं तसें कांहींच केलें नाहीं. त्यांनीं धर्मराजाला राज्य मिळवून दिलें, आपली धर्मभगिनी द्रौपदी हिचे अश्रु पुसले आणि द्वारकेचा रस्ता धरला. श्रीकृष्णांइतक्या थोरांना त्याच कारणांसाठीं पूर्णावतार म्हणावयाचें कीं स्वतः सर्व बाजूंनीं पूर्ण असूनहि ते भक्तांकरितां अपूर्ण बनावयास सिद्ध होते. श्रीकृष्ण जेव्हां पूर्ण परमेश्वरस्वरूपांतच असतील, त्या वेळीं त्यांच्या वैभवास कांहींच कमतरता नसली पाहिजे. श्रीकृष्ण मानवी स्वरूपांत सुद्धां सर्वतोपरी परिपूर्ण होते. परंतु इतकें असूनहि द्रौपदीच्या स्थालींतील एका शाकपत्रावर ते संतुष्ट झाले. आम्हांला असाच देव पाहिजे. आम्हांला आमचेकरितां अपूर्ण राहणारा देव पाहिजे. आम्हां अपूर्ण लोकांकरितां वैभव टाकून देणाऱ्या श्रीकृष्णाचे पूर्णावतारास आमचें शतशः वंदन असो !

---

## घारीसारखे चपळ बना !

—ह्याच्यापुढची गोष्ट ह्मणजे, शारीरिक शक्ति व लष्करी विद्या. टिळक–गान्धींचे अनुयायी घारीसारखे चपळ पाहिजेत. असे तुह्मीं असलां तरच तुम्हांला कोणी भिईल किंवा मानील! गाल खप्पड झालेले, डोकें अस्मानांत गेलेलें, पोट पंढरपुरास चाललेलें, व हातापायांची “ शेव ” बनलेली, असल्या लोकांनीं गान्धीं टोप्या घातल्या, नाहींतर रोज ‘ वन्दे मातरम्’चा जप केला, तर त्याची कोणाला पर्वा वाटेल ? गांधी–टिळकांचा अनुयायी म्हटला म्हणजे त्याला पाहिल्याबरोबर धास्ती वाटली पाहिजे. हातापायांच्या काडचा झालेलीं पाप्यांचीं पितरें आपल्या पितरांचा उद्धार काय करणार ?

[संदेश, ८ सप्टेंबर १९२२,]

# *श्री रामजन्म.

आजचा दिवस परम मंगल आहे. आज माध्यान्हीं श्रीरामचंद्र प्रभूचा जन्म व्हावयाचा आहे. आज हिंदुमात्रास रामाच्या जन्माची कथा, जन्माचें प्रयोजन व जन्माचें सार्थक्य हें ऐकून पराकाष्ठेचें समाधान होईल. ह्या सगुण परब्रह्माच्या लीला श्रवण करीत असतां प्रत्येक श्रोत्याचें अंत:करण निरतिशय व अवर्णनीय आनंदांत निमग्न होऊन स्वत:चें शरीर व स्वत:चा प्रपंच, यांचें भानहि राहाणार नाहीं. ज्या रावणाच्या उपद्व्यापामुळें ऋषींच्या धार्मिक कृत्यांत घडोघडीं अंतराय उत्पन्न झाले, त्या रावणाचा वधकर्ता जन्मास येत असल्याबद्दल कोणाचें अंत:करण प्रेमातिशयानें भरून येणार नाहीं ? सुदुस्त्यज्य व देवादिकांनींहि हेवा करण्यासारख्या राज्यलक्ष्मीचा त्याग करून जो राम केवळ आपल्या पित्याची आज्ञा पालन करण्याकरितां चौदा वर्षांचा वनवास भोगावयास सिद्ध झाला, त्या रामाची कर्तव्यतत्परता श्रवण करून, कोणास रामाचें दास्यत्व पत्करावें असें वाटणार नाहीं ? एकपत्नी, एकवचनी, एकबाणी राम कोणाचें अंत:करण आकर्षण करून घेणार नाहीं ? ज्यानें बालवयांत विश्वामित्रापासून शस्त्रास्त्रविद्या ग्रहण करून जनकाच्या जवळ असलेलें शिवधनु भंगिलें व सीतेचें पाणिग्रहण करण्याची आपली पात्रता सिद्ध केली, ज्यानें शिळा होऊन पडलेल्या अहिल्येचा उद्धार केला, व वानरांसारख्यांमध्यें संघशक्ति उत्पन्न करून तिच्या बळानें चौदा चौकड्यांचें राज्य करणाऱ्या महाप्रबल रावणाचा वध करून सीतेस परत आणिलें, अशा मंगलमय व पराक्रमी श्रीरामचंद्रप्रभूविषयीं ज्याच्या अंत:करणांत परम आदर, परम प्रेम व परम विश्वास उत्पन्न होणार नाहीं, असा मनष्य हिंदूंत विरळा !

रामावतार म्हणजे दैवी शक्तीचें उद्घाटन होय. रावणाच्या राक्षसी कृत्यांची परमावधि होऊन, जिकडे तिकडे तमोगुणांचें प्राबल्य माजलें तेव्हां सृष्टीच्या स्वाभाविक स्थितींत पडलेलें अंतर नाहीसें करून सन्मार्गाचा प्रचार अनिरुद्धपणें चालविण्याकरितां रामचंद्रप्रभूंनीं कौसल्येच्या उदरीं

* संदेश ११ एप्रिल १९१६.

जन्मास येऊन लोकस्थिति सुधारली. रामांनीं जन्मास येऊन फक्त आपल्या आईबापांच्या, कुलाच्या किंवा राज्याच्या मोठेपणांत भर घातली असें नाहीं. तर त्यांनीं सर्व जगाची स्थिति बदलली. वाईटाचें पारिपत्य करून चांगल्याची प्रस्थापना करणें हेंच अवताराचें मुख्य कर्तव्य होय, व तें रामचंद्रप्रभूंनीं आपल्या उदाहरणानें सर्व जगाच्या निदर्शनास आणून दिलें. चांगलेपणाची किंवा अवतारीपणाची हीच साक्ष होय. स्वार्थाकडे दुर्लक्ष करून परार्थ साधणें व त्यांतच जीविताची इतिकर्तव्यता मानणें हा रामाच्या चरित्रापासून घेण्या-सारखा मोठा बोध आहे. रामाची उपासना म्हणजे त्यांनीं जे सद्‌गुण आपल्या आचरणांत प्रकट केले त्यांचें परिपालन करून तदुनुरूप वर्तन करणें हीच होय. रामोपासक हिंदुस्थानच्या सर्व भागांत आहेत तसे ते महाराष्ट्रांतहि आहेत; पण रामोपासकांचें नांव निघालें कीं रामदासांची मूर्ति डोळ्यांसमोर उभी राहिल्याशिवाय रहात नाहीं. रामाच्या स्वरूपाचा यथार्थ बोध राम-दासांसच झाला होता व म्हणूनच त्यांनीं आमरणांत अविवाहित राहून धर्मास आलेली ग्लानि नाहींशी करण्यांत आयुष्य वेचलें. परंतु धर्माची ग्लानि स्वराज्याच्या स्थापनेशिवाय नष्ट होत नाहीं असें वाटल्यावरून त्यांनीं त्या दिशेनें प्रयत्न करून, आपले हेतु सिद्धीस नेले. हीच खरी रामाची सेवा होय. राम सर्वत्र भरलेला आहे. त्याची व्याप्ति प्राणिमात्रांत आहे. त्याच्या-शिवाय रितें स्थळ असें नाहींच. ही अद्वैत भावना मनांत बाळगून, हें जीवन्मुक्ताचें ज्ञान प्राप्त करून घेऊन व आपल्या उपास्य देवतेशीं तादात्म्य करून, रामदासांनीं लोकोपकारक कार्यांचेंच आचरण केलें. हें कार्य रामदास न करिते तर रामानें तें दुसऱ्या कोणाच्या तरी हातानें करवून घेतलेंच असतें. पण रामदासांनीं रामानें दिलेल्या अंतःस्फूर्तीचा अनादर केला नाहीं. जनीं, वनीं, जगीं, स्थलीं, काष्ठीं, पापाणीं राम भरलेला आहे हें राम-दासांनीं पूर्णपणें जाणलें होतें; जगताची स्थिति व संहार हीं रामाच्याच इच्छेनें होत असतात हें रामदासांनीं ओळखलें होतें; व म्हणूनच रामाच्या तात्त्विक स्वरूपाचें नुसतें ज्ञान करून घेऊन ते तृप्त न राहतां निकृष्टाव-स्थेला पोहोंचलेल्या समाजाची उन्नति करण्याचा प्रपंच त्यांनीं आपल्या माग लावून घेतला. रामाचा साक्षात्कार झाल्यावर ते एकाद्या गुहेंत बसून राम-

चिंतनांत आपला देह ठेवते, तरी मोक्ष प्राप्त झाला असता; पण त्यांनीं आपल्या ज्ञानाचा, आपल्या सामर्थ्याचा, आपल्या पवित्र आचरणाचा उपयोग समाजाच्या उन्नतीकडे खर्च केला व त्यामुळें श्रेष्ठ रामोपासकांत त्यांची गणना झाली आहे. रामाची उपासना करणारांनीं रामदासांचें आधीं अनुकरण केलें पाहिजे, व असें होईल तरच त्यांस रामाच्या प्राप्तीची आशा आहे.

रामाचा जन्म आज प्रत्येक राममंदिरांत व इतरत्रहि साजरा होईल. पण एक दिवस जन्मोत्सव केल्यानें रामाचें स्वरूप चित्तावर कायम राहील काय ? नाहीं. त्या सर्वव्यापी रामाचें स्वरूप यथाबुद्धि जगतांत पाहिलें पाहिजे. आज हिंदुस्थानच्या स्थितीकडे पाहिलें तर त्यांत राम दिसणार नाहीं काय ? हिंदुस्थानांत 'राम' नाहीं असें कोण म्हणेल ? राम म्हणजे अलौकिक किंवा दिव्य शक्ति, या अर्थानें पाहूं जातां मध्यंतरीं हिंदुस्थानांतील चैतन्य लुप्तप्राय झाल्यासारखें दिसत होतें पण रामाच्या भूमींतून राम कधींहि कायमचे अंतर्धान पावावयाचे नाहींत. हिंदु लोकांचा धर्मसंग्रह, त्यांचें तत्वज्ञान, त्यांची नीतिमत्ता व उदात्त ध्येयें हीं पाश्चात्त्यांनीं ओळखलीं आहेत, व सध्यां साऱ्या हिंदुस्थानांत जी चैतन्याची लाट उसळली आहे, तिचा खळखळाट पृथ्वीवरील साऱ्या राष्ट्रांपर्यंत ऐकूं गेला आहे. ही दैवी शक्तिच आमचीं कार्यें घडवून आणीत आहे. या शक्तीच्या जन्माचें अभिनंदन कोण करणार नाहीं ? या रामाचा उत्सव कोणास प्रिय होणार नाहीं ? या उत्सवांत आम्हीं स्वेच्छेनें सामील होऊं तर विशेषच, पण न होऊं तरी त्याचें कार्य घडून आल्याशिवाय रहावयाचें नाहीं. मग जाणून बुजून त्यापासून अलिप्त कोण राहील ? सर्वव्यापी, सर्वसमर्थ रामचंद्र प्रभो ! आपण आजच्या प्रमाणेंच प्रतिवर्षी प्रगट होत जाऊन आम्हां हिंदी लोकांच्या हातून हिंदुस्थानची सेवा जास्त जास्त प्रमाणावर घेत जा, व हिंदुस्थानांत "राम" आहे असें सर्व जगांत प्रस्थापित करा.

# * पुंडलीकवरदे हरिविठ्ठल !

हे सकलशक्तिनिवास, विश्वसूत्रचालक, ब्रह्मांडनायक, भक्तकाजकल्पद्रुम पंढरीश, आज तुझ्या चरणीं मिलिंदायमान झालेला भक्तसमुदाय तुझ्याकडें भक्तिभावानें धांवून येत आहे. सर्व महाराष्ट्रीयांचीं अंतःकरणें आज तुझ्याच प्रेममूर्तीनें आकर्षण करून घेतलीं आहेत. या वेळीं सहस्त्रशः लोक तुझ्या चरणीं येऊन थडकले आहेत व सहस्त्रावधि लोक कोणी बैलगाडींतून तर कोणी बाष्परथांतून तुझ्या दर्शनास येण्यासाठीं मार्ग आक्रमण करीत आहेत. तुझें दर्शन, तुझें प्रीतियुक्त हास्य, तुझी सगुण साजिरी मूर्ति, तुझें अत्यंत पावन असें राऊळ, तुला उजवें घालून जाणारी भागीरथी चंद्रभागा, तिचें पवित्र वाळवंट, तुझ्या रम्य क्रीडांनीं फलश्रुत होऊन गेलेली गोपाळपुरी हींच आज प्रत्येकाच्या हृदयांत निवास करीत आहेत. आज जें लाखों लोक तुझ्या चरणापाशीं प्राप्त झालेले आहेत त्यांना तर तूं आपल्या स्वयंसिद्ध आनंदाचे वाटेकरी केलेलेंच आहेस, पण ज्यांना अनेक कारणांमुळें तुझ्याकडे येतां आलें नाहीं तेहि तुझ्याच प्रेमांत जागच्या जागींच तल्लीन होऊन गेलेले आहेत. तुझा महिमा आहे तो हाच ! हाच तुझा ऐश्वरी योग होय ! तुझ्याजवळ स्थूळ शरीरानें येऊनहि जर कुणाचें मन ऐहिक व्यापारांत निमग्न झालें असेल तर त्याला तुझ्या सहवासाचा आनंद प्राप्त होणें शक्य नाहीं. उलटपक्षीं तुजपासून दूर असणाऱ्या मनुष्याला तुझ्याविषयीं अत्यंत प्रेम असलें तर त्याच्या हृदयांत त्वदन्य विचारांचा मुळींच प्रवेश न होऊं देतां, तूं त्याच्या अंतःकरणाचा पाट करून त्यावर स्थिर होतोस, व तूं भावप्राप्य आहेस असेंच सर्वांच्या प्रत्ययास आणून देतोस. याकरितां तूं काय केलें नाहींस ? तुला जगांत नाना स्वरूप धारण करण्याची हौस आहे खरी, पण आपल्या भक्तांचीं संकटें दूर करण्यास जशा प्रकारचें सोंग घेण्याची जरुरी असते तसें सोंग घेऊन तूं त्यांस अभयदान देतोस. हा तुझा महिमा किती वर्णावा ? तूं आपला भक्त उच्च आहे कीं नीच आहे, थोर आहे कीं पामर

* संदेश ता. १० जुलै १९१६.

६३४२

आहे, श्रीमंत आहे कीं दरिद्री आहे, राजा आहे कीं रंक आहे, पुरुष आहे कीं स्त्री आहे, ब्राम्हण आहे कीं शूद्र आहे, सुदृढ आहे कीं रोगपीडित आहे, याचा मुळींच विचार न करतां त्याच्या अंगीं तुझ्यावर निस्सीम प्रेम आहे कीं नाहीं एवढेंच पाहतोस, व तेवढें दिसून आल्यावर तूं त्याचा स्वत: किंकर बनून त्याचे इच्छित मनोरथ सिद्धीस नेतोस. याकरितां तुला किती नीचपणाचीं कामें करावीं लागलीं आहेत ? दिवसभर भिक्षा मागून मिळालेल्या शिध्याचा तुला नैवेद्य दाखविल्याशिवाय पोटांत घांस न घालण्याचा निश्चय असलेल्या एका बृद्ध स्त्रीचा रात्रीं शेजारती होऊन गेल्यावर रावळांत प्रवेश होईना म्हणून, ती दु:खानें परत घराकडे गेली आणि आपले प्राण व्याकुळ होत असतां " माझा विठोबा आज उपाशापोटींच किरे निजला " असें म्हणून आक्रोश करीत बसली पण या विचारानें तिचें चित्त एकाग्र होऊन गेलें; अर्थात त्या ठिकाणीं, पंढरीनिवासा ! तुला जावें लागून तिच्या ताकांत कालविलेल्या पिठाच्या नैवेद्याचा स्वीकार करून स्वत:स ताकपीठ्या ही संज्ञा घ्यावी लागली. एवढें तुझें मन दयाशील आहे व म्हणूनच तुझी कृपा संपादन करण्याचा दरवाजा सर्वत्रांस सदासर्वदा खुला आहे. तूं वाटेल त्या भक्तास वाटेल तेव्हां भेट देण्यास सिद्ध आहेस म्हणूनच तुला " जगाचा बादशहा " असें म्हणून आम्हीं आळवितों. आमची काय जीं गाऱ्हाणीं, सुखदु:खें, उणीवा, आशा, आकांक्षा असतील त्या सर्व तुझ्यापाशीं खुल्या दिलानें सांगण्यास आम्हांस संकोच वाटत नाहीं. चोरून ठेवतां येईल मनुष्यापासून, पण तूं आमच्या मनाच्याहि आंत वास करणारा असल्यामुळें तुझ्यापासून चोरी करून ठेवण्याचें आमच्यांत बळ तरी कुठें आहे ? असा तूं कृपाघन, अखिल-हृदयनिवास, विघ्ननिवारक व अभीष्टफलदायक असल्यामुळें आम्ही तुला अनन्यशरण आहोंत. आमचे मनोरथ सिद्धीस नेणें हें तुझ्याच प्रसादावर अवलंबून आहे.

पंढरीनाथा, ज्या अर्थी जगाचें चक्र सुरू केल्यापासून आजपर्यंत कोणतेंहि कार्य कारणावांचून घडलें नाहीं, कोणताहि वृक्ष बीजाशिवाय उद्भवला नाहीं, फार काय, भक्त जनांनीं तुझें चिंतन करून तुझ्या आगमनाची मार्ग-प्रतीक्षा केल्याशिवाय तं आपलें प्रकटीकरण केलें नाहींस, त्या अर्थी ह्या

द्वैतमय सृष्टींत कर्माचा सिद्धांत अबाधित आहे, असेंच आमच्या मतीस निश्चित वाटतें. हा कर्माचा गाडा मी चालू ठेवणार, नाहींतर विश्वाचा संहार होईल, असें भगवन्! आपण स्वतः आपल्याच मुखानें गीतेंत प्रतिपादिलें आहे. तेव्हां अर्थात् तुमची कृपा संपादन करण्यास निष्ठायुक्त ज्ञानसिद्ध कर्मांचा आश्रय करण्याशिवाय गत्यंतर नाहीं हें ओघानेंच प्राप्त होतें. परंतु कर्माचा महिमा वाढविण्याकरितांच कीं काय, सध्यां आमच्यामध्यें शुद्ध कर्माचा लोप व वेदांताच्या लटक्या बातांचा सुळसुळाट झालेला दिसून येत आहे. आमच्या पूर्वजांनीं सध्यांच्या पाश्चात्य कर्मवीरांप्रमाणें साहसाचीं, शौर्याचीं, शहाणपणाचीं, उद्यमाचीं कर्मे केलीं नसतीं तर या भरतभूमीचे पोवाडे परकीयांनीं कशाला गाइले असते ? आर्यमातेची थोरवी आहे ती तिच्या शूर पुत्रांनीं केलेल्या कर्मांमुळें तिला प्राप्त झालेली आहे. अठरा पुराणें, सहा शास्त्रें, शतावधि उपशास्त्रें, कला यांचा विस्तार कर्मांशिवाय झाला काय ? व्याकरण, ज्योतिष, गणित, अलंकारशास्त्र, भूगर्भशास्त्र, आयुर्वेद, अश्वचिकित्सा इत्यादि असंख्य आदिभौतिक शास्त्रांचा उगम कर्मविमुखतेपासून होणें शक्य आहे काय ? रामरावण युद्ध व त्यानंतरचें भारतीय युद्ध ह्या पौराणिक कालच्या गोष्टी सोडून दिल्या तरी प्रतापसिंह, विक्रमादित्य, भोज, अशोक, पृथ्वीराज, शिवाजी, इत्यादि प्रतापशाली भूपतींनीं गाजविलेलें शौर्य व शंकराचार्यादिकांसारख्या अद्वितीय नरमणींनीं सरस्वतीच्या प्रीत्यर्थ केलेले प्रयत्न हे कर्मास तुच्छ लेखून होणें शक्य आहे काय ? कर्मास कांहीं किंमत नसती तर कश्मीरापासून रामेश्वरापर्यंत, व द्वारकेपासून ब्रम्हदेशापर्यंत भरतभूमीच्या विस्तारांत जी प्रेक्षणीय, प्रचंड व सर्वभक्षक कालाकडे पाहून हंसणारीं देवालयें आहेत तीं उभारण्याचें आमच्या पूर्वजांनीं मनावर घेतलें असतें काय ? ऐहिक वस्तूंपासून प्राप्त होणारें वैभव स्पृहणीय नसतें तर आमचे पूर्वज स्वराज्यस्थापनेचा परिश्रम वृथाच करते काय ? व धर्माच्या लक्षणांत ते अभ्युदयहेतुत्वाचा समावेश करते काय ? सारांश, ऐहिक अभ्युदयाशिवाय समाजास पृथ्वीच्या पाठीवर टिकून राहतां येणें शक्य नाहीं व तो अभ्युदय प्राप्त करून घेणें हें आपली आध्यात्मिक उन्नति प्राप्त करून घेण्याच्या आड येणारें कृत्य होय अशी जी आज कित्येकांची समजूत झालेली आहे, ती

सर्वथैव भ्रममूलक, निराधार आणि आत्मघातकीपणाची होय. बा मोहपटल-विनाशक पंढरीनाथा, आम्हांला दिव्यदृष्टि देऊन आमचें अज्ञानावरण दूर कर आणि ज्या उल्हासानें, ज्या आत्मविश्वासानें, ज्या सात्त्विक आकांक्षेनें आमचे पूर्वज स्वकर्तव्य करावयास प्रवृत्त होत असत व त्यांच्या पुण्याईवरच आज आम्हीं आपले दिवस कंठीत आहोंत—तें मानसिक बल, तो विश्वास, ती कर्तव्यनिष्ठा आमच्या अंगीं उत्पन्न कर. हिंदुस्थानच्या प्रजेवर आलस्योद्भव निष्क्रियतेची जी बळकट छाप बसलेली आहे तिच्या मगरमिठींतून आम्हांला सोडीव आणि आमचीं कर्तव्यें करण्यास आम्हांला बुद्धि व सामर्थ्य दे.

भो पांडुरंगा ! तूं जगन्निवास आहेस, आह्मीं आपल्या बुद्धीनें व आमच्या सोईकरतां, पंढरी ही तुझी राजधानी कल्पिली आहे, पण तूं फक्त तेथेंच रहात नाहींस. तूं पंढरीस आहेस तसाच व्हर्डून येथेंहि आहेस, तूं जनरल फ्रेंचांच्या बाहूंत शक्ति अर्पण करीत आहेस व जनरल हिंडेनबर्गच्या मेंदूंतून आपला आंवरता पाय घेत आहेस, पॉट्सडॅम व बर्लिन येथील राजवाड्यांत जमा होणाऱ्या प्रधानमंडळाचा जसा तूं समाचार घेत आहेस तसाच लंडन, पॅरिस, व पेट्रोग्राड येथील राजकारणधुरंधरांस आत्मविश्वास, बुद्धिबल व शारीरिक सामर्थ्य देत आहेस. ब्रिटिश साम्राज्याची नवी घटना होणार आहे, त्या वेळच्या चर्चेच्याहि वेळीं तूं सर्व मित्रमंडळाच्या हृदयांत त्यांना दिसणार नाहींस अशा बेतानें तूं हजर राहशील. आपल्या गुप्त सभांचे अहवाल बाहेर फोडावयाचे नाहींत असें त्यानीं ठरविलेलें असलें तरी ते सर्वजण, तुझी सल्ला घेतल्याशिवाय एक शब्दहि उच्चारावयाचे नाहींत. फार काय, तूं देशील त्याशिवाय दुसरा विचारच त्यांच्या अंतःकरणांत उद्भवावयाचा नाहीं. असा तूं सर्वव्यापी, सर्वसाक्षी, सर्वप्रेरक आहेस ! व ज्या अर्थी आह्मी तुला आमचा राजा, आमचा पालक, आमचा बाप, आमचा बंधु, आमचा सखा, नव्हे आमचें सर्वस्व समजतों, त्या अर्थी आमचा हितसंबंध जेथें असेल तेथें आमचा वकील ह्मणून हजर राहणें तुला प्राप्त आहे. देवा विठ्ठला, महाराच्या सोंगानें रसद पोहोंचवून आपल्या भक्ताचें संकटनिवारण करणाऱ्या, ताकपीठाच्या आशेनें आपलें ठिकाण सोडून म्हाताऱ्या बाईच्या घरीं ठेंचाबुक्या खात

धांवत जाणाऱ्या, भक्तांच्या इच्छेप्रमाणें निरनिराळे अवतार धारण करून जगांत सुस्थिति घडवून आणणाऱ्या परमेश्वरा, आज साऱ्या महाराष्ट्रांतील लोक तुला शरण येऊन काय जें मागणें मागतात तें पुरविण्याचें सामर्थ्य तुझ्यांत नाहीं असें कसें घडेल ? तुझ्या पायांवर आपला माथा ठेवतांना, अगर आपल्या ऐहिक व्यापारांत निमग्न असतांना सर्व महाराष्ट्रीयांची व हिंदी जनतेची जर एक इच्छा असेल तर ती सध्यांचें युद्ध समाप्त झाल्यानंतर ह्या हतभागी हिंदुस्थानास इंपीरिअल पार्लमेंटमध्यें आपल्या इतर भावंडांच्या बरोबरीचा दर्जा प्राप्त व्हावा हीच आहे. ही त्यांची इच्छा अगदीं न्याय्य आहे, तिची प्रेरणाहि तुझ्याकडूनच झालेली आहे, अशी आमची दृढ निष्ठा आहे. कारण ती तशी नसती तर कोट्यवधि लोकांच्या मनांत एकसमयावच्छेदेंकरून ती उद्‌भवलीच नसती, पण ज्या अर्थी ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत सर्व हिंदुस्थान “स्वराज्य” (होमरूल) ह्या एका शब्दानें दमदुमत आहे त्या अर्थी सर्वांच्या अंत:करणांतील नगाऱ्यावर परमेश्वरा, तुझे आघात सुरू आहेत यांत मुळींच शंका नाहीं. तेहतीस कोटी अंत:करणांत उद्‌भवलेली इच्छा विफल होईल अशी देवा ! आह्मीं कल्पना तरी कशी करावी ? सच्चिदानंदस्वरूप, सांवळ्या पंढरीच्या पाटला! आमचे मनोरथ पूर्ण करणें सर्वस्वीं तुझ्याच स्वाधीन आहे, तुझ्यावरच आमची पूर्ण निष्ठा आहे. तुझ्या प्रसादाशिवाय आमचें कल्याण होणार नाहीं अशी आमची दृढ श्रद्धा आहे व त्या तुझ्या प्रसादास प्रात्र होण्याकरितां तूं आमच्यामध्यें साहस, धैर्य, शौर्य, सद्‌बुद्धि, सुनीति, कर्तव्यपरायणता इत्यादि सद्‌गुण उत्पन्न कर, याशिवाय तुला दुसरें तें मागणें काय असणार ? तूं आमच्या मन:कामना पूर्ण केल्यावर आमची ऐहिक उन्नति होऊन नंतर आह्मी तुझ्या ऐश्वर्याचे, वैभवाचे व शक्तीचे पोवाडे आजच्यापेक्षांहि मोटया सुरानें गाऊं. परमेश्वरा! होईल ना तुझा अनुग्रह? होइलच यांत शंका नाहीं. ‘धर्मसंस्थापनार्थाय संभबामि युगे युगे,’ ठीक आहे. देवा, हे तुझेच ना शब्द ? तर मग ह्मणा, पुंडलीक वरदे हरिविठ्ठल !!

# * शिवाजीचा लोकोद्धार.

आपण आर्य लोक—हिंदुलोक या जगांत परमेश्वराचे अत्यंत लाडके आहोंत. पृथ्वीच्या पाठीवर आमच्या इतके भाग्यवान् दुसरे कोणीहि नाहींत. परमेश्वराच्या कृपेला आमच्या इतके दुसरे कोणतेहि लोक पात्र झालेले नाहींत. प्रत्येक राष्ट्र कल्पांतानंतर पुन्हा आपआपल्या पूर्व-कर्मानुसार बरावाईट जन्म घेतें असें मानलें, तर या कल्पांतांत अत्युच्च असलेल्या आपल्या राष्ट्रानें मागील जन्मांत फारच मोठें पुण्य संपादन करून ठेवलें असलें पाहिजे असें खास वाटतें. हिंदुस्थानासारखी अत्यंत पवित्र पुण्यभूमि ईश्वरानें केवळ आपल्यासच दिली आहे. दुर्लंघ्य मर्यादांनीं परिवेष्टित व सर्व जगांतल्या अनेकविध सौंदर्यवस्तूंचें संग्रहस्थान असें हें आर्यावर्त, परमेश्वरानें फक्त आपल्यासच दिलें आहे. सर्व जगांत अतिश्रेष्ठ व प्रत्यक्ष संजीवनीच्या वनस्पतींनींहि युक्त असा हिमाचल, सर्व जगांत अत्यंत श्रेष्ठ असलेली पुण्यपावन सरिता गंगानदी, हीं सर्व परमेश्वरानें आपणांसच दिलीं आहेत. सर्व राष्ट्रांचें, धर्मांचें, शास्त्रांचें प्राचीनत्त्व त्यानें आपल्याकडेच दिलें आहे. आपल्या सनातन धर्मांचें प्रधानांग जे वेद ते परमेश्वरानें प्रत्यक्ष आपल्या निःश्वसनानेंच उत्पन्न केलेले आहेत. सर्व तात्त्विक ग्रंथांतला ग्रंथमेरु जो कर्मयोगाचा भगवद्गीता ग्रंथ, तो प्रत्यक्ष परमेश्वराच्या मुखांतूनच आपल्या उद्धाराकरितां स्रवलेला आहे. लोकोद्धारासाठीं झालेले श्रीरामचंद्राचे व श्रीकृष्णाचे पूर्णावतार, आपल्याच आर्यावर्तांत झालेले आहेत. व्यास, वाल्मीकि, पराशरादि अत्यंत श्रेष्ठ महर्षी, हरिश्चंद्रासारखे सत्त्वनिष्ठ राजे आपल्यालाच लाभले आहेत, आणि शिवाजी महाराजांसारखे लोकोत्तर पुरुषहि केवळ आपल्यालाच लाभले आहेत. ते आपल्यास लाभले आहेत म्हणूनच आम्हीं दैववान् आहोंत, आणि परमेश्वराची अशी आपल्यावर कृपादृष्टि आहे म्हणूनच आपल्या देशाची, धर्माची, लोकांची कितीहि अवनति झाली तरी आम्ही कधींहि नष्ट होणार नाहीं अशी आमची खात्री आहे.

---

* संदेश ता. १८ जून १९१६.

इतकी उज्ज्वल परंपरा ज्या लोकांची आहे, ते लोक कधींहि नष्टप्राय होणार नाहींत–परमेश्वर त्यांना होऊं देणार नाहीं. चक्रनेमिक्रमाप्रमाणें त्यांची कितीहि अवनति झाली, कालाच्या तडाख्यांत त्यांची कितीहि दुर्दशा झाली, तरी परमेश्वर त्यांना कधींहि नाश पावूं देणार नाहीं. त्यांची उन्नति करणें परमेश्वरास भाग आहे. ‘ परित्राणाय साधूनां । विनाशायच दुष्कृतां । धर्मसंस्थापनार्थाय संभावामि युगे युगे ॥ ’ असें परमेश्वराचें आश्वासन–अभिवचन–हिंदुधर्मांतील लोकांना मिळालें आहे, आणि त्याचें कारण परमेश्वर आपला पाठीराखा आहे हें होय. धर्माची अवनति आणि अधर्माचें अभ्युत्थान ह्या गोष्टी सूर्याला लागणाऱ्या किंचित्काल ग्रहणाप्रमाणें अथवा साधूंना कांहीं काल प्राप्त होणाऱ्या संकटाप्रमाणें आहेत. ह्या गोष्टी या आयुष्याच्या परीक्षा आहेत. ह्या परीक्षेंत–ह्या दिव्यांत आपण जितकें अधिक सत्व दाखवितों तितकी आपली उन्नति अधिक सुलभतेनें व अधिक सत्वर होते.

अशा संकटांतून पार पडण्याकरितांच वरील उज्ज्वल परंपरा परमेश्वरानें आपल्यास दिली आहे. त्याचीं चरित्रें आपल्यास आदर्शवत् व्हावींत, म्हणूनच तीं आपल्यापुढें ठेवलीं आहेत, व म्हणूनच तीं आपलीं दैवतें आहेत. आपलें शील, आपलें सत्व कायम राखण्याकरितां हीं महापुरुष–चरित्रें आपलीं साहाय्यकारी होत. प्रभु रामचंद्राचें चरित्र आपणास जितकें सहाय्यकारी आहे, तितकेंच प्रभु श्रीकृष्णाचें आहे व तितकेंच श्रीशिवाजीचें आहे. जनकल्याणाकरितां, लोकोद्धाराकरितां, ज्यांचे ज्यांचे अवतार झाले त्या सर्व महाविभूतींचीं चरित्रें हीं आपल्या विपत्कालीं आपले मार्गदर्शक होत, आपले गुरु होत, आपलीं दैवतें होत, आणि म्हणून ह्या सर्व विभूती अत्यंत वंद्य व पूज्य आहेत. ज्या आर्यमातेच्या उदरीं हीं रत्नें निर्माण झालीं, त्या आर्य मातेला आमचे सर्वांचे शतशः प्रणाम असोत.

महापुरुषांचीं आयुष्यें हीं वर्षांनीं मोजावयाचीं नसून, शतकांनीं मोजावयाचीं असतात, आणि म्हणून ज्यांचे अवतारास अद्याप फारशीं शतकें झालीं नसतील, ज्यांच्या लोककल्याणाच्या कृती अद्याप दृष्टीस पडत असतील, ज्यांची स्मृति अद्याप अगदीं ताजी असेल अशाच विभूती आपल्या अधिक संन्निध असतात, व अशाच विभूतींना आपला प्रेमशब्द अधिक

लौकर ऐकूं येतो. श्रीशिवाजी महाराज व श्री समर्थ रामदास हे आपल्या अधिक संनिध आहेत असें आपल्यास वाटतें व त्यांचीच आपल्यास अगोदर आठवण होते. आपण निराशेनें एखादे वेळेस डोळे मिटल्यास एकदम शिवरायांची व समर्थांचीच मूर्ति आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते व ती आपलें सांत्वन करते. शून्यतेनें एखादे वेळेस आकाशाकडे पाहिलें असतां एकदम शिवरायांची व समर्थांचीच मूर्ति आपल्या डोळ्यांसमोर येते व आपल्या मनास धीर देते. याचें कारण दुसरें कांहीं नसून, शिवरायांचा काल व स्मृति आपल्या चालू काळाशीं व स्मृतींशीं अधिक संन्निध आहेत, व म्हणून ते आपल्याजवळ आहेत असें आपणांस वाटतें हें होय.

आणि असें वाटतें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. शिवाजी महाराजांचें चरित्र इतकें हृदयंगम व उदात्त आहे कीं, त्यांतील प्रत्येक गोष्ट आपल्या अंतःकरणास चटका लावल्यावांचून सोडीत नाहीं. तीन तीन शतकांनंतरहि ते आज आपल्या 'जवळ,' अगदीं आपल्यांत आहेत असें वाटणें, हा केवळ त्यांच्या उदात्त चारित्र्याचाच गुण आहे. आपल्यांत अगदीं लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना जें त्यांच्या चरित्राविषयीं प्रेम वाटतें तें त्यांच्या उदात्त चारित्र्याचाच गुण होय. त्यांच्याइतकें उदात्त चरित्र फारसें कोणाचेंहि सांपडत नाहीं. सीझर, शिकंदर, नेपोलियन हे त्यांच्या एकेका किंवा अधिक गुणांचे आदर्श होतील, परंतु त्या सर्वांचा एक देह केल्याशिवाय त्यांच्यासारखी सर्वगुणादर्श अशी एकहि विभूति अलीकडच्या काळांत सांपडावयाची नाहीं. त्यांचें शौर्य अवर्णनीय, त्यांचें धैर्य अवर्णनीय, त्यांचें औदार्य अवर्णनीय, त्यांचे सर्वच गुण अवर्णनीय. त्यांचें पितृप्रेम, त्यांचें मातृप्रेम, भ्रातृप्रेम, सर्वच प्रशंसनीय. त्यांची धर्मभक्ति, गोब्राह्मणांच्या रक्षणाविषयीं दक्षता, परमेश्वरावर निष्ठा, व गुरुभक्ति, सर्वच आदरणीय. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर ह्या षड्विकारांच्या ते स्वाधीन नसून ते षड्विकार त्यांच्या स्वाधीन होते. त्यांचे विचार, उच्चार व आचार सर्व अर्थशः शुद्ध होते. पवित्रतेचे ते मूर्तिमंत पुतळे होते. धर्माची ते प्रत्यक्ष मूर्ति होते. त्यांचा शहाणपणा अवर्णनीय, त्यांचा मुत्सद्दीपणा अवर्णनीय, त्यांची कल्पकता अवर्णनीय, सर्वच कांहीं अवर्णनीय होतें. त्यांची गुणग्राहकता, त्यांची स्वभावसरलता, त्यांचा विनय

व निगर्वीपणा हे सर्वच गुण अप्रतिम होते. सारांश, थोडक्यांत म्हणावयाचें म्हणजे, ज्या एकेका गुणामुळें मनुष्य श्रेष्ठ पदास पोंचतो, त्या सर्व गुणांचा समुच्चय महाराजांच्या ठायीं होता, त्या सर्व गुणांनीं महाराज युक्त होते, त्या सर्व गुणांचें प्रत्यक्ष स्थानच महाराज होते ! आणि म्हणून ते श्रेष्ठ अतिश्रेष्ठ महापुरुष होते ! सर्व सद्‍गुण पूर्णतेनें एकाच व्यक्तीच्या ठायीं कधींहि बहुधा संभवत नाहींत, पण ते श्री शिवरायाच्या ठिकाणीं संभवले, म्हणनच ते श्रेष्ठ झाले, व म्हणूनच त्यांना आपण दैवी पुरुष, महापुरुष व प्रत्यक्ष ईश्वरावतारहि म्हणतों !

परंतु एवढ्याच एका गुणसमुच्चयानें कांहीं महाराज लोकादरास पात्र झाले नाहींत, तर सर्व गुणांपेक्षांहि विशेष उच्च गुण जो ‘ देशाभिमान ’ तो त्यांच्या ठायीं मूर्तिमंत वास करीत होता, म्हणूनच ते इतके लोकाग्रणी झाले. महाराज देशभक्तीचे मूर्तिमंत पुतळे होते. त्यांच्या रोमरोमीं देशाभिमान भरला होता, त्यांचा गर्भवास देशाभिमानाच्या विचारांत गेला, त्यांचें बाल-पण देशाभिमानाच्या कथा व गोष्टी ऐकण्यांत गेलें, त्यांचें तारुण्य देशाभि-मानाचीं कृत्यें करण्यांत गेलें, व त्यांचें उतारवय देशाभिमानाचें गीत गाण्यांत गेलें. देशभक्ति हा गुण सर्व गुणांतला गुणमेरु आहे, व त्याच्यामुळेंच सर्व गुण प्रकाशतात. इतर सर्व गुण परप्रकाशी चंद्राप्रमाणें असून देशभक्ति हा गुण स्वयंप्रकाशी सूर्याप्रमाणें आहे, किंवा इतर गुण नक्षत्रांप्रमाणें असून देश-भक्ति हा गुण त्यांना अधिक सुंदर करणाऱ्या व चारुता देणाऱ्या पूर्णशशी-प्रमाणें आहे. देशभक्ति हा गुण आपल्या शुद्ध स्वरूपानें बाहेर दिसो वा न दिसो, परंतु अंतःकरणांत ती तीव्रतेनें प्रकाशत असल्यावांचून इतर सद्‍गुण कधींहि प्रकाशावयाचे नाहींत. लोककल्याणाची–लोकहिताची दृष्टि व भावना अंतःकरणांत असल्यावांचून ते गुण लोकनिदर्शनाला केव्हांहि यावयाचे नाहींत. मनुष्यास दिलेले सर्व गुणच मुळीं स्वतःकरितां–स्वार्थाकरितां दिलेले नसून परार्थाकरितां दिलेले असतात आणि म्हणून अंतःकरणांत देशहिताची दृष्टि नसली तर ते या जगांत निरुपयोगीं ठरून, जागच्या जागीं कुजून जातात. लोककल्याण, समाजसुस्थिति, देशसौख्य हें याच दृष्टीनें सर्वांत श्रेष्ठ व उदात्त ध्येय ठरलेलें आहे. शौर्य, धैर्य हे समाजाकरितां व देशाकरितां अस-

तील तर ते खरे गुण. परोपकार घराच्या बाहेर पडत असेल तर तो खरा गुण. त्याचप्रमाणें मातृपितृप्रेमासारखे सर्व गुण तात्कालिक जरी विशिष्ट कार्यांकरितां असले तरीं त्यांचें अंतिम कार्य समाजसुस्थिति करणें, समाजाचें व राष्ट्राचें शील व दर्जा वाढविणें हें असल्यामुळें, त्यांना मान्यता आली आहे. ह्या सर्व गुणांचें सद्‌गुणत्व राष्ट्रीय दृष्टचा आहे, आणि म्हणून ती राष्ट्रीय दृष्टि अथवा देशाभिमान हा सर्व गुणांतला गुणमेरु आहे.

शिवरायांमध्यें हा गुण पूर्णपणें व प्रखरतेनें वसत असल्यामुळें ते सर्व राष्ट्राच्या आदरास पात्र झाले आहेत. त्यांच्या चरित्राचें परिशीलन करण्याचें कांहीं आतां विशेष प्रयोजन नाहीं, कारण तें सर्वांच्या अत्यंत परिचयाचें आहे. त्यांनीं अगदीं बालवयांतच काबीज केलेले किल्ले, प्रतापगडावर अफझुलखानाला दाखविलेलें शौर्य, शाहिस्तेखानाला दाखविलेली चपळाई, राजा जयचंदाशीं केलेली मुसद्देगिरी, दिल्ली दरबारांतून सुटून येण्यांत दाखविलेलें कारस्थानपटुत्व, अष्टप्रधान नेमून राज्याचा बंदोबस्त करण्यांत दाखविलेला शहाणपणा, आपलें ब्रीद न सोडतां शहाजीची सुटका करण्यांत दाखविलेलें पितृप्रेम, जिजाईकरितां एकदम तानाजीची किंमत देऊन सिंहगड घेण्यांत दाखविलेलें मातृप्रेम, व्यंकोजींचें गर्वपरिहरण करून पुन्हां सर्व राज्य त्याच्याच स्वाधीन करण्यांत दाखविलेलें बंधुप्रेम व सर्व राज्य समर्थचरणीं अर्पण करण्यांत दाखविलेलें गुरुप्रेम आणि शेवटीं स्वतःस राज्याभिषेक करून घेण्यांत दाखविलेलें लोकप्रेम, ह्या सर्व गोष्टी सर्वांस श्रुत आहेत.

शिवाजी महाराजांच्या काळीं, त्या वेळच्या देशाच्या व धर्माच्या विपन्न परिस्थितींत देशोत्कर्ष व धर्मोद्धार हींच काय तीं मुख्य कार्यें प्रथम व जरूर करण्यासारखीं होतीं, व तींच त्यांनीं आपलीं ध्येयें ठरविलीं. देशसौख्य हेंच त्यांचें कार्य व देशसौख्य हेंच त्यांचें कारण होतें. त्यांचें सर्व चित्तवित्त देशमय झालें होतें. त्यांचे पराक्रम देशाकरितां, त्यांचें बरें देशाकरितां, त्यांचें वाईट देशाकरितां, त्यांचें सर्वच कांहीं देशाकरितां होतें, प्रत्यक्ष त्यांचें आयुष्यच देशाकरितां होतें, त्यांचा जन्मच देशोद्धाराकरितां होता. केवळ आजन्म आपला देह झिजवणाऱ्या व शेवटीं आपल्या पराक्रमांनीं देशस्वातंत्र्य मिळवून सर्व प्रजेचें चिरसुख व कल्याण करणाऱ्या या महात्म्या अवतारी पुरुषाला कोण शतशः वंदन करणार नाहीं ?

शिवाजीमहाराजांनीं आपल्या चरित्रानें आपल्यास एक मुख्य गोष्ट ही शिकविली कीं, देशभक्ति हा गुण प्रत्येक व्यक्तिमात्रास निसर्गतःच जरूर असतो. जसें बोलणें, धर्मश्रद्धा असणें, मातृपितृभक्त असणें, वगैरे गुण प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणीं निसर्गप्राप्त असणें जरूर असतें–हे गुण असले तर तें कौतुकास्पद नसून उलट ते नसले तरच ते दोषार्ह असतात–त्याचप्रमाणें देशभक्ति हाहि गुण असणें म्हणजे मोठेसें कौतुक नसून तो नसणें हा मात्र दोष होय. देशभक्त असणें हें मुळीं मनुष्याचें जन्मप्राप्त कर्तव्यच आहे व तें त्यानें बजावलें तरच तो मनुष्यत्वाला प्राप्त होतो. ज्याप्रमाणें प्रत्येक ज्ञात वस्तूला कांहींतरी कर्तव्य असतें, कांहींतरी उपयोग असतो, त्याप्रमाणें मनुष्याच्या आयुष्यालाहि ईश्वरानें कांहीं विशिष्ट कर्तव्य ठेवलें आहे, आणि तें म्हणजे लोकहितार्थ आपलें आयुष्य वेंचणें हें होय. आयुष्याची ही उदात्त कल्पना फारच थोडया लोकांच्या दृष्टीपुढें उभी असते. पण ज्यांना आयुष्याला कांहीं किंमत देणें असेल, त्यांनीं ही कल्पना आपल्यापुढें अहर्निश ठेवलीच पाहिजे. देशहित साधणें, देशभक्त असणें, हें कांहीं मोठेंसें पुण्यकर्म नाहीं, तें आपल्या आयुष्याचें कर्तव्यच आहे. पण देशाच्या कल्पनेवांचून आपलें अंतःकरण अगदीं कोरडें असणें हें मात्र महत्पाप होय, अशी दृढ भावना प्रत्येकाची झाली पाहिजे. शिवाजीमहाराजांनीं आपल्या सर्व आयुष्यभर ही भावना पुढें ठेवली व म्हणून त्यांचें आयुष्य अनुकरणीय–सच्चरित्र झालें आहे. अशा महात्म्यांना पुन्हां प्रणाम असोत !

---

## तात्यासाहेब केळकर--

--तात्यासाहेब केळकरांच्या संबंधानें चाबुकस्वारमध्येंच अनेक वेळां लिहिण्याचा संबंध आल्यामुळें त्याविषयीं पुनरावृत्ति करण्याची जरूरी नाही. बुद्धीची कुशाग्रता, व्यापकता, सुपूर्तता, व चपलता या चारी गुणांनी त्यांची तुलना कै. महादेव गोविंद रानडे यांच्याशींच करावी लागते. रानडयांच्या वेळेपासून इतका बुद्धिमान पुरुष महाराष्ट्रांत झालाच नाहीं म्हटलें तरी चालेल. अनेक प्रसंगीं कै. लोकमान्य टिळकांपेक्षां केळकरांनीं सरस बुद्धिमत्ता दाखविलेली आहे ! व्यासंगांत तर ते कोणापेक्षांही खात्रीनें सरस आहेत. (चाबुकस्वार ता. २१–५–१९२७.)

## * विसरूं नको.

### आहे देह खलींत । हेतु सगळा बाहेर मी ठेविला ॥

तुम्हांस वाटतें काय कीं, ज्या महापुरुषानें दोनतीन शतकांपूर्वी महाराष्ट्रांत विलक्षण शौर्य व धाडस उत्पन्न करून हिंदु लोकांचें साम्राज्य प्रस्थापित केलें, त्याची जन्मतिथि जवळ आलेली आहे ? तुम्हांस वाटतें काय कीं, दोनतीन शतकांपूर्वी महाराष्ट्र हा शब्द सर्वत्र इतक्या अतुल प्रशंसेचा विषय होऊन गेलेला होता कीं, स्वदेशाभिमान, ऐक्य, मुत्सद्देगिरी, पराक्रम, दृढनिश्चय आणि जीवाविषयीं बेफिकीरपणा ह्या सर्वांबद्दल त्या वेळच्या राजधोरणाच्या कोशांत महाराष्ट्र हा एकच शब्द वापरीत असत ? तुम्हांस वाटतें काय कीं, साम्राज्यसूर्यं हिंदुस्थानच्या उलट टोंकाला पोंचलेला असतां त्यास तेथून खेंचून आणून, त्याची इच्छा नसतांनाहि मातु:श्री जिजाबाईच्या विख्यात पुत्रानें—अहाहा, धन्य, धन्य त्या माऊलीची कूस—त्यास रायगडावर तळपावयास लावलें ? तुम्हांस वाटतें काय कीं, प्रतापरवि मावळून जात असतांना मावळप्रांतांतच त्यास पायबंद देऊन दादोजी कोंडदेवाच्या अतुलविक्रमी शिष्यानें खुद्द मावळ्यांच्या हातूनच त्याचें मावळणें बंद करविलें ? तुम्हांस वाटतें काय, आधुनिक महाराष्ट्रीयांनो, तुम्हांस आठवतें काय ? अंत:कलहाच्या पंकांत बुड्या मारीत त्यांतच धन्यता मानणाऱ्या महाराष्ट्रीयानों, तुम्हांस आठवतें काय कीं, दोन तीन शतकांपूर्वी ह्या महाराष्ट्राचा उज्ज्वल इतिहास लिहिण्याकरितां मुसलमान तवारिखकार, मराठी बखरकार, इंग्रजी इतिहासकार, आणि इटालियन वृत्तकार महाराष्ट्राच्या प्रत्येक कृत्याकडे आश्चर्यानें टक लावून पहात बसलेले होते ? महाराष्ट्रीयांनों, तुम्हांस काय सांगावें ? पण महाभारताच्या घनघोर संग्रामानंतर ह्या पृथ्वीशीं 'गडी फू' करून स्वर्गांतच आनंद मानीत बसणारे सुरवृन्द, रामदासांच्या मंत्रस्फुल्लिंगाची सर्व महाराष्ट्रभर जीवनज्योति लावीत सुटणाऱ्या त्यांच्या 'शिवबा' ची बिरुदावलि अवलोकन करीत, स्वर्गांतील जन्मसार्थक्य कल्प-

* संदेश ता. १५ मे १९१५.

वृक्षाचीं यशोरूपी पुष्पें त्याच्या भाग्यावर अहमहमिकेनें ओतीत होते ? महाराष्ट्रीयांनों, शिवराजांच्या चरित्रांतील देवी भवानीच्या आशिर्वादाचे प्रसंग कविकल्पना म्हणून अश्रद्धेय मानूं नका. त्यांत अश्रद्धेय कांहीं नाहीं. शिवाजी महाराजांच्या चरित्रांतील अश्रद्धेय भाग भवानीचे आशिर्वाद हा नव्हे, तर शिवाजी महाराजांचें चरित्र हाच त्यांचे चरित्रांतील 'अश्रद्धेय' भाग आहे !! बापानें टाकलेल्या व अनुत्तेजक स्थितींत वाढलेल्या एका पंधरा सोळा वर्षे वयाच्या अजाण बालकानें साम्राज्य—स्थापनेची महत्वाकांक्षा धरली; ज्यांना लंगोटी उलटी कीं सुलटी घालावयाची हें माहीत नव्हतें, अशा अडाणी लोकांकडून त्यानें द्रोणाचार्यांना आश्चर्य वाटेल अशीं असिधाराव्रताचीं कृत्यें करविलीं; अफजुलखान, शाहिस्तेखान, दिल्लीची कैद, वगैरे अनर्थकारक प्रसंगांनीं गळयास तात लावली असतांना, ज्याप्रमाणें एखादा जादूगार आपल्या शरीराभोंवतीं आंवळलेले लोखंडी दोर सहजलीलेनें तोडून टाकतो, त्याप्रमाणें ह्या बहाद्दरानें त्यांतून अत्यल्प प्रयासानें आपली मुक्तता करून घेतली; त्यानें साम्राज्यस्थापनेचा आपला संकल्प थोडक्याच अवधींत पुरा करून साम्राज्याभिषेकाचा सुखसोहळा 'याच देहीं, याच डोळां' अनुभविला, आणि त्यानें त्या वेळीं हयात असलेल्या सर्व श्रेष्ठ पुरुषांत आपलें मूर्धवर्तित्व गाजवून दुर्गुणांचा, दुर्वासनांचा अथवा दुरभिमानाचा स्पर्शहि आपल्या मनास होऊं दिला नाहीं. ह्यांपैकीं एकेक गोष्ट, एकेकाच्या चरित्रांत घातली तरी ती अश्रध्देय भासावयास लागण्याइतकी लोकोत्तर आहे. मग ह्या सर्व गोष्टी एकाच चरित्रांत संकलित झाल्यावर हें चरित्र अश्रद्धेय कोण म्हणणार नाहीं ? आणि ह्या असल्या अश्रद्धेय चरित्राची वाहवा करण्याकरितां जगन्माता भवानीला—पार्वतीला, ह्या अत्यंत्य दुष्ट जनतेशीं एक पळभर संसर्ग घडला तरी हरकत नाहीं, पण तो शिवाजी आहे कसा तो तरी पाहुं या, ह्या विचारानें ह्या जगांत प्रकट होण्याकरितां अधीरता वाटली असेल, ह्यांत कांही एक नवल नाहीं. महाराष्ट्रीयांनों ! तुम्हांस आठवतें काय कीं, ह्या महाराष्ट्रभूमींत दोन अडीचशें वर्षापूर्वींच एका मराठ्याच्या नांवाचीं नाणीं पाडलीं गेलीं ? तुम्हांस आठवतें काय कीं, भाग्योदय आणि पवित्रता, कांचन आणि गंगा, भगवाझेंडा आणि ज़रीपटका हीं दोन अडीचशें वर्षांपूर्वीं सर्व भरतखंडावर फडफडण्याकरितां ह्या महाराष्ट्रांतून

समारंभानें निघालीं ? तुम्हांस आठवतें काय ? हें सारें तुम्हांस आठवतें काय ? तुमची स्मृति इतकी जिवंत राहिली आहें काय ? पण तुम्हांस हें कोठून आठवणार ? शिवाजीची आठवण ठेवण्याइतकी तुम्हांस फुरसद आहे कुठें ? तुमच्या कर्तव्यपूर्तींत, शिवाजीच्या स्मरणाला जागा उरणार कशी ? तुम्हाला फार काम आहे. तुमच्यापुढें एंगेजमेण्टांचे भारे रचलेले आहेत. त्यांतून एकाद्या पळाची फुरसद काढून शिवाजी या नांवाचा एक इसम होऊन गेला इतकें आठवण्याइतके क्लेश तुम्ही आपल्या स्मरणशक्तीला काय म्हणून द्यावे ? शिवाजी तुम्हास सध्यां काय देतो आहे, कीं त्याच्या स्मृतीला तुम्हीं अश्रूंचें अर्घ्यप्रदान करावें ? शिवाजी मोठा होऊन गेला असेल, तर तो गेला असेल. इतिहासाच्या ऐनेमहालांतील एकादी कांच भंगली म्हणून त्याचें दुःख तुम्हाला काय ? जुन्या वृत्तांताचीं प्रेतें पुरली गेलीं आहेत हें एक प्रकारें बरेंच झालें आहे. तीं प्रेतें पुन्हां उकरून करावयाचें काय ? जुन्या पराक्रमांची सावली कितीहि मोठी असली तरी हल्लींच्या संसारांतील तापाला ती थोडीच उपयोगी पडणार आहे ? जाऊं द्या, ही जुनी सावली जाऊं द्या, हीं जुनीं प्रेतें नाहीशीं होऊं द्यात. जुन्या पिशाच्चांच्या आरोळ्या ऐकण्याची ही वेळ नव्हे. आपण हल्लींचा संसार पाहिला पाहिजे. आम्हाला शिवाजीशीं कर्तव्य नाहीं, हल्लींच्या जगासंबंधानें कांहीं बोलावयाचें असेल तर बोला.

शिवाजीचें स्मरण आज कशाला ? यंदां बंडूचें लग्न कर्तव्य आहे, त्याच्याकरितां कुलशीलवान् मुलगी पाहिली पाहिजे. लग्न वैशाखांतच होईल तितकें चांगलें, कारण मग साहेबांबरोबर टूरवर जावें लागल्यास लग्न ठरवावयास कोणी नाहीं. शिवाजीला जन्माला यावयाचें होतें तर तो वैशाखांतच कशाला जन्मला ? लग्नसराईवांचून, मे महिन्याच्या सुट्टीवांचून, इतके महिने पडलेले होते, मग दुष्काळांत तेरावा महिना हा कशाला उत्पन्न झाला ? शिवाजीचें स्मरण आजच करावयाची कांहीं जरूर नाहीं. चन्द्री वाढीला लागलेली आहे, ह्या हुंड्याची भरती करतां करतां घरांतील सरी व तोडे गहाण ठेवावे लागतील, त्याकरितां शिवाजीचा तोरणा किल्ला कांहीं उपयोगीं पडावयाचा नाहीं. शिवाजी मोठा झाला तर आपल्या घरीं ! सध्यां शिवाजीसाठीं रडत बसून हे सुगीचे

कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकर ( मध्यभागीं )—सन १९०७.



दिवस व्यर्थ घालवावे कीं काय ? कुळांच्या हातांत ह्या वेळीं काय ते पैसे खेळते असावयाचे, कुळांच्या कणगी ह्या वेळीं काय त्या भरलेल्या असावयाच्या. ही सोन्याची वेळ गमावून जर ' शिवाजी आणि तानाजी ' आह्मीं करीत बसलों तर पुढें निभाव लागावयाचा कसा ? तुकारामबोवांप्रमाणें शिवाजीच्या योगानें जर दगडधोंडयांचें सोनें होत असतें. तर मग कांहीं हरकतच नव्हती. मग ' शिवाजी महाराज की जय ' असे आह्मीं सतरा वेळां वडबडत बसलों असतों. परंतु आतां ही बडबड करून सोय काय ? इस्टेट मारवाडयाकडे पडलेली आहे, त्याचे ' बेचोक बारा ' दरवर्षी होत चाललेले आहेत. ह्या काळांत हाडाचीं काडें केली तरी एक कपर्दिका दिसावयास प्रयास पडतात, असल्या चिंतेंत आणि काळजींत कोठला शिवाजी आणि कोठला राजाराम ? किती दिवस तिचा नाद आहे कीं, हिऱ्याच्या बांगडया आणि सोन्याचें शिरकमळ हवें आहे म्हणून ! इतके दिवस तिला कसें तरी नादावर ठेवलें, पण आतां तिला ' वायदा ' सांगितला तर तिचा कायमचा रुसवा होईल. तिच्यापुढें शिवाजीमहाराज काय, कःपदार्थ आहेत ! सतरा शिवाजीमहाराज तिच्यावरून ओवाळून टाकावे. शिवाजी महाराज, शिवाजीमहाराज करूनच आमचा देश अधःपाताला गेला आहे. सध्यां शिवाजीमहाराज आम्हांला तारावयास येणार नाहींत; आमची समाजस्थिति आम्ही सुधारूं, त्याच वेळीं आम्हांला उर्जित दशा येईल. आम्हाला त्या जुन्या गोष्टी आणि त्या वेळचें तें ' गो-ब्राम्हण-रक्षण' आज कशाला ? गाईला ' माता ' म्हटल्यानेंच आमचे लोक बैलोबा निघाले. आणि ब्राम्हणांचें प्रस्थ वाढविल्यामुळेंच देश ऐदी बनला. आम्हीं ह्या बिघडलेल्या समाजाच्या सुधारणेलाच आतां लागलें पाहिजे. देशांतील सोंवळया ओंवळयांचें बंड मोडून टाकलें पाहिजे, वर्णाश्रमधर्माचें निर्मूलन केलें पाहिजे, विधवांच्या केशवपनावर हत्यार चालविलें पाहिजे, पुनर्विवाहावर भर दिला पाहिजे, मिश्र विवाहावर झोड उडविली पाहिजे, मुलांमुलींची विवाहमर्यादा वाढविली पाहिजे, स्त्रिशिक्षणाचीं कॉलेजें काढलीं पाहिजेत, खाद्यपेयांचे निर्बंध तोडून टाकले पाहिजेत, सर्वत्र सुधारणा गजबजवून दिली पाहिजे. शिवाजीचें नांव कशाला काढतां ? शिवाजीकरितां रडण्या-

पेक्षां आमच्यापुढें जास्त महत्वाच्या चळवळी आहेत, शिवाजीच्या साम्राज्याची गोष्ट आम्हाला कशाला ? शिवाजी आणि त्याचें साम्राज्य खुशाल समाधिस्थ असो, आमच्यापुढें कार्यांचा डोंगर पडलेला आहे. आम्हांला जागोजागीं गिरण्या काढावयाच्या आहेत. आम्हांला साखरेचे कारखाने उघडावयाचे आहेत. आम्हांला प्रत्येक खेड्यांत शाळा स्थापावयाच्या आहेत. वसंत–व्याख्यान–मालेंत माझें भाषण आहे. मला पतपेढ्यांच्या कॉन्फरन्सला जावयाचें आहे. मला पैसाफंडाकरितां जागृति करावयाची आहे. मला जिल्ह्याजिल्ह्यांतून व तालुक्यातालुक्यांतून कार्यकारी संस्था निर्माण करावयाच्या आहेत, कांग्रेसच्या नियमावलींवर मला लोकमताचा अंदाज घ्यावयाचा आहे. संयुक्तकॉंग्रेस करितां आमचा प्रयत्न आहे, आम्हांला साहित्य—परिषदेस जावयाचें आहे, आम्हाला विवेकानंदांप्रमाणें धर्मावर व्याख्यानें देत फिरावयाचें आहे, आम्हांला मागासलेल्या जातींकरितां फंड गोळा करावयाचा आहे. शिवाजी व त्याचा इतिहास याची ' पीडा ' आमच्या मागें कशाला ?

खरेंच, तुम्हीं इतक्या विविध उद्योगांत गुंतलेले असतांना, शिवाजीमहाराजांची " पीडा " तुमच्या पाठीमागें असणें योग्य नाहीं. एवढेंच काय, पण ह्याहिपेक्षां मोठेमोठे व्यवसाय तुमचेपुढें आहेत, आणि ते तुम्हांस पाठीमागें टाकतां उपयोगी नाहींत. हिंदुस्थानचे परम कृपाळु व्हाईसरॉय ना. लॉर्ड हार्डिंज यांची तुम्हास मुदत वाढवून घ्यावयाची आहे. मद्यप्रसारास परिणामकारक आळा बसविण्यासाठीं तुम्हाला टेम्परन्सचें काम जोरानें करावयाचें आहे. संयुक्त प्रांताला कार्यकारी कौन्सिल मिळण्यासाठीं तुम्हांला लॉर्ड क्यूना मदत करावयाची आहे. पंजाबला लेफटनंट गव्हर्नर मिळण्यासाठीं तुम्हाला सनदशीर चळवळ करावयाची आहे. हरिद्वार येथील कुम्भमेळ्याच्या स्वेच्छा–सहाय्याचा तुम्हांला रिपोर्ट करावयाचा आहे, हिंदुस्थान सरकारनें जाहीर केलेल्या स्वराज्याचे ठरावावर तुम्हाला लोकमत गोळा करावयाचें आहे, युद्ध संपल्यानंतर बेल्जमला पूर्वस्थिति कशी प्राप्त होईल ह्याची तुम्हांला तरतूद करावयाची आहे, युद्धाचे पाटीमागून कोणत्या मागण्या कशा तऱ्हेनें मागावयाच्या ह्याची तुम्हाला आतांपासून वाटाघाट करावयाची आहे, तुम्हांला कॉन्ग्रेसची तयारी करावयाची आहे,

तुम्हाला दादाभाईंना सन्माननिरोप पाठवावयाचा आहे आणि अखेरची पण खैरातीची गोष्ट ही कीं, तुम्हाला भारतसेवक परमपूज्य कै. गोपाळ कृष्ण गोखले ह्यांचें स्मारक करावयाचें आहे. ह्या सर्व महत्वाच्या कामापुढें, शिवाजी महाराजांचें विस्मरण झाल्यास तें क्षम्य आहे असें कोणींहि कबूल केल्यावांचून राहणार नाहीं.

परंतु तुमची चूक होते आहे, ती येथेंच. शिवाजीमहाराजांचें स्मरण सद्यःस्थितींतील उद्योग टाकून देण्याकरितां नव्हे, ते जास्त चांगले चालावेत म्हणून आहे. शिवाजीमहाराजांचें स्मरण हा प्राकृत व्यवसायांतील अडथळा नव्हे, तर प्राकृत व्यवसायांचें हें उत्तेजन आहे. ज्या शिवाजीमहाराजांनीं जन्माला आल्यापासून तों चितेवर शयन करीपर्यंत स्वदेशप्रीतीच्या परिमलानें हा सर्व महाराष्ट्र देश सुगंधित केला, त्यांच्या त्या सुगंधाच्या परागांनीं आपल्याहि व्यवसायांना चारुता यावी ह्याकरितां आपणांस शिवाजी महारांचें स्मरण करावयाचें आहे. शिवाजीमहाराजांचें स्मरण शिवाजीमहाराजांचें अनकरण करण्याकरितां हल्लींच्या लोकांनीं करावयाचें नाहीं हें आम्हीं मागील एका अंकांत स्पष्टपणें सांगून ठेवलेलें आहे. शिवाजी महाराजांची कृति, शिवाजी महाराजांची परिस्थिति आणि शिवाजी महाराजांचें ध्येय ह्यापैकीं एकहि आपल्या कामाला पडावयाचें नाहीं. शिवाजी महाराजांचा काळ आणि हल्लींचा काळ ह्यांत जमीन–अस्मानचें अंतर पडलेलें आहे. काळ बदलला ह्मणजे नुसती माणसें बदलतात एवढेंच नव्हे, तर काळाबरोबर कृति, परिस्थिति आणि ध्येय ह्या सर्वांत फरक पडत असतो. शिवाजीमहाराजांचें ध्येय, सामग्रज्य–सम्पादन करणें हें होतें, आमचें ध्येय वसाहतींचें स्वराज्य (Colonial Self–government) मिळविणें हें आहे. शिवाजी महाराजांना 'महाराज' म्हणवून घ्यावयाचें होतें, आपणांस 'नामदार' म्हणवून घ्यावयाचें आहे. परकीयांचा द्वेष हें शिवाजीमहाराजांचें धोरण होतें, परकीयांवर प्रेम हें आमचें धोरण आहे. मुसलमानी सत्तेचें उच्चाटन हें शिवाजी महाराजांना आपलें कर्तव्य वाटत होतें, इंग्रजी सत्तेवर अत्यंत प्रेम हें आपलें कर्तव्य आपण समजत असतों. क्रान्ति हा शिवाजी महाराजांचा उद्योग होता, शांति हा आपला उद्योग आहे. शिवाजीमहाराजांना मुसलमानांचा फडाव करावयाचा होता, आपणांस मुसलमानांशीं

सहकार्य करावयाचें आहे. मुसलमान लोक हे शिवाजी महाराजांचे दुश्मन् होते, मुसलमान लोक हे आपले प्रिय बंधु आहेत. युद्ध हा शिवाजी महाराजांचा पेशा होता, राजनिष्ठा हा आपला पेशा आहे. शिवाजीमहाराज हे विजिगीषेच्या मार्गानें गेले, आपणांस सनदशीर कार्यकर्तृत्वाच्या मार्गानें जावयाचें आहे. शिवाजी महाराज व आपण ह्यांच्यांत इतकी तफावत असल्यावर शिवाजी महाराजांच्या कृतीचें अनुकरण करा असा आपणांस कोण उपदेश करील?

शिवाजीमहाराजांच्या कृतीचें अनुकरण करा असा जो कोणी उपदेश करील त्यास शिवाजीमहाराजांचे कृतींतील मर्मच समजलें नाहीं असें म्हणावें लागेल. थोर पुरुषांचें अनुकरण त्यांच्या कृतींत करावयाचें नसतें, तर त्यांच्या वृत्तींत ( Soul ) करावयाचें असतें. रामचंद्राचें अनुकरण करावयाचें म्हणजे धनुर्बाण घेऊन माकडें गोळा करावयास लागावयाचें नाहीं. कृष्णाचें अनुकरण करावयाचें म्हणजे गावांतल्या गौळणींवर हात टाकावयाचा नाहीं. परशुरामजयंति करावयाची म्हणजे शेजाऱ्यापाजाऱ्याच्या अंगावर कुऱ्हाड चालवावयाची नाहीं. मारुतीउत्सव करावयाचे म्हणज शेपूट विकत आणून चिकटवावयाचें नाहीं, किंवा भीष्माष्टमी करावयाची म्हणजे-म्हाताऱ्या बापाची तलफ भागविण्याकरितां तरुण-तरुण मत्स्यगंधा शोधीतहि बसावयाचें नाहीं. त्यांचें अनुकरण करणें म्हणजे त्यांची वृत्ति ( Soul ) काय होती, ह्याचा शोध करून ती आपल्या अंगांत बाणेल अशा तऱ्हेचा प्रयत्न करणें होय. महाभारतांतील व्यक्ति-चरित्रें वाचून शिवाजी झाला. शिवाजीचें चरित्र वाचून हल्लींच्या काळाला योग्य अशीं माणसें उत्पन्न झालीं पाहिजेत.

थोर माणसें जातात तीं आपली परिस्थिति आपले बरोबर घेऊन जातात पण त्यांचे हेतु त्यांचे मागें तसेच राहिलेले असतात. त्यांची कुडी मर्त्यलोक सोडून गेल्यास कितीहि वर्षें गेलेलीं असलीं तथापि, त्यांचे हेतु देशांत चिरंजीव होऊन बसलेले असतात व त्या हेतूंचा निवास देशांतून कधींहि उठत नाहीं. ह्या हेतूंची स्वारी, ह्या हेतूंनीं भारून ठेवलेलें वातावरण, ह्या हेतूंनीं पवित्र झालेले आकाशरेणु देशांत निरंतर वावरत असल्यामुळें अनुकूल व्यक्ति त्यांना सांपडल्याबरोबर ते परकायप्रवेश करून

मूर्त स्वरूप धारण करीत असतात. पवित्र हेतूंची जी परंपरा एखाद्या देशांत पिढ्यान् पिढ्या चालू असलेली आपल्या दृष्टीस पडते, त्याचें कारण हेंच होय. शरीर नसतांनाहि थोर पुरुषांचें जें वास्तव्य होत असतें तें ह्याच प्रकारानें होय व ह्याच प्रकारानें थोर पुरुष मृत होऊन कितीहि वर्षें झालेलीं असलीं, तथापि ते हांकेसरशीं अवतीर्ण होत असतात. वास्तविक पाहतां श्रीरामचंद्र, श्रीकृष्ण, श्रीबुद्ध, श्रीव्यास, ह्या विभूति स्वेच्छेनें अथवा कालेच्छेनें अन्तवश होऊन इतका काल लोटलेला आहे कीं, त्यांची गणति करतांकरतां भांडारकरांचे टांके ढिले झालेले आहेत. इतका काळ लोटून गेल्यामुळें राम अथवा कृष्ण, ह्यांना हांका मारणें वास्तविक पाहतां योग्य नव्हे, परंतु हे महात्मे जगांतून कितीहि अदृश्य झाले, तरी आपल्या पवित्र हेतूंच्या रूपानें त्यांचें ह्या देशांतील अस्तित्व इतकें अबाधित झालेलें आहे कीं आणखी दुप्पट शतकें मध्यंतरीं गेलीं तरी श्रीरामचंद्राच्या चरणीं विनीत होऊन केव्हांहि श्रीरामप्रभूस आळवाल तर तो भक्तवत्सल देव आपल्या भक्ताच्या संकटीं उडी घातल्यावांचून कधींहि राहाणार नाहीं.

श्रीशिवाजीमहाराजांचें तसेंच आहे. श्रीशिवाजी महाराज, त्या वेळचा त्यांचा मुसलमानांविषयीं द्वेष, त्या वेळची त्यांची परिस्थिति हीं सर्व अदृश्य होऊन गेलेलीं आहेत, तथापि ह्या महाराष्ट्रांत त्यांचे हेतु चिरस्थायी होऊन बसलेले आहेत. "आम्हीं स्वर्गवासास जावयास सिद्ध झालों, पण आमचा उत्कट हेतु होता तो असिद्ध राहिला" असे शिवाजीमहाराजांचे अखेरचे शब्द होते. हा श्रीशिवाजीमहाराजांचाच हेतु असिद्ध राहिलेला आहे असें नसून जे महात्मे देशांत होऊन जातात त्या त्या सर्वांचा हेतु असाच असिद्ध राहून गेलेला असतो. त्रिभुवनांचाहि अतिक्रम करणारे थोर पुरुषांचे हेतु, त्रिभुवनांचीहि अत्योन्नति होऊन गेली तरी असिद्धच राहणार, व हेतु असिद्ध राहतात म्हणूनच ते तेजोरूपानें देशांत वास्तव्य करून पुढील पिढ्यांना मार्गोपदेशक होत असतात. पुढील पिढ्यांना सत्त्वोपदेश करण्याकरितां श्रीशिवाजीमहाराजांचे हेतु त्याचप्रमाणें सर्व महाराष्ट्रभर प्रसृत होऊन बसले आहेत. प्रत्येक गडावर आणि प्रत्येक पहाडावर श्रीशिवाजी महाराजांचे हेतु विराजमान होऊन बसलेले आहेत. प्रत्येक नदीचे कांठीं आणि प्रत्येक कार्यवेदीचे प्रत्यंतरभागीं श्रीशिवाजीमहाराजांचे हेतु विरा-

जमान होऊन बसलेले आहेत. प्रत्येक वृक्षपल्लवावर आणि प्रत्येक पुष्पदलावर श्रीशिवाजीमहाराजांचे हेतु विराजमान झालेले आहेत. प्रत्येक सूर्यरश्मीवर आणि प्रत्येक वायुनि:श्वासावर श्रीशिवाजीमहाराजांचे हेतू विराजमान झालेले आहेत. प्रत्येक पुष्करणीवर आणि प्रत्येक वीथि–सरणीवर श्रीशिवाजी महाराजांचे हेतु विराजमान झालेले आहेत. प्रत्येक काननांत आणि प्रत्येक उपवनांत श्रीशिवाजी महाराजांचे हेतु विराजमान झालेले आहेत. जिवंत असतां श्रीशिवाजी महाराजांनीं सर्व महाराष्ट्रदेश भारून टाकलेला होता. मृत्यूनंतरहि श्रीशिवाजी महाराजांनीं सर्व महाराष्ट्र देश भारून टाकलेला आहे. श्रीशिवाजी महाराजांचा हेतु सर्व ठिकाणीं आहे, सर्व स्थळीं आहे, महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत आहे. श्रीशिवाजी महाराजांच्या पवित्र हेतूंनीं अनुगृहित झालेलें नाहीं असें महाराष्ट्रांत एकहि वातावरण नाहीं. श्रीशिवाजी महाराज म्हणजेच सर्व महाराष्ट्र होय. म्हणून शिवाजीमहाराजांस विसरूं नका. श्रीशिवाजी महाराजांचें ह्याचकरितां स्मरण ठेवा. श्रीशिवाजी महाराजांच्या कृती नामशेष होऊन गेलेल्या आहेत. त्या कृतींची आतां गरजहि नाहीं. परंतु श्रीशिवाजी महाराजांच्या हेतूंचें तसें नाहीं. ते आपल्या पवित्रपणानें जागरूक आहेत, आणि जर तुमचेहि हेतु पवित्र असतील तर त्यांचे तुम्हांस प्रेमपूर्वक आशिर्वाद प्राप्त होतील. प्रत्येक सत्कार्य हें श्रीशिवाजी महाराजांचें कार्य आहे. आणि जर तुम्ही त्यांचें स्मरण ठेवाल तर त्यांच्या हेतूंचा जोर, त्यांची अप्रतिबंध इच्छाशक्ति तुम्हांस प्राप्त होऊन तुम्हीं आपल्या सत्कार्यांत जास्त लौकर यश पावाल. तुम्ही लॉर्ड हार्डिंजकरितां खटपट करा, तुम्हीं संयुक्त प्रांताकरितां कौन्सिल मागा, तुम्ही थिऑसफी बनवा, तुम्ही काँग्रेस भरवा, तुम्ही जातिबाह्य लोकांची कामगिरी हातीं घ्या, तुम्ही गोखल्याचें स्मारक करा, अथवा राष्ट्रध्येय ठरविण्याच्या कामांत तुम्हीं असा, श्रीशिवाजी महाराजांचें स्मरण हा तुम्हांस अडथळा नसून कुमक आहे. श्रीशिवाजीमहाराजांचे आशिर्वाद तुम्ही लाथाडूं नका. त्यांचें नांव तुम्हीं विसरूं नका. जी जी पवित्र योजना तुम्हांस यशस्वी करावयाची असेल, तिचे आरंभीं श्रीशिवाजीमहाराजांचें पवित्र, उदात्त, अत्युच्च आणि मंगल नाम उच्चारित जा. ‘श्रीशिवाजी महाराजकी जय’ म्हणा म्हणजे तुमचे सर्व सदुद्योग सुफलित होतील!

---

# * बोला, जयजय रघुवीर समर्थ !

समर्थाचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळीं कोण आहे ? ॥

अशा प्रकारचा जगद्विजयी आत्मश्रद्धायुक्त सवाल करण्याचें ज्या व्यक्तींत सामर्थ्य असेल तोच खरा समर्थ, बाकी आडनांवाचे समर्थ ! हिंदुस्थानांत असोत, विलायतेंत जावोत, भविष्यकाळाकडे पाहोत किंवा भूतकाळांत वावरोत; त्यांचें सामर्थ्य, त्यांची कर्तव्यनिष्ठा, त्यांचें ध्येय, त्यांची कर्तबगारी, हीं नेहमींच कोतीं, चिमुकलीं, नेमस्त रहावयाचीं ! त्यांची समाजसेवा एखाद्या बोळापुरती, त्यांची राष्ट्रसेवा एखाद्या परस्परसहकारी खेळापुरती, त्यांची कर्तबगारी फक्त " चार चौघांत " सांगण्यापुरती, आणि त्यांचें सामर्थ्य फक्त समर्थांच्या कर्तबगारीचा फायदा घेण्यापुरतेंच रहावयाचें. ' उत्कट भव्य तेंची घ्यावें, ' असला मर्दानी, विशाल, आत्मनिष्ठेचा आणि कडव्या कर्तव्यनिष्ठेचा उपदेश त्यांस रुचावयाचा नाहीं, हें तत्त्व त्यांस पचावयाचें नाहीं, आणि असलें कार्य त्यांच्या हातून व्हावयाचें नाहीं.

' समर्थांचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळीं कोण आहे ' असा उत्कट कर्तव्यनिष्ठता दर्शविणारा, भव्य कर्तबगारी दाखविणारा, जगद्विजयी, आत्मनिष्ठा व्यक्त करणारा प्रश्न विचारण्याचें सामर्थ्य रामदासांच्या अंगीं होतें; अशा वृत्तीनें वागण्याचें सामर्थ्य रामदासांच्या अंगांत होतें. अशा धोरणानें कार्य करण्याचें सामर्थ्य रामदासांच्या अंगांत होतें. आपल्याला दबवील, आपल्याला नमवील, आपल्याला वांकवील, आपल्याला झुकवील, आपणांला हलवील अशी एकही शक्ति ह्या जगांत नाहीं, अशी त्यांची भावना, असें त्यांचें धोरण, आणि असा त्यांचा दरारा होता आणि म्हणूनच ते समर्थ होते, म्हणूनच आज इतक्या वर्षांनंतर त्यांचा दासबोध हजारों लोकांस स्फूर्तिप्रद होऊं शकतो, त्यांचे मनाचे श्लोक शेकडों लोक

* संदेश ता. १४ फेब्रुवारी १९२०.

मुखानें गाऊं शकतात आणि आज दासनवमीच्या दिवशी आपण त्यांच्या पावन चरित्राचें स्मरण करतों.

उत्कट, भव्य, अचाट, असामान्य सामर्थ्य, प्रतिष्ठा हें समार्थाच्या सामर्थ्याचें रहस्य आहे, त्यांच्या बळावरच ते असा बेधडक प्रश्न विचारूं शकतात कीं 'समर्थांचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भूमंडळीं कोण आहे ?' आणि आजही ज्यांच्या अंगीं असा प्रश्न विचारण्याइतकें उत्कट, भव्य, अचाट, असामान्य सामर्थ्य असेल तोच समर्थ गणला जाईल, तोच अचाट कामगिरी वजावूं शकेल. असे लोक ह्या जगांत पुष्कळच आहेत कीं, जे समर्थांच्या सेवकाला, समर्थांला खास वक्र दृष्टीनें पहातील, वक्रनीतीनें त्यांचें सामर्थ्य हाणून पाडूं पहातील, त्यांच्या धोरणाला वक्रस्वरूप देण्यासाठीं विपर्यास करतील आणि त्यांचें पाऊल वांकडें पडावें म्हणून प्रयत्न करतील. समर्थ रामदासांना हें पूर्णपणें माहीत होतें, स्वानुभवानें माहीत होतें. प्रश्न विचारतांना त्यांस वक्रदृष्टीनें कोण पाहील असें विचारवयाचें नसून, वक्रदृष्टीनें पाहून ती दृष्टि यशस्वी करील, वक्रदृष्टीनें पाहून समर्थांला वक्र करील, वांकवील किंवा मार्गभ्रष्ट करील असा ह्या जगांत कोण आहे ?

प्रयत्न पुष्कळ होईल, नाहीं असें नाहीं. रामदासांना ऊंसाचा मार खावा लागला, तुकाराम महाराजांना झाडू मिळाला, गांधींना मार खावा लागला, आणि लोकमान्यांवर अंडें आलें, अशी वक्रनीतीनें वक्रदृष्टि केली तरी पण समर्थ पळाले नाहींत, तुकाराम महाराजांचें पाऊल वांकडें पडलें नाही, गांधी मार्गभ्रष्ट झाले नाहींत किंवा लोकमान्य डगमगले नाहींत. असें अचाट सामर्थ्य ज्याच्या अंगांत नाहीं, अशी भव्य कर्तबगारी दाखविणें ज्यांच्या नशिबीं नाहीं आणि अशा असामान्य सामर्थ्याचें महत्त्व कळण्याइतकें बुद्धिवैभव ज्यांच्यांत नाही, त्यांना रामदासांचें चरित्र कळणार नाहीं, रामदासांचें धोरण मानवणार नाहीं आणि रामनवमी आणि दासनवमी ह्यांतील फरक कळणार नाही. अचाट सामर्थ्य अंगी असल्यामुळें वृत्तींत दिसून येणारी ती दुर्दमनीय निर्भयता ऊंसखाऊ गोड्या लोकांस रुचणार नाहीं, झाडूला न जुमानणाऱ्या 'आलिया भोगासी'

तत्परतेनें सादर होणाऱ्यास पचणार नाहीं, तडजोडवाद्यास आवडणार नाहीं आणि पलायनपटूंस मानवणार नाहीं, हें उघड आहे.

ह्या वृत्तीला तुम्ही वंदा किंवा निंदा, मारा किंवा आदरा, अंडें फेंका किंवा हिरेमोत्यें उधळा, सत्याग्रह म्हणा किंवा कुटिल नीति म्हणा, ही समर्थ वृत्ति, ही समर्थ निर्भयता, ही समर्थ रामदासांपासून लोकमान्य टिळकापर्यंतच्या काळांत, तुकाराम महाराजांपासून महात्मा गांधीपर्यंतच्या लोकांत, पौर्णिमेच्या आकाशांत अद्वितीय तेजानें चमकणाऱ्या चंद्राप्रमाणें एकाकीच चमकणाऱ्या समर्थ वृत्तीला, समर्थ निर्भयतेला कोणीही वांकवूं शकणार नाहीं, दबवूं शकणार नाहीं, वळवूं शकणार नाहीं किंवा मार्गभ्रष्ट करूं शकणार नाहीं. समर्थसंप्रदाय म्हणून जर कांहीं असेल, नरसंप्रदाय--पुरुषत्वसंपन्न संप्रदाय म्हणून जर कोठें असेल तर त्या समर्थ संप्रदायाचें आद्यतत्व ही निर्भयता, ही समंजस निर्भयता, हें सात्विक सामर्थ्य, ही निर्भयवृत्ति हेंच आहे. आणि समाजाची व जगाची धारणा, प्रगति व उन्नति ह्यांत उत्कट व भव्य कामगिरी ज्यांच्या हातून व्हावयाची असेल त्यांच्या अंगीं हा गुण असलाच पाहिजे.

समर्थ रामदास म्हटल्याबरोबर प्रथम ही सामर्थ्याची कल्पना मनापुढें उभी राहते, ही निर्भयता, निर्मळ नील आकाशाप्रमाणें सर्व चरित्र व्यापून राहिलेली आढळते, ही निर्भयवृत्ति त्यांच्या अस्तित्वाशीं एकरूप होऊन गेलेली दिसते, आणि श्रीकृष्णापासून टिळकांपर्यंत, आणि तुकाराम महाराजांपासून गांधींपर्यंत हें निर्भय सामर्थ्य, ही अचाट सामर्थ्यसंपन्न निर्भयता जितक्या प्रमाणांत दिसून येईल तितक्या प्रमाणांत त्यांच्याविषयीं कोणासही प्रेमादर वाटणारच.

हें सामर्थ्य, ही निर्भयता, हा समर्थसंप्रदायाचा पाया असून त्यावर लोकसंग्राहकता, निस्पृहता आणि कार्यकुशलता अशी तिमजली इमारत उभारली जाते. अशा अचाट सामर्थ्याचा उपयोग लोकसंग्रहार्थ करावयाचा, लोककल्याणार्थ करावयाचा, हा समर्थसंप्रदायाचा बाणा आहे. समर्थ संप्रदाय स्वत: समर्थ होण्यासाठीं नाहीं, स्वत:चें सामर्थ्य प्रकट करण्यासाठीं नाहीं. स्वत:च्या सुखसोई, कीर्ति, संपत्ति, ह्यांच्यासाठीं नाहीं. समर्थसंप्रदाय हा सर्वांस निर्भयतेचे धडे घालून देण्यासाठीं आहे, समर्थसंप्रदाय हा

सर्वांस व्यवहार शिकविण्यासाठीं, 'आधीं संसार करावा नेटका,' असें शिकविण्यासाठीं, संसार नेटका करण्यासाठीं, पारमार्थिक उन्नतीबरोबरच ऐहिक उन्नतींतही सर्वांस समर्थ बनविण्यासाठीं आहे.

'मराठा तितुका मेळवावा' असें सांगणारा हा संप्रदाय लोकसंग्राहक आहे. 'मराठा तितुका मेळवावा.' समर्थांच्या ह्या उपदेशाचें मूल्य त्या वेळीं किती असेल तें असो, त्या वेळीं ह्या उपदेशावरच महाराष्ट्र पुनरुज्जीवित झाला आणि जगला. त्या वळीं महाराष्ट्राला हा उपदेश जितका जीवन-मरणात्मक महत्वाचा होता तितकाच तो आजही आहे. आज ह्यावेळीं लोकांस समर्थ करणाऱ्या संप्रदायाची आवश्यकता आहे. आणि मराठा तितुका मेळवावा असें सांगणाऱ्या लोकसंग्राहक संप्रदायाची आवश्यकता आहे. इतके दिवसपर्यंत निदान महाराष्ट्रानें तरी लोकसंग्रहाचें फार महत्वाचें व अद्वितीय काम केलें आहे. परंतु सुदैवानें आज असा काळ आला आहे कीं, मराठा तितुका मेळवावा, मराठा तितुका मेळवावा, मराठा तितुका मेळवावा असें त्रिवारच काय, पण तीस कोटी वेळां सांगितलें तरी थोडेंच आहे. हा वेळ असा आणीबाणीचा आहे कीं, ह्यावेळीं लोकसंग्रह धोक्यांत आहे. ह्यावेळीं महाराष्ट्राचा लोकसंग्रह बुडविण्याचे प्रयत्न होत आहेत. ह्यावेळीं महाराष्ट्रानें पंचप्राणांपलीकडे जपून ठेविलेला लोकसंग्रह हिरावून घेण्याचे प्रयत्न होत आहेत. राष्ट्रीय आणि विशेषतः महाराष्ट्रीय राजकारण ह्यावेळीं परिस्थितीच्या आंचीनें उकळलें जात आहे, उसळी घेत आहे. ह्यावेळीं समर्थांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे मद्रासच्या परिषदांतून, नेमस्तांच्या कमिटयांतून आणि पुण्याच्या सभांतून, 'मतामतांचा गलबला ! कोणी पुसेना कोणाला' असा प्रकार आढळून येत आहे. ह्यावेळीं समर्थांचें सामर्थ्य कसास लागत आहे, परंतु लोकसंग्रह धोक्यांत येऊं पहात आहे. ह्या वेळीं एक समर्थ खराखुरा समर्थ ठरूं पहात आहे, परंतु लोकसंग्रह जीवासाठीं धडपडत आहे. अशा वेळीं एकच समर्थ निरुपयोगी असून समर्थांच्या बरोबर समर्थांच्या सभोंवतीं उपसमर्थांचा, समर्थांच्या सार्थ शिष्यांचा गराडा पडेल, समंजस शिष्यांना प्रामुख्य मिळेल, खाबू शिष्यांना गचांडी मिळेल व गोऱ्या कुंभाराचें थापटणें एकेकाचीं टाळकीं शेकून नाटकी शिष्य, अवसानघातकी

शिष्य आणि कल्याणशिष्य यांची पुरी पारख होऊन निवडानिवड होईल, तरच हा मतामतांचा गलबला थांबेल, समर्थसंप्रदाय पुन्हां लोकांस सामर्थ्यप्रद व लोकसंग्राहक होईल. नसते वाद, नसते भेद, नसत्या अडचणी आणि नसते खटाटोप ह्यांच्या भरीस पडून समर्थांचें सामर्थ्य कसोटीस लागेल, परंतु लोकसंग्राहक न होतां गलबला अधिक वाढविणारें होईल.

आज महाराष्ट्राच्या सुदैवानें महाराष्ट्रांत समर्थ आहे, खराखुरा समर्थ आहे, कसोटीला उतरलेला समर्थ आहे. समर्थ आहे पण कल्याण पाहिजे आहे, समर्थ आहे परंतु कल्याण नाहीं, सामर्थ्य आहे पण कल्याणप्रद शिष्य नाहींत.

आज ह्या दासनवमीच्या दिवशीं महाराष्ट्रीय समर्थाभोंवतालच्या नव-ग्रहांची–ग्रहमंडळीची जर रामदासांच्या शिष्यांप्रमाणें कसून पारख होईल, पिकलेला अंबा गळूं म्हणून चोखण्याचा प्रसंग शिष्यमंडळावर येईल तर खरा कल्याण समजेल. सुदैव हेंच कीं महाराष्ट्रांत समर्थ आहे, दुर्दैव हेंच कीं महाराष्ट्रांत समर्थ आहे परंतु समर्थशिष्यांची कसून पारख होत नाहीं. महाराष्ट्रीय समर्थशिष्यांनां गळू चोखण्यास लावण्याऐवजीं आपल्या गांधीसंप्रदायी साधेपणानें शिष्यांचीं गळवें चोखीत आहे ! शिष्यांचे उपद्व्याप निस्तारीत आहे, शिष्यांच्या उणेपणानें आपला पुरेपणा अपुरा करीत आहे. आणि तुकारामाला मंबाजीनें हिणवावें त्याप्रमाणें हिणवून घेण्याचा प्रसंग येत आहे. हिणवून घेण्याचा प्रसंग वैयक्तिक आहे, परंतु लोकसंग्रहाचें तत्व धोक्यांत येत आहे. असल्या ग्रहमालेंतून समर्थांची सुटका कधीं होईल ती होवो; परंतु सध्यां मात्र लोकसंग्रहाचे ग्रह फिरले आहेत इतकें मात्र खरें !

आज ' मराठा तितुका मेळवावा ' ह्या तत्वाकडे दुर्लक्ष होऊन श्री. शिंद्यांसारखा कट्टा मराठा गमावून बसण्याची पाळी समर्थसांप्रदायिकांवर आलेली आहे. आज मराठा तितुका मेळवावा ह्या सांप्रदायिक तत्वाकडें दुर्लक्ष होऊन मराठ्यांवर मात करावी, प्रतिपक्षावर चढ करावी म्हणून समर्थ मोहरा बळी घालण्याची गर्ह्य प्रवृत्ति समर्थशिष्यांत दिसून येत आहे. समर्थांचें सामर्थ्य आतां तरी पुन्हां आपल्या सामर्थ्यसंवर्धक आणि

लोकसंग्राहक तेजानें चमकूं लागो अशी आज समर्थनवमीच्या दिवशी आह्मी कळवळ्यानें आशा करीत आहों.

निर्भयता आणि लोकसंग्राहकता ह्याखेरीज समर्थसंप्रदायांतील तिसरा एक विशेष म्हणजे निःस्पृहता हा होय. निस्पृहता म्हणजे स्पष्टवक्तेपणाही नव्हे. समर्थांचा निस्पृहपणा म्हणजे निर्लोभ वृत्ति होय. सर्व लोकांवर लोभ ठेवावयाचा, स्वसुखावर लोभ ठेवावयाचा नाही, लोकसंग्रह करावयाचा, द्रव्यसंग्रह नव्हे; लोकांसाठीं भिक्षांदेही करावयाची, लोकांनीं जमविलेल्या भिक्षेवर वामकुक्षी करावयाची किंवा चैन करावयाची नाहीं; हीच खरी निस्पृहता. समर्थसंप्रदाय म्हणजे कांहीं समाजसेवा नव्हे! 'न मिळे भीक तर वैद्यकी शीक' ह्या तत्त्वाची सुधारणा करून 'न मिळे भीक तर हो समाजसेवक'! समर्थसंप्रदाय म्हणजे कांहीं एखादी सोसायटी नव्हे कीं इतरत्र मास्तरकी मिळणें कठीण झाल्यावर प्रोफेसर होऊन वर स्वार्थत्यागाची दक्षिणा घ्यावयाची! समर्थसंप्रदाय म्हणजे कांहीं संकटनिवारक मंडळ नव्हे कीं, त्यामुळें पुष्कळांस आपल्या भावी संकटांची निरवानिरव करण्याचीहि सोय व्हावी! समर्थसंप्रदाय ही सुळावरची पोळी आहे. स्वार्थशून्यतेच्या सुळावर बळी पडून, बायकापोरांस मुकून, वाडे–बंगले विकून कफल्लक व्हावें, तेव्हां समर्थसंप्रदायांत सामील होतां येतें.

समर्थसंप्रदायांत ज्याला सामील व्हावयाचें असेल त्यानें, सर्वांस समर्थ करण्यासाठीं, आणि सर्वसंग्राहक होण्यासाठीं झटलें पाहिजे. त्यासाठीं निस्पृह बनलें पाहिजे. त्यासाठीं इतरांच्या सर्वस्वाचे संग्राहक, संरक्षक किंवा संक्षेपक न बनतां स्वतःच्या सर्वस्वाचे संक्षेपक बनलें पाहिजे.

समर्थसंप्रदायाचा आधार सामर्थ्य, धोरण लोकसंग्रह, वृत्ति निःस्पृहता आणि साधन कार्यकुशलता हें आहे. 'योगः कर्मसु कौशलम् ।' कर्मकुशलता हा समर्थसंप्रदायाचा राष्ट्रसामर्थ्यसंवर्धक, लोकसंग्राहक मार्ग आहे. आणि ह्या कर्मकुशलतेचें समर्थांनीं आपल्या दासबोधांत सुन्दर स्पष्टीकरण केलें आहे. समर्थांची कर्मकुशलता श्रीकृष्णप्रणीत कर्मकुशलतेच्या स्वरूपाची आहे. समर्थांच्या कर्मकुशलतेचें स्वरूप हें कर्मयोगावर उभारलेलें आहे. समर्थांची कर्मकुशलता ही खरोखरच 'ये यथा मां प्रपद्यंते' ह्या धोरणाचीच आहे. समर्थांनीं कार्यकुशलतेचें दिग्दर्शन करतांना स्पष्ट सांगून टाकलें

आहे कीं, ' जशास तैसें भेटे, तेव्हांच संशय फिटे. ' कांट्यानें कांटा काढावा ह्या तत्वाला कोणी कांहींही नांवें ठेवो, ह्या तत्वांतील गौण बाजूलाच कोणी कितीही प्राधान्य देवो, कृष्णाऐवजीं कृष्णाच्या नांवावर ख्रिस्ताचें तत्व कोणी कितीही सांगो, जगाचा व्यवहार हा ह्या तत्वावरच चालणार. कैसरच्या कैसरीवृत्तीला आळा घालण्यासाठीं क्षात्रवृत्तिच सर्व जगभर नाचली !

गांधीटिळकवादांत वस्तुतः दिसतो तितका मतभेद नाहीं; परंतु जो मतभेद आहे तो असा आहे कीं, लोकमान्य समर्थांइतके स्पष्ट बोलून आपली कार्यपद्धति दाखवितात आणि महात्मा गांधी तुकारामी किंवा एकनाथी वळणावर जातात. परंतु अखेर कांहीं झालें तरी त्यांस व्यवहार विसरतां येत नाहीं आणि सर्प देव्हाऱ्यांत जरी चढला तरी त्याला जोड्यानें ठेंचावा, म्हणून तुकाराम महाराजांस सुद्धां सांगावेंच लागतें. लोकमान्यांनीं, साधु व्यवहाराला निरुपयोगी आहेत असें म्हटल्यामुळें पुष्कळांस कसेसेंच वाटेल !

वस्तुतः असें कसेसेंच वाटणारांस लोकमान्यांच्या विचारसरणीचा ओघच समजला नाहीं. साधु शब्दाच्या कोणत्या अर्थछटेवर त्यांचा रोंख होता हेंच त्यांना समजलें नाही आणि म. गांधींसही समजलें नाहीं, मग टाईम्स–क्रॉनिकलमध्यें पत्रें खरडणाऱ्या पी. आर. ला न समजलें तर आश्चर्य कसलें ? तेव्हां ह्यास असा अर्थ कळत नसला, आधुनिक समर्थांची विचारसरणी आधुनिक तुकारामाला समजत नसलीं तरी, प्राचीन समर्थांची विचारसरणी प्राचीन तुकारामास समजत होती व उमजतही होती आणि म्हणूनच श्रीशिवाजी महाराजांस उपदेश देण्याचें काम तुकाराममहाराजांनीं आपल्याकडे न घेतां त्यांस समर्थांकडे बोट दाखविलें. आपणांला ह्यांत कांहीं समजत नाहीं असें म्हणून तुकारामांनीं शिवाजीमहाराजांस रामदासांकडे पाठवून दिलें. आधुनिक तुकाराम महात्मा गांधी हे सुद्धां प्राचीन गांधीप्रमाणें देव्हाऱ्यांतील सर्प जोड्यानें ठेंचायला कधींच तयार होत नाहींत असें नाहीं. युरोपियन् महायुद्धांत लष्करभरतीला मदत करून म. गांधींनी विंचू–सर्पाविषयीं तुकाराम महाराजांनी दर्शविलेल्याच मार्गाचा

अवलंब केला. तो मार्ग त्यांच्या धोरणास विसंगत असो किंवा नसो, पण व्यावहारिक होता खास.

आधुनिक तुकारामांनीं या बाबतींत प्राचीन तुकारामाचा मार्ग स्वीकारला, त्याचप्रमाणें राजकारणांत मला कांहीं समजत नाहीं असें म्हणूनही तुकारामाच्या शिवाजीविषयक धोरणाचा ते अवलंब करीत आहेत. दुःखाची गोष्ट इतकीच कीं, प्राचीन तुकाराम महाराज समर्थ रामदासांना नीतिपाठ द्यावयाच्या उद्योगांत पडले नाहींत. परंतु आधुनिक तुकाराम आधुनिक समर्थांस नीतिपाठ देऊं पहात आहेत. परंतु कांहीं झालें तरी या सर्व प्रसंगाचें पर्यवसान परस्परसंक्षेपक न होतां परस्परसुधारकच होईल अशी आशा करावयास हरकत नाहीं. आतां हा आधुनिक व प्राचीन रामदास—तुकारामांचा विषय सोडून मूळ समर्थसंप्रदायाकडेच वळावयाचें म्हणजे असेंच म्हणावें लागतें कीं, कोणत्याही प्रसंगीं, कोणत्याही परिस्थितींत, आत्मोद्धार व राष्ट्रोद्धार ह्यांची सांगड घालावयाला समर्थ असा जर कोणता संप्रदाय असेल तर तो समर्थसंप्रदायच होय. आणि छाटी, काठी नव्हे, तर दुर्दमनीय निर्भयता, निर्मळ लोकसंग्रह, निष्कलंक निस्पृहता, आणि निर्व्यंग कार्यकुशलता हींच समर्थसंप्रदायाचीं खरीं लक्षणें होत.

---

## पैसा नको, स्वराज्य पाहिजे:—

—महाराष्ट्रीय मनुष्यास पैशाची तितकी आवड नाहीं. घरदार, चीजवस्तु, बायकामुलें, ह्यांचीहि त्याला तितकी फिकीर नाहीं. त्यास मुख्य काळजी एवढीच कीं 'जगांत सत्ता कुणाची आहे?' एक कपर्दिकाहि नसतांना, तो स्वराज्य मिळविण्याची हांव धरील, व शिवाजी आणि टिळक ह्यांच्या अभिमानांत गर्क असेल. पैसा, तिजोरी, भरभराट, शेतवाडी हें सर्व जवळ असूनहि महाराष्ट्रीय मनुष्य राजकारणाशिवाय बापुडवाणा दिसेल व त्यास जग शून्य भासेल. त्यास राजकारणांत पडायला पाहिजे. त्याशिवाय त्यास चैन पडायचें नाहीं.

(सं. १२ नोव्हेंबर १९२२.)

# महाराष्ट्रास स्वातंत्र्याचा संदेश. *

**शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।**
**शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ॥**

गेल्या माघ शुद्ध नवमीस रामदासनवमीचा उत्सव करून जे महाभाग परतले, ते महाराष्ट्रभर रामदासांचा कोणता निरोप फैलावणार आहेत? जनतेच्या हिताकरितां राजकारणाची कांस धरून परमेश्वरी कार्याकरितां मुत्सद्देगिरीचा व्यय करणाऱ्या महात्मा रामदासांची कोणती इच्छा ते महाराष्ट्रभर सांगत फिरणार आहेत? स्वातंत्र्यशाहीराच्या काव्य-हिंदोल्यावर नऊ दिवस एकसारखे सुखकर झोंके घेऊन ते कोणता प्रभंजन महाराष्ट्रांत उत्पन्न करणार आहेत? महाराष्ट्राचा 'पहिला बोलशेव्हिक' प्रत्येक भावी देशभक्ताकरितां स्वातंत्र्याचा अक्षय्य सज्जनगड उभारून गेला असतां त्याची कोणती कामगिरी ते बजावणार आहेत?

* * *

गेल्या रामदासनवमीला हजारों समर्थभक्त सज्जनगडावर गेले व तेथून हजारों समर्थभक्त उत्सव आटपल्यावर परतले. रामदासनवमीचे चुरचुरीत रिपोर्ट वर्तमानपत्रांतूनही प्रसिद्ध झाले व अनेक वर्तमानपत्रांचे स्पेशल रिपोर्टरहि सज्जनगडावर गेले. त्यांनीं तिथें काय पाहिलें व त्यांनीं तिथून कोणता बोध घेतला? अमक्यानें तूप वाढलें आणि अमक्यानें पंक्तींत आग्रह केला, एवढाच काय? अमक्यानें छबीना काढला आणि अमक्यानें प्रवचन केलें एवढाच काय! अमक्यानें सत्रंजी घातली आणि अमक्यानें लोडतक्क्या ठेवला एवढाच काय? नाहीं, नाहीं! सज्जनगडावरील "दास" बोध ह्यापेक्षां फार निराळा कर्णमंत्र सांगत असला पाहिजे.

अर्वाचीन मराठी वाङमयांत जें अत्यंत स्फूर्तिदायक असें एखादें वाङ्मय तयार झालेलें असेल, त्यापैकींच श्री. शिवरामपंत परांजपे यांचें "काळ"

---

× टिळक ता. २६ फेब्रुवारी १९२२.

पत्र होय. आज " काळ " वर्तमानपत्र अस्तित्वांत नाहीं व प्रेस ॲक्टच्या दुरडीखालीं स्वातंत्र्याच्या भारद्वाज पक्षाला झांकण्याचा हास्यास्पद प्रयत्न करणाऱ्या ब्रिटिश सरकारनें " काळ " पत्रांतले कित्येक लेख अजिबात सरकारजमाहि केलेले आहेत. पण सरकारच्या हुकुमाचे कितीही दगड वर घातले तरी " काळ " पत्रांतले हे लेख काळाच्या दडपणाखालीं दडपून जायचे नाहींत. ते केव्हांतरी खास वर डोकें करतील, आणि आपल्या अप्रतिहत चैतन्यानें महाराष्ट्राला सचेतन करतील.

* * *

ह्या " काळ " पत्रांतील एक लेख आम्हांला अजूनहि नीट आठवतो. काळ पत्राचा तो अंक आज आमच्यापुढें नाहीं, पण त्यांतील अक्षरें स्मरणाग्नीच्या जळत्या शाईनें आमच्या अंतःकरणावर तांबड्या लाल अक्षरांत अजूनहि लिहिलेलीं आहेत. तीं अक्षरें हीं कीं, रामदासांचा दासबोध ही अगम्य परमार्थांतील रिकामी वटवट नाहीं, तर जे लोक " दास " झालेले असतील, परवशतेंत सांपडले असतील त्यांना प्रबुद्ध—जागे करण्याकरितां हा ग्रंथ लिहिलेला आहे. गुलामगिरींत पडलेल्यानों, दासानों, हा ग्रंथ वाचा आणि गुलामगिरीच्या बेड्या कशा भिरकावून द्याव्या, हें ह्या ग्रंथावरून शिका !

आणि सज्जनगडावर तरी हेंच शिकायचें आहे. सज्जनगडाची एकएक पायरी चढत असतांना, सज्जनगडावरून परत येत असतांना, सज्जनगडावरील कीर्तन ऐकत असतांना, सज्जनगडावरील प्रसाद भक्षण करतांना, सज्जनगडावरील छबीन्यांत सामील होत असतांना, सज्जनगडावरील कुबडीकडे पहात असतांना, रामदासांच्या ह्या निरोपाचें चिंतन केलें पाहिजे. देशबांधवांनों, तुम्हांला अंतःकरण असेल तर स्वातंत्र्याची इच्छा करा ! तुम्हांला अंतःकरण असेल तर गुलामगिरीची किळस येऊं द्या !

* * *

ज्याला अंतःकरण असेल त्याला हा उपदेश पटेल. ज्याला अंतःकरण असेल त्याला सज्जनगडावरील " स्वातंत्र्या "चा जिवंत शब्द ऐकूं येईल. ज्याच्या अंगांत " राम " असेल त्याच्याशींच सज्जनगड बोलेल.

सज्जनगडावर समर्थांच्या खडावा अजूनहि आहेत ना ? ऐका—त्यांच्या त्या खडावांकडे कान लावा ! अहाहा ! त्यांतून खडखड करीत कोणते शब्द उसळून येतात पहा—तिकडे कान दिलात तर तुम्हाला समर्थ रामदासांचा स्पष्ट निरोप ऐकूं येईल कीं—

**शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।।**
**शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ।।**

* * *

छें:, छे:, पण एवढेंच नाहीं, एवढ्यावरच समर्थ आपल्याला सोडीत नाहींत. समर्थांचें आपल्याला आणखीहि सांगणें आहे कीं जर तुह्मीं मर्द असाल तर—

**त्याहूनि करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष ।**
**यापरी आतां विशेष । काय लिहावें ? ।।**

* * *

आणि खरोखरच रामदासनवमीच्या उत्सवाकरितां लोटलेल्या देश-भक्तांनों, आम्हीं तरी तुम्हांला यापेक्षां जास्त काय सांगणार ?

---

## * स्वातंत्र्याचा प्रचंड उत्सव.

**दमामे चौघडे वाजती । धडाके भांड्यांचे होती ।**
**फौजा भक्तांच्या साजती । ठायीं ठायीं ।।**

हिंदुस्थानांतील पहिला बोल्शेव्हिक रामदास ह्याचा प्रचंड उत्सव सज्जन-गड ऊर्फ परळी येथें ह्या आठवड्यांत धडाक्यानें झाला. गेलीं दोन तीन शतकें हा उत्सव होत आहे, आणि यापुढेंहि हा उत्सव असाच प्रेमानें आणि आस्थेनें होत जाईल. स्वातंत्र्याचा उत्सव दरवर्षी अमेरिकेंत होत असतो

* टिळक ता. २६ फेब्रुवारी १९२२.

असें म्हणतात. स्वातंत्र्याचा उत्सव दुसरीकडे कोठेंहि होत असल्याची प्रसिद्धि नाहीं. पण आमच्या महाराष्ट्रांत—आमच्या ह्या स्वातंत्र्यभूमींत—आमच्या ह्या स्वातंत्र्याच्या जन्मस्थानीं—आमच्या ह्या स्वातंत्र्याच्या माहेरघरीं—हा उत्सव दरवर्षी होत आहे. 'काव्येषु नाटकं रम्यं, तत्रापिच रम्यं शकुन्तला'——काव्यग्रंथांत नाटक अत्यंत रम्य आणि त्यांतल्या त्यांत शाकुन्तलाची तर केवळ बहारच——असें आजपर्यंत म्हणण्याचा प्रघात आहे. पण नाटकाचें काय घेतां? स्वातंत्र्याचा——स्वातंत्र्याच्या नाटकाचा विचार करा—आणि अभिमानानें म्हणा कीं, सर्व राजकीय स्थितींत राजकीय स्वातंत्र्याचीच स्थिति स्पृहणीय, सर्व राजकीय स्वातंत्र्यांत आमची हिंदभूमि अत्यंत थोर, सर्व हिंदभूमींत आमचा महाराष्ट्र ह्मणजे स्वातंत्र्याचें आगर, सर्व महाराष्ट्रांत सातारा जिल्हा म्हणजे स्वातंत्र्याचें नंदनवन आणि सर्व सातारा जिल्ह्यांत परळी अथवा सज्जनगड हेंच स्वातंत्र्याचें खास ठिकाण!

* * *

ह्या परळीवर, ह्या सज्जनगडावर, राजकीय स्वातंत्र्याचा उत्सव दर वर्षी होत असतो. गेलीं दोन तीनशें वर्षें हा उत्सव एकसारखा होत आहे. आणि ह्या महाराष्ट्रांत हा स्वातंत्र्याचा उत्सव एकसारखा होत रहाणार. स्वातंत्र्याचा सूर्य जगांतून मावळला तरी हा हिंदुस्थान स्वातंत्र्याच्या सूर्याला तळपत ठेवणार आणि ह्या हिंदुस्थानांतहि स्वातंत्र्यसूर्याला ग्रहण लागलें तरी हा महाराष्ट्र—हा स्वातंत्र्याभिमानी महाराष्ट्र——स्वातंत्र्यावरचें सर्व अभ्र नाहींसें करणार आणि सह्याद्रीचे प्रत्येक टोंकावर, डोंगराचे प्रत्येक माथ्यावर, किल्ल्याच्या प्रत्येक तटावर मोठ्या ईर्षेनें सांगणार कीं हें पहा, राजकीय स्वातंत्र्याचें हें विजयी निशाण पहा!

* * * *

आजपर्यन्त जगांत तट, किल्ले, बुरूज अनेक बांधले गेले असतील, पण राजकीय स्वातंत्र्याचा तट कोठेंहि बांधला गेला नसेल. पण हा तट महाराष्ट्रांत बांधला गेला. सज्जनगड हा काय आहे? स्तिमित भावनांनीं जाण्याचें हें ठिकाण नव्हे! शांत चित्तवृत्तीनें पाहण्याचें हें ठिकाण नव्हे! मूक, मूढ अथवा मृत अंतःकरणानें नजर फेंकण्याचें हें ठिकाण नव्हे! जें

पाहिलें असतां हृदयाची लगबग उडावी, जें पाहिलें असतां वृत्ति खळबळून जाव्या, जें पाहिलें असतां अंतःकरणाचे धर तुटावे, आणि जें पाहिलें असतां स्वातंत्र्याचे सैराट मनोविकार बेफामपणानें उसळ्यांवर उसळ्या मारीत जावे असलें हें पवित्र ठिकाण आहे. परळीला पहा आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्याची इच्छा करा. परळीला पहा आणि राष्ट्राच्या स्वातंत्र्याकरितां मनावर इच्छा उद्भूत होऊं द्या !

*   *   *   *

कारण परळी हें हिंदुस्थानांतील पहिल्या बोल्शेव्हिकाचें ठिकाण आहे. राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा सुमनहार रामप्रभूचे कंठांत अडकविणाऱ्या पहिल्या बोल्शेव्हिकाचें परळी हें मुख्य ठिकाण आहे. स्वतः उदास राहून आराध्य-देवतेजवळ स्वातंत्र्याचा प्रसाद मागणाऱ्या स्वातंत्र्यभक्ताचें परळी हें महा-स्थान आहे. देशबांधवांच्या मनोवृत्तींची भिक्षा आपल्या झोळींत एके ठायीं करून, महाराष्ट्रांतल्या प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा अंगारा लावणाऱ्या श्रेष्ठ विभूतीचें परळी हें दिव्यधाम आहे. पारतंत्र्याची सावली झपाट्यानें काळोख करीत असतां तेथें स्वातंत्र्याची " चकमक " झडविणाऱ्या स्वातंत्र्य-शिलेदाराची परळी ही पराक्रमभूमि आहे. " जय जय रघुवीर समर्थ " म्हणून प्रत्येक दुबळ्या माणसाचे अंगांतली स्वातंत्र्याची ज्योत पेटविणाऱ्या सामर्थ्यवान् जादुगाराची परळी ही चमत्कार–वल्ली आहे. निराश होऊं नका, निराश होऊं नका, असें म्हणून स्वातंत्र्याच्या आशेनें सर्व महाराष्ट्राला चेतविणाऱ्या एका बहाद्दर शाहीराची परळी ही तुतारी आहे. इथें स्वातं-त्र्याचे चौघडे आहेत, स्वातंत्र्याच्या रणभेरी आहेत, स्वातंत्र्याचे दमामे आहेत. ऐका, ऐका, ते स्वातंत्र्याचे जयशब्द ऐका:—

**दमामे, चौघडे वाजती । धडाके भांड्यांचे होती ।**
**फौजा भक्तांच्या साजती । ठायीं ठायीं ॥**

# * स्वराज्य स्थापा ! स्वराज्य स्थापा ! !

**मनामाजी ते जैशिजैशी अपेक्षा। करीना कदा राम त्याची उपेक्षा**
**वहूतापरी चालवीलें दयाळें। तुम्हा योग्य कां आमुचें तोंड काळें ?**

हिंदुस्थानांतला पहिला बोलशेव्हिक रामदास ह्यानीं सांगितलें कीं, जनतेचें हित डोळ्यांपुढें ठेवा, त्याकरितां राजकारण करा आणि त्यासाठीं शिवरायाचें रूप आठवा. पण तें आठवायचें म्हणजे काय करायचें ? त्याचें उत्तर फारसें कठीण नाहीं ! त्याचें उत्तर हेंच कीं स्वराज्य स्थापा !

* * * *

कारण स्वराज्यस्थापनेचा प्रश्न अगदीं यशस्वी रीतीनें जर कोणी सोडवून दाखविला असेल तर तो श्री शिवाजीमहाराजानीं होय. ज्या काळांत दासबोधग्रंथ निर्माण झाला, त्याच काळांत प्रत्यक्ष शिवाजी राजाहि निर्माण व्हावा, हें महाराष्ट्राचें केवढें भाग्य आहे ? ग्रंथ आणि त्याची फलश्रुति अशीं एकदम कधींहि अवतरलीं नसतील ! दासबोधांत समर्थांनीं "दास" पणांतून सुटण्याची युक्ति देशबांधवांना सांगितली. महाराष्ट्राचें भाग्य कीं दासबोधाची शाई पुरती वाळलीहि नसेल तोंच ह्याच युक्तीनें "दास"-पणांतून देशाला सोडविणाराहि महापुरुष समर्थांचे हयातींत, समर्थांचे नजरेसमोर, समर्थांच्या ऐन आयुष्यांतच पुढें आला !

* * * *

कोणी कोणी म्हणतात की, शिवाजीमहाराज निर्माण व्हायला दासबोध मुळींच कारण झाला नाहीं. शिवाजी महाराज आणि समर्थांची गांठही उभयतांच्या उत्तर आयुष्यापर्यंत पडलेली नाहीं. खरोखर म्हटलें म्हणजे हा इतिहासाचा व कागदपत्रांचा प्रश्न आहे.— हा आग्रहाचा व मतभेदाचा प्रश्न नाहीं. निःपक्षपात अंतःकरणानें त्यावेळचे कागदपत्र वाचा आणि त्यांवरून काय निर्णय लागेल तो प्रांजलपणें कबूल

* टिळक ता. २६ फेब्रुवारी १९२२.

करा, पण आम्हीं एवढें खास सांगतों कीं रामदासांवर जर कोणी अंतःकरणापासून प्रेम केलें असेल तर तें शिवाजीमहाराजांनींच केलें व शिवाजीमहाराजांची पारख खरी जर कोणी केली असेल तर ती रामदासांनींच केली.

* * * *

रामदासांनीं श्री शिवाजीमहाराजांची जी खरी पारख केली त्यांतूनच 'शिवरायाचें आठवावें रूप, शिवरायाचा आठवावा प्रताप,' वगैरे हृद्य उपदेश बाहेर पडले. समर्थांच्या दासबोधांतून त्या वेळचा शिवाजी निर्माण झाला नसेल, पण श्री शिवाजीमहाराजांना शोभतील अशा गुणकलापांनीं दासबोध असा ओथंबलेला आहे कीं प्रत्येक पिढींत प्रयेक कालांत, प्रत्येक अमदानींत शिवाजी उत्पन्न करण्याचें सामर्थ्य दासबोधांत आलेलें आहे.

* * * *

कारण दासबोधानें असें शिकविलें आहे कीं, स्वराज्याच्या प्रेरणेनें सर्व लोकांना भरवा आणि त्यांच्यांत हुरूप आणून स्वराज्य स्थापन करा ! ह्या जगांत जें इच्छावें तें प्राप्त होतें. भिकार मामलेदारीची इच्छा करा, मामलेदारी प्राप्त होईल; दरिद्री वकीलीवर डोळा ठेवा, वकीली–सनद मिळेल; दळभद्रया कमिशनची हांव ठेवा, विलायतच्या कमिशनवर तुमचा गुजारा चालेल;–अणि जर तुम्हीं 'स्वराज्य' पाहिजे असें म्हणाल, तर स्वराज्यहि पायां पडत तुमच्याकडे येईल. या जगांत जें इच्छावें तें मिळतें. मग गुलामगिरीची हौस कां बाळगतां ?

* * * *

जर परमेश्वर आणि राजकारण यांचा संबंध असेल, जर "प्रथम हरिकथा निरूपण–दुसरें तें राजकारण" हें खरें असेल, जर परमेश्वर म्हणजे जनता आणि जनता म्हणजे परमेश्वर असेल, तर जनतेची शपथ घालून परमेश्वराला विचारा कीं आज स्वराज्यामुळें इंग्लंडचें तोंड उजळ आहे, आज स्वराज्यामुळें रशियाचें तोंड उजळ आहे, आज स्वराज्यामुळें जपानचें तोंड उजळ आहे–मग हिंदुस्थानच्या इंद्रा, देशभक्तांच्या हृदयचंद्रा, महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य–महेंद्रा, रामदासांच्या रामचंद्रा, आमचेंच तोंड जगांत काळें कां ?

* * * *

गुलामगिरीची खंती येऊं द्या ! पारतंत्र्याची लाज वाटूं द्या ! स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय जगांत तोंड दाखविणार नाहीं असा निर्धार करा आणि स्वराज्य मिळवा !

---

# * स्वराज्याचीं साधनें.

इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये ।
लिहावयाचें सांगूं नये । जबानीनें ॥

सामुग्रीची पूर्णता हें जें स्वराज्याचें साधन आम्हीं सांगितलें, त्यासंबंधानें पुष्कळांचा आक्षेप येण्याचा संभव आहे. त्यांना असें वाटतें कीं, स्वार्थत्याग असल्यावर मग पैसा कशाला लागतो ? शौर्य असल्यावर मग मनुष्यांची फार संख्या काय करायची ? व मनुष्यांची खूप संख्या जवळ असली म्हणजे इतर साधनांची काय गरज ? हा आक्षेप अगदीं खोटा आहे असें नाहीं. कारण पुष्कळ वेळां साधनें कमीं असलीं म्हणजे इतर मार्गांनीं ती उणीव भरून काढावयाची असते. शिवाजी महाराजांजवळ भरपूर हत्यारें व सैन्य असतें, तर त्यांना गनिमी काव्याची पद्धति स्वीकारण्याचा प्रसंग आला नसता. थोडेच लोक कां होईनात, पण त्यांचेजवळ जिवाला जीव देणारे अनुयायी होते म्हणूनच त्यांना मोठमोठ्या सैन्यांना टक्कर देतां आली. तथापि ज्यांना स्वराज्य स्थापावयाचें असेल, त्यांनीं शक्य तितकी सामुग्री गोळा करणें इष्ट आहे. कमी सामुग्रीवर जय अवलंबून ठेवणें अतिशय धोक्याचें आहे. त्यांतील एखादी सांखळी जरी तुटली, तरी अपेश येतें. जवळ सामुग्री नसली म्हणून रडत बसणें नामर्दपणाचें खरें, पण साधनें कमी असल्यास तशी जाणीव तरी स्वराज्यसाधकास जरूर पाहिजे; आणि संधि सांपडतांच त्यानें ती उणीव नाहींशी करून टाकली पाहिजे. सामुग्री कमी असतांनाहि कार्यास सुरवात करणें हा जवळ जवळ

* टिळक ता. २६ फेब्रुवारी सन १९२२

जुव्याचाच डाव आहे. त्याचा उपयोग करणें अपरिहार्य असेल तेव्हांच करावा. नेहमींचा उत्कृष्ट नियम म्हणजे सर्व सामुग्री सिद्ध करून कार्यास सुरवात करणें हेंच चांगलें.

ह्यापुढील स्वराज्याचें चवथें साधन म्हणजे चाणाक्षपणा. राजकारणांत हा गुण बिनमोल होय, किंबहुना हा गुण सर्व गुणांना मागें टाकतो यांत संशय नाहीं. इंग्रजींत ज्याला Practical Politics म्हणतात तो हाच गुण होय. राजकारणांत ध्येय हें नेहमीं एकच असतें. पण साधनें एकरूप असूं शकत नाहींत. प्रसंग आणि परिस्थिति ह्यांना अनुसरून साधनें एक-सारखीं बदलत असतात. ज्या परिस्थितीला जें साधन जुळत असेल तेंच साधन त्या वेळीं उपयोगांत आणणें, ह्यांतच राजकारणाची कुशाग्रता असते. खऱ्या राजकारणी पुरुषाची पारख ह्या गुणावरून होत असते. आणि अशाच पुरुषाला खात्रीनें सिद्धि मिळवितां येते.

**धट्टासि आणावा धट्ट । उद्धटासि पाहिजे उद्धट ।**
**खटनटासि खटनट । अगत्य करी ॥**

रामदासांचे शब्दांतील हेतु हाच होय. कारण—

**जैशासि जैसा भेटे । तेव्हां मजालशी थाटे ॥**

हा जगाचा अनुभव आहे. आणि ह्या अनुभवाप्रमाणें राजकारणी पुरु-षाचें वर्तन न होईल तर राजकारणी पुरुषाच्या शहाणपणाचें तेज कांहीं एक पडणार नाहीं.

त्याचेपुढील स्वराज्याचें पांचवें साधन म्हणजे 'गुप्त मसलत' हें होय. राजकारण ही जनतेची चळवळ आहे, व त्यांतील बहुतेक प्रमेयें लोकांना माहीत अशींच असलीं पाहिजेत हें उघड आहे. तथापि राजकारणांत सर्वच उघडा कारभार असणें कधींहि योग्य नाहीं. राजकारणांत कित्येक धोरणें अशीं असतात कीं कुणालाहि तीं कळतां उपयोगी नाहींत. त्यांचे योगानें शत्रु सावध होतात व आपला कार्यभाग बिघडवितात. अशा वेळीं मसलत सिद्धीला जाईपर्यंत दुसऱ्यांना तिचा मागमूसहि न कळणें हेंच योग्य होय.

**वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ॥**

अथवा,

**उदंड करी गुप्त रूपें । भिकाऱ्यासारिखें स्वरूपें ॥**

हीं राजकीय महंतांचीं लक्षणें रामदासांनीं मुद्दाम सांगितलेलीं आहेत. हल्लींच्या चळवळींत रामदासांनीं सांगितलेला हा गुण अगदींच कमी आहे, किंवहुना तो नाहींच ह्मटलें तरी चालेल. पण गुप्तपणा हा राजकारणाचा आत्माच होय. रामदासांचा तर येथपर्यंत कटाक्ष आहे कीं,

**इशारतीचें बोलतां नये । बोलायाचें लिहूं नये ।।**

ह्मणजे ज्या गोष्टी नुसत्या संकेतानें कळवावयाच्या असतात त्यांचा उच्चारहि करूं नये. आणि ज्या फक्त बोलावयाच्या असतात, त्या कधीं कागदावर लिहूं नयेत. रामदासांचें हें राजकारण अगदीं अनुभवसिद्ध आहे. श्रीशिवाजीमहाराजांच्या वेळेस ह्याचा गुण आलाच होता आणि पुढेंहि जेव्हां जेव्हां हें राजकारण कृतींत उतरेल तेव्हां याचा गुण आल्याखेरीज राहणार नाहीं.

---

# * हें हिंमतबाजांचें काम आहे.

**जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।।**
**जो आपणचि कष्टत गेला । तोची भला ।।**

स्वराज्य मिळविणें हें हिंमतबाजांचें काम आहे, इतरांचें नाहीं. स्वराज्य हें केव्हांहि मिळवितां येतें. तें अवरंगजेबाचे वेळींहि मिळवितां येतें, व लॉर्ड रीडिंगचे वेळींहि मिळवितां येतें. हें हिंमतबाजांचें काम आहे, इतरांचें नाहीं.

स्वराज्याचें पहिलें साधन म्हणजे जनतेविषयींचेंच प्रेम आणि जनतेच्याच कल्याणाची चळवळ अथवा खटपट! रामदासांनीं त्यालाच " प्रथम हरिकथा निरूपण " असें म्हटलेलें आहे. स्वराज्याचें अन्य साधन म्हणजे प्रॉपगॅण्डा अथवा स्वमतविस्तार! हा स्वमतविस्तार करायला लोकांवर वजन बसवावें लागतें, त्यांचा विश्वास संपादन करावा लागतो, त्यांचें प्रेम आकर्षण

* टिळक ता. २६ फेब्रुवारी सन १९२२.

करून घ्यावें लागतें ! "सकळ लोक एक करावे" हा रामदासांनीं ठिक-ठिकाणीं आग्रहाचा उपदेश केलेला आहे. "प्रॉपगॅण्डा" मधील तत्त्व रामदासांनीं बरोबर ओळखलें होतें. प्रॉपगॅण्डा हा स्वराज्याचा मूळ पाया होय. प्रॉपगॅण्डाशिवाय रचलेली स्वराज्याची इमारत केव्हांही डळमळीत रहाणारच !

प्रॉपगॅण्डा म्हटला कीं भयंकर व्याप मागें लागलाच ! हा व्याप कांहीं कांहीं वेळां इतका वाढतो कीं लोकांनांसुद्धां तो उपद्व्यापच वाटायला लागतो. पण त्याला कंटाळतां उपयोगीं नाहीं. व्यापाला जो कंटाळेल, तो स्वराज्य मिळवायला सर्वथैव नालायक होय. मिनिटा–मिनिटाला ज्याचीं निरनिराळीं कार्यें चाललेलीं आहेत, मोटारींतून धांवलें तरीसुद्धां ज्याचा कार्यभाग पुरा पडत नाहीं, ज्याचेकडे एकसारखे जासूद, हेर, वातमीदार, मित्र, सहकारी ह्यांची रांग लागलेली आहे, लोकांशीं बोलतां बोलतां ज्याला पांचपांच मिनिटेंसुद्धां वांटणीला येत नाहींत, दहा सेक्रेटरी ज्याच्या "इन्स्ट्रक्शन्स्" एकसारखे घेत आहेत, जो रिकिबींत पाय ठेवतां ठेवतां चहा घेत आहे व घोड्यावर बसल्या बसल्या जेवण मागवीत आहे, आगगाडीच्या डब्यांत ज्याची झोंप होत आहे व सूर्योदयाचे वेळेस नदीकिनारा जिथें मिळेल तिथें जो स्नान करीत आहे, जो मुत्सद्यांत मुत्सद्दी, विद्वानांत विद्वान, व्यापाऱ्यांतील बडा शेट, कारखानदारांतील मोठा कारखानदार, कायदेपंडितांत बसला असतां ज्याला कायदे पाठ, कीर्तनांत बसला असतां ज्याचा सुभाषितांत हातखंडा, वैद्यांना जो नाडीघात शिकवील, डॉक्टरांना जो जंतुज्ञानांतील अर्वाचीन शोध सांगेल, दहापांच भाषा ज्याला अवगत, प्रत्येक समाजांत ज्याचे अनुयायी, जो सभागृहांत उभा राहिला तरी सिंह, कुस्तीच्या आखाड्यांत गेला तरी लंगोट कसायला तयार, शारीरिक सामर्थ्यांत जो प्रबळ, आधुनिक युद्ध-विद्येंत जो कुशल, असा जो प्रेमळ, सुशील, सुविद्य, निश्चयी, रागीट, खुनशी पुढारी तोच स्वराज्याच्या प्राप्तीला लायक. स्वराज्य मिळवायचें असलें तर "व्यापा" ला कंटाळूं नका असें रामदासांनीं मुद्दाम सांगितलें आहे.

**उपाधीस कंटाळला । विचाराचा आळस झाला ।**
**म्हणजे जाणावा चेवला । बुद्धीपासुनी ॥**

स्वराज्याचें तिसरें साधन म्हणजे संपूर्ण सामुग्री ! स्वराज्य म्हणजें बलवंतांशीं विरोध ! ज्यांचे हातांत राजसत्ता असते ती त्यांना कधींहि सोडावीशी वाटत नाहीं. ती त्यांचे हातून आपल्या हातांत घ्यायची म्हणजे त्यांचे जवळ जीं जीं साधनें आहेत तीं तीं सर्व आपल्या जवळ पाहिजेत ! युक्तीला युक्ति, बुद्धीला बुद्धि, मस्तीला मस्ती, संपत्तीला संपत्ति, इतकी सर्व तयारी आपले जवळ असेल तरच स्वराज्य कमवतां येईल. तयारीचे कामांत नेपोलियन फार प्रसिद्ध असे ! पर्वाचे युद्धांत जर्मन लोकांनींहि फारच हुषारीनें तयारी केली होती. असली तयारी करायला अतिशय दूरदर्शित्व अंगांत लागतें. पुढील दहा वर्षांचे अंदाज आज बांधावे लागतात. एवढेंच काय, पण शास्त्रीय शोध, भौतिक ज्ञान वगैरे बाबतींत आपले जवळ एखादी अशी करामत लागते, कीं जिची प्रतिपक्षावर सहज मात करतां येईल.

**गुप्त कल्पना कोणास कळाव्या । कोणें येऊनि आटपाव्या ? ।**
**ज्याच्या त्याणें कराव्या । वचकट बुद्धि ॥**

---

## हिंमतीनें पुढें चला.*

**लोकीं हिंमत धरावी । शर्थीची तरवार करावी ।**
**चढती वाढती पदवी । पावाल येणें ॥**

स्वराज्यस्थापनेला जे गुण अवश्य आहेत त्यांतील फक्त एका गुणाचें वर्णन करावयाचें आहे, आणि तो धैर्य अथवा दृढ निश्चय हा गुण होय. स्वराज्याला बाकीचीं सर्व साधनें जितपत अवश्य आहेत, तितपतच धैर्य अथवा दृढ निश्चय हा गुण अवश्य लागत असतो, किंबहुना ह्या गुणाला बाकीचे सर्व गुण अंगभूतच आहेत असें म्हणावयाला हरकत नाहीं. रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें स्वराज्य ही शर्थीची तरवार आहे. ती तरवार

* टिळक ता. २६ फेब्रुवारी १९२२.

हातीं धरणाराचे अंगांत भरपूर आत्मविश्वास पाहिजे. अशा आत्मविश्वासानें पुढें सरणाऱ्यालाच स्वराज्य वश होईल, जो मनाचा नरम व शरीराचा दुर्बल त्याला स्वराज्य कधींही मिळणार नाहीं.

* * * *

ह्यासहि रामदासांनीं असा मार्ग सांगितला आहे कीं, तुम्हांला जें काय करायचें तें भरपूर विचार करून व पूर्ण तयारी करून करा, पण तुम्हीं एकदां सुरवात केली म्हणजे त्यांत इतका आवेश खर्च करा कीं तो आवेश पाहूनच शत्रु गर्भगळीत होऊन गेला पाहिजे. मुळमुळीतपणानें सुरवात करणें अथवा सुरवात केल्यानंतर मागें परतणें हें अत्यंत आत्मघातकीपणाचें होय, व त्याच्या योगानें कामाची हानिच होत असते. ‘First stroke is half the battle’, लढाई जिंकायची असेल तर पहिला जोराचा तडाखा लगावा, अशी इंग्रजींत एक म्हण आहे व रामदासांनींहि ह्या संबंधांत

**आधीं गाजवावे तडाखे। मग भूमंडळ धाके ॥**

असाच उपदेश केलेला आहे.

आणि हिंदुस्थानच्या प्रस्तुत राजकारणांत तर ह्या उपदेशाचा फारच उपयोग आहे. कारण श्रीशिवाजीमहाराज यांचे आणि आपले हल्लींचे मार्ग अतिशय भिन्न आहेत. श्रीशिवाजी महाराजांची स्वराज्यस्थापना शस्त्रास्त्रांचे बळावर होत होती, आपणांस हातांत शस्त्र घ्यावयाचें नाहीं. त्यांच्या राजकारणांत द्वेष, वैर, वगैरे विकारांना जागा होती, प्रस्तुतचे राजकारणांत प्रत्येक गोष्ट प्रेमाचे बळावर चालायची आहे. तरवारीचे जागीं लोणी व भाल्याचे जागीं रेशीम अशी हल्लीं राजकारणाची स्थिति आहे. ह्या वेळीं “आधीं गाजवावे तडाखे” हें तत्व इतक्या जोरानें अमलांत आणिलें पाहिजे कीं त्या प्रेमतडाख्याचे तीव्रतेंत यत्किंचित्सुद्धां तफावत होतां कामा नये.

सध्यां आपल्याला हात न चालवितां ‘तडाखे’ मारायचे आहेत व तरवार न घेतां लढाई जिंकायची आहे. शिवाजी महाराज व प्रस्तुतचा काळ यांतील जो विशेष भेद आहे तो हाच होय. आधीं श्रीशिवरायांच्या

काळापेक्षां अलीकडचें राजकारण जास्त अवघड आहे व ह्या राजकारणांत ज्या लोकांशीं आपला संबंध येतो ते इंग्रज लोक राजकारणांत इतके पक्के आहेत कीं, त्यांचे हातून एखादी गोष्ट मिळणें मुष्किलीचेंच आहे. पण आपणांस श्रीशिवाजी महाराजांपेक्षां जास्त अवघड कामगिरी बजावावयाची आहे. ह्यांत खट्टू होतां उपयोगाचें नाहीं, उलट त्या योगानें आपणांस जास्त हुरूप चढला पाहिजे. उमेदीनेंच आपण कार्याला लागलें पाहिजे. श्रीसमर्थ रामदासांनींहि आपणांस हेंच सांगितलेलें आहे कीं, नुसतें 'शिवाजीमहाराज ', ' शिवाजीमहाराज' अशी जपमाळ घेऊन बसूं नका. त्यांच्याहि पुढें जा, त्यांचेपेक्षांहि जास्त कामगिरी करून दाखवा. कारण—

**त्याहुनी करावें विशेष । तरिच ह्मणावें पुरुष ॥**
**यापरी आतां विशेष । काय लिहावें ? ॥**

---

# ॐ भवति भिक्षां देहि ! *

पर्वा सातारा शहरानजीक सज्जनगड येथें, रामदासनवमीची जी जत्रा भरली, तशी जत्रा कोणत्याहि राष्ट्रांत फार क्वचित् भरत असते. कारण ह्या जत्रेच्या योगानें केवळ राष्ट्राच्या धर्म-स्थापनेकडेच लक्ष जातें असें नव्हे तर राष्ट्राच्या राजकारणाकडेहि लक्ष जातें. धर्म आणि राजकारण ह्यांचें एकीकरण करून धर्मांतून राजकारण व राजकारणांतून धर्म हें अपूर्व तत्व शिकविणारा जो महापुरुष रामदास, त्यांच्या स्मरणासाठीं ही जत्रा असल्याकारणानें ह्या जत्रेस एक असाधारण महत्त्व आलेलें आहे. ह्या जत्रेचें मूळ, त्याचा हेतु, त्याचा उपयोग, त्यांतील ध्येय ह्यापैकीं प्रत्येक गोष्ट, जत्रेंतील प्रत्येक मनुष्याच्या आतां लक्षांत आहे असें मात्र नाहीं. इतर जत्रा आणि ही जत्रा आतां सारखीच झालेली आहे. खावें, प्यावें, हिंडावें, रमावें आणि शून्य स्मृतीनें रामदासाच्या नांवाचा गजर करून ऊरमोडी नदींतून परत यावें एवढेंच आतां ह्या जत्रेंत उरलेलें

* संदेश, ता. ११ फेब्रुवारी सन १९२३.

आहे. परंतु लोक जरी रामदासांना विसरले तरी आपणांस विसरतां येत नाहीं. आपणांस त्यांचें स्मरण केलेंच पाहिजे, आणि रामदासांचें विशिष्ट कार्य आपल्या हृदयावर बिंबवलें पाहिजे.

* * * *

परंतु रामदासांचें कार्य अनेकविध होतें. त्या समग्र कार्यांत आज आपणांस शिरायचें नाहीं. आज आपणांस त्यांच्या कार्यापैकीं एका विशिष्ट भागाकडे बघावयाचें आहे, आणि तो भाग म्हणजे त्यांची भिक्षा हा होय.

**ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागीतली पाहिजे भिक्षा ॥**
**ॐ भवति ह्या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥**

ह्याप्रमाणें भिक्षेची तरफदारी करून श्री रामदासांनीं जगापुढें एक कोडें ठेवून दिलेलें आहे. आतां ह्या कोड्याचा उलगडा करणें फार कठीण आहे, कारण भिक्षावृत्ति ही फार नीच वृत्ति मानण्यांत आलेली आहे. आणि

**भिक्षापात्र अवलंबणें, जळो जिणें लाजिरवाणें ॥**

ह्या शब्दांत श्रीतुकाराम महाराजांसारख्यांनीं सुद्धां भिक्षेचा निषेध केलेला आहे. तेव्हां अशा निषिद्ध वृत्तीचा रामदासांनीं गौरव करावा, हें फार विचित्र होय. आणि ह्याकरितांच ह्या प्रश्नाचा अतिशय खोल दृष्टीनें विचार केला पाहिजे.

* * * *

अशा रीतीनें विचार करीत असतां आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, रामदासांनीं एक अत्यंत अवघड कार्य आपल्या शिरावर घेतलेलें होतें, आणि तें कार्य म्हणजे श्रीशिवाजी महाराजांच्या राजकारणाचा प्रसार हें होय. श्रीरामदास आणि श्रीशिवाजी महाराज ह्यांची भेट कधीं झाली हा वादग्रस्त प्रश्न एके बाजूला ठेवला, तरी त्यांची भेट होण्यापूर्वीच श्रीशिवाजी महाराजांचें ध्येय त्यांनीं ओळखलेलें होतें, हें निर्विवाद आहे; व त्या ध्येयास मदत करण्याचें त्यांनीं ठरविलेलें होतें, ह्यांतहि संशय नाहीं. 'तुमचे देशीं वास्तव्य केलें ।' वगैरे वाक्यांवरून रामदास आणि शिवाजीमहाराज ह्यांची भेट होण्याचे अगोदरच श्रीशिवाजीमहाराजांचें

कार्य त्यांना पटलें होतें हें स्पष्टपणें सिद्ध होतें. पण तें कार्य पटून उपयोग काय ? तें कार्य त्यांना जितकें आवडलें होतें तितकेंच तें कठीण होतें. कारण श्रीशिवाजीमहाराज हे क्रान्तिकारक होते, बंडखोर होते, "राजद्रोही" होते—श्रीशिवाजीमहाराज हे शस्त्रास्त्रें घेऊन राष्ट्राचें स्वातंत्र्य संपादन करण्याकरितां सिद्ध झालेले हौते.

* * * *

अशा स्थितींत प्रत्येक ठिकाणीं शिवाजीमहाराज व त्यांचे लोक ह्यांना मज्जाव असावा हें उघड आहे. ते शहरांत आले तर त्यांना पकडायला बादशहाचे लोक बसलेले होते. त्यांच्या पाळतीवर डिटेक्टिव्ह लोक फिरत होते. त्यांचा सुगावा लावण्याकरितां चहाडखोर लोक संधि बघत होते. स्वयंस्फूर्तीचे "राजनिष्ठ" लोक ते केव्हां हातीं लागतात ह्याची वाट पहात होते. अशा स्थितींत श्रीशिवाजीमहाराजांचें कार्य लोकांना समजायचें कसें ? लोकांचा आदर त्यांचेविषयीं कसा वाढावयाचा ? शिवाजी हा लुटारू नाहीं, हा राष्ट्रोद्धारक आहे—ही त्यांची समजूत कशी पटायची !

* * * *

कारण त्या वेळीं वर्तमानपत्रें नव्हतीं, त्या वेळीं लेक्चरें देण्याची पद्धति नव्हती, त्या वेळीं दाणाबंदरावर सभा भरत नव्हत्या, त्या वेळीं असोसिएटेड प्रेसच्या तारा नव्हत्या, त्या वेळीं मुद्रणकला नव्हती—विचारविनिमयाचें एकहि साधन त्या वेळीं नव्हतें. श्रीशिवाजीमहाराज ह्यांना तर किल्ले, डोंगर, रानें, वनें—ह्यांच्याशिवाय कुठें वस्तीच करतां येत नव्हती. अशा वेळीं जनतेची आणि त्यांची गांठ कशी पडायची ! त्यांचा स्वातंत्र्याचा संदेश जनतेला कसा पोंचायचा ?

पण हें काम रामदासांना साध्य होतें. शिवाजीमहाराजांच्या शिपायांना प्रत्येक ठिकाणीं मज्जाव होता, पण ह्या फकीराला कोण मज्जाव करणार ? विरक्त वृत्ति, संचय काडीचा नाहीं, मुखांत रामनाम, पवित्र आचरण—अशा पुरुषाला शहरांत येऊं नको असें कोण म्हणणार ! मुसलमान शिपाई, मुसलमान अधिकारी, "राजनिष्ठ" लोक, डिटेक्टिव्ह व चहाडखोर ह्यांपैकीं ह्या फकीराला नको म्हणायला कोण तयार होणार !

त्यांतहि रामदासांची राहणी फार तुटक ! कुणाशीं संबध यायचा नाहीं—कुणाशीं लफडीं उत्पन्न व्हायचीं नाहींत. रामदास म्हणजे गांजेकस साधु नव्हते, कीं त्यांच्या धुमीपाशीं व्यसनी लोकांचा तांडा जमेल ! त्यांचें पावित्र्य हें त्यांचें कवच होतें. त्यांना मज्जाव करण्याची बुद्धि कुणाला होणार !

अशा वेळीं श्रीरामदासांनीं भिक्षेची तोड काढली. त्यांचें वैराग्य हें त्यांचें कवच होतें. हें कवच अंगावर घालून श्रीशिवाजी महाराजांच्या पवित्र हेतूंची जनतेला ओळख करून देण्याचें त्यांनीं ठरविलें. त्यानीं शिष्यसमुदाय गोळा केला. त्यांना आपल्या पवित्र आचरणाचा निर्बंध घातला. एकांतवासाचें महत्त्व त्यांचे चित्तावर त्यांनीं बिंबविलें. रघुपतीची भक्ति त्यांचे मनावर त्यांनीं ठसविली, आणि त्यांना गांवोगांवीं आणि प्रांतोप्रांतीं स्वातंत्र्याचा संदेश फैलावण्याकरितां पाठवून दिलें.

* * * *

हा स्वातंत्र्याचा संदेश ज्या भिक्षेच्या मिषानें त्यांना फैलावावयाचा होता, ती माधुकरीची भिक्षा होती. ज्या भिक्षेंत पवित्रपणा आहे, ज्या भिक्षेंत संग्रह नाहीं, ज्या भिक्षेंत कडकडीत वैराग्य आहे, ज्या भिक्षेंत ईश्वरसेवा आहे, ती भिक्षा रामदासांनीं आपल्या शिष्यांना सांगितली. ह्या भिक्षेचा हेतु भिक्षा मागणें हा नव्हता, स्वातंत्र्याचा संदेश पोंचविणें हा त्या भिक्षेचा हेतु होता. ह्या भिक्षेचा हेतु अन्नसंग्रह नव्हता; लोकसंग्रह हा ह्या भिक्षेचा हेतु होता. ही भिक्षा हें त्या वेळचें "क्रॉनिकल" होतें, त्या त्यावेळच्या "असोसिएटेड प्रेस"च्या तारा होत्या, हीं त्यावेळचीं लेक्चरें होतीं, ह्या त्यावेळच्या रेमार्केटवरील सभा होत्या.

आणि ह्यांना कोणत्याहि गोष्टीची बाधा नव्हती. ह्या क्रॉनिकलचे हॉर्निमन "रिपोर्ट" होण्याची भीति नव्हती—त्या लेक्चरांचा "रिपोर्ट" येणें शक्य नव्हतें. ह्या सभा सभाबंदीच्या कायद्याखालीं उधळून लावण्याची काळजी नव्हती. ह्या असोसिएटेडच्या तारा प्रतिपक्षाच्या तावडींत सांपडण्याची भीति नव्हती. कारण रामदासांचा हा स्वातंत्र्याचा संदेश, थेट स्वयंपाकघरापर्यंत धडाक्यानें जात होता. घरांतील गृहिणी, घरांतील स्वामिनी, घरांतील कुटुंबिनी—ह्यांच्यापर्यंत थेट हा स्वातंत्र्य—संदेश पोंचत होता.

रामदासांचे शिष्य घरांत जे जात ते थेट घरमालकिणीजवळ जाऊन 'ॐ भवति।' करीत. राजाचे शिपाई झाले तरी बाहेर, चहाडखोर झाले तरी बाहेर, डिटेक्टिव्ह झाले तरी बाहेर-पण इथें हे रामाचे दास, थेट स्वयंपाक-घरांत जाऊन उभे रहात. अशा स्थितींत त्यांचा संदेश जनांचे अंतरंगा-पर्यंत जाऊन पोंचल्याशिवाय कसा राहील?

रामदासांचें कार्य जें यशस्वी झालें, श्रीशिवाजी महाराजांचें ध्येय जें लोकप्रिय झालें, स्वातंत्र्याचा संदेश जो जनतेच्या अंत:करणांत फोंफावला त्याचें कारण हें होय. ही रामदासांची भिक्षा ही पोटभरू वृत्ति नव्हती. ही राष्ट्राची उन्नति होती. ही गुलामगिरीवरची कुऱ्हाड होती आणि श्रीसमर्थ रामदास अभिमानानें सांगत कीं—

**ब्राह्मणाची मुख्य दीक्षा। मागीतली पाहिजे भिक्षा।**
**ॐ भवति ह्या पक्षा। रक्षिलें पाहिजे ॥**

---

## मी कधींहि भिणार नाहीं!

—'राज्यकर्त्यांनो, तुम्हीं आपल्या तोफा आणवा नाहींतर बंदुका आणवा—मी तुम्हांस भिणार नाहीं. अधिकाऱ्यांनों, तुरुंगाचे दरवाजे खोला नाहींतर पायांत लोखंडी बेड्या घाला—पण मी तुम्हांस भिणार नाहीं. सत्ताधाऱ्यांनों—हातांत चाबूक घेऊन या, नाहींतर अन्धारकोठडींत लोटून द्या—मी तुम्हांस भिणार नाहीं. पाठीवर कोरडे उडूं द्या, कांटेरी टोप डोक्यावर ठेवा, हाल हाल करा—उठतां बसतां सव्वामणाचें पोतें डोक्यावर ठेवा, पण मी तुम्हांस भिणार नाहीं. मी स्वातंत्र्याचा शिपाईगडी आहें—जिव्हेंतून शेवटचें अस्पष्ट वाक्य निघेपर्यंत मी आपल्या देशबांधवांस स्वातंत्र्याचा उपदेश करीन! ऐहिक सामर्थ्यापेक्षांहि वरचढ असणारीं दैवी सामर्थ्यें ह्या जगांत आहेत आणि जर माझें तत्त्व खरें असेल तर शेवटीं त्याचाच जय होईल.'

हाच टिळक-स्पेशल अंक! हेंच टिळकांचें ब्रीदवाक्य! हाच त्यांचा महामंत्र! हा घ्या—आणि निर्भय व्हा!

[सं. ८ आगष्ट १९२२]

# शेवटची वेल सुकली ! *

चार वर्षांपूर्वी पुण्याच्या किर्लोस्कर थिएटरमध्यें 'तोतयाचें बंड' चाललेलें होतें, त्यावेळीं एक वयस्क व्यक्ति दुसऱ्या मजल्यावर बसून तो 'खेळ' पहात होती. ही व्यक्ति कोण बरें ? आणि ही व्यक्ति काय पहात होती ? ही व्यक्ति 'तोतयाचें बंड' पहात होती, आणि किर्लोस्कर थिएटरमध्यें बसून हें बंड ती पहात होती. हें किर्लोस्कर थिएटर म्हणजे पूर्वीचा माणकेश्वराचा वाडा होय. हे माणकेश्वर नाना फडणीस वारल्यानंतर नाना फडणीसांचे जागीं मराठी राज्याचे झालेले मंत्रि होत. थोडेंसें पलिकडे गेलें व क्रिकेटचें एक दुकान, एक न्हाव्याचें दुकान, आणि एक चहाकॉफीचें दुकान मध्यें टाकलें म्हणजे तेथें नाना फडणीसांचा वाडा लागतो. मराठींतील षष्ठीच्या प्रत्यया, असें कां खोटें बोलतोस ? हा वाडा नाना फडणीसांचा कोठला ? आतां तेथें नाना फडणीस कोठें आहेत ? त्यांच्या वंशजांची सुद्धां आतां त्या वाड्यावर मालकी नाहीं !

* * *

त्या वाड्यांत––कीं ज्या वाड्यांत एके काळीं बारभाईचें कारस्थान रचलें गेलें, ज्या वाड्यांत राघोबादादाला कोठें कैदेंत ठेवावें ह्याचा प्रथम विचार झाला, ज्या वाड्यांत मराठी राजाच्या सुरक्षिततेबद्दल अहोरात्र चिंतन चाललें होतें व पलीकडे शनिवार वाड्याच्या कारंजावर, सवाई माधवरावांची उडी पडल्याबरोबर ज्या वाड्यांत कोणी न पहातां, कोणाला न कळवितां, सर्वांपासून दडवून अगदीं एकांत स्थानीं डोळयांतील अश्रुधारांचें प्रथम कारंजें उडालें,–त्या वाड्यांत, नाना फडणीसां(च्या) वाड्यांत––षष्ठीच्या प्रत्यया ! तू इतका खोटें बोलणारा, इतका निर्लज्ज, इतका बेशरम आहेस कीं तुझें खोटें बोलणें चुकवावें म्हणून तुझ्या भोवतीं आम्हीं पाठी तरी किती वेळ धरूं ?––जा, नीचा, जा व खुशाल त्या फडणीसांच्या वाड्यांत असें ठांसून बोल––त्या नाना फडणीसांच्या वाड्यांत आतां पन्नास रुपयांवर "तुनुमुनु तुनुमुनु" करणारीं मास्तरें, बारा वाजल्याची

---

* संदेश, ता. २ सप्टेंबर १९१७.

घंटा बडविणारे शिपाई व छडीच्या धाकानें खोटी सबब हुडकून काढण्यांत गर्क झालेलीं पोरें हींच आज वावरत आहेत !

* * *

कथानक तुटलें ! आम्हीं आपल्या वाचकांना आज जें कथानक सांगणार होतों तें कथानक तुटलें ! मध्येंच हीं न्हाव्यांचीं दुकानें व मास्तरांचीं वाळकुडीं " देहें " निघालीं ! पण चला, आपण आज तुटकेंच कथानक लावूं या ! हें कथानक तुटकेंच आहे. कारण जें जरासंधाच्या वज्रदेहाइतकें एके काळीं बेमालूम सांधलें गेलें होतें तें तुटल्याचेंच हें द्योतक आहे ! होय, वाचकांनों, ते तुटलें—तें तुटलें बरें ! तें तुटलें हें सांगण्याकरितांच आज हें कथानक लावलें आहे ! एक वयस्क मूर्ति, नाना फडणीसांच्या वाड्यापासून फार दूर नसलेल्या माणकेश्वराच्या वाड्यांत चार वर्षांपूर्वीं " तोतयाचें बंड " पहात बसलेली होती ! त्या नाटकांत पेशव्यांचा वाडा आलेला होता. पांच पन्नास रुपयांवर तोंडाला रंग लावावयास कबूल असलेला एक माणूस त्या दिवशीं कानांत कुंडलें घालून " नाना फडणीस " बनलेला होता, व तितक्याच किंवा कांहीं कमीजास्ती रुपयांवर लुगडें नेसावयाला कबूल असलेला एक पुरुष त्या दिवशीं " पार्वतीबाई " झाला होता—झाली, त्या नाटकांतलीं मुख्य पात्रें हीं दोनच. त्यांशिवाय एक विठाई होती, एक बगंभट होता, एक दौलतराव होता. त्यांच्याशी आपल्याला काय करावयाचें आहे ? तीं पात्रें सर्व काल्पनिक—खोटीं ! आणि तो तोतया तर बोलून चालून तोतयाच ! तो खरा कोठला ? त्या नाटकांत खरीं पात्रें अशीं मुख्यतः दोनच. एक पार्वतीबाई आणि दुसरे नाना फडणीस !

* * *

नाना फडणीसांच्या वाड्यापासून जवळच असलेल्या माणकेश्वराच्या वाड्यांत बसून नाटक पहाणारी ती वयस्क व्यक्ति हें सर्व पहात होती. ती नाना फडणीस पहात होती, ती पार्वतीबाई पहात होती, ती रॉकेलच्या पेट्यांचा व दीडदमडीच्या जर्मन रंगाचा बनविलेला शनिवार-वाडाहि पहात होती ! शनवार वाडा ! शनवार वाडा ! नाना फडणीसांच्या वाड्या-

पलीकडचा चार पावलांवरचा तो शनवार वाडा—शनवार वाड्याची कल्पना आल्याबरोबर त्या व्यक्तीच्या अंतःकरणांत चर्रर झालें ! सांडसानें चरके द्यावे त्याप्रमाणें त्या व्यक्तीच्या स्मृतीला चरके बसले ! करवतीनें चरचर कर्वतावें त्याप्रमाणें त्या व्यक्तीची स्मरणशक्ति करवतली गेली. डोळ्यांपुढें अंधेरी आली ! किटसनचे दिवे असतांना सुद्धां डोळ्यांना दिसेनासें झालें ! त्या व्यक्तीचे डोळे मिटले ! कुलूप लावलेल्या गेटाप्रमाणें त्या घट्ट झांकलेल्या डोळ्यांच्या आंत अश्रुबिंदूंचा घोळका बाहेर येण्यासाठीं डळडळत होता. पण डोळे इतके घट्ट मिटलेले होते कीं त्यांना बाहेर यायला मार्ग नव्हता.

* * *

इतर माणसेंहि नाटक पहातच होतीं ! एकदां नाना फडणीसांची तारीफ करावी, एकदां पार्वतीबाईची तारीफ करावी, एकदां त्या विठाबाईच्या 'ॲक्टिंगवर' खुष व्हावें, एकदां त्या बगंभटाकरितां दांत काढावे, असें त्यांचें चाललेलें होतें ! शनवारवाड्याचा 'सीन' काय हुबेहूब साधलेला आहे, असें तीं आपापसांत कुजबुजत होतीं ! त्यांना वाटत होतें कीं फळकुटावर रंग दिला म्हणजे शनिवारवाडा होतो आणि कानांत कुंडलें घातलीं म्हणजे नाना फडणीस होतो ! शनिवार वाडे व नाना फडणीस इतक्या सोप्या युक्तींत जर होत असते तर मग आणखी काय पाहिजे होतें ? रॉकेलची प्रत्येक पेटी व मण्यांचा लोंबता लंबक एवढ्या तयारीनेंच जर नाना फडणीस व त्यांचा वाडा निर्माण होते तर निदान त्यांच्या वंशजाकडे तरी तो कां न राहता व शनिवार वा–वा–वा–तुटले, हें कथानक पुन्हां इथें तुटलें ! हें कथानक आज कांहीं तडीला जात नाहीं.

* * *

ती व्यक्ति हें सारें पहात होती ! पण छेः, ती हें कोठून पहाणार ? तिनें नाटक पहायला सुरवात केली व फळकुटावरच्या शनिवार वाड्या-पुढे तिनें आपले डोळे घट्ट मिटून धरले. तिला कांहीं दिसेना ! तिनें मान खालीं घातली, गुडघ्यावर हात ठेवले व रात्र जशी सूर्याच्या

गोलकाला दडविते, त्याप्रमाणें आपल्या पदरांत तिनें आपला गोल चेहेरा दडविला. ती आपलें सर्व अस्तित्व विसरली ! आजूबाजूंच्या प्रेक्षकांचीहि तिला जाणीव नाहींशी झाली ! नाटकांतला एकहि शब्द तिला ऐकूं येईना ! सुम्म्, असा एकच आवाज, अंधार हें एकच अस्तित्व, व आयुष्य हें एकच ओझें तिला वाटूं लागलें ! अशा स्थितींत तिला बाहेरचें नाटक कोठून ऐकूं येणार ?

* * *

पण हें बाहेरचें नाटक तिला ऐकूं येत असतें तरच बरें झालें असतें. कारण हें बाहेरचें नाटक बंद झाल्याबरोबर तिच्या अंतःकरणांत जें एक नवें नाटक सुरू झालें तें फारच क्रूर होतें. त्या नाटकानें तिचीं आंतडीं ओढलीं, त्यानें तिला स्मरणाच्या यमयातना दिल्या. बाहेर एक नाना फडणीस नरसोपंतांनीं लिहिलेलीं मोजकीं वाक्यें बडबडत होता. पण आंत तिच्या अंतःकरणांत खरा नाना फडणीस आपल्या खऱ्या दिवाणखान्यांत बसला होता. आंत खरी पार्वतीबाई खऱ्या शनवारवाड्यांत बसून टिपें मोजीत होती; त्यावेळीं नानांच्या वाड्यांत न्यू स्कूल नव्हतें, नाना फडणीसच होते; त्या वेळीं शनवार वाड्याच्या नव्या इमारती झाल्या नव्हत्या, शनवारवाडा आपले सर्व मजले सायसंगीत उभे करून तिच्या स्मरणांत थाटलेला होता; आणि ते नाना फडणीस व ती पार्वतीबाई, त्या शनवार वाड्यांतून आपल्या खऱ्या भाषेंतून ह्या व्यक्तीला विचारीत होती कीं, "कुसुम, तूं एकटीच येथें कोठें ?

* * *

जिवंत माणसांनीं जिवंत माणसांना प्रश्न विचारला म्हणजे त्यांत कांहीं विशेष नसतें. कारण जिवंत माणसें त्याची लगेच वाट लावूं शकतात, पण मेलेल्या माणसांनीं जिवंत माणसांना प्रश्न विचारला म्हणजे तो फार वाईट. कारण त्या प्रश्नांतून कशानेंच सुटका होत नाहीं. तो प्रश्न त्यांचा सारखा पाठलाग करीत असतो. जिवंत माणसें पाठीस लागलीं म्हणजे त्यांना सहज झुकांडी देतां येते. कारण एकाद्या अरुंद वाटेंत अथवा एखाद्या आडव्या घरांत शिरलें म्हणजे त्यांची चकामुक पडते. परन्तु मेलेल्या माणसाचा पाठलाग

फार वाईट. कोणत्याही गल्लीत शिरलें तरी तीं पाठीमागें असतातच ! आपण पळालों कीं तीं आपल्या मागें पळतात. आपण टांगा केला कीं तीं टांगा करतात, आपण मोटार केलीं तर तीं मोटार करून आपल्यामागें धांवत येतात. आपण बांकावर बसावें तर तीं बांकावर बसतात. आपण खुर्चीवर टेंकलों तर तीं आपल्या जवळ खुर्ची घेतात, व कड्याकुलपें घालून आपण एकांतांत म्हणून बसलों, म्हणजे बिनपाय वाजवतां त्या कड्या—कुलुपांतून आपल्या जवळ येऊन आपल्याला असें विचारतात कीं, 'आम्हांला तूं कसें टाळणार ?' या त्या व्यक्तीचें–किर्लोस्कर थिएटरमधील त्या व्यक्तीचें––त्या दिवशीं तसेंच झालें. तिनें डोळे मिटल्यानन्तर एकदम तीं सारीं मेलेलीं माणसें, तो उंच मानेचा नाना फडणीस, त्या झुरत असलेल्या पार्वतीबाई, तो पोटाचा कोथळा बाहेर पडलेला नारायणराव, तो 'भाऊ,' 'भाऊ,' करीत ऊर बडविणारा नानासाहेब, तो कफ दाटलेला माधवराव—फार काय सांगावें ? कारंज्यावर उडी टाकण्याच्या तयारींत असलेला तो सवाई पेशवा, हीं सारीं मेलेलीं माणसें तिच्याभोंवतीं जिवंत झालीं व तिला म्हणालीं 'कुसुम, तूं एकटीच येथें कोठें ?

* * *

पण एवढ्यावरच थांबलें नाहीं! ह्यापेक्षां आणखी पुष्कळ प्रकार झाले. पेशव्यांनीं पुण्यापासून ब्रह्मावर्तापर्यंत प्रवास केला म्हणजे आपली त्यांची संगति तुटते. मग आपण दयाळु इंग्रज प्रभूंचा अंमल पहावयास लागतों. लहान मुलांच्या डोळ्यांपुढून एखादें प्रेत उचलून नेलें, म्हणजे त्यांची "आई" किंवा "बाप" किंवा "मामा" किंवा "काका" तेथें संपतो ! पुढचे मसणवटींतील प्रकार त्यांच्या कोंवळ्या डोळ्यांना सहसा दिसूं देत नाहींत. पेशवाईचें असेंच झालें. रावबाजी पुण्याहून ब्रह्मावर्ताला गेले कीं तेथेंच आपणांस पेशवाई संपली ! मग पेशवाईचें प्रेत तिकडे मसणवटींत किती दिवस पडून राहिलेलें होतें व त्याला जमिनींत गाडलें कीं कोल्हयाकुत्र्यांनीं फाडलें, कीं तें तसेंच तेथें सडलें, ह्याची आपल्याला वार्ताही नाहीं !

* * * *

पण ती किर्लोस्कर थिएटरमधील त्या दिवशींची व्यक्ति आपल्या-इतकी सुखी नव्हती. किंबहुना ब्रह्मावर्ताच्या पुढील इतिहासाशींच तिचा संबंध जास्त जास्त आला. तिचा जन्म ब्रह्मावर्त येथें झाला व तिच्या जन्मापासून ती पदच्युत नृपतीची कन्या म्हणून मिरविली गेली. शहाजी राजाचें अपत्य असून पुढें अकबर होणेंहि बरें, एवढेंच नव्हे तर नेपोलियन-प्रमाणें साम्राज्य–सिंहासनावर नाचून अंतकाळीं झोपडींत मरणेंहि पत्करेल, कारण त्यांत स्वतःचें वैभव मिळविलेलें असतें व तें स्वतःच घालविलेलें असतें, परंतु पदच्युत राजाच्या पोटीं येणें, वितळलेल्या सोन्याच्या पाळ-ण्यांत झोके घेणें, डिस्‌मिस् केलेल्या नोकराचेकडून लाड केले जाणें, ह्या गोष्टीइतकी मानहानिकारक गोष्ट दुसरी कोणतीहि नाहीं. परंतु किर्लोस्कर थिएटरमधील ती व्यक्ति अशा अपमानांतच जन्माला आली. तिनें जन्मा-पासून अपमान पाहिला, अपमान ऐकला, व अपमान सहन केला. पूर्वीच्या राजवैभवाच्या हकीगती ऐकाव्या व ब्रह्मावर्तांत असावें. पूर्वीच्या अफाट सत्तेचीं वर्णनें ऐकावीं व स्वतः सत्ताहीनतेचा अनुभव घ्यावा. पूर्वीचा अटकेपासून रामेश्वरापर्यंत फडकलेला भगवा झेंडा पहावा, आणि स्वतः फक्त ब्रह्मावर्तांतच वेष्टिलेलें असावें, ही स्थिति अत्यंत शोचनीय, अत्यंत दुःखकारक, अत्यंत क्लेश देणारी होय! पण किर्लोस्कर थिएटरमधील त्या व्यक्तीनें ही सर्व स्थिति प्रत्यक्ष सहन केलेली होती एवढेंच नव्हे, तर तो भाग्यहीन बाजीराव, त्याचा तो भाग्यहीन चिमाजीअप्पा, तो बंडखोर नानासाहेब, तो बंडखोर रावसाहेब, तो बंडखोर तात्या टोपे व त्यांच्या बायका, त्यांच्या मुली, त्यांच्या सुना, ह्यांचा उडालेला हल-कल्लोळ, किर्लोस्कर थिएटरमधील ह्या व्यक्तीनें स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलेला होता. ही आमची व्यक्ति म्हणजे दुःखपर्यवसायी नाटकांतील शेवटचा आकांत, करुण कहाणींतील शेवटची किंकाळी, अपशकुनी भवि-तव्यतेची शेवटची गांजणूक होती. अशा ह्या व्यक्तीपुढें त्या दिवशीं, त्या 'तोतयाचे बंडा'चे दिवशीं, सर्व मराठी इतिहास पुन्हां जिवंत होऊन पुन्हां पुन्हां थडग्यांतून उठून, पुन्हां चितेवरून खडबडून, उभा राहिला असेल व त्या व्यक्तीला त्या दिवशीं त्यानें किती भेडसावलें असेल ह्याची वाचकांनींच कल्पना करावी!

* * *

ही व्यक्ति कोण, हें आतां वाचकांना सांगण्याची गरजच राहिली नाहीं. कारण ज्यानें महाराष्ट्राचा स्वराज्यसूर्य लोपविला, ज्यानें श्रीशिवाजी महाराजांच्या कीर्तीला, कृतीला व उपकारांना हरताळ फांसला, त्या परम दुर्दैवी, परम अमंगळ, परम सुतकी अशा शेवटल्या बाजीरावाची ही कन्या होय ! ज्याप्रमाणें श्रीशिवाजी महाराजांनीं मराठी राज्य कमाविलें ही गोष्ट आम्हीं कधींहि विसरणार नाहीं त्याप्रमाणें आमचें मराठी राज्य घालवावयास दुसरा बाजीराव कारणीभूत झाला ही गोष्टहि आमच्या स्मरणांतून कधींहि जाणार नाहीं. मराठी राज्याचा इतिहास प्रतापवंत शिवाजी महाराजांपासून सुरू झाला व प्रतापहीन बाजीरावापाशीं संपला. मराठी इतिहासाचें पहिलें कव्हर शिवाजी आहे, व शेवटचें मलपृष्ठ बाजीराव आहे. तेव्हां कोणी कितीहि आळशी वाचक असला तरी निदान पहिलें व शेवटचें कव्हर हें त्याच्या लक्षांत राहिल्या-वांचन कधींहि रहाणार नाहीं. हीं दोन्ही कव्हरें तांबडचा लालभडक रंगांत आहेत. पहिलें कव्हर पुण्यश्लोक शिवाजीच्या प्रतापांनीं खुललेलें आहे, व शेवटचें कव्हर रावबाजीनीं उधळलेल्या विलासरंगांनीं रंगविलेलें आहे. दुदैव इतकेंच, दुःख इतकेंच, विलापाची, शोकाची गोष्ट इतकीच कीं, रावबाजीशीं "शेवटचा" हें उपपद कायमचें चिकटलें गेलें व हाय ! हाय ! ह्या उपपदाबरोबर स्मृतीचा बाण त्या व्यक्तीच्या हृदयांत कायमचा रोंवला गेला !

* * * *

त्या दिवशीं किर्लोस्कर थिएटरमध्यें "तोतयाचें बंड" पहात बसलेली ही व्यक्ति, त्या बाजीरावाची मुलगी होय. हिचें नांव कुसुमाबाई, व हें कुसुम ब्रह्मावर्ताच्या भाग्यहीन बागेंत उगवलें, भाग्यहीन बगीच्यांत राहिलें, व नुकतेंच भाग्यहीन रीतीनें भाग्यहीनपणांतच काशी येथें म्लान झालें. ज्या शेवटच्या बाजीरावानें मराठी राज्याचा शेवट केला, त्याची कन्या—कोणत्याहि खऱ्या रक्ताच्या मराठ्याचे स्मरणांतून कधींहि नाहींशा न होणाऱ्या इ. स. १८१८ सालचा पहिला शेंकडा ऐन संपण्याचे वेळींच, म्हणजे १९१७ सालीं—मृत्यु पावावी हा योगायोग खरोखर फार विलक्षण दिसतो. बाजीराव गादीवर आला तेव्हां तो ऐन पंचवीशींत होता. तेव्हां

ज्यानें सतराव्या शतकाचीं पंचवीस तीस वर्षे उत्तम तऱ्हेनें पाहिलीं, त्यानें व त्याच्या कन्येनें मिळून सन अठराशेंचें सबंध शतक मध्यें गडप करून शिवाय सन एकोणीसशेंच्या शतकाचीं पहिलीं सतरा वर्षें पहावीं, ही गोष्ट फारच लक्षांत ठेवण्यासारखी आहे. बाजीराव जर आपल्या परम-प्रतापी पंचम जॉर्ज बादशहांप्रमाणें भाग्यवंत असता व त्याची कन्या कुसुमाबाई ही जर भाग्यवंतपणांत व्हिक्टोरिया चक्रवर्तिनी असती, तर ह्या दोन व्यक्तींत--बापांत व कन्येंत मिळून--मराठ्यांच्या इतिहासाचीं दीडशें वर्षें कधींच निघून गेलीं असतीं. परंतु मराठी इतिहासाला तें भाग्य कधींहि लाभलें नाहीं. मराठी इतिहासाच्या अल्पावधींत ग्रीक थर्मापिलीचे प्रसंग आहेत, रोमन इतिहासाच्या हॅनिबॉलच्या स्वाऱ्या आहेत, मराठी इतिहा-सांत ट्यूडर--स्टुअर्टच्या घराण्यांची जोड आहे, ह्या दृष्टीनें, जगांतील कोणत्याहि इतिहासापेक्षां मराठी इतिहास जास्त उद्दीपक, जास्त भरगच्च, जास्त देशभक्तिप्रवण व ज्यास्त पराक्रमी आहे. पण दुर्दैव एकसारखें हात धुऊन मागें लागल्यामुळें मराठी इतिहासाला त्यानें कधीं उसतंच पडूं दिली नाहीं. अकबर, अवरंगजेब, व्हिक्टोरिया राणी, तिसरा जॉर्ज, चव-दावा लुई, राणी कॅथराईन ह्यांप्रमाणें शिवाजी, राजाराम, बाजीराव, पहिला माधवराव, महादजी शिंदे ह्यांपैकीं मराठी इतिहासांत एक जरी " सेंचुरी बॅट्स्मन " निघता तरी मराठी इतिहास ज्या वर्षी संपला त्या वर्षी संपला नसता. पण भगवंतानें मराठी राज्यांतलीं सर्व रत्नें व माणकें अत्यंत अल्पायुषी केलीं व पुढील भाग्यहीन व्यक्तींना एवढालीं आयुष्यें दिलीं कीं त्यांपैकीं फक्त दोघांमध्यें दीडशें वर्षें आटून गेलीं !

* * * *

असो, पेशवाई संपल्यानंतर पेशवे घराण्यांतल्या व्यक्तींचे काय काय धिंडवडे निघाले, ह्यासबंधीं खुद्द कुसुमबाईच्या तोंडून निघालेलें वृत्त आह्मीं आज दुसरीकडे दिलें आहे. कुसुमबाईचें निधनवृत्त दोन चार दिवसांपूर्वी संदेशमध्यें प्रसिद्ध झालेंच आहे. हें निधनवृत्त १९१७ मध्यें ह्मणजे १८१८ चें शतक पूर्ण करणाऱ्या सालांतच घडावें व पेशवाई घालविणाऱ्या पुरुषाच्या वंशांतील शेवटची व्यक्ति पेशवाई बुडाल्यापासून बरोबर शंभराव्या वर्षी नाहींशी व्हावी हा योगायोग आह्मांस फार विलक्षण वाटतो, व त्याचा

पुन्हां पुन्हां उच्चार केल्यावांचून आह्मांस राहवत नाहीं. पेशव्यांनीं पुणें सोडल्यापासून पेशव्यांच्या एकाहि वंशजाचे पाय पुन्हां पुण्याला लागले नाहींत, फक्त १९१३ मध्यें ह्या कुसुमाबाई–हें त्यांचें माहेरचें म्हणजे पेशव्यांच्या घरचें नांव, त्यांचें सासरचें नांव बयाबाई आपटे असें होतें–पुणें येथें आल्या व विशेष संस्मरणीय योग असा कीं, त्याच वर्षी " तोतयाचें बंड " हें नाटक प्रथमच रंगभूमीवर येऊन ग्रंथकाराच्या विनंतीवरून त्यांनीं नाटक पाहण्यास येण्याचें उदारपणें कबूल केलें. मराठी राज्य नामशेष झाल्यानंतर नाना फडणीसांच्या वाड्याची शाळा बनावी, माण-केश्वरांच्या वाड्यांत थिएटर यावें, आणि पदभ्रष्ट पेशव्याची कन्या तेथें पार्वतीबाईचें नाटक पहाण्यास बसावी ही करुणप्रसंगांची जुळणी इतकी कल्पनातीत आहे कीं, प्रत्यक्ष शूद्रक अवतरला तरी त्याला इतके चमत्कारिक प्रसंग जमवितां यावयाचे नाहींत. पण नियति ही खरोखर करुण काव्या-पेक्षांहि ज्यास्त विचित्र घटनांची घटक आहे आणि परमेश्वर हा कोण-त्याहि कल्पनाबाज नाटककारापेक्षां जास्त कल्पक नाटककार आहे, म्हणून त्याच्या दरबारीं असले प्रसंग उद्भवलेले पाहिले म्हणजे आश्चर्य करणें, स्तिमित होणें, थक्क होऊन जाणें ह्यापेक्षां आपणांसारख्या मर्त्य जीवांच्या ह्रातांत काय आहे !

* * * *

परंतु आपण कितीहि थक्क झालों तरी ज्या दुर्दैवग्रस्त स्त्रीचें, ज्या कुसुमबाईचें, ज्या भाग्यवान् पेशवे घराण्यांतल्या अभागी कुसमचें आयुष्य गेल्या आठवड्यांत संपलें, त्यांचेबद्दल मनमुराद अश्रु ढाळल्याशिवाय आपल्या स्वदेशभक्तीचें ऋण आपण बरोबर रीतीनें फेडलें असें म्हणतां येणार नाहीं. कुसुमाबाई अप्रसिद्ध होत्या, कुसुमाबाईचा पिता हतभागी होता, चांडाळ होता, हें सर्व जरी खरें आहे, तथापि त्या श्रीशिवरायांच्या स्वरा-ज्यांतील शेवटचा दुवा असल्यामुळें त्यांचें महत्व, त्यांची किंमत व त्यांच्या विषयींची आदरबुद्धि हीं तिळमात्र कमी होत नाहींत. आज कुसुमाबाईचें चरित्र आपण आठवलें नाहीं म्हणून आपल्याला कोणीहि शासन कर-णार नाहीं, कारण राज्य घालविलेल्या बापाची ती राज्यावर नसणारी कन्या होती ! ज्ञानप्रकाशनें तसेंच केलें ! रावबाजी ब्रम्हावर्तास वारले

तेव्हां त्यांचें निधनवृत्त ज्ञानप्रकाशनें तीन चार ओळींतच दिलें. पण तेच रावबाजी जर पेशवाईवर असतांना वारते, व त्या वेळीं जर ज्ञानप्रकाश हयात असता, तर त्यांच्याकरितां हुंदके देतां देतां ज्ञानप्रकाशला पंधरा दिवस सुद्धां पुरले नसते ! पण आम्हीं असें म्हणतों कीं, भाग्यहीनपणांत कुसुमबाई वारली, ह्यामुळें तर त्यांच्या संबंधानें दुःख करण्याचें दुप्पट कर्तव्य आपल्यावर येऊन पडलेलें आहे आणि हें कर्तव्य जर आपण बजावणार ना ीं, तर आपल्या देशभक्तींत ती एक विलक्षण उणीव राहून जाईल !

* * * *

मराठी इतिहास म्हणजे काय? महाराष्ट्रीय मनुष्य म्हणजे काय? मराठा ह्मणजे तरी काय ? मराठा ह्मणजे शिवाजी, मराठा ह्मणजे राजाराम, मराठा ह्मणजे बाजीराव, मराठा म्हणजे पानपतचा विश्वासराव ! स्वतःला मराठा म्हणवून घेणारा मनुष्य असला, तरी ह्यांचें जर त्याला पदोपदीं स्मरण न होईल, ह्यांच्या स्मरणानें अवगुंठित असें जर त्याचें आयुष्य न जाईल, तर तो मराठा कसला ? शिवाजीनें महाराष्ट्र उत्पन्न केला, शिवाजीनें मराठी इतिहास बनविला, शिवाजीनें 'मराठा'–चैतन्य उत्पन्न केलें, तेव्हां जो शिवाजीला व शिवाजीपासून बाजीरावापर्यंत झालेल्या इतिहास–प्रवाहाला विसरेल तो हाडाचा मराठाच नव्हे ! ती शक्ति, ती स्फूर्ति, तो देशाभिमान, तें शौर्य जर आमच्या महराष्ट्रीयांच्या अंगीं सळसळलें तर तें 'मराठा' ह्या नांवाला योग्य, नाहींतर ह्या महाराष्ट्रांत त्यांनीं राहूं नये, कृष्णेच्या पाण्याला शिवूं नये, सह्याद्रीकडे पाहूं नये, विष्णुशास्त्र्यांनीं नटविलेल्या मराठी भाषेचा उच्चार करूं नये ! ज्याची स्मृति, ज्याची भावना, ज्याचा शब्द सारंगीवरील काठीप्रमाणें तिकडून इकडे व इकडून तिकडे हालत न राहील, व त्यांतून देशभक्तीचीं मधुर गीतें न निघतील तर त्यानें नांव बदलून ठेवावें–'मराठा' हें नांव कधींहि विटाळूं नये.

* * * *

किर्लोस्कर थिएटरमध्यें आपण जरी नाटक पहात बसलों तरी कुसुमबाईंप्रमाणें आपल्या स्मरणाला स्फुरण भरलें पाहिजे, आपल्या डोळ्यांपुढें खरे सीन आले पाहिजेत, आपण हातरुमालानें तोंड दडवून आपल्या अंतःकरणाच्या रंगपटावर तो शिवाजी, तो संभाजी, ती येसूबाई, तो राम-

शास्त्री, तो चाफाजी, तो महादजी, ह्यांनाच नाचावयास बोलाविलें पाहिजे. थिएटरच्या बाहेरील पाटीवर शनवार–बुधवारचा कोणताहि खेळ लागलेला असो, आपल्याला त्यांत माणकेश्वराचा वाडाच दिसला पाहिजे. जातांना, येतांना, कार्य करतांना, विश्रांति घेतांना जर आपलें मराठी सत्य, आपलें मराठी देशप्रेम व आपलें मराठी वैभव आपणांस आठवलें, तरच आपण आपल्या आईच्या पोटीं जन्मलों ! जो मनुष्य पुण्यांत पाय ठेवील आणि शिवाजीच्या स्मरणानें मुदित होणार नाहीं, जो मनुष्य बोलाईच्या पटांगणावर उभा राहील आणि आपल्यापुढें दसरा उभा करणार नाहीं, जो मनुष्य पेशव्यांच्या शनवार वाड्यावरून जाईल व अंतःकरणांत पूज्य बुद्धीनें थरारणार नाहीं, तो मनुष्य कसला ? ताजमहालापुढें उभें राहून ओरडणारें गाढव व असला मनुष्य ही उभयतां सारखींच !

*    *    *    *

आणि म्हणून पेशवे कुळांतली ही शेवटची स्त्री मृत झालेली पाहून, पेशवे कुळांतली ही शेवटची पताका खालीं पडलेली पाहून, पेशवे वंशवृक्षाची ही पालवी सुकून गेलेली पाहून आपण दुःखी झालें पाहिजे, शोक केला पाहिजे, अश्रूंनीं ही महाराष्ट्रभूमि नाहविली पाहिजे. आज आपण शिवाजीच्या राजवटींत नाहीं, दयाळु पंजम जॉर्जच्या राजवटींत आहोंत ! आज आपण भगव्या झेंड्याखालीं नाहीं, यूनियन-जॅकखालीं आहोंत ! आज आपण शिवाजीपासून बाजीरावापर्यंत नाहीं, तर क्लाइव्ह, वॉरन हेस्टिंग्जपासून मॉटेग्यूच्या तीरातीरानें पुढें चाललेले आहोंत. काळ बदलला आहे, कर्तव्यांत पालट पडला आहे, भविष्यत्काल निराळ्या स्वरूपाचा झालेला आहे. तरी पण कुसुमाबाईप्रमाणें लक्षांत ठेवलेंच पाहिजे कीं आपण श्रीमंतांचे आहोंत, राजघराण्यांतले आहोंत, मराठा परंपरेंतले आहोंत. फेरोझशहा मेथा, सुरेंद्रनाथ बानर्जी, चिंतामणी, जिना ह्यांच्या परंपरेतले आपण नाहीं. त्यांना ज्या गोष्टी पाहून तोंडाला पाणी सुटत असेल त्या आपल्यालाहि मिळाल्या तर उत्तमच,–कारण आपण कांहीं त्यांचे वैरी नाहीं, ते आपले देशबंधूच आहेत.–पण जें पाहिलें असतां जिना जिन्यावरून दुडदुड धांवत येतील, जिचें वर्णन करतां करतां ना. वॉच्छांना शेक्सपीअरची इंग्रजी वाचासुद्धां अपुरीच वाटेल, त्याकरितां

तसल्या प्रकारची सुरेंद्रनाथी घिसाडघाई आपल्याला कधींच करायला नको. आपण राजनिष्ठ, शांत, गंभीर, व धीराचे बनलें पाहिजे. देशभक्ति, सत्य-निष्ठा, राष्ट्रीयपणा ह्याच काय तो आपला बाणा, व तोच आपण चोवीस तास वाढवीत गेलें पाहिजे. हेंच, हेंच आपलें कर्तव्य. महाराष्ट्रीयाला दुसरें कर्तव्य नाहीं. कॉंग्रेस, प्रांतिक कमिट्या, एकोणीसांचा मसुदा, गोखल्यांची स्कीम, जिनांची योजना—हूं—चालूं द्या, चालू द्या हें सारें! वॉच्छा व सुरेंद्र-नाथ त्यांत पटाईत आहेत, त्यांना त्यांत चोवीस तास गुन्तूं द्या, आम्हां महाराष्ट्रीयांना त्यांत कांहीं समजतच नाहीं. कोणत्या बैठकींत, कोणी निवडलेले, किती मेंबर घ्यावेत—छेः, आम्ही महाराष्ट्रीयांनीं असले उखाणे कधीं सोडविलेलेच नाहींत! आम्हांला एकच समजतें, तें काय? तर देश-भक्ति! चोवीस तास शिवाजी—रामदासांचें स्मरण करून व चोवीस तास इंग्रज सरकारशीं राजनिष्ठ राहून, चोवीस तास सत्य व चोवीस तास कायदा पुढ्यांत ठेवून, चोवीस तास राष्ट्रीय कर्तव्यें व चोवीस तास सनदशीर कर्तव्यें, ह्यांचें पालन करून आम्हीं महाराष्ट्रीय सत्यत्वाच्या श्रीमंतींत झुलत राहणार. जर आम्हां महाराष्ट्रीयांना कोणी असें म्हणालें कीं, 'जरा आमचेकडे लक्ष देऊन, येथें आठच मेंबर ठेवावे कीं नववा मेंबर आणखी घ्यावा एवढें सांगा', तर आम्हीं त्यास वन्दन करून एवढें सांगू कीं, "भाई! ह्या महाराष्ट्राच्या इतिहासांसिंधूत आम्हीं यावेळीं डोकें खुपसून बसलों आहोंत. ज्या वेळीं त्यांत आम्हांला कुसुमबाई सुद्धां दिसेनाशी होईल, त्यावेळीं मी तुला मेंबरांची फोड करून देईन, तोंपर्यंत मी स्वतःशीं संतुष्ट आहें कीं, मी 'महाराष्ट्रीय' आहें!"

---

## गरीबांना विसरले!

—इंग्रजसरकारचें हिन्दुस्थानावर राज्य होऊन शंभर दीडशें वर्षें झालीं. इतक्या अवधींत सिव्हिल सर्व्हण्टांकरितां कमिशनें बसलीं, हुण्डणावळीचे नियम झाले, राजेशाही दरबार भरले, पाहुण्याकरितां दारू उडाली, एवढेंच काय, पण व्हाइसरायांना पगार पुरत नाहीं म्हणून त्यांचा पगार वाढवि-ण्यांत आला पण इतक्या अवधींत गरीब मजुरांची आठवण मात्र कधींच कुणाला झाली नाहीं. [सं. ११ फे. १९२३]

# विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक.

Breathes there the man with soul so dead,
Who never to himself hath said,
This is my Country ?

**प्रथम पेरी चिपळुणकर । देशभक्तीचे विचार ॥**
**मागें तूं मित्र शूर । पाळिसी व्रता ॥**
**धन्य थोर मित्रता । स्तुत्य हीच मित्रता ॥**

आज आगरकर–डे ( आगरकरांचा स्मृतिदिन ) असल्यामुळें आगरकरांच्या चरित्राकडे लोकांचें विशेष लक्ष पोंचलेलें असून आगरकर हा पुरुष होता तरी कसा, ह्यासंबंधानें जो तो जिज्ञासेनें विचार करीत आहे. प्रथमतः आम्हांस हें सांगितलें पाहिजे कीं, गेलीं वीसएकवीस वर्षें महाराष्ट्रानें आगरकरांसंबंधानें जी विस्मृति दाखविली, त्या विस्मृतीच्या शिक्षेस आगरकर कधींहि पात्र नसून, आगरकरांविषयीं महाराष्ट्रांतील पुढाऱ्यांनीं ह्याचेपूर्वीं जागरूकता दाखवावयास पाहिजे होती. ही जागरूकता दाखवावयाचें काम सर्व महाराष्ट्राचें तर होतेंच, पण त्यांतले त्यांत आगरकरांचा ज्यांच्याशीं विशेष संबंध आला व आगरकरांच्या गुणांचें ज्यांनीं विशेष कौतुक केलें, त्यांचें तर ह्यासंबंधांत विशेष कर्तव्य होतें. आगरकरांच्या नंतर सुमारें पांच वर्षें कै. माधव गोविंद रानडे हे ह्यात होते. ना. गोखले आगरकरांच्या नंतर वीस वर्षांनीं वारले. ना. प्रि. परांजपे आजच्या समारंभाचे अध्यक्षच आहेत त्यांवर आणि प्रो. वासुदेवराव पटवर्धन, रा. रा. सीताराम गणेश देवधर, वगैरे सुधारणा–सेनापतींवर एकाप्रकारें गोपाळ गणेश आगरकर यांच्याविषयीं कृतज्ञतेचें ओझें होतें. परंतु त्यांपैकीं कोणीहि आजपर्यंत आगरकरांचा जन्मदिवस विशेषरीतीनें साजरा केल्याचें दिसत नाहीं. त्यांपैकीं रानड्यांची गोष्ट सोडून द्या, परंतु कै. गोखले हे आगरकरांना गुरु समजत होते व हें त्यांचें गुरुत्व वासुदेवराव पटवर्धनांना माहित होतें, परंतु आगरकरांची स्मृति असल्याचें गोखले अथवा पटवर्धन ह्यांनीं सार्वजनिकरीत्या

कधींहि विशेष सोपस्कारानें दाखविलें नाहीं. ना. प्रि. परांजपे हे आज अध्यक्षाची खुर्ची सुशोभित करणार आहेत, व यंदां अहमदाबाद येथील सामाजिक सुधारणेचें "व्यासपीठ" हि तेच अलंकृत करणार! परंतु ह्यापूर्वी आगरकर-डे साजरा करण्याची त्यांनींहि कधीं विशेष खटपट केलेली नाहीं. रानडे, गोखले, परांजपे, पटवर्धन ह्या महाशयमालिकेच्या विशेष स्मरणांतून सार्वजनिक रीत्या अस्तित्वांत नसलेल्या गोपाळराव आगरकरांचें चीज करण्याची पाळी, सार्वजनिक कामांत नवीनच पडलेल्या तरण्याताठ्या व अल्प-"मिस्रू"-धर कोंवळ्या सुशिक्षितांकडे यावी, हें आम्हांस मुळींच अभिनंदनीय वाटत नाहीं. आगरकरांच्यासंबंधीं करावयाच्या राहिलेल्या कर्तव्यांत, रानडे, गोखले, परांजपे वगैरे मंडळी अजिबात चुकली असें आम्हांस वाटतें. आणि जरी ही चूक आज कोंवळे जवान भरून काढीत आहेत, तथापि त्यासंबंधींचा विषाद कायम राहतोच.

आगरकरदिनोत्सवाचा जो स्पेशल अंक मासिक मनोरंजननें काढलेला आहे, त्यांत त्या सत्पुरुषाचें चरित्र रा. रा. आळतेकर, महाजनि, वर्दे, भाटे, देवधर इत्यादि कसलेल्या लेखकांनीं गाइलेलें आहे. ह्या सर्व कसलेल्या लेखकांत '**विनमुरलेलें लोणचें**' म्हणजे रा. रा. आळतेकरांचाच लेख दिसतो. रा. रा. आळतेकर हे उत्साही आहेत, तरतरीत आहेत, बाणेदार आहेत; परंतु ज्याप्रमाणें सोडावॉटरमधील फसफसणारा फेंस ग्लासापेक्षां जमनीवरच जास्त पडतो, त्याप्रमाणें रा. रा. आळतेकरांचे उचंबळणारे विचार मुद्यांपेक्षां भलत्याच भावनांवर जास्त वाहवलेले आहेत. यांत रा. रा. आळतेकरांचा विशेष दोष आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आम्हांस एवढेंच वाटतें कीं, हें लोणचें अजून मुरलेलें नाहीं, "डिसिप्लिन" च्या बरणींत हें अजून पुष्कळ दिवस राहिलें पाहिजे. आजच्या आगरकर-डे मध्यें विशेष पुढाकार रा. रा. आळतेकर ह्यानींच घेतलेला आहे. किंबहुना आमची माहिती खरी असेल तर रा. रा. आळतेकर हे ह्या "आयडिया" चे जनक, संवर्धक व परिपोषक आहेत. आम्हीं आळतेकरांच्या विचारांचें लोणचें अजून मुरलेलें नाहीं असें म्हणतों, तें एवढ्याचकरितां कीं, आगरकर-डे मध्यें रा. रा. आळतेकर ह्यांनीं इतका पुढाकार घेतलेला असल्यामुळें मासिक मनोरंजनाच्या

अंकांत रा. रा. आळतेकर ह्यांचा लेख भीष्माचार्य " महाजनि " ह्यांच्याहि अगोदर जो नाचला तो तसा नाचला नसता तर तें आमच्या दृष्टीनें जास्ती विनयाचें व नेत्रमनोहर झालें असतें. यजमानानें भीष्म-द्रोणांना जेवावयास बोलावून आपलाच पाट पहिला मांडणें योग्य दिसत नाहीं. आतां हा दोष आळतेकरांचाच असेल असें आम्हीं म्हणत नाहीं. ही मासिक मनोरंजनकारांचीहि चूक असेल; किंबहुना दोघांनाहि ही चूक वाटत नसेल ! परंतु एकंदरींत आम्हांस जें वाटतें तें हेंच कीं अजून लोणचें मुरलेलें नाहीं.

मासिक मनोरंजनच्या " स्पेशल " अंकांत निरनिराळ्या लेखकांनीं निरनिराळ्या तऱ्हेनें आगरकरांचें चरित्र गाईलेलें असल्याचें आम्हीं वर सांगितलेंच आहे. परंतु हीं सर्व चरित्रें वाचूनहि आगरकरांच्या चरित्राचें मार्मिक रीतीनें कोणी अवलोकन केलें असेल असें दिसत नाहीं. मृत पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याची एक चमत्कारिक पद्धति मराठींत पडून गेलेली आहे. मेलेला मनुष्य जर अगदींच " ढ " असेल तर अमुक अमुक हे शांत आणि मनमिळाऊ होते असा शेरा त्यांचेवर आलाच ! ते धनिक असले तर त्यांनीं विशेष कांहींहि केलेलें नसो, पण अमुक अमुक हे " सार्वजनिक कामांत बरेंच लक्ष घालीत असत " हा शेरा त्यांना भूषविणारच. ते सरकारीं नोकरींत वारले तर " सरकारी नोकरींत राहूनहि सार्वजनिक कार्याविषयीं कळकळ बाळगणाऱ्यांपैकीं हे प्रमुख होते " अशी त्यांची स्तुति व्हावयाचीच. ते सरकारी पदव्यांनीं मंडित अथवा नामदार असले तर " नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता " हा संस्कृत श्लोक आपल्या सर्व भारुडासह त्यांच्याकडे आलाच ! एखाद्या चरित्राचें कोणी मार्मिकपणें निरीक्षण करील व त्यांतून खरें महत्त्व हुडकून काढण्याची खटपट करील तर शपथ ! ज्याप्रमाणें वकिलीचे, हुकुमनाम्याचे, दरखास्तीचे वगैरे " नमुने " ठरलेले असतात, त्याप्रमाणें " मृत्युलेखां "चेहि नमुने कोणी छापून ठेवील तर वर्तमानपत्रांच्या धंद्यांत वर्ष–दीडवर्षच पडलेल्या, कोंवळ्या, बिनअनुभवी तरुणांना त्यांचा उपयोग झाल्यावांचून राहाणार नाहीं. मरणाऱ्या मनुष्यालाहि नमुने पाहिल्याबरोबर समजून जाईल कीं

आपण ‘ शांत आणि मनमिळाऊ’–पैकींच आहोंत, ‘ दुर्लभ कार्यकर्त्या ’ पैकीं आहोंत, कीं ‘ सार्वजनिक कामांत लक्ष घालणाऱ्यां ’ पैकीं आहोंत.

इतर मनुष्यांचीं चरित्रें लिहिण्याची पद्धति ज्याप्रमाणें ठरून गेलेली आहे, त्याचप्रमाणें एखादा सुधारणाप्रवर्तक वारला तर त्याचेंहि चरित्र-लेखन ठरून गेलेलें आहे. ते सत्याचे फार अभिमानी होते, लोकनिंदेला त्यांनीं कधींहि भीक घातली नाहीं, ते लोकछंदानुवर्ती नव्हते, लोकांनीं त्यांचा छळ केला तरीहि ते त्याची पर्वा करीत नसत, ते आपल्या सदसद्विवेकबुद्धीचे गुलाम होते, सवंग लोकप्रियता संपादन करण्याचा त्यांनीं कधींहि प्रयत्न केला नाहीं, इत्यादि इत्यादि चार नाटकी वाक्यें लिहिलीं कीं त्या महात्म्याचें चरित्र आटोपलें. आपल्यांतील रानड्यांचें चरित्र घ्या, गोखल्यांचें चरित्र ध्या, राजारामशास्त्री भागवतांचें चरित्र ध्या, भांडारकरांचें चरित्र घ्या, अथवा वाटेल त्याचें चरित्र घ्या, एवढीं चार पांच वाक्यें निरनिराळ्या ठेक्यांवर व निरनिराळ्या सुरांत म्हटलीं कीं, चरित्रांत दुसरें कांहीं पहावयासच नको. “सत्या”चे बिचाऱ्याचे इतके हाल चाललेले आहेत कीं त्याला इकडे तिकडे जाण्याची चोरीच आहे. प्रेस ॲक्टच्या लगामानें वर्तमानपत्रें गुदमरून गेलीं असें म्हणतात, पण त्यापेक्षां सुद्धां अलीकडील मराठी चरित्रलेखनानें ‘सत्य’ अगदीं गुदमरून गेलेलें आहे. ‘सत्या’नें अलीकडे इकडे तिकडे पाहण्याची अगदीं सोय नाहीं. ‘सत्य’ जर म्हणेल कीं मी डॉ. मुंजांचे चरित्रांत जाईन, धुंडिराज टेंगडींच्या चरित्रांत घुसेन, आळेकरांन्या चरित्रांत प्रवेश करीन, राजवाड्यांच्या चरित्राकडे पाहीन, लवाट्यांच्या चरित्रांत दडेन, शंकरराव देवांजवळ आसरा मागेन, अथवा निदानपक्षीं गायकवाडवाडा मोठा आहे तेथें तरी कांहीं आश्रय मिळतो कीं काय तें पाहीन, तर सत्याच्या ह्या गमज्या कांहीएक चालावयाच्या नाहींत. सत्यानें निमूटपणें शंकरराव देवांचें चरित्र सोडून डॉ. देवांच्या चरित्रांत घुसलें पाहिजे, लवाट्यांना सोडून त्यानें कर्व्यांच्या चरित्रांत खोली मागून घेतली पाहिजे, मुंजे–अळेकरांना सोडून सत्यानें निमूटपणें घनतोडीवर नटेशरावांच्या बंगल्याकडे निघालें पाहिजे, आणि गायकवाड वाडा ! अब्रम्हण्यं ! अब्रम्हण्यं ! सवंग लोकप्रियतेचा वाडा तो ? सत्यानें तिकडे ढुंकून सुद्धां पाहतां उपयोगी नाहीं. सत्याला आपल्या अब्रूची

चाड असेल तर त्यानें बिनतक्रार आगरकरांच्या चरित्राची वाट धरावी, नाहींतर खुशाल आक्रोश करीत रहावें. मराठी चरित्रकार कांहीं त्याला भीक घालणार नाहींत.

मासिक मनोरंजनमधील सर्व चरित्रें ह्याच मासल्याचीं आहेत. सत्य, सदसद्विवेकबुद्धि, ह्यांच्याशिवाय ह्या चरित्रांमध्यें दुसरें कांहीं एक नाहीं. इतक्या पांच सहा लोकांनीं आगरकरांचीं चरित्रें लिहिलेलीं आहेत, पण त्या सर्वांत आलटून पालटून एकच मजकूर आहे. निरनिराळ्या नाटक कंपन्यांनीं हरिभाऊ आपट्यांची ' संतसखूबाई ' केली तरी ज्याप्रमाणें म्हाळसाबाई सखूचे गालगुच्चे घेत असलेली आढळावयाची, त्याप्रमाणें प्रत्येक चरित्रांत, प्रत्येक लेखणी सत्य, सदसद्विवेकबुद्धि ह्यांचे गालगुच्चेच घेत असलेली दिसून येईल. आज संध्याकाळीं वुइल्सन कॉलेजमध्यें जीं वक्त्यांचीं व उपवक्त्यांचीं भाषणें होतील तीं सुद्धां सर्व ह्याच मासल्याचीं होण्याचा संभव आहे. " क " उठेल आणि म्हणेल कीं सत्याशिवाय आगरकरांनीं कशाचीहि चाड केली नाही. " ग " पुन्हां तेंच सांगेल. " घ " म्हणेल कीं सत्याशिवाय कशाचीहि चाड आगरकरांनीं केली नाहीं. मिळून काय ? विनोदकारांनीं आपल्या " विनोद " नाटकांत विनोदी तऱ्हेनें म्हटल्याप्रमाणें " अगबाई शेला ! " व " अगबाई शेला ! ! " एका मुलाला ताकाशीं भात खावयाचा कंटाळा आल्यामुळें त्यानें आपल्या आईजवळ दुसरें कांहीं मागितलें. आईनें सांगितलें कीं, "ताकाशीं भात नको असेल तर भाताशीं ताक खात जा."

आगरकरांच्या आयुष्याचा विचार केला म्हणजे त्यांचे सहाध्यायी टिळक आणि त्यांचे गुरु विष्णुशास्त्री चिपळुणकर ह्यांच्या चरित्राकडे सहज लक्ष जातें. अलीकडील लेखक दाखवितात त्याप्रमाणें गोपाळ गणेश आगरकर ह्यांचें चरित्र स्वतंत्र व तुटकें नसून महाराष्ट्राच्या इतिहासाचे शृंखलेंतील तो एक भाग आहे. ही सांखळी आगरकरांच्या चरित्रांत इतक्या स्पष्ट रीतीनें निबद्ध आहे कीं ती लक्षांत न घेतां आगरकरांच्या चरित्राचा विचार करणें म्हणजे मेजवानीला बसलें असतां आजूबाजूच्या लोकांकडे लक्ष न देतां खीर ओरपूं लागण्यासारखें आहे. आगरकरांच्या चरित्राचा हिरा विष्णुशास्त्र्यांच्या चरित्राचे सुवर्णांत इतक्या डौलदार रीतीनें बसविलेला आहे

कीं त्याच्या शोभेचें महत्त्व लक्षांत यावयास विष्णुशास्त्री चिपळुणकरांच्या चरित्राचेंहि कार्य लक्षांत घ्यावयास पाहिजे. विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणजे महाराष्ट्राची मूर्तिमंत स्फूर्ति होय. महाराष्ट्राची सेवा इतर पुरुषांनीं इतर रीतीनें केली असेल, परंतु महाराष्ट्रास जर कोणी चालना दिली असेल तर ती विष्णुशास्त्री चिपळूणकरांनींच होय. विष्णुशास्त्री आणि महाराष्ट्रांतील इतर नामांकित पुरुष ह्यांतील अंतर हेंच आहे कीं, इतर पुरुष हे महाराष्ट्राचे अलंकार होते व विष्णुशास्त्री चिपळूणकर हे महाराष्ट्राची प्रेरणा होते. विष्णुशास्त्र्यांचेपूर्वी केरोपंत छत्र्यांसारखे विद्वान्, महादेव गोविंद रानड्यांसारखे ज्ञाते, कृष्णशास्त्री चिपळूणकरांसारखे पंडित, विष्णुशास्त्री पंडितांसारखे सुधारक, वामन आबाजी मोडकांसारखे प्रगतिकर्ते आणि महादेव मोरेश्वर कुंटयांसारखे वक्ते पुष्कळ उत्पन्न झाले, परंतु असले पुरुष हे राष्ट्रास शोभा आणतात, राष्ट्रास जिवंत ठेवीत नाहींत. ज्याप्रमाणें कर्णफुलें, बिंदी, बिजवरा, केतक, छंद हे दागिने म्हणजे सुंदर स्त्री नव्हे, तर तिच्या कनकोपम शरीरांतून बिजलीप्रमाणें वावरून उच्छ्वासपरिमलाच्या योगानें भासमान होणारा पवन, हाच तिचा जीवनसर्वस्व होय, त्याप्रमाणें विद्वान, गणिती, शास्त्रज्ञ, कवि हे राष्ट्राचे प्राण नसून त्यास स्फूर्तिदेणारा पुरुष हाच त्याचा खरा प्राण होय. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे ह्याच दृष्टीनें महाराष्ट्राचे प्राण होते. ज्याप्रमाणें शरीरांतून प्राणपवन स्फुरूं लागला म्हणजे दृष्टीस चमक येते, ओंठावर लाली येते, दंतपंक्तींत स्फटिकपणा येतो, केशकलापांत भृंगता व करचरणांत विभ्रम व गति येते, त्याप्रमाणें महाराष्ट्रांत विष्णुशास्त्री चमकूं लागल्याबरोबर महाराष्ट्राच्या कोणत्या अंगांत चेतना आली नाहीं ? विष्णुशास्त्री चिपळूणकर महाराष्ट्राच्या सार्वजनिक सेवेंत पडल्याबरोबर महाराष्ट्र–भाषा सुरस झाली, वाङ्मयांत तेज आलें, निःस्वार्थतेला किंमत आली, स्वावलंबन संचरलें, शिक्षण स्वयंप्रेरित झालें, इतिहास नामांकितपणास चढला, काव्य आनंदप्रद झालें, स्वाभिमान शिगेस चढला व स्वदेशभक्ति उल्लसित झाली. विष्णुशास्त्री प्रकाशमान झाल्यावरोबर काय काय उत्कर्ष पावलें नाहीं ? पण ह्याचें कारण हें कीं, विष्णुशास्त्री हे महाराष्ट्राचें चैतन्य होते, विष्णुशास्त्री हेच महाराष्ट्राचें जीवन व तपन होते.

विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांची योग्यता महाराष्ट्रांत अपूर्व आहे. शिवाजीमहाराज ह्यांच्यापासून जर स्वतंत्र महाराष्ट्राच्या इतिहासास प्रारंभ झाला असेल तर पारतंत्र्यांतील महाराष्ट्राच्या इतिहासास विष्णुशास्त्र्यांपासूनच आरंभ झाला ह्यांत संशय नाहीं. विष्णुशास्त्र्यांचेपूर्वी महाराष्ट्रास इतिहास नव्हता. तर डोंगरावरील पाणी ज्याप्रमाणें जसें वळण मिळेल त्याप्रमाणें वाहत जातें, त्याप्रमाणें जसा येईल तसा दिवस विष्णुशास्त्र्यांपूर्वी महाराष्ट्र घालवीत असे. ज्याप्रमाणें एखादें मांजर धप उंचावरून पडलें म्हणजे कांहीं वेळ चकित होऊन, इकडे तिकडे पहात पडल्या जागेवरच स्तब्ध असतें, त्याप्रमाणें आपल्या अत्युच्च वैभवगिरीवरून ढांसळल्यापासून महाराष्ट्र कांहीं वेळ इतकें चकित व स्तब्ध होतें कीं, कोठें कसें चलनवलन करावें हेंच त्यास समजेना. महाराष्ट्राच्या ह्याच चकितपणाच्या काळांत गोपाळराव देशमुख, कृष्णशास्त्री चिपळूणकर, महादेव गोविंद रानडे, महादेव मोरेश्वर कुंटे वगैरे लोक उत्पन्न झाले. ह्या वेळीं महाराष्ट्रांत सर्व कांहीं होतें, पण महाराष्ट्र भानावर नव्हता. हा महाराष्ट्राचा बेभानपणा घालविण्याकरितां त्यांस प्रेरणेचे धक्के, उपदेशाचे चाबूक, टीकाशास्त्राचे तडाखे देण्यास, जो जोमदार, उत्साही, हौशी, तेजस्वी पुरुष झाला, तेच विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होत. त्यांनीं महाराष्ट्रास चकचकीत सांगितलें कीं, ‘ महाराष्ट्रा ! ऊठ, स्वातंत्र्य गेलें म्हणून रडत काय बसलास ? चालायला लाग. जो चालतो तो मुक्काम गांठतो. ’

महादेव गोविंद रानडे, महादेव मोरेश्वर कुंटे, विष्णुशास्त्री पंडित ह्यांच्या वेळीं महाराष्ट्रांत सार्वजनिक बाबतींत प्रयत्न झाले नाहींत असें नाहीं. परंतु विष्णुशास्त्र्यांच्या प्रयत्नांचें मुख्य स्वरूप हें कीं ह्या वेळेपासून महाराष्ट्रांत हेतुपूर्वक प्रयत्न ( Conscious efforts ) व्हावयास लागले. आपण राष्ट्र आहों, आपल्याला जगावयाचा अधिकार आहे, आपण जगलेंच पाहिजे, अशा जागत्यासवरत्या जागरूक कल्पनेनें विष्णुशास्त्र्यांच्या वेळेपासून प्रयत्न व्हावयास लागल्यामुळेंच विष्णुशास्त्री चिपळूणकर हे आधुनिक इतिहासाचे प्रवर्तक, प्रवृत्तीचे जनक, स्फूर्तीचे निर्झर, व स्वदेशाभिमानाचे सागर गणले गेलेले आहेत. विष्णुशास्त्र्यांनीं

सर्व प्रयत्नांना रुचि आणली, त्यांत व्यापक दृष्टि उत्पन्न केली, त्यांना ध्येय दाखविलें व त्यांत स्वदेशभक्तीचें झळझळीत जीवन ओतलें. शास्त्रीबोवांच्या पाठोपाठ त्यांचा जाज्वल्य अभिमान बाळगणारे व त्यांच्या तालमींत तयार झालेले त्यांचे दोन शिष्य उभेच होते. तेच बाळ गंगाधर टिळक व गोपाळ गणेश आगरकर हे होत. शास्त्रीबोवांनी देशकार्य पुरें केलें तोंच तें ह्या दोघां शिष्यांनीं उचललें. गुरुशिष्यांत परंपरेचा जो जिवंत संबंध लागतो तो विष्णुशास्त्री चिपळूणकर व टिळक--आगरकर ह्यांच्याइतका कोठेंहि आढळून येणार नाहीं.

विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या उपदेशाचें सार हेंच कीं इतर लोकांना ज्याप्रमाणें घरें आहेत, त्याप्रमाणें महाराष्ट्र हेंच आमचें घर आहे व ह्याच घरावर आम्ही निःस्सीम प्रेम केलें पाहिजे. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पूर्वी स्वदेशभक्तीचा पाया इतक्या शून्य अंशापर्यंत गेलेला होता कीं, कांहीं कांहीं लोकांना इंग्रजी ज्ञान ही आपली संस्कृति व इंग्लंड हें आपलें "होम" असें वाटावयास लागलें होतें. अद्यापहि कांहीं कांहीं पार्शी लोक इंग्रजी भाषेलाच आपली मातृभाषा समजण्याचा प्रयत्न करीतात. विष्णुशास्त्र्यांच्या कडक उपदेशानें लोकांना समजूं लागलें कीं, आपल्या राज्यकर्त्यांच्या ठिकाणीं जरी आपली राजनिष्ठा असली पाहिजे, तरी ह्या राजनिष्ठेचा उत्तम विकास म्हणजे इंग्रजी राज्यकर्त्यांच्या अंमलाखालीं आपल्या देशाची शक्यतम उन्नति करून घेणें हा होय. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं महाराष्ट्र हेंच आमचें 'घर' हें तत्व लोकसमाजाच्या मनावर पूर्णपणें बिंबविल्यानन्तर जे लोक ह्या घराच्या व्यवस्थेस लागले त्यांतच टिळक आणि आगरकर हे प्रमुख होत. घराची व्यवस्था ठेवावयाची म्हणजे ती दोन तऱ्हेनें ठेवतां येते. एकतर घराचे आसपास कोण शेजारी आहेत, घरावर कोणत्या राजाचा कर आहे, घरावर किती बोजे आहेत, घरास कोठून भय आहे, घर संपत्तिमान व्हावयास काय केलें पाहिजे आणि घराचा संसार कसा चालवावयाचा हें पाहणें. घराची दुसरी व्यवस्था म्हणजे, घराची साफसुफी करणें, तेथलें सामानसुमान स्वच्छ ठेवणें, तेथील कपाटांना व्हार्निश देणें, घरांतील कपबशा नीट मांडणें, घराला सफेती देणें व घरांतील भांडींकुंडीं उजळ ठेवणें ही होय. घर चांगल्या अवस्थेंत ठेवावयास, घराची दोन्ही तऱ्हेनें व्यवस्था

ठेवली पाहिजे. किंबहुना घर एक दिवस सारवावयाचें राहिलें तरी हरकत नाहीं, परंतु घरखर्चाची नीट तजवीज करणें, शेजाऱ्या–पाजाऱ्यांची ओळख करून घेणें, राजाच्या कानापर्यंत आपलीं गाऱ्हाणीं घालणें व घर ज्या बाजूनें निर्भय होईल तशी व्यवस्था करणें हें जास्त महत्त्वाचें आहे. सार्वजनिक चर्चेच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे सामाजिक व राजकीय प्रयत्न हे दोन्ही राष्ट्रोन्नतीला अवश्य असून एक वेळ एखाद्या विधवेचें लग्न व्हावयाचें राहिलें तरी हरकत नाहीं, परंतु राष्ट्रोन्नतीच्या ज्या परकीय बाबी आहेत त्यांचा प्रवाह राष्ट्रोन्नतीस अनुकूल असाच व्हावयास पाहिजे. राजकीय सुधारणा आधीं कीं सामाजिक सुधारणा आधीं, ह्या विषयींचा जें लोक वाद घालतात त्यांनीं हें मुख्यतः ध्यानांत ठेवलें पाहिजे. वस्तुतः पाहतां ह्या दोन सुधारणांत आधीं आणि मागाहून असें कांहीं नाहींच, कारण संसारांत गृहप्रपंचाकरीतां तजवीज करणें हें जितकें अगत्याचें आहे तितकेंच घरीं आल्यावर तेथील टापटीपीनें, स्वच्छतेनें व घरांतील मंडळीच्या एकोप्यानें आनंदित होणें हेंहि अगत्याचें आहे. परंतु प्रसंगच आला तर एक वेळ गृहसौख्याकडे कानाडोळा होवो, परंतु घर कायम राहो अशीच प्रत्येक मनुष्याची इच्छा असली पाहिजे. महाराष्ट्र हें आपलें घर आहे अशी दृढ जाणीव विष्णुशास्त्र्यांनीं उत्पन्न केल्यानंतर त्या जाणीवेस दृश्य स्वरूप देण्याकरितां राजकीय दृष्टीनें टिळक व सामाजिक दृष्टीनें आगरकर हे उभे राहिले. परंतु राष्ट्रसेवा करणें हाच दोघांचा उद्देश होता, व दोघेहि विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें दिव्य तत्त्व अमलांत आणण्यासाठीं झटत होते. टिळक हे दिवाणखान्यांत होते तर आगरकर हे बगीच्यांत होते; टिळक हे दरबारांत होते, तर आगरकर हे देवघरांत होते; टिळक उत्पन्नाची चिंता वहात होते, तर आगरकर मितव्ययानें कसें वागावें हें पहात होते; टिळक खलिते लिहीत होते, तर आगरकर परटीचे कपडे मांडीत होते; टिळक जगावें कसें हें पहात होते, तर आगरकर जेवावें कसें हें शिकवीत होते; टिळक शेजाऱ्यापाजाऱ्यांची घरांतील माहिती करून घेत होते, तर आगरकर बायकांचें स्वास्थ्य पहात होते; टिळक बाहेरचीं दुःखें निवारीत होते, तर आगरकर घरचीं गाऱ्हाणीं ऐकत होते; टिळक मुत्सद्यांना खेळवीत होते, तर आगरकर मुलांना खेळवीत होते; दोघांचें कार्य एकच, गुरु एकच, देव

एकच. एकानें देवाकरितां बाजारांतून अलंकार आणले आणि दुसऱ्यानें घरांतल्या घरांत उपकरणींच खळबळलीं, म्हणून पूजा एकच देवाची! टिळक–आगरकर एकमेकांशीं भांडले असतील, त्यांचा कधीं रुसवाहि झाला असेल, पण असा रुसवा कोणत्या घरीं होत नाहीं ? परंतु महाराष्ट्रभूमि हें माझें घर, हीच दोघांची भावना, त्याच देवतेच्यापायीं दोघांचीं लोटांगणें! विष्णुशास्त्र्यांनीं त्यांना तसेंच शिकविलें होतें. विष्णुशास्त्र्यांनीं असा उपदेश केला होता कीं प्रयत्न राजकीय असो, सामाजिक असो, सांपत्तिक असो अथवा भावनात्मक असो, त्याचा विनियोग राष्ट्रमातेच्याच चरणीं झाला पाहिजे.

---

## राजसंन्यासाची गोड कल्पना !

—हिन्दुस्थानांत संन्यासाची गोड कल्पना भगवद्गीतेनें आणली व ती लोकप्रिय केली. भरल्या घरांत वावरायचें, पण तें सर्व परमेश्वरार्पण समजायचें, प्रत्येक गोष्टीचा रसास्वाद घ्यायचा पण उपभोग घ्यायचा नाहीं, ही मधुर कल्पना हिन्दुस्थानला प्रथम भगवद्गीतेनें शिकविली. पुढें गौतमबुद्धानें संन्यासवृत्तीचा जास्त प्रचार केला व त्यानंतर शंकराचार्यांसारखे संसारसंन्यासी, रामदासांसारखे ज्ञानसंन्यासी निर्माण झाले.

श्रीशिवरायांच्या राजसंन्यावरूनच गडकऱ्यांना राजसंन्यास हें नाटक सुचलेलें आहे. राज्य मिळवायचें पण तें देशबान्धवांसाठीं मिळवायचें, राजश्री संपादन करायची, पण ती देशबान्धवांसाठीं करायची, राज्यलक्ष्मीचा स्वीकार करावयाचा, पण तो देशबान्धवांचीं दुःखें नाहींशीं करण्याकरितां करावयाचा, हें एक अलौकिक उदाहरण श्रीशिवरायांनीं घालून दिलें. जगाच्या इतिहासांतहि, अशीं थोर उदाहरणें थोडीं आहेत मग महाराष्ट्राच्या इतिहासांत तीं कितीतरी थोडींच असतील.

[ सं. २४ आगष्ट १९२२

# * सोन्याचा दिवस.

आज महाराष्ट्रांतील यच्चयावत् मनुष्यास धन्योऽहम्, धन्योऽहम, असें कां वाटत आहे? आज जिकडे पहावें तिकडे हास्यमुखें व प्रसन्न अंत:करणें कां दृष्टीस पडत आहेत? आज प्रत्येकाच्या अंत:करणांत, आनंदाच्या ऊर्मी प्रचंड वेगानें कां उसळत आहेत? कृतज्ञतेचा आनंद आज प्रत्येकास कां वाटत आहे? संपूर्ण महाराष्ट्राची आज एकूणएक शीर आणि एकूण एक नाडी कोणत्या प्रेरणेच्या संचारानें भरून गेली आहे? आज महाराष्ट्रास कोणतें शतकृत्य केल्यासारखें वाटत आहे? आज महाराष्ट्रांतील आबाल-वृद्धांच्या मनोमय भूमीवर कोणत्या हृदयस्थ देवतेचें चित्र प्रस्थापित झालेलें आहे? या सर्व प्रश्नांचें उत्तर प्रत्येकाच्या अंत:करणांत सांपडणारें आहे. महाराष्ट्रांतील व्यक्तिमात्रास आजच्या कालीं जें कांहीं हवें आहे तें आपल्या दिव्य वाणीनें सांगणाऱ्या महनीय पुरुषाच्या आयुष्यास आज साठ वर्षें पुरीं झालीं असून त्याला एकसष्ठावें वर्ष लागलें आहे. स्वदेशाकरितां आपल्या हाडांचीं काडें करून अविश्रांत परिश्रम करणाऱ्या निःस्वार्थी पुरुषाला त्या नितांत करुणामय प्रभूनें आणखी अनेक वर्षें आयुष्य देऊन त्याच्या हातून आमचें कल्याण करून घ्यावें, अशी परमेश्वराची प्रार्थना करण्याकरितां आज पुणें येथें लोकमान्य टिळकांचे स्नेही, सोबती, चहाते अनुयायी वगैरे नाना ठिकाणचे लोक जमून आनंदोत्सव करीत आहेत. त्या आनंदानें कोणाचें अंत:करण फुलून जाणार नाहीं?

टिळकांनीं महाराष्ट्रांत जो एवढा मान संपादन केला आहे, ते जे कित्ये-कांच्या भक्तीचे विषय बनले आहेत, त्यांनीं शत्रु, मित्र, लहान, थोर या सर्वांचीं अंत:करणें आकर्षण करून घेतलीं आहेत, त्या सर्वांचें कारण त्यांनीं जनतेशीं आपलें तादात्म्य करून घेतलें हें होय. आम्ही कै. आगरकरांच्या कामगिरीसंबंधानें लिहितांना साधारणपणें टिळकांच्याहि कामगिरीची स्थूल दिशा दाखविलेली आहे. इंग्रजांचें राज्य व्यवस्थितपणानें महाराष्ट्रांत प्रस्था-

---

* संदेश ता. २३ जुलै सन १९१६.

पित झाल्यानंतर त्यापासून मिळणाऱ्या सुख–शांतीच्या अनुभवांत महाराष्ट्रीय जनता निस्तब्ध होऊन गेली होती. उन्हांतून थकून आलेला मनुष्य एखाद्या सुरम्य उपवनांत शिरून एखाद्या हिरव्या गार वृक्षाच्या छायेखालीं बसला म्हणजे ज्याप्रमाणें निद्रादेवतेस वश होतो, तद्वत् महाराष्ट्रीयांची स्थिति होऊन गेलेली होती. स्वतः परिश्रम न करितां उपभोगावयास मिळणारी सौख्यदायक शांति ही खरी शांति नसून हृदयास संमोह उत्पन्न करणारी मूर्च्छना होय, या गोष्टीचें त्यांस विस्मरण पडलें. तें स्मरण महाराष्ट्रीयांस कै. चिपळूणकरांनीं करून दिलें. महाराष्ट्राची सर्वांगिक उन्नति करण्याचा जीवनसंदेश घेऊन येणारे महाराष्ट्रांतील पहिले पुरुष म्हणजे चिपळुणकर होत. आपल्या ओजस्वी लेखनशक्तीनें कधीं चिमटे घेऊन तर कधीं गुदगुल्या करून, कधीं प्राचीन वैभवाचें मनोरम वर्णन करून तर कधीं सद्यःकालीन आलस्यावर सणसणीत टीका करून, कधीं भविष्यकालच्या सुरम्य आशा दाखवून तर कधीं भावी कालाचें भेसूर चित्र उठवून, कधीं मधुर आलापांचें सुस्वर गायन करून, तर कधीं रणभेरीतुल्य कर्कश निनाद करून, कै. चिपळुणकरांनीं महाराष्ट्रीयांस निष्क्रियत्वाच्या मूर्च्छेनेंतून उठवून त्यांच्यामध्यें चैतन्याचा संचार केला. निर्जीवास सजीव करण्याचें श्रेय विष्णुशास्त्र्यांनीं संपादन केलें. औद्योगिक, सामाजिक, शिक्षणविषयक, राजकीय अशा सर्व बाबतींत हिंदुस्थानची व अर्थातच तदंतर्गत महाराष्ट्राची सुधारणा झाली पाहिजे असें विष्णुशास्त्र्यांनीं कंठरवानें प्रतिपादन केलें. चैतन्य उत्पादन करणारा हा नरशिरोमणी महाराष्ट्रास फार दिवस लाभला नाहीं हें त्याचें दुर्भाग्य; पण त्यांची प्रेरणा व त्यांचें कार्य त्यांच्या देहाबरोबर नष्ट झालें नाहीं. त्यांच्या हृदयाशीं तादात्म्य करून घेणाऱ्या ज्या दोन अद्वितीय व्यक्ति विष्णुशास्त्र्यांस त्यांच्या हयातींत मिळाल्या त्या टिळक आणि आगरकर ह्या होत. एका वृक्षाच्या बुंध्यापासून मूळचा बुंधा वर जात असतां त्याला दुसरी शाखा फुटते त्याप्रमाणें चिपळुणकरांचा मुख्य बुंधा वर वाढत जाऊन त्याला आगरकरांची शाखा फुटली. पण चिपळुणकरांच्या मनांतून या दोन शाखा एकत्र मिळून सामाजिक व राजकीय या दोन्ही प्रकारच्या सुधारणा व्हाव्या असें होतें.

पण पुढें टिळक व आगरकर यांच्यामध्यें मतभेद पडून टिळकांनीं राजकीय सुधारणेस अग्रेसरत्व दिलें आणि आगरकरांनीं सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला. या दोन्ही सुधारणा राष्ट्राच्या वाढीस अत्यंत आवश्यक असतात, व त्या दोन्ही व्हावयास पाहिजेतच. त्यांपैकीं एक श्रेष्ठ व दुसरी कनिष्ठ असा भेद मुळींच नाहीं. आधीं किंवा मागाहून एवढाच काय तो प्रश्न रहातो. कित्येकदां सामाजिक सुधारणा करणें राजकीय सुधारणेपेक्षांहि अवघड असतें व कधीं त्याच्या विपरीत स्थिति असते. हें कालमानावर व परिस्थितीवर अवलंबून असतें. ज्यावेळीं महाराष्ट्राच्या नभोवितानांत चिपळूणकररूपी रवि प्रकट झाला, त्या काळीं या दोन्ही सुधारणा करणें अगत्याचें होतें. पण आधीं लोकांस दोन्ही सांजेस जेवण मिळाल्याशिवाय त्यांना सामाजिक सुधारणेचे अलंकार घालतां यावयाचे नाहींत व घातले तरी ते भिकाऱ्याच्या अंगावरील दागिन्यांप्रमाणें शोभादायक व्हावयाचे नाहींत, अशा प्रकारच्या विचारसरणीस प्राधान्य देऊन राजकीय सुधारणेचा पुरस्कार करण्यांत आला. आगरकर व टिळक यांच्या दरम्यान मतभेद उत्पन्न झाला तेव्हां सामाजिक सुधारणा करण्याच्या कामापेक्षां राजकीय सुधारणा करण्याचे बाबतींत शतशः जास्त विघ्नें होतीं. त्यामुळें टिळकांचें कार्य आगरकरांच्या कार्यापेक्षां जास्त परिश्रमाचें, ज्यास्त सायासाचें व जास्त कठीण होतें. टिळकांच्या मार्गांत अनेक अडचणी होत्या. राज्यकर्ते व प्रजाजन या दोघांशींहि टिळकांचा संबंध होता. प्रजाजनांच्या अंतःकरणांत योग्य विचार उत्पन्न करून त्यांचें परिपोषण करावयाचें आणि ते विचार सरकारच्या कानावर घालून त्यांच्याकडून आपली अभ्युन्नति करून घ्यावयाची, असा त्यांना दोघांशीं संबंध ठेवावा लागत असे. यांपैकीं आपल्या देशबांधवांच्या अंतःकरणांत सुविचारांची जागृति करण्याचें काम त्यांनीं केलें. त्यांत त्यांना फारसा विरोध आला नाहीं. कारण सर्वांच्या अडचणी व गरजा काय आहेत याचें साग्र अवलोकन करून त्याच त्यानीं त्यांच्यापुढें मांडल्या व म्हणून त्यांच्यावर सर्वांची प्रीति बसली; पण सरकारशीं त्यांचा जो संबंध आला त्यांत संकटें उत्पन्न होऊन त्यांना अत्यंत कष्ट सोसावे लागले. याचें मुख्य कारण असें कीं टिळकांच्या बहुतेक चळवळी म्हणजे भाषणें व लेखन; हीं विशेषतः मराठी भाषेंतून झालीं व आमचें सरकार या

भाषेस पारखे असल्यामुळें साहजिक त्यांना टिळकांचें 'खरें अंतरंग' कळलें नाहीं. टिळक मराठी भाषेंत जें कांहीं प्रतिपादन करीत, त्यावर इंग्रजी भाषांतराचा एक संस्कार होऊन मग तें सरकारच्या कानावर जात असल्यामुळें, मूळाचा विपर्यास होणें संभवनीय होतें. त्यामुळें सरकारची टिळकांच्या संबंधानें अनेक दिवसपर्यंत साशंक वृत्ति होती. आम्हीं जें जें कृत्य करतों त्याचा विपरीत अर्थ करून टिळक लोकांस समजावून देत असतील असें सरकारास वाटे. सरकारची ही संशयवृत्ति टिळकांस पदोपदीं नडत असे. व त्याचेमुळें त्यांचें काम अतिशय विकट झालें होतें. आगरकरांनीं समाजसुधारणेचें काम आपल्या शिरावर घेतलें. त्यांत त्यांना कष्ट व लोकापवाद थोडे फार सहन करावे लागले, नाहीं असें नाहीं; पण टिळकांप्रमाणें ते श्रम जीवावर सर्वस्वीं गदा आणण्याच्या स्वरूपाचे नव्हते. इतक्या लोकांच्या अभ्युन्नतीची चिंता वाहून त्यांना कर्तव्यास उद्युक्त करण्याचा उपदेश करावयाचा व इकडे कायद्याची मर्यादा उल्लंघन होते की काय यावर लक्ष ठेवावयाचें, अशी चिंता टिळकांस वहावी लागे. आगरकरांवर फक्त जननिंदेचे प्रहार झाले पण टिळकांस मानसिक यातनांबरोबरच शारीरिक यातना सहन कराव्या लागल्या. पण वाट एवढी बिकट दिसत असतांहि टिळकांनीं त्याच वाटेनें जावयाचें निश्चित केलें व म्हणूनच ते लोकमतावर एवढी छाप बसविण्यास समर्थ झाले.

राष्ट्रकार्य हें सर्व देशांत व सर्व काळीं एकसारखें नसतें, तें परिस्थितीच्या मानानें अवघड किंवा सुलभ असतें. नेपोलियनच्या वेळीं जें राष्ट्रकार्य होतें तें आज फ्रान्समध्यें नाहीं; शिवाजीनें जें राष्ट्रकार्य लढविलें त्याची हुबेहुब नक्कल आज महाराष्ट्रांत होणें अशक्य आहे. एलिजाबेथच्या किंवा ॲनच्या वेळची परिस्थिती आज इंग्लंडांत नाहीं किंवा जॉर्ज वाशिंग्टनच्या तऱ्हा आज अमेरिकेंत उपयोगी पडणार नाहींत. ज्यावेळीं देशास जें हवें असतें तें उत्कृष्टपणें घडवून आणणें हें त्या देशांतील कर्तबगार मनुष्याचें कर्तव्य असतें. या दृष्टीनें पाहतां राष्ट्रकार्याचे स्थूल मानानें तीन विभाग पाडतां येतील. एखादे वेळीं राष्ट्राचें अस्तित्व कसें टिकवून धरावें हा प्रश्न राष्ट्रावर येऊन पडतो. त्या वेळची परिस्थिति विशेष जोखमीची आणि भयप्रद असते. राष्ट्राला परचक्रापासून सोडवावयाचें कर्तव्य

त्याच्या पुढाऱ्यांवर असतें. अशा प्रकारची जबाबदारी इंग्लंडचा आल्फ्रेड राजा व शिवाजीमहाराज यांच्यावर येऊन पडली होती. राष्ट्राचा मृत्यु टाळावयाचें त्यांचें काम होतें; हें काम अर्थात् अतिशय कठीण, अतिशय बुद्धिमत्तेचें, व अतिशय शौर्याचें आहे; व तो मान हजार पांचशें वर्षांनीं एखाद्यालाच मिळत असतो व म्हणून त्या मानास प्राप्त झालेल्या व्यक्ति सर्व जगास वंद्य होऊन बसतात. दुसऱ्या प्रकारचें राष्ट्रकार्य म्हणजे आहे तीच व्यवस्था टिकवून चालू ठेवावयाची हें होय. बापानें संपादन करून ठेवलेल्या द्रव्याचें रक्षण करणें हें सुद्धां जसें कठीण असतें, त्याप्रमाणें बिकट परिस्थिति प्राप्त झाली असतां त्या संकट–समुद्रांत सुरक्षितपणानें राष्ट्रनौका कशी हांकावी याचा मार्ग आखण्यासाठीं अद्वितीय बुद्धिमत्ता व कर्तबगारी अवश्य असते. ह्या प्रकारच्या पेंचांत इंग्लंडचे मुख्य प्रधान मि. अस्क्विथ हे सध्यां सांपडलेले आहेत. त्यांना नवीन राज्यव्यवस्था स्थापन करावयाची नाहीं, फक्त आहे तीच आपल्या कौशल्यानें व व्यावहारिक शहाणपणानें रक्षण करून ठेवावयाची आहे. हें काम अतिशय कठीण असलें तरी राज्य स्थापन करण्यास लागणारी बुद्धि वेगळी आणि स्थापन केलेलें राज्य टिकवून धरण्यास लागणारी वेगळी, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पण याशिवाय राष्ट्रकार्यांत तिसरा एक प्रकार असूं शकतो. आजपर्यंत चालू असलेल्या स्थितीहून भिन्न प्रकारची व्यवस्था जेव्हां अंमलांत आणावयाची असते, तेव्हांची परिस्थिति कांहीं विशेषच असते. राजकर्त्यांससुद्धां अशाच प्रकारचा नाजुक फरक घडवून आणणें कठीण असतें; मग प्रजाजनांपैकीं एखाद्या व्यक्तीस तो करावयाचा असल्यास त्यांस तें काम किती डोईजड असेल याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. नवीन राज्य स्थापावयास लागणारी, किंवा आहे ती घडी बिकट परिस्थितींत चालू ठेवावयास लागणारी बुद्धिमत्ता जरी येथें आवश्यक नसली, तरी नवीन तत्वाला राजकारणांत प्रवेश करावयाचा असतो, लोकांच्या परंपरागत चालत आलेल्या कल्पनांमध्यें फरक घडवून आणावयाचा असतो, व त्या कल्पनांस राजमान्यता मिळावयाची असते. अशा रीतीनें हें काम तिप्पट अवघड झालेलें असतें. या तिसऱ्या प्रकारच्या राजकारणाचा बोजा टिळकांवर पडलेला आहे. ज्या

कोटचवधी लोकांचें कल्याण त्यांस करावयाचें आहे, ती जर्व जनता निःशब्द आहे, तिला आपणांस काय पाहिजे हें आपल्या तोंडानें सांगतां येत नाहीं; या मूक जनतेस वाचा फोडण्याचें कार्य टिळकांनीं आपल्या शिरावर घेतलें आहे. सर्वस्वीं पंगु अशा हिंदी प्रजेस प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या उत्तुंग दुर्गावर चढविण्याचें कठीण काम टिळकांनीं आपण होऊन अंगावर घेतलें आहे. हें कार्य करतांना त्यांना विरोध झाला व त्या योगानें प्रजापक्षांतील लोकांचीं मनेंहि त्यांच्या संबंधानें चलबिचल होण्यास अवसर मिळाला. पण आपल्या आत्मप्रत्ययावर, आपल्या तत्त्वनिष्ठेच्या बळावर व केवळ प्रजाहितपरायणतेवर विसंबून टिळकांनीं संपूर्ण महाराष्ट्रजनतेचा विश्वास संपादन केला. हें कार्य करीत असतांना हितशत्रू उत्पन्न झाले नाहींत, असें नाहीं. पण त्यांच्या योगानें त्यांच्या कर्तबगारीस कमीपणा येण्याचे ऐवजीं त्यांचें महत्त्वच जास्त दृग्गोचर झालें. टिळकांनीं असें काय केलें कीं त्याच्या योगानें ते इतके लोकप्रिय झाले ? या प्रश्नाचें उत्तर आपले व्हाइसरॉय ह्यानीं स्वतःच्या सबंधानें बोलतांना नुकतेंच दिलें आहे.

लॉर्ड हार्डिंज यांजवर साऱ्या हिंदुस्थानांतून स्तुतीचा वर्षाव होऊं लागला तेव्हां त्या सर्वांस उत्तर देण्यासाठीं त्यांनीं मुम्बईहून स्वदेशास प्रयाण करतेवेळीं येथील अपॉलो बंदरावर भाषण करतांना स्वतःच्या लोकप्रियतेसंबंधानें उद्‌गार काढून तिची जी मार्मिक उपपत्ति सांगितली, तीच टिळकांच्या बाबतींत अक्षरशः लागू पडते. लॉर्ड हार्डिज म्हणाले कीं, माझ्यावर लोकांचें प्रेम बसावयाचें कारण म्हणजे मी आपल्या प्रजाजनांवर पूर्ण विश्वास टाकला हें होय. त्यांच्या आकांक्षा काय आहेत, त्यांचें संवर्धन कसें करावयाचें, त्यांना प्रोत्साहन कसें द्यावयाचें, याचें मी निरंतर चिंतन केलें व आपल्या प्रजाजनांची अहर्निश काळजी बाळगिली, म्हणून मला त्यांचें प्रेम मिळवितां आलें. लॉर्ड हार्डिज यांचे उद्‌गार टिळकांच्या बाबतींत किती तंतोतंत जुळतात ! टिळक जर इंग्लंडांत गेले—कांहीं कामानिमित्त ते विलायतेंत जाणार असल्याची दाट वंदता आहे व ती खरी ठरण्याचाही पुष्कळ संभव आहे —व तेथें त्यांना कोणी असा प्रश्न केला कीं, ‘तुमच्यावर तुमच्या देशबांधवांचा इतका विश्वास कां व तुम्हीं कोणाकोणाच्या क्रोधास एवढे पात्र झालां

असतांहि तुमचा लोकांत एवढा मान कां ?' तर टिळकांना लॉर्ड हार्डिंज प्रमाणें उत्तर देतां येईल. लॉर्ड हार्डिंज ह्यांना आपल्या प्रजेचीं मनें आकर्षण करून घेण्याची जी युक्ति साधली होती तीच टिळकांस अवगत आहे व म्हणून त्यांना आपल्या देशबांधवांच्या हृदयमंदिरांतील सिंहासनावरील अढळ स्थान प्राप्त झालेलें आहे. टिळकांच्या मनांत आपल्या लोकांविषयीं अत्यंत प्रेम आहे व त्यांच्याकरितां त्यांनीं तारुण्यापासून उतारवयापावेतों खस्त खाल्ली आहे म्हणून लोकांनीं उलट त्यांच्यावर प्रेम केलें आहे. त्यांच्या अंतःकरणांतून उद्‌भूत झालेल्या प्रेमाचा प्रवाह लोकांवर जाऊन तोच परत त्यांच्याच ठिकाणीं गेला आहे. जनतेशीं इतकी एकरूपता, प्रजासत्ताक राज्यांमधून सुद्धां क्वचितच पाहावयास मिळेल !

टिळकांची लोकप्रियता सहन न होऊन कित्येकांस त्याबद्दल हेवा वाटतो मग असा हेवा वाटणें मनष्य स्वभावास धरूनच आहे असें म्हटलें पाहिजे. मनुष्य उन्हांतून चालूं लागला म्हणजे त्याची प्रतिछाया जशी त्याच्या मागोमाग चालत असते, त्याप्रमाणें मनुष्यानें आपल्या पराक्रमानें मोठेपणा मिळवला कीं त्याला शत्रु उत्पन्न होतातच, हा सृष्टि नियम आहे व यास अनुसरून टिळकांना अहितचिंतक उत्पन्न झाले. त्यांचा टिळकांवर मोठा आक्षेप असा कीं टिळक हे लोकप्रियतेचे भोक्ते आहेत, त्यांना सवंग लोकप्रियता हवी आहे, पण हा आरोप सर्वस्वीं भ्रममूलक आहे. एकतर लोकप्रियता मिळविण्याचें काम सोपें नाहीं. लोकांचा विश्वास बसण्यासारखें कांहीं करून दाखविल्याशिवाय ते कोणावर प्रेम करीत नाहींत. लोक इतके खुळे नसतात कीं त्यांस एखाद्यानें फसविलें, तरी पुनः त्यावर ते विश्वास ठेवतील. टिळक लोककार्यांत पडल्यापासून त्यांनीं जी लोकप्रीति संपादन केली आहे, तींत त्यांच्यावरील संकटांमुळें किंवा देशावरील विपरीत स्थितीमुळें यत्किंचित् न्यून आलें नाहीं. उलट ती शुक्लेंदूच्या कलेप्रमाणें दिसेंदिवस वृद्धिंगत होत चालली होती. अशी वस्तुस्थिति असतां, त्यांची लोकप्रियता सवंग आहे असा त्यांच्यावर आरोप करणें, ह्मणजे त्यांना कमी लेखण्याचा प्रयत्न करून त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या संपूर्ण जनतेस मूर्ख ठरविण्याप्रमाणें आहे. ज्यांची जनतेसंबंधीं इतकी तुच्छतेची कल्पना आहे, कीं जे " लोकांचे " ह्मणविण्यास अपात्र

आहेत, अशा लोकांनीं टिळकांवर लोकप्रियतेच्या संबंधानें असले आरोप करणें ह्मणजे द्राक्षें आंबट ह्मणून नाकें मुरडण्याप्रमाणेंच होय. परंतु जे लोक टिळकांना, सवंग लोकप्रियतेसाठीं धडपडणारे ह्मणतात, त्यांना आपण काय म्हणतों याची तरी कल्पना असते कीं नाहीं, याची वानवाच आहे. टिळकांची लोकप्रियता किती सवंग आहे, याचा या लोकांनीं कांहींतरी विचार केलेला आहे काय ? टिळकांची लोकप्रियता खरोखरच सवंग आहे काय ? खरोखर पाहतां महाराष्ट्रांत जितके म्हणून थोर पुरुष देशोद्धारार्थ झटले, तितक्यांत टिळकांसारखे हाल कोणासहि सहन करावे लागले नाहींत. त्यांनीं स्वतःच्या हिंमतीवर आपल्या चळवळी सुरू केल्या. त्यांनीं लक्ष्मीवंतांची मनधरणी केली नाहीं. जर सार्वजनिक संस्था चालावयाच्या असतील, तर त्या आपल्या बळावर चालतील, द्रव्यवानांच्या बलानें त्या चालणार नाहींत. असल्या संस्थांचा आत्मा धनिकांच्या तिजोरींत गुरफटलेला नसून तो देशभक्तीच्या आवरणानें वेष्टिलेला असतो, अशी टिळकांची दृढ श्रद्धा होती व याच श्रद्धेच्या योगानें त्यांच्या संस्था आज एवढ्या यशस्वी झालेल्या आहेत. टिळकांनीं लोकप्रीतीवर आपलें लक्ष केव्हांहि ठेवलें नाहीं, उलट लोकप्रीति ही त्यांच्या मागोमाग धांवत गेली. टिळक आपण होऊन लोकप्रीतीच्या मागें लागले नाहींत, तिनें स्वप्रेरणेनें त्यांच्या गळ्यांत माळ घातली. 'मला पूज्य माना' ह्मटल्यानें लोक कोणास पूज्य मानीत नाहींत, तर नमस्कार करण्याच्या योग्यतेचें कृत्य करून दाखविलें ह्मणजे लोक आपोआपच त्यावर विश्वास ठेवतात. टिळकांना तीनदां तुरुंगवास आला, व त्या अवधींत त्यांनीं आपलें बौद्धिक सामर्थ्य महाराष्ट्राच्या व जगाच्याहि निदर्शनास आणलें. टिळकांच्यासंबंधानें त्यांच्या हितशत्रूंनीं, नाहीं नाहीं त्या प्रकारचा गैरसमज उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला, व त्या योगानें त्यांचा मार्ग अतिशय अवघड झाला, पण कोणत्याहि परिस्थितीनें गांगरून न जातां त्यानीं लोकसेवेचें व्रत आजपर्यंत कायम राखलें. कोणत्याहि संकटानें ते डगमगले नाहींत. त्यांना आपलें कर्तव्य करण्यास इतके कष्ट सोसावे लागले तरी त्यांची लोकप्रीति सवंग आहे असें ह्मणणारे कोणत्या तोंडानें म्हणत असतील देव

जाणे ! लोकप्रियता मिळविण्यास त्यांना जी किंमत पडली तिजपेक्षां जास्त किंमत एखाद्या तरी पुरुषाला पडल्याचें उदाहरण दाखविणें अशक्य आहे.

टिळकांची कामगिरी महाराष्ट्रांत जरी झालेली असली तरी त्यांची दृष्टि महाराष्ट्राच्या चतु:सीमेनें मर्यादित झालेली नाहीं. ते महाराष्ट्रीयांपुढें बोलतात व लिहितात तरीं सर्व हिंदी लोक त्यांच्या दृष्टीपुढे असतात. आर्य तत्त्वज्ञानांतील अद्वैत सिद्धांत त्यांच्या मनावर पूर्णपणें ठसलेला आहे, व ही तात्विक दृष्टिच त्यांच्या सर्व शक्तींचें रहस्य होय. सर्व जगास थक्क करून सोडणारे त्यांचे 'ओरायन' आणि 'गीतारहस्य' हे ग्रंथ त्यांच्या तुरुंगवासांत निर्माण झाले आहेत, यावरून त्यांच्या निर्द्वंद्व मन:स्थितीची कल्पना सहज होण्यासारखी आहे. राजकारणाचा संबंध फक्त विद्यमान व्यवहाराशीं असतो हें खरें, पण त्यांच्या पाठीशीं तत्वज्ञानाचें बल पाहिजे असतें, व टिळकांच्या अंगीं तें आहे म्हणूनच ते कालाच्या पाठीमागें पडले नाहींत. एकदां हातीं घेतलेलें काम शेवटपर्यंत पार पाडण्याची चिकाटी, कडवा निश्चय, सत्यनिष्ठा, अढळ श्रद्धा व आत्मविश्वास हे गुण त्यांच्या अंगीं ओतप्रोत भरलेले आहेत. निश्चयी स्वभावापायीं लोकांनीं त्यांस कित्येकदां हट्टी व एककल्ली म्हटलें, तरी पण त्यांनीं आपल्या अंगीकृत कार्याचा त्याग केला नाहीं, व त्यांचा हाच निश्चय आमच्या सर्वांच्या कल्याणास कारणीभूत होवो अशी आमची इच्छा आहे.

लोकमान्यांस परमेश्वरानें एकसष्टावें वर्ष दाखविलें याबद्दल कोणाचें अंत:करण भरून येणार नाहीं ? आज महाराष्ट्रांतील सर्व आबालवृद्धांची परमेश्वरास एका अंत:करणानें अशी प्रार्थना आहे कीं, टिळकांस पुरीं शंभर वर्षें आयुष्य दे ! १०० वर्षें जगणारीं माणसें असतात, पण त्यांच्यामध्यें साठीच्या पुढें त्राण उरत नाहीं. तसें टिळकांचें न होतां त्यांना देशसेवा करण्याचें बळ परमेश्वर देवो, अशी सकल महाराष्ट्रीयांची परमेश्वरास प्रार्थना आहे. त्यांच्या स्पष्टोक्तीबद्दल त्यांच्यासंबंधानें आजवर सरकारचा गैरसमज झाला पण तो यापुढें टिकणें शक्य न होवो. ज्या हक्कांचें त्यानीं प्रतिपादन केलें, ते हक्क हिंदुस्थानच्या लोकांस देण्याचा समय जवळ येत चालला आहे, याची जाणीव हिंदी

प्रजेप्रमाणें सरकारासहि आहे, व लोकमत आणि शासनपद्धति यांचा मनोहर सुसंगम झालेला लवकर दृष्टीस पडो अशी आमची इच्छा आहे. टिळकांची भाषा सरकारास अप्रिय झाली असेल, त्यांची प्रतिपादन–पद्धति त्यांस केव्हां केव्हां रुचली नसेल, त्यांचा निर्भीडपणा सरकारास पसंत पडला नसेल, पण आतांपर्यंत टिळक ज्या दिव्यांतून पार पडले त्याचे योगानें सरकारचीहि त्यांच्या निर्मळ व शुद्ध हेतूविषयीं खात्री पटो. टिळकांनीं इंग्लंडच्या सत्तेचा त्याग करावयाचें केव्हांच प्रतिपादन केलें नाहीं; उलट इंग्लंडचा संबंध कायम ठेवण्यांत कृतज्ञताबुद्धीपेक्षां हितबुद्धिच जास्त आहे, असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें आहे. यावरून त्यांच्यासंबंधानें भलत्या कल्पना करण्यांत मुळींच अर्थ नाहीं हें उघड आहे. सरकारचा खरा मित्र जर कोणी असेल तर ते टिळकच होत, असें सरकारच्या प्रत्ययास येवो, व इतउत्तर सरकारची त्यांच्यासंबंधानें खातरजमा होऊन त्यांच्यामध्यें प्रेमभाव उत्पन्न होवो अशी आम्ही ईश्वराजवळ प्रार्थना करितों. सच्चिदानंदस्वरूपी परमेश्वरा! लोकमान्यांस चिरायु कर व या भारतभूचें कल्याण करावयास त्यांच्या हातां-पायांस शेवटपर्यंत अमूप बल दे, यापेक्षां दुसरें मागणें तें कोणतें ?

---

## दिवाळीचीं कडबोळीं—

तुम्हांस कोणी विचारलें कीं 'तुमचें कर्तव्य काय ?' तर तुम्हीं बेलाशक सांगा कीं 'तुमच्या प्रमाणें आम्हींहि स्वतंत्र होणें, हें आमचें कर्तव्य आहे.'

* * *

सर्वांत लज्जास्पद गोष्ट म्हणजे परतंत्र राहाण्याची. ज्याचें राष्ट्र स्वतंत्र नाहीं, अशा लोकांना जगांत अब्रू मुळींच नाहीं. ते सर्वत्र शरमलेले! ते सर्वत्र ओशाळलेले.

* * *

तुम्हीं स्वतंत्र आहांत तर आम्हीं स्वतंत्र कां असूं नये ? हा प्रश्न आपले मनांत रात्रंदिवस घोळूं द्या. ह्या जगांत स्वतंत्र्य राहण्याचा अधिकार प्रत्येकास आहे. जो म्हणून मनुष्याचे जन्माला आला त्याला स्वतंत्र असण्याचा अधिकार आहे. तो जर स्वतंत्र नसेल तर तो परमेश्वराचा दोष नव्हे, तो त्याचा स्वतःचा दोष आहे.

कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकर ( श्रुतिबोध–सहकाऱ्यांसह )–सन १९१२.



# * डॉ. भांडारकर दीर्घायुषी होवोत !

विद्वद्वर्य डॉ. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर ह्यांच्या वयास आज ऐंशीं वर्षें पुरीं होत आहेत. सर रामकृष्णपंत हे विद्वन्मान्य आहेत, एकनिष्ठ सरस्वतिभक्त आहेत, अव्वल दर्जाचे संस्कृतज्ञ आहेत, नामांकित पुराणवस्तुसंशोधक आहेत, ह्या नात्यांनीं त्यांची केवळ महाराष्ट्रांत किंवा हिंदुस्थानांतच नव्हे तर इंग्लंड, जर्मनी वगैरे सर्व सुधारलेल्या देशांत प्रसिद्धि आहे. आणि शिवाय ते एक केवळ प्रमुखच नव्हेत तर आद्य सुधारकहि आहेत आणि ह्या सर्व नात्यांनीं त्यांनीं वाङ्मयांत व विचार-सामुग्रींतहि महत्त्वाची भर घातली आहे. त्यांचे जे अनेक गुरू व उपगुरू होते त्यापकीं प. वा. प. पू. दादाभाई हेहि एक होते; आणि ह्या असामान्य दर्जाच्या सामान्य गुणांशिवाय त्यांची कर्तव्यतत्परता, एकनिष्ठा वगैरे गुणहि नामांकित आहेत. आणि ह्या सर्व कारणांच्या समुच्चयामुळें डॉ. भांडारकर हे आज पुष्कळांच्या आदरास पात्र झाले आहेत. त्यांचा वाढदिवस प्रेमादरानें साजरा करण्यांत येत आहे. आणि त्यांस आयुरा-योग्य चिंतण्यांत येत आहे. व संदेशही आज आपला स्पेशल भांडारकर-अंक काढून त्यांच्या वाढदिवसाच्या आनंदांत सहविभागी होत आहे.

सर रामकृष्णपंत हे केवळ स्वतःच्या असामान्य गुणांनीं महापदास चढलेले आहेत. हायस्कूलचे हेडमास्तर व कॉलेजांतील मुख्य अध्यापक होण्याचा मान मिळविणारे पहिले हिंदी गृहस्थ हेच होत. आणि अध्यापक ह्या नात्यानें त्यांनीं जी कामगिरी बजावली आहे ती असाधारण आहे. परंतु त्यांच्या चरित्रक्रमांतील हा भाग कांहींसा वैयक्तिक आहे. विद्वान् साहित्यसेवक, संस्कृतज्ञ, संशोधक, ह्या नात्यानें त्यांनी बजावलेली कामगिरी फारच बहुविध व व्यापक स्वरूपाची आहे. ह्या नात्यानें त्यानीं बजाविलेल्या कामगिरींत सर्वांत महत्वाची अशी त्यांची कामगिरी म्हणजे त्यांनीं बॉंबे गॅझेटिअरसाठीं लिहिलेला दख्खनचा इतिहास हा ग्रंथ होय. हा ग्रंथ

---

* संदेश ता. ६ जुलई सन १९१७.

लहान असला तरी त्यांनी त्या योगें भावी इतिहासकारांसाठीं बहुमोल सामुग्री त्यांत ग्रथित करून ठेविली आहे. परंतु त्या ग्रंथाचें महत्व केवळ त्यांत एकत्रित केलेल्या सामुग्रीवरच नाहीं. ह्या ग्रंथाचें व डॉ. सर रामकृष्णपंत ह्यांनीं तद्वारा बजावलेल्या कामगिरीचें महत्व ह्या ग्रंथावरून निघणाऱ्या एका अतिसुन्दर महत्त्वाच्या सिद्धांतावर अवलंबून आहे. आणि सर साहेबांच्या ह्या कामगिरीचें येथें अत्यल्प दिग्दर्शन करणें अस्थानीं होणार नाहीं.

ह्या इतिहासावरून असें स्पष्ट होतें कीं, ख्रि. पू. सहाव्या शतकाच्या सुमारास आर्य लोकांस दक्षिणदेशाची माहिती झाल्यानंतर देवगिरीच्या यादव घराण्यांतील शेवटचा हरपाळ हा इ. स. १३१८ ह्या वर्षी मुसलमानांकडून मारला जाईपर्यंतचा सर्व काळ हा महाराष्ट्राचा स्वराज्यकाळ होता. आर्यांस जर त्या वेळेपासून महाराष्ट्रास स्वदेश म्हणतां आलें तर हा एकोणीसशें वर्षांचा काळ महाराष्ट्रास **स्वराज्याचा ठरतो.** ह्या विधानास जर कोणी अर्धवट ऐतिहासिक व्यक्ति अपवाद आणीत असेल तर ती 'नहपान क्षहरात' हा इ. स. प्रारंभाच्या सुमारास झालेला राजा होय. हा बहुधा 'शक' असावा. ह्या नियमाचे सिद्धांतत्व सिद्ध करणारा अपवाद सोडला तर आपलें हें महाराष्ट्र आपली स्वराज्याची पात्रता १९ शतकें तरी निरपवाद रीतीनें सिद्ध करीत आहे. असें अनुमान आपणांस डॉ. सर भांडारकर यांच्या ह्या साधनसामुग्रीवरून काढतां येतें; आणि हें अनुमान आपणांस अत्यंत अभिमानास्पद आहे, अतिशय आशासंचारक आहे आणि आपले सध्यांचे होमरूलपर्यवसायी प्रयत्नांत उत्साहसंचारक होण्यासारखें आहे. सामाजिक सुधारणेच्या बाबतींतही त्यांनीं आजपर्यन्त फार महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. आपल्या मतासाठीं कितीतरी विरोध, अडचणी व त्रास ह्यांस तोंड दिलें आहे; पुष्कळशा सुधारणा कृतींत उतरविल्या आहेत,आणि इतरांस सुधारणा सक्रिय करण्याकडे प्रवृत्त केलें आहे. हिंदुसमाजाच्या, निदान महाराष्ट्रांतील तरी सामाजिक जीवनक्रमाप्रमाणेंच धार्मिक जीवनक्रमांतहि डॉ. सर रामकृष्णपंत ह्यांच्या व्यक्तित्वाचा थोडाफार परिणाम दृग्गोचर झाल्यावांचून रहात नाहीं. इ. स. १८६९ सालीं प्रार्थना–समाजांत दाखल झाल्यानंतर इतर कांहीं मंडळीच्या सहाय्यानें त्यांनीं समाजाच्या जुन्या मतांस पुष्कळच नवीन

स्वरूप देऊन त्यांस सध्यांच्या प्रार्थनासमाजाच्या मतांचा निश्चितपणा व व्यवस्थितपणा आणून दिला आहे; व आपल्या ह्या धार्मिक व सामाजिक मतांचा प्रसार त्यांनीं सतत ४० वर्षें तरी संथपणें परंतु अव्याहतपणें चालविलेला आहे; धार्मिक मतें आणि तत्प्रीत्यर्थ प्रार्थनासमाज व इतर साधनांनीं त्यांनीं केलेले प्रयत्न आणि त्यांचा हिंदुसमाजावर झालेला परिणाम ह्यांचें स्वरूप त्यांच्या वाङ्मयात्मक कामगिरीप्रमाणें जगप्रसिद्ध किंवा सर्वराष्ट्रीय नाहीं. त्यांस तितकें व्यापक स्वरूप मिळालेलें नाहीं. आपल्या ह्या कामगिरीच्या लाभाचा फार मोठा वांटा त्यांनीं महाराष्ट्रालाच दिला आहे व त्याबद्दल महाराष्ट्र त्यांजविषयीं कृतज्ञहि आहे.

डॉ. सर रामकृष्णपंत ह्यांच्या ह्या वाङ्मयात्मक, सामाजिक व धार्मिक कामगिरीकडे पाहिलें म्हणजे त्यांच्या प्रचंड बुद्धिमत्तेविषयीं आश्चर्य वाटतें, कर्तव्यतत्परतेविषयीं आदर वाटूं लागतो. त्यांचा स्पष्टवक्तेपणा, अंगीकृत कार्यासाठीं त्रास व अडचणी सहन करण्याची चिकाटी, कर्मैकनिष्ठा हीं पाहिलीं म्हणजे त्यांच्याविषयीं प्रेमादर वाटूं लागतो. आपला "वैष्णविझम् व शैविझम्" हा ग्रंथ तर त्यांनीं आपल्या वयाच्या ७६ व्या वर्षी प्रसिद्ध केला आहे. इतक्या वृद्ध वयांत इतकें संशोधनाचें व मेहनतीचें दांडगें काम करणाऱ्या विद्वद्वर्याच्या चिकाटीचें, कर्तव्यनिष्ठेचें आणि निरलसतेचें करावें तितकें कौतुक थोडेंच वाटतें.

---

## आनंदाची गोष्ट !

—आनन्दाची गोष्ट ही कीं, बाळाजीपन्त नातू व ना. गोपाळ कृष्ण गोखले, हे दोघेहि जरी सरकारच्या मर्जीतले होते, तरी त्यांच्यात अंतर होतें. बाळाजीपन्त नातू हा पाजी मनुष्य होता, गोखले तसे नव्हते. बाळाजीपन्त नातू हा चहाडखोर होता, गोखले तसे नव्हते. बाळाजीपन्त नातू हा गळेकापू होता, गोखले तसे नव्हते. बाळाजीपन्त नातू हा राष्ट्रबुडव्या माणूस होता, पण गोखले तसे नव्हते.

[सं. ११ फे. १९२३.]

# * गान्धी मुंबईत आले.

**विजयी होउनि आला वाटे । त्याविण नच तो परतायाचा ॥**

गांधी आले यांत मोठेसें काय झालें असें विचारण्याची सुद्धां आतां सोय उरली नाहीं. कारण गांधींच्या येण्याचा आतां इतका धाक बसून गेलेला आहे कीं अनिश्चित, अविवेकी, अभक्त आणि अधार्मिक लोकांच्या अंगावर गांधी म्हटलें कीं कांटा उभा राहतो. गांधींच्या या विलक्षण नैतिक वजनामुळें एकाद्या गांवांत गांधींचें येणें म्हणजे खरोखर ती संस्मरणीय गोष्ट समजली जाते. ही संस्मरणीय गोष्ट आतां मुम्बईस घडलेली आहे आणि कॉंग्रेसच्या अगोदरपासून मुम्बईहून गेलेले गांधी ( मध्यंतरींचा एक दिवस वजा जातां ) मुम्बई येथें फिरून आलेले आहेत.

आणि ह्या वेळीं गांधी कसे आलेले आहेत ? ह्यावेळीं गांधी मुम्बईंत नुसते आलेले नाहींत. ह्यावेळीं गांधी नेहमीप्रमाणें आलेले नाहींत. ह्यावेळीं गांधी उगीच असे तसे आलेले नाहींत. तर ज्याप्रमाणें एखादा सम्राट् विश्वविजय करून आपल्या नगरीस परत येतो त्याप्रमाणें कॉंग्रेसमध्यें अपूर्व विजय संपादन करून गांधी मुम्बईस आलेले आहेत. महाराष्ट्र कविवर्य कै. गोविन्द बल्लाळ देवल ह्यांनीं आपल्या विक्रमोर्वशीय नाटकांत गायिल्याप्रमाणें—

**दिसतो गरुडध्वज ज्यावरचा । सोमदत्त हा रथ भूपाचा ।**
**विजयी होउनि आला वाटे । त्याविण नच तो परतायाचा ॥**

हें वर्णन जर आज यथार्थतेनें लागू होत असेल तर तें मोहनचन्द करमचन्द गांधी यांनाच होय. मुम्बईंत असलें विजयी येणें ज्याला लाभत असेल तो परम भाग्यवान होय आणि सध्यां हें भाग्य निःसंशय गांधींनाच लाभलें आहे.

गांधीनीं मुंबईत येण्यापूर्वीं कॉंग्रेसमधील आपला सुप्रसिद्ध विजय मिळविलेला आहेच. पण गांधींचा विजय एवढ्यावरच थांबलेला नाहीं. येतां

---

* संदेश ३ ऑक्टोबर १९२०.

येतां गांधींनीं आणखी एक विजय मिळविलेला आहे आणि त्याचीं वर्णनें आम्हीं दुसरीकडे दिलेल्या आमच्या अहमदाबाद येथील बातमीदाराचे पत्रांत सविस्तरपणें दिलेलीं आहेत. अहमदाबाद येथें चहाचें व्यसन अतिशय बोकाळलें होतें. तेथें चहाचे रोज बाराशें डबे खलास होत असत, साखर रोज एकशेंतीस मण लागे व दूध रोज सातशें पन्नास मण फडशा होत असे. ह्या अशा भयंकर खर्चाखालीं लोक डबघाईस येत असून दुकानदारांचें पोट मात्र दिवसेंदिवस वाढत आहे. गांधींनीं या अनन्वित प्रकारास आळा घालण्याचा निश्चय केला. त्यांनीं सर्व अहमदाबादभर ह्या व्यसनाविरुद्ध चळवळ उभारली. चहा घ्यायचा तर घरीं घ्यायचा, दुकानांत म्हणून चहा घ्यायचा नाहीं, असा सक्तीचा उपदेश सर्वांस करण्यांत आला. आणि ह्याचा ताबडतोब असा सुपरिणाम झाला कीं शहरांत चार आणे शेर दूध होतें, तें दोन आणे शेर झालें. भलत्या व्यसनांना आळा घालून उदरपोषणाचे सर्व जिन्नस गरिबांकरितां स्वस्त करून द्यायचे हाच गांधींच्या सर्व चळवळींचा प्रधान हेतु आहे. श्रीमंतांप्रमाणेंच किंबहुना श्रीमंतांइतकाच गरिबांनाहि खाण्याचा अधिकार आहे, हाच गांधींच्या सर्व चळवळींचा इत्यर्थ होय! गांधींची ही चळवळ गरीब लोकांत इतकी पसरत चालली आहे कीं, परवांच्या त्यांच्या एका सभेस पंधरा हजार श्रोतृसमुदाय लोटलेला होता.

याप्रमाणें विजयावर विजय मिळवून गांधी मुंबईंत आलेले आहेत. आज गांधींचा शब्द म्हणजे तो हुकूम आहे, आज कोणताही फौजफांटा जवळ नसतांना, कोणताही अधिकार हातांत नसतांना, कोणतीही शस्त्र-संपत्ति जवळ नसतांना केवळ नीतीच्या बळावर गांधींचा अंमल चौपाटीच्या वाळवंटापासून तों सह्याद्रीच्या उंचवटयापर्यंत चालला आहे. गांधी मुम्बईंत आले ते उगीच आले नाहींत. सर्व लोकांवर नैतिक अंमल चालवण्याकरितां ते मुम्बईंत आलेले आहेत. जनतेला नैतिक अधिकाराच्या जुवाखालीं ओढण्यासाठीं गांधी मुम्बईंत आलेले आहेत.

परंतु गांधींचीं युद्धें अजून संपलेलीं नाहींत. आजच त्यांना ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत भयंकर युद्ध करावयाचें आहे.

परंतु स्वतः गांधींना ह्या लढायांचें कांहींच वाटत नाहीं. त्यांचा आत्मविश्वास कायम आहे आणि ह्या लढाया ह्मणजे हातचा मळ असें त्यांना

वाटत आहे. त्यांची तब्येतही आतां बरी आहे. काल मुंबईत उतरल्याबरोबर ते भाजेकर हॉस्पिटलांत ना. पटेल यांचे समाचाराकरितां गेले. आपलीं शांततेचीं शस्त्रास्त्रें पाजळून, आपलीं सत्याग्रहाचीं शस्त्रास्त्रें पाजळून व आपलीं मधुर वाणीचीं शस्त्रास्त्रें पाजळून आतां गांधी आषल्या ह्यानंतरच्या लढाया मारण्यासाठीं कंबर कसून बसलेले आहेत. 'रणीं एक येवो, पुरें सैन्य किंवा' ह्या कविवचनांत सांगितल्याप्रमाणें ह्यांना प्रतिपक्षाच्या संख्येची फिकीर नाहीं. त्याच्याशीं झगडण्यासाठीं, त्याला पेचांत धरण्यासाठीं ते उत्सुक झालेले आहेत आणि ह्या उत्सुकपणांतच त्यांचा जय आहे.

---

## कुजक्या नारळांची खरात !

एखादें लग्न निघालें म्हणजे आपल्या आश्रयाखालचे लोकांना शेला-पागोटें किंवा निदान नारळ तरी देण्याची पद्धति आहे. कुणी ही देणगी प्रेमानें देतात व कुणीं केवळ परक्यांनीं नांवें ठेवू नये म्हणून देतात. ज्यावेळीं ही देणगी प्रेमानें दिलेली असते, तेव्हां पागोट्याची जर खरी असते, व नारळ ताजा आणि पाणीवाला असतो. पण ज्यावेळीं केवळ तिऱ्हाइतांनीं नांवें ठेवूं नये म्हणून ही देणगी देण्यांत येते त्यावेळीं जर खोटीं व नारळ कुजका असतो. महायुद्धाचेनंतर ज्यावेळीं आपल्या अंमलाखालच्या राष्टांनां खैरात करण्याची वेळ इंग्लंडवर आली, त्यावेळीं ते आयर्लंण्डला फ्रीस्टेट, ईजिप्तला इण्डिपेण्डन्स व हिंदुस्थानला सुधारणा, अशा तिघांना तीन देणग्या इंग्लंडनें दिल्या. ह्या देणग्या खऱ्या अथवा दिखाऊ असणें हें केवळ इंग्लंडच्या प्रेमावर अवलंबून आहे. सरकार म्हणतें, आम्हीं खऱ्या दिल्या. नेमस्त लोकहि तसेंच म्हणतात. राष्ट्रीयपक्षाचें मात्र तसें मत नाहीं. राष्ट्रीय पक्षाचें असें मत आहे कीं, इंग्लंडनें त्यावेळीं प्रेसिडेण्ड हार्डिंग यांचे समोर ज्या २४ अटी मान्य केल्या होत्या, त्या आपण पाळल्या, एवढेंच दाखविण्याकरितांच हा सुधारणांचा देखावा इंग्लंडनें केला. त्यांत इंग्लंण्डचें खरें प्रेम नाहीं, आणि म्हणूनच हा बेगडी नारळ कुजका आहे. आयर्लंण्ड व ईजिप्त ह्या देशांतील राष्ट्रीयपक्षाचेंहि, त्यांना मिळालेल्या दानासम्बन्धानें हेंच मत आहे, आणि त्यामुळें ह्या दानामुळें हीं तीन राष्ट्रें खूष होण्याचे ऐवजीं तिन्ही देशांत असंतोषाचा भडका उडालेला आहे. [सं. ११ फ. १९२३]

---

# * दादाभाई बना !

परमपूज्य दादाभाई नवरोजी स्वर्गवासी झाल्यास आज आठ दिवस झाले. त्यांचें देहावसान अकाली झालें, असेंहि म्हणण्याचें कारण नियतिदेवीनें ठेवलें नाहीं. कारण दादाभाईसारखीं नररत्नें आपल्या देशाला सर्वकाल लाभावीं अशी जरी आपली प्रबळ इच्छा असली तरी 'शतायुर्वैपुरुषः' या सृष्टिनियमानें तिला मर्यादा आलीच पाहिजे. आनंदाची गोष्ट एवढीच कीं, हा प्रश्न जगांतील आपणासारख्या सामान्य व्यक्तींसंबंधानें उत्पन्न होत नसून ऱ्याण्णव वर्षानंतरहि "दादाभाई इतक्यांत कां मेले ?" असाच प्रश्न प्रत्येक हिंदुस्थानवासी मनुष्याच्या मनांत उभा रहात आहे. खरोखर हें भाग्य अवर्णनीय होय, आणि असलें हें अवर्णनीय भाग्य पाहिलें म्हणजे खचित दादाभाईची माता दादाभाईनाच प्रसवली असें वाटूं लागतें. आपणासारखे जगांतील बहुतेक सामान्य मानवी जीव जिवंत असूनहि मेलेलेच असतात, पण मेलेले असून चिरंजीव असे दादाभाईसारखे कांहींतरी पुण्यात्मे ह्या पतित हिंदुभूमींत जन्म घेतात त्याबद्दल आपण निःसंशय गर्व बाळगिला पाहिजे. एखादा पेटविलेला दिवा वाऱ्याच्या झोतीनें जाऊं नये म्हणून ज्याप्रमाणें त्याला अंगणांतून उचलून दिवाणखान्यांत नेतात त्याप्रमाणें मानवी देहयातनांच्या वाऱ्याच्या झुळकी दादाभाईच्या प्राणज्योतीस बाधूं नयेत म्हणून नियतिदेवीनें हा दीप आतां मृत्युलोकांतून उचलून चिरंतन स्वर्गमंदिरांत नेऊन ठेवलेला आहे. आणि आपल्या मानवी नेत्रांस त्यांचा पुराण–पुरुष देह जर अदृश्य झाला असेल तर तें नश्वरत्वाचें लक्षण नमून त्याच्या रक्षणाकरितां पुढें केलेला तो नियतिदेवीच्या भरजरी शालूचा पदर आहे. दादाभाई आतां चिरंजीव झालेले आहेत. स्वर्गांत पाऊल ठेवल्याबरोबर त्यांना जेव्हां पूर्वीचे " सप्तैते चिरजीविनः " भेटतील, त्यावेळीं खरोखर अश्वत्थामा त्यांना शाबासकी देईल कीं, कौन्सिलें अथवा म्युनिसिपल हक्क असल्या लाहयांच्या पिठाला दूध समजून त्यांनीं जिभोळ्या चाटल्या नाहींत, अथवा त्यामुळें स्वराज्याच्या खऱ्या दुधाचा नाद त्यांनीं

---

* संदेश ता. ८ जुलई सन १९१७.

सोडून दिला नाहीं. हनुमान् म्हणेल कीं लक्ष्मणाला शक्ति लागली असतांना मी द्रोणगिरी पर्वत आणला खरा, पण सात समुद्र ओलांडून ह्यांनीं जी स्वराज्य–प्रियतेची मृत्युंजय मात्रा, मूर्च्छित हिंदुस्थानाला पुन्हां सावध करण्याकरितां आणली तिची योग्यता माझ्या साऱ्या द्रोणागिरीलासुद्धां यावयाची नाहीं. व्यासमुनि म्हणतील कीं मी पंचलक्षण पुराणें रचून, आज विष्णूची तर उद्यां गरुडाची, अशी जी महति वर्णन करीत बसलों त्यापेक्षां स्वावलंबनाच्या एकाच लक्षणानें युक्त असलेल्या स्वराज्याच्या एकाच पुराणाचें कथन जर मी दादाभाईंप्रमाणें करीत बसलों असतों तर ॲनी वेझंट व टिळक ह्या दोघांनींही मला एकजुटीनें कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडलें असतें. विभीषण म्हणाला असेल कीं आपल्या बांधवांचा गळा कापून व आपल्या भूपतीशीं राजद्रोह करून जो मला माराकुटीनें अंगांत " राम " आणण्याचा प्रयत्न करावा लागला, त्यापेक्षां अखिल भारतीयांशीं कधींहि बंधुद्रोह न करणारा व साम्राज्यांतर्गत स्वराज्य मागून स्वराज्य–प्रयत्नांत सुद्धां राजनिष्ठेला धक्का न पोंचूं देणारा हा जो बहाद्दर, त्याच्या अंगांत माझ्यापेक्षां सुद्धां कांहीं विशेष "राम" आहे. परशुरामांना असा पश्चात्ताप झाला असेल कीं आपण हातांत शस्त्र घेऊन व्यर्थ एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली, त्यापेक्षां स्वतः निःशस्त्रत्वाचें व्रत घेऊन राष्ट्रांतील क्षात्रवृत्ति नष्ट न होऊं देण्याकरितां हत्यारांच्या कायद्याविरुद्ध भांडणारा हा पारशी–त्यालाच खरें राष्ट्रजीवनाचें बीज कळलें. दादाभाईंचीं निष्कांचन वृत्ति पाहून कृपाचार्यांना स्वतःच्या निर्लोभी पवित्र आयुष्याचें सार्थक झाल्यासारखें वाटलें असेल व बळिराजा मनांत पुटपुटला असेल कीं माझ्या साम्राज्यांतील निष्कंटक नागरिकत्व मिळविण्याकरितां वामनाला तीन वर तरी मागावे लागले, पण हा दादाभाई खरोखर त्या वामनाचाहि दादाच, त्यानें कलोनियन स्वराज्याच्या एकाच पवित्र्यांत, एकाच पावलांत–एकाच "स्टेप" मध्यें–राष्ट्राला जें जें हवें ते तें सारें मागून घेतलेलें आहे. दादाभाईंना हा शहाणपणा कोणी शिकविला ? त्यांना ही अक्कल कोणी दिली ? त्यांना ही अक्कल परिस्थितीनें दिली व अहोरात्र परिस्थितीच्याच विचारांत जे निमग्न असतात त्या सर्वांना ही अक्कल येते. परिस्थिति ही मोटी गुरु आहे. फंड उभा न करितां ती

कॉलेजें घालते, व भिक्षा मागत न फिरतां ती विद्यालयें चालवते. ज्या ह्या मिस् परिस्थितीनें, ज्या ह्या कुमारी ठाकुरणीनें, ज्या ह्या संस्कृतीपूर्ण गोदावरीनें लोकमान्य टिळकांना शिकविलें, महात्मा गांधींना शिकविलें, भगिनी ॲनी बेझंटला शिकविलें, त्याच गुरूनें दादाभाईंनाहि हुषार केलें. व ह्या सर्वांपेक्षांहि दादाभाई वयानें जास्त ह्मणून तिनें प्रथम त्यांचेकडून व त्यांच्याच तोंडून कलोनियल "स्वराज्याच्या" मधुर मागणीचीं मधुर अक्षरें वदविलीं. आमचा हा तीस वर्षांचे वार खाल्लेला, वरसोव्याचा कॉंग्रेसगडी, सारें झालें तरी कांहींच झालें नाहीं असें समजून, लिकलिकणाऱ्या डोळ्यांतून नवीन हिंदुस्थान, न्यू इंडिया, पुढील हिंदुस्थान, कल्पनामय हिंदुस्थान, उदार इंग्रजानें आत्मतुल्य बनलिलेला हिंदुस्थान, पहात बसत होता. म्हातारा स्वतः पिकलें पान झालेला होता, पण त्यांच्या कल्पनेपुढें भावी हिंदुस्थानची नवी पालवी दिसत होती. जीर्ण कालाच्या मळकट बरणींत मुरून तो स्वतः जुनें लोणचें बनून गेलेला होता, पण ह्या लोणच्याच्या स्वादानें तरी नवीन विचारांचें अन्न आपल्या देशबांधवांच्या पोटांत शक्य तितकें जास्त कसें जाईल अशी म्हाताऱ्याला तळमळ लागलेली होती. स्वतः ऱ्याण्णव वर्षांचा अतिदूरचा प्रवास करून तो आलेला होता, पण मूर्ख वाटसरूप्रमाणें मी अमक्या बोगद्यांतून आलों व तमकीं रिव्हर्सिंग स्टेशनें ओलांडलीं अशी वायफळ बडबड तो करीत बसलेला नव्हता, तर पुन्हां पुन्हां टाइमटेबलें काढून पुढचें स्टेशन लवकर कसें येईल ह्या एकाच फिकीरींत तो पडलेला होता. स्वतःचे केंस पांढरे झाल्याची त्याला पर्वा नव्हती, कारण ऱ्याण्णवाव्या वर्षीं पांढरे केंस नसणें म्हणजे तोंडाला काळिमा आहे हें त्याला माहीत होतें. त्याला गर्व एवढाच आहे कीं, काळानें इतके पाय आपटले, पण माझ्या शरीराबरोबर माझें मन तो म्हातारें करूं शकला नाहीं. दादाभाईंचा कोणताहि फोटो घ्या, त्यांत त्या नाकाच्या खुबीदार ठेवणीवरून व ओंठाच्या मजेदार लकबीवरून विनोदी हास्याची नाजुक लकेर ओळखूं येते. जणूं काय ते अभिमानानें एकसारखे काळाला हिणवीत होते कीं, तुझी चेष्टा माझ्याशीं कोठपर्यंत चालेल ? माझ्या डोक्यावरचे केंस पांढरे करीपर्यंत ! पण बच्चंपिल्ली, लक्षांत ठेव कीं हा दादाभाई इतका खंबीर आहे कीं हा शेवटीं तुझ्याच डोक्यावरून हात फिरवून साऱ्या हिंदुस्थानाला तरुण बनवील !

---

# *कै. गोपाळ कृष्ण गोखले.

**शरीरस्य गुणानां च दूरत्यन्तमन्तरं ।**
**शरीरं क्षणविध्वंसि कल्पान्तस्थायिनो गुणाः ॥**

शरीर क्षणविध्वंसि असतें असें आपण कधीं ऐकत नसतों बरें ? परंतु ह्या सत्यवाणीचा अत्यंत दुःखद प्रत्यय, ज्यावेळीं जगातून एखादी महान् व्यक्ति नाहींशी होते तेव्हांच येतो. शरीर क्षणविध्वंसि असतें ह्याबद्दल सामान्य माणसांच्या वियोगानें कांहीं एक वाटत नाही; कारण जगांतील बहुतेक लोक आपलें अस्तित्व जगाला आवडावें व जगाला उपयोगी वाटावें असा कांहींच प्रयत्न करीत नाहींत. परंतु जगाला 'हवी हवी' अशी वाटणारी कुडी, जगाच्या हितांत सदासर्वदा कष्टमय होणारी तनु, जगाच्या कल्याणाकरितां रात्रंदिवस मनाला संताप जडविणारी शरीरयष्टि, ज्यावेळीं एका क्षणांत तो निर्घृण कृतान्त ह्या जगांतून उचलून नेतो त्यावेळीं " शरीरं क्षणविध्वंसि " ह्या उक्तीची हृदय करपविणारी उग्रता एकदम अनुभवास येऊन मन उदास व निराश होऊन जातें. ना. गोखले हे खरोखरच कैलासवासी झाले काय ? ना. गोखले हे खरोखरच आपल्यांतून गेले काय ? होय ! ना. गोखले हे खरोखरच कैलासवासी झाले. अश्रूनों ! नेत्रांत एकदम गर्दी न करतां ही दुष्ट बातमी एकवार " ऐका. " कल्पनांनों, ना. गोखले वारले ही बातमी ऐकण्याइतकें काठिण्य आपले अंगांत आणा, विचारसामर्थ्यांनों, आकाशांतील विजेप्रमाणें कडकडणारी ही अमंगल वार्ता अंगावर येऊन कोसळली असतां खचून जाऊं नका. राष्ट्रभावनांनों, गोखल्यांना शोधण्याकरितां आकाशाकडे शून्य दृष्टि फेंकीत भांबावून जाऊं नका. स्थिर व्हा, स्थिर व्हा, " शरीरं क्षणविध्वंसि " हें वाक्य आतांपर्यंत तुमच्या श्रव—

---

* संदेश ता. २ फेब्रुवारी १९१५.

णावरच येत असे, पण आतां तें वाक्य खरें झालें आहे. ना. गोखल्यांचा प्रज्ञाजीवि देह निर्जीव–रक्षामय बनून गेला आहे.

ना. गोखले आज कित्येक दिवस आजारी होते. त्यांच्यांतील उत्साह, त्यांच्यांतील तरतरी, त्यांच्यांतील हौस, आज कित्येक दिवस नाहींशी होऊन गेलेली होती. ना. गोखले ह्यांच्यांतील खरी चित्कला अलीकडे कित्येक दिवस मंदमंद होत चालली होती. परंतु त्यांचा अंत इतक्यांत होईल असें मात्र कोणासही वाटलें नव्हतें. शेवटीं त्यांचें जें देहावसान झालें तें खरोखरच एका क्षणांत झालें. ना. गोखले शुक्रवारीं रात्रीं दहा–अकरा वाजतां वारले. शुक्रवार उजाडेपर्यंत तो गोखल्यांना घेऊनच आज आपले डोळे मिटणार अशी कोणास कल्पनाहि नव्हती. कॉंग्रेस–समेटाचें बोलणें कडाक्यानें चाललें होतें. गुप्त पत्राच्या चर्चेचें वादळ एकसारखें सुरूच होतें. सुरेंद्रनाथ–मेथांचें बोलणें व्हावयाचें ठरलें होतें. एखाद्या रणांगणावरील वीराला शोभणारी धुमश्चक्री गोखल्यांच्या समोर, मागें व आजूबाजूस सुरू राहून गोखल्यांना एक प्रकारची शोभा देत होती. सर्व्हंटांची ये–जा सुरू होती. विजापुरकरांच्या खेपा चाललेल्या होत्या. तारवाले शिपाई गर्दीत होते. सुब्बारावांचा तोफखाना चालू होता. अशा गडबडींत, अशा धुमश्चक्रींत, अशा दंगलींत, अशा धांवपळींत कृतांतानें ना. गोखल्यांवर एकदम झडप घातली, व महाराष्ट्राचें सर्व लक्ष गोखल्यांकडे लागून राहिलें असतांना गोखल्यांच्या शरीरावर व महाराष्ट्राच्या नेत्रांवर एकदम झांकण घातलें.

हाय, हाय ! गोखले तर गेले. परंतु हा शोकनिमग्न महाराष्ट्र त्यांना कधींहि, कधींहि विसरणार नाहीं. गोखले ही महाराष्ट्राची एक मधुर कार्यज्योति होती. ही कार्यज्योति मालवल्यामुळें महाराष्ट्रावर निबिड अंधःकार आपला अंमल पसरवील, परंतु ह्या अंधःकारांत महाराष्ट्राची गोखल्यांसंबंधींची स्मृति कधींहि लुप्त व्हावयाची नाहीं. गोखल्यांची योग्यता महाराष्ट्राच्या इतिहासांत कोठें लागेल ह्याची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु एक गोष्ट आम्हीं बेधडक म्हणतों कीं, महाराष्ट्राची कीर्ति सर्व हिंदुस्थानांत प्रसृत करणाऱ्या ज्या अगदीं थोड्या व्यक्ति आपल्यांत उत्पन्न झाल्या त्यांपैकीं गोखले ही एक व्यक्ति होय. गोखल्यांचे गुण व

अवगुण, गोखल्यांचीं सत्कृत्यें व त्यांचे दोष, गोखल्यांच्या महत्तम इच्छा व अल्पतम आशा, सर्व एकीकडे ठेवल्या तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं महाराष्ट्रांतील दहापांच अलौकिक व्यक्तींपैकीं गोखले हे एक होते. महाराष्ट्राला गोखल्यांनीं एक प्रकारचें नवीन महत्त्व आणलेलें आहे, महाराष्ट्राला गोखल्यांनीं एक प्रकारची अलौकिक प्रौढी प्राप्त करून दिलेली आहे. राष्ट्राच्या राजकीय कारस्थानांत महाराष्ट्राला महत्त्वाचें स्थान प्राप्त करून देऊन गोखल्यांनीं महाराष्ट्रावर चिरंतन उपकार करून ठेवलेले आहेत. महाराष्ट्रा, गोखल्यांच्याकरितां शोक करून तूं क्षारोदकाचे कितीही पाट बाहविलेस तरी त्यांनीं तुझ्यावर केलेल्या उपकारांचें मापन त्याचेमुळें होणार नाहीं.

ना. गोखल्यांनीं महाराष्ट्रावर जें ऋणाचें ओझें करून ठेवलेलें आहे, त्यांतील अत्यंत वर्णनीय ओझें म्हणजे ना. गोखल्यांनीं महाराष्ट्रीय राजकारस्थानाची सप्त नद्यांच्या आंतच घुटमळणारी कोंडी फोडून त्यास विलायतेपर्यन्त नलें ही होय. श्री. बाळ गंगाधर टिळक यांची गोष्ट सोडून दिली आणि महाराष्ट्रांत पूर्वीं उत्पन्न होऊन गेलेले कै. विश्वनाथ नारायण मंडलीक, कै. गोपाळराव हरि देशमुख व कै. महादेव गोविंद रानडे हे तीन राजकारणी पुरुष घेतले, तर ह्यांपैकीं हिंदुस्थानच्या देशमर्यादेच्या पलीकडे विलायतेंत महाराष्ट्राच्या राजकारणाचा प्रथम झेंडा लावणारे जर कोणी असतील तर ते ना. गोपाळ कृष्ण गोखले हेच होत. व्यक्तिमतभिन्नत्वाप्रमाणें वरील तीन पुरुषांपेक्षां गोखल्यांचा नंबर कोणी वर लावील अथवा कोणी खालीं लावील, परंतु ही गोष्ट कोणासही कबूल करावी लागेल कीं पुण्याचें "पॉलिटिक्स" मोर्लेच्या चेंबरमध्यें जर प्रथम कोणी चर्चेकरितां नेलें असेल तर तें गोखल्यांनींच होय. आजपर्यन्त राजकारणाचा भगवा झेंडा उभारून विलायतेपर्यन्त महाराष्ट्रांतला एकहि पुरुष गेलेला नव्हता. १८९७ सालीं गोखले ज्या वेळीं विलायतेंत वेल्बी कमिशनकरितां प्रथम गेले, त्या वेळपर्यन्त महाराष्ट्रांतलें राजकारण बुधवारपेठेपासून रामनारायणाचा बंगला, ह्या आवाराच्या बाहेर जाऊं शकेल अशी फारशी कोणास कल्पना नव्हती. विलायतेला जाणें ही गोष्टहि महाराष्ट्रांतील राजकारणी पुरुषांत तोंपर्यंत अपूर्व होती. विलायतेला जावयाचें तर डब्ल्यू. सी. बानर्जींनीं जावें, सुब्रह्मण्य

ऐयरनीं जावें पण राजकारणाकरितां महाराष्ट्रीयांनीं विलायतेला जावें ही कल्पना पूर्वी फारशी प्रचलित नव्हती. ना. गोखल्यांनीं ही कल्पना प्रथम प्रचारांत आणली, व ती त्यांनीं इतक्या यशस्वीपणानें सिद्धीस नेली कीं त्या वेळेपर्यंत राजकारणांत पडलेले सर्व ऋषि व महर्षि मागें पडून ना. गोखले व मोर्ले ह्यांच्यांत बैठकी तासतास होऊं लागल्या. ना. गोखल्यांची कोणत्याहि एका गोष्टींत जर सर्वधुरीण श्रेष्ठता असेल तर ती ह्याच गोष्टीबद्दल होय. राजकीय विचारांना विलायतेचें पाणी जर कोणी पाजलें असेल तर तें गोखल्यांनीं प्रथम पाजलें. राजकारणांत प्रथम गोखल्यांनीं सीमोल्लंघन केलें. राजकीय विचारांचे घोडे महराष्ट्राबाहेर गोखल्यांनीं प्रथम दवडले. राजकारणाची अटक गोखल्यांनीं प्रथम ओलांडली. महाराष्ट्रानें गोखल्यांबद्दल जें ऋणी रहावयाचें आहे तें याच गोष्टीबद्दल होय. गोखले हे राजकारणांतले बिनीवाले होते, गोखले हे राजकारणी कोलंबस होते, गोखलें हे राजकारणांतले राघो भरारी होते. गोखल्यांचें यश महाराष्ट्रांत सदैव गाजो, व महाराष्ट्राच्या अश्रूंनीं भिजविलेल्या त्यांच्या परलोकांतील शय्येवर गेल्या पंचवीस तीस वर्षें एकसारखा कष्टलेला त्यांचा परोपकारी देह अविरोध विश्रांति घेवो !

---

## मानवजातीचे सम्राट !:—

—श्री शिवाजीमहाराजांचें स्मारक होणें जर इष्ट असेल, तर तें अखिल भारतीयच झालें पाहिजे हें उघड आहे. श्री शिवाजीमहाराजांसारखे जे राष्ट्रकर्ते कधीं काळीं निर्माण होतात, त्यांना जात कसली ? ते सर्व मानव जातीचे सम्राट असतात. प्रत्येक मनुष्य त्यांच्यापुढें रयतेसारखा असतो व सर्वांचे प्रणाम घेण्याचा त्यांचा जन्मसिद्ध हक्क असतो.

[ सं. ३ डिसेंबर १९२२. ]

# * लोकमान्यांचा स्वर्गवास.

**कमि नव्हते सृष्टींत अवांतर प्राणी न्यायाला ।**
**आयुष्य उणें जाहलें टिळक बळवंत रायाला ॥**

श्री शिवाजीरायांचा मृत्यु, राजारामाचें अकालीं मरण, पानिपतचा रणसंग्राम, नारायणराव पेशव्यांचा वध, सवाई माधवरावांची आत्महत्या, अथवा नाना फडणविसांचा स्वर्गवास, ह्या महाराष्ट्राच्या इतिहासांतील ज्या भयंकर विपत्ती, त्यांच्याहून अणुमात्रहि कमी नसलेली भयंकर वेळा आज महाराष्ट्रावर आलेली असून तिनें महाराष्ट्रांतून आज बाळ गंगाधर टिळक यांना ओढून नेलेलें आहे, हें कळविण्यास आम्हांस अत्यंत दुःख वाटतें. काल संध्याकाळपर्यंत ही आपत्ति येणार ह्याचें नुसतें स्वप्नहि नव्हतें इतकेंच काय, पण लोकमान्यांच्या तापाला नववा दिवस उलटून गेल्यावर सर्व प्रकारें अशीं गोड स्वप्नें वाटायला लागलीं होतीं कीं, कृतांतानें ओढून नेलेलें पण महाराष्ट्राच्या नियतीनें परत आणण्याकरितां शिकस्त केलेलें हें दान, परमेश्वर आणखी कांहीं वर्षे महाराष्ट्राकडे ठेवील; पण ही आशा खोटी ठरली, मानवी यत्न विफल झाले, महाराष्ट्राचें दैव फुटलें आणि परम पवित्र, परम थोर, परम मंगल, परम प्रिय आणि परम दुर्लभ असें हें दिव्य पुरुषरत्न **लो. बाळ गंगाधर टिळक** ह्यांना काल मध्यरात्र उलटतांच, बरोबर रात्रीचे बारा वाजून पन्नास मिनिटांनीं, स्वर्गांतील भाग्यवान् देवांनीं आपल्याला ह्या महापुरुषाचा सहवास घडावा या मत्सरी इच्छेनें ह्या जगांतून कायमचें उचलून नेलें !

वाचकांनों, ह्यापेक्षां जास्ती दुर्दैवाची कल्पना तुम्हाला करतां येते काय ? देशबंधूनों, दुर्दैवाची ह्यापेक्षां जास्त कुटिलता तुम्हांस कल्पनेंत आणतां येते काय ? महाराष्ट्रीयांनों, कुयोगांचा ह्यापेक्षां कठीण लत्ताप्रहार तुम्हांला शक्यतेंत समजतां येतो काय ? ह्या अभागी देशांतील नागरिकांनों, ह्यापेक्षां जास्त जड असें कौटुंबिक दुःख दुसरें कोणतें असेल असें तुम्हीं म्हणूं शकतां

---

* संदेश, ता. १ ऑगस्ट १९२०.

काय? संसारसमुद्रांतील जीवांनों, ह्यापेक्षां दुःखाच्या जास्त दुःखद गटंगळ्या असणें शक्य आहे काय? संसृतींतील मानवांनों, हृदयाला सपासप कापीत जाणारी ह्यापेक्षां प्रखर अशी दुर्दैवाची सुरी तुम्हीं कधीं अनुभवली आहे काय? मर्त्यलोकांतील मर्त्यांनों, ह्यापेक्षां डोळ्यांपुढें अंधारी आणणारें तमोमय संकट दुसरें असेल असें तुम्हांला वाटतें काय? जन्ममृत्यूच्या भोंवऱ्यांतील प्राणबिंदूंनो, दुःखाच्या सर्वतोमुखी लाटांत जास्त घुटमळणें बाकी आहे असें तुमचें मन तुम्हांस सांगतें काय? कृतांताच्या तरवारीला बळी पडणाऱ्या हतभाग्यांनों, निष्कारण काळाच्या जबड्यांत शिरतांना जास्त मानसिक क्लेश होत असतील, हें संभवतें तरी काय? शिवाजीच्या, बाजीरावाच्या, राजारामाच्या, नाना फडणिसाच्या, विष्णुशास्त्र्यांच्या, मंडलिकांच्या दीन दासानुदासांनों, लोकमान्यांच्या मृत्यूनें तुमचें नशीब फुटलें, हृदय फाटलें, पुण्यराशि गोठलें, तुमचें मांगल्य त्या चोरानें—त्या निष्ठुर यमानें—त्या अधर्माचरण करणाऱ्या यमधर्मानें, त्या नृशंसानें, त्या कृतांतानें लुटलें असें तुम्हांस वाटत नाहीं काय?

लोकमान्य! तुम्हाला आतां कोठें पाहूं? तुमची सांवळी मूर्ति कोठें अवलोकन करूं? तुम्हांला कोठें शोधूं? तुम्हांला कोठें धुंडाळूं? आमचा जीव तुमच्या जीवाशीं गोठवलेला होता, आमचा प्राण तुमच्या पंचप्राणांचा भाग होता, आमचें अस्तित्व तुमच्या अस्तित्वांत गुरफटून गेलें होतें, आमचें जीवन तुमच्या जीवनांत गुंतलेलें होतें, लोकमान्य! आतां तुम्हीं कोठें सांपडाल? तुम्ही कोठें दिसाल? तुम्ही जात असतांना आमच्या जीवाला ओढणी लागलेली आहे, आमच्या प्राणांना क्लेश पडत आहेत. **कांट्याच्या जाळ्यावरून ज्याप्रमाणें रेशमी वस्त्राला फरफरां ओढावें,** त्याप्रमाणेंच आमच्या हृदयाच्या चिरफळ्या झालेल्या आहेत, आमच्या मनाला शतावधि, सहस्त्रावधि क्लेश होत आहेत. तुम्हांला पाहूं, तुम्हाला शोधूं, तुम्हाला गांठूं, तुम्हांला घट्ट मिठी मारूं, तुमच्या चरणाला जीवतोडीनें बिलगूं, त्यावेळीं—त्याचवेळीं, कदाचित् आमचे हे क्लेश, ह्या यातना, ह्या दुर्धर वेदना, ह्या परम पीडादायक भावना थांबल्या तर थांबतील.

पण तुम्हांला शोधूं कुठें? लोकमान्य, तुम्हाला शोधूं कुठें? तुम्हाला शोधण्याकरितां काय किंमत देऊं? काय? त्या यमधर्माच्या पायाशीं देहां-

तल्या रक्ताचा हौद उत्पन्न करूं? काय? त्या यमधर्माच्या पायांजवळ, मानवी कुडीचीं शकलें शकलें करून मांडूं? काय? त्या यमधर्माच्या पायांनजीक ह्या मर्त्य देहाचें नीरांजन करूं? काय? त्या यमधर्माला दया आणण्याकरितां मृत्युलोकापासून यमलोकापर्यंत देहदंडाचा दंड करून दंडवत करीत जाऊं? किंवा त्या अधाशी मृत्यूची खा खा शमन करण्याकरितां त्याच्यापुढें आम्हीं–तुमचे सर्व देशबांधव–आपलीं शिरकमलें उतरून ठेवूं? लोकमान्य, आम्हीं काय करूं? लोकमान्य, आम्हीं काय करूं? तुम्ही दिसावें, तुम्हीं भेटावें, तुम्हीं पुन्हा यावें, म्हणून सांगा आम्ही काय करूं? आजपर्यंत तुम्हीं आमचीं हृदयें इतकीं परवश करून घेतलेलीं आहेत, कीं तुमचा हुकूम झाल्यावर आम्ही तो पाळल्यावांचून ठेवूं हें शक्य नाहीं. आतांच आम्हीं तुम्हांला सांगितलें ना? आणि पुन्हा एकदां आम्ही तुमच्या पायांची शपथ घेऊन सांगतों कीं लोकमान्य! आमचे प्राण तुमच्या स्वाधीन, आमचें मन तुमच्या स्वाधीन, आमचें जीवन तुमच्या स्वाधीन. लोकमान्य! आम्ही तुमचे, तुम्ही आमचे आहांत. मग बोला, काय वाटेल तें सांगा, वाटेल तें मागा, वाटेल ती आज्ञा करा, वाटेल तो हुकूम फर्मावा, आणि बोला, तुम्हांला कोठें शोधूं, लोकमान्य! आम्हीं तुम्हांला कुठें शोधूं?]

कारण गेलीं चाळीस वर्षें, तुमच्या अस्तित्वांत आमचें अस्तित्व इतकें बुडून गेलेलें आहे कीं, तुमचें अस्तित्व आणि महाराष्ट्राचें अस्तित्व हीं निराळीं राहिलेलीं नाहींत. गेल्या चाळीस वर्षांत सूर्यानें इतक्या येरझाऱ्या केल्या, वायु इतके वेळ वाहिला, समुद्राला इतके वेळ भरती आली, तारे इतक्या वेळां चमकले, पण त्या प्रत्येक चमकण्यानें, भ्रमणानें, लाटेनें, पवनानें हेंच तत्त्व पुन्हा पुन्हा प्रस्थापित केलेलें आहे कीं, टिळक म्हणजेच महाराष्ट्र, आणि महाराष्ट्र म्हणजेच टिळक! ह्या चाळीस वर्षांतील एक कृति काढा, एक गोष्ट घ्या, एक वर्तमानपत्र वाचा, एक राजकारण उलगडा, त्यांत शोधकांना काय आढळेल? १८८० त तुम्हीं महाराष्ट्राच्या राजकीय पटांगणांत उतरलांत आणि १९२० मध्यें आज तुम्हीं आम्हांला सोडून चाललांत, इतक्या अवधीत प्रत्येक चळवळींत, प्रत्येक उद्योगांत, प्रत्येक व्यवसायांत, प्रत्येक राजकीयोत्सवांत शोधकांना काय आढळेल? खरोखरच काय आढळेल? त्यांना असेंच आढळेल कीं गेल्या चाळीस वर्षांतील महाराष्ट्रांत

एकच–एकच नांव भरलेलें आहे, दुसरें नांव भरलेलें नाहीं आणि तें कोणतें? तर बाळ गंगाधर टिळक हें होय. कोणी कितीहि शोधो, कोणी कितीहि धुण्डाळो, कोणी कितीहि तपास करो, पण त्याची माय व्यायली नाहीं कीं, एकातरी गोष्टींत बाळ गंगाधर टिळकांशिवाय, त्याला दुसरें एखादें नांव दाखवितां येईल. हा आमचा वीर, हा आमचा हीरो हा आमचा प्राण, हा आमचा लोकमान्य, इतका सर्वव्यापी होता कीं त्यानें ह्या महाराष्ट्रांतील चर आणि अचर, सजीव आणि अजीव, सचेतन आणि अचेतन इतकेंच काय, पण ह्या महाराष्ट्रांतील मानव, देव, किन्नर, विभूति–ह्या महाराष्ट्रांतील साधू, संत, योगी, तपस्वी–ह्या महाराष्ट्रांतील जल, स्थल, पाषाण, तरु, लता, उद्यान, पुरोपूर–पुरोपूर व्यापून टाकलेलें होतें! आमच्या लोकमान्या, लोकांच्या लोकमान्या, महाराष्ट्राच्या लोकमान्या, तुझ्याशिवाय जीव तुटतो रे! तुझ्याशिवाय जीवाला ओढणी किरे लागते! बोल, बोल, लोकमान्या! बोल, आणि तूं कुठें भेटशील हें आम्हांस सांग.

महाराष्ट्राकरितां, लोकमान्य! तुमच्यावर संकटें कितीतरी आलीं? ह्या देशासाठीं तुम्हीं चार वेळां तुरुंगांत तर गेलां आणि ह्याशिवाय तुम्हीं इतर अनंत प्रकारचे जे क्लेश भोगलेले आहेत, त्यांना सीमाच नाहीं. ह्या देशाच्या सेवेकरितां तुम्हीं आपल्या भाग्याचीं कोठारें लुटूं दिलेलीं आहेत, आपली संपत्ति पुनर्वसूच्या पावसाप्रमाणें धो धो ओतलेली आहे, ह्या देशाकरितां तुम्हीं आपल्या कुडीची समिधा केलेली आहे, ह्या देशाकरितां तुम्हीं आपल्या बुद्धीचीं कपाटें सताड उघडीं ठेवलेलीं आहेत, ह्या देशाकरितां तुमचा मेंदू झिजलेला आहे, ह्या देशाकरितां तुमचें शौर्य झुंजलेलें आहे, ह्या देशाकरितां तुम्हीं आपल्या प्राणांचा होम केलेला आहे. तुम्हीं या देशाला काय दिलेलें नाहीं? त्याच्याकरितां काय संकट आपल्यावर ओढवून घेतलेलें नाहीं? अहर्निश देशाची चिंता करणारें मन, अहर्निश देशाच्या गोष्टी बोलणारी जिव्हा, अहर्निश देशाची सेवा करणारें शरीर आणि अहर्निश थोर गोष्टी पहाणारे महाराष्ट्रांतील डोंगर, नद्या, सरोवरें, अरण्यें हीं सर्व तुमच्या अनुपम देशभक्तीचे, अतुल देशसेवेचे असामान्य स्वार्थत्यागाचे, अमोल उद्योग–व्यापृतपणाचे साक्षीदार आहेत. तो गायकवाडवाडा, कीं जेथें हजारों व्याख्यानप्रसंग झाले, आणि ते सर्व

देशाकरितां झाले, तें पुण्यवान पुणें, कीं ज्यानें सारखीं चाळीस वर्षे तुमची पवित्र काया झेलली, पृष्ठावर वाहिली, तो महाराष्ट्रीय प्रदेश कीं जेथें तुमची छवी नाहीं असा एक गांव नाहीं, एक शीव नाहीं. आणि तो येरवड्याचा, तो साबरमतीचा तुरुंग कीं तुमच्या सर्व लोकोत्तर देशसेवेचें प्रत्यक्ष अवलोकन करण्याचें भाग्य ज्याला एकट्यालाच लाभलें, सर्व—हे सर्व—तुमच्या सत्कृतींचे साक्षीदार आहेत. हे सांगतील, कीं ह्या निधड्या छातीच्या पुरुषानें, ह्या महाराष्ट्राचें जीवन आपल्या जीवनांत इतकें रंगवून, इतकें गुंगवून, इतकें तन्मय करून टाकलें होतें, कीं चाळीस वर्षेपर्यंत टिळक म्हणजेच महाराष्ट्र आणि महाराष्ट्र म्हणजेच टिळक होते.

आणि चाळीस वर्षेपर्यंत इथल्या जनतेला असें वेड लावणाऱ्या जादुगारा, ह्या वेळीं आम्हाला सोडून चाललास? जनतेच्या जनतानंदा, ह्या शोक-सागरांत आम्हांला लोटलंस? लोकांच्या प्रेमांतील लोकमान्या, अश्रूंच्या दर्यांत आम्हांला टाकून दिलेंस? देशबांधवांच्या कैवल्या, आम्हां सर्वांना विलाप करायला टेविलेंस? महाराष्ट्रभूमीच्या अभिमान्या, शोक करण्याचेंच कर्तव्य आमच्याकडे ठेवलेंस? पूर्वजांच्या पुण्य अपत्या, सर्व देशावर विर-हाचा अंधःकार पसरलास? गीता सांगणाऱ्या कृष्णशोरीच्या पट्टशिष्या, तुझ्या सत्संगाची भगवद्‌गीता आमचे हातून हिरावून नेलीस? भारत देशाच्या कुलदीपक तिलका, आम्हांस असहाय, दीन, अनाथ केलेंस? श्रीकृष्णाच्या ज्ञानावनारा, स्वराज्याचें पूर्ण ज्ञान आम्हांला न देतांच गेलास? महाराष्ट्र-कुंजवनांत उत्साहाची मुरली वाजवणाऱ्या मुरलीधरा, हीं खिल्लारें, हीं वासरें तुझ्या वेणुनादाला मुकविलींस? बोला, लोकमान्य! बोला, लोक-मान्य! राग टाकून बोला, बोला, लोकमान्य! पूर्वप्रेमाच्या सर्व स्मृतींनीं बोला कीं तुमच्या विरहावस्थेंत ह्या तुमच्या महाराष्ट्रानें काळ कंठावा तरी कसा? कारण तूं गेलास तो तुझ्याबरोबर महाराष्ट्राचा शिवाजी गेला आहे, तूं गेलास तो तुझ्याबरोबर महाराष्ट्राचा अर्जुन गेलेला आहे, तूं गेलास तो तुझ्याबरोबर महाराष्ट्राचा श्रीकृष्ण गेलेला आहे. लोकमान्य बाळ गंगाधर! तुम्हीं गेलां ते तुमच्यावरोबर महाराष्ट्राची ज्ञानेश्वरी, महाराष्ट्राचें महाभारत, महाराष्ट्राचें रामायण लुप्त होऊन गेलेलें आहे. आम्हीं हजारों प्राणी तुमच्या जागीं नेण्यास योग्य होतों. तुमचीच निवड करतांना परमेश्वरानें महाराष्ट्राचें कोणतें हित पाहिलें?

---

# *लोकमान्यमय स्पेशल अंक !

सर्व अग्नींमध्यें विझविण्यास अत्यंत कठिण अग्नि म्हणजे शोकाचा अग्नि होय. जगांतील सर्व अग्नी विझतील, सर्व प्राणिमात्रांस गांजणारा अग्नि सहज उपायानें शांत होईल, उदकांच्या महासंचयामध्यें सुद्धां वडवाग्नि उपशम पावेल, परंतु विरहाच्या योगानें उद्दीप्त झालेल्या दुःखाग्नीच्या ज्वाला कधींही कमी होणार नाहींत. आणि त्यांतहि हा विरहाग्नि जर अशा एका प्रियतम व्यक्तीच्या विरहाच्या योगानें निर्माण झालेला असेल, कीं त्या व्यक्तीच्या प्रेमाला पार नाहीं, तर त्याच्या धगधगीत जिव्हा, काय देह करपवतील, कीं काय हृदय करपवतील, कीं काय व्यक्ति—भावनांशीं निबद्ध असलेल्या जगाला आग लावतील, ह्याचा कांहीं एक नियम नाहीं. विरहानें व्याकुल झालेल्या व्यक्तीला काय दिसतें ? त्या व्यक्तीला ह्या सर्व जगतांत, आगडोंबाळी वणवा दिसत असतो. त्याला वाटतें कीं नगराला आग लागलेली आहे, त्याला वाटतें कीं आप्, तेज, वायु ह्या सर्वांनीं पेट घेतलेला आहे, त्याला वाटतें कीं हें सर्व ब्रम्हांड "होळी"च्या स्वरूपांत चेतलेलें आहे, त्याला वाटतें कीं परमेश्वरानें आपलीं सर्व रूपें सध्यां बंद केलेलीं असून अग्नि, भयंकर अग्नि, सर्वभक्षक अग्नि, सर्वांचा स्वाहा करणारा अग्नि, सर्वांची होळी करणारा अग्नि, परमेश्वरानें हें आपलें एकच स्वरूप शिल्लक ठेवलें आहे. 'कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो। लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः।' परमेश्वरानें आपल्याच मुखानें आपल्या भीषणतेचें केलेलें वर्णन जर केव्हांहि यथार्थ लागू होत असेल, तर तें अशाच वेळीं होय, आणि विरहदुःखामुळें परमेश्वराचें हें वर्णन डोळ्यापुढें उभे राहिलें म्हणजे भीतीनें हृदय धडकून अर्जुनाप्रमाणें डोळे जे एकदां घट्ट मिटले जातात ते मग खुद्द परमेश्वरच त्या तिमिरांतून जागें करावयास येईपर्यंत उघडले जात नाहींत.

**शोकाचा अग्नि**

लो० टिळकांच्या स्वर्गवासामुळें महाराष्ट्राच्या स्थितीची जी अत्यंत व्याकुल अवस्था झालेली आहे, तिची अतिशय अल्प रूपरेषा जर दाखवा-

---

* संदेश ता. १५ ऑगस्ट १९२०.

वयाची असेल तर ती वरीलप्रमाणें दाखवितां येईल. परंतु ही केवळ रूपरेषा आहे. रूपरेषा कसली ? ही नुसती पुसट छाया आहे. पण ह्यांत पुसट छायाहि येत नाहीं, ह्यांत छायेची अत्यंत अंधुक अशी प्रतिछाया आहे. प्रतिछायाहि काय ? पण ह्यांत प्रतिछायेचा अस्पष्ट असा अंश आहे. वास्तविक पहातां, लोकमान्यांच्या स्वर्गवासानें महाराष्ट्राची जी करुण स्थिति झालेली आहे, तिचें वर्णनसुद्धां करतां यायचें नाहीं. लोकमान्यांच्या मृत्यूनें मोठमोठे वीर दीन गाई बनलेले आहेत. लोकमान्यांच्या मृत्यूनें सदा उल्हसित असलेलीं अल्पवयी बालकांचीं मुखकमलें कोमेजून गेलेलीं आहेत. लोकमान्यांच्या मृत्यूनें सूर्याच्या तिग्मतीक्ष्ण शोकाच्या काळ्या रेघांची छटा मारूं लागलेली आहे. लोकमान्यांच्या मृत्यूनें ब्रम्हदेवाचें कडासन मोडून गेलेलें आहे. लोकमान्यांच्या मृत्यूनें सह्याद्रीच्या पाठीचा कणा वांकून गेलेला आहे. लोकमान्यांच्या मृत्यूनें कृष्णाकांठच्या कणखर जोंधळ्यांतला कणखरपणा लोपून गेलेला आहे. लोकमान्यांच्या मृत्यूनें लोखंडाचें मेण झालेलें आहे, वज्राचा कापूस झालेला आहे, निर्धारांची कपास झालेली आहे, आणि लोकमान्यांच्या स्वर्गवासानें शेषावर पहुडलेल्या नारायणालाहि इतक्या जोराचे हुंदके आलेले आहेत कीं त्यामुळें महाराष्ट्राची विभवलक्ष्मी मुळुमुळु रडायला लागलेली आहे, शेषाला कोंपरखळ्या बसून त्याच्या अंगांतून रक्ताच्या चिळकांड्या उडालेल्या आहेत, आणि त्यामुळें नाभिकमळस्थित ब्रम्हदेव इतक्या जोरानें चेंडूसारखा वर उडून गेलेला आहे कीं त्यामुळेंच, वाचकहो, त्यामुळेंच आम्हीं वर म्हटल्याप्रमाणें त्याचें कडासन कडाडून गेलेलें आहे.

लोकमान्यांच्या स्वर्गवासामुळें महाराष्ट्रांत कोणत्या प्रकारचा हाहाःकार उडालेला आहे, ह्याची यथार्थ कल्पना खरोखर कोणालाहि करतां यायची नाहीं. एवढे लोकमान्य गणिती, पण त्यांनासुद्धां ह्याचें गणित

**माहाराष्ट्रांतील हाहाःकार.**

कधींहि करतां आलें नसतें. त्यांना जर तें गणित करतां येतें, तर महाराष्ट्राला धाय मोकलीत रडत बसवून त्यांनीं खरोखर महाष्ट्राचा त्याग केला नसता. आज महाराष्ट्रांतील प्रत्येक घर पहा, प्रत्येकावर अशी कळा आलेली आहे कीं जणूं कांहीं प्रत्येक घरांतील एकएक जिव्हाळ्याचा जीव नाहींसा झालेला

आहे. पानपतच्या लढाईनें सर्व महाराष्ट्रावर असा आकांत उडवून दिला होता कीं, त्यावेळीं सुतक नाही असें एकहि घर नव्हतें. सवाई मधवरावांनीं कारंज्यावर उडी घेतली त्यावेळीं अखिल महाराष्ट्रांत असा एकहि सहृदय जीव नव्हता कीं त्याच्या डोळ्यांत टचकन् पाणी आलें नाहीं. संभाजी महाराजांनीं धर्माकरितां डोळे फोडून घेतले, देह सोलून घेतला, त्यावेळीं ह्या महाराष्ट्रांत एक पाषाणहि असा उरला नव्हता कीं तो घटकाभर रडून घेण्याचा अधिकार प्राप्त व्हावा म्हणून मनुष्यप्राणी बनला नाहीं; आणि ज्यावेळीं ते आबासाहेब महाराज—मुलांनों, तुम्हांला आबासाहेब महाराज म्हणजे कोण ? ह्याचा नीट अर्थ कळला नसेल नाहीं ? पण हा तुमच्या अस्वाभाविक, निसर्गविरुद्ध, नीतिप्रतिषिद्ध शिक्षणाचा दोष आहे, तुमचा दोष नव्हे. तुमचे शिक्षक लोकमान्यांच्या दहावे दिवशीं शाळांचीं द्वारें उघडीं ठेवण्यांत पटाईत आहेत, पण आबासाहेब कोण हें सांगण्यास मात्र ते तयार नाहींत. मुलांनों, आबासाहेब महाराज म्हणजे ते सूर्यवंशमणि शिवाजीराजे, आबासाहेब महाराज म्हणजे तो जिजाईचा ताना, तानाजीचा पाठीराखा, स्वधर्माचा वाली, सत्याचा कुलदीप आणि महाराष्ट्रइतिहासाचा कथाकंठमणि, अतुल विक्रमशाली हिंदुपदपादशहा श्री शिवछत्रपति आणि ज्यावेळीं ते आबासाहेब महाराज स्वर्गस्थ झाले त्यावेळीं गहूंहरभऱ्याच्या, बाजरीज्वारीच्या तुरीभुइमुगाच्या, साळीतांदुळांच्या ह्या महाराष्ट्रभूमीवर अश्रूंचा एवढा पाऊस पडला कीं जरी सप्तसमुद्र ह्या देशावर वाहत गेले असते तरी ह्या भूमीला इतका क्षारपणा आला नसता.

कर्ण पतन पावल्यानंतर त्याचा रथ ज्यावेळीं शल्यानें सुयोधनाच्या शिबिरांत नेला, त्यावेळीं रथ रिकामा पाहून सुयोधनाच्या हृदयांत काय कालवाकालव झाली असेल ? सकाळीं जोमानें चक्रव्यूहांत शिरलेला अभिमन्यु रणांगणावर पडला, असें ऐकून पार्थाच्या अंतःकरणाचें काय झालें असेल ? जिवांत गोवलेला, प्रेमांत शिवलेला, मनांत भावलेला, प्रीतींत खोंवलेला अशा त्या सांवळ्या गोवळ्याला—त्या मधुर मुरलीवाल्याला, त्या कुंजविहारी लाडक्याला—त्या राधिकेच्या गोडक्याला—त्या राधिकेच्या खेळ-

गड्याला—त्या यशोदेच्या वाळक्याला—त्या श्रीकृष्णाला—मातृस्तनापासून तों चेंडुफळीपर्यंत सर्वकाळ—सर्ववेळ, सर्व चिमुकलें आयुष्य, सर्वांना वेड लावणाऱ्या त्या नंदकिशोराला ज्यावेळीं अक्रूरानें गोकुळांतून उचलून नेलें असेल, त्यावेळीं गोकुळांत ती काळरात्र कशी गेली असेल? देशबन्धूनों, लोकमान्यांच्या विरहाचें दुःख आम्हीं कोणत्या शब्दांत, कोणत्या उदाहरणांत वर्णन करूं? खरोखर हें वर्णन करायला आमचेजवळ शब्द नाहीत, हें वर्णन करायला, लोकमान्यांच्याहि अगोदर स्वर्गांत पळून गेलेल्या त्या महाराष्ट्रशाहिराला—त्या गडकऱ्याला—परत बोलवा. त्याला सांगा कीं लोकमान्यांच्या विरहाचें वर्णन करावें लागेल म्हणून त्यांच्याहि अगोदर पळून गेलास काय? चल ये, महाराष्ट्रशाहीर ही आपली पदवी तुला कायम ठेवावयाची असेल, तर लोकमान्यांच्या स्वर्गवासानें ही महाराष्ट्रभू कशी चर्रर्र झाली ह्याचें वर्णन कर. पण तूं तरी नवीन वर्णन काय करणार? तूं तरी असेंच म्हणणार कीं नाहीं, कीं श्रीशिवछत्रपतींच्या दिवंगमनानें शोकाकुल झालेल्या महाराष्ट्र—भूमीनें मोठ्या आशेनें आपल्या मांडीवर खेळ खेळण्याकरितां घेतलेला हा बाळ ज्यावेळी मोहमयीच्या दर्याकिनाऱ्यावर अचेतन होऊन पडला, तेव्हां त्या दुर्वार्तेवर विश्वास ठेवायला ती नाकबूल झाली, अग्नीच्या स्वाधीन ती त्याचा देह करीना, अग्नीनें आपल्या ज्वाळा पेटवाव्या आणि महाराष्ट्र—विभवश्रीनें आपल्या डोळ्यांतल्या जलधारांनीं त्या विझवाव्या असा क्रम सुरु झाला. शेवटीं बेफाम होऊन, केश मोकळे सोडून, खदिरांगारासारखे लाल डोळे करून, ती नीच अग्नीला म्हणाली, ‘नीचा, नराधमा, राक्षसा, दूर हो; दूर हो, माझ्या बाळाला स्पर्श करूं सकोस! मेल्या, हा अचेतन झालेला नाही. माझा राजहंस निजला आहे. त्याला हात तर लाव, म्हणजे ह्या मेघमालेची फुटकी तपेली करून, मी ती तुझ्या डोक्यांत घालीन!’

**गडकऱ्यांना परत बोलवा.**

आणि खरोखर त्या दिवशीं मेघमंडळाची फुटकी तपेली झाली. सरदारगृहांतून लोकमान्यांचा पवित्र देह वाजतगाजत व निशाणेंपताका फडकावीत समुद्रकिनाऱ्याकडे येत असतां त्या दिवशी पावसाची अशी झुम्बड उडाली, कीं बोलायची सोय नाहीं. मुंबईंत त्या पांचसहा तासांत चांगला सपाटूनच

पाऊस पडला. निदान त्या दिवसापासून आतांपर्यंत तरी इतक्या जोराचा पाऊस पडलेला आम्हांस आठवत नाहीं. ह्या पावसाखालीं नर–नारी, बालकें, सर्व भिजलीं. ह्या पावसाखालीं अश्व–गोधन–पाडसें, सर्व भिजलीं. पण त्या भिजण्याबद्दल कुणास राग आला नाहीं, कीं कोणाला आश्चर्य वाटलें नाहीं. पावसाच्या इतक्याहि झुम्बडीमधून सर्वांनीं आपलीं दीन झालेलीं तोंडें वर काढलीं आणि लोकमान्यांच्या देहाचें डोळाभर दर्शनसुख घेतलें. त्या दिवसाच्या पावसाला आमचेजवळ एकच उपमा, म्हणजे ज्या दिवशीं मथुरेच्या तुरुंगांतून गोकुळच्या राजवाड्यांत आपल्या नूतन जन्म पावलेल्या बालकाला वसुदेव रात्रीच्या निविड अन्धःकारांतून नेत होता ती होय. परंतु हाय, हाय ! त्या रात्री एक गीतारहस्यबोधक बालक जगाला भाग्यशाली करण्याकरितां जन्माला येत होतें. आणि ह्या रात्रीं एक गीतारहस्यबोधक बाळ जगाला दुर्भाग्यांत लोटून स्वर्गाकडे कूच करीत होते.

त्या दिवशीं इतका पाऊस कां पडला ? कां पडला ह्याचें काय कारण होतें बरें ? लोकमान्यांच्या चितेनें पेट घेऊं नये म्हणून भूमातेनें खरोखरीच कां मेघमंडळाची फुटकी तपेली बनविली होती ? कीं लोकमान्य स्वर्गाच्या दारांत प्रवेश करीत असतांना स्वर्गांतील सुरसुन्दरी, अमृताचे कलश त्यांचे पायावर ओतीत होती ? कीं गडकरी, केशवसुत, ख्रिस्तप्रेमी टिळक ह्या कवींचा तांडा स्वर्गद्वारापाशीं लोकमान्यांचे स्वागतार्थ काव्यरसाचा पर्जन्य पाडीत होता ? कीं स्वर्गीय आनंदाश्रमांत बसलेले कै. हरिभाऊ आपटे हे लोकमान्यांवर ‘तुटलेला तारा’ ही आपली नूतन कादंबरी लिहीत असतांना त्या करुण प्रसंगामुळें त्यांची शब्दसुधेनें भरलेली दौत स्वर्गांत पालथी झाली होती ? कीं लोकमान्य येतात, पंचवीस वर्षांनी आपल्याला भेटतात म्हणून विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळराव आगरकर, माधवराव नामजोशी, हे त्यांचे स्वर्गीय मित्र काय आनंदाश्रूंनीं डबडबलेले होते ? कीं भूमातेच्या मांडीवरून त्यांना आपल्या मांडीवर घेणारी अमरपुरी त्यांना पहिल्याच दिवशीं लाडानें न्हाऊंमाखू घालीत होती ? काय होत होतें सांगा. महाराष्ट्रबन्धूनों, काय होत होतें सांगा ! महाराष्ट्रीय लेखनकुशलांनों, काय होत होतें सांगा ! महाराष्ट्रकविजनांनों ! आपल्या

**स्वर्गांतील सुरसुन्दरी.**

कल्पनाशक्तीला वाटेल तितक्या कसोटीला लावा आणि लोकमान्यांच्या स्वर्गवासाचे दिवशीं असा धो धो पाऊस कां पडत होता ह्याचें कारण सांगा!

तो प्रसंग आमचे डोळयांपुढें अजून चित्रासारखा उभा आहे. इतके दिवस झाले, तरी तो प्रसंग आमचे डोळयांपुढून अजून हालत नाहीं. आमच्या डोळयांत डोळेपणा आहे, आमच्या मनांत मनपणा आहे, आमची पर्णकुटी शीतोष्ण स्पर्शांना जबाब द्यायला तयार आहे, तोंपर्यंत तो प्रसंग आमचे डोळयांपुढून कधींहि हालणार नाहीं. लोकमान्यांचा देह, चौपाटी लगतच्या पुलाला वळसा घालीत होता, पुढें दिंड्या चाललेल्या होत्या, निशाणें फडकडत होतीं, भजनी मेळे गात होते, परमेश्वराच्या गर्जनेचा गंभीर ध्वनि चोहोंकडे उसळत होता, 'लोकमान्य टिळकमहाराजकी जय' 'लोकमान्य टिळकमहाराजकी जय' अशा ललकाऱ्या त्या गंभीर ध्वनींत मिसळत होत्या आणि इकडे पाऊस तर असा पडत होता कीं जणूं कांहीं आकाशाची शिवणच उसवलेली होती. अशा वेळीं काय होत होतें? जो तो आपली मान उंचावीत होता. जो तो पुढें येण्याची खटपट करीत होता, जो तो धक्के खात होता व देत होता, लहान मुलें सूर्यमंडळासारखीं आपलीं लहानशीं तोंडें घेऊन आपल्यालाहि पहायला सांपडेल काय? म्हणून आशेनें गर्दींत शिरतच होतीं. कित्येक दयाळु माणसें त्यांना आपल्या खांद्यावर घेऊन त्यांची लालसा पूर्ण करीत होतीं 'हिंदुमुसलमान! टोपी निकालो,' असे व्हॉलंटीयर लोकांचे हुकुम गर्जतच होते. अशा वेळीं, अशा ह्या संस्मरणीय वेळीं, एक सुमारें पस्तीस चाळीस वर्षांचा तरुण ख्रिस्ती मनुष्य, साठ वर्षें वयाच्या आपल्या वृद्ध आईला घेऊन तेथें आला होता. त्याचें अंतःकरण आज एका पवित्र विचारानें भरलेलें दिसत होतें. जवळ उभे असलेले मुसलमान, मागें पुढें खेचलेले व रेचलेले हिंदू आणि पार्शी, ह्यांचा प्रचंड जमाव पाहून आपण आपल्या कर्तव्याला चुकलों नाहीं, अशाबद्दल त्याच्या मनाला समाधान वाटत होतें. इतक्यांत पावसाची मुसळधार आली. त्याची ती वृद्ध आई गोंधळली. तिच्या वृद्ध देहाला पावसाचा प्रचंड मारा पीडा देऊं लागला. इकडे टिळकांना मिरवीत मिरवीत हळुहळू येत असलेला देह आणि इकडे आपल्या म्हाताऱ्या आईची पावसानें उडत असलेली दुर्दशा पाहून, तो ख्रिस्ती मनुष्य हळूच

तिला म्हणाला, आई, घाबरूं नकोस बरें. हे पहा टिळकांकरितां देवसुध्दां रडत आहेत. ( मा ! लुक हिअर, ईव्हन गॉड इज वीपिंग फॉर मि. टिळक. )

खरोखर ह्यापेक्षां अधिक हृदयस्पर्शी असें दुसरें कांहींतरी असेल काय ? 'मा, ईव्हन् गॉड इज वीपिंग फॉर मि. टिळक' ह्यापेक्षां विरहव्यथेचें हृदयस्पर्शी वर्णन कोणाला तरी करतां येईल काय ? खरोखर लोकमान्यांचा

**गॉड इज वीपिंग !**

विरह वाटून परमेश्वरसुद्धां त्या दिवशीं रडला. हिंदुस्थानांत चाळीस वर्षे लोकमान्यांना एकसारखें पहाण्याची संवय झालेला तो परमेश्वर त्या दिवशीं त्यांच्या विरहानें रडला. महाराष्ट्र आणि लोकमान्य, ते अलग अलग आहेत असें पहाण्याची कधींहि आपत्ति न आलेला परमेश्वर त्या दिवशीं लोकमान्यांच्या विरहामुळें रडला, आपणां-प्रमाणेंच लोकमान्यहि सर्वव्यापी आहेत, निदान महाराष्ट्र देश तरी त्यांनीं आपल्याप्रमाणेंच सर्वतोव्याप्त करून टाकलेला आहे असें पाहून 'शिष्यादिच्छेत् पराजयं' या न्यायानें माना डोलवणारा परमेश्वर त्या दिवशीं लोक-मान्यांच्या विरहानें धाय मोकलून रडला. कृतांतानें आपल्याला फसविलें, लोकमान्यांच्या निर्गमनाची वर्दी त्यानें आपल्याला दिली नाहीं, ह्या विचा-रानें क्रोधायमान झालेला परमेश्वर त्या दिवशीं लोकमान्यांच्या विरहानें रडला. लोकमान्यांच्या दुखण्यांत नवव्या दिवसानंतर त्यांच्या निर्याणाचा हुकुम फिरीव अशी आज्ञा केली असतांनाहि, रात्रीं चोरट्याप्रमाणें त्या हुकुमाची तामिली करणारा बेशिस्त यमधर्म आमच्यापुढें आणून हाजीर करावा असा विचार मनांत आणणारा परमेश्वर त्या दिवशीं लोकमान्यांच्या विरहामुळें रडला. अन्यायाचा प्रतिकर्ता कोणी उरला नाहीं, ह्या विचारानें त्या दिवशीं परमेश्वर रडला. धर्माचा आधार तुटला, ह्या विचारानें त्या दिवशीं परमेश्वर रडला. 'अद्य गीता निराधारा, निरालंबा तथा मही' असा दुःखाचा विचार मनांत येऊन भगवद्‌गीतेची निराश्रय स्थिति, जनतेची असहाय अवस्था, आणि महाराष्ट्रभूची वलापलहरी डोळ्यांपुढें ढळढळीत दिसायला लागून त्या दिवशीं परमेश्वर रडला.

लोकमान्यांसारखा सद्‌गुणांचा सागर, धैर्याचा मेरु आणि निश्चयाचा हिमगिरी पुन्हां निर्माण होणें अशक्य आहे. लोकमान्यांसारखीं नररत्नें हीं अशा प्रकारच्या विभूतींपैकीं आहेत कीं शतकेंच्या शतकें जावीं लागतात,

**टिळकांचें अद्वितीयत्व.** तेव्हां असें एखादें नररत्न हातीं येतें. जगांतील रोजच्या मालापैकीं, लोकमान्य ही वस्तु नव्हे. जरा कुठें घांसूनपुसून ठेवलें, किंवा जरा कुठें जिल्हई दिली कीं चमकायला लागायचें, अशाप्रकारच्या नकली पदार्थांपैकीं लोकमान्य नव्हेत. लोकमान्यांच्या मागें पाहायला लागलें म्हणजे एकदम शिवाजी दिसायला लागेल कीं काय असेंच वाटतें, आणि लोकमान्यांच्या पुढें पहायला लागलें तर लोकमान्य ही गादी अनेक शतकें रिकामीच राहाणार, अशी भीति वाटायला लागते. सुदैवानें श्रीशिवाजी महाराजांनीं निर्माण केलेली इतिहासगंगा इतकी ठणठणीत कोरडी नाहीं, कीं त्यांत शिवाजी हा एकटाच मोठा पुरुष होऊन गेला. शिवाजीच्या मागोमाग आलेला संभाजी हा कितीहि मूर्ख अथवा दुष्ट असला तरी अंग सोललें जात असतांहि, शत्रूच्या जुलमी हुकुमाप्रमाणें वागण्याचें निश्चयानें नाकारणारा संभाजी हा शिवाजीला शोभेल असाच मुलगा होता, हें खात्रीनें कबूल करावें लागतें. त्याचप्रमाणें खूप शर्तीनें राज्य राखणारा राजाराम, गंगानदीपर्यंत भीमथडीचीं तट्टें उधळींत नेणारे संताजी आणि धनाजी, घोड्यावर बसल्याबसल्या कणसें चोळणारा बाजीराव, पानिपतचा पराभव हुदडून लावणारा माधवराव, इंग्रजांना वडगांव मुक्कामीं चुरमुरे खायला लावणारा महादजी आणि स्वराज्यरक्षणाची शिकस्त करणारा नाना–त्याचप्रमाणें जिजाबाई, ताराबाई, गोपिकाबाई, अहिल्याबाई अशा मानधन आणि महाराष्ट्राची अब्रू राखणाऱ्या स्त्रिया, ह्या सर्व नरनारींनीं महाराष्ट्र–इतिहासाची रत्नपेटिका इतकी भरगच्च भरलेली आहे कीं त्यापैकीं कोणाहि एकाचें नांव, प्रत्येक मराठी गड्याचें तोंड उजळच करील. महाराष्ट्राचा आधुनिक इतिहासहि अगदींच नापीक, खडकाळ नाहीं. ह्याहि इतिहासांत, विष्णुबुवा ब्रह्मचारी, विष्णुशास्त्री पंडित, विष्णुशास्त्री चिपळूणकर महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, गोपाळ गणेश आगरकर इत्यादि अशी जबरदस्त माणसें निर्माण झालेलीं आहेत, कीं त्यांनीं काल बदललेला आहे, इतिहासाला नवीन वळण लावलेलें आहे. पण शिवकालीन इतिहासांत ज्याप्रमाणें एकच जंगी माणूस सांगा म्हटलें, तर आपणांस श्रीशिवाजी महाराज असेंच म्हणावें लागेल, त्याप्रमाणें आधुनिक इतिहासांत एकच प्रचंड व्यक्ति अथवा एकच प्रचंड शक्ति सांगायचा प्रसंग आला असतांना श्री. बाळ गंगाधर टिळक ह्यांचेंच नांव निःसंशय सांगावें लागेल.

आम्हां राष्ट्रीयांस ह्या गोष्टीचा अभिमान वाटतो. नेमस्त-पक्ष, जहाल-पक्ष, प्रागतिक-पक्ष, राष्ट्रीय-पक्ष, आस्तेकदम-पक्ष, जल्दीकदम-पक्ष, ह्या दोन पक्षांत, आम्हां राष्ट्रीयांच्या वांटचास देवानें लोकमान्यांना दिलें ह्या-

**टिळक आणि पक्षभेद.**

बद्दल आम्हांस फार फार आनंद वाटतो, ह्याबद्दल देवाचे आम्हांवर फार उपकार आहेत, त्याबद्दल देवाचे आम्हीं फार कृतज्ञ आहोंत. परंतु ज्या मानानें देवाचा मोठा उपकार, ज्याप्रमाणें देवाचें हें मोठें ऋण, ज्या हिशोबानें देवाची ही मोठी कृपा, त्याच मानानें आमचा—आम्हां राष्ट्रीयपक्षांतल्या लोकांचा—अत्यंत मोठा आधार तुटलेला आहे. लोकमान्यांच्या मृत्यूनें आमचा कौस्तुभमणि, आमचें स्यमंतक रत्न, आमचा कोहिनूर हिरा हरपून गेलेला आहे. लोकमान्यांच्या ह्यातींत आम्ही जितके श्रीमंत होतों, तितके आतां निर्धन झालेले आहोंत; त्या वेळीं जितके आम्ही सामर्थ्यवान् होतों, तितके आज असमर्थ झालेले आहोंत; आम्ही त्या वेळीं जितके उमेदीवर होतों, तितकेच आज निरुत्साही आणि नाउमेद झालेलों आहोंत. लोकमान्य होते तोंपर्यंत आम्हां सर्वांवर छत्र होतें, त्यांचा भयंकर पाठिंबा आम्हांला होता. लोकमान्य होते तोंवर आमच्या चुक्यांना चुक्या म्हणण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती, आमचा हात धरायची कोणाची छाती नव्हती, आम्हांला फट् म्हणण्याची कुणाची हिंमत नव्हती, तोंपर्यंत आम्ही सर्व राजबिंडे दिसत होतों. कारण येथील "प्रजामित्र" नांवाच्या पारशी वर्तमानपत्रानें म्हटल्याप्रमाणें "बिनमुगुटि महाराष्ट्र—नरपति" लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, ह्यांच्या राजकारणाच्या राजवाड्यांत आम्हीं वावरत होतों. लोकमान्यांच्या विरहानें आमचें तें सर्व वैभव नाहींसें झालेलें आहे. आमचा महाराष्ट्रपक्ष आतां पोरका पडलेला आहे. आमचें राष्ट्रीयपक्षाचें तेज छायामय झालेलें आहे. लोकमान्यांच्या स्वर्गवासाची बातमी ऐकल्याबरोबर आमच्यांतील कांहीं पुढारी मूर्छित पडले, कांहीं देहभान विसरले, कांहींनीं अन्नोदक सोडलें, कांहींच्या आयुष्यांतील उमेद कायमची गेली, आणि कांहीं लहान मुलांप्रमाणें ओक्साबोक्सीं रुदन करूं लागले, ते त्यामुळें होय. लोकमान्यांच्या आधाराचें भरभक्कम भांडवल आम्हांला पुरविण्यांत भवितव्यतेनें आमचेवर जितकी मेहेरनजर केलेली होती, तितकीच त्यांना

आमचेमधून उचलून नेण्यांत तिनें आमच्यावर अवकृपा केलेली आहे. पानपतांत विश्वासराव आणि सदाशिवराव पडल्याचें ऐकून एवढा कार्य-धुरंधर पेशवा नाना, पण त्याचीहि कंबर खचली! नवल नाहीं कीं लोकमान्यांच्या स्वर्गवासाची हकीकत ऐकून आमचीहि कंबर खचून जावी!

खरोखर हें लिहीत असतांहि आमच्या डोळ्याचें पाणी खळत नाहीं, आमची लेखणी लटपटूं लागते, आमच्या हृदयाला कंप सुटतो. लोकमान्य आमच्यांत नाहींत ही कल्पनाच आम्हाला सहन होत नाहीं. ही कल्पना आमच्या सर्व विचारशक्तींचा लोप करून टाकते. आमच्या शिरावर लोकमान्यासारखा राष्ट्रधुरीण आहे ही आमची समजूत आमच्या हाडींमाशीं इतकी खिळलेली होती कीं त्या लोकमान्यांवांचून जगाच्या अस्तित्वाची समजूत पटत नाहीं. त्यांच्या शिवाय आमचें अस्तित्व आम्हांस अशक्यच वाटतें. आम्हीं हयात नसून, आमचीं शवेंच येथें आहेत अशी आमची कल्पना होते. आमचा प्राण ता. ३१ जुलै रोजीं आमच्या कुडींतून निघून गेलेला आहे, असें आम्हांस वाटतें. ह्याबद्दल आम्हांस भ्याड म्हणा, पळपुटे म्हणा, निर्माल्य म्हणा, आम्हाला कचरा म्हणा कीं आम्हाला चुकार म्हणा. पण आम्हांस लोकमान्यांकरितां भरपूर रडलें पाहिजे आणि तें आम्हीं रडून घेणार! रडणें हें पुरुषांना शोभतें कीं नाहीं ह्याचा विचार सध्यां आमच्याजवळ नाहीं. विलाप करणें हा स्त्रियांचा हक्क आहे कीं काय, हें आम्हाला विचारूं नका. अश्रू ढाळणें हे मर्दाला लांछन आहे, असल्या भागूबाईच्या गोष्टी आम्हाला सांगू नका. आम्हीं रडणार, भरपूर रडणार, आमचें सर्व प्रेम, सर्व भक्ति, सर्व श्रद्धा, सर्व निष्ठा ह्यांना आम्हीं अश्रुरूप करणार, आणि लोकमान्यांच्या विरहाकरितां आम्हीं इतके अश्रू ढाळणार कीं तुमचा विरोध, तुमचा उपहास, तुमची निंदा ही सुद्धां त्यांत वाहून जावीं!

**अनावर शोक.**

कारण लोकमान्य हे आमच्या पित्याच्या ठिकाणीं होते. मातेची वत्सलता त्यांचे अंगीं होती. भावाचा पाठीराखेपणा ते करीत असत. ते आमचे गुरु होते. ते पंतोजीप्रमाणें हाताला धरून वळण देत. शिक्षकाप्रमाणें छड्या मारीत, प्रोफेसराप्रमाणें ज्ञान देत. ते आमच्यांतील ज्येष्ठ पुरुष होते, श्रेष्ठ पुरुष होते, ते आपल्या पक्षांतील पुराणपुरुष होते. ते आमच्या मळ्यां-

तील ताईत होते, दंडांतील अनंत होते. ते आमच्या मस्तकावरील वैभवाचा मुगुट होते. लोकमान्य हे आमच्या देव्हाऱ्यांतील 'बाण' होते, ते आमच्या देवालयांतील दत्तात्रय होते. ते गेले ह्यांत आमचा कोणता आप्त गेला नाहीं ? कोणता नातेवाईक हरवला नाहीं ? कोणता स्नेही लोपला नाही ? लोकमान्यांच्या स्वर्गवासामुळें आमचा कोणता देव्हारा रिकामा पडला नाहीं ?

आणि म्हणून, महाराष्ट्रीयांनों, लोकमान्याकरितां शोक करायला तुम्ही लाजूं नका, ह्यांत कमीपणा नाहीं, दुबळेपणा नाहीं. महाराष्ट्रीयांनो, यांत कोणतीहि लाज नाहीं. लोकमान्यांकरितां विलाप करणें हा तुमचा हक्क आहे आणि हा हक्क तुम्ही न लाजतां बजावा.

**लोकमान्यांसाठीं रडा !**

लोकमांन्यांसाठी तुम्हीं पर्वा तिलमिश्रित जलहि त्यांना अर्पण केलेंत, पण अश्रुमिश्रित जलहि त्यांना अर्पण करायला विसरूं नका. रडणें हे मानवपणाला लांछन नाहीं. मानवपणाचें तें भूषण आहे. मानवपणाचा तो हक्क आहे. तो जन्मसिद्ध हक्क आहे. तोच खरा मानव कीं ज्याचें हृदय फुलाप्रमाणें नाजुक असतें, आणि पाषाणापेक्षांहि कठोर असतें. हा प्रसंग पाषाणापेक्षां कठोर असण्याचा नाहीं. आम्हीं हा प्रसंग फुलाप्रमाणें किंबहुना फुलापेक्षांहि जास्त नाजुक असण्याचा आहे. ह्या वेळीं मृदु बना, नाजुक बना, लवणारे बना, ह्यावेळीं विरघळून जा. कारण दुःखानें जो विरघळूं शकतो, तो धैर्याचा प्रसंग आला असतां दगडासारखा कठोर आणि निश्चयी बनतो. लोकमान्य दोन्ही होते. महाराष्ट्रीयांनो, तुम्ही दोन्हीहि व्हा.

कारण हा विलाप संपल्याबरोबर पाषाणासारखें घट्ट अंतःकरण बनविण्याचा प्रसंग तुमच्यावरतीं येणार आहे. आतां तुमचा पाठीराखा गेला, वाली गेला, मार्गदर्शक गेला. आतां तुमचें नशीब तुम्हांलाच आपल्या हातीं घेतलें पाहिजे. पित्याच्या मृत्यूनंतर ज्याप्रमाणें मुलगा हा एकदम पोक्त होतो, त्याप्रमाणें आतां एकदम पोक्त होण्याचा प्रसंग तुमचेवर आलेला आहे. यावेळीं तुम्हाला रडतां उपयोगी नाहीं. या वेळीं

**महाराष्ट्राची अब्रू.**

तुमचीच अब्रू तुमच्या हातांत आहे एवढेंच नव्हे, तर लोकमान्यांचीहि अब्रू तुमच्या हातांत आहे. ज्याप्रमाणें मुलगा पित्याची अब्रू जास्त उज्ज्वल करूं शकतो, अथवा

कलंकितहि करूं शकतो, त्याप्रमाणें लोकमान्यांची अब्रू जास्त उज्ज्वल करणें अथवा कलंकित करणें हें तुमच्या हातीं आहे. सर्व महाराष्ट्र हा आज लोकमान्यांचा पुत्र आहे, लोकमान्यांना दोनच पुत्र नसून महाराष्ट्रांतील प्रत्येक निधडया छातीचा देशभक्त हा त्यांचा पुत्र आहे. लोकमान्यांचा अभिमान प्रत्येक पुत्राला धरला पाहिजे. पण त्याचे अगोदर महाराष्ट्रीयांनों! रडा, लोकमान्यांकरितां पोटभर रडा. लोकमान्यांकरितां पोटभर अश्रू ढाळणें, हें लोकमान्यांबद्दलचें तुमचें कर्तव्य आहे. आणि आपल्या अश्रूंची तिलांजली आपण आपल्या राष्ट्रजनकाला–लोकमान्यांना–देत असतां, जर कोणी आपणांस भागूबाई म्हणेल तर अशा प्रसंगीं आपणाला हंसणारा नरशार्दूलच स्वतः भागुबाई ठरेल !

लोकमान्य हे राष्ट्रीय पक्षाचे जनक, आधारस्तंभ, आणि मार्गदर्शक होते, हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. त्यांच्या स्मृतीचा जास्त हक्क आम्हांला आहे, त्यांच्या कीर्तीचा जास्त अधिकार आम्हांला आहे, त्यांच्या कार्याचा जास्त वारसा आम्हाला आहे आणि त्यांच्या नांवाची जास्त जबाबदारीहि पण आमचीच आहे. पण इतकें जरी असलें तरी लोकमान्यांचे विरोधी म्हणून गणल्या जाणाऱ्या प्रत्येक पक्षानें आणि प्रत्येक समाजानेंहि त्यांच्या स्वर्गवासानंतर त्यांच्या स्मृतीवर कृतज्ञतेचीं पुष्पें वाहिलेलीं आहेत हें बोलून दाखविण्यास आम्हांस अत्यंत आनंद वाटतो. लोकमान्यांच्या अत्यंत विरोधकांपैकी प्रमुख म्हटले म्हणजे ना. रँगलर परांजपे हे होत. खरोखर अत्यंत

**प्रतिपक्षी रँ. परांजपे.**

आनंद वाटतो कीं, लोकमान्यांना अत्यंत तुच्छ गणणारे, पदोपदीं त्यांचा मार्ग खुंटविणारे, भर सभेंत त्यांच्या थोरणाला विघ्नें आणण्याकरितां जाणारे आणि ते विलातेहून जाऊन आले असतां त्यांना मानपत्रहि देऊं नका असें म्हणणारे, ना. रँगलर परांजपे हेच होते. पण आम्हांस कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं, लोकमान्यांच्या विरोधकांपैकीं हे अत्यंत प्रबळ विरोधक असून सुद्धां, लोकमान्यांच्या गुणसमुदायाची साक्ष द्यायला ते आनंदानें पुढें आले, एवढेंच नव्हे तर त्यांच्याविषयीं त्यांनीं इतक्या मोकळेपणाचे आणि इतक्या प्रेमळपणाचे उद्गार काढले आहेत कीं, ते वाचून मन हालल्यावांचून रहात नाहीं. सार्वजनिक आयुष्यांत जें विशेष लक्षांत ठेवावयाचें असतें तें हें कीं, दोन

व्यक्तींचा एकाद्या सार्वजनिक विषयांत मतभेद झाला म्हणून ते एकमेकांचे शत्रू झाले असें नव्हे; किंबहुना एकाच देशमातेच्या हितासाठीं आणि सेवेसाठीं आपल्या मतभेदाप्रमाणें, प्रामाणिकपणानें भांडणाऱ्या दोन सार्वजनिक व्यक्तींनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ज्याप्रमाणें नदींत किंवा समुद्रांत मारलेलें वल्हें हें जरी पाणी दुभंग करतें तरी तें पुन्हा मिळण्याकरितांच असतें, त्याप्रमाणेंच, सार्वजनिक वादांतील मतभेद हे ज्या मानानें तीव्र होत जातात, त्याच मानानें त्या दोघां व्यक्तींचीं मनें नंतर एक होत गेलीं पाहिजेत. ना. परांजपे यांनीं हें तत्त्व उत्तम प्रकारें लक्षांत ठेवलें; एवढेंच नव्हे तर अंतःकरणांतला सर्व ओलावा त्यांनीं लोकमान्यांच्या स्तुति-उद्गाराचे वेळीं दाखविला त्याबद्दल ना. परांजपे ह्यांची जितकी प्रसंसा करावी तितकी थोडीच आहे.

लोकमान्यांच्या विरोधकांत त्यांच्याविषयीं अत्यंत जिव्हाळ्याचे उद्गार काढणारे दुसरे गृहस्थ म्हणजे रा. रा. वालचंद रामचंद कोठारी हे होत. त्यांचा लोकमान्याविषयींचा लेख इतका अंतःकरण तोडणारा आहे कीं,

**प्रतिपक्षी रा. कोठारी.**

इतका सुन्दर लेख आमचे वाचनांत दुसरा कोणताहि आलेला नाहीं. रा. रा. कोठारी ह्यांचा लोकमान्यांविषयींचा विरोध प्रख्यात आहे. लोकमान्यांविषयींच काय, पण सामान्यतः ब्राम्हण ज्ञातीविषयीं त्यांच्या लेखांत एकादा दुसरा चांगला शब्द शोधूं जाणें म्हणजे खाणावळीच्या आमटींत डाळीचे दाणे शोधण्याइतकेंत हास्यस्पद असतें. रा. रा. कोठारी आणि लोकमान्य यांच्या विरोधाला गेल्या सहा महिन्यांत तर इतका ऊत आलेला होता कीं जवळ जवळ त्यांची मैत्री म्हणजे अग्नि आणि पाणी त्यांच्या मैत्रीइतकीच अशक्य होती. एकवार लोकमान्य आणि रँगलर त्यांच्यामधून विस्तव जाईल पण कोठारी आणि लोकमान्य त्यांच्या अंतःकरणाची मिळणी कधींहि होणार नाही, हा जणुं ठरलेला सिद्धांत होता. पण इतकें असून रा. रा. कोठारी यांनी विरोधांना फक्त मतभेदांतच डांबून, लोकमान्यांची जळजळीत देशभक्ति ओळखली, सार्वजजनिक रीत्या तशी कबुली द्यायला संकोच बाळगला नाहीं, हें आम्हीं राष्ट्राचें मोठें मांगल्य समजतों.

ह्यानंतर ज्या विरोधकांचा आम्हांस उल्लेख केला पाहिजे, ते लोकमान्यांचे प्रसिद्ध प्रतिपक्षी सर नारायणराव चंदावरकर हे होत. हे लोकमान्यांच्या आजारांत मुद्दाम लोकमान्यांच्या समाचारासाठीं गेले होते. त्यानीं त्या वेळीं, त्याचे नंतर आणि त्याचे पूर्वी काढलेले उद्‌गार अत्यंत प्रशंसनीय आहेत. आम्हांस असेंहि म्हणतां येईल कीं लोकमान्यांना 'ग्रेट' (थोर) म्हणणारे सर नारायण हेच प्रथम होत. सर नारायणांचें हें 'डिक्टम' ऊर्फ कवच, मित्रांनीं आणि शत्रूंनीं लक्षांत ठेवण्याजोगें आहे. सर नारायण हे लोकमान्यांचे आरंभापासून अखेरपर्यंत बिनप्रत्यवाय प्रतिरोधी होते. ताई महाराजांच्या खटल्यांत हायकोर्टाचे खुर्चीवरून त्यांनीं लोकमान्यांवर जें टीकास्त्र सोडलेलें होतें, त्यामुळें खाजगी खर्चाच्या दृष्टीनेंहि लोकमान्यांवर विलक्षण संकट आलेलें होतें. तथापि ह्या सर्व विरोधानंतर लोकमान्यांचे गुण लक्षांत ठेवणें, ते ओळखणें व ते सार्वजनिकरीत्या बोलून दाखविणें ह्यांस अतिशयच धैर्य लागतें. पण हें नीतिधैर्य सर नारायण ह्यांनीं उत्कृष्ट तऱ्हेनें दाखविलेलें आहे. आणि म्हणून ह्या अश्रुभरांत त्यांचेंहि कौतुक करणें आम्हांस इष्ट आहे.

**प्रतिपक्षी सर नारायण.**

ह्या मातृभूचीं जितकीं मुलें आहेत, तितक्या सर्वांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आपले मतभेद अथवा आपलें मतैक्य ह्या सर्वांचें मूळ एक— म्हणजे मातृभूमीच्या कल्याणाची इच्छा हें होय. जोंपर्यंत हें मूळ आहे, तोंपर्यंत मतभेद संभवतात, कलह संभवतात, पक्ष—प्रतिपक्ष संभवतात, परंतु द्वेष खात्रीनें संभवत नाहीं. महाराष्ट्राचें शहाणपण इतकें खास लयाला गेलेलें नाहीं कीं, मतभेदाचें परिवर्तन द्वेषांत होऊं शकेल, अथवा कलहाचें रूपांतर वैरामध्यें होईल. मतभेद निराळा, द्वेष निराळा, कलह निराळा, वैर निराळें, हें तत्त्व सार्वजनिक कार्यकर्त्यांनीं कधींहि विसरणें योग्य नव्हतें. टिळक—आगरकर कुठें भांडले नाहींत? असे कोणते अपशब्द होते कीं जे एकमेकांनीं एकमेकांविषयीं उच्चारले नाहींत! एकानें दुसऱ्यास गंजीवरचा कुत्रा म्हणावें आणि दुसऱ्यानें पहिल्यास ग्रामसिंह म्हणून त्याची हेटाळणी करावी हा प्रकार कित्येक वर्षेंपर्यंत धूमधडाका चालू होता. एकमेकांचे दरम्यान

वकील-बॅरिस्टरांच्या नोटिसाहि होऊन गेल्या होत्या. टिळक ज्यावेळीं कौन्सिलकरितां उमेदवार म्हणून १८९५ सालीं उभे राहिले त्यावेळीं त्यांचे विरोधी कोण होते ? दुसरे कोणी नव्हते, गोपाळ गणेश आगरकर हेच होते. पण टिळकांची खात्री होती कीं आपल्यावर जर कांहीं जडभारी प्रसंग ओढवेल तर गोपाळराव आगरकरच आपल्या बाजूला उभे रहातील, आणि आगरकरांचीहि खात्री होती कीं, आपल्याला जरी पाठचा

**खांदेकरी टिळक.**

भाऊ नाहीं, तरी टिळक हेच आपले खरे भाऊ आहेत. आगरकर ज्यावेळीं अंथरुणावर पडले त्यावेळीं त्यांनीं टिळकांचें स्मरण केलें आणि गोपाळरावांचेसाठीं जी भव्य स्मशानयात्रा निघाली त्यांत लो. टिळक हेच प्रमुख खांदेकरी होते. ना. गोखले ह्यांचे मृत्यूचे वेळीं, लोकमान्य मुद्दाम सिंहगडाहून त्यांच्या सन्मानार्थ धांवून आले आणि कै. महादेव गोविंद रानडे हे ज्यावेळीं मुम्बईंत वीस वर्षांपूर्वीं वारले, त्यावेळीं लोकमान्य त्यांचे सन्मानाकरितां पुण्याहून येथें आले; हें तर राहोच, पण न्या. रानड्यांच्या मृत्यूवर त्यांनीं इतक्या कळवळून लेख लिहिला कीं त्यांच्या परम भक्तांपैकीं एकाहि लेखकाच्या लेखणींतून तसा अंतःकरणाचा गद्‌गदितपणा प्रकट झाला नाहीं.

आणि असें होणें साहजिकच होतें. कारण ज्या राजकारणाची परंपरा टिळकांनीं चालविली, वाढविली व दृढ केली, त्या राजकारणाचे आद्यप्रवर्तक रानडे हेच होते. राजकारण हा एक मंत्र आहे, ही एक विद्या आहे, हें एक शास्त्र आहे. ह्या शास्त्राला इतर शास्त्रांप्रमाणेंच मंत्रद्रष्टे ऋषि लागतात. रानडे हे ऋषि होते. ज्याप्रमाणें टिळक हे लोकमान्य

**'लोकमान्य' पदवी.**

ह्या पदवीनें विभूषित आहेत, ज्याप्रमाणें 'नामदार' ह्या पदवीनें गोखल्यांचा अर्थबोध होतो, ज्याप्रमाणें धर्ममार्तंड म्हणजे कै. भाऊशास्त्री लेले आणि सर म्हणजे सर भालचंद्र, त्याप्रमाणें हे 'महर्षि' ह्या पदवीनें प्रसिद्ध होते. ह्या पदव्या सरकारनें किंवा एकाद्या संस्थेनें दिलेल्या असल्यापेक्षां लोकांनींच दिलेल्या असतात असें म्हटलें तरी चालेल. रानड्यांना महर्षि ही पदवी लोकांनींच दिलेली होती. त्यांत सरकारचा संबंधहि नव्हता; तथापि पदव्या प्रचारांत आणणें ही गोष्ट मुख्यतः लोकांच्याच हातीं असते.

ण्यांत सरकारचा फारसा संबंधहि नसतो. मुंबईत इतके सर आहेत, पण मी सरसाहेबांच्या घरीं गेलों होतों, असें म्हटलें म्हणजे सर भालचंद्रांच्याच घराचा अर्थबोध होतो, दुसऱ्याचे घराचा अर्थबोध होत नाहीं. अशा लोकदत्त अथवा लोकरूढ पदव्यांपैकीं महर्षि ही पदवी होती व रानड्यांचें आयुष्यकृत्य जर लक्षांत आणलें, तर त्याचें कारण काय असावें हें सहज लक्षांत येतें आपल्या आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास शिवाजी महाराजांपासून होतो असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. ह्याच्या पूर्वीचा इतिहासहि अत्यंत उज्ज्वल आहे आणि तोहि अभिमानास्पद गोष्टींनीं खच्चून भरलेला आहे. परन्तु सामान्यतः आपणांस शिवाजीपासूनचाच इतिहास माहित असतो. शिवरायानें ज्या स्वराज्याची मांडणी केली त्याचा धागा दुसऱ्या बाजीरावापाशीं संपला. आणि तेथपासून ह्या महाराष्ट्राच्या इतिहासांतील एका नव्या युगाला आरंभ झाला. हें युग अर्थातच पराधीनतामय आहे. पारतंत्र्य ही यांतली जुळणीची सांखळी आहे. परावत्तता हें याचें स्वरूप आहे. महाराष्ट्रीय लोक आणि इंग्रज लोक ह्यांचा संबंध जर तुल्य अधिकाराच्या अथवा तुल्य योग्यतेच्या नात्यावर जुळला गेला असता, तर महाराष्ट्रांत आज जे प्रश्न आणि ज्या चळवळी उत्पन्न झालेल्या आपण पाहतों, त्यांपैकीं एकहि प्रश्न उपस्थित झाला नसता. एशिया खंडांत हिंदुस्थान हें एकच राष्ट्र नाहीं. हिंदुस्थानच्या उत्तरेला चीनचें राष्ट्र आहे, त्याच्या ईशान्येस जपान हें राष्ट्र आहे. यूरोपांतील लोकांच्या झुंडी जर कोणत्याहि योगायोगामुळें आपल्याकडे न लोटतां ह्या देशांकडे किंवा पश्चिम बाजूकडील राष्ट्रांकडे लोटल्या असत्या तर इतिहास किती व कसा बदलला असता ह्याचा आज तर्क करणें अशक्य आहे. कदाचित् त्या वेळीं असें होण्याचा संभव होता कीं, जर्मन आणि इंग्लिश ह्यांचेमधील पर्वाच्या घनघोर युद्धांत जपानला इंग्लंडकरितां रिक्रूटभरती करण्याचा प्रसंग आला असता आणि आपणां हिंदुस्थानवासी लोकांना संयुक्तांचा मित्र होण्याचा मान मिळून काऊंचाऊं येथें जर्मन लोकांशीं चाऊ-म्याऊ करण्याची जबाबदारी आपणांवर पडली असती. पण काय झालें असतें हा येथें प्रश्न नाहीं. काय झालें, हा प्रश्न आहे. कदाचित् परमेश्व-

राची अशीच इच्छा असेल कीं स्वातंत्र्यहानीच्या कडू गोष्टी सर्वांचे अगोदर आधण गिळून नुसता आपलाच परावलंबनरोग नव्हे तर इतर राष्ट्रांचाहि परावलंबनरूपी ताप आपण बरा करावा ! परमेश्वराचा खरोखर काय उद्देश असेल तो असो. पण वस्तुस्थिति मात्र अशी आहे कीं सबंध एशिया खंडांत फक्त हिंदुस्थानचाच स्वातंत्र्य–तिलक पहिल्या प्रथम पुसला गेला, महाराष्ट्राचें स्वातंत्र्य गमावलें, महाराष्ट्राचें वैभव नामशेष झालें, ह्या गोष्टीचा महाराष्ट्रांतील तरुण लोकांवर अत्यंत अनिष्ट परिणाम झाला. त्यांच्या तारुण्यांतला तरुणपणा नष्ट झाला. त्यांच्या अंगातला जोम लुप्त झाला, त्यांच्या मनांतली उमेद नष्ट झाली. तरुणांचें तारुण्य तेंच कीं ज्यांत कांहीं एक अशक्य दिसत नाहीं. स्वराज्य गेलें म्हणून

**तरवारीचे कोयते !**

काय झालें ? सैन्य घरीं बसलें म्हणून काय झालें ? लढवय्यांनीं तरवारीचे कोयते बनविले म्हणून काय झालें ? एवढेंच नव्हे तर भवितव्यता–चेटकीनें आपल्या जादूच्या पोतडींत सर्व महाराष्ट्राला घालून खुळ्‌खुळ् खुळ्‌खुळ् वाजविलें म्हणून काय झालें ? आम्हीं आहोंत तर स्वराज्य खेंचून आणूं, आम्हीं आहोंत तर स्वराज्य काळाच्याही दाढेंतून हिसकावून काढूं, असा हिय्या धरणारा तरुण लोकांचा वर्ग जोंपर्यंत राष्ट्रामध्यें असतो तोंपर्यंत त्या राष्ट्रांत तरुण लोक आहेत असें म्हणावें, नाहींतर त्यांतील प्रत्येक तरुण दिसणारा मनुष्य, म्हाताऱ्यापेक्षां म्हातारा असून, ओंठावर मिशी धारण करायला नालायक आहे, असेंच समजलें पाहिजे.

इ. स. १८१८ मध्यें शिवाजीनें प्रस्थापित केलेलें स्वराज्य नष्ट झालें. त्या वेळीं महाराष्ट्राच्या दुर्दैवानें असाच मेषपात्र तरुण वर्ग ह्या हिंदुस्थानांत निर्माण झालेला होता. किंबहुना असा मेषमात्र तरुण वर्ग त्या वेळीं निर्माण झाला म्हणूनच महाराष्ट्राचें स्वातंत्र्य गेलें. ह्या तरुण वर्गानें स्वराज्याचा जो स्फुल्लिंग, त्यावर उत्तेजनाचा वारा घालून प्रज्वलित ठेवला नाहीं, एवढेंच केवळ नव्हे तर शक्य तितक्या जलदीनें व शक्य तितक्या पूर्ण रीतीनें हा स्फुल्लिंग विझवून टाकावा असा त्या तरुण पिढीचा प्रयत्न होता. इंग्रज लोक हेच काय ते शहाणे, हेच काय ते विद्वान्, हेच काय ते थोर, हेच काय ते पराक्रमी. त्यांचेपुढें आपण

कोणत्या झाडाचा पाला, आपण किती मूर्ख, आपण केवढ्या मूर्खांचे मुलगे, आपलीं शास्त्रें किती मूर्खपणाचीं, आपला इतिहास किती क्षुल्लक, अशा स्वाभिमानशून्य कल्पना प्रसूत झाल्या, त्या सर्व ह्याच काळांत होत. ही मूर्खपणाची परंपरा, बरेच दिवस महाराष्ट्रांत अस्तित्वांत होती आणि त्या वेळीं इतकें कांहीं ओंगळ वाङ्मय निर्माण झालें कीं आजच्या काळांत मनुष्य कितीहि मूर्ख असला तरी त्याला तें वाचून हंसूंच येईल ! पुन्हां स्वराज्य प्राप्त करून घेणें हें या काळांत अनावश्यक, अशक्य, अयोग्य आणि अक्षम्य मानलें जात असे, आणि ह्यावरहि मात करणारी गोष्ट म्हणजे ही कीं जर कोणी अशाकरितां प्रयत्न केला तर त्याला आपलेच लोक वेडयांतला वेडा आणि मूर्खांतला मूर्ख म्हणून निवडून काढीत असत.

महाराष्ट्रांत ही लाट अडविण्यास जर कोणी कारणीभूत झालें असेल तर ते कै. महादेव गोविंद रानडे हेच होत. ह्या महर्षीनींच महाराष्ट्राच्या

**महर्षी रानडे.**

कानांत प्रथम असा मंत्र फुंकला कीं, महाराष्ट्रा ! स्वराज्य गेलें म्हणून निराश होऊं नको—परिस्थितीला वाघ समजशील तर मरशील, परिस्थितीला गुरु समजशील तर तरशील. परिस्थितीला वाघ समजणें हा भ्याडपणा आहे. जो कठीण परिस्थितींत गुरफटला जाईल त्यानें त्या परिस्थितीलाच गुरू समजून तिचा उपयोग करावा. राजकारण हा बुद्धिबळाचा डाव आहे. त्यांत एकाची दुसऱ्यावर मात झाली म्हणून निराश होण्याचें कांहींच कारण नाहीं. आज शेजाऱ्याची मात आपल्यावर झाली तर उद्यां आपली मात शेजाऱ्यावर होईल ह्यासाठीं राजकारणाचा खेळ मोडूं नका, तो खेळ खेळत रहा आणि भरंवसा बाळगा कीं शेजाऱ्याचे डाव जर तुम्हीहि करायला शिकलां तर तुम्हांलाहि असें दान पडेल कीं, तुमची मात शेजाऱ्यावर झाल्याशिवाय कधींहि रहाणार नाहीं.

कै. रानडे ह्यांचें तत्वज्ञान अशा प्रकारचें होतें. होप—म्हणजे आशा बाळगा हा मंत्र महाराष्ट्राला न्यायमूर्ति रानडयांनीं अगोदर शिकवला. निराश झालेल्या महाराष्ट्राला रानडयांनी प्रथम आशायुक्त केलें. हताश झालेल्या महाराष्ट्राला प्रथम रानडयांनीं कार्यप्रवृत्त बनविलें. सर्व उ ोग सोडून स्वस्थ बसलेल्या महाराष्ट्राला प्रथम रानडयांनीं उद्योगाला लावलें. रानडे

म्हणत, की इंग्रज आले म्हणून तुम्हीं घाबरलां कीं काय ? अहो, इंग्रजांचें येणें हीच देवाची कृपा माना. इंग्रजांचें शहाणपण शिका. अशा रीतीनें इंग्रजांची विद्या तुम्हीं शिकलां कीं इंग्रजांच्या हातांत गेलेलें आपलें स्वराज्य परत मिळविणें काय कठीण आहे ?

महादेव गोविंद रानड्यांना महाराष्ट्राचे आद्यमहर्षि असें जें मानलें जातें, ह्याचें कारण हें आहे कीं, महाराष्ट्राचा हा थंडगार झालेला गोळा त्यांनीं ऊबदार बनविला. त्यांनीं महाराष्ट्राला आंच दिली. त्यांनीं महाराष्ट्राच्या निराशेची हिंवाळी रात्र संपविली. त्यावेळीं सर्व महाराष्ट्र महादेव गोविंद रानड्यांनीं उठविलें, पुढें ढकललें, शर्यतींत नोंदविलें. त्यांना त्यावेळीं सहाय्यहि ना. दादाभाई नौरोजी ह्यांचें मिळालें. रानडे जर दादाभाई नौरोजींइतके जगते तर रानड्यांचें नांव आज जें पुष्कळ अंशानें लुप्त झालेलें आहे, तें कधींहि झालें नसतें. पण रानडे दादाभाईंच्या मानानें अल्पायुषी झाले. रानडे टिळकांपेक्षां सुद्धां कमी जगले. टिळकांनीं आपल्या पांसष्टाव्या वर्षाचा उत्सव पाहिला आणि मग स्वर्गात प्रयाण केलें. रानड्यांना साठावें वर्ष लागणार म्हणून उत्सवाची तयारी सुरू झाली, त्याचे अगोदरच त्यांचें देहावसान झालें. रानड्यांनीं आपल्याला साठावें वर्ष लागलेलें पाहिलेंही नाहीं. आणि कॉंग्रेसचे अध्यक्षही होण्याचा मान त्यांना त्यांचे हयातींत लाभला नाहीं.

रानड्यांच्या वेळीं त्यांची विशेष बहादुरी ही समजली जात असे कीं त्यांचे वेळीं एकही चळवळ अशी नव्हती कीं जिच्यांत त्यांचा हात नव्हता. ज्याप्रमाणें ' व्यासोच्छिष्टं जगत् सर्वं ' अशी व्यासांच्या संबंधानें म्हण आहे त्याप्रमाणें माधवरावांचे संबंधानेंहि ही म्हण खरी होती, कीं त्या वेळची प्रत्येक चळवळ माधवस्पृष्ट होती. टिळकांनीं लिहिलेल्या माधवरावांच्या मृत्युलेखाचा आम्हीं वर निर्देश केलेला आहे. ह्यांत हीच गोष्ट टिळकांनीं माधवरावांसंबंधानें अभिमानपूर्वक सांगून 'सर्वज्ञः स हि माधवः' अशा एका सर्वपरिचित संस्कृत अवतरणानें आपल्या लेखाचा समारोप केलेला आहे.

माधवराव रानड्यांचे फारसे ग्रंथ दुर्दैवानें हयात नाहींत. कै. गोपाळ कृष्ण गोखले ह्यांचा त्यांचें चरित्र लिहिण्याचा हेतु होता, पण दुर्दैवानें तो

त्यांचा हेतुहि सिद्धीस गेला नाहीं, परंतु जे थोडेबहुत त्यांचे ग्रंथ आणि त्यांचे लेख अस्तित्वांत आहेत, त्यांतून डोकावणारास माधवराव रानडे हे कोणत्या प्रकारचे पुरुष होते ह्याची सहज कल्पना करतां येईल. आज मितीसही माधवराव रानड्यांचे धर्मावर, तत्वज्ञानावर, समाजचर्चेवर, अर्थशास्त्रावर आणि इतिहासावर निबंध प्रचलित आहेत. नुसत्या एवढ्या-वरून जरी पारख केली तरी ह्या विराट् पुरुषाच्या बुद्धीचा एक भाग इति-हासाकडे तर एक धर्माकडे, एक समाजशास्त्राकडे तर एक अर्थशास्त्राकडे वाहिलेला होता असें सहज दिसून येतें. ह्याशिवाय अभिमानानें सांगण्या-जोगी गोष्ट म्हणजे ही कीं दादाभाई नवरोजींच्या बरोबरीनें इंडियन नॅशनल काँग्रेस स्थापण्याचा व चालविण्याचा मान रानड्यांचेकडे होता. राष्ट्रीय सभेची अशी एकहि बैठक भरली नाहीं कीं तींत महादेव गोविंद रानडे हे हजर नव्हते. मृत्युशय्येवर असल्यामुळें इ० स० १९०० मधील लाहोर येथील बैठकीस मात्र ते हजर राहूं शकले नाहींत. आणि दुर्दैवाची गोष्ट ही कीं ह्या बैठकीनंतर एकच महिन्याच्या आंत हा थोर पुरुष इहलोक सोडून गेला.

**रानड्यांचें गुरुत्व.** खास महाराष्ट्रासंबंधानें रानड्यांची सेवा म्हणजे शिवाजीमहाराजांच्या चरित्राला त्यांनीं आणलेली उज्ज्वलता ही होय. आपणा महाराष्ट्रीयांच्या रक्तांतच शिवाजीमहाराजांविषयींचा अभिमान जरी उतरलेला असला तरी त्या वेळच्या शिष्ट–वर्तुलांत शिवाजी म्हणजे एक टाकाऊ माणूस समजला जात असे. ही सर्व समजूत रानड्यांनीं बदलली. शिवाजीच्या अष्टप्रधानांत डिमॉक्रसीच्या प्रधानमंडळाचें बीज आहे हें रानड्यांनीं सिद्ध करून दाखविलें. राजा-रामाची कारकीर्द–राजारामाचा जिंजीवास–राजारामाच्या लढाया, टक्करी व चकमकी–कीं ज्यांचा अर्थच आधुनिक वाचकांना व लेखकांना समजत नसे, त्यांत स्वातंत्र्याचें एवढें घनघोर युद्ध सांठविलेलें आहे, हें रानड्यांनीं विशद करून सांगितलें. सर्वांत मोठी रानड्यांची कामगिरी म्हणजे ही कीं, महाराष्ट्रांतील साधुसंतांची राष्ट्रीय कामगिरी कोणत्या प्रकारची होती हें रानड्यांनीं–फक्त रानड्यांनींच–केवळ रानड्यांनींच जगापुढें मांडलें.

संत हे महाराष्ट्रीय इतिहासाचे भाग आहेत, त्या स्वराज्याच्या पायऱ्या आहेत, त्या स्वातंत्र्याच्या निशाण्या आहेत, ह्याची अत्यंत गोड सुसंगति जी रानड्यांनीं लावली त्यामुळें ज्ञानेश्वरमुकुंदराजांच्या कालापासून तों शिवाजीमहाराजांच्या उदयापर्यंत एकदम एक पवित्र प्रकाश महाराष्ट्राच्या इतिहासावर पडला. महर्षि म्हणवून घेण्यास रानड्यांना दुसरा कोणताही अधिकार नसला तरी हा एवढा अधिकार खास आहे, आणि हा त्यांचा अधिकार संतांच्या आशिर्वादानें खात्रीनें चिरंतन राहील.

लो० टिळक हे जे महाराष्ट्रांत प्रथम उदयाला आले, ते रानड्यांचे विरोधी म्हणून उदयाला आले. रानडे आणि टिळक ही विरोधी जोडी सुमारें नऊ दहा वर्षेपर्यंत होती. विशेषत: हिंदु–मुसलमानांचे तंटयांत इ. स. १८९३ सालीं रानड्यांचे इच्छेविरुद्ध आणि रानडे नको नको म्हणत असतांना, टिळक, बाळासाहेब नातू वगैरे लोकांनीं शनिवारवाडयासमोर जी एक जाहीर सभा भरविली तेव्हांपासून रानडे आणि टिळक ह्यांचेमधील विरोध वज्रलेप झाला. ह्याचेहि अगोदर एका महातेजस्वी पुरुषाचा उल्लेख केला पाहिजे, तो करून मग आपण पुन्हां लोकमान्यांच्या चरित्राकडे वळूं.

हा तेजस्वी पुरुष कोण हें सांगण्याची मुळींच जरूरी नाहीं, वाचकांनीं हा सहज ओळखला असेल. हा पुरुष म्हणजे अर्थात् कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे होत. अलीकडील सर्व महाराष्ट्रांत इतका तेजस्वी पुरुष दुसरा कोणीच झाला नाहीं. अतिशय थोडया अवकाशांत अतिशय मोठी कामगिरी करून, आपलें तेज पाडून, लोकांना दिपवून, शत्रूंना चकवून, लोक वाहवा, वाहवा, असें म्हणत असतांना सपाटयासरशीं स्वर्गाकडे तडक निघून जाणारा अखिल अर्वाचीन इतिहासांत विष्णुशास्त्री चिपळूणकरांशिवाय दुसरा कोणी नाहीं. प्राचीन काळीं ज्ञानेश्वर-महाराज तसे असतील, त्याचेहि पूर्वी असली धडाडी आद्यशंकराचार्यांच्या चरित्रांत मात्र दिसून येईल, पण अलीकडच्या काळांत विष्णुशास्त्र्यांशिवाय असा दुसरा पुरुष झालाच नाहीं. स्वतंत्रतेच्या काळाच्या परिभाषेंत बोलायचें म्हटलें म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर हे शांततेच्या काळांतील विश्वासराव, दत्ताजीराव शिंदे अथवा माधवराव पेशवे होते. देशभक्तीचा हा टॉर्पेडो जो सुटला तो प्रत्येक प्रतिपक्षी घायाळ करीत चालला. त्याची धडाडी एवढी मोठी

**विष्णुशास्त्री चिपळूणकर.**

होती कीं आपण घायाळ झालों इतका विचार करण्याचीहि फुरसत तो प्रतिपक्षाला देत नसे. आणि जर तो त्याचा विचार करील तर तितक्यांत दुसरा असा सपाटा बसे कीं तो व्याकुळच होऊन पडे. विष्णुशास्त्र्यांच्या ह्या धडाडीपुढें मी मी म्हणणारे मोठमोठे मर्द जखमी होऊन पडले मग लुंग्यासुंग्यांची गोष्ट कशाला ?

विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या प्रतिपक्षावर जें इतिहासप्रसिद्ध भयंकर शर-संधान केलें, त्यांत त्यांचा महादेव गोविंद रानडे ह्यांचेवरील हल्ला अत्यंत नामांकित आहे. महादेव गोविंद रानडे हेच तोंपर्यंत समाजाचे नेते होते. त्यांच्या पुढारीपणांत वारसा सांगायला तोंपर्यंत कोणीहि पुढें आलेला नव्हता. पण लेखनकौशल्यांत नुकतेंच नांव कमवूं लागलेल्या तरुण विष्णुशास्त्र्यांनीं सर्व इतर प्रतिपक्षी सोडून एकदम महादेव गोविंद रानड्यांवरच जेव्हां नेम धरला तेव्हां सर्वांना वाटलें कीं ह्या युद्धांत हा विष्णुशास्त्री कसला तगतो ? पण तो विष्णुशास्त्री तगला, त्यानें लढाई जिंकली, वीरांचे मान त्याला मिळाले आणि जयगर्जनेंत आणि विजयीपणाच्या भरांत त्यांनीं लोकहितवादीशीं नवीन युद्ध पुकारलें.

ह्या युद्धाशीं आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांचे चरित्रांतील इतर गोष्टींशीं आज आपणांस विशेष कर्तव्य नाहीं. आज आपणांस जें मुख्यतः पहावयाचें आहे, तें हें की रानडे हे एवढे महर्षी असतांना आणि विष्णु-शास्त्री हेहि सदिच्छाप्रेरित असतांना त्यांच्यांत युद्ध कां जुम्पलें ? याचें कारण हुडकून काढणें फार सोपें आहे. दोघांच्याहि चरित्राचें अवलोकन केलें म्हणजे ह्याचें कारण सहज सांपडेल, आणि तें हें कीं, रानडे हे महर्षि असल्यामुळें त्यांच्या अंगांत स्थायिभाव होता, आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर हे तेजस्वी असल्याकारणानें त्यांच्यांत तडफ होती. इ. स. १८९६ सालीं जहाल आणि मवाळ हे जे दोन राजकीय पक्ष अस्तित्वांत आले त्यांचींच हीं पूर्व स्वरूपें होत. रानड्यांनीं महाराष्ट्राला आशा दिली, रानड्यांनीं महाराष्ट्राला दिशा दाखविली, रानड्यांनीं महाराष्ट्राला कार्य-प्रवृत्त केलें हें सर्व खरें, पण जो जोम, जी धडक, जो वेग कार्यकर्त्या पुरुषांत लागतो तो वेग त्यांना उत्पन्न करतां आला नाहीं. हा वेग

विष्णुशास्त्र्यांनीं उत्पन्न केला आणि तोहि माधवराव रानड्यांनीं जितक्या कार्यांचा अंगिकार केलेला होता तितक्या प्रकारच्या सर्व कार्यांत केला.

कारण विष्णुशास्त्र्यांनीं आर्यभूषण नांवाचा छापखाना घातला, केसरी आणि मराठा हीं दोन वर्तमानपत्रें सुरू केलीं, न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली, चित्रकलेला उत्तेजन देण्याकरितां चित्रशाळा काढली आणि ह्या सर्वांच्या परिश्रमाचें चीज व्हावें म्हणून किताबखाना नांवाचें एक पुस्तक-विक्रीचेंहि दुकान काढलें. ह्याशिवाय काव्येतिहाससंग्रह ह्या नांवाचें मराठी इतिहासाकरितां व काव्याकरितां त्यांनीं मासिक सुरू केलेलेंच होतें, आणि आपली सुप्रसिद्ध निबंधमालाहि त्यांनीं चालविली होती.

**चिपळूणकरांच्या कार्यांचा पसारा.**

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या इतका विविध देशकार्यांचा व यशस्वी हाताचा पुरुष महाराष्ट्रांत झालाच नाहीं. ह्या पुरुषानें शिक्षण, वर्तमानपत्रें, चित्रकला, वाङ्मय, इतिहास, काव्य, ह्या सर्वांच्या अभिवृध्यर्थ संस्था काढल्या आणि व्यापारी तत्त्वावर दुकान काढण्याचीहि त्यानेंच कल्पना चालविली. आज ह्यांतील बहुतेक संस्था अतिशय उत्तम रीतीनें चाललेल्या आहेत. आणि परमेश्वराची जर कृपा असेल तर ह्यापुढेंहि त्या महाराष्ट्राला ललामभूत होतील.

श्री. महादेव गोविंद रानडे आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्या दोघांचीं चरित्रें पारखलीं म्हणजे एक तत्त्वकथन आहे आणि दुसरें त्याचें आचरण आहे; एक सिद्धांत आहे, आणि दुसरा त्याचा अनुभव आहे; एक स्पष्टीकरण आहे आणि दुसरें सोडवलेलें उदाहरण आहे; एक दिग्दर्शन आहे, आणि दुसरें ध्येयगमन आहे; एक मनुस्मृति आहे आणि दुसरी त्याची कृति आहे; एक युद्धशास्त्र आहे आणि दुसरें प्रत्यक्ष युद्ध आहे हें सहज दिसून येतें. विचार आणि कृति ह्यांच्यांत जो फरक तोच रानडे आणि विष्णुशास्त्री ह्यांच्यांतला फरक; कल्पना आणि आचरण ह्यांच्यांत जो भेद, तोच विष्णुशास्त्री आणि रानडे ह्यांच्यांतला भेद; वाणी आणि करणी यांच्यांत जें तारतम्य तेंच रानडे व विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्यांतलें तारतम्य.

विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणाले कीं देशाकरितां स्वार्थत्याग करणें योग्य ना? मग ही पहा मी सरकारी नोकरी झुगारून दिली! जनतेला

शहाणें करणें योग्य आहे ना? मग हा पहा मी केसरी काढला! शिक्षण सरकारच्या हातांत नसावें ना? मग हें पहा माझें न्यू इंग्लिश स्कूल! उद्योगधंद्याशिवाय तरणोपाय नाहीं ना? मग हा पहा माझा किताबखाना! पूर्वजांचा अभिमान उत्पन्न केला पाहिजे ना? मग पहा काव्येतिहास-संग्रह! तुम्ही देशी भाषेचा उत्कर्ष करावा म्हणतां आणि इंग्रजी भाषेंत लिहितां? धिक्कार असो तुम्हांला! ही पहा, मी मराठी भाषेंत निबंधमाला काढली. आणि काय? तुम्ही देशाभिमानी असून ख्रिस्ती वळणावर प्रार्थना-मंदिरें बांधतां? काय म्हणावें तुम्हांला? अहो, हा मराठी कवि मोरोपंतच घ्या. ह्यानें "प्रियाकुचतटीं काढविलेल्या पत्रावळी" च तुम्हांला इतक्या संकटांतून तारून नेतील कीं निराकार परमेश्वराची तुम्हांला गरजच लागणार नाहीं.

**अपूर्व अभिमान.**

वाणी आणि करणी ह्यांचा जो तंटा तोच रानडे आणि विष्णुशास्त्री त्यांच्यांतील तंटा! वाणी ही नेहमीं करणीला दटावीत असावयाची आणि करणी ही नेहमीं वाणीला फरफरत ओढीत असावयाची! वाणी बोलण्यांत चूर, कृतींत मागें. वाणी मार्ग दाखविते, पण करणी लोकांना पुढें सारते. करणी स्वतः पुढें सरते आणि दुसऱ्यांना उदाहरण दाखविते. वाणी सभेंत शहाणी, दरबारांत शहाणी, रणांत सावध; करणी रणाची हौशी, झगड्याविषयीं निर्भय, दरबारांत कमी झकपकीची; वाणी सिध्दांत बोलणारी व उदाहरणें देणारी, पण करणी उदाहरण घालून देणारी, सिध्दांत आचरणारी! वाणी–करणीचा जो तंटा तोच रानडे–विष्णुशास्त्र्यांचा तंटा! वाणी–करणीचा जो कलह तोच रानडे–विष्णुशास्त्र्यांचा कलह!

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांचा मृत्यु फार अल्प वयांत झाला. ते वारले तेव्हां ते केवळ बत्तीस वर्षांचे होते, तरी तितक्या अवधींत त्यांनीं वर वर्णन केलेल्या यशस्वी संस्था निर्माण केल्या आणि एकट्यानें निबंधमालेचे चौऱ्यायशीं अंक लिहिले. परंतु विष्णुशास्त्र्यांच्या अवतार–समाप्तीनंतर त्यांच्या कार्यांची समाप्ति झाली. ज्या सहकारी तरुण लोकांना घेऊन विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपली कार्यदिशा आंखली होती, त्या सहकारी मित्रांनीं विष्णुशास्त्र्यांचीं सर्व कार्यें पुढें चालविलीं. ह्या तरुण मंडळींतच आगरकर आणि टिळक प्रमुख होते.

एक रानडे जर पुढें ठेवले सर आगरकर आणि टिळक ह्या दोघांचेंहि चरित्र उत्तम रीतीनें उलगडतें. रानड्यांच्या कार्यक्रमांत सामाजिक, राजकीय वगैरे सर्व चळवळींना सारखें महत्व होतें. ह्यांपैकीं आगरकरांनीं सामाजिक भाग विशेष रीतीनें पुढें घेतला आणि टिळकांनीं राजकीय भागाची प्रगति केली. सार्वजनिक कार्यगंगेचे जे इथें दोन ओघ पडले ते आगरकांच्या मृत्यूपर्यंतहि एक झाले नाहींत. राजकीय कामांत रानडे आणि टिळक ह्यांची झुंज जुंपली, तथापि १८९३ पर्यंत साधारणपणें टिळक राजकीय कामांत रानडे यांस मानीत असत. इ. स. १८९३ मध्यें हिंदुमुसलमानांचे तंटयांत रानड्यांच्या सल्ल्याविरुद्ध टिळकांनीं सभा भरविली आणि तोच रानड्यांचा प्रथम सार्वजनिक आज्ञाभंग होय. ह्यापुढें रानडे आणि टिळक ह्यांचें कधींहि जमलें नाहीं.

**टिळक व आगरकर.**

ह्या न जमण्याचा पहिला परिणाम म्हणजे जहाल आणि नेमस्त ह्या परिभाषेची उत्पत्ति होय. हे शब्द १८८६ सालीं निघाले. त्यापूर्वीं सार्वजनिक भांडणांत हे शब्द नव्हते. १८८६ सालीं रानड्यांनीं आपल्या पक्षाच्या लोकांचा जाहीरनामा काढून प्रसिद्ध केलें कीं टिळक हे जहाल पक्षाचे आहेत आणि स्वतःचा पक्ष हा नेमस्त राजकारणाचा पक्ष आहे. ह्या जाहीरनाम्यावर टिळकांनीं 'हा म्हातारचळ कीं पोरखेळ' ह्या शिरोलेखाखालीं अत्यंत खळबळ उडविणारा लेख लिहून रानड्यांवर टीकेचा भडीमार केला. परंतु हा म्हातारचळ असो का पोरखेळ असो, जहाल आणि नेमस्त हे जे त्या वेळीं दोन तट पडले, ते कायमचे पडले. नेमस्त पक्षाचे सर्वप्रसिद्ध अग्रणी व रानड्यांचे पट्टशिष्य ना. गोखले १९१५ सालीं वारले, आणि आज जहाल ऊर्फ राष्ट्रीय पक्षाच्या अग्रणीचा स्वर्गवास वर्णन करण्याची पाळी आलेली आहे.

**म्हातारचळ कीं पोरखेळ ?**

लो० टिळक आणि कै० रानडे ह्यांच्या चरित्रांशीं एकमेकांचा काय संबंध आहे, हें वरील विवेचनावरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल. रानड्यांचें चरित्र चालू असतांच त्यांच्या सिद्धांतांना कृतीचें रूप देणारा, त्यांच्या उपदेशाला आचरणाचें कोंदण बसविणारा, त्यांच्या वाणीला करणीची गति देणारा जो महापुरुष, तो विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि ह्या

विष्णुशास्त्र्यांची १८८१ सालींच तुटलेली आयुष्यरेषा ज्यानें राजकीय विषयांत १९२० सालापर्यंत लांबविली तेच लो० बाळ गंगाधर टिळक होत. टिळक हे विष्णुशास्त्र्यांच्या कार्याचे पूर्ति होते, विष्णुशास्त्र्यांच्या देशभक्तीची अवतारसमाप्ति होते, ते विश्णुशास्त्र्यांच्या स्वार्थत्यागांतील विरक्ति होते, ते विष्णुशास्त्र्यांच्या स्वावलंबनांतील दिव्य आत्मशक्ति होते. टिळक म्हणजेच विष्णुशास्त्र्यांचें राजकीय काम ! टिळक म्हणजेच विष्णुशास्त्र्यांचें १९२० पर्यंतचें आयुष्य !

आणि हें आयुष्य अतिशय मोठमोठ्या व्यवसायांत आणि अतिशय मोठमोठ्या घडामोडींत गेलें. हें आयुष्य अतिशय दांडग्या चळवळींत आणि अतिशय प्रबल लाटांत गेलें. हें आयुष्य अतिशय भयंकर संकटांत आणि अतिशय भयंकर युद्धांत गेलें. हें आयुष्य अतिशय भव्य यशःप्राप्तींत आणि अतिशय दिव्य जयजयकारांत गेलें. विष्णुशास्त्र्यांनीं आपलें आयुष्य चालवावयास अतिशय लायक मित्र गांठला ! त्यानें एका आयुष्यांत अनेक वीरांचें आयुष्य आणून दाखविलें ! त्यानें एका आयुष्यांत शेंकडों आयुष्यें भरलेलीं दाखविलीं !

लोकमान्यांच्या चरित्रांतील नुसत्या ठळक गोष्टी घेतल्या तरी हें एका पुरुषाचें आयुष्य असणें अशक्य वाटतें. ह्या एकेका गोष्टीवर एवढाला प्रचंड ग्रंथ होईल कीं त्यानें इतिहासाचीं शेकडों पृष्ठें भरून जातील. एका

**टिळकांचें अफाट चरित्र.**

लेखांत आणि त्याहि वर्तमानपत्राच्या एका लेखांत त्याचें वर्णन देण्याचा प्रयत्न करणें म्हणजे सबंध महाभारत आंगठीच्या एका खड्यांत बसविण्यासारखें हास्यास्पद आहे. लोकमान्यांच्या आयुष्याच्या सुरवातीस त्यांच्यावर कोल्हापूरच्या दिवाणांनीं केलेला फौजदारी खटला येतो. ह्या खटल्यांतून निघाल्यानंतर फर्ग्युसन कॉलेजची स्थापना येते. व नंतर कॉलेज अतिशय थाटामाटांत चालू लागतें. टिळकांचे मित्र नामजोशी ह्यांच्या मध्यस्थीनें कॉलेजला नानांच्या वगैरे इमारती मिळतात. ह्यापुढें क्रीडाभुवनाचे तंटे, फर्ग्युसन कॉलेजमधील अंतःकलह व चहाप्रकरण उपस्थित होतें; पुढें हिंदु-मुसलमानांच्या मारामाऱ्या सुरू होतात. १८९४ मध्यें गणपति-उत्सव चालू होतो. आणि १८९९ मध्यें लगेच शिवाजीस्मारकाच्या चळवळीला सुरवात होते. ह्याच सालीं टिळक मुम्बई-सरकारच्या

कौन्सिलचे सभासद निवडले जातात व १८९७ सालीं त्यांची पुन्हा निवडणूक होते. ह्या सालीं त्यांचेवर राजद्रोहाचा पहिला खटला होऊन त्यांना दीड वर्ष सक्तमजुरीची शिक्षा होते. हा त्यांचा तुरुंगवासाचा दुसरा अनुभव होय. पुढें ताईमहाराजांचा जो खटला सुरू झाला, त्यानें त्यांना एकसारखा चोवीस वर्षें त्रास दिला. ह्या खटल्याचेहि बाबतींत त्यांना थोडा वेळ तुरुंगांत जावें लागलेंच ! हे त्यांचे तुरुंगाचे तिसऱ्या वेळचे क्लेश ! १९०५ सालीं वंगभंगाची भयंकर चळवळ सुरू झाली. ह्या चळवळीचे अनुषंगानें स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार आणि स्वराज्य असे चार प्रकारचे प्रश्न उपस्थित झाले, आणि ह्या चारी प्रश्नांत त्यांनीं अनुपमेय धैर्यानें पुढाकार घेतला. १९०६ सालीं शिवाजी–उत्सवाकरितां ते कलकत्ता येथें गेले असतांना त्यांचें अपूर्व स्वागत झालें आणि त्यांत बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी आणि मोतीलाल घोष या दोघांनींहि अग्रेसरत्व पत्करलें. १९०७ सालीं सुरतेची कॉंग्रेस भरली आणि मोडली व १९०८ सालीं

**टिळक व पिकेटिंग.**

त्यांनीं मद्यपाननिषेधाची 'न भूतो न भविष्यति' अशी चळवळ केली. ह्या चळवळीचा इतका परिणाम झाला कीं गांवोगांवचे गुत्ते अजिबात बंद पडले आणि एका वरिष्ठ अधिकाऱ्यानें सरकारकडे असा रिपोर्ट केला कीं ह्या शहरांत मी अंमल चालवीत नसून, टिळक सत्ता चालवीत आहेत. ह्याच सालीं त्यांचेवर राजद्रोहाचा दुसरा खटला झाला व त्यांची सहा वर्षेपर्यंत मंडालेकडे रवानगी झाली. १९१४ सालीं त्यांची मुक्तता झाली. ह्याच वर्षी त्यांचे घराचे दोहों बाजूस सरकारी चौक्या बसवून, सरकारनें त्यांना त्रास देण्याचा अतिशय चंग बांधलेला होता, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. महायुद्धहि याच वर्षी सुरू झालें. १९१५ त पुणें येथील प्रांतिक सभा भरली व त्याच वर्षी होमरूल लीगची वाटाघाट गायकवाडवाड्यांत झाली. १९१६ सालीं बेळगांव येथें नेमस्त आणि राष्ट्रीय पक्षांचा समेट ठरला आणि राष्ट्रीय पक्षाचे लोक पुन्हां कॉंग्रेसमध्यें जाऊं लागले. त्या वर्षी लखनौ येथें कॉंग्रेस भरली होती. कॉंग्रेसचे वेळीं लोकमान्यांचा भयंकर सत्कार झाला. १९१७ ची कॉंग्रेस कलकत्ता येथें भरली. तेथून लोकमान्य नागपूर येथें कीर्तन-संमेलनास आले, व नंतर लौकरच त्यांनीं वऱ्हाड-मध्य-

प्रांतांत जो दौरा काढला तो इतिहासप्रसिद्धच आहे. सर्वांचें अभिनंदन आणि जयजयकार घेत घेत १९१८ चे सुरवातीस लोकमान्य डेप्युटेशनवर इंग्लंडला निघाले, परंतु सरकारचा अटकाव झाल्यामुळें त्यांना सिलोन-मधूनच परत फिरावें लागलें. पुढें मॉन्टेग्यू—चेम्सफर्ड—सुधारणा जाहीर झाल्या व मुंबईची स्पेशल कॉंग्रेस भरली; येथपासून लोकमान्य आणि मिसेस बेझंट ह्यांच्यामधील विरोधास सुरवात झाली व पुढें तो वृद्धिंगतच होत गेला. १९१८ मध्यें त्यांना कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडण्यांत आलें. परंतु त्यापूर्वीच ते इंग्लंडला निघून गेल्यामुळें तो योग अखेरपर्यंत आला नाहीं. १९१८ पासून १९१९ अखेरपर्यंत त्यांनीं विलायतेंतील चळवळ चालविली, इंडियापत्र कॉंग्रेसच्या कबज्यांत आणिलें व प्रेसिडेंट विल्सनशीं पत्रव्यवहार केला. १९१९ चे अखेरीस ते इकडे आले, तेव्हां लोकांना अत्यानंद झाला,

**स्वराज्याची चळवळ.**

व ठिकठिकाणीं त्यांचा गौरव झाला. १९२० चे सुरवातीपासून त्यांचा काळ अत्यंत कार्यव्यग्रतेंत गेला. जुन्नर येथील सभा, सिंधप्रांतांतील दौरा, आणि सोलापूर कॉन्फरन्स येथें त्यांचीं उत्साहकारक भाषणें हजारों लोकांनीं ऐकलीं. पुढें त्यांचा पर्सफंड-समारंभ झाला आणि त्यानंतर ते बनारस येथें गेले. बनारस येथून आल्यानंतर पुन्हां ताईमहाराज-केसनें त्यांचें लक्ष वेधलें, पण त्याचा निकाल पुन्हा त्यांना अनुकूल होऊन विजयलक्ष्मीनें आपल्या चवऱ्या त्यांचेवर ढाळल्या. हाच त्यांचा शेवटचा विजय होय व ह्याच विजयानंदांत परमेश्वरानें त्यांस आपल्या दरबारीं बोलावून नेलें.

वर जें लो. टिळकांचें चरित्र थोडक्यांत दिलें आहे, त्यावरून ह्या एका चरित्रांत किती विविध गोष्टी सांठविल्या आहेत हें सहज दिसून येणार आहे. सर्व गोष्टींची खरोखर बेरीज करायला बसलें तर आणखीहि तितक्याच महत्त्वाच्या गोष्टी खात्रीनें निघतील. वरील गोष्टींत आम्हीं बडोद्याचें बापटकमिशन घेतलेलें नाहीं, कॉंग्रेस-मंडपाचा वाद घेतलेला नाहीं, त्यांत आम्हीं त्यांचा सीलोन-ब्रम्हदेशचा प्रवास दिलेला नाहीं, त्यांच्या विंचुरकर वाड्याची व गायकवाड वाड्याची हकीगत घेतलेली नाहीं. ह्यांत आम्हीं अशा बऱ्याच गोष्टी घेतलेल्या नाहींत. ह्यांपैकीं कांहीं खाजगी आहेत, कांहीं मुद्दाम वगळण्याजोग्या आहेत, आणि कांहीं त्यांच्याशीं दुसऱ्या लोकांनीं केलेलें वर्तन दाखविण्याजोग्या आहेत.

मराठी टैप सुधारण्याच्या कामीं आणि छापखान्यांतील यंत्रसामुग्री उत्तम तऱ्हेनें जुळविण्याचे कामीं त्यांनीं जे परिश्रम केले व जें बुद्धिकौशल्य दाखविलें तेंहि वर्णनीय आहे. पंचांगप्रवर्तन आणि गीतरहस्यप्रवर्तन हे तर त्यांचे अलीकडेच आवडते विषय होते. आणि ह्या दोन्ही बाबतींत त्यांना बहुजनविचारसरणीच्या उलट जावें लागलें होतें. तथापि बहुजनसमाज विरुद्ध आहे म्हणून त्यांनीं आपलें मत प्रतिपादन करण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं, व आपण पसंत केलेलें पंचाग लोकांत सुरू व्हावें म्हणून शक्य तितका प्रयत्न केला. नाटयासारख्या

**टिळक व नाट्यकला.**

ललितकला त्यांना अप्रिय होत्या असा पुष्कळ लोकांचा समज असे व १८९७ चे पुढें कैदेंतून सुटून आल्यानंतर त्यांनीं नाटचकलेंतून मन काढलें ही गोष्टही खरी आहे. तथापि ह्याच बरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, किर्लोस्कर सं. मंडळी पुणें येथें गेली कीं त्यांचे हँडबिलावर बाळ गंगाधर टिळक आणि गणेश कृष्ण गर्दे ह्या दोघांच्या सह्या असत. टिळक तुरुंगांत गेले तरी त्यांचे जागेवर आलेले श्री. नरसिंह चिंतामण केळकर ह्यानींहि ही वहिवाट चालू ठेवलेली होती. आणि पुढें किर्लोस्कर मंडळी कै. भाऊराव कोल्हटकर यांचे मृत्यूमुळें संकटांत पडली तेव्हांपासून हळुहळू ही वहिवाट बद पडली. तरी नाटचकलेस त्यांचा आशिर्वाद होता. सुप्रसिद्ध नारायणराव राजहंस नाटकाचे धंद्यांत येण्यास टिळकांची शिफारस कारणीभूत झालेली होती. आणि त्यांना बालगंधर्व ही जी पदवी मिळालेली आहे ती मूळ लो. टिळकांनींच त्यांना दिली. सर्कशींत कै. छत्रे हे त्यांचे मित्र होते. आणि त्यांचे सर्कशीबरोबरच त्यांनीं ब्रम्हदेशांत प्रवास केला होता. सर्कशीबरोबर प्रवास करण्यांत विशेष फायदा असतो, असें ते बोलून दाखवीत. नाटचकलेकडे जरी त्यांनीं अलीकडे दुर्लक्ष केलेलें होतें तरी नाटकांतील मर्म जसें ते ओळखून काढीत, तसें तें इतरांना क्वचितच समजे. वर्तमानपत्रकार या नात्यानें त्यांची योग्यता पहिल्या दर्जाची होती. जन्मत:च त्या कलेंतील खुब्या त्यांना माहीत होत्या असेंहि म्हटलें तरी चालेल. विषय निवडून काढणें ही त्यांची विशेष हातोटी होती. आणि हेडिंगें द्यावीं तर तीं टिळकांनींच द्यावीं, इतरांनीं प्रयत्न केला तरी त्यांची खुबी इतरांनाहि साधत नसे. ते वक्तृत्ववान् नव्हते तथापि त्यांच्या प्रत्येक

शब्दांत कृति भरलेली असल्यामुळें, एखादा बृहस्पति बोलणारा असला तरी त्याचेपेक्षां ते जास्त परिणाम करीत. संस्कृतमध्येंहि ते उत्तम भाषणें करीत.

**टिळक व संस्कृत भाषण.**

१८९६ सालीं संस्कृतमध्यें लेक्चरें देणारा एक पंडित पुण्यास आला असतां त्याचेपुढें संस्कृत बोलण्यांत कॉलेजमधील प्रोफेसरहि लटपटून गेल्यामुळें, आतां पुण्याची अब्रू जाते कीं काय, असें वाटूं लागलें होतें, पण टिळक निर्भयपणें सभेंत उभे राहिले आणि त्यांनीं संस्कृतमध्यें असें अस्खलित भाषण केलें कीं तें ऐकून सर्व सभा तर चकित झालीच पण त्या पंडितांचाहि गर्व उतरला. तथापि सभेंत इंग्रजी व मराठी बोलण्याची कला त्यांना अवगत होण्यास बराच उशीर लागला. प्रसंगोपात्त ते हिंदींतहि भाषणें करीत, पण त्या भाषेवर त्यांचें अध्ययन झालें नसल्यामुळें त्यांना हिंदींत भाषण करण्याचा संकोच वाटत असे. त्यांच्या बाह्य देखाव्यावरून त्यांना विनोद प्रिय नाहीं, असें वाटण्याचा संभव आहे. पण भाषणांत त्यांच्याइतका विनोद फारच थोड्यांना साधत होता. हा विनोद त्यांचे लेखांतहि उतरत असे. खुद्द त्यांनीं केसरींत लिहिलेल्या लेखांत ते विनोदाची कुठेंतरी अशी खोंच मारीत कीं कित्येक दिवस गावांत हास्याच्या उकळ्या फुटत. 'नारि असुनि सत्यपणा तूंचि राखिला,' 'चटावरचें श्राद्ध,' 'पांढरा शंख कीं पिवळा शंख,' वगैरे त्यांच्या विनोदी कोट्या अजूनहि त्या वेळच्या लोकांच्या लक्षांतून गेल्या नाहींत. शिक्षक या नात्यानें सामान्य विद्यार्थ्यांना त्यांचा उपयोग फार कमी होई, कारण ते क्लासांत अनियमितपणानें येत व आल्यानंतर विषय इतक्या जलदीनें शिकवीत कीं, त्यांचेबरोबर साधारण विद्यार्थ्यांच्या ग्राहकशक्तीला धांव मारतां येत नसे. तथापि वर्गांतील हुषार विद्यार्थ्यांना मात्र त्यांचें शिकवणें म्हणजे ज्ञानाची एक चमचमीत मेजवानीच असे. सर्व विषयांत त्यांची गति सारखी होती. आणि सर्व विषयांत ते पहिल्या दर्जांतच असत. मित्र ह्या नात्यानें ते फार प्रेमळ होते. त्यांचे जवळ मानापमानाचें बंड फारच कमी होतें, व एकदां मनुष्यावर विश्वास बसला म्हणजे इतक्या मोकळेपणानें व लहान मुलाला योग्य अशा निष्कपटपणानें वागत, कीं एवढा थोर पुरुष इतका साधा कसा याचें आश्चर्य वाटल्याखेरीज रहात नसे. आश्रित व पदरच्या माणसांवर ते फार मेहेरनजर ठेवीत. त्यांनीं न्यू इंग्लिश स्कूल

सोडलें त्यावेळीं तिथले शिपाई खरोखर रडले असें सांगतात. त्यांचा हात उदार होता. मंडालेहून परत आल्यानंतर त्यांनीं नरसोपंत केळकरांपासून तों कारखान्यांतील गडीमाणसांपर्यंत सर्वांना एका बैठकींत पैसा वांटला व एका मुठीनें दहा हजार रुपये खर्च केले. ते कॉंग्रेसकॉन्फरन्सला निघाले म्हणजे त्यांचेबरोबर मोठ-मोठे लोकसुद्धां त्यांच्या पैशावर फुकट जायला निघत, आणि तेहि कोणाला नको म्हणून म्हणत नसत. त्यांना माणसाची उत्कृष्ट पारख असे व कोणाच्या स्वभावांत काय व्यंग आहे, कोणाच्या वर्तनांत काय दोष आहे, ह्याची त्यांना इत्थंभूत माहिती असे. तरी त्यांनीं कोणाचा अव्हेर केला नाहीं, किंवा कोणास दुखविलें नाहीं. ते सर्वांना सांभाळून घेऊन वागत, आणि मनुष्य त्यांचा कितीहि द्वेष्टा असला तरी विशिष्ट कामांत त्याच्याशीं सहकार्यता करायला त्यांची तयारी असे. पाहुण्यांचा सत्कार हा त्यांच्या स्वभावांतील विशेष गुण होता. बाहेर गांवचे शेंकडों लोक त्यांचेकडे हक्कानें उतरत, तरी ते सर्वांचें प्रेमानें स्वागत करीत, व प्रत्येकाची उत्कृष्ट बरदास्त राखीत. लो. टिळकांचा सर्व गुणगण नजरेपुढें उभा राहिला म्हणजे मानवी पूर्णतेनें आपल्या सर्व साहित्याचें सुन्दर प्रदर्शनच मांडलेलें आहे कीं काय असें वाटतें आणि मन उदात्त, उन्नत आणि पवित्र होतें !

**टिळकांचें औदार्य.**

तथापि लो. टिळकांच्या ह्या सर्व सद्‌गुणांना शोभा आणील असा एक गुण जर त्यांचे अंगांत नसता तर त्यांच्या अंगच्या सर्व गुणांची माती झाली असती. हा गुण म्हणजे अर्थात्‌च धैर्य हा होय. लो. टिळकांची आज जी एवढी ख्याती झालेली आहे, त्यास कारण एकच—त्यांचें अलौकिक धैर्य ! धैर्य हें त्यांच्या आयुष्याची गुरुकिल्ली आहे, त्यांच्या लोकमान्यतेचें स्पष्टीकरण आहे, कोणास कधींहि लाभली नाहीं अशा त्यांच्या विलक्षण लोकप्रियतेचें निदान आहे. लोकमान्यांच्या अंगीं बाकी जे शेकडों गुण होते तितके गुण कमीअधिक प्रमाणानें अंगांत असणारा एखादा मनुष्य, एखादे वेळीं असूंहि शकेल. पण त्याचे अंगांत धैर्य नसल्यामुळें तो तितक्या लोकप्रियतेला चढत नाहीं. लो. टिळक हे कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या आयुष्याचें दीर्घीकरण होते, असें जें आम्हीं ह्मणतों तें याचसाठीं होय.

**टिळकांचें अलौकिक धैर्य.**

आधुनिक महाराष्ट्रांत धैर्य हा गुण विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं प्रथम वर्तनांत आणला. आणि त्यांनीं जें बीजारोपण केलें त्याचीच वृद्धि त्यांचेमागून लो. टिळकांनीं केली. कै. महादेव गोविंद रानडे यांचें मर्हापित्व त्या वेळच्या लोकांनाहि नालबूल नव्हतें आणि तें ह्यापुढेंहि नाकबूल करतां येणार नाहीं. पण कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे सार्वजनिक कार्याच्या आखाड्यांत उतरेपर्यंत महाराष्ट्रांत धैर्य हा गुण अपरिचित होता. श्री. रमाबाईसाहेब रानडे यांनीं म्हटल्याप्रमाणें 'मी वांकेन पण जगेन' हें रानड्यांचें ध्येय होतें. आणि ह्याच ध्येयाप्रमाणें ते आजन्म चालले. ह्याचे उलट 'मी मेलों तरी बेहत्तर आहे पण मी वांकणार नाहीं,' हा सिद्धांत निशाणावर फडकावून कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर निघाले आणि त्याची कसोटी खरी लो. टिळकांनीं लावून दाखविली. विष्णुशास्त्र्यांनीं जी पहिली धैर्याची गोष्ट केली, ती सरकारी नोकरीवर लाथ मारणें ही होय. रानड्यांचें राजकारण, सरकारी नोकरी संभाळून सार्वजनिक सेवा करणें हें होतें. त्यांचे पट्टशिष्य ना. गोखले निघाले तेहि सरकारची कृपा संभाळून व सरकारी मर्जी न बिघडवूं देतां राजकारण करणारे निघाले. परंतु तत्त्व म्हटलें कीं राजपुरुषांची कृपा नेहमीं रहातेच असें नाहीं. पुष्कळ प्रसंग असे येतात कीं, त्या वेळीं सरकारी अधिकाऱ्यांच्या मर्जीविरुद्ध, किंबहुना सरकारच्या धोरणाला टक्कर देऊन राजकारण करावें लागतें. अशा रीतीनें निरालंब आणि असंकोच राजकारण करायला सांपडावें म्हणून कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं आपल्या सार्वजनिक आयुष्याला सुरवात, सरकारी नोकरीचा राजिनामा देऊन केली. पण ह्यापुढें ते फारच लौकर वारले. लो. टिळकांचेवर ज्या प्रकारचे घनघोर प्रसंग आले त्या प्रकारचे प्रसंग जर विष्णुशास्त्र्यांवर आले असते तर त्यांत त्यांचें धैर्य टिकलें असतें कीं नाहीं हा प्रश्न पुष्कळ वेळां काढण्यांत येतो. पण असे प्रश्न काढणें आणि शिवाजीमहाराज जर ह्या प्रसंगीं ह्यात असते तर त्यांनी पंचांगपरिवर्तन–कमिटीचें पंचांग वापरलें असतें कीं जुनें पंचांग वापरलें असतें हा प्रश्न, हे दोन्ही सारखेच आहेत. त्या काळांत आश्चर्यविषय झालेली, म्हणजे सरकारी नोकरीवर लाथ मारणें ही धैर्याची गोष्ट विष्णुशास्त्र्यांनीं केली ही गोष्ट निर्विवाद आहे, आणि अशा प्रकारचें धैर्य

दाखविणारे गृहस्थ महाराष्ट्रांत तेच पहिले होत, ह्यासंबंधानेंहि वाद नाहीं. मग ज्या गोष्टी नुसत्या कल्पनाच आहेत व ज्यांचा निर्णय करायला सध्यां कोणत्याहि प्रकारचें साधन नाहीं त्या गोष्टीची रिकामी चर्चा कशाला?

विष्णुशास्त्री चिपळूणकरांचें उदाहरण हा त्या वेळीं तरुणांना एक उत्साह चढविणारा कित्ता होता. विष्णुशास्त्र्यांनंतर तरुण लोकांत जो कांहीं स्वार्थत्याग, सार्वजनिक कार्याचा हव्यास आणि धैर्ययुक्त निश्चय दिसूं लागला, तो केवळ विष्णुशास्त्र्यांच्या उदाहरणाचेंच फळ होय, दुसऱ्या कोणाच्याहि उदाहरणाचा हा परिणाम नव्हता. टिळक, आगरकर, भानु, गोखले, वामन शिवराम आपटे, एवढेच काय, पण कर्वे, रँग्लर परांजपे, नरसोपंत केळकर, कृष्णाजीपंत खाडीलकर, लवाटे, हरिभाऊ आपटे, हरिभाऊ लिमये, प्रो. भाटे हे सर्व पुरुष विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्याच निःस्वार्थ परंपरेंतील अनुयायी होत. सरकारी नोकरींत न शिरणें हा ह्या सर्वांचा बाणा होता. आणि हा बाणा सर्वांनीं शेवटपर्यंत कायम ठेवला. तरुणांना आदर्शभूत असें विष्णुशास्त्र्यांसारखें जंगी उदाहरण राष्ट्राच्या इतिहासांत फारच थोड्या वेळीं घडत असेल. निदान महाराष्ट्रांत तरी तें विष्णुशास्त्र्यांच्या रूपानें एकदांच घडलें. विष्णुशास्त्र्यांपुढील सार्वजनिक कार्यांत शिरणारी आजपर्यंतची तरुण पिढी ही विष्णुशास्त्र्यांनीं लावलेल्या सुंदर बीजाचींच मधुर फळें होत. आपल्या उदात्त धैर्यानें महाराष्ट्रांतील तरुण पिढीवर विष्णुशास्त्र्यांनीं स्वतःचा कायमचा छाप मारून ठेवला आहे यांत तिळमात्र संशय नाहीं.

विष्णुशास्त्र्यांचें धैर्यकंकण लो. टिळकांनीं हातांत बांधलें खरें, पण त्यामुळें त्यांचेवर खरोखर अनन्वित प्रसंग आले. विष्णुशास्त्री बारल्याबरोबर त्यांना जे एकशें एक दिवस डोंगरीच्या तुरुंगांत काढावे लागले, तो तर एक प्रसंग राहोच, पण त्यांच्यावर पहिला धैर्याचा प्रसंग १८९७ सालीं ओढवला. ह्या वेळीं लॉर्ड सॅन्ढर्स्ट हे गव्हर्नर होते. देशांत दुष्काळ पडलेला होता व त्या दुष्काळाला मदत म्हणूनच कीं काय, ह्या देशांत त्याच सालीं प्लेगनें पहिल्यानें पाऊल ठेवलें. अलीकडील पिढीला प्लेग ही या देशांत नवीन चीज आहे हें कदाचित् खरेंहि वाटत नसेल, पण ह्या देशांत प्लेग नसल्याचें कोट्यवधि लोकांना माहित आहे व त्या वेळीं

प्लेगवांचून कोणाचें अडतहि नसे. प्लेगनें मुबई बंदरांत १८९६ सालच्या उत्तर भागांत पाऊल टाकलें व १८९७ चे आरंभास तो सर्व महाराष्ट्रभर फैलावला. प्लेगच्या बंदोबस्तामुळें पुण्यांत लोक इतके वैतागून गेले, कीं प्लेग बरा पण जीव नको, असें त्यांना होऊन गेलें. ह्यावेळीं सरकारनें

**रँड साहेबाचें प्रकरण.**

मि. रँड नांवाचा एक करडा अधिकारी पुण्यांत प्लेगचा बंदोबस्त करण्याकरितां आणन ठेवलेला होता. त्याची अंमलदारी चालविण्याची पद्धति लोकांना संताप आणण्यासारखी होती. त्यावेळीं आगरकर मरून वर्ष दीडवर्षच झालेलें होतें. व त्यांचा बाणेदार ' सुधारक, ' प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धन ह्या एका बाणेदार तरुणाचे हातीं आलेला होता. " सुधारका "मध्यें रँडच्या जुलमासंबंधानें झणझणीत लेख येऊं लागले आणि रॅण्डनिषेधाच्या ह्या मोहिमेंत सामील होण्याच्या उद्देशानें, " ज्ञानप्रकाश " पत्राचे ऑफिसांत लोकांचीं गाऱ्हाणीं नमूद करण्याकरितां एक नोंदणी–कचेरी मुद्दाम उघडण्यांत आलेली होती. कै. गोपाळ कृष्ण गोखले हे वेल्बी कमिशनपुढें साक्ष देण्याकरितां त्या वेळीं विलायतेस गेले होते. त्यांना येथील त्यांच्या मित्रांनीं प्लेगमधील जुलुमाचीं लालभडक वर्णनें ज्या वेळीं लिहून पाठविलीं त्या वेळीं त्या जुलुमांचीं तशींच वर्णनें त्यांनीं मँचेस्टर गार्डियन्‌ला पत्रें पाठवून व इतर ठिकाणीं लेक्चरें देऊन केलीं. इकडे प्रसिद्ध मिशनरी हिंदु विदुषी पंडिता रमाबाई ह्यांनींहि प्लेगमधील जुलुमाची बरीच हकीगत प्रसिद्ध केली.

वर दिलेल्या हकीगतीवरून प्लेगच्या जुलुमासंबंधीं जी चळवळ झाली त्या चळवळींत नेमस्त म्हणवून घेणाऱ्या पक्षानेंच जास्त पुढाकार घेतलेला होता, हें दिसून येईल. आणि ह्याला कारणहि तसेंच होतें. न्या. रानडे ह्यांनीं स्वतःला " नेमस्त " नांव घेऊन आपला पक्ष " जहाल " पक्षापासून वेगळा काढल्यानंतर पुण्यामध्यें राजकीय कामांत दोन संस्था अहमहमिकेनें काम करूं लागल्या. एक टिळकांची सार्वजनिक सभा, आणि दुसरी रानड्यांची डेक्कन सभा. दुष्काळाच्या बाबतींत टिळकांच्या संस्थेनें जास्ती काम केलें. फॅमिन कोड लोकांना समजावून सांगण्याकरितां टिळकांनीं जागोजाग वक्ते पाठविले, व आपले हक्क काय आहेत याची त्यांना माहिती करून दिली. ह्या वक्त्यांत शिवराम महादेव परांजपे व अच्युत

सीताराम साठे हे दोघे तरुण एम्. ए. होते. ह्या दोघांवरहि सरकारनें खटले केले, पण दोघेहि दोषमुक्त होऊन सुटले. शेवटीं दुष्काळमधील कामगिरीसंबंधानें सरकारचा टिळकांचेवर इतका राग झाला कीं एका विशिष्ट चुकीबद्दल शिक्षा म्हणून अर्ज करण्याचा सार्वजनिक सभेचा हक्क, लॉर्ड सॅण्ढर्स्ट ह्यांनीं सरकारी हुकूम काढून रद्द केला!

प्लेगमधील जुलुमाबद्दल जंगी चळवळ करण्याचा जो नेमस्त पक्षानें उपक्रम केला, तो टिळकांच्या दुष्काळविषयक चळवळीवरूनच होय. दुष्काळामधील टिळकांची चळवळ पाहून त्यांची लोकप्रियता भरारली, पण प्लेगविषयक त्यांची चळवळ त्यांच्या लोकप्रियतेला भरती आणण्याजोगी नव्हती. प्लेगमध्यें सर्व पुढारी पुणें सोडून पळून गेले असतां ते धैर्यानें शहरांत राहिले, त्यांनीं पेठेनिहाय कमिट्या स्थापन केल्या आणि हिंदु हॉस्पिटलाची स्थापना करून त्यांनीं लोकांची औषधपाण्याची उत्तम व्यवस्था केली. पण सरकारच्या जुलुमाचा निषेध करीत असतां ते लोकांच्या भ्याडपणाबद्दल जे लोकांवर कोरडे उडवीत ते त्यांना आवडत नसत, आणि टिळक हे सरकारशीं लागू आहेत अशीहि त्यावरून कांहीं लोकांनीं कंडी पिकविली. ह्या कुटाळकीचा शेवटीं असा परिणाम झाला कीं टिळकांना रावबहाद्दूर ही पदवी मिळणार अशी चोहोंकडे बातमी पसरली. ह्या बातमीवर लोक खुशाल विश्वास ठेवूं लागले.

ह्याच संधीस शिवाजीमहाराजांचा उत्सव झाला. १८९६ सालीं रायगडावर झालेल्या उत्सवानंतरचा हा दुसरा उत्सव होय. ह्यापूर्वीच प्रो. भानु हे स्वतः गाणपत्य असल्यामुळें टिळकांच्या गणपति–उत्सवांत सामील होत, आणि स्वतः इतिहाससंशोधक असल्यामुळें शिवाजी–उत्सवांतहि ते प्रसिद्धपणें सामील होत. " नाना आणि महादजी " हे त्यांचे इतिहासविषयक लेख प्रथम केसरी पत्रांतच प्रसिद्ध झाले होते. आणि ह्या सुमारास अफझुलखानाच्या वधासंबंधानें नवीन इतिहास–पुरावा गोळा करून

**टिळक व प्रो. भानु.**

ते त्यावर व्याख्यानें देऊं लागले होते. पुणें येथील डेक्कन कॉलेजांतील इतिहासविषयक प्रोफेसर एफ्. डब्ल्यू. बेन ह्यांचे अध्यक्षतेखालीं डेक्कन कॉलेजांत त्यांचें एक व्याख्यान झालें. आणि इतरत्रहि त्यांच्या ह्या विषयाचा बोलबाला झाल्या-

मुळें १८९७ च्या जून महिन्यांत पडणाऱ्या शिवाजी–उत्सवाकरितां टिळक-पक्षीय मंडळीनीं त्यांना व्याख्यानाची सुपारी दिली. त्यांनींहि ती पत्करली आणि टिळकांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचें त्याच विषयावर टिळकांच्या वाड्यांत व्याख्यान झालें. केसरी पत्रांत ह्या व्याख्यानाचा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन अध्यक्ष ह्या नात्यानें टिळकांनीं केलेल्या भाषणाचाहि सारांश प्रसिद्ध झाला. पण हा रिपोर्ट प्रसिद्ध होऊन एक आठवडा लोटतो न लोटतो तोंच, किंबहुना ह्या रिपोर्टाची शाई वाळते न वाळते इतक्यांत धूम्! धाड्! धाड्! धूम्! धाड्! धाड्! धाड्! धाड्! धाड्!! व्हिक्टोरिया राणीच्या ज्युबिली–समारंभाच्या ऐन उत्सवांत आणि गव्हर्न-रच्या बंगल्याच्या ऐन रस्त्यावर रँडसाहेबाचा खून पडला आणि रॅण्ड बरोबर लेफ्टनंट ऐयर्स्ट नांवाचा एक लष्करी अंमलदारहि मारला गेला.

मग काय विचारतां? सरकारी अंमलदारांत एकच कल्लोळ उडाला. या खुनाच्या मुळाशीं कोण असावा ह्याची चौकशी सुरू झाली. संशय घरण्याजोग्या जितक्या संस्था होत्या त्या सर्व संस्थांची खानेतलाशी करण्यांत आली. रँडच्या जुलमाविरुद्ध चळवळ करणाऱ्यांकडे, म्हणजे अर्थात् नेमस्त-पक्षीय लोकांकडे सरकारचें लक्ष वळलें. ह्यांपैकीं कोणीहि खून केले नव्हते किंवा खुनाला प्रोत्साहनहि दिलें नव्हतें. ह्यांची सर्व चळवळ अत्यंत देश-भक्तीची, अत्यंत कायदेशीर आणि अत्यंत शांततामूलक होती. किंबहुना, त्यानीं जर ही चळवळ केली नसती तर, रॅण्डच्या जुलमाला व लोकांच्या क्षोभाला जास्तच ऊत आला असता. ह्यांनीं जरी ह्या वेळीं माघार खाल्ली नसती तरी त्यांचा खुनाशीं संबंध जोडण्याची सरकारची छाती नव्हती. पण तका विवेक ह्या लोकांनीं केला नाहीं. सरकारनें डोळे वटारल्याबरोबर ज्ञानप्रकाशनें माफी मागितली, 'सुधारका' नें दिलगिरी प्रदर्शित केली, वासुदेव बळवंत पटवर्धन ह्यांनीं एडिटरशिप सोडून दिली, प्रो. भानूंनीं खुषीच्या सक्तीचा अज्ञातवास पत्करला, विष्णु मोरेश्वर भिडे क्षमा मागून मोकळे झाले व गोपाळ कृष्ण गोखले विलायतेहून येऊन मुंबई बंदरांत पाय ठेवतात तोंच त्यांनीं आपली अन्कंडिशनल अपॉलजी पोलीस कमिशनरच्या पुढें लिहून दाखल केली.

ह्या सर्व लोकांनीं लष्करी क्षोभाच्या महायज्ञाचें अवभृथस्नान केल्या-बरोबर सरकारच्या डोळ्यांसमोर व डोळ्यावर येणारे फक्त एक टिळक व त्यांचे स्नेहि शिल्लक राहिले. ह्यांची प्लेगांतहि चळवळ विशेष मोठ्या प्रमाणावर नव्हती. सरकारच्या बरोबर त्यांनीं लोकांवर खरमरीत ताशेरे झाडलेले होते. तरी माघार न खाणारे आणि सरकारचीं जीं कृत्यें नापसंत असतील त्यांचेवर प्रखर टीकास्त्र सोडण्यास न डगमगणारे एक टिळक हेच होते आणि म्हणून नेमस्त पक्षाच्या क्षमायाचनेनंतर सरकारची सबंध झडप एका टिळकांवरच येऊन पडली.

टिळकांचें अत्युत्तम लेखन जें आहे तें ह्या काळांतील आहे. ह्यावेळीं टिळकांची लेखणी आपल्या उच्चत्वाच्या भरांत येऊन पोंचली होती. त्यांचें सर्व उदात्त मन ह्यावेळीं त्यांच्या लेखणींत येऊन उतरलें होतें. जगांतील उत्कृष्ट विचाररत्नांत हक्कानें विराजतील असे उमदे विचार त्यांची लेखणी भराभर प्रसवत होती. ह्यावेळीं केसरीचा प्रत्येक अंक एकएका अंकापेक्षां सरस निघे व त्यांचें प्रत्येक वाक्य मागल्या वाक्यापेक्षां मोलाचें होई. लेखणी थंड पडून हृदय लिहितें, लेखणी हें साधन असून मनुष्याच्या उमदेपणाचा पुंज लिहिण्याचें काम करते, असे प्रसंग प्रत्येक उत्कृष्ट लेखकाचे आयुष्यांत केव्हांतरी येत असतात. टिळकांचे आयुष्यांतील पहिला प्रसंग हा होता. त्यावेळीं त्यांनीं जें लिहिलेलें आहे तें ऐकून खरोखर पाषाणाला सुद्धां अंत:करणें फुटतील मग जिवंत माणसांचीं मनें गग्ददा हालतील ह्यांत काय नवल आहे? टिळकांना जर लेखक म्हणायचें असेल तर आह्मीं या वेळीं ह्मणूं. चऱ्या पाडणाऱ्या पेन्सिलीनें स्लेटपाटीवर जसे करकोचे पडतात व पाटी कितीहि पुसली तरी ते जात नाहींत असें लिहिणें असलें तर तें लिहिणें ! नाहींतर तें लिहिणें कसलें ? टिळकांनीं ह्या प्रसंगीं असलें लिहिणें लिहिलें. त्यांनीं ह्या वेळीं जें लिहिणें लिहिलें त्याचा त्या काळच्या लोकांच्या हृदयावर तर करकोचा पडलाच पण त्याचें अस्पष्ट नादब्रह्म ह्या महाराष्ट्रांत अजूनसुद्धां घुमत आहे. टिळकांच्या भोंवतीं शेवटपर्यंत दहादहा वर्षांचीं मुलें गोळा होत. मोळीविक्या अडाणी बाया त्यांचे भोंवतीं गर्दी करीत. लंगोटी लावलेले असंख्य शेतकरी त्यांना पाहण्यासाठीं झुंडीनें येत. साक्षरतेचा पिढ्यान्‌पिढ्या गंध नसलेले अडाणी

**टिळक व लंगोटीवाले.**

देशबांधव पंढरीच्या पर्वणीप्रमाणें त्यांच्या आगमनाची पर्वणी समजत हें कशामुळें ? त्यांना त्यांचीं लेक्चरें समजत होतीं म्हणून ? त्यांनीं कधीं त्यांची विलायतची कामगिरी पाहिली होती म्हणून ? त्यांना होमरूल शब्दाचा अर्थ कळला म्हणून ? छे, ह्यांपेकीं कशामुळें नाहीं, कशामुळेंहि नाहीं. थोर पुरुषांचीं अंतःकरणें आपल्या उदात्तपणाच्या ऐन जोमांत हजारों देशबांधवांच्या हृदयावर जे कायमचे करकोचे पाडीत असतात त्यामुळेंच होय.

येशू ख्रिस्ताच्या ग्रंथांत, त्याचें डोंगरावरील प्रवचन अत्यंत उत्कृष्ट मानतात. भवभूतीनें उत्तर-रामचरित्राच्या तिसऱ्या अंकांत करुणरसाची कमाल केली आहे, असें म्हणतात. शेक्सपीअरच्या किंगलिअरमध्यें त्याच्या भावनामय लेखनाची सीमा झालेली आहे असें मानण्यांत येतें. रामदासांच्या समग्र ग्रंथांत त्यांच्या करुणाष्टकाची जोड कशालाहि यायची नाहीं अशी समजूत आहे. पण ह्या सर्व परमोत्कट वाङ्मयांत टिळकांनीं त्या वेळीं लिहिलेले केसरीचे अंक खात्रीनें जाऊन बसतील. त्यांनीं त्या वेळीं सहजस्फूर्तीनें असे सुन्दर सुन्दर व उच्चपणांत उच्च, श्रेष्ठांत श्रेष्ठ, उदात्तपणांत उदात्त सिद्धांत लिहिलेले आहेत, कीं कोणताहि तत्त्वज्ञ त्यांची रत्नमाला आपल्या कंठांत अभिमानानें मिरवील !

अंतःकरणें उचकटायला कालिदासाचें मेघदूतच कशाला पाहिजे ? हा आमचा महाराष्ट्र–मुरलीधर टिळक आपल्या त्या वेळच्या लेखांनीं कोणत्याहि पिढीचीं अंतःकरणें उचकटील !

टिळक ह्या वेळीं यत्किंचित्‌हि भ्याले नाहींत. सरकार जों जों धमकी द्यायला लागलें, तों तों हे निर्भयतेला चढले आणि मि. रॅण्डचा खून झाल्यापासून एक महिन्याच्या आंत त्यांना राजद्रोहाच्या आरोपावरून सरकारनें

**टिळकांवरील खटला.**

गिरफदार केलें. त्यांचे स्नेही सरदार नातूबंधू ह्यांनाहि अटक करण्यांत आली. टिळकांच्याकरितां बॅरिस्टर दावर (हेच पुढें न्यायमूर्ति होऊन टिळकांना काळ्यापाण्याची शिक्षा देणारे झाले) ह्यांनीं मॅजिस्ट्रेटकडे जामीन मागितला, पण तो मिळाला नाहीं. पुढें हायकोर्टांत जामिनाचा प्रश्न निघून न्या. बदरुद्दीन तय्यबजी ह्यांनीं त्यांचेकरितां एक लाख रुपयांचा जामीन मागितला व श्री. जमनादास द्वारकादास ह्यांचे वडिलांनीं त्या जामिनाची तजवीज

केली. तितक्यांत टिळक भयंकर आजारी पडले व खटल्याची सुनावणी होण्याचे अगोदरच ते जगांतून नाहींसे होतात कीं काय, अशी भीति पडली. पण ते त्यांतून बरे झाले, व मुंबईहून पुण्यास गेले.

ह्या अवधींत सरकारची माफी मागून मोकळे होण्याबद्दल त्यांच्या कांहीं कांहीं मित्रांनीं शिकस्त केली आणि जे माफी मागा असें प्रत्यक्ष म्हणत नव्हते त्यांनाहि टिळकांचे तुरुंगाचे क्लेश चुकले असते तर आनंदच झाला असता. निदान माफी मागूं नका, कांहीं झालें तरी सरकारच्या मिथ्या आरोपांना तोंड द्या, असा त्यांना निग्रहाचा उपदेश करणारा एकहि स्नेही नव्हता पण एकटे टिळक मात्र तसे होते. त्यांनीं निश्चय केला कीं, 'देह जावो अथवा राहो' पण जें आपण बोललों, जें आपण लिहिलें, जो आपण लोकांना उपदेश केला तो आपण खरा करून दाखविणार!

ह्या वेळच्या एका पत्रांत ते म्हणतात कीं अशा प्रसंगीं जर मी माघार खाल्ली व क्षमा मागून मुक्त झालों तर लोकांत माझें वजन काय राहील? व माझ्या बोलण्याला कोण किंमत देईल? अशा स्थितींत पुण्यांत जिवंत राहणें काय, किंवा अंदमान बेटांत राहणें काय सारखेंच! ह्यासाठीं माफी न मागण्याचा मी निश्चय केला आहे. मग माझ्या जीवाचें जें काय होईल तें होवो.

ह्या वेळीं टिळकांचें वय बेचाळीस वर्षांचे होतें. त्यांच्या एकाच मुलीचें लग्न झालें होतें व मुलगे लहान होते. कुटुंबपोषणाला सर्व आधार काय तो "केसरी"चा होता. पण "केसरी"चें कर्ज आदल्याच वर्षीं फिटलेलें होतें. त्यांचे एक धनवान स्नेही श्री. बाबामहाराज ह्याच पंधरवड्यांत वारले होते, व टिळकांनीं संकटांत उडी घ्यावी अशी त्यांची कोणत्याहि प्रकारची आर्थिक परिस्थिति नव्हती. पण संकट उभें राहिल्यावर हा सिंहाचा छावा काय डरणार? संकटांत उडी घालायला तो स्वतःच्या हिंमतीनें तयार झाला व माफीच्या सर्व सूचना फेंटाळून हा वीर न्यायासनापुढे धैर्यानें उभें राहण्याकरितां पुन्हां पुण्याहून मुंबईस आला.

झालें! खटला सुरू झाला. टिळकांच्याकरितां कलकत्त्याहून बॅरिस्टर प्यू हे मुद्दाम आले होते. सरकारच्या बाजूला उत्तम उत्तम कायदेपंडित

होते. खटला आठ दिवस चालला, व आठवे दिवशीं त्या. स्ट्रॅची ह्यांनीं टिळकांना दोषी ठरवून अठरा महिने सक्तमजुरीची शिक्षा दिली! टिळक त्या वेळीं इतकेंच म्हणाले कीं, 'आपण जरी मला दोषी ठरविलें तरी मी राजद्रोहाचा गुन्हा केलेला नाहीं; ज्यूरीला मराठी समजत नव्हतें ही शोचनीय गोष्ट आहे; त्यांना जर मराठी समजत असतें तर केसरींतील वाक्यांचा अर्थ मी म्हणतों त्याप्रमाणेंच त्यांनीं केला असता!' टिळकांचें हें निर्भय भाषण ऐकून कोर्टांत हजर असलेल्या दोन युरोपियन स्त्रियांना धन्यता वाटली. प्रत्येक प्रमुख वर्तमानपत्रानें त्यांची पाठ थोपटली, त्यांचीं चित्रें, फोटो, कार्टुनें ह्यांची गर्दी उसळली, येथील ॲडव्होकेट पत्रानें त्यांचा एक मोठा फोटो छापून वांटला!

**चणे खावे लोखंडाचे!**

टिळक हे जे टिळक झाले ते उगीच झाले नाहींत. 'चणे खावे लोखंडाचे' ह्या तुकारामोक्तीप्रमाणें त्यांनीं लोखंडाचे चणे खाल्ले तेव्हां लोकांनीं आपल्या डोक्यावर त्यांना नाचूं दिलें. त्यांचा वऱ्हाडमधील दौरा, साठाव्या वर्षी झालेला जयजयकार, त्यांच्या होमरूल चळवळीची झालेली वडेजावी, ह्यावरून त्यांच्या लोकप्रियतेची जी साक्ष पटते तिचेवरून त्या लोकप्रियतेची भलती मीमांसा करण्यांत मात्र अर्थ नाहीं. ह्या लोकप्रियतेची मीमांसा एकच कीं दुर्धर संकटकाळांत सुद्धां ते अत्यंत निर्भयपणानें वागले. टिळकांची लोकप्रियता स्वस्त होती, सवंग होती असा केव्हां केव्हां ध्वनि निघतो व बोरीबंदरपासून लखनौपर्यंत प्रत्येक स्टेशनवर त्यांचा जो जयजयकार होई, ह्यावरून कोणी कोणी ह्या ध्वनीला पुष्टीहि देत. पण तरुण लोकांनीं ह्या बाबतींत आपला गैरसमज कधींहि होऊं देतां उपयोगी नाहीं. टिळकांची लोकप्रियता त्यांच्या संकटक्षमतेवरच प्रस्थापित झालेली होती. धैर्याचा काळ्या पाषाणाचा चौथरा त्या लोकप्रियतेच्या बुडाशीं होता आणि ह्यामुळेंच इतरांची लोकप्रियता आली आणि गेली तरी टिळकांची लोकप्रियता भंग पावली नाहीं. "ब्रह्मज्ञान नव्हे चाऊटीच्या गोष्टी" असें जें तुकाराम महाराजांनीं म्हटलेलें आहे, तें राजकारणाला तंतोतंत लागू पडतें. राजकारण हें चाऊटीच्या गोष्टी नव्हेत. राजकारणासाठीं रक्त सांडावें लागतें.

टिळकांच्या आयुष्यांतील हा पहिला प्रसंग झाला. दुसरा प्रसंग ह्यापेक्षांहि भीषण आहे. हा प्रसंग म्हणजे अर्थातच ताईमहाराजांचे खटल्यांतील होय.

**ताईमहाराज प्रकरण.**

ताईमहाराजांचे खटल्याला जें इतकें विकोपाचें रूप आलें, ह्याचें कारण टिळकांचें खाजगी वर्तन पापिष्ट ठरावें, ह्यांत सरकारी अधिकाऱ्यांचा फायदा होता, हें होय. १८९७ च्या खटल्यांत लो. टिळकांचेकडून सरकारला जर माफी मिळाली असती तर ती त्यांना हवी होती. कारण त्या माफीचे बळावर टिळकांची लोकांच्या अंतःकरणावरील पक्कड त्यांना बोलवोल म्हणतां नाहींशी करतां आली असती पण हा त्यांचा बेत सिद्धीला गेला नाहीं. लो. टिळकांना भीति दाखवूं, त्यांना धाकदपटशानें वळवूं, संकटांच्या बळानें त्यांना राजकारणाच्या पटांगणावरून हांकलून देऊं, ही सरकारी अधिकाऱ्यांची आशा जेव्हां नष्ट झाली तेव्हां टिळकांचें वजन कमी करण्याचा त्यांना मार्गच सांपडेना. आयर्लंडच्या इतिहासांत सरकारला ह्याच प्रमाणें पार्नेल नांवाचा एक पुढारी डोईजड झाला होता. पण नवरा जिवंत असलेल्या ओशी नांवाच्या एका बाईशीं तो आठदहा वर्षें लागू असल्यामुळें आणि तें बेंड पुढें अवजड होऊन फुटल्यामुळें, सरकारला त्याचें वजन जें एकदम खाड्दिशीं कमी करतां आलें तें पार्नेलला पुढें कशानेंहि सांवरतां आलें नाहीं. लो. टिळकांच्या आयुष्यांत असलें कोणतेंहि व्यंग नव्हतें. त्यांचें खाजगी वर्तन धुतल्या तांदुळाप्रमाणें चोख होतें. हिंदुस्थानांत सरकार जें झगडत होतें, तें आयर्लंडप्रमाणें एखाद्या दुराचारी पार्नेलशीं झगडत नव्हतें, तर ह्या धर्मभूमींतील एका पवित्र पुरुषाशीं झगडत होतें. ह्या पुरुषाचे मुखांतून पुढें गीतेचा अर्थ स्फुरणार होता, व 'आचार्य' पदवीला हा पुरुष पुढें पात्र होणार होता. पण सरकारला त्या गोष्टीची काय कल्पना ? त्यांना एवढेंच माहित होतें कीं टिळक हे कधीं विषयवासनेच्या लफड्यांत सांपडत नाहींत, कधीं मद्यस्पर्श करीत नाहींत, कधीं अभक्ष्यभक्षणालासुद्धां तयार होत नाहींत. पण इतक्यांत ताईमहाराज नांवाची त्यांच्याच एका परमप्रिय स्नेह्याची पत्नी, अशी तक्रार घेऊन आली कीं टिळकांनीं आपलेवर दुराग्रह चालवून, आपली इच्छा नसतांना आपल्याकडून एक मुलगा दत्तक घेवविण्याचा प्रयत्न केला आणि त्याचें दत्तविधान झालें नसतांनाहि तें झाल्याबद्दल धडधडीत खोटें विधान

त्यांनीं केलें. टिळकांच्या वाईटावर असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना ह्यापेक्षां दुसरें काय पाहिजे होतें ? त्यांनीं लगेच बाईच्या बोलण्यावर विश्वास टाकला आणि टिळकांवर फौजदारी खटला सुरू केला. पर्जरी, फोर्जरी वगैरे सरकारी कायदेपुस्तकांत जितकीं जरीपुराणवालीं बदमाष लोकांसाठीं घातलेलीं कलमें आहेत, त्या कलमांचें पाशुपतास्त्र ज्यावेळीं टिळकांचेवर सोडण्यांत आलें, त्यावेळीं खरोखर टिळकांच्या आयुष्यांतील अत्यंत कसोटीचा प्रसंग होता. टिळकांचे जागीं जरी दुसरा कोणताहि गृहस्थ असता तरी असले आरोप उच्चारल्याबरोबर त्याच सरकारी अधिकाऱ्यांनीं ते आरोप खोटे मानले असते. निदान त्याची उत्तम रीतीनें प्राथमिक चौकशी केल्याशिवाय त्यांनीं असल्या खटल्याला संमति दिलीच नसती. पण टिळकांचे बाबतींत त्यांनीं ही संमति दिली व ती आनंदानेंच दिली. असली संमति देण्याचा सुप्रसंग आल्याबद्दल त्यांनीं देवाचे आभारहि मानले असतील ! टिळकांचेवरील सर्व संकटांत हें दुस्तर संकट होतें. कारण त्यांत त्यांची खासगी वर्तणूक आणि समाजांतील दर्जा ह्यांचेवर घाला होता. पण हेंहि संकट टिळकांनीं धैर्यानें सोसलें. हा संकटांचा पाश त्यांचे गळ्याभोंवतीं पडला असतांनाच 'आर्टिक होम इन् दि वेदाज्' ह्या सुप्रसिद्ध ग्रंथाचें लेखन चाललें होतें.

ह्या फौजदारी खटल्यानें टिळकांना १९०२ पासून १९०४ पर्यन्त छळलें. त्यांच्या आयुष्यावरील अत्यंत काळाकुट्ट डाग ह्मणजे तुम्ही पर्जरी (खोट्या शपथा), फोर्जरी (खोटे कागद) इ. करणारे गृहस्थ आहां, असा त्यांचेवर आरोप ठेवून मि. क्लेमंटस्, स्पेशल मॅजिस्ट्रेट, ह्यांनीं त्यांना दिलेली अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा होय. ही शिक्षा व्हावयाच्या अगोदर आठच दिवस त्यांचा वरील ग्रंथ बाहेर पडलेला होता व त्याची सर्वत्र वाहवा चाललेली होती. शिक्षा ऐकण्याकरितां कोर्टांत जातांना

**फौजदारी खटला.**

'तुम्हीं निर्दोषी ह्मणून सुटाल' असें त्यांना ज्योतिषानीं आश्वासन दिलें होतें. पण राजकीय ज्योतिष इतर कोणत्याहि ज्योतिषापेक्षां त्यांनाच उत्तम कळत असे. त्यांनीं असली खोटी आशा कधींहि बाळगली नाहीं. कोर्टांत जातांना आपल्या हातानें त्यांनीं अपीलाची तजवीज केली आणि कोर्टाचा हुकूम झाल्याबरोबर ते पोलीसच्या स्वाधीन झाले. पण इतक्यांत इकडे अपील—कोर्टाचा हुकूम

त्यांना जामीनावर सोडण्याचा आला. येरवडयापर्यन्त जाण्याचा आणि पहिले कपडे वगैरे काढण्याचा आणि तुरुंगांतील वस्त्रें परिधान करण्याचा त्यांचा विधि होत आहे, इतक्यांत त्यांचे स्नेही जामीनाचा हुकूम घेऊन तेथें गेले आणि त्यांनीं त्यांना सोडवून आणलें. अपील कोर्टानें त्यांचा आरोप कायम केला, पण शिक्षा दीड वर्षावरून सहा महिन्यांवर आणली. ह्याचेपुढील अपील म्हणजे हायकोर्टापुढीलच होय. ह्या वेळीं सर लॉरेन्स जेन्किन्स हे मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश होते. त्यांची नेमणूक झाल्यापासून त्यांच्या न्यायप्रियतेचा डंका वाजत होता. पण हायकोर्टापुढील अपील करण्याच्या ऐन वेळेस नाताळची सुटी आली आणि ह्या सुटींत जामीनाचा अर्ज करणें शक्य नसल्यामुळें टिळकांना येरवडयाच्या तुरुंगांत नाहक रखडावें लागलें. आटोकाट मानवी प्रयत्न केले तरी त्यांचा तुरुंगवास त्या वेळीं चुकवितां आला नाहीं.

हायकोर्ट उघडल्यानन्तर त्यांना जामीन मिळाला व पुढें दोन महिन्यांनीं अपीलाची सुनावणीहि झाली. सर लॉरेन्स जेन्किन्स ह्यांच्या कीर्तीला शोभेल अशीच ती सुनावणी होती. त्यांनीं टिळकांना सर्व आरोपांतून पूर्ण निर्दोषी ठरविलें इतकेंच नव्हे तर, दत्तकप्रकरणांतील टिळकांचे वर्तन कोणत्याहि प्रकारें आक्षेपार्ह नव्हतें असा आपला अभिप्राय नमूद करून ठेवला.

ह्याप्रमाणें सरकारचा पुनः एक डाव फसला; नाहींतर ह्याचे परिणाम टिळकांना अत्यंत बाधक झाले असते. टिळक खोटया शपथा घेणारे आहेत, खोटे कागद करणारे आहेत, अशी गोष्ट जर एकदां कां शाबीत झाली असती तर समाजांतून उठण्याची पाळी त्यांचेवर आली असती. त्यांच्या विश्वासू अनुयायांनीं त्यांना सोडलें असतें असा भाग नाहीं आणि आमचें तर असें मत आहे कीं, अनुयायांनीं आपला पुढारी स्वतः अगोदरच पारखून घ्यावा, अदालतीचे मतावर त्याचा निर्दोषीपणा अवलंबून ठेवूं नये. पण सर्व लोक इतके समंजस असतात असें नाहीं. कांहीं लोक तर असे असतात कीं, हायकोर्टाचें मत तें त्याचें मत. मग चुकीच्या समजुतीनें ह्या कोर्टानें पांढऱ्याला काळें अथवा काळ्याला पांढरें ठरविलेलें असलें तरी हरकत नाहीं. अशा लोकांच्या कचाटयांतून

**परमेश्वराची कृपा.**

लो. टिळक सुटले ही खरोखर परमेश्वराची कृपा होय. पण ह्या संकटांत

ते जर घाबरले असते तर खटल्यांतून सुटण्याचे न्यायाचे मार्ग त्यांना सुचलेच नसते.

ह्या पुढील प्रसंग म्हणजे, त्यांच्या धैर्याच्या कसोटीचा तिसरा प्रसंग होय. या प्रसंगांत सर्व भीषणता, सर्व कठोरता, सर्व उत्कटता, सर्व कठीणता, आणि सर्व अत्यंतता भरलेली आहे. इतका भयंकर प्रसंग मनुष्याच्या आयुष्यांत तर येत नाहींच, पण नाटकारांना तरी रंगवितां येतो कीं नाहीं हा प्रश्नच आहे. करवीरमठाच्या शंकराचार्यांनीं लोकमान्यांना 'राष्ट्रसूत्रधार' ही पदवी धाडून दिलेली आहे. पण खरोखर म्हटलें म्हणजे लोकमान्य हे एका भयानक रसाच्या नाटचकथानकाचे "हीरो" होते आणि जगन्नाटकसूत्रधाराच्या इच्छेप्रमाणें महाराष्ट्राच्या रंगभूमीवर हा नाटचप्रयोग चाललेला होता. १८९७ पासून टिळकांनीं नाटकाकडे फारसें लक्ष दिलें नाहीं हें मागें एके ठिकाणीं सांगितलेलेंच आहे, पण ह्याचें कारण कदाचित् हेंच असेल कीं, वरील भयानक नाटचप्रयोगांत "हीरो"चा भाग त्यांना करावा लागला होता. मुम्बईत होणारीं नाटकें बहुतकरून तीन अंकांची असतात आणि त्यांपैकीं तिसऱ्या अंकांत नाटककार आपल्या सर्व नाटचशक्तीची अशी उठावदार फेंक करतो कीं, तें पाहून प्रेक्षक आश्चर्यमूढ होऊन जातात. लोकमान्य ज्या भयानक नाटचप्रयोगांतील हीरो होते, तो सर्व प्रयोग मुम्बईतच झाला, आणि त्याचे अंकहि तीनच झाले. ह्यापैकीं पहिला अंक १८९७ सालीं सर जॉन स्ट्रॅचीपुढें झाला, दुसरा अंक १९०४ मध्यें सर लॉरेन्स जेन्किन्सपुढें झाला आणि तिसरा अंक १९०८ सालीं न्यायमूर्ति सर दिनशा दावर ह्यांचेपुढें झाला. पहिल्या दोन अंकांचें विवेचन आतांपर्यंत झालेलें आहे. तिसरा अंक अत्यंत भीषण, अत्यंत भयानक आहे, वर सांगितल्याप्रमाणें तिसरा अंक अत्यंत कसोटीचा आहे. जगन्नाटकसूत्रधारानें ह्या अंकांत टिळकांना अत्यंत दुर्घट प्रसंगांत घातलें, पण त्याहि प्रसंगांत टिळकांनीं शाबास म्हणवून घेतलें.

**टिळकांचा 'हीरो'चा पाट!**

लॉर्ड कर्झनसाहेबांनीं लोकमताविरुद्ध बंगालची फाळणी केल्यानंतर, काय काय प्रकार झाले त्या सर्व गोष्टींची येथें जंत्री देणें अनवश्यक होय. ह्यांत टिळकांचा केवढा भाग होता, एवढेंच सांगणें इष्ट आहे. पण ह्या

चळवळींतील टिळकांचा केवढा भाग होता हें सांगणें म्हणजे चळवळीचा सर्वच भाग सांगणें होय. कारण ही चळवळ जरी बंगालमध्यें सुरू झालेली होती, तरी टिळकांनीं थोडक्याच काळांत तिच्याशी स्वत:ला इतकें तन्मय करून घेतलेलें होतें कीं ह्या चळवळीचे हातपाय बंगाल्यांत असून डोकें पुण्यांत आहे, असें तिला लौकरच रूप आलें. ह्या वर्षीं कॉंग्रेसची बैठक नागपूर येथें भरायची ठरलेली असल्यामुळें ह्या सभेला टिळक हेच अध्यक्ष असावे अशी बाबू बिपिनचंद्र पॉल ह्यांनीं बंगाल्यांत चळवळ सुरू केली आणि तिला खुद्द नागपूर येथें इतकें पाठबळ मिळालें कीं सर फिरोजशहा मेथा वगैरे पुढारी घाबरून जाऊन, त्यांनीं कॉंग्रेसची उचलबांगडी नागपूरहून सुरतेस केली. ह्याचवेळीं नेमस्त पुढारी व राष्ट्रीय पुढारी ह्यांचें, राष्ट्राचें ध्येय कोणतें, कलोनियल स्वराज्य कीं काय, ह्या विषयावर भांडण जुंपलें होतें. आणि राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार ह्याहि विषयावर पुढाऱ्यांत कुरबूर होती. ह्या सर्व भांडणांना, अध्यक्षपदाच्या भांडणाची

**सुरतेची कॉंग्रेस.**

जोड मिळून, राष्ट्रीय पक्ष आणि नेमस्त पक्ष ह्यांचे दरम्यान सुरत येथें असा भयंकर रणसंग्राम झाला कीं, त्या तडाख्यांत सुरत येथील कांग्रेस उधळून गेली. सरकार हा सर्व प्रकार लक्षपूर्वक अवलोकन करीत होतें. आणि बंगालच्या फाळणीच्या निमित्तानें देशाच्या कोनाकोपऱ्यांतून टिळकांनीं हेलावलेली स्वराज्याची चळवळ कशी नियंत्रित करावी या विचारांत ते होते. त्यांनीं विद्यार्थ्यांना बंदी करण्याकरितां रिस्ले सर्क्युलर काढलें. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. त्यांनीं सभा बंद पाडण्याकरितां सेडिशस–मीटिंग ॲक्ट केला, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. त्यांनी शेंकडों तरुणांना व लियाकत हुसेन ह्यांच्यासारख्या वयोवृद्ध माणसांना सुद्धां तुरुंगांत घालून पाहिलें, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. टिळकांची चळवळ वाढतच होती, त्यांचे अनुयायी भरतच होते. स्वराज्याचा नाममंत्र हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि रंगूनपासून बलुचिस्तानापर्यंत जास्त जास्त दुमदुमला जात होता !

आणि एवढ्यानेंच टिळकांचें समाधान झालें नाहीं. वरील हेलकावा, वरील आंदोलन, वरील लहरी व लाटा ह्या अपुऱ्या पडल्या म्हणूनच कीं

काय, टिळकांनीं ह्याच सुमारास आपली मद्यपाननिषेधाची प्रचंड चळवळ सुरू केली. ही चळवळ एक दोन आठवड्यांच्या आंत महाराष्ट्राच्या दरी-खोऱ्यांपर्यंत पसरली आणि दारूबाजांना दारू पिणें अशक्य झालें. रयतेला दारू पिण्याचा हक्क आहे असें सरकारी अधिकाऱ्यांनीं पुष्कळ सांगून पाहिलें, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. ह्याच सुमारास मागें एका ठिकाणीं सांगितलेले उद्‌गार एका सरकारी अधिकाऱ्यानें काढले. तो म्हणाला कीं सध्यां महाराष्ट्रांत टिळकांचा अंमल सुरू झालेला आहे, अशा स्थितींत आम्हांला आपली हुकमत चालवितां येणें शक्य नाहीं.

**टिळकांची हुकमत.**

पण इतकेंहि झालें तरी टिळकांचेविरुद्ध कांहीं एक करणें, अथवा त्यांची चळवळ बंद पाडणें, सरकारला अशक्य होतें. कारण, टिळक जें जें करीत होते त्यांत बेकायदेशीर कांहींएक नव्हतें. पण इतक्यांत अशी तार आली कीं बंगालमध्यें कांहीं तरुणांनीं किंग्जफर्ड नांवाच्या एका मॅजिस्ट्रेटवर बॉम्बगोळे फेंकण्याचा प्रयत्न केला आणि तो मिसेस केनडी नांवाच्या एका इंग्रज स्त्रीला लागून ती प्राणास मुकली. त्याचे पाठोपाठच दुसरी एक तार आली कीं कलकत्ता येथें माणिकतोळा बागेंत बॉम्ब तयार करण्याचा एक भयंकर कट झालेला असून श्री. अरविंद घोष व त्यांचे भाऊ हे त्या कटांत आहेत!

ह्या बातम्या विद्युल्लतेप्रमाणें सर्व देशभर पसरल्या. सर्वांचे डोळे एकदम टिळकांच्या सुरक्षितपणाकडे लागले, पण त्याचेहि अगोदर सरकारचे डोळे त्यांचेकडे लागलेले होते. बॉम्बगोळे, बंगालमधील प्रकार, अरविंद घोषचा खटला, इत्यादि विषयांवर केसरींत आर्टिकलें येऊं लागल्याबरोबर सरकारनें टिळकांवर पुन्हां खटला केला. बॉम्बगोळ्यांची मीमांसा वगैरे आर्टिकलें सदोष म्हणून सरकारचा आक्षेप होता. टिळकांचे पूर्वीचे वकील सर दिनशा दावर हे ह्यावेळीं नुकतेच हायकोर्टातील न्यायाधिशाच्या जागेवर विराजमान झालेले होते. टिळकांना सरदारगृहांत पकडलें व मि. ॲस्टन प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, ह्यांचेपुढें उभें केलें. त्यांनीं जामीन न दिल्यामुळें जस्टिस दावर, हायकोर्ट जज्ज, ह्यांचेपुढें जामीन मागण्यांत आला, त्या वेळीं सर्वांना आशा होती कीं न्या. दावर हे टिळकांना


कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकर ( पत्नी व पुत्र यांसह )—सन १९२८.



जामीन देतील, कारण पूर्वी न्या. बद्रुद्दीन तय्यबजी ह्यांचेकडून त्यांनींच टिळकांना जामिनावर खुलें करून आणलें होतें. पण ह्या वेळीं ज. दावर म्हणाले, "पूर्वीच्या खटल्यांतील मुद्दे माझेपुढें मांडूं नका, मला हें सर्व माहीत आहे. पण एकंदर गोष्टींचा विचार करतां जामीन नाकारणें हेंच मला योग्य दिसतें."

आणि त्यांना नुसतें जामीन नाकारणें एवढेंच योग्य दिसलें नाहीं, तर कॉमन ज्यूरीचे ऐवजीं स्पेशल ज्यूरी देणें हेंहि त्यांना योग्य दिसलें. स्पेशल

*




ज्यूरींत युरोपियन लोकांचा जास्त भरणा होता. टिळकांच्या वकिलांचें असें म्हणणें होतें कीं, ह्या खटल्यांत स्पेशल ज्यूरी भरवायला स्पेशल कारणें कांहीं दिसत नाहींत, कॉमन ज्यूरीवरही भागण्यासारखें आहे. पण हें म्हणणें न्यायमूर्तींना मुळींच पटलें नाहीं. त्यांनीं टिळकांचा जामीन नामंजूर केला आणि त्यांचा खटला स्पेशल ज्यूरीपुढें व्हावा असें ठरविलें.

---

* संदेशमधील लेखाचा एक नमुनेदार मथळा.

ठरल्याप्रमाणें खटल्याला सुरवात झाली. टिळकांनीं स्वत:करितां वकील-बॅरिस्टर उभा करण्याचें निक्षून नाकारलें. सरकारी बाजूनें ब्रॅन्सन नांवाचे एक प्रख्यात बॅरिस्टर होते व त्यांना झुंज देण्यास हा एकटा मराठा गडी उभा होता. पण प्रश्न विचारून विचारून, त्यानीं सरकारचे बाजूच्या पुष्कळ साक्षीदारांची तारांबळ उडविली. ह्यांत जोशी ह्या नांवाचा एक साक्षीदार होता. त्याला टिळकांनीं विचारलेले प्रश्न आणि त्यांचीं साक्षीदारानें दिलेलीं उत्तरें, त्यावेळीं लोकचर्चेला इतकीं पात्र झालीं कीं पुढें पुष्कळ दिवसपर्यंत तीं लोकांच्या स्मरणांतून गेलीं नाहींत. केसरींत आलेले लेख हे स्वतंत्र लेख नसून इंग्रजी वर्तमानपत्रांत आलेल्या आक्षेपांना ते उत्तरादाखल आहेत, असें दाखविण्याचा टिळकांनीं उत्तम प्रयत्न केला आणि

**टिळकांचें हायकोर्टांतील भाषण.**

केसरींत ज्या प्रकारचे लेख आलेले होते तशा प्रकारचे लेख आणखी शेंकडों वर्तमानपत्रांत आलेले आहेत, हेंहि उत्तम रीतीनें प्रतिपादन केलें, पण ह्या प्रतिपादनाचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. टिळकांचें भाषण एकसारखें सहा दिवसपर्यंत चाललेलें होतें. भाषणाचे शेवटीं, ज्यूरींतील गृहस्थांना उद्देशून जें त्यांनीं कळवळ्याचें भाषण केलेलें होतें तें तर इतकें हृदयंगम होतें कीं एक क्षणमात्र कां होईना, पण तें भाषण ऐकून ज्यूरींतील लोकांच्या अंत:करणाची चलबिचल झाली असेल ह्यांत संशय नाहीं. पण ह्या भाषणाचा काय उपयोग झाला ? लो. टिळक दोषमुक्त ठरले काय ? ह्या प्रश्नाचें आपणांस काय उत्तर द्यावेंसें वाटतें, आणि वस्तुस्थितीनें ह्या प्रश्नाचें काय उत्तर दिलें ? पुढील मजकुराची कल्पना करतांना आमच्या तर डोळ्यांपुढें चक्कर येते. खरोखर लेखकाचें कर्तव्य फार खडतर ! हृदयाचीं बुजलेलीं मर्में, अंत:करणाचे बरे झालेले घाव, काळजाचा ठाव घेऊन आटलेले रक्ताचे ओघळ, ह्यांना पुन: ओले करावे लागतात ! हाय हाय ! काय हें दुर्दैव !

रात्रींचे नऊ वाजलेले होते. सर्व बालकें पेंगायला लागलेलीं होतीं. प्रौढ माणसांनी संध्याकाळचा ' ॲडव्होकेट ' व संध्याकाळचें ' सांजवर्तमान ' बाजूस ठेऊन दिलेलें होतें. उद्यांचा दिवस कसा उगवेल ही प्रत्येकाला काळजी वाटत होती. हायकोर्टाच्या आवारापाशीं गर्दी करणारे हजारों

गरीब लोक आपापल्या बिऱ्हाडीं विड्यांचे व चिलमीचे झुरके घेत होते. टिळकमहाराज उद्यां सुटतील काय ? त्यांच्या भाषणाचा उपयोग होईल काय ? जनतेच्या प्रेमाला आनंदाची खबर येईल काय ? ' मि. टिळक ! तुम्ही दोषमुक्त आहांत, ' असाच हुकूम लिहिण्याच्या संधीची ज. दावर वाट पहात असतील काय ?

काय लोक भोळे ! काय लोक वेडे ! अहो, तुम्ही समजतां तरी काय? हायकोर्ट सहा वाजतां बंद झालें असें तुम्हीं समजतां ? जज्जसाहेब उद्यां निकाल देणार असें तुम्हीं समजतां ? किती तुम्ही भोळे ! किती तुम्ही वेडे ! अहो, आज हायकोर्टाचें काम दिवे लावून चाललेलें आहे ! आतां नऊ वाजले ना ? हें पहा खटल्याचें काम बहुतेक संपत आलें ! तुम्ही कडे चिलीम भरीत आहां, इकडे खटल्याची वेळ भरत आलेली आहे ! इकडे तुम्ही वर्तमानपत्रें फेंकून दिलेलीं आहेत, इकडे वर्तमानपत्रांच्या ढिगावरून टिळकांच्या वर्तमानपत्रांतील लेखांची पारख चाललेली आहे ! इकडे तुम्हीं पेंगत आहां—होय मुलांनों, तुम्हांला निजलें पाहिजे, उद्यां सकाळीं शाळेच्या अभ्यासाकरितां तुम्हांला लवकर उठायचें आहे—पण इकडे कोणीहि पेंगत नाहीं. इकडे डोळ्यांत तेल घालून ज्यूरीच्या मताची दोन व्यक्ती वाट पहात आहेत. एक न्या. दावर आणि एक लो. टिळक ! काय ? ज्यूरीनें आपलें मत दिलें ? ज्यूरीचें एकमत झालें ? नाहीं, ज्यूरीनें मत दिलें, पण ज्यूरीचें एकमत झालें नाहीं. ज्यूरींतील सात लोकांचें असें मत आहे कीं टिळक दोषी आहेत. ज्यूरींतील दोन माणसें म्हणतात कीं टिळक निर्दोषी आहेत. न्यायमूर्ति दावर ! आतां निकाल आपलेकडे आहे. आपलें मत काय आहे ? काय ? आपण टिळकांना दोषी म्हणतां कीं निर्दोषी म्हणतां ? दोषी ? टिळक दोषी ? ज्यूरींतील बहुमता-प्रमाणें आपलेंहि मत आहे ? मग सुनावा, निकाल सुनावा !

" टिळक ! तुमचे लेख कायद्याचा भंग करणारे आहेत. हिंदुस्थानांत बॉम्बचें आगमन झाल्याबद्दल त्यांत आनंद प्रदर्शित केला आहे. एका इंग्रज अबलेचा खून झाला, तरी तुम्हांला वाईट वाटलेलें नाहीं. असले लेख नास-

**सहा वर्षांची शिक्षा.**

क्याकुसक्या मेंदूतूनच बाहेर पडूं शकतात. तुमचा मेंदू कुजलेला आहे, सडलेला आहे, तुमची बुद्धि वांकडीतिकडी बेताल झालेली आहे. काय ? तुम्हीं अपराधी आहां, असें तुम्हाला वाटत नाहीं ? ज्युरींतील सात लोक म्हणतात तसें तुम्हांला वाटत नाहीं ?"–"नाहीं, मी अपराधी आहें असें मला मुळींच वाटत नाहीं. ज्यूरींतील लोक कांहींहि निकाल देवोत, मी अपराधी नाहीं असें माझें स्पष्ट म्हणणें आहे. न्यायमूर्ति ! आपल्या ह्या अदालतीपेक्षां जगताच्या अभिमानी अशा श्रेष्ठ शक्ति–जगताचा अभिमान बाळगणारीं श्रेष्ठ सामर्थ्ये–विश्वांत आहेत ! अहाहा ! कदाचित् त्यांचीच अशी इच्छा असेल कीं, मला माझ्या आयुष्यांत स्वस्थता लाभूं नये. जें कार्य मी हातांत घेतलेलें आहे, त्याची भरभराट होण्याकरितां माझ्या क्लेशांचीच त्यांना गरज असेल, आणि म्हणूनच ही आपत्ति माझ्यावर आली असेल ! "

" टिळक, मी तुम्हाला सहा वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा देतों."

टिळकांचें चरित्र तें हें. हें टिळकांचें चरित्र ! टिळकांचें चरित्र इथें आहे. आम्ही तुम्हांला सांगूं कीं टिळक स्वार्थत्यागी होते, आम्हीं तुम्हांला सांगूं कीं टिळक देशभक्त होते, आम्ही तुम्हांला सांगूं कीं टिळक विद्वान होते,

**टिळक कुठें सांपडतील ?**

आम्ही तुम्हांला सांगूं कीं टिळक उदार होते, मनमोकळे होते, सरळ होते, साधे होते, गणिती होते, ज्योतिषी होते. छेः, छेः, छे, छे, छेः, ह्या सर्व गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी ह्या गोष्टींत टिळक नाहींत ! टिळक इथें आहेत. टिळक इथें आहेत. ज्या गोष्टी इतरांनाहि करतां येण्याजोग्या होत्या व टिळकहि करीत होते, त्या गोष्टींत टिळक नाहींत.

तुम्ही स्वार्थत्याग म्हणतां ना ? आज तुमच्यापुढें स्वार्थत्यागाचीं किती उदाहरणें उभीं करूं ? विष्णुशास्त्र्यांनीं स्वार्थत्यागाचें वळण लावल्यापासून अगदीं अस्सल स्वार्थत्यागाचींहि अनेक उदाहरणें महाराष्ट्रांत निर्माण झालेलीं आहेत पण तीं टिळक आहेत काय ? तुम्ही विद्वत्तेच्या गोष्टी काढतां. पण ही महाराष्ट्रीय भूमि ह्याहि बाबतींत वंध्या आहे, असें नाहीं. महाराष्ट्रांतलीं विद्वान माणसें जमा करायला लागलें तर टिळकांच्यापेक्षां कमीअधिक मानानें अनेक विद्वान माणसें दाखवायला येतील ! काय ? तुम्हीं गणिताच्या

अगर ज्योतिषाच्या बाबतींत बोलतां ? पण असें कशाला ? ह्या बाबतींतले नुसते ग्रन्थ पहा, म्हणजे आपल्या महाराष्ट्रांत गणित किंवा ज्योतिष अगदींच नाहीं असें तुम्हांस म्हणतां यावयाचें नाहीं. तुम्हांला राजकारणांत पडणारे लोक पाहिजेत ? तुम्हांला कॉन्ग्रेसचे अध्यक्ष पाहिजेत कीं उपाध्यक्ष पाहिजेत ? काय ? तुम्हांला कौन्सिलमध्यें जाणारे पाहिजेत कीं तुम्हांला कौन्सिलमध्यें न जाणारे पाहिजेत ? तुम्हांला कोऑपरेशनवाले पाहिजेत कीं नॉन–कोऑपरेशनवाले पाहिजेत ? तुम्हांला डेप्युटेशनवर जाणारे पाहिजेत कीं डेप्यटेशनला नांवें ठेवणारे लोक पाहिजेत ? काय म्हणतां ? सभोंवार माणसांचा घोळका जमविणारे लोक तम्हांला पाहिजेत ? दहा दहा हजार वीस वीस हजार लोकांमध्यें जाऊन भाषण करणारे लोक तम्हांला पाहिजेत ? ह्यांना तुम्हीं लोकमान्य म्हणणार आहां ? पण आम्हीं तुम्हांला सांगतों कीं वरीलपैकीं एकाहि ठिकाणीं लोकमान्य मुळींच नाहींत ! टिळक लोकमान्य झाले ते लोकांच्या घोळक्यांत घोंटाळले म्हणून नव्हे, तर सर्व लोकांना मागें ठेवून ते एकटे संकटांत उडी घालायला गेले म्हणून !

लोकमान्यांचा हा गुण विशेष होता. ह्या एका गुणामुळें ते लोकमान्य झाले. तुमच्या अंगांत बाकीच्या गुणांपैकीं एखादा गुण कमी असला तरी हरकत नाहीं. राष्ट्रसेवकांत हे इतर गुणहि असावेच लागतात. ह्या गुणांशिवाय पुढाऱ्यांचें भागायचेंच नाहीं, पण लोकमान्यांचा म्हणून जर तुम्हांला एखादा गुण उचलायचा असेल, तर त्यांचें निर्धोक धैर्य हा एकच गुण शिका. रानडयांचेपासून तों आजच्या घटकेपर्यंन्त निरनिराळ्या पुढाऱ्यांचा ह्या लेखांत उल्लेख झाला. लोकमान्य आणि इतर पुढारी ह्यांच्यांत स्वार्थत्याग, देशभक्ति, कळकळ, निश्चय, सुस्वभाव, नम्रता, विद्वत्ता हे सर्व गुण दोघांना लागूच आहेत. त्यांत एक जास्त आणि एक कमी असेंहि फारसें आढळायचें नाहीं, पण सर्व पुढारी संकटापर्यन्त जातात, आणि तेथून माघारे येतात. संकटांचा मत्स्यभेद कोणीहि करीत नाहीं. तसें करणारा धाडसी वीर एकटा टिळकच. ह्यानेंच संकटांशीं दंड थोपटावे आणि त्यांच्याशीं कुस्ती खेळायला तयार व्हावें ! महाराष्ट्र–राजकारणाच्या मल्लविद्यापटांगणांत आजपर्यन्त लोकमान्य हा एकटाच वीर उतरत होता, आणि आज चाळीस वर्षेपर्यन्त टाग् टाग्

असे एकट्याचच दंड थोपटलेले ऐकूं येत होते. जेथून इतर पुढारी परततात, संकटांच्या ज्या रणांगणाजवळ इतर पुढारी मागें येतात, क्लेशांच्या ज्या भूमिकेजवळ जाऊन इतर जेथें माघार घेतात, ' अन्ये यतो निवर्तन्ते तद्धाम परमम् ' तें परम धाम, तें परम स्थान, तें विजयाचें श्रेष्ठ मंदिर तें यशाचें मंगल ठिकाण, तें जयजयकाराचें परम दुर्घट स्थल—तें स्थल, तें स्थल, तें लोकमान्याचें—एकट्या लोकमान्यांचेंच आहे. लोकमान्य टिळक महाराजकी जय !

* * * *

लोकमान्य टिळकांच्या चरित्राचें अतिशय संक्षिप्त अवलोकन वर केलेलें आहे. परंतु एवढ्या मर्यादेंत लोकमान्यांच्या चरित्राची अल्प छटाहि यावयाची नाहीं. " चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरं " असें रामरायाच्या चरित्रासंबंधें, बुधकौशिक ऋषीनें जें म्हटलेलें आहे तें अगदीं खरें आहे. परंतु एवढें शतकोटिप्रविस्तर चरित्र असतांना सुद्धां जशी त्याचेवरून रामरक्षा रचावीच लागते, त्याचप्रमाणें लोकमान्यांचें चरित्र गाढ, अगाध, आणि विस्तीर्ण असतांनासुद्धां त्यांतील मुख्य तत्त्वाचें परिशीलन आपण केलेंच पाहिजे. पुण्यांत ज्या दिवशीं लोकमान्यांचा तिलांजलिविधि झाला, त्या दिवशीं लोकमान्यांच्या पिंडास कावळा लवकर स्पर्श करीना असें म्हणतात. कसा करणार ? एवढ्या मोठ्या संकल्पांत कोणकोणत्या इच्छा भरलेल्या होत्या, कोणकोणते बेत गूढ स्वरूपांत होते, कोणकोणत्या योजना अपरिणत राहिलेल्या होत्या व कोणकोणत्या महत्वाकांक्षा अपुऱ्या राहिलेल्या होत्या, त्याचा शोध कसा लागणार ? असा कोणता पराक्रमी पुरुष आहे कीं, ज्याच्या इच्छा परिपूर्ण झालेल्या असतील ! श्रीशिवाजी महाराजांच्या सर्व इच्छा परिपूर्ण झालेल्या असतील काय ? नर्मदातीरीं वारलेल्या बाजीरावाच्या इच्छा परिपूर्ण झालेल्या असतील काय ? परदेशांतलीं उदाहरणें घेतलीं तरी काय ? शिकंदर इच्छापरिपूर्ण होऊन मेला असेल काय ? किंवा पीटर धी ग्रेट इच्छापरिपूर्ण होऊन मेला असेल काय ? पराक्रमी पुरुषांचें लक्षणच हें कीं त्यांच्या इच्छा कधींहि पूर्ण झालेल्या नसायच्या ! पराक्रमी लोकांच्या इच्छा भरधांव दौडीनें धांवत असल्याकार-

**कावळा स्पर्श करीना !**

णानें त्या इच्छा परिपूर्ण करणें हें एका आयुष्याला अशक्यच आहे. एका आयुष्यांत ज्याच्या इच्छा परिपूर्ण होतात, तो कदाचित् शहाणा असेल, पण तो पराक्रमी कधींहि असणार नाहीं. "असंतोषः श्रियो मूलं" असें जें आपल्या प्राचीन महात्म्यांनीं सांगितलें आहे, तें ह्याचकरितां होय. संतोष आला कीं पराक्रम संपला. पराक्रम संपला कीं राज्यश्री आटोपली! आपल्या राष्ट्राचें अपरिमित वैभव इच्छिणारे जे लोकमान्यांसारखे पराक्रमी पुरुष असतात, त्यांच्या इच्छा अपरिमित असणें हेंच त्यांना भूषण आणि इच्छा अपरिमित असल्या कीं त्यांची तृप्ति कोठून होणार? लोकमान्यांच्या पिंडाला जो काकस्पर्श लौकर झाला नाहीं, तो ह्याच कारणामुळें होय. हें कारण लोकमान्यांविषयीं आमचें प्रेम जास्त प्रक्षुब्ध करायला लावतें व त्यांच्या इच्छेकडे आमचें लक्ष वेधतें. विष्णुशास्त्र्यांचें आयुष्य लवकरच संपलें आणि त्यांची पराक्रमाची इच्छा अपूर्ण राहिली म्हणून त्यांनीं मृत्यूचे वेळीं, लोकमान्यांकडे आशापूर्ण डोळे लावले! लोकमान्यांनीं त्यांच्या आशेची पूर्ति केली. त्यांची पराक्रमलालसा स्वतःच्या पराक्रमांनीं पुरी करून दाखविली. आतां आपलें पांसष्ट वर्षांचें आयुष्यहि अपुरें पडल्यामुळें लोकमान्यांनींहि आपली आशापूर्ण दृष्टि महाराष्ट्रांतील तरुण पिढीकडे लावली असेल काय? होय, लावली कशी नसेल? प्रत्येक तरुणाला ते स्वर्गाच्या खिडकींत उभे राहून म्हणत असतील, 'महाराष्ट्रातल्या तरुणा, तूंहि माझ्यासारखेच पराक्रम गाजव! त्याशिवाय माझ्या पिंडाला कावळा स्पर्श करणार नाहीं.' म्हणून महाराष्ट्रीय तरुणानों, महर्षि रानडयांचा राष्ट्रमंत्र घ्या आणि लोकमान्यांप्रमाणें पराक्रम गाजवा. परिस्थितीला वाघ म्हणून कधींहि चालावयाचें नाहीं. परिस्थितीला वाघ म्हणणें तरुणपणाला बट्टा आहे. तरुण मनुष्याला प्रत्येक गोष्ट लहान दिसली पाहिजे, अल्प दिसली पाहिजे, सुलभ दिसली पाहिजे. महर्षि रानडयांनीं परिस्थितीला अल्प मानायला शिकवलें, विष्णुशास्त्र्यांनीं व टिळकांनीं तिला अल्प करून दाखविलें. ते महर्षि रानडे, ते विष्णुशास्त्री, ते टिळक, हे सर्व आज स्वर्गमंदिराच्या पायरीवर बसलेले आहेत, व राष्ट्रकार्यांत शिणलेली आपली तनु ताजीतवानी करीत त्यांनीं महाराष्ट्रांतील तरुणांकडे दृष्टि लावलेली आहे. रानडे-विष्णुशास्त्री, रानडे-टिळक ह्यांच्यां-

तील विरोध आतां मावळला आहे. सर्व विरोधाच्या तीव्रतेवर मृत्यूचा थंडपणा शिंपला गेल्यामुळें, त्या विरोधाचें बीज त्यांच्या स्वर्गवासांत राहिलेलें नाहीं. ते धर्मराज महर्षि रानडे, तो अर्जुनासारखा तिखट आणि कडवा विष्णुशास्त्री, तो धैर्याची गदा लीलेनें पेलणारा तिलक-भीम, आणि ते गोपाळ गणेश आगरकर व गोपाळ कृष्ण गोखले

**पांच पांडव!** असे दोघे नकुलसहदेव, असे महाराष्ट्राचे पांच पराक्रमी पांडव, स्वर्गाच्या हस्तिनापुरांत आज विराजमान झालेले असून श्रीकृष्णशौरीची अशी प्रार्थना करीत आहेत कीं "मेकेस्ट फ्री अवर इंडिया ॥ वहु कृपाळु यदुराया ॥" त्यांची ही एका स्वरानें आणि एक-कंठानें चाललेली प्रार्थना ऐकून असें शक्य वाटतें काय, कीं आतां यापुढें महाराष्ट्रांत विरोध शिल्लक राहतील? ह्यापुढें त्यांचें दिव्य गायन ऐकायचें, त्यांची संयुक्त आज्ञा श्रवण करायची, त्यांच्या एकत्रित हांकेला "ओ" द्यायची, कीं आपलेच एकत्रित आवाज भिन्न करायचे? रान-ड्यांनीं १८६० मध्यें सार्वजनिक आयुष्याला सुरवात केल्यापासून तों १९२० मध्यें लोकमान्यांचा स्वर्गवास होईपर्यंत साठ संवत्सरांचें जें चक्र गेलें त्यांत महाराष्ट्राचें परायत्त राजकारण काय असतें तें ठरलें गेलें. रानडे म्हणाले, 'निराश होऊं नका, सर्व बाजूंनीं पुढें या, पूर्वस्थिति साधा.' विष्णुशास्त्री म्हणाले, 'चला, स्वतः कार्य करा.' आगरकर म्हणाले, 'राज-कीय उन्नतीसाठीं सामाजिक उन्नति मागें टाकूं नका.' टिळक म्हणाले, 'राजकीय उन्नतींत स्वतःचा बळी द्यावा लागला तरी बळी द्या, पण राज-कीय उन्नति साधा.' गोपाळराव गोखले म्हणाले, 'जहालपणा धरीत असतां कौंसिलांतूनहि देशकार्य साधावें लागतें हें लक्षांत ठेवा.' ह्याप्रमाणें त्या पांच पांडवांपैकीं प्रत्येक वीरानें एक एक तत्त्व साधलें व आपला अव-तार संपविला. पण स्वर्गात ते आतां एकत्र झाले आहेत. प्रत्येक जण दुसऱ्याशीं खलबत करीत आहे. त्यांतला सर्वांत मोठा गणिती टिळक सर्वांच्या पराक्रमाची महाराष्ट्रासाठीं बेरीज करीत बसलेला आहे. तो सर्वांचा एकरूप झालेला आहे. ज्या कृष्णाची वाट ते पहात बसले होते त्याचें चिंतन करतां करतां आणि त्याची गीता गातां गातां तो स्वतः कृष्णमय झाला आहे. त्याला आतां चार हात दिसूं लागलेले आहेत.

आपल्या चारी स्नेह्यांचे पराक्रम त्याच्या चार हातांत झळकूं लागलेले आहेत, त्याचें मुख आतां तेजोवलयानें मंडित झालेलें आहे. त्याच्या कांसेला पीतांबर आहे. त्याच्या कंठांत कौस्तुभमाला आहे. हिंदुस्थान देशाला आपल्या हातांतील सात्त्विक आयुष्याचें कवच त्यानें दिलेलें आहे, आणि आपलें दिव्य मुखकमल दाखवून सर्वांचे चित्तांत तो विश्वास उत्पन्न करीत आहे. त्याच्या दर्शनानेंच भीति पळालेली आहे, शंका मावळलेल्या आहेत, अनिश्चितपणा लयाला गेलेला आहे, आणि आलस्य, अज्ञान, द्वेष, मत्सर इत्यादि राष्ट्रशत्रू धूम ठोकावयाच्या बेतांत आहेत. त्याच्या या दिव्य स्वरूपांत त्याचेपुढें कोण उभा राहील बरें? कोण म्हणून प्रश्न कशाला? हिंदुस्थानांतील ज्या तरुणांचेकरितां त्यानें परिश्रम केले, ज्या तरुणांत त्यानें आशा उत्पन्न केली, ज्या तरुणांची त्यानें आशा धरली, आणि ज्या तरुणांकडे शेवटीं नजर फेंकून त्यानें स्वर्गलोकाकडे गमन केलें, त्या तरुणांशिवाय त्याचेपुढें कोण ऊभें रहावयास योग्य आहे? तो हिंदुस्थानांतील तरुणवर्ग, त्याचेपुढें राहून जेव्हां त्यास विनवील कीं "भो तिलकभगवन्, शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नं" त्या वेळीं तो जीं दिव्याक्षरें बोलेल तीं किती सुंदर असतील बरें?

तो म्हणेल, तरुणा, ऐक! माझी इच्छा काय आहे तें ऐक. श्रीशिवाजीमहाराजांनीं उभारलेलें स्वराज्यमंदिर ज्यावेळीं जीर्ण झालें त्यावेळीं त्याचा सनदशीर रीतीनें जीर्णोद्धार करण्याची स्फूर्ति रानडेमहर्षींना झाली.

**टिळकांची अखेरची इच्छा**

त्यांनीं आपलें तेज, विष्णुशास्त्र्यांना दिलें आणि आपलें ओज गोखल्यांना अर्पण केलें. विष्णुशास्त्र्यांसारख्यांच्या तेजाचे मी आणि आगरकर विभागी झालों. तेजाला ओजाशिवाय प्रगल्भता नाहीं आणि ओजाला तेजाशिवाय गति नाहीं. हा मला साक्षात्कार झाला, आणि म्हणून आपलें तीन वेळां तेज गाजवून मी ओजस्वीपणानें डेप्युटेशनवर गेलों. आतां मी तेज, ओज, प्रताप आणि प्रभाव यांचा स्वामी झालों आहे. 'याच देहीं, याचि डोळां' स्वराज्य सोहळा पाहीन, अशी मी प्रतिज्ञा केली होती. स्वराज्याच्या हप्त्यानें माझी प्रतिज्ञा पूर्ण झाली. पण माझी इच्छा पूर्ण झालेली नाहीं. स्वर्गीय सत्याच्या दिव्य ओऽऽस्फुरणानें, तरुणा! मी सांगतों कीं माझी इच्छा पूर्ण झालेली नाहीं,

पूर्ण स्वराज्य मिळेपर्यंत ती माझी इच्छा पूर्ण होणारहि नाहीं. ह्यासाठीं माझ्या अग्निसंस्काराची रक्षा घेऊन प्रतिज्ञा कर, माझ्या अग्निसंस्काराजवळील वाळू घेऊन प्रतिज्ञा कर, माझ्या निवापांजलीचे तीळ घेऊन प्रतिज्ञा कर कीं, 'मी ब्रिटिश साम्राज्यांतर्गत पूर्ण स्वराज्य प्राप्त करून घेईन.' माझी शेवटली इच्छा ही आहे आणि प्रत्येक तरुणानें माझ्या अग्निरक्षेवर तशी शपथ घेतल्याशिवाय माझ्या पिंडास काकस्पर्श कधींहि होणार नाहीं.

---

## दिवाळीचीं कडबोळीं.

ह्या जगांत कोणीहि परतंत्र असतां उपयोगी नाहीं. जगांत परतंत्रता वावरणें आणि घरांत प्लेगचे उंदीर असणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्या. घरांतील दूपित हवा शुद्ध करायची असेल तर उंदीर नाहींसे करा. जगांतील दूषित हवा शुद्ध करावयाची असेल तर परंत्रता घालवा.

* * *

जगांतील परतंत्रता घालविण्याचा उत्तम उपाय म्हणजे तुम्हीं स्वतः स्वतंत्र व्हा. जगांतील प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र झालें म्हणजे जगांतील दूषित हवा गेलीच !

* * *

जो ब्राम्हण ब्राम्हणेतरांना कनिष्ठ मानील, तो ब्राम्हणच नव्हे. जो स्पृश्य अस्पृश्यांच्या ताटांत जेवायला कचरेल तो स्पृश्यच नव्हे. जो हिंदी मनुष्य युरोपियनांना स्वतःपेक्षां श्रेष्ठ मानील तो आईबापांच्या पोटचाच नव्हे. जो पुरुष स्त्रियांना कनिष्ठ लेखील तो आपल्या आईचा पुत्रच नव्हे.

* * * *

ब्राम्हणेतर हे ब्राम्हणांपेक्षां कनिष्ठ नाहींत. हिंदीं लोक हे युरोपियनांपेक्षां कनिष्ठ नाहीत. स्त्रिया ह्या पुरुषांपेक्षां कनिष्ठ नाहींत.

* * * *

स्वतंत्र व्हा—स्वतःस युरोपियनांहून कनिष्ठ मानू नका. इतरांस स्वतःपेक्षां कनिष्ठ मानूं नका. स्वातंत्र्य हीच जगाची आनंदाची दिवाळी आहे.

# * मनोरंजनचे मित्र.

गेलें जवळ जवळ पाव शतक निघत असलेल्या मासिक मनोरंजनचे मालक, प्रकाशक व संपादक रा. रा. काशिनाथ रघुनाथ मित्र ह्यांना काल रोजीं संध्याकाळीं देवाज्ञा झाल्याचें अत्यंत दुःखकारक वृत्त कळविण्याची पाळी आमचेवर आलेली आहे. रा. रा. मित्र हे अलीकडे कांहीं दिवस काळपुळीच्या आजारानें अत्यवस्थ होते आणि नुक्तेंच त्यांचेवर ऑपरेशनहि करण्यांत आलेलें होतें. तथापि ते अजूनहि कांहीं दिवस जगतील अशी आशा होती. ती आशा नष्ट होऊन त्यांचा आयुष्य-तंतु काल संध्याकाळीं भंग पावला आणि रा. रा. काशिनाथपंतांचा कायमचा विरह होण्याची पाळी आली ! रा. रा. मित्र ह्यांनीं आम्हीं प्रथमारंभींच म्हटल्याप्रमाणें, वाङमयाच्या दुनियेंतील पाव शतक आक्रमलेलें होतें, तेव्हां त्यांचा मृत्यु महाराष्ट्रवाङमयास चांगलाच जाणवेल आणि त्यांचे मृत्यूनें बरीच मोठी उणीव भासावयास लागेल ह्यांत कांहीं संशय नाहीं. वाङमयाच्या सेवेंतच कालक्रमण करीत असलेल्या आमच्यासारख्या सेवकास तर रा. रा. मित्र ह्यांचा मृत्यु म्हणजे प्रत्यक्ष बंधूच्याच मृत्यूसारखा दुःसह होय. तेव्हां त्यांच्याकरितां विलाप करण्याचा जो आमचा विशेष हक्क, त्याचा आदर करून रा. रा. मित्र ह्यांच्या चरित्राचें आम्ही येथें थोडक्यांत पर्यालोचन करतों.

कै. रा. रा. काशिनाथ रघुनाथ मित्र ह्यांच्या चरित्राचा जो विशेष गुण आहे तो हा कीं, त्यांना स्वभावतः कोणत्याहि गोष्टीचें सहाय्य नसतांना केवळ स्वतःच्या उद्योगावर, शहाणपणावर व कर्तबगारीवर त्यांनीं मासिक मनोरंजनासारखी संस्मरणीय संस्था उदयाला आणली. १८९६-९७ सालीं ज्यावेळीं रा. रा. मित्र ह्यांनीं मासिक मनोरंजन मुंबईंत सुरू केलें, त्यावेळीं त्याची वर्गणी फक्त एक रुपया असून त्यांत चोवीस पृष्ठेंच मजकूर येत असे. अलीकडे फोटो, ब्लॉक वगैरेंचा मासिक पुस्तकांतून पाऊस

* संदेश ता. २५ जून १९२०.

पाडण्याचा जो उपक्रम सुरू झालेला आहे, त्याचें प्राबल्य त्याकाळीं नसल्यामुळें त्यावेळच्या मासिक मनोरंजनांत तीहि बाजू नव्हती. असें असतांनाहि जें कार्य हातीं घेतलें त्याची अत्यंत एकनिष्ठपणें सेवा करण्याचा रा. रा. मित्र ह्यांचा दृढ निश्चय असल्यामुळें मासिक मनोरंजनास त्यांना विशिष्ट रूप आणतां आलें, एवढेंच केवळ नव्हे, तर हें कार्य ह्यांच्या हातून कसें निभतें अशी ज्यांना ज्यांना म्हणून शंका वाटत होती त्या त्या सर्व लोकांच्या मत्सरी शंका अगदीं फोल ठरून, हें कार्य कायम पार पाडण्याची जर कोणामध्यें अक्कल असेल तर ती रा. रा. मित्र ह्यांचेच अंगीं आहे, हें अनुभवानें सिद्ध झालें. रा. रा. मित्र हे गडकऱ्यांप्रमाणें उपजत कवि नव्हते, हरिभाऊ आपटयांप्रमाणें उपजत कादंबरीकार नव्हते, ते कोणी सिंगल अथवा डबल ग्रॅज्युएटहि नव्हते, ते संपत्तिमान् नव्हते, ते मुंबईंत प्रथम आले तेव्हां त्यांच्या ओळखीहि फार नव्हत्या. तथापि प्रचलित सर्व मासिक पुस्तकांहून अगदीं निराळें असें एक सुन्दर मासिक पुस्तक काढण्याचा त्यांनीं निश्चय केला आणि ह्याच निश्चयाचें फळ म्हणजे सर्व मनोरंजक मासिकांत अग्रगण्य असलेलें मासिक मनोरंजन हें होय.

मासिक मनोरंजनचे अगोदर कांहीं वर्षें कै. हरिभाऊ आपटे वगैरे मंडळीच्या सहाय्यानें मनोरंजन आणि निबंधचंद्रिका ह्या नांवाचें एक मासिक पुस्तक चाललेलें होतें. पण ते धड निबंध नाहींत, धड मनोरंजन नाहीं, अशा अर्ध स्थितीच्या दुर्दैवी फेऱ्यांत सांपडल्यामुळें फारसें लोकप्रिय कधींच झालें नाहीं. ह्यानंतर वाचकवर्गास मनोरंजक वाङ्मय नियतकालिकाच्या पद्धतीनें पुरविण्याचा विशेष महत्त्वाचा प्रयत्न कै. हरिभाऊ आपटयांनीं आपल्या करमणूक पत्राच्या द्वारें केला. हें करमणक पत्र सुमारें पंधरा वर्षें अतिशय नमुनेदार रीतीनें चाललेलें होतें तथापि सौन्दर्य मनमुराद रीतीनें ओतून एखाद्या नवीन पद्धतीवर नियतकालिक काढण्याचा प्रयत्न करण्याचें जें कार्य राहिलेलें होतें, तें कार्य करण्याचें काम रा. रा. काशिनाथपंतांनीं उचललें आणि त्यांत त्यांना त्यांच्या कल्पनेपेक्षांहि जास्त यश मिळालें.

रा, रा. मित्र ह्यांना हें अपूर्व यश मिळालें याचें पहिलें कारण म्हणजे त्यांच्या मनोरंजनाची अपूर्व नवीनता होय. त्यावेळीं हयात असलेल्या सर्व

मासिकांना गबाळपणाची अतिशय संवय लागलेली होती. किंबहुना, ज्याप्रमाणें तुकारामाचें सोंग घेणारे नट मद्दाम थोडासा कांसोटा सुटा ठेवतात—त्यांना जणुं वाटतें कीं तुकारामाची योग्यता 'शतकोटी' अभंगांत नाहीं तर त्याच्या गबाळग्रंथी पोषाखांत आहे—त्याप्रमाणें मासिक मनोरंजन निघण्याचें अगोदर निघणाऱ्या सर्व मासिकांची—मग त्यांचा विषय मनोरंजन कां असेना—अशी कल्पना होती कीं आपण जितक्या म्हणून गबाळ्या वेषांत दिसूं तितकी आपली जास्त वाह्वा होईल. मासिक मनोरंजननें ही समजूत अजिबात बदलली ! सुंदर कागद, सुंदर छपाई, सुंदर टाईप, सुंदर विषय, सुंदर चित्रें आणि जाहिरातीहि इतक्या सुबक कीं त्यांच्याकडे पाहूनहि मन प्रसन्न व्हावें, अशी सौन्दर्याची पद्धति महाराष्ट्रांत रा. रा. मित्र ह्यांनींच प्रथम पाडली ! जें उदात्त असेल तें भिकार असलेंच पाहिजे, हा सिद्धांत अत्यंत खोटा आहे. किंबहुना उदात्ततेला सुंदरतेची जोड दिली म्हणजे ती उदात्तता जशी खुलते तशी ती आचरट वेषांत खुलत नाहीं, हें मित्र ह्यांनीं प्रथम महाराष्ट्रांतील लोकांच्या निदर्शनास आणिलें. ह्या जगांत धंदे करण्याच्या दोन अगदीं निरनिराळ्या व अगदीं विरुद्ध पद्धती आहेत. एक पद्धति स्वस्ततेकडे लक्ष देते, मग त्यांत सुंदरतेचा खून झाला तरी हरकत नाहीं. दुसरी पद्धति आपलें सर्व लक्ष सुंदरतेकडे पोंचविते, मग तें स्वस्त न झालें तरी त्यांस त्याची पर्वा वाटत नाहीं. रा. रा. मित्र हे ह्या दुसऱ्या वर्गापैकीं होते. सुंदरता हें त्यांचें ध्येय होतें. त्यांचें मासिक, त्यांचा छापखाना, त्यांचा धंदा हा केवळ ह्याच तत्त्वावर चाललेला होता. रा. रा. मित्र ह्यांना ह्या कामीं उत्तम सिद्धि मिळाली आणि सरस्वतीच्या सेवेंत ह्या तत्त्वाला कायमचें स्थान मिळालें.

रा. रा. मित्र ह्यांच्या यशाची दुसरी गुरुकिल्ली म्हणजे मनोरंजक वाङ्मयाचे बाबतींत त्यांनीं महाराष्ट्र—वाङ्मयाचा आणि अन्यप्रांतीय वाङ्मयाचा जोडून दिलेला संबंध होय. ह्या संबंधामुळें महाराष्ट्र—वाङ्मयांत विविधता आणि विस्तीर्णता हा गुण आला आहे, आणि वाङ्मयसेवेचे तुलनात्मक हिशोब करण्याची संवय महाराष्ट्रांतील लोकांना लागली आहे. बंगाली कादंबऱ्या आणि बंगाली मासिकें ह्यांचें भाषांतर करण्याची

त्योंपर्यंत मराठींत फारशी पद्धत नव्हती. मासिक मनोरंजनामध्यें साधारणतः पाहिले वर्षापासूनच ही पद्धति सुरु झाली आणि ती अखेरपर्यंत होती. ह्याशिवाय गुजराथी, हिंदी, ह्या गोष्टींची बरीच भाषांतरें मासिक मनोरंजनमध्यें आलेली आहेत. तामीळ, तेलगु वगैरे कठीण भाषांचीं सुद्धां भाषांतरें मनोरंजननें दिलेलीं आहेत. कै. मित्र ह्यांनीं महाराष्ट्र–वाङमयाची ह्या दृष्टीनें अमोलिक सेवा केलेली आहे. महाराष्ट्र–वाङ्मयास दाखविलेल्या ह्या नवीन दिशेमुळें मासिक मनोरंजन फार प्रसिद्धीला आलें आणि ह्याचमुळें कै. रा. रा. मित्र ह्यांचे महाराष्ट्र–वाङ्मयावर कायमचे उपकार झालेले आहेत.

कै. काशिनाथ रघुनाथ मित्र ह्यांचें आयुष्य आणि व्यवसाय यशस्वी होण्याचें तिसरें कारण म्हणजे त्यांचा धंदेवाईकपणा हा होय. धंदा कसा थाटावा, त्याला आर्जवशक्ति कशी संपादावी, माणसें कशीं राजी राखावीं, त्यांना वेतनें कोणत्या प्रमाणांत द्यावीं, कोणत्या वेळीं काय करावें, पैसा कसा जमा करावा, पैसा देणाऱ्यांना संतुष्ट ठेवण्याचा मार्ग कोणता, इत्यादि सर्व कला कै. मित्र ह्यांचे अंगीं पूर्ण होत्या; म्हणून अंगीं कोणत्याहि प्रकारची विशेष विद्वत्ता, ज्ञान, बुद्धीचें तेज अथवा परदेशाचा अनुभव नसतांना त्यांना ग्रॅज्युएट झालेल्या, प्रसिद्धि पावलेल्या, नामांकितपणास चढलेल्या अथवा कीर्तिपदावर आरूढ झालेल्या विद्वानांचा ताफाचा ताफा, आपले पायापाशीं झुलवितां येत असे. कै. मित्र ह्यांचेजवळ असलेली साधनांची अल्पता लक्षांत घेतली म्हणजे ह्या गोष्टीचें अत्यंत कौतुक वाटतें आणि असा हिरा आपल्यांतून गेल्याबद्दल दुःख झाल्यावांचून राहात नाहीं. पांढरपेशे वर्गांत लेखक व सेवक वाटेल तितके निघतील, पण ग्रॅज्युएट लोकांना पदरीं ठेवणारा अ–ग्रॅज्युएट निघणें दुरापास्त आहे, आणि म्हणून कै. मित्र ह्यांच्या मृत्यूबद्दल जितका शोक करावा तितका थोडाच आहे.

पण आतां कै. मित्र महाराष्ट्राला सोडून गेले हें खास ! ह्या पुढील प्रश्न मासिक मनोरंजन चिरायु कसें होईल, एवढाच आहे. कै. मित्रांचे शेकडों मित्र आणि अभिमानी मुंबईमध्यें व सर्व राष्ट्रभर पसरलेले आहेत.

ते यावेळीं पुढें येऊन मासिक मनोरंजन बुडूं देणार नाहींत अशी आम्हांस आशा आहे. नवयुगचे श्री. डी. काशीनाथ, आणि निर्णयसागरचे श्री. तुकारामशेट ह्यांच्या निधनानंतर अल्प कालांतच रा. रा. काशीनाथपंतहि अंतरले ही दुर्दैवाची विशेष करडी नजर होय. आमच्या महाराष्ट्रांत केवळ विलक्षण कर्तबगारीमुळें ज्या संस्था पुढें सरसावल्या आहेत त्यांत मासिक मनोरंजन, पुण्याची चित्रशाळा, मुबईचा निर्णयसागर बडोद्याची व्यायामशाळा, सातारची विमा कंपनी इत्यादि संस्थांचा समावेश होतो. ह्या सर्वांचें अस्तित्व कायमचें टिकावें अशी प्रत्येक महाराष्ट्रीयाची इच्छा असणें अगदीं साहजिक आहे. ह्या सर्वांत मासिक मनोरंजन हें जणुं अंतर्बाह्य दृष्ट्या वाङ्मय–व्यवसायांतील काव्यच होतें. कै. मित्र ह्यांचे अल्पवयी पुत्र आणि त्यांच्या विरहाकुल कन्यका ह्यांचें तर आम्हीं त्यांच्यामागें योगक्षेम इच्छितोंच, तथापि कै. मित्र ह्यांचें खरें अपत्य मासिक मनोरंजन हेंच आहे. ह्याला पदरांत घेणारे कोणीतरी हिम्मतवान् ‘ मित्र ’ पुढें आले पाहिजेत. ते पुढें येवोत अशी इच्छा करून आणि कै. मित्र ह्यांच्या सर्व लहानथोर कुटुंबीय मंडळीच्या दुःखाचे वांटेकरी होऊन हें संदेशपुष्प आम्हीं अत्यंत जड अंतःकरणानें त्यांचे स्मृतिदेहावर आज ठेवतों.

---

## दिवाळीचीं कडबोळीं.

लक्षांत ठेवा, कीं युरोपियन लोकांपेक्षां तुम्हीं कोणत्याहि तऱ्हेनें कमी योग्यतेचे नाहींत. तुमच्यापेक्षां ते श्रेष्ठ नाहींत, त्यांच्यापेक्षां तुम्हीं कनिष्ठ नाहीं. तुम्हीं हिंदभूचे खरे पुत्र असाल, तर युरोपियनांचे बरोबरीनें बसा. युरोपियनला दबकूं नका. युरोपियन तुम्हांपेक्षां श्रेष्ठ कुठला ?

*   *   *   *

स्वतंत्र व्हा ! स्वतंत्र व्हा ! मनुष्याचें पहिलें कर्तव्य स्वतंत्र होणें हेंच आहे.

# *स्वामी श्रद्धानन्दांचा जयजयकार.

पावसाळा नुकताच संपलेला होता. शेतें हिरवींगार झालेलीं होतीं. कांहींनीं आपला अल्लड हिरवा रंग टाकून सोनेरी पिवळी चमक धारण केलेली होती. स्वामी श्रद्धानन्दांप्रमाणें शेतांत उभ्या असलेल्या धान्याचें ह्या जगांतील कार्य संपलेलें होतें व लोकहितार्थ स्वतःचा देह कुरबान करण्याची वाट तें पहात होतें! सज्जनांचा स्वभावच हा! आपला बचाव करणें हा त्यांचा धर्म नव्हे! आपला देह कुरबान करणें हाच त्यांचा धर्म! लोकांच्या हितासाठीं स्वतःची आहुति पडली कीं तोच त्यांचा ब्रह्मानन्द! सज्जनांना परमेश्वराचें उदार दान असें म्हणतात तें उगीच नाहीं! सज्जन हे सुरक्षित रहाण्याकरितां नाहींत, ते बळी जाण्याकरितां आहेत. लोकांनीं त्यांना खावें—अगदीं मुळासकट खावें—ह्यांतच त्यांना आनन्द! स्वतःचें पोट भरण्यांत त्यांना मौज वाटत नाहीं! लोकांनीं त्यांना खावें आणि आपलें पोट भरावें ह्यांत त्यांची खरी मौज!

* * * *

शेतांत उभीं असलेलीं धान्यें ह्या विचारांचीं होतीं. शेतांत उभा असलेला जोंधळा—शेतांत उभा असलेला गहूं—शेतांत उभा असलेला ऊंस—शेतांत उभा असलेला हरभरा—ह्या सर्वांचे चेहऱ्यावर स्वार्थत्यागाचा सोनेरी रंग चढलेला होता! ते रोज प्रार्थना करीत होते कीं देवा, लोक केव्हां येतील व आम्हांला कापतील? ताटव्यांच्या देंठावर नाचत रहाणें आतां पुरे! आत्मस्तुतीचें वारें आतां पुरे! रोज उगवत्या सूर्याचें दर्शन घेणें आतां बस्स झालें! आकाशांतील चांदण्यांनों, तो दिवस लौकर उगवो कीं ज्या दिवशीं लोक आपल्या हातांत विळे घेऊन आमच्या देहाच्या कणसांची मुण्डीछाट करतील आणि आमच्या मृत्यूवर लोकांच्या मेजवान्या झडतील! गव्हांचीं पिकें काढलीं गेलीं नाहींत, तर बुन्दीचे लाडू होणार नाहींत! साळीचीं शेतें कापलीं गेलीं नाहींत, तर साखरभात मिळणार

---

* संदेश ता. २३ डिसेंबर १९२८.

नाहीं ! उसाचें पीक चरकाच्या चरक्यांत पिळून निघालें नाहीं तर साखरहि मिळणार नाहीं !

* * *

पावसाळा संपला होता– शेतें पिवळीं धमक झालेलीं होतीं–शेतें कापण्यासाठीं शेतकरी लोक व शेतकऱ्यांच्या बायका तयारी करीत होत्या. आणि त्यांचे सर्व बेत त्या पिकांच्या देखतच चाललेले होते ! पोरें बापांना विचारीत होतीं–'बाबा, पिकें कधीं कापणार ?' बायका नवऱ्यांना विचारीत होत्या–'कारभारी, पिकें कधीं कापायचीं ?' मैत्रिणी मैत्रिणींना विचारीत होत्या, शेजारी शेजाऱ्यांना विचारीत होते–'शेतें कापायला आलीं नाहींत का ?'

* * *

आणि हीं सर्व भाषणें शेतांतलीं पिकें ऐकत होतीं. हीं भाषणें गहूं ऐकत होते, ज्वारी ऐकत होती, तांदुळ ऐकत होते, बाजरी ऐकत होती, ऊंस ऐकत होते, उडीदहि ऐकत होता ! तें ऐकून कोणालाहि वाईट वाटलें नाहीं ! एवढा उडीद–म्हणजे सगळ्या धान्यांत काळ्या काजळाचा–आपणांस कापणार–मळणार–तुडविणार–खाणार–म्हणून तोहि घाबरला नाहीं! उलट तो आनंदानें फुरारला व उद्यांचा दिवस उगवतो केव्हां, ह्याची वाट पहात बसला !

* * * *

कैलासांत शंकराचा वृषभ तयार झालेला होता ! त्याच्या अंगावर स्वर्गीय आसन कसलेलें होतें ! त्याची वेसण धरून शृंगीभृंगी उभे होते. आपणावर शंकराची स्वारी बसणार म्हणून तो वृषभ आनन्दोन्मादांत लेस झालेला होता, व बंदुकीच्या तोंडाप्रमाणें ठिणग्या येत असलेले आपले डोळे धुंदीमध्ये किलकिले करून तो खुरांनीं जमीन उकरीत होता.

* * * *

इतक्यांत शंकराची स्वारी तेथें आली ! ते पार्वतीला म्हणाले–प्रिये ! चल, ह्या नन्दीवर आपण बसूं व सर्व जगांत पर्यटन करूं ! ह्या नश्वर जगांतील नश्वर सुखदुःखें कुणावर कसा परिणाम करीत आहेत हें पाहण्यांत मोठी मौज असते नाहीं ?

* * *

वैकुंठांत श्रीविष्णु दुपारचे चार वाजल्यावर निजून उठलेले होते. लक्ष्मीनें त्यांच्यासाठीं अमृताचा पेला तयार केलेला होता–( वैकुंठांत चहा नव्हता. ) अमृतपान करून श्रीविष्णु–लक्ष्मीचीं आपआपसांत विनोदाचीं भाषणें चाललेलीं होतीं, तों इतक्यांत इंद्राच्या पॅलेस–टॉवरवरून पांचाचे ठोके ऐकूं आले.

* * *

श्रीविष्णु लक्ष्मीला म्हणाले–चल, लाडके चल! आपण गरुडावर आरूढ होऊं व हें जग कसें काय चाललेलें आहे हें पाहूं! आपण देव झालों तरी जगाच्या बन्दोबस्ताकडे एखाद्या खुशालचेंडू देशी संस्थानिकाप्रमाणें अगदींच दुर्लक्ष करणें चांगलें नाहीं.

लक्ष्मीलाहि हें पसन्त पडलें–व तिनें गरुडाला हांक मारली!

* * * *

ब्रह्मदेव आपली टेनीस–बॅट घेऊन क्लबमध्यें चालले होते! बॅचलर लोकांचा वेळ जायला टेनिस–क्लब हेंच उत्तम साधन! म्हणजे बॅचलर-पणाचे घोटाळे उडत नाहींत–निदान जे घोंटाळे उडतात ते तिथल्या तिथेंच उडतात! पूर्वीं ब्रह्मदेवांनींहि कांहीं घोंटाळे केले असें म्हणतात, ते देखील टेनिस–क्लब स्थापन झाला नव्हता त्याच वेळीं केले असतील!

* * * *

पण ब्रह्मदेव टेनिस–बॅट घेऊन निघाले असतील–नसतील, इतक्यांत ब्रह्म-वीणा वाजवीत नारद तेथें आले. ते म्हणाले–महाराज, टेनीस कसचा खेळतां? आपला हंस तावडतोब बोलवा! शंकर व विष्णु दोघेहि आपआपल्या आसनांवर बसून जगाच्या दौऱ्यावर निघालेले आहेत! तुम्हीहि त्यांना "जॉइन्" व्हा! नाहींतर, ख्रिस्टमसची सुटी अशीच निघून जाईल व पुढें पश्चात्तापांत पडाल!

* * * *

ब्रह्मदेव थबकले! त्यांनीं आपल्या हंसाला बोलाविलें, व त्याचेवर वसून ते ब्रह्मलोकाच्या बाहेर पडले. त्यांच्या हंसाची 'स्पीड' चांगली होती! ती पूनामेलपेक्षां जास्त होती–ती एरोप्लेनपेक्षां जास्त होती!

* * * *

आणि त्याचा परिणाम जसा व्हायचा तसाच झाला! शंकर, विष्णु आणि ब्रह्मदेव ह्यांची मृत्युलोकांत गांठ पडली!

"लेडी लक्ष्मी, गुड ईव्हिनिंग"–शंकर डॉ. मुंज्यांप्रमाणें दाढीवर हात फिरवीत म्हणाले. 'O that you' पार्वती ब्रह्मदेवांना म्हणाली, 'हौ आर यू?' 'ऑल राइट!' ब्रह्मदेवांनीं उत्तर दिलें!

* * * *

ते दिवस थंडीचे होते! पावसाळा संपलेला होता. सर्वजण थंडीनें कुड-कुडत होते! फक्त पिकें हंसत होतीं!

'हॅलो–हें कोण हंसतंय् इथें?' लक्ष्मी आपल्या लालसर पापण्या हालवीत म्हणाली!

'ओ!–हीं तर पिकें!' श्रीविष्णूनीं कौतुक केलें!

'पण तीं हंसताहेत कां?' ब्रह्मदेवांनीं सर्वांसमक्ष पिकांना विचारलें.

'कां हंसतों?' गहूं हंसत हंसत म्हणाला–'उद्यां आम्हाला कापणार म्हणून हंसतों.'

'उद्यां आमची कापणी करून जग आपलें पोट भरणार म्हणून आम्हीं हंसतों'–तान्दुळ म्हणाले! 'उद्यां आमच्या नाशानें जगाला भरभराट येणार म्हणून आम्हीं हंसतों!'–बाकीचीं सर्व धान्यें म्हणालीं!

'काय, तुमचा नाश होणार म्हणून तुम्हीं हंसतां?'

'होय सरकार! आमचा नाश होणार म्हणून आम्हीं हसतों! जगाच्या कल्याणाकरितां आमचा नाश होणार म्हणून आम्हीं हंसतों!'

देव विस्मित झाले, तिन्ही देव विस्मित झाले! देवीहि विस्मित झाल्या!

'महाराज, विस्मित होऊं नका! जगाच्या कल्याणासाठीं मरण हेंच आयुष्याचें सार्थक–हाच आनन्द–हाच जीविताचा महोत्सव! त्या महोत्सवामुळें आम्हीं हंसलों.'

देव ह्मणाले—तुह्मीं धन्य आहांत! तुम्हीं मृत्यूचें भय काढून टाकलेंत! तुम्हीं मृत्यूला जीवन बनविलेंत, मृत्युलोकाचा स्वर्ग बनविलात. मागा, ह्यावेळीं हवा तो वर मागा! आम्हीं देव तुमच्यावर संतुष्ट आहोंत!

होय—आम्हीं तुमच्यावर संतुष्ट आहोंत—उभयतां देवीहि म्हणाल्या !

मग एकच वर आम्हांला द्या–आम्हांला सॉक्रेटीस करा—आम्हांला येशु ख्रिस्त करा–आम्हांला श्रद्धानंद करा—सर्व जगाची सेवा करतां करतां आम्हाला मृत्यु द्या !

तथास्तु—शंकर म्हणाले.

तथास्तु—विष्णु म्हणाले.

तथास्तु—ब्रम्हदेव म्हणाले.

तथास्तु—तथास्तु—देवीहि तथास्तु म्हणाल्या !

---

## टिळकांचा टिळकपणा !

टिळकांवरील संकटपरंपरेमुळें त्यांचें स्वावलंबन विशषच खुलून दिसत होतें. त्यांच्या कष्टपरंपरेमुळें टिळकांचा टिळकपणा एकसारखा उजाळ्यांत पडून त्याचा शंभर नंबरीपणा सारखा कायम राहिला. त्या संकटपरंपरेमुळें टिळकांचा टिळकपणा त्या स्वतंत्र स्वरूपांत प्रगट झाला.

कैसरच्या कुटिलपणाच्या अतिशयामुळें ज्याप्रमाणें विजयी ब्रिटिश–मुत्सद्देगिरीची कर्तबगारी अधिक खुलून दिसत होती, जर्मन डुक्कर–मुसंडीच्या प्रखरतेमुळें ज्याप्रमाणें मार्शल फॉक त्यांच्या चिकाटीच्या रणकौशल्याचें महत्त्व अधिकच उत्कट असल्याचें दिसून येत होतें, त्याचप्रमाणें टिळकांवरील संकटपरंपरेमुळें त्यांचा टिळकपणा विशेषच स्पष्ट, सहजगम्य, सर्वमान्य व सर्वप्रमुख झालेला होता.

( युगांतर—२७ जुलै १९२४. )

# * मरण म्हणजे मृत्यु नव्हे !

सपदि विलयमेतु राजलक्ष्मीः। शिरसि पतन्त्वथवा कृपाणधाराः।।

आज दुसरीकडे "रंगीला रसूल" या पुस्तकाचे कर्ते श्री. राजपाल यांच्या मृत्यूची जी हकीकत दिलेली आहे तिचेवरून राजपाल ह्यांचें आयुष्य कशा रीतीनें सार्थकीं लागलेलें आहे ह्याची हकीगत वाचकांच्या लक्षांत येईल ! आपणां हिंदु लोकांना अत्यंत प्रिय अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती आपला हिंदु धर्म ही होय ! धर्माच्या पलीकडे आपणांस कोणतीहि वस्तु प्रिय नाहीं ! धर्माच्या पलीकडे आपणांस घर प्रिय नाहीं, दार प्रिय नाहीं, संपत्ति प्रिय नाहीं ! धर्माच्या पलीकडे आपणांस संसार प्रिय नाहीं, कांता प्रिय नाहीं, अपत्य प्रिय नाहीं. धर्माच्या पलीकडे आपणांस सौख्य प्रिय नाहीं, विलास प्रिय नाहीं, खुद्द स्वराज्य प्रिय नाहीं.

आमच्या हिंदुधर्मासह आम्हांला स्वराज्य पाहिजे ! आम्ही हिंदु राहून आह्मांला स्वराज्य मिळालें पाहिजे ! आमचा हिंदु चौघडा वाजत असतां आमच्या स्वराज्याचा चौघडा वाजायला लागला पाहिजे. स्वराज्याशिवाय आम्ही चार दिवस काढूं ! आमचें स्वराज्य गेलें तरी चार दिवस आम्हीं स्वराज्याच्या मुकुटाशिवाय काढूं ! आमचें स्वराज्य नाहींसें झालें तरी चार दिवस आम्हीं वनांत भटकूं ! स्वराज्याशिवाय श्रीरामचंद्रांनीं चौदा वर्षें काढलीं ! स्वराज्याशिवाय धर्मराजांनीं बारा वर्षें काढलीं ! स्वराज्याशिवाय नळ राजाला आयुष्यामधील कांहीं भाग काढावा लागला ! स्वराज्याशिवाय आल्फ्रेड राजाला भटकावें लागलें ! स्वराज्याशिवाय लेनीनला लपून रहावें लागलें ! मनुष्याच्या आयुष्यांत स्वराज्याशिवाय रहाण्याचा एखादे वेळीं प्रसंग यायचाच ! आम्हींहि कांहीं वेळ स्वराज्याशिवाय राहूं ! पण—आमच्या प्रिय हिंदुधर्माशिवाय आम्हीं एक क्षणभरहि कधीं राहणार नाहीं.

---

* संदेश ७ एप्रिल १९२९.

आम्हीं सर्व ह्या दृढ निश्चयाचे आहोंत. आम्हीं आजन्म हिंदुच रहाणार ! आम्हीं "हिंदु" म्हणूनच जगणार व आम्हीं हिंदु म्हणून मरणार. किंबहुना, आम्हांला मरण आलें तर हिंदुधर्माचेसाठीं आलें पाहिजे.

हिंदुधर्माचे पायीं मरण म्हणजे किती मंगलकारक मरण ! तो केवढा उत्सव ! तो केवढा पवित्र दिवस ! आपल्या आयुष्याचें पुष्प जर आपल्या पवित्र हिंदुधर्माचे चरणावर वहाण्याचा आपल्याला अधिकार मिळाला तर तो केवढा शुभ दिवस ! तो केवढा जयध्वनि ! तो केवढा यशोध्वज ! अहाहा ! मी प्लेगनें मरण्यापेक्षां आपल्या हिंदुधर्मासाठीं मरेन ! मी इन्फ्लुएन्झानें मरण्यापेक्षां आपल्या हिंदुधर्मासाठीं मरेन ! मी न्यूमोनियानें मरण्यापेक्षां आपल्या हिंदुधर्मासाठीं मरेन ! मी अन्थरूणावर मरण्यापेक्षां हिंदुधर्मासाठीं मरेन ! मी घरीं खोकत मरण्यापेक्षां आपल्या हिंदुधर्मासाठीं मरेन !

अशा प्रकारचें मरण ज्यांना ज्यांना आजपर्यंत लाभलें ते सर्व धन्य होत ! अशा प्रकारचें मरण पृथ्वीराज ह्याला लाभलें. पृथ्वीराजा धन्य होय ! अशा प्रकारचें मरण सम्भाजी राजास लाभलें, संभाजी राजा धन्य होय ! अशा प्रकारचें मरण स्वामी श्रद्धानंदांना लाभलें, स्वामी श्रद्धानंद धन्य होत !

श्री. राजपाल ह्यांना अशाच प्रकारचें मरण लाभलेलें आहे ! राजपाल धन्य होय ! मरणाचा जो प्रसाद परमेश्वरानें पृथ्वीराजाकरितां ठेवलेला होता त्या प्रसादाचा भाग त्यानें राजपालला दिलेला आहे ! जें मरणाचें स्वर्गीय अमृत परमेश्वरानें श्रीसंभाजी महाराजांसाठीं " रिझर्व " ठेवलेलें होतें, तें आज त्यानें श्री. राजपाल ह्यांस दिलेलें आहे ! जो मरणाचा पवित्र आनन्दपुंज परमेश्वरानें स्वामी श्रद्धानंदाकरितां राखून ठेवलेला होता, तो आनंद–तो परमेश्वरी आनंद–हिंदुधर्मासाठीं मरण्याचा तो पवित्र आनंद–परमेश्वरानें आज श्री. राजपाल ह्यांना दिलेला आहे. करा–ह्यांचे साठीं उत्सव करा ! उभारा–ह्यांचे साठीं तोरणें उभारा ! लावा–ह्याचे साठीं विजयध्वज लावा, आणि राजपाल ह्यांच्या मरणाचा महोत्सव साजरा करा !

कारण असलें मरण म्हणजे मृत्यु नव्हे ! असलें मरण म्हणजे आयुष्याचा शेवट नव्हे ! असलें मरण म्हणजे नवीन आयुष्य होय ! तो पहा—तो पहा, आकाशांतला तारा पाहिलांत ना ? तो तारा म्हणजे कोण तुम्ही समजतां ? अहो, तो तारा म्हणजे हिंदुधर्माच्या पायीं मरण पावलेले पृथ्वीराज ! तो आतां नवकवच घालून, साज करून, हिंदुधर्माच्या संरक्षणासाठीं झपाझप येत आहे ! ते—ते पहा आपले संभाजी महाराज ! हिंदुधर्माच्या उद्धारासाठीं नवीन देह धारण करून ते पहा झपाट्यानें इकडे येत आहेत ! ते—ते ते पहा आपले स्वामी श्रद्धानन्द ! नवीन शरीर, नवीन तेज, नवीन कांति ह्यांसह हिंदुधर्माच्या प्रसारासाठीं ते फार जल़दीनें इकडे येत आहेत ! आणि ते पहा राजपाल— तेहि मेलेले नाहींत. तेहि नाहींसे झालेले नाहींत. तेहि आपल्यांतून गेलेले नाहींत ! ते देह बदलीत आहेत ! ते नवीन देह धारण करीत आहेत ! ते नवीन जोमानें ह्या हिंदुभूमीकडे येत आहेत ! कारण लक्षांत ठेवा कीं मरण म्हणजे मृत्यु नव्हे ! मरण म्हणजे नवजीवन आहे आणि नवीन आयुष्यांतील ही सर्व मंडळी हिंदुधर्माच्या संरक्षणासाठीं झप्—झप्—झप् येत आहेत !

---

## कडवे बोल !

अब्राह्मणांना ब्राम्हणांचेकडून पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. एवढेंच नव्हे तर अस्पृश्य म्हणून ज्यांना आपण अपमानीत असतों त्यांचा अस्पृश्यतेचा कलंक ब्राम्हण आणि अब्राम्हण ह्या दोघांनीहि काढून टाकला पाहिजे.

हे सहा कोटी देशबांधव विनाकारण समाजाच्या शिक्षेला पात्र झालेले आहेत. आज हजारों वर्षे त्यांचा अगदीं विनाकारण छळ झालेला आहे. युरोपियन लोकांचेकडून हिंदी जनतेचें स्वातंत्र्य हिरावून घेण्यांत जितके अन्याय झालेले आहेत, अब्राम्हण लोकांना धार्मिक स्वातंत्र्य न देण्यांत जितके अन्याय झालेले आहेत, ह्या सर्वांपेक्षां जास्त अन्याय ह्या सहा कोटी लोकांना अस्पृश्य मानण्यांत झालेले आहेत.

( युगांतर—ता. १३ एप्रिल १९२४. )

# * त्या पैशावर थूः !

आमचा हा महाराष्ट्र शूराचा बच्चा आहे. महाराष्ट्राला युद्धाच्या तयारींत रहाण्याची नेहमींच संवय आहे. बाजीरावाप्रमाणें घोड्या-वर बसल्या बसल्या कणसें चोळावीं व महादजीप्रमाणें पाय तुटला तरी घोड्यावरची मांड हालूं नये, अशी आमची पूर्वीपासूनचीच पद्धति आहे, आमचें जीवन म्हणजे छावणींतलें आयुष्य आहे. मृत्यूनें सुद्धां आम्हांला गर्दीगर्दीतच गांठलें पाहिजे. खोकत बसून मृत्यूची वाट पहायला आम्हांला वेळ नाहीं. घोड्याचें जीन ह्या आमच्या गाद्या, व गाशानें झटकलेली शेतांतली उघडी जागा ही आमची हवेली ! आम्हांला कुणाशीं लढा-यचें नाहीं, कुणाची कुरापत काढायची नाहीं. आम्हांला शांततेच्या व प्रेमाच्या मार्गानें स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे. पण आम्हांला लढावयाचें नसलें तरी लढण्याला नालायक अशा स्थितींत आम्हीं कधींही राहाणार नाहीं. आह्मीं भ्याड ह्मणवून घेणार नाहीं. आम्हीं कचरणार नाहीं. लंड-नमध्यें अनाश्रित हिंदी नाविकांची चौकशी करायला बसलेली चढेल कमिटी हिंदी लोकांचे पश्चात् हिंदी लोकांसंबंधानें जरी वाटेल तें बोलत असली, तरी आह्मी महाराष्ट्रीय–आह्मी हिंदी लोक इंग्रजांचे प्रत्ययाला आणूं कीं, ह्या हिंदुस्थानांत जन्माला आलेला एकही मनुष्य भ्याड नाहीं!

आणि जर संदेश एखादें तत्व उराशीं बाळगून पुढें निघाला असेल तर तें हें एकच तत्व होय. संदेश दिडकी दिडकी कमवायला किंवा वर्गणीदारांकडे किती वर्गणी मागितली म्हणजे धंदा नफ्यांत चालेल ह्याची आंकडेमोड करायला जन्मलेला नाहीं. 'संदेश' हिंदुस्थानच्या स्वतंत्रतेकरितां जन्मलेला आहे व ज्याप्रमाणें इंग्रजांनीं हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ग्रासलें ह्मणून त्या स्वातंत्र्याला मरण नाहीं, त्याप्रमाणें " संदेश " संकटांनीं कितीहि ग्रासला तरी संदेशाला मृत्यु येणें अशक्य आहे. संदेशचीं तत्त्वें अजरामर आहेत

* संदेश, ता. २१ जुलै १९२२ मधील 'संदेशचा नवीन संदेश' या अग्रलेखांतील एक उतारा.

आणि म्हणून **काल, कामदार अथवा कालकूट** ह्या तिघांनाहि संदेश अलंघ्य आहे. आणा दोन आणे टाकून आपली वाचनाची तलफ भागविणारा लहरी मनुष्य हा संदेशचा वाचक नव्हे, तर हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां अंतःकरणापासून झटणारा मनुष्य हा संदेशचा वाचक आहे. संदेश निर्भय आहे, आणि संदेशचा मार्गहि निर्भय आहे. सर्व हिंदुस्थानचें ऐक्य करून हिंदुस्थानच्या मानेभोंवतीं बसलेलें पारतंत्र्याचें बिरडें सोडविणें हें ' संदेशचें ' ध्येय आहे, आणि ह्याचकरितां ' संदेश ' नें आयुष्य स्वीकारलेलें आहे ! आयुष्याचा संदेशला एकच उपयोग माहीत आहे, आणि तो उपयोग देशाचें स्वातंत्र्य हाच होय. हें स्वातंत्र्य साध्य करीत असतांना ' संदेश ' ला कोणी कांहींहि म्हटलें तरी त्याची पर्वा नाहीं. मजुरांचे मेळ्यांत उभा असतांना श्रीमंत व भांडवलवाल्या लोकांनीं त्याला बोल्शेव्हिक म्हटलें तरी त्याची त्याला फिकीर नाहीं. अब्राम्हणांच्या रांगेंत उभा असतांना त्याला कोणी ' कोल्हापुरी ' म्हटलें तरी त्याला त्याची दिक्कत नाहीं. अस्पृश्यांच्या पंक्तींत बसल्यानें त्याला कोणी अस्पृश्य म्हटलें तरी त्याला त्याचा राग नाहीं व मुसलमानांच्या खांद्याशीं खांदा लावून उभा राहिल्यानें त्याला कोणी अविंध म्हटलें तरी त्याची दिक्कत नाहीं. 'संदेश' निर्भय आहे. भीतीचा लवलेशहि त्याला स्पर्श करणार नाहीं. एक क्षणमात्रहि भीतीचा कंप त्याचे वांट्यास येणार नाही. त्याचें पाऊल मजबूत आहे, व त्याचीं तत्त्वें खंबीर आहेत. आणि हीं खंबीर तत्त्वें त्याला यशस्वी करतील व त्याचें कार्य तडीला नेतील ही त्याची खात्री आहे. हा काल क्रांतीचा आहे व जोर मारावयाची हीच वेळ आहे ! विश्वामित्राप्रमाणें प्रतिसृष्टि निर्माण करून जितक्या इंग्रजांच्या हिकमती तितक्या आपल्या हिकमती, जितक्या इंग्रजांच्या युक्त्या तितक्या आपल्या युक्त्या, जितक्या इंग्रजांच्या कला तितक्या आपल्या कला काढण्याची व त्यांना शह देण्याची ही वेळ आहे. इंग्रजांना वाटत असेल कीं आपण कर्तुं–अकर्तुं आहों, पण आम्हीं त्यांच्याहि बारशाला जेवलेलों आहोंत ! आमचे बापजादे त्यांच्या बापजाद्यांपुढें हरले असतीत, किंवा आमच्या आजांनीं त्यांच्या आजांपुढें गुडघे टेंकले असतील, पण आम्ही–आम्ही स्वयंसामर्थ्यवान् आहोंत–आम्ही कुणापुढेंहि गुडघे टेंकणार नाहीं. क्लाइव्ह साहेबांनीं प्लासी येथें जरी त्यावेळच्या

हिंदुमुसलमानांचा पराजय केला असला, किंवा जरी एखाद्या स्मिथनें पुण्याजवळ पेशव्यांवर जय मिळविला असला तरी हें क्लाइव्ह जाणे किंवा स्मिथ जाणे! त्यामुळें आम्हीं कोणाचे अंकित होणार नाहीं, किंवा कुणाचे दास म्हणून उभे राहणार नाहीं. आमचें स्वातंत्र्य, आमच्या देशाचें सामर्थ्य, आमच्या राष्ट्राचें सामर्थ्य, आमच्या भगव्या झेंडयाचें व जरीपटक्याचें स्वातंत्र्य हें अबाधित आहे. तें टाका–तें बऱ्या बोलानें द्या–व तें न द्याल तर आम्हीं तें घेऊं, तें घेऊंच घेऊं!

आणि असें जो म्हणेल तोच संदेशचा वर्गणीदार व त्यालाच "संदेश" वाचण्याचा अधिकार! इतरांनीं त्याचेपुढें कितीहि पैसे फेंकले तरी त्या पैशावर थू:! संदेश हा स्वातंत्र्यभक्तांचा "पेपर" आहे–आंकडेमोडयांचा व नफे कमवणाऱ्यांचा नाहीं. कारण देशाच्या स्वातंत्र्यापुढें दुसरा कोणता नफा जास्ती आहे? देशाच्या स्वातंत्र्यापुढें कोणती किफायत जास्त आहे? अरे, नफे कमवायचे असले तर राज्य कमवायची इच्छा धरा, हत्तीच्या गंडस्थलावर बसण्याची इच्छा धरा, हिंदुस्थानच्या लोकसत्तेचे सर्वांगधुरीण होण्याची इच्छा धरा–तुम्हाला नफे कमवायचे तर जगाच्या साम्राज्य-बाजारांत उभे रहा व त्या बाजारांतला जो कोणता हिरा–जें कोणतें रत्न–जो कोणता मूल्यवान् खडा हवा असेल तो हातांत घ्यायची इच्छा धरा. इतर नफे व इतर लाभ ह्यांचेकरितां कसल्या जिभा चाटतां?

आम्हांला असला वाचकवर्ग पाहिजे–स्वातंत्र्याची लालसा धरून थेट वैभवाच्या कळसावर झेंप घालणारा वाचकवर्ग आम्हांस पाहिजे. जो स्वतः पुढें सरून, पुढें न सरणाऱ्यास गचांडी देऊन त्याला पुढें सरकावील, असला वाचकवर्ग आम्हांस पाहिजे. पराक्रमी वाचकवर्ग हा आमचा वाचकवर्ग आहे. स्वातंत्र्याच्या ध्येयासाठीं बेभान होणारा, आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं जीवित तृणवत् मानणारा वाचकवर्ग आम्हांस पाहिजे. पैसा–थू: त्या पैशावर! पैसा–थू: त्या पैशावर! आपण जिथें लाथ मारूं तिथें पाणी काढूं! पण लक्षांत ठेवा कीं प्राणाचें मोल दिल्याशिवाय स्वातंत्र्य मात्र कधींहि मिळणार नाहीं.

स्वातंत्र्याशिवाय इतर गोष्टी काढील तो कमजातीचा व कमअस्सल होय! ह्या वेळीं आपण सर्व एक! आपल्यापैकीं प्रत्येक थोर व प्रत्येक मोठा! जो स्वातंत्र्याचा भोक्ता तो थोर व मोठा असलाच पाहिजे.

# * सन्देशचें धोरण.

ह्या लेखाला सुरुवात करतांना ज्यांच्या आयुष्यापासून महाराष्ट्रांतील सर्व राष्ट्र—कर्त्यांना चेतना मिळाली, ज्यांचें आयुष्य सर्व राष्ट्रकर्त्यांना मार्गदर्शक झालें, ज्यांच्या आयुष्याचा कित्ता प्रत्येक राष्ट्रकार्याभिमानी मनुष्य आपले पुढें ठेवीत असे, आणि ज्यांच्या राष्ट्रीय कार्यकर्तृत्वानें हा महाराष्ट्र देश गेलीं चाळीस वर्षें एकसारखा भरलेला दिसत होता, त्या कै. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांचें स्मरण केल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. ह्यांचे महाराष्ट्रावर किती उपकार आहेत, ह्याचें वर्णन करण्याची जरूरी नाहीं. सर्व महाराष्ट्र त्याची गणति करण्यास अहमहमिकेनें झटत आहे, संदेशवर तर त्याचे अगणित उपकार आहेत व ते कृतज्ञपणें नमूद करण्याची ही संधि आज संदेश घेत आहे. लोकमान्यांच्या गुणसमुच्चयाचें आकलन करण्याची शक्ति प्राप्त झाल्यापासून तों तहत त्यांच्या स्वर्गवासापर्यंत लोकमान्यांची संस्कृतिमंगल मूर्ति संदेशच्या हृदयांत सतत वास करीत होती. त्यांचा मानसिक विरह झाला असा क्षण संदेशला कधींही आठवत नाहीं. लोकमान्य हे संदेशला सदैव निकट होते, सदैव प्रत्यक्ष होते, आदरपूर्वक त्यांना वन्दन केल्याशिवाय आणि आस्थापूर्वक त्यांचे आशिर्वाद घेतल्याशिवाय सन्देशला कोणतेंही महत्त्वाचें कार्य सन्तोषकारक वाटत नसे. सन्देशचें आजपर्यंतचें सर्व जीवन लोकमान्यांच्या प्रेरणेनें व लोकमान्यांच्या प्रेमानें आर्द्र झालेलें आणि लोकमान्यांच्या भक्तीनें विनात झालेलें आहे. लोकमान्यांचा स्वर्गवास हा सर्व राष्ट्राला तर असह्य आहेच, पण सन्देशला तो असह्यतम आहे आणि हें सार्वजनिक रीत्या कबूल करण्यांत सन्देशला अत्यंत अभिमान वाटत आहे. वरील गोष्ट जाहीर करण्यांत आम्हांला कोणताही ऐहिक लाभ साधून घ्यावयाचा नाहीं हेंही ह्याबरोबर सांगितलेंच पाहिजे. लोकमान्यांच्या प्रेमानुषंगानें आम्हांस समाजांतील दर्जा, वजन, उच्च पद, पुढारीपणा अथवा इतर ऐहिक बाबती

* संदेश ता. १४ सप्टेंबर सन १९२०.

ह्यांपैकीं कशावरही हक्क सांगायचा नाहीं, ह्यांपैकीं कशावरही आमचा डोळा नाहीं. आम्हीं जें लिहिलें, बोललों, वागलों ह्यांपैकीं आम्हांला ज्याचें श्रेय घेतां येईल असें फार थोडें आहे. जें आहे तें लोकमान्यांच्या स्फूर्तीचें, लोकमान्यांच्या शिकवणीचें आणि लोकमान्यांच्या तत्त्वकथनाचेंच आहे, एवढेंच येथें सांगण्याचा आमचा इरादा आहे. अर्थात् आमच्या कृतीबद्दल अथवा आमच्या समजुतीबद्दल लोकमान्यांकडे कोणत्याही तऱ्हेची जबाबदारी नाहीं. लोकमान्यांची शिकवणूक जशी आमचे मनावर प्रतिबिंबित झाली, त्याप्रमाणें आमचें वर्तन झालेलें आहे. त्याबद्दल जर कोणी जबाबदार असेल तर आमचे आम्हींच आहों. लोकमान्य अथवा दुसरें कोणीही त्याबद्दल जाबाबदार नाहीं.

लोकमान्यांच्या चरित्राचें पर्यालोचन आम्हीं सन्देशमध्यें विस्तृत रीतीनें केलेलेंच आहे. त्याचें पुनरुच्चारण करण्याची येथें मुळींच गरज नाहीं. आम्हांस महाराष्ट्राचा आधुनिक राजकीय इतिहास कै. महादेव गोविंद रानडे ह्यांच्या कर्तबगारीपासून दिसतो. तेथून विष्णुशास्त्री चिपळूणकर, कै. आगरकर, कै. गोपाळ कृष्ण गोखले हे श्रेष्ठ पुरुष झाले आणि सर्वांचे अखेरीस लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे झाले. ह्यांपैकीं जास्ती मोठा कोण आणि कमी मोठा कोण, ह्या भानगडीच्या प्रश्नांत आम्हीं शिरत नाहीं. ह्यांपैकीं खरा कोण आणि खोटा कोण, ह्याहि वादविवादांत आम्हीं शिरत नाहीं. ह्या थोर पुरुषांशिवाय महाराष्ट्रांत कै. काशिनाथ त्रिंबक तेलंग, कै. विष्णु परशुरामशास्त्री पंडित, श्री. डॉक्टर सर रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर, कै. शंकर पांडुरंग, कै. मण्डलीक, कै. नाना शंकरशेट इत्यादि ज्या थोर थोर विभूति झाल्या त्यांनाहि आम्हीं विसरलेलों नाहीं. आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, कै. महादेव गोविंद रानडे ह्यांचेपासून एका विवक्षित व सुसंगत राजकारणाला आरंभ होऊन त्याची अतिशय उत्कट परिणति कै. बाळ गंगाधर टिळक ह्यांच्या आयुष्यांत झाली. रानड्यांपासून टिळकांचेपर्यंत एकच सुसंगत राजकारण होतें आणि रानड्यांपासून टिळकांचेपर्यंत झालेल्या चारपांच व्यक्ति हीं त्या राजकारणाचीं निरनिराळीं दलें होतीं. टिळकांच्या स्वर्गवासामुळें हीं सर्व दलें

परमेश्वर—चरणीं एकत्रित झालीं आहेत आणि हीं पांच दलें परमेश्वराचे चरणांवर वहाण्यांत महाराष्ट्राचे हातून एकच परमेश्वरपूजा समाप्त झालेली आहे.

रानडे, विष्णुशास्त्री, आगरकर, गोखले, टिळक ह्या पांच निरनिराळ्या व्यक्ति घेतल्या तर त्यांत पांच निरनिराळे रस अथवा स्वभाव आपणांस दिसून येतात. रानडे हे 'महर्षि' होते. त्यांच्यांत आपल्याला शान्तरस आढळतो. आधुनिक गांधी जर आपणांस कोठें पहावयाचा असेल तर तो आपणांस रानड्यांत दिसेल. गांधी ही महाराष्ट्राला तरी अपरिचित चीज नाहीं. रानड्यांच्या रूपानें महाराष्ट्रांत गांधी होऊन गेले आहेत. महाराष्ट्रांत धार्मिक वृत्ति नाहीं अशी तक्रार गांधींनीं लोकसंग्रहाचे प्रतिनिधीपाशीं केली. पण ह्याचें कारण एवढेंच, कीं गांधींनीं कधीं रानड्यांना पाहिलेलें नव्हतें. जर रानड्यांची पूर्ण माहिती गांधींना असती तर महाराष्ट्रांत धार्मिकपणा नाहीं असें गांधींना कधींहि म्हणावेंसें वाटलें नसतें.

पण महर्षि रानडे जरी महाराष्ट्राचे 'महात्मे' पुढारी होते, तथापि तडफ, जोर, त्वेष, स्वार्थत्याग, धैर्य, हे गुण महाराष्ट्रांत विष्णुशास्त्र्यानींच आणिले. ह्या गुणांत रानड्यांचें चरित्र फारसें उज्ज्वल नाहीं. कै. आगरकर ह्यांनीं विष्णुशास्त्र्यांच्या स्वार्थत्यागाला सामाजिक सुधारणेकडे खेंचून दोन्ही डोळ्यांनीं डोळस केलें, गोपाळ कृष्ण गोखल्यांनीं महाराष्ट्रीय राजकारणांतील हिरवट आडदांडपणा टाकून त्यांत दरबारीपणा आणण्याचा प्रयत्न केला आणि बाळ गंगाधर टिळकांनीं धैर्याची कमाल आणि निर्भयपणाचा कडेलोट करून महाराष्ट्रीय राजकारणाची कीर्ति भरतखंडभर दुमदुमविली.

महाराष्ट्रीय राजकारण हें वरील पांच चरित्रांचें मिळून झालेलें आहे. ह्यांपैकीं कोणत्याहि एका चरित्रांत संपूर्ण राजकारण नाहीं. महाराष्ट्रांतील राजकारण ज्या कोणास समग्रपणानें समजून घ्यायचें असेल, त्यानें वरील पांची चरित्रांचें अवलोकन एकदम केलें पाहिजे. त्यांच्या चरित्रांचें अवलोकन करणें हा महाराष्ट्रीय चरित्राचा पहिला अवघडपणा आहे, आणि त्यांतील दुसरा अवघडपणा असा आहे कीं, हीं पांची चरित्रें एकाच राजकारणाचीं पंचदलें असतांना, एकमेकांचें एकमेकांशीं भयंकर वैमनस्य

होतें. उदाहरणार्थ, रानडे व विश्णुशास्त्री यांचें वैर होतें; टिळक व आगरकर ह्यांचें वांकडें होतें; आणि रानडे व टिळक ह्यांचें तर इतकें भयंकर शत्रुत्व होतें, कीं तेव्हांपासून नेमस्त आणि राष्ट्रीय अशा फळ्या पडून ह्या फ्ळ्या रानडे, गोखले व टिळक यांच्या आयुष्यांना तर भोंवल्याच, पण त्यांच्यानंतर अजूनसुद्धां या पक्षभेदाचे निखारे महाराष्ट्राच्या अंगावर पडतच आहेत.

हीं भांडणें आणखी वाढवायचीं म्हणजे अशीं कीं त्यांत नवीन उद्भूत झालेल्या ब्राम्हण–अब्राम्हण वादाच्या विस्तवाचे निखारे भरींत भर घालण्याकरितां टाकून दिले पाहिजेत ! ब्राम्हण–अब्राम्हण हा प्रश्न कै. जोतिराव फुले ह्यांच्या वेळेपासून उद्भूत झालेला आहे. महाराष्ट्रांत सुमारें पंचाण्णव हिस्से अब्राम्हण आहेत, आणि सबंध हिंदुस्थानांतही ब्राम्हणांचें प्रमाण साधारण रीत्या तितकेंच आहे. एवढ्या लहान संख्येनें एवढ्या मोठ्या संख्येस ‘ आम्ही तुमच्यापेक्षां वरिष्ठ आहों ’ असें म्हणणें, ‘ तुम्ही सोवळ्यांत प्रविष्ट करण्यास योग्य नाहीं ’ असें सांगणें आणि ‘ लग्नें, मुंजी, बारसें, बारावें इत्यादि सर्व धार्मिक संस्कारांत आपलेच हातीं सर्व अधिकार ठेवणें ’ हें कोणासहि अपमानकारक वाटणारच ! कै. ज्योतिराव फुले हे स्वाभिमानाची जागती ज्योत असल्यामुळें त्यांनीं ह्या सर्व गोष्टींबद्दल अत्यंत तीव्र निषेध केला, आणि त्या वेळीं त्यांनीं जो सत्यशोधक समाज स्थापला तोच सध्यां अतिशय जोराला लागलेला आहे.

ह्या सत्यशोधक समाजाचीं अशीं तत्वें आहेत कीं ईश्वराकडे जाण्यास मध्यस्थ नको. सत्यशोधक समाजानें जातिभेदावरहि भयंकर हल्ला चालविलेला आहे आणि समाजांत अथवा धर्मांत ज्या कांहीं अश्लाघ्य रूढी घडलेल्या आहेत त्या सर्वांवरही सत्यशोधक समाजाचा अत्यंत मोठा कटाक्ष आहे. पुष्कळ निरक्षर लोकांना सत्यशोधक समाजाचीं तत्वें जीं तावडतोब पटतात ह्याचें कारण हेंच होय, आणि आपल्या मतांचा प्रसार करण्याकरितां हा समाज बहुजनसमाजाला प्रिय अशा तमाशाचा अवलंब करीत असल्यामुळें ती गोष्ट ह्यांना आणखी सोपी होऊन बसते.

आणखी एक भांडण हवें असलें, तर तो अस्पृश्यांचा वर्ग होय. ह्या वर्गांत महार, मांग इत्यादिकांचा समावेश होतो आणि त्यांच्यांत चांगलीं,

मेहनती, प्रामाणिक, प्रतिष्ठित, पराक्रमी अशीं वाटेल तितकीं माणसें निर्माण होत असतांना, त्यांना हिंदुसमाजांत इतक्या वाईट तऱ्हेनें वागवलें जातें कीं, ह्यापेक्षां घरच्या कुत्र्यांनाहि शतपट ज्यास्त दया दाखविण्यांत येत असेल ! हा अस्पृश्यांचा समाज लहानसहान नसून, या सहा कोटी लोकांत इतका असंतोष व इतका कुढेपणा आलेला आहे कीं ह्या असंतोषाला जर कोणी जागृत केलें तर त्याचे पायीं हजारों लोकांचे देह पडल्यावांचून राहणार नाहींत.

वरील सर्व विवेचनांत आमचा हेतु एवढाच आहे कीं भांडायलाच बसलों तर भांडायला वाटेल तितकें इंधन आहे. जहाल–मवाळ, ब्राम्हण–अब्राम्हण, स्पृश्य–अस्पृश्य हीं भांडणें काढायचाच अवकाश कीं तीं भांडणें इतकीं वाढतील कीं त्यांचे पायीं महाराष्ट्राचा चक्काचुराडा होऊं शकेल. नुसतें जहाल–मवाळ हेंच भांडण घ्या, हें भांडण महाराष्ट्राला जवळ जवळ चोवीस वर्षें पुरलें आहे ! ब्राम्हण–अब्राम्हण ह्या वादाची आतां नुसती सुरवात आहे व स्पृश्य–अपृश्य हें भांडण ह्यांचे मागून पेटायचें आहे, अशी जर कल्पना केली तर ह्या भांडणांत महाराष्ट्राचीं शेंपन्नास वर्षें सहज निघून जातील. प्रश्न असा आहे कीं आपण असे भांडतच बसणार, कीं तंटे मिटवून राष्ट्रकार्याला लागणार ?

ह्या संबंधानें विचार करतां आह्मांला जें मुख्य सांगावयाचें तें हें कीं, ज्या व्यक्तींसाठीं किंवा ज्यांच्या मतांसाठीं आपण भांडलों त्या सर्व व्यक्ति आपल्याला प्रियच आहेत. रानडे–विष्णुशास्त्री–गोखले–आगरकर–टिळक ह्यांपैकीं एक तरी कोणी पुरूष असा दाखवा, कीं जो नसला तरी चालेल ! आपण जहाल असूं किंवा मवाळ असूं, पण वरील पांच पुरुषांपैकीं आपणांस कोण नको असें सांगा ! नको म्हणणारा कोणी निघणारच नाहीं. एवढेंच नव्हे तर सत्यशोधक समाजाचे संस्थापक कै. ज्योतिराव फुले हेही आपल्या इतिहासांत अवश्य असले पाहिजेत असें आपलें मन आपणांस सांगेल. आपण जहाल असूं कीं मवाळ असूं, नरम असूं कीं गरम असूं, एवढें मात्र खरें कीं आपणांस वरील पांची व्यक्तीपाहिजे आहेत. ह्या पांचांत कै. ज्योतिराव फुले यांना जरूर आणून बसवा.

पण ह्यांपैकीं कोणी कमी करूं नका. कारण ह्यांपैकीं एकेकाला पहातां पहातां, आह्मांला महाराष्ट्राच्या समग्र इतिहासाकडे पहावयाचें आहे. वरील व्यक्तींतील प्रत्येक मनुष्य हा राजकारणाचा एक भाग आहे व सर्व संकलित व्यक्ती हेंच महाराष्ट्राचें खरें राजकारण आहे.

आणि म्हणून लोकमान्यांच्या स्वर्गवासानंतर आमचें पहिलें धोरण हें कीं रानडे, टिळक, आगरकर, गोखले, विष्णुशास्त्री ही सर्व मंडळी आतां परमेश्वराचे पायांपाशीं महाराष्ट्राचें हित चिंतण्यासाठीं गेलेली असतांना त्यांची स्वर्गीय समाधि भंग करून, पूर्वीचीं भांडणें भांडण्याचें आम्हांस कांहींएक कारण दिसत नाहीं. जोंपर्यंत गोखले, टिळक, रानडे हे ह्या मृत्युलोकावर होते, तोंपर्यंत हा रानडेपक्ष, हा टिळकपक्ष, हा गोखलेपक्ष असा भेदभाव कायम राखण्यांत मुद्दा होता. त्यांच्या वेळीं ह्या भेदभावाची आवश्यकता होती. त्यांचेवेळीं ह्या भेदभावाची मौज होती. पण पंचकडी-पैकीं शेंवटचा वीर आयुष्याची वुईकेट पडल्यामुळें स्वर्गनिवासाच्या तंबूकडे जाण्यास निघाला असतांना, त्यांच्या दृष्टीसमोर जे हलकल्लोळ आपण माजवीत होतों तेच आपण पुन्हां माजवावेत काय ? प्रत्येक गोष्टीची वेळ असते. प्रत्येक गोष्टीचा हंगाम असतो. जोंपर्यंत वरील पांची वीर मानवी आयुष्याच्या रणभूमीवर होते, तोंपर्यंत ह्याचा हंगामही कदाचित् होता ! पण आतां ते रानडेही राहिले नाहींत आणि टिळकहि राहिले नाहींत. आतां ह्यापुढें तीच जुनी दृष्टि व शिळीं भांडणें पुढें चालवणें हें आम्हांस यत्किंचित्हि इष्ट वाटत नाहीं.

लोकमान्य टिळकांच्या स्वर्गवासानंतर जर पहिली कोणती गोष्ट आपणांस शिकायची असेल तर ही होय ! आतां पंचवीरांचें पहिलें युग संपून आतां सर्वजनसमाजाचें अथवा डिमॉक्रसीचें दुसरें युग सुरु झालें आहे. आणि ज्याप्रमाणें पत्याचा एक डाव संपला म्हणजे सर्व पानांची गल्लत करतात, त्याप्रमाणें सर्व पक्षभेदांची आतां गल्लत करण्याची वेळ आलेली आहे. आतां आपण पानें पुन्हां पिचूं या ! आणि राजकारणाचे डाव आपल्या सामर्थ्याप्रमाणें पुन्हां मांडूं या ! पूर्वी महाराष्ट्रांत भांडणें होतीं याचें कारण ते पुढारी बहाद्दर होते. आतां आपण

जर भांडूं लागलों तर ती बहादूरी कांहीं आपल्याला गाजवितां यायची नाहीं व आपलीं भांडणें मात्र कायम रहातील ! ह्यासाठीं आमची सर्व महाराष्ट्रियन् बांधवांना अशी प्रार्थना आहे, कीं लोकमान्यांच्या स्वर्गवासानंतर आपआपल्या श्रद्धेप्रमाणें रानडे, गोखले, टिळक, ह्यांपैकीं वाटेल त्याचें पवित्र नांव घ्या आणि निश्चय करा कीं आतां जुने सर्व भेद नाहीसे झाले आणि इतउतर महाराष्ट्रीय हा एकच पक्ष महाराष्ट्रांत कायम राहील !

लोकमान्य टिळकांचे स्वर्गवासानंतर महाराष्ट्रीयांचें पहिलें कर्तव्य आहे तें ह्या एकीचें आहे. आतां जुनीं भांडणें मोडणें आपलें कर्तव्य आहे. आतां व्यक्तिद्वेषाला मुठमाती देणें हें आपलें कर्तव्य आहे. आतां भेदांना आणि विरोधांना त्यांच्या योग्यतेपेक्षां जास्ती किंमत न देणें हें आपलें कर्तव्य आहे. [विरोध हे विरोधाच्या घरीं राहूं द्यात. मतभेद हे कोपऱ्यांत बसूं द्यात. आपणां सर्वांला राष्ट्राची सेवा करायची आहे आणि ही सेवा करीत असतांना आपण सर्व एकच आहोंत.]

आमचें दुसरें धोरण हें कीं आम्हीं सर्व बाजूंनीं स्वातंत्र्याभिमानी आहोंत आणि हें स्वातंत्र्य जितकें राष्ट्राचें तितकें व्यक्तीचें, जितकें व्यक्तीचें तितकेंच राष्ट्राचेंहि असलें पाहिजे. मागील इतिहास पहातांना आम्हीं महाराष्ट्राचे पंचरसात्मक राजकारण पहात असतों, राजकारणाचें एक एक दल पहात नाहीं. आमच्या भावी राजकारणांत ही पांची दलें आलीं पाहिजेत. आम्ही जितके राजकारणांत पुढें जाऊं, तितकेच आम्ही सामाजिक बाबतींतहि पुढें जाऊं ! आम्ही जितके राष्ट्रीय स्वातंत्र्य मागूं तितकेंच आम्ही धर्मालाहि स्वातंत्र्य देऊं. आम्ही जितके पुरुषांसाठीं हक्क मागूं तितकेच स्त्रियांच्याहि हक्कांकरितां झगडूं. आम्हांस जितका ब्राह्मण प्रिय आहे तितकाच अब्राम्हणहि प्रिय आहे. जें ज्ञान आम्ही ब्राम्हणांना देऊं तेंच ज्ञान आम्ही अब्राम्हणांना सुद्धां तितक्याच पूर्णतेनें देऊं. जें धर्मस्वातंत्र्य आम्ही ब्राम्हणांस देण्यास तयार होऊं तेंच धर्मस्वातंत्र्य आम्हीं अब्राम्हणांनासुद्धां अर्पण करूं आणि जी पवित्रता आम्हांस ब्राम्हण—जातीविषयीं वाटेल, तितकीच पवित्रता आम्हांस अब्राम्हणांविषयींही वाटेल. इत-

केंच काय, आम्हीं अस्पृश्यांची अस्पृश्यता ठेवणार नाहीं, आम्ही अव्यवहाऱ्यांना व्यवहार्य करून घेऊं, आम्ही अपंक्तांना इतके पंक्तिपावन समजूं कीं त्यांचीं पिढ्यान् पिढ्यांचीं दुःखें, त्यांचीं शतकोशतकांचीं आंसवें, त्यांचीं युगान् युगांचीं दुर्दैवें त्यांत पार वाहून जातील! आमच्या राष्ट्रनीतींत महार–मांग हे अस्पृश्य नव्हेत. ते आमचे बांधव, ते आमचे सहोदर, ते आमचे भ्राते! त्यांच्याशीं व्यवहार करायला आम्हांला शंका, भीति अथवा लज्जा मुळींच वाटणार नाहीं. आमच्या राष्ट्रनीतींत अस्पृश्य हा अस्पृश्य नव्हे, तर जो कोणी राष्ट्रमातेच्या मानेवर चहाडखोरीची सुरी ठेवतो तोच अस्पृश्य होय.

ह्या पुढील अखेरची गोष्ट म्हणजे ज्या राजकीय स्वातंत्र्यावांचून हिंदभूमीचें मुखकमल म्लान आणि खिन्न आहे, ज्या राजकीय स्वराज्यावांचून हिंददेवीच्या राजमुकुटाला मान नाही, तिच्या मस्तकावरील कोहीनूराला चमक नाहीं, तें राजकीय स्वातंत्र्य तन–मन–धनें करून मिळविणें हें होय. आमच्या सर्व सामाजिक सुधारणा ह्या राजकीय स्वराज्याकरितां आहेत, आणि आमच्या सर्व राजकीय अधिकारांचा उपयोग व्यक्तींच्या स्वातंत्र्याकरितां, अबलांच्या उन्नतीकरितां, अस्पृश्यांच्या उत्कर्षाकरितां, मजुरांच्या अन्यायखंडणाकरितां आणि गरिबांच्या सुखाकरितां व संपत्तीकरितां आहे. गरिबांचें विव्हळणें, अबलांचें रोदन, अर्भकांचा विलाप, अनाथांचा आक्रोश हा श्रीमंतांच्या व वैभवशाल्यांच्या आशिर्वादापेक्षां आम्हांस जास्त आदरणीय आहे, आणि श्रीमंतांच्या पायांत लुडबडून मरण येण्यापेक्षां गरिबांच्या झोपडींत उशाला दगड घेतला असतां मृत्यु येणें हें आम्हांस जास्त पसंत आहे. ईश्वर करो आणि जरी त्यानें आमची संपत्ति हिरावून घेतली तरी आमच्या संकल्पाचा कधींही भंग न होवो!

ज्यांनीं संदेशचें आजपर्यन्त वर्तन लक्ष्यपूर्वक अवलोकन केलेलें आहे, त्यांना आज आह्मी जाहीर केलेल्या धोरणांत कांहींच नवीन आढळणार नाहीं. कारण पूर्वीपासून संदेश हा मजुरांचा पेपर आहे, हा अस्पृश्यांचा कैवारी आहे, हा धर्मस्वातंत्र्याचा अभिमानी आहे, स्त्रियांच्या शिक्षणाच्या वादांत ह्यानें प्रबल मतविरोधालाही न जुमानतां स्त्रियांचीच बाजू घेतलेली

आहे. आमच्या भगिनीवर्गाला तर संदेश इतका प्रिय आहे कीं, संदेश बघितला कीं त्यांना कुणीतरी माहेरचाच आलेला आहे असें वाटतें. संदेशचें हेंच धोरण पुढें राहील आणि राजकीय स्वातंत्र्याचे योगानें सामाजिक स्वातंत्र्य मिळविण्याचा तो नेहमीं यत्न करील. ह्यांत संदेश कांहींएक नवीन करणार नाहीं, किंवा गेलीं पंधरा वर्षे राजकीय आणि सामाजिक बाबतींत संदेशकारांनीं धारण केलेलीं मतें आणि आचरणांत आणलेलें वर्तन, ह्यांत संदेशला एका काडीचाही फरक करावा लागणार नाहीं. पण लोकमान्यांच्या स्वर्गवासामुळें एकदम जगाला एवढा धक्का बसला आहे कीं पूर्वीच्याच गोष्टी पण त्या पुन्हां जास्त एकत्रित रीतीनें व जास्त स्पष्टपणानें सांगाव्या लागतात ! सत्यगोष्टी ह्या कितीही वेळ सांगाव्या लागल्या तरी सांगितल्याच पाहिजेत आणि प्रसंगोपात्त ह्या सत्यगोष्टी पुन्हां सांगाव्या लागल्या तरी त्यांत आम्हांला आनंदच वाटतो.

आणि आम्हीं या गोष्टी पुन्हां पुन्हां सांगतों याचें कारण एवढेंच कीं, लो. टिळकांच्या चरणांजवळ जमलेल्या राष्ट्रीय तरुणांपैकीं आम्ही तरुण राष्ट्रीय आहोंत. निर्भयपणा हा आमचा बाणा आहे. जेथें सत्य असेल तेथे आम्हीं घूमधडाका उडी घालूं ! तेथें कोण आणि किती आहेत, ह्याची आम्ही तिळमात्र पर्वा करणार नाहीं. आमच्याजवळ अल्पता नाहीं. आम्ही अमर्याद प्रेमानें आमच्या राष्ट्रभूमीवर प्रेम करतों, आणि तेंच अमर्याद प्रेम आम्ही आमच्या देशबांधवांविषयींही मनांत बाळगतों. आम्हांस सम्पत्तीची पर्वा नाहीं. संपत्ति ही परमेश्वराच्या पायांची पायधूळ आहे. ती अंगावर रहायची असली तर परमेश्वराचींच पाउलें तेथें पाहिजेत आणि तीं पाउलें नसून तेथें संपत्ति असेल तर ती संपत्ती कवडी किमतीची होय. संदेशचा जन्म अशा काळांत झालेला आहे कीं ज्या काळीं तरवारीचा खणखणाट नाहीं, भाल्यांच्या फेंका नाहींत, घोड्यांची दौड नाहीं, फौजेची जमावट नाहीं, कांहीं नाहीं. संदेशला त्यांत आनंद आहे. ज्या शांततेच्या छायेखालीं संदेशचा जन्म झालेला आहे, त्याच शांततेवर तो खूष आहे, कारण शांततेचे पराक्रम हे युद्धकालाच्या पराक्रमांपेक्षां हजारपटींनी ज्यास्ती अवघड व ज्यास्ती मौल्यवान् असतात ! महारा-

ष्ट्रांतल्या तरुणांचा दृढनिश्चय हीच त्यांची तलवार ! त्यांचा शांतता-प्रस्थापक जमाव हीच त्यांची फौज ! [अडचणींना धाड्‌दिशीं फोडून जाणारा त्यांचा आत्मविश्वास हेच त्यांचे घोडेस्वार आणि परिस्थितीच्या वर पुरुषभर ऊंच असलेली त्यांची महत्वाकांक्षा हाच त्यांचा झेंडा ! अशा उत्साही तरुणांनों, हा संदेश तुम्हांला बोलावीत आहे, हिय्येबाज तरुण लोकांनों, अचाट पराक्रम करायला हा संदेश तुम्हांला पाळवीत आहे, प्रफुल्ल मुखांच्या प्रफुल्ल तरुणांनों, स्वराज्य म्हटल्याबरोबर स्वराज्य, अशी स्थिति उत्पन्न करायला संदेश तुम्हांला पाचारण करीत आहे. या--सामाजिक स्वातंत्र्याच्या झेंड्याखालीं या. अस्पृश्यतेच्या छिन्नभिन्नत्वाखालीं जमा व्हा. युवतीवर्गाला स्वातंत्र्यनिशाणाखालीं उभें राहण्यास उत्तेजन द्या ! एकीकडून असहकारितेच्या किल्ल्यावर मोर्चे लावलेले जहाल, एकीकडें कौन्सिलें काबिज केलेले अब्राम्हण, एकीकडे दुःखांतून मुक्त झालेले मजूर, एकीकडे अस्पृश्यतेंतून पार सुटलेले ' अंत्यज, ' एकीकडे दास्याच्या दर-वाज्यांतून प्रकाशांत येणाऱ्या स्त्रिया, आणि एकीकडे पीळदार मिशांचे आणि पीळदार दंडांचे तरुण स्वराज्य--गडावर चढायला लागलेले आहेत. या, या, ह्याच पर्वणींत सामील व्हा. ह्यांत यश आहे, ह्यांत जय आहे, ह्यांत सिद्धि आहे आणि लो. टिळकांच्या जीविताचा अखेरचा फर्मानही असाच आहे.]

---

## कडवे बोल !

तोरणा किल्ल्याचे पायथ्याशीं मराठ्यांचे रक्ताजवळच ब्राम्हणाचें रक्त सांडलें गेलें व प्रतापगडाचे तळाशीं ब्राम्हणाचे रक्ताजवळ महारांचे रक्त ओतण्यांत आलें. ब्राम्हण आणि मराठे यांना मावळ्यांच्या एकाच रणां-गणावर कंठस्नान मिळालें, व मराठे आणि महार यांचे देह एकाच भूमींत गाडले गेले.

एका देशांत उगवलेल्या या मानवी रोपट्यांनीं एकमेकांच्या गळ्यांत गळा घातला, तर दोघेहि तरतील, दोघेहि उन्नतीला चढतील. ऐक्य हेंच त्यांच्या उन्नतीचें बीज आहे. प्रेम हेंच त्यांच्या उन्नतीचें कारण आहे.

( युगांतर--१३ एप्रील १९२४. )

# * जय जय रघुवीर समर्थ !

हिंदुस्थाना, तुझें स्वातंत्र्य कुठें गेलें ? हिंदुस्थाना, तो स्वातंत्र्याचा अलंकार तूं कूठें हरविलास ? हिंदुस्थाना, तूं इतका कपाळकरंटा कशानें झालास ? हिंदुस्थाना, तुझें नांव इतिहासांतून कां पुसलें गेलें ? हिंदुस्थाना, कोणत्याहि राष्ट्राला न मिळणारी अशी भयंकर शिक्षा तुला कां मिळाली ? हिंदुस्थाना, तुझा सुवर्णमुकुट धुळींत कां मळवला गेला ? हिंदुस्थाना, तुझा जयध्वज कां फाटला ? तुझ्या निशाणाच्या चिंधड्या कां झाल्या ?

ह्याचें कारण एवढेंच कीं, हिंदुस्थाना, तूं आपली पुण्यपरंपरा टाकून दिलीस. तूं सोनें फेंकून दिलेंस आणि फुटकें पितळ गळ्यांत बांधलेंस ! तूं रत्नताट लाथाडलेंस आणि खापर हातांत घेतलेंस ! हिंदुस्थाना, तूं उज्ज्वल सत्य खातेऱ्यांत भिरकावून दिलेंस आणि बदनामी असत्य पदरांत बांधून घेतलेंस !

तुझ्या तोंडाकडे पहायची पूर्वी कुणाची छाती होती ? तुझा अपमान करायला पूर्वी कुणाचा हात वहात होता ? तुझा धिक्कार करायची पूर्वी कुणाची माय व्याली होती ? तुला धिक्कारून जिवंत राहूं असें म्हणण्याची पूर्वी कुणाची हिंमत होती ? तुला कमी मानून, तुझी उपेक्षा करून, तुझ्याकडे दुर्लक्ष करून कुणाचें चालणार होतें ?

कारण जगाच्या शर्यतींत तूं पहिला होतास. तुझें पद सर्वांच्या वर होतें. तूं सर्वांना प्राणभूत होतास ! तूं सर्व जगताला 'नमुना' होतास. तूं पुढें जावेंस आणि जगतानें पाळीव कुत्र्याप्रमाणें तुझ्यामागून यावें असा पूर्व संप्रदाय होता. तो संप्रदाय आतां कुठें आहे ? आतां इतर राष्ट्रांनीं तुझ्या मागोमाग यायचेऐवजीं तूं मात्र पाळीव कुत्रा बनून इतरांच्या मागोमाग धांवत आहेस.

त्या तुझ्या तोंडाळा पारतंत्र्याचा डाग लावलेला आहे. तूं किती जरी सोंग आणलेंस तरी तुझ्या तोंडाला पारतंत्र्याचा डाग लागलेला आहे.

---

* टिळक ता. २६ फेब्रुवारी १९२२.

हा पारतंत्र्याचा डाग कधींहि पुसला जाणार नाहीं, कधींहि धुतला जाणार नाहीं. पंजावांतले पांचहि सिंधु भरीला घातलेस, तुंगभद्रेचें आणि कृष्णेचें पाणी हा डाग धुण्याकरितां खर्ची घातलेंस, टेम्स, ऱ्हाईन, व्होल्गा, मिसीसिपी ह्या सर्व नद्या हा डाग पुसण्याकरितां उभ्या केल्यास —हाय ! अरे, निष्पाप अंतःकरणानें स्वातंत्र्यभूमींतून वाहणाऱ्या ह्या नद्याहि बाटतील, त्या अपवित्र होतील, पण तुझ्या तोंडावरचा पारतंत्र्याचा डाग कधींहि धुतला जाणार नाहीं.

शरमेची गोष्ट कीं तुलाहि शिकविण्याचा प्रसंग यावा ! पूर्वी तूं जगताला उपदेश करणारा असतांना आतां लोकांनीं तुला शिकवावें अशी स्थिति आली ! तुझी तसबीर लोकांनीं हातांत घ्यावी अशी पूर्वी स्थिति असतांना आज तुला लोकांची तसबीर हातांत घेऊन त्याप्रमाणें नटण्याची पाळी आली. आणि तुझें तें अभद्र तोंड ! तें काळेंकुट्ट तोंड पहायला आज कोणीहि तयार नाहीं, तें अभद्र तोंड पाहिलें कीं अपशकून झाल्याप्रमाणें प्रत्येक भर्रर्रदिशीं मान वळवतो. खरोखर तुझें तोंड कोण पाहील? जें तुझें तोंड पाहिल्याबरोबर पूर्वेचा भाग्यसूर्य एकदम पश्चिमेकडे उगवायला लागला, जें तुझें तोंड पाहिल्यावर दुग्धमधुर समुद्रजलहि शिसारीनें खारें झालें, जें तुझें तोंड पाहिल्याबरोबर पर्वत जागच्याजागीं स्तंभित झाले आणि नद्या समुद्रांत जीव द्यायला निघाल्या, तें तुझें तोंड कोण पाहील ? कोणी पहाणार नाहीं. तुझें तोंड पाहिल्याबरोबर स्वातंत्र्याचा भोक्ता जनरल बोथा एकदम आपलें साऊथ आफ्रिकेचें दार लावून घेतो, तुझें तोंड पाहिल्याबरोबर केनियाचा गव्हर्नर ओकारी देतो, तुझें तोंड पाहिल्याबरोबर ऑस्ट्रेलियाच्या अंगावर शहारे उभे राहतात, जॉर्ज वॉशिंग्टनची अमेरिका पातळांत लपून रहाते—हिंदुस्थाना, तें तुझें तोंड कोण पाहील ?

हा डाग तुला नडतो आहे. हा डाग तुझें नांव बद्दु करतो आहे. तुला अजून आशा असेल, मला कुठेंतरी येऊं देतील अशी तुझी अजून कल्पना असेल, तर जवळच्या चीन देशांत जा, जवळच्या जपानकडे वळ ! पण तिथें सुद्धां तुला कोणी "या" असें म्हणणार नाहीं. अरे, पारतंत्र्यानें चोपडलेलें, पारतंत्र्यानें लुडबुडलेलें, पारतंत्र्यानें माखलेलें, पारतं-

त्म्मनें डागळलेलें तुझें तोंड–हें तुझें अभद्र तोंड पाहूनच चीन पिवळाधमक पडला आणि जपानची भीतीनें वाढ खुंटली. जा ! हें तुझें काळें तोंड घेऊन तूं वाटेल तिथें जा ! तुला अनुभव येईल, कीं हा डाग पुसून टाकल्याखेरीज कुणीहि तुझें मुखावलोकन करणार नाहीं.

परवां रामदासनवमी आली आणि गेली, शिवरात्रही आली आणि गेली, पण तुला त्याचें काय ?

तुझ्या रात्री अशिवच, तुझे दिवस अमंगलच ! रामानें कृपा केली तर जड शिळा उद्धरल्या, शंकरानें कृपा केली तर गणिका, हरिणी, कुक्कुट, मर्कट हे सर्व उद्धरून गेले ! पण तूं असलें अमंगल श्वान आहेस, तूं असलें नीच मर्कट आहेस, तूं असलें हीन कुक्कुट आहेस कीं, तूं मात्र उद्धरला जात नाहींस ! हिंदुस्थाना ! रामदासनवमी आली आणि गेली, शिवरात्र आली आणि गेली, गुढीपाडवा पुढें येऊन राहिला तरी तूं अमंगलच, तूं अपवित्रच ! तुझें निशाण फाटलेलें असतां आणि तुझी वैजयती तुटलेली असतां तूं पवित्र कोठून असणार ?

त्याला उपाय ? त्याला उपाय पुन्हां 'हरहर महादेव' गरज, पुन्हां 'जय जय रघुवीर समर्थ' म्हण ! निश्चय कर कीं प्रस्तुतच्या गर्तेतून मी बाहेर निघणार, निश्चय कर की प्रस्तुतच्या नरकांतून मी बाहेर पडणार! फाटलेलें निशाण, तुटलेला हार, मळलेलें यश, तुडविलें गेलेलें नांव, हरविलेली कीर्ति, काळिमा लागलेलें मुख–निश्चय कर कीं बस्स ! आतां ह्या पलीकडे ही स्थिति ठेवणार नाहीं. दरवर्षी शिवरात्र येते, रामदासनवमी येते तरी तुला लाज वाटत नाहीं ? प्रत्येक शिवरात्र 'हरहर महादेव' ह्या तुझ्या पूर्वापार रणगर्जनेची तुला आठवण देत असतां ती तूं गर्जत नाहींस ? प्रत्येक रामदासनवमी 'जय जय रघुवीर समर्थ' हा खडखडीत मंत्र तुझ्यासमोर आवेशानें म्हणत असतां तिकडे तूं लक्ष देत नाहींस ? टवकार, कान टवकार! उघड, डोळे उघड ! अरे, ती सह्याद्रीच्या घाटांतून व शिवथर ओहोळाच्या दरडींतून खडखड आवाज करीत जाणारी खडावा आज मुकी झाली असें तुला वाटतें कीं काय ? शिवाजीची कृष्णा घोडी टप्टप् टापा टाकीनाशी झाली, कीं प्रतापगडची देवी वरप्रसाद देईनाशी झाली ? छे:, ह्यांतलें

कांहींएक नाहीं. ह्यांतलें कोणीहि आपलें व्रत सोडलें नाहीं, त्यांतल्या कोणीहि आपला स्वभावपालट केला नाहीं. तूं मात्र आपली स्वराज्याची शपथ मोडलीस, तूं मात्र आपली स्वराज्याची शपथ सोडलीस, तूं आपल्या स्वराज्यव्रतापासून ढळलास ! तें व्रत पुन्हां घे ! पुन्हां बाबुलनाथापुढें बस, पुन्हां रघुपतीपुढें हात जोड, त्यांच्यासमोर पश्चात्ताप कर, त्यांच्यादेखत, होय, त्यांच्यादेखत, शिवरायाच्या समाधीजी रक्षा उचल–त्यांच्यादेखत समर्थाचा खडावा अश्रूंनीं न्हाण ! हें प्रायश्चित घेतलेंस, डोळ्यांवाटे पातकें ओसरविलींस, पुन्हां शिवाजी–रामदासांशीं तन्मय झालास, तद्रूप झालास, तदाकार झालास, तर हें बघ तुझें स्वराज्य आणि मिरव तें मस्तकावर !

---

## कडवे बोल !

अस्पृश्य कोण ? राष्ट्रमातेच्या हितावर जे उठतात, तेच अस्पृश्य ! राष्ट्राचे मानेवर जे विश्वासघात करतात, तेच अस्पृश्य ! राष्ट्रांत अशा लोकांना अस्पृश्य माना आणि अशी अस्पृश्यता राष्ट्रांत न पसरेल अशी व्यवस्था करा.

ज्या लोकांनीं गरिबीशिवाय कोणताहि अपराध केलेला नाहीं, ज्या लोकांनीं लीनतेशिवाय कोणतीहि मनोवृत्ति धरलेली नाहीं, ज्या लोकांनीं स्पृश्य जातीकडे कधीं मान वर करून पाहिलेलें नाहीं, त्यांच्या अस्पृश्यतेची विटंबना नाहींशी करण्याचे दिवस आतां आले नाहींत काय ?

( युगांतर—१३ एप्रील १९२४. )

# * मराठी काव्याची प्रभात.

"घनःश्याम सुन्दरा, श्रीधरा । अरुणोदय झाला ॥
उठिं लवकरि वनमाळी । उदयाचळीं मित्र आला ॥"

मराठी कवितेसंबंधानें अलीकडे जे तंटे उपस्थित झालेले आहेत, ते पाहून कोणालाहि दुःख वाटल्यावांचून राहाणार नाहीं. महाराष्ट्रांतील लोकांचा मुख्य दोष कलह–प्रियता हा आहे, असें कित्येक वेळां दृष्टोत्पत्तीस आलें आहे. आणि मराठी कवितेसंबंधानें जेव्हां वाद उत्पन्न झालेला आपण पहातों त्यावेळीं ह्या कलहप्रियतेचीच आणखी एकदां ओळख पटते. वास्तविक पहातां "मवाळ" आणि "जहाल" असल्या पक्षांचा मराठी कवितेच्या सदनांत उच्चारसुद्धां होतां उपयोगी नाहीं. परंतु अलीकडील अनुभव अगदीं निराळा येत असून एकमेकांचा पाडाव करण्याची भावना मराठी काव्य–सदनांतहि इतकी प्रबल दिसते कीं, महाराष्ट्राच्या कलहप्रियतेची पाठच थोपटावी लागते. मराठी कवितेसंबंधानें जो वाद माजत चाललेला आहे, तो प्राचीन कवि चांगले, कीं अर्वाचीन कवि चांगले अशाबद्दल होय. वस्तुतः पहातां, प्राचीन आणि अर्वाचीन कवि हा वाद इतका क्षुल्लक आहे कीं, महाराष्ट्राशिवाय इतर ठिकाणीं तो कधीहि चिरडीवर जाणार नाहीं. परतु महाराष्ट्राचें भागधेयच असें आहे कीं, क्षुल्लक प्रश्न असला तरीहि त्यावर रणें माजून परस्परांत वितुष्ट उत्पन्न व्हावें. या वितुष्टाचें पर्यवसान एक तर सरसकट सर्व जुन्या कवींना शिव्या देण्यामध्यें होतें, अथवा उलट पक्षीं सर्व स्तुतीचा भर आधुनिक कवितेवर आदळून अलीकडील कवींसारखे कवि मागें झाले नाहींत आणि पुढें होणार नाहींत, इतक्या अप्रयोजक कोटीपर्यंत जातें. वास्तविक पहातां प्राचीन कवि आणि अर्वाचीन कवि हा भेदच अगोदर असमंजसपणाचा आहे. जो आजचा अर्वाचीन तोच उद्यांचा प्राचीन असें जर ढळढळीत आपल्या डोळ्यापुढें दिसत आहे, तर

* 'प्रभात' मासिक माहे जुलै १९१५.

कालाचा काल्पनिक पडदा उभा करून कविवर्गांत दोन तट उपस्थित करणें अत्यंत असमंजसपणाचें आहे. प्राचीन कवि आणि अर्वाचीन कवि, असे भेद जर कोणत्याहि एखाद्या विशिष्ट काव्यगुणांमुळें करावयाचे असतील तर तेंहि आवश्यक आहे; कारण त्यामुळें कित्येक अर्वाचीन कवींना प्राचीन म्हणावें लागेल, आणि प्राचीन कवींस अर्वाचीन ही पदवी लावावी लागेल. इतका हा भेद अनवश्यक व चमत्कारिक आहे आणि या भेदांत मराठी काव्याच्या खऱ्या हितचिंतकानें शिरूंच नये हें चांगलें.

कवितेचें खरें लक्षण म्हटलें म्हणजे, हृदयांतील तरंगाचें रूप व्यक्त करून दाखविणें होय. कवितेस ह्याशिवाय दुसरें कांहीं एक लागत नाहीं. कवितेस काल लागत नाहीं, चाल लागत नाहीं अथवा अलंकारांची शालही लागत नाहीं. "वाटुली पाहतां शीणले डोळुले" ही शब्दरचना किती साधी आहे ? परंतु ह्या साध्या शब्दप्रयोगांत जितकें काव्य भरलेलें आहे तितकें काव्य सामावण्यास कैसर बादशहाचें सर्व कल्पनासाम्राज्यहि पुरणार नाहीं. मानवी अंतःकरणाच्या किनखापी पिशव्या रसिक समाजापुढें भरभरून ओतून दाखविणें म्हणजेच काव्य, मग तें अर्वाचीनांनीं केलेलें असो अथवा प्राचीनांनीं केलेलें असो ! कविता करण्याचा अधिकार प्राचीनांना होता व अर्वाचीनांनाहि तो आहे. प्राचीनांनीं तो गाजविला आणि अर्वाचीनहि तो गाजवीत आहेत. ह्यांत कोणी कोणास हंसावयाचें अथवा कोणी कोणाची चेष्टा करावयाचें कांहींच कारण नाहीं. अर्वाचीन झाले तरी ते प्राचीनांचींच मुलेंलेंकरें आहेत व प्राचीन झाले तरी ते अर्वाचीनांचेच वडील आहेत. मग अमुक प्राचीन म्हणून त्यांचीच एकसारखी नांवाजणी, अथवा आम्ही अर्वाचीन म्हणून आपलीच एकसारखी प्रशंसा करण्यांत काय अर्थ आहे ? बापाला महामूर्ख म्हटल्यानें कोणताहि लेक शहाणा ठरत नाहीं. अथवा हल्लींच्या पिढीला कमी लेखल्यानें प्राचीन पिढीच्या नांवलौकिकांत भर पडते, अशांतलाहि भाग नाहीं. आम्हांला एवढेंच वाटतें कीं, प्राचीन—अर्वाचीन, गद्य—पद्य, अथवा समयक—नियमक असले वाद उकरून काढणें म्हणजे केवळ वाऱ्याशीं भांडत बसणें होय. कलहाग्नीनें चेतलेल्या ह्या महाराष्ट्र-

रूपी होमकुंडांत कवितादेवीच्या नेत्रज्वालांची भर पडण्याचें कांहींच कारण नाहीं. कवितादेवी म्हणजे कल्पना–कल्पवनांतील सुंदर गुलावाचें फूल आहे. तिला तिच्या दासांनीं रणकल्लोळापासून दूर ठेवावयास नको काय ?

अर्वाचीन कवींचा प्राचीन कवींवर असा एक मोठा आक्षेप आहे कीं त्यांनीं अध्यात्म विचाराचाच चुना घेऊन तो एकसारखा कुटला आहे. मुकुंदराज घ्या, दासोपंत घ्या, अध्यात्मविचार हा त्यांचा खरा विषय आणि ह्या विषयाच्या अनुषंगानें त्यांना जेवढी सुचेल तेवढी कविता ! अध्यात्मविचाराच्या शृंखलांनीं जखडलेलें असतां स्वतंत्र कल्पना सुचणें दुरापास्तच, तथापि त्यांतल्या त्यांत स्वतंत्र मनोभावनेची एखादी झुळुक लागली तर तेवढ्यापुरतेच प्राचीन वृत्त–जनिते ( Versifiers ) हे कवि ! नाहींतर खऱ्या कवितेच्या नांवानें त्यांचेजवळ आंवळ्याएवढें पूज्यच ! ही विचारसरणी उत्पन्न होण्यास खरोखर पुष्कळ कारणें घडलेलीं आहेत, आणि त्या सर्वांत मुख्य कारण हें कीं रम्यरमणीवर्णनाला ज्यांत स्थान नाहीं ती कधीं ‘ कविता ’च होऊं शकणार नाहीं, ही कल्पना होय. रमणी–वर्णनाची इतकी अनिवार तृष्णा अलीकडे कां उद्‌भवली असावी, ह्याचें कारण ठरवीत बसण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु अध्यात्मविचारांत कविता उत्पन्न होणार नाहीं, असें कधींहि म्हणतां यावयाचें नाहीं. अंतःकरणाची प्रत्येक स्फूर्ति ही कवितेस सर्वथैव लागू आहे, आणि भगवत्सेवेचा उमाळा जर खरोखर अंतःकरणांतून होत असला तर अध्यात्मविचार करणारे कवि हे कवि नव्हेत असें म्हणणें कोण्याहि “ कविपुंगवां ”स अशक्यच होईल.

प्राचीन कवींसंबंधानें एक मुख्य अडचण जी भासते ती ही कीं, त्यांतील बहुतेक कवि संस्कृत संस्कृतीच्या कडेवर बसलेलीं लेंकरें आहेत. संस्कृत संस्कृति ज्या कल्पना देईल त्या बोलावयाच्या, ती ज्या उपमा सुचवील त्या घ्यावयाच्या, ती जी तत्वविद्या शिकवील ती शिकावयाची आणि तिनें ज्या कथा संग्रहित केलेल्या असतील त्यांचेवर कवनें रचावयाचीं अशी बहुतेक प्राचीन कवींची रीति असल्यामुळें प्राचीन मराठी कवि हे संस्कृत कवि अथवा संस्कृत तत्वज्ञ ह्यांचेपासून वेगळे आहेत असें भास-

तच नाहीं. ज्याप्रमाणें एखाद्या स्त्रीस भेटावयास बोलावलें म्हणजे तिच्या बालकाला निराळें आमंत्रण द्यावें लागत नाहीं, त्याचप्रमाणें संस्कृत विद्या व ग्रंथभांडार ह्यांचा परिचय करून घेतला म्हणजे त्यांत नाविन्य वाटेनासें होतें. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तकाराम, वामन, मोरोपंत वगैरे महाकवींच्या काव्यांत शेंकडों नवीन दृष्टांत, शेंकडों नवीन रूपकें नाहींत असें नाहीं, परंतु ज्याप्रमाणें नेकटायबूट कितीहि चढविला आणि डोक्यास मात्र माभळभटी पागोटें घातलें तर मनुष्य जुन्या राहणीचाच ठरेल, त्याप्रमाणें मराठी महाकवींनीं संस्कृतवाङ्मयाच्या साखरभातांत नवीन कल्पनांचे कितीहि बदाम घातले, तथापि त्यांचें संस्कृताभिन्नत्व नाहींसें होत नाहीं. तुकारामाच्या कल्पना व उपमा वाचीत असतां आपण अगदीं भक्तिरसाच्या रंगांत यावें आणि तितक्यांत तीच उपमा व तोच दृष्टांत नामदेवांच्या काव्यांत आहे असें आढळल्याबरोबर ज्याप्रमाणें आपला पहिला आनंद नाहींसा होतो, त्याचप्रमाणें प्राचीन मराठी काव्यांवर आपण कितीहि डोलूं लागलों तथापि त्यांत संस्कृत कल्पनांचा सर्वव्यापी परिमल अनुभवास येऊं लागल्यावरोबर आपलें लक्ष मराठीवरून संस्कृत संस्कृतीकडे उडून जातें. शिवाय संस्कृत संस्कृतीचीहि गोष्ट घेतली तथापि त्यांत 'कविता' म्हणून एक औरच प्रकार आहे. ह्या प्रकाराचें जरी मराठी कवींनीं अनुकरण केलें असतें तरी आधुनिक कवींचें त्यांच्या कवित्वाबद्दल समाधान झालें असतें. परंतु तसें कांहीं एक न होतां ज्याअर्थी 'मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें,' अथवा 'नतावनधृतव्रतज्वलन तूंचि बाधावनीं,' असल्या प्रकारचें आधुनिक कल्पनांप्रमाणें रुक्ष कवित्व मराठी कवि करूं लागले तेव्हां आधुनिक कवींचा त्यांच्या विषयींचा आदर सर्वतोपरी ढांसळून 'हे हो कवी कसले ?' असा त्यांचेकडून प्रश्न होऊं लागला हें साहजिकच आहे.

संस्कृतांत वेदान्त अथवा 'घटपट' जरी हवे तितके असले, तथापि काव्याचाहि भरपूर पुरवठा आहे. संस्कृतांतील काव्याइतकें विपुल आणि विविध काव्य दुसऱ्या फारच थोड्या भाषांत असेल. संस्कृत काव्यांत कांहीं नाहीं असें नाहींच. संस्कृत काव्यांतील सुभाषितांचा भरणा पाहूनच एखाद्याला

संस्कृत भाषेविषयीं अत्यंत आदर वाटावयास लागेल. संस्कृत काव्यांत नाटकें आहेत, चम्पू आहेत, छेकापन्हुति आहेत, अन्तर्लापिका आहेत, बहिर्लापिका आहेत, भ्रमर आहेत, सखीजन आहेत, पान्थ आहेत, वसंत आहे, स्त्री-लावण्याचीं तर इतकीं तऱ्हेतऱ्हेचीं वर्णनें आहेत कीं तीं ऐकून खरोखर लोहपिष्ठ भक्षण करणाऱ्या तापसांचेंहि चित्त चलित होऊन जाईल ! संस्कृतांत इतिहास, पुराणें, गोष्टी तर अनंतच आहेत. ह्याखेरीज नुसतीं अध्यात्मपर जरी काव्यें हवीं असलीं, तथापि तीं संस्कृतांत मुळींच उणीं नाहींत. 'प्राप्ते संनिहिते मरणे' असल्यासारख्या खड्या तात्त्विक बोलांपुढें कबीर तरी काय करील अथवा तुकाराम तरी काय बोलेल ?

असलें विशाल संस्कृत वाङ्मय पाहिलें आणि त्याचेपुढें प्राचीन मराठी वाङ्मय तुलनेकरितां ठेवलें म्हणजे मराठी गिरा ही अजून कोमल कन्यका आहे व ती संस्कृत जननीच्याच स्तनांतील दुग्धपान करीत आहे, ह्याविषयीं आधुनिक कवींस तिळमात्र संशय वाटत नाहीं. प्राचीन मराठी कवि हे मुळीं कवीच नव्हते, संस्कृत काव्यसरोवरांतील जलांशाचे फवारे आपल्या मुखांतून सर्व महाराष्ट्रभर उडविणारे हे जलयंत्रद्वारें आहेत असें जें आधुनिक कवींना वाटतें तें ह्यामुळेंच होय. प्राचीन मराठी कवींनीं काय केलें ? तर जग हें नश्वर आहे कीं चिरस्थायी आहे, या सिद्धांताचा शोध लावला. परंतु अर्वाचीन कवि असें म्हणतात कीं, संस्कृत कालीं विद्वान लोकांच्या घरच्या साळुक्या-मैनासुद्धां 'जग हें ध्रुव आहे कीं अध्रुव आहे,' असा पक्ष-प्रतिपक्ष करीत असत तर त्यांत ज्ञानेश्वर-एकनाथांनीं असा कोणता पुरुषार्थ केला ? रामदासांनीं मोठ्या आवेशानें रामायणीय युद्धाचें वर्णन केलें असेल, परंतु संस्कृत काव्योदधींत जर अस्सल वाल्मिकी रामायणाचाच समावेश आहे तर त्यापुढें रामदासांच्या काव्याचा अट्टाहास कोण वाचील ? आधुनिक कवींचा मराठी प्राचीन कवींवर जो मुख्य आक्षेप आहे तो हाच कीं, मराठी कवि साधारणतः नीरस विषयच काव्याकरितां निवडतात आणि या विषयांतही ते आपली स्वतःची बुद्धि कांहींच चालवीत नसून, संस्कृत वाङ्मयाच्या अवाढव्य छत्राखालीं ते कोणत्या कोपऱ्यांत लपून बसलेले असतात तें दिसतहि नाहीं !

जे विषय आधुनिक कवींच्या काव्यांत येतात, ते विषय प्राचीन कवींच्या काव्यांत येत नव्हते हें प्रांजलपणें कबूल केलेंच पाहिजे. 'कोण्या वसंताचें?" 'कुणास्तव कुणींतरी', 'गुलाब', 'मधमाशीला', 'माझे झाडा', 'कन्यादान', असले विषय प्राचीन मराठी कवींत सांपडणें प्रायः अशक्य आहे. त्यांचे विषय म्हणजे ॐकारवर्णन, अनुभवामृत, अहिल्यास्तव, उमारमासंवाद, मनोबोध, मार्कण्डेयाख्यान, रुक्मिणीपत्रिका, आणि शृंगाराचा अतिरेकच झाल्यास रासक्रीडा, चंद्रावळी इत्यादि होत. ह्यांपैकीं एकहि विषय असा नाहीं कीं, जो आधुनिक कवि हौसेनें घेतील. आधुनिक कवींचेहि विषय असे नाहींत कीं, जे प्राचीन कवींनीं हौसेनें घेतले असते. 'छत्री'ला पाहून कोणाहि प्राचीन मराठी कवीची प्रतिभा उद्दीपित झालीच नसती. 'वीण्याची तुटलेली तार' पाहून कोणाहि प्राचीन मराठी कवीला आपल्या प्रतिभेची तार तोडण्याची बुद्धि झाली नसती. प्रचीन मराठी कवि आज हयात नाहींत म्हणूनच अर्वाचीन मराठी कवींस त्यांना अप्रतिबंधपणें शिव्या द्यावयास सांपडत आहेत. परंतु ते जर आज हयात असते, तर त्यांनींहि मराठी अर्वाचीन कवींची भयंकर निर्भर्त्सना केली असती. तुकाराम तर असेंच म्हणाला असता कीं, "सुपा–टोपलीचे कवि । आम्ही सुधा, हे काकवी ॥"

असला हा भयंकर विषयभेद व स्वभाव–परिच्छेद पाहून साधारण वाचकांचें मन खरोखरच भांबावून जातें आणि तो प्राचीन कवींचा तरी भाट अथवा अर्वाचीन कवींचा तरी अभिमानी बनतो. आपल्या महाराष्ट्र–वाङ्मयांत जे विनाकारण तट पडत चाललेले आहेत, व ज्यांचें पर्यवसान निःपक्षपातित्वाच्या वादविवादांत न होतां महाराष्ट्राच्या नेहमीच्या संवयीप्रमाणें द्वेष, मत्सर, विडम्बना, आणि विषदिग्ध भाषा ह्यांत होऊं लागलेलें आहे, त्यांच्या मुळाशीं प्राचीन कवि चांगले कीं अर्वाचीन कवि चांगले हें ठरविण्यांत झालेला मनाचा गोंधळ हेंच आहे. परंतु प्राचीन मराठी कवींचें विशिष्ट लक्षण पाहतांना ज्याप्रमाणें आपण संस्कृत संस्कृतीचा बळकट आश्रय हें त्यांचें मुख्य स्वरूप निवडून काढलें, त्याचप्रमाणें आर्वाचीन मराठी कवींचेंहि विशिष्ट लक्षण काय आहे हें पाहून त्यांचेंहि

खरें स्वरूप निवडून काढलें पाहिजे. त्या लक्षणाचा शोध करतांना आपल्या लक्षांत जी गोष्ट एकदम येते ती ही कीं, ज्याप्रमाणें प्राचीन मराठी कवी हे संस्कृतच्या कडेवरचीं अर्भकें होत, त्याप्रमाणें अर्वाचीन मराठी कवी हे आंग्ल संस्कृतीच्या कडेवरील अर्भकें आहेत. दोन्ही मुलेंच, दोन्हीहि दुग्ध-पान करणारीं, दोन्हीहि मातृभुजाश्रितच, दोन्हीहि स्वतंत्रपणें चालण्यास असमर्थच, परंतु ह्या दोहोंत एक मात्र ढळढळीत फरक असा आहे कीं, प्राचीन कवि हे आपल्या स्वतःच्या आईचे अंगावर दूध प्याले असल्यामुळें बाळसेदार, तजेलेदार, हूड, हंसरे असे होते. उलटपक्षीं, अर्वाचीन मराठी कवींना खऱ्या आईचें दूध कधींच न मिळाल्यामुळें त्यांच्यांत नैसर्गिक जोमदारपणा फारसा आढळून येत नाहीं. अर्वाचीन मराठी कवींची कविता त्रोटक असते व प्राचीन मराठी कवींची कविता दीर्घप्रवासी असते असें विधान कित्येक मार्मिक करीत असतात. हें विधान जितकें खुबीचें तितकेंच मनास पटणारेंहि आहे, तथापि त्याचें मर्म वर जें सांगितलें तेंच आहे. हल्लींचे मराठी कवि जी क्षुल्लक कविता रचीत असतात त्याचें कारण त्यांचा विनय नव्हे, तर त्यांच्या अंगांत प्राचीन मराठी कवींच्या इतकी रग नाहीं हेंच आहे. मोरो-पंतांची वाटेल तितकी टवाळी करा, तथापि प्रचंड रामकथेंत निरनिराळे व्यूह रचून, त्या व्यूहांतून एकशें आठ वेळां वाट काढण्याची हिंमत त्यांचे अंगीं होती, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. एकपत्नीव्रताची प्रौढी बाळगावी हें खरें आहे. पण ती कोणी? तर कृष्णाप्रमाणें सोळासहस्त्र अंगना करण्याची पात्रता असूनहि सीता नाहींशी झाल्याबरोबर ज्यांनीं "हा सीते! हा सीते!" अशा एकनिष्ठतेच्या विलापांनीं सर्व दंडकारण्य दणदणून सोडलें, त्या रघुकुलटिळकांनीं? क्षयाचा विकार झालेला आहे, दूध पचत नाहीं, डॉ. रावकडे सारखे खेटे चाललेले आहेत, (Bed-diet) शय्या–पथ्यावर सर्व जीविताची मदार आलेली आहे, अशा शेंदाड शिपायांनीं एकपत्नी–व्रताच्या लांब लांब गप्पा मारल्या म्हणून त्यांत फायदा कोणता?

अलीकडील कवींची स्थिति बरेच वेळां काडीपैलवानांच्या सारखी असते. ज्याप्रमाणें असले एखादे हाडूकबहाद्दर बाहेर ऐटीनें यावयास निघाले म्हणजे आपल्या शरीरांतील मांसलपणाची उणीव शिंप्यानें शिवलेल्या

पोषाखाच्या फुग्यानेंच भागवून नेतात, त्या वेळीं 'एक पाव शेट व तीन पाव दाढी' ही म्हण अगदीं सार्थ होते. अलीकडील अलंकारविभूषित मासिक पुस्तकें पहावीं, तों एखादें पान चित्रविचित्र वेलांनीं व पुष्पांनीं खच्चून गेलेलें असतें, व आंत एक लहानशी कविता उगीच कोठें टुकुटुकू करीत बसलेली दिसते. त्या वेळीं असें सहज मनांत येतें कीं, एवढया गुढघ्याएवढया न्हाणवलीला ह्या मासिक पुस्तककारानें एवढें मखर कशाला बांधलें आहे? परंतु कविता रचण्यापेक्षां त्या प्रसिद्ध करण्याचीच अलिकडील कवींना घाई असल्यामुळें कविराज जें चिटोरें अंगावर फेंकतील तेंच शिरसावंद्य मानून त्यालाच होईल तितक्या "उठावा"नें दाखविणें मासिक पुस्तककारांना भाग पडतें. अलीकडील कवितांत जो क्षुद्रपणा आढळतो त्याचें कारण हेंच कीं, कवींची काव्यप्रतिभा बऱ्याच अंतरापर्यंत अव्याहत सुरू राहील इतकी ती ताकदवान् नसते. अर्वाचीन कवींची स्फूर्ति म्हणजे विजेचें तळपणें अथवा काजव्याचें चमकणें होय. त्याच्यापासून सूर्यप्रकाशाच्या उज्ज्वल, स्थिर व चिरप्रभावी तेजाची अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

एका दृष्टीनें असें देखील म्हणतां येईल कीं, प्राचीन 'कवि' हि कवि नव्हेत. ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव अथवा तुकाराम ह्यांपैकीं कोणताहि कवि घ्या, ज्या दृष्टीनें कवि काव्यें रचतात तशी दृष्टि एकाहि कवीची नव्हती. 'काव्यें' रचण्यापेक्षां ह्या सर्व महापुरुषांचा फारच उदात्त उद्देश होता. त्यांना 'कालिदास' म्हणवून घेण्याची मुळींच हांव नव्हती. त्यांची मुख्य तृष्णा परमेश्वरानें आपणांस आपले "दास" म्हणावें एवढीच होती. त्यांना कालिदास म्हणून कोणी कितीहि मान दिला असता तथापि जर ईश्वरानें त्यांना आपलें म्हटलें नसतें तर त्यांच्या मनाचें समाधान झालें नसतें. अशा थोर बिभूतींना 'कवि' म्हणणें ही एका प्रकारें त्यांची योग्यता कमी करण्यासारखेंच आहे. ते तत्त्वज्ञ, धर्मकर्ते व समाजोद्धारक होते. ते समाजनियमाची गंगा होते. त्या गंगेंत लोकांना आपलीं पातकें, आपलीं दुःखें, आपले मनस्ताप बुडवून टाकण्याची परवानगी होती. परंतु आपली काव्यस्पृहाहि त्यांत खळबळून घ्यावी इतक्या हीन प्रतीचे ते नव्हते. ह्या थोर पुरुषांनीं आपले सर्व दिव्य उद्गार काव्यरूपांत काढलेले

आहेत हें खरें, तथापि त्यांचे काव्यरूपांतील उद्‌गार निघण्याचें कारण त्या वेळीं मराठी भाषेंत गद्य लिहिण्याची पद्धति फारशी नव्हती हेंच आहे. त्यांचे वेळीं जर अलीकडच्याप्रमाणें गद्य लिहिण्याची पद्धति असती तर ज्ञानेश्वरांनीं आपली "ज्ञानेश्वरी" व वामन पंडितांनीं आपली "यथार्थ-दीपिका" काव्यांत लिहिली असती कीं नाहीं हा प्रश्नच आहे. प्राचीन मराठी कवींपैकीं 'कवि' असे मुख्यतः फारच थोडे होते. बहुतकरून सर्व तत्वज्ञ, संत व साधुच फार होते. जगाला शिकविणें हा त्यांचा उद्देश होता, तें काव्यांतच शिकविणें हा हेतु त्यांच्या अंतःकरणापासून फारच दूर असेल !

प्राचीन कवींप्रमाणें अर्वाचीन कवींनाहि वास्तविक रीत्या "कवि" म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु प्राचीन कवींप्रमाणें ते तत्वज्ञ आहेत म्हणून त्यांना 'कवि,' म्हणावयाचें नाहीं असें नव्हे. तर 'कवि' म्हणवून घेण्या-इतका त्यांचेजवळ स्फूर्तीचा सांठाच नाहीं. अर्वाचीन कवींपैकीं बरेचसे कवि आंग्लोपजीवि आहेत हें वर सांगितलेंच आहे. त्यांचें बहुतेकांचें असें असतें कीं, इंग्रजी वाचतां वाचतां एखादा चांगला मजकूर ह्यांना आढळला तर ते लगेच तो कवितेंत आणण्याचा प्रयत्न करितात. परंतु इंग्रजी कवि जितकें ढोंचतील तेवढेंच पाऊल पुढे टाकावयाचें, हा अर्वाचीन कवींचा क्रम त्यांना काव्यकीर्तींत कितीसें अंतर पुढें नेणार ? अर्वाचीन कवीची कविता म्हणजे एखाद्या सुंदर पैठणीवर काढलेली जरीची बुट्टी आहे. ती लहान लहान प्रमाणांत सर्वत्र चमकत असावयाची. परंतु बुट्टी म्हणजे कांहीं पैठणी नव्हे. ती एकाद्या महावस्त्रावर सुंदर दिसते, परंतु ती स्वतः कांहीं महावस्त्राप्रमाणें नेसावसाच्या उपयोगी पडत नाहीं.

प्राचीन कवि इतर व्यावहारिक विषय जरी घेत नसले तथापि ते जे विषय घेत असत त्यांतच ते इतके तन्मय होत असत कीं त्यामुळें उत्पन्न झालेल्या मनःस्थितींतून काव्यनिर्झर उगम पावणें शक्य असे. आधुनिक कवींचें तसें नाहीं. आधुनिक कवि इतक्या आकुंचित, इतक्या भीरु, इतक्या असंद परिस्थितींत उत्पन्न झालेले आहेत कीं, त्यांच्या स्फूर्तीचीं बंधनें तटातट तुटून, ती स्वच्छंदपणें खिदळत जाईल असें शक्यच नाहीं. प्राचीन कवींना परमेश्वराचे गुण आठवून आनंदाच्या उकळ्या येत, त्यांना परमे-

श्वर भेटलासें वाटून त्याचें वर्णन केल्याशिवाय रहावत नसे, त्यांना भीम हा दुःशासनाचे उरावर बसलेला प्रत्यक्ष दिसे, अंबरीषाची स्थिति पाहून त्यांना खरीखुरी अनुकंपा उत्पन्न होई व भीष्माची निःपांडवी पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा ऐकून त्यांना खरोखर द्रौपदीइतकेंच भय वाटत असे. आपल्या भोंवतीं चाललेले प्रकार, आपल्या भोंवतीं चाललेले पराक्रम, आपल्या भोंवतीं चाललेला आक्रोश पाहून तिकडे प्राचीन मराठी कवींनीं कां लक्ष दिलें नाहीं, आणि अभिमन्यूचें प्रेत घेऊनच ते कां रतड बसले, हें पूर्णपणें समजणें खरोखर कठिण आहे. तथापि त्यांतील एक कारण वर सांगितलें तेंच होतें, म्हणजे हें कीं प्राचीन मराठी कवि खरे तत्त्वज्ञानी होते, कवि नव्हते. परंतु प्राचीन मराठी कवींची काव्यप्रतिभा उज्वलित होण्यास ईश्वराच्या " वेड्या वांकड्या " भक्तीचेंच कां होईना, पण सबळ कारण होतें. आधुनिक कवींच्या संबंधानें हेंहि कारण नाहीसें झालें, आणि " सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपुला बाप " असल्या प्रकारची नीरस, निर्बुद्ध, निपट व कळकटलेली कविता जन्म पावली. अर्वाचीन कवींची प्रतिभा जागृत व्हावयास प्रबल कारण तरी कोणतें आहे ? कविता उत्पन्न होण्यास अत्यंत तुफान अशी मनोवृत्ति उत्पन्न व्हावी लागते. प्राचीन कवींच्या समोर अफझुलखानाचा वध, राजारामाचा जिंजीवास, पानपतची लढाई, वगैरे वगैरे प्रसंग नित्यशः घडूनहि त्यांनीं त्याचेकड पाहिलें नाहीं हें खरें, तथापि सीतेचा वनवास, द्रौपदीचा अपमान अथवा अभिमन्यूचा चक्रव्यूह, इत्यादि प्रसंगहि सत्यवत् करण्याइतकी त्यांची मानसदृष्टि जबरी असल्यामुळें त्यांना उत्कट प्रसंगाची कधीं कमतरताच पडली नाहीं. परंतु सध्यांच्या शतकांत असे प्रसंग कोणते आहेत ? आतां ' भिलटी 'च्या बोरांवर तुमच्या हातून एक " ओलें " अक्षरहि निघावयाचें नाहीं. मराठे, रजपूत अथवा क्षत्रिय ह्यांच्या पराक्रमांनीं तुमचें चित्त थरारून जावयाचें नाहीं, कारण त्यांची तुह्माला माहिती नाहीं. मग तुह्मीं कविता रचणार कशावर ? नाण्यांच्या प्रश्नावर ? इनॉक्युलेशनवर ? शाळांच्या बक्षिससमारंभावर ? कर्झनसाहेबांनीं मिठाचा कर माफ केला त्यावर ? कीं मिंटो साहेबांनीं मॉर्लेचा खलिता आणला

त्याचेवर ? विषय नसतां कविता रचण्यास बसलेले कवि दहा पांच कड-व्यांच्या आंतच रडकुंडीला येतात ह्यांत कांहीं नवल नाहीं. मग त्यांची कविता इंग्रजी कवितांतून चोरलेल्या उष्ट्या कल्पनांवर, पहिल्याच बाळंत-पणांत आटपलेल्या क्षयरोगी "प्रिये" वर, अथवा दृष्टीपुढें जो कोणता विषय असेल—मग ती छत्री असो, दऊत असो, चहाचा कप असो अथवा तीन बत्तींची सिगारेट असो—तिच्यावर चालावयाची. काय हे कवि आणि काय त्यांची कविता !

प्राचीन कवि हे 'कवि' नव्हते कारण ते श्रेष्ठ तत्त्वज्ञानी होते, आणि अर्वाचीन कवि हे कवि नाहींत, कारण 'कवि' म्हणण्याइतकी त्यांची स्फूर्तिच नाहीं हें वर दाखविलेंच आहे. मग हा महाराष्ट्र-देश कवींवांचूनच सुना गेला काय ? असा प्रश्न सहाजिकच उपस्थित होईल. त्याचें एक उत्तर आम्हीं असें देतों कीं, ह्या महाराष्ट्र देशाचा नैसर्गिक स्वभावच असा आहे कीं येथें ( Sentimental ) भावनापीडित लोक उत्पन्न होत नाहींत. येथें सर्व रोखठोक हिशोबी काम. मुसलमानी अमदानींत कवितेला फार वाव होता, कारण त्यावेळचे इतिहास जर वाचले तर करुण प्रसंग त्यावेळीं फार उत्पन्न होत असत असें दिसतें. परंतु त्यावेळीं महाराष्ट्रांतील कवि रडगाणें लावीत बसले नाहींत. त्यांतील जे संत अथवा तत्वज्ञानी होते, ते मुसलमानी धर्मापासून हिंदुधर्माचा बचाव कसा करावा ह्या नादाला लागले व जे वीर अथवा राजकारणी होते ते मुसल-मानी सत्तेपासून स्वदेशाचा बचाव कसा करावा ह्या विचाराला लागले. ह्या दोहोंच्या झपाट्यांत रडण्याचे लांब लांब सूर काढणाऱ्या कवींना जागाच मिळाली नाहीं. तथापि महाराष्ट्रांत कवि झालेच नाहींत असें मात्र नाहीं. ज्यावेळीं मराठी राज्य स्थिरस्थावर होऊन लोकांच्या शृंगारवृत्ति थोड्याशा रंगल्या, ज्यावेळीं वैभवाची खूप भरती होऊन "पंचकल्याणि घोडा अबलक" घरोघर दिसूं लागले, त्यावेळीं भगवद्भक्त व वीर ( 'शूर' नव्हे, कारण ह्या महाराष्ट्रांतून शूर लोक कधीं नाहींसे झालेच नाहींत ) ह्यांच्या पिढ्या मोरोपंत व बाजीराव ह्यांचेबरोबर संपल्या आणि ज्यावेळीं

सक्त मेहनतीबरोबर सुखाचीही, थोडासा झुरका घेण्याइतकी ऐपत महाराष्ट्राचे अंगीं आली त्याचवेळीं महाराष्ट्रांत खरे 'मराठी' कवि निर्माण होऊं लागले. ह्या कवींपैकीं प्रमुख कवि म्हटले म्हणजे रामजोशी, अनंतफंदी, होनाजीबाळ, परशुराम, वगैरे होत. अमृतराय वगैरे कवींचीहि गणना ह्यांतच केली तरी चालेल, कारण हे थोडेबहुत दोन्ही पिढ्यांमधील आहेत. त्या कवींचा जो काल तीच खरी मराठी काव्याची प्रभात होय. त्या प्रभातीचें द्योतक ह्मणूनच कीं काय होनाजी बाळानें 'घनश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला' हें अत्यंत मधुर पद रचलेलें आहे.

मराठी काव्याच्या प्रभातकालाचे हे कवि अगदीं स्वतंत्र प्रतिभांचे आहेत. ह्यांचीं काव्यें वाचूं लागलें म्हणजे खरोखर पहांटेच्या गुलाबी थण्डींत समुद्रकिनारची गोड झुळूक उपभोगीत हिंडावयास गेल्याचा भास होतो. खरा 'कवी'चा पेशा त्यांचाच होता. 'काव्य' रचण्याचा संकल्प करूनच ह्यांनी आपले छंद रचले. हे स्वतःसहि 'कवि' म्हणवीत असत व एकमेकांच्याहि कवित्वकीर्तीची तारीफ करून 'कवन बहुत उदरामधिं भरलें फणस जसा मोठा कापा' असें त्यांचें फार मजेदार वर्णन केलेलें आहे. हे कवि संस्कृत संकृतीच्याहि पदराखालीं झांकले गेले नव्हते, आंग्ल संस्कृतीच्याहि कडेवरचें बाहुलें नव्हते व जें काय होतें तें त्यांचें स्वतःचें होतें. त्यांच्या कल्पना निराळ्या, त्यांचीं वृत्तें निराळीं, त्यांचे विषय निराळे, त्यांची हातोटी निराळी, त्यांचें सर्व निराळें होतें. खरी मराठी कविता काय ती ही होती. ह्यांनीं शृंगाराचीं वर्णनें केलीं म्हणजे महाराष्ट्रांतल्या लावण्यलतिकांचीं हीं वर्णनें आहेत असें चट्दिशीं मनाला पटतें, ह्यांनीं प्रेमविद्ध पुरुषांचीं केलेलीं वर्णनें ऐकलीं म्हणजे मराठे शिलेदार हुबेहुब डोळ्यांपुढें येऊन उभे रहातात. त्यांच्या कवितांनीं त्या वेळचा महाराष्ट्र कल्पनेपुढें चित्रित होतो. त्या वेळचे पराक्रम, त्या वेळचीं संकटें, त्या वेळचे दुर्धर प्रसंग, हे सर्व बरोबर रीतीनें त्यांच्याच कवितांनीं पुन्हां दिसावयास लागतात. त्या वेळचे सद्गुण, त्या वेळचे दुर्गुण, त्या वेळच्या चांगल्या चाली, त्या वेळच्या वाईट चाली, हें सर्व कांहींएक सत्यापलाप न करितां, आपणांस कळविणारे जर कोणी खरे जासूद असतील तर हेच

'कविराय' होत. 'सहज मनांमधीं आलें साजणी। कधीं स्वामीचा एकांत घडे ?॥ तों जासूदें येऊन सांगितलें मुक्काम गंगे अलीकडे॥' हें एका विरहिणीचें सोत्कंठ विचारप्रदर्शन जसा त्या वेळचा प्रेममय पण मर्द तरुण वर्ग वाचकांच्या दृष्टीसमोर उभा करतो, त्यापुढें हल्लींचे सेकंड क्लासांत बसून प्रियकरणीची शाल सांवरणारे प्रेमवीर लुंगेसुंगे दिसूं लागतात. महाराष्ट्राची प्रथमपासून जर एखाद्या गुणाबद्दल प्रसिद्धि असेल, तर ती मर्दपणाबद्दल आहे. दक्षिणचा घोडेस्वार पुरातन कालापासून शूरांच्या कर्णपथावर आपल्या घोड्यांच्या टापा घालवीत आलेला आहे. असा शिलेदार जेव्हां कोठें तरी तरवार गाजवून आपल्या प्रियकरणीला भेटावयास घाईघाईनें कूच करीत जात असेल तेव्हां शृंगाररसाला आलेलें भरतें, तो काय तो खरा 'मराठा' शृंगार! नाहींतर मिस्टरना डिस्पेप्शिया झालेला व मिसेस्चीं गालफडें बसलेलीं, अशा स्थितींत कॉलेजमध्यें शिकलेले रोमिओ आणि ज्युलिएटचे अथवा पुंडलीक-महाश्वेतेचे शृंगार जबरदस्तीनें आठवून एखाद्या मासिकाकरितां मुद्दाम दळलेली माकडचेष्टा हा कसला शृंगार? पन्नास पड्यांवर एखाद्या फर्ममध्यें खरडेघांशी करतां करतां कंबरेचे टांके ढिले झालेले 'प्राणपति,' व चाळीमध्यें जुनेर नेसून नळाचें पाणी भरतां भरतां नको जीव झालेली "प्राणसखी" ह्यांच्या शृंगारांत स्वाभाविकपणा तो काय येणार? व रसोत्पत्ति तरी कशी होणार?

संस्कृत कविता अतिशय ढंगवाली कविता आहे, हें मागें सांगितलेंच आहे. संस्कृत कवितेमध्यें जितकी विविधता आहे तितकी दुसऱ्या कोणत्याहि काव्यांत असेल कीं नाहीं हेंहि मागें सुचविण्यांत आलेलेंच आहे. परंतु संस्कृत कवितेंतील हे सर्व रंग मराठी काव्याच्या प्रभातकालीं मराठी कवितेंत येत चाललेले होते. त्या प्रभाताच्या पुढें जर लगेच दिवस वरवर येत गेला असता तर पेशवाईपासून आजपर्यंत गेलेल्या शंभर वर्षांत मराठी काव्यानें बहार करून सोडली असती, ही आम्हांस पक्की खात्री आहे. परंत एकोणीसावे शतकांत जो एक ट्रॅन्स्फर सीन झाला व समाजस्थितींत जो एकदम पालट पडला त्याच्या योगानें नुकतीच पल्लव फुटत चाललेली मराठी कविता एकदम "सत्य सदा बोलावें, सांगे गुरु आणि आपुला बाप"

असल्या वृत्तांवर येऊन बसली. ही मराठी कविता पूर्वीप्रमाणें विठ्ठलाचे पायांवर जरी पडली असती तरी एव्हांना शापमुक्त होऊनहि गेली असती: परंतु आतां त्याबद्दल विचार करून काय उपयोग? सध्यां हातांतल्या "काठी" वरच्या कविता नशिबीं आलेल्या आहेत त्या खऱ्या!

मराठीचे आद्य वाङमयाचार्य "कवि" न वसतां लोकोद्धारकर्ते होऊन गेले याबद्दल आम्हांस अत्यंत अभिमान वाटतो. लोकोद्धाराचें कार्य पुढें उभें राहिलें असतां काव्यरचना सुचणें हें अधःपाताचेंच लक्षण होय, आणि मराठी राष्ट्राच्या ऐन सुरवातीस त्यास जो गडबडीचा काळ आला, त्या वेळीं लोकोद्धाराचें पवित्र कार्य टाकून जर आमचे ज्ञानोबा, आमचे एकनाथ, व आमचे तुकाराम "मम जिवाची प्रियकरणी" करीत बसले असते तर राष्ट्राची भयंकर हानि झाली असती ह्यांत संशय नाहीं. एकनाथ, तुकाराम, ज्ञानेश्वर ह्यांना हातांतल्या काठीवर अथवा एखाद्या तरण्या ताठीवर कविता करतां आली नसती असें जर कोणाचें म्हणणें असेल तर ती चूक आहे. कारण ज्या महापुरुषांना अध्यात्मासारख्या गूढ विषयावर सुद्धां छंदोरचना करून वाचकांचें अंतःकरण गद्‌गद् हालवितां आलें, त्यांना जोरानें वहाणाऱ्या ओढ्यावर अथवा मुसळधार ओतणाऱ्या सरीवर काव्य करतां आलें नसतें असें म्हणणें अत्यंत असमंजसपणाचें आहे. हे गूढज्ञानाचे दीप, हे राष्ट्रकर्तव्यांचे मेरुमणि, हे अगाध विश्वप्रेमाचे सागर, कवितांची जुळणी करूं शकले नसते असें कसें म्हणतां येईल? परंतु 'कवि' होण्यापेक्षां फार उदात्त कर्तव्यक्षेत्र त्यांनीं आपलेपुढे ठेवलें. त्यांनीं राष्ट्राचा संसार अंगावर घेतला. त्यांनीं राष्ट्राची चिंता पाठीवर वाहिली. ह्यांच्यापुढें कवींचें अल्पतेज तें किती? कवि हे कितीहि थोर असले तथापि ते राष्ट्राचे अलंकार होत, राष्ट्राचे प्राण नव्हत हें कबूल केलेंच पाहिजे. विचारकर्ते, उद्धारकर्ते, सुस्थितिकर्ते हे देशाचे प्राण होत. आमचे ज्ञानेश्वर, तुकाराम ह्याच कोटीपैकीं होते. राष्ट्र आपल्या पायांवर उभें असलें म्हणजे त्यास अलंकार जास्त शोभा देत असतात परंतु राष्ट्रास अलंकार चढविणाऱ्यांपेक्षां राष्ट्रास त्याच्या पायांवर उभे करणारे महात्मे हे निःसंशय श्रेष्ठ ठरलेच पाहिजेत. शेक्सपियरसंबंधीं इंग्लंडमधील

लोकांना अत्यंत अभिमान आहे. एकानें एकदां असेंहि म्हटलेलें होतें कीं, प्रसंग आला तर आम्ही आपलें साम्राज्यसुद्धां गमावूं परंतु आपला शेक्सपीअर कधींहि गमावणार नाहीं. शांततेच्या वेळच्या त्या गर्वोक्ति किती बेजबावदारीच्या असतात हें सध्यांच्या प्रसंगीं उत्तम रीतीनें दिसून येणार आहे. सध्यां इंग्लंडचे लोकांना जर असा प्रश्न विचारला, कीं बोला, तुम्हांला तुमचा शेक्सपिअर–मिल्टन पाहिजे कीं लॉर्ड किचनेर आणि लॉईड जॉर्ज पाहिजेत तर ते म्हणतील कीं पहिली जोडी जरी आणखी दोन शतकांनीं आम्हांला मिळाली तरी हरकत नाहीं, परंतु आमचे किच्नेर व लॉईड जॉर्ज ह्यांना आमचेपासून दूर नेऊं नका. उद्यां जर्मन लोकांच्या तीस मैली तोफा सुटूं लागल्या असतां त्यांचेपुढें जर रोमिओ आणि ज्यूलियटच्या पुस्तकांची रास घातली तर शत्रु पळून जाईल काय ? अशा वेळीं शेक्सपिअर काय उपयोगी पडेल ? अशा वेळीं लॉइड जॉर्ज व किचनेरच उपयोगी पडतील व त्यांच्या बत्तीस मैली तोफाच शत्रूंचें धाबें दणाणून टाकतील. कविश्रेष्ठ झाले म्हणून त्यांच्या गुणांची अतिशयोक्ति गाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कवि हे नाकांतील नथा आहेत, खुद्द नाक नव्हेत. राष्ट्रकर्ते पुरुष हेच राष्ट्राचे नाक होत आणि ज्या राष्ट्रांत राष्ट्रकर्ते पुरुष जास्त उत्पन्न होतात त्याच राष्ट्राचें नाक वरती रहातें. आम्हास अत्यंत अभिमान वाटतो कीं, महाराष्ट्राच्या संकटयुगांत तुकाराम–ज्ञानदेव–रामदासादिकांनीं राष्ट्रोद्धार करण्याचा विडा उचलला, ‘ कवि ’ म्हणवून घेण्याचा अट्टाहास केला नाहीं. त्यांच्या हातून काव्य निर्माण झालेंच असेल तर तें सहज लीलेनें झालें; हेतुपूर्वक झालें नाहीं. ते ज्ञानी ह्या अर्थानें ‘ कवि ’ होत, काव्य–विरचक ह्या अर्थानें कवि नव्हते. महाराष्ट्राचे खरे कवि, रामजोशी–परशुराम–अनंतफंदी इत्यादिक होत. त्या प्रभाताचा अजून दिवस व्हावयाचा आहे. अजून महाराष्ट्राचा कीर्ति–सूर्य मध्यान्हीं चढावयाचा आहे, त्या कीर्तिसूर्यास आम्हीं आगाऊच वंदन करतों व अशी अपेक्षा करतों कीं—

‘ ध्वान्तं क्वापि निलीनमम्बरमणिर्व्योमाग्रमारोहति । ’

# * सौ. वत्सलावहिनींचें पत्र.

[ खालील पत्र सौ. वत्सलावहिनी ह्यांनीं त्यांचे ‘ संदेशभावजी ’ यांजकडे पाठविलें होतें, तें ह्या महाराष्ट्र–मंगल–मालेसाठीं त्यांच्या परवानगीनें आम्ही प्रसिद्ध करीत आहोंत. ]

॥ श्री ॥

रा. रा. ‘ **सन्देश** ’ भावजी यांस:—

भावजी, काय सांगूं तुम्हांला ? अलीकडे ज्याच्या त्याच्या तोंडीं पहावं, तों आपला बायकांचा प्रश्न ! हरविलास शारदा ह्यांचा कायदा बायकांच्याकरितां. डॉ. गौर ह्यांचें बील बायकांच्या करितां. श्री. जयकरांचीं भाषणें बायकांच्या करितां. मुंबईतली परिषद बायकांच्या करितां. बाई, बाई बाई ! काय ही पुरुषांना आम्हां बायकांची काळजी ! खरोखर भावजी, इतकी काळजी पाहून जीव कसा गुदमरून जातो. एवढे महात्मा गांधी ना ? पण ते सुद्धां आमच्या बायकांच्याकाळजींत सांपडलेले !

इतके दिवस बायका कधीं स्वयंसेवकांच्या पलटणींत शिरलेल्या ऐकल्या होत्या का तुम्हीं ? आम्हीं बाई कधीं ऐकल्या नव्हत्या. आमच्या वेळीं, भावजी, हें नव्हतंच ! पण गांधींच्या चळवळींत स्वयंसेवकांच्या पलटणींमध्यें बायकांचा पहिला नंबर. पर्वां कॉंग्रेस भरली त्यावेळीं जितकी पुरुषांचीं पलटणं, तितकींच बायकांचीं पलटणं ! भावजी, ह्या कायदेभंगाकरितां महात्मा गान्धींनीं स्वयंसेवकांचीं सैन्यें उभारलेली आहेत ना ? त्यांतहि पुरुषांच्या बरोबरीनं बायकांना शिरायचा उपदेश चाललाय. आणि बायकाहि झपाट्यानं ह्यांत शिरताहेत. आतां तुम्ही म्हणाल कीं, बायका म्हणजे अमुक एका गोष्टींत मागें आहेत—तर तसं नाहीं हो भावजी. त्या अगदीं पुरुषांच्या पावलांवर पावलं ठेवून चालल्या आहेत. मी तर म्हणतें कीं सध्यां कोणतीहि गोष्ट घ्या, त्यांत आपला बायकांचा पाय पुढं. पूर्वी बायका वरातींत पुढें होत्या व कथापुराणांत मागें बसत होत्या पण आतां

* महाराष्ट्र–मंगलमाला. १ मार्च १९३०.

बायका चोहोंकडे पुढेंच. त्या सभातनं पुढें, कथापुराणांतनं पुढें, नाटकांत पुढें, ए वढी सरकारची ट्रामगाडी ना ? पण ट्रामगाडींत सुद्धां, त्या पुरुषांच्या पुढें.

एक काळ भावजी ! असा होता कीं, बायकांच्या संबंधानं एखाददुसऱ्या पुरुषालाच काय ती कळकळ असे, बाकीच्या पुरुषांच्या ध्यानीं मनींहि बायका म्हणून कुणी आहेत असं नसे. मला पक्कें आठवतें भावजी, आमच्या वेळीं बायकांच्या संबंधानें विशेष लिहायचं म्हणजे कोणी ? तर आगरकरांनीं; पण आपल्यांतले अगदीं शहाणेसुरते लोकसुद्धां त्यांना हंसत. म्हणे त्यांनीं आपल्या शहाणपणाचा टेंभा काय पाजळला ? तर बायकांना शिक्षण कां देत नाहीं ? जणूं कांहीं ह्याशिवाय त्यांना ल्याहायला विषयच नाहींत. अहो, तुम्हांला ल्याहायची हौस आहे, तर नाण्यांच्या प्रश्नांवर लिहा, " औद्योगिक प्रगति "—( बाई, बाई, बाई, केवढा तरी हा अगडबंब शब्द ! ) वर लिहा. जमीन–महसुलाच्या धोरणावर लिहा. स्वदेशी कापडाच्या करावर लिहा. आणि लिहितांना ग्रीस, रोम, स्पेन्सर, मिल्ल, शेक्सपिअर, सिसरो, तुर्कस्थान, रशिया असे मोठमोठे शब्द तुमच्या लिखाणांत आणा ! बायकांचं शिक्षण—इश्श मेलं. ह्याच्यावर कसलं लिहितां ? म्हणतात ना—बायकांत पुरुष लांबोडा, त्यांतलीच गत ही !

आगरकरांना–हो–विसरलेंच–त्यांच्या पूर्वीं विष्णुशास्त्री पण्डित म्हणून होते–फार प्रसिद्ध होते हो त्यावेळीं–म्हणजे हल्लीं जसे चिंतामणराव वद्य प्रसिद्ध आहेत, किंवा तुमचं देव भलं करो, डॉ. मुंजे प्रसिद्ध आहेत, तसे एके वेळीं ते प्रसिद्ध होते–तेहि बायकांच्या सम्बन्धानें पुष्कळ लिहीत असत ! पण त्यांना किंवा आगरकरांना लोक काय म्हणत ? बायकी लेखक ! नेहमीं हे बायकांच्या संबंधानें लिहायचे किंवा बोलावयाचे. आगरकरांचे सगळे विषय–आणि मी म्हणतें भावजी, कीं सगळे नसले, तरी निम्म्याहून अधिक विषय तरी बायकांच्या संबंधानेंच होते हो ! बायकांनीं अनवाणी चालावं कीं पायांत जोडा घालून चालावं ह्यावर सुद्धां त्यांनीं लिहिलं आणि मग लोक जे हंसायला लागले म्हणतां, कीं विचारूं नका. किती मजा झाली भावजी त्यावेळीं. मी देखील भावजी, त्या दिवशीं खूप हंसलें. आतां कित्ती मला त्याचं वाईट वाटतं. आणि मला चांगलं आठवतं कीं

ह्याबद्दल माझ्यावर त्या दिवशीं रागावणं देखील झालं. तिकडचा स्वभाव तुम्हांला माहितच आहे भावजी. थोरामोठ्यांची थट्टा केलेली एवढी देखील खपायची नाहीं. त्यांतनं आगरकर म्हणजे काय ? तिकडे अगदीं देव! त्यांना हंसलेलं तिकडे कुठें खपायला ?

कर्व्यांनीं तर कमालच केली. आगरकरांनीं नुसतं बायकांच्यासाठीं लिहिलं. त्याकरितां एकादी संस्था वगैरे कांहीं त्यांनीं काढिली नाहीं. बाकी संस्था काढण्याइतकं त्यांना आयुष्य कुठं होतं म्हणा. अगोदर महाराष्ट्रांतल्या लोकांना आयुष्य कमी; आणि त्यांतनं विष्णुशास्त्री चिपळूणकर, वामनराव आपटे, आगरकर, गडकरी, जनार्दन विनायक ओक, बालकवि, कुळकर्णी वगैरे मंडळींना फारच थोडं आयुष्य. म्हणजे लोकांनीं त्यांना कुठं पाहिलं न पाहिलं, तोंच ते मावळले! अन् भावजी, लोकांची हौस फिटली. एखादा सण जसा येतो कीं नाहीं ? आणि जरा कुठं जेवणं खाणं होतात न होतात, तोंच तो मावळतो—संक्रान्तीचंच घ्या ना. अगदीं अस्संच होतं.—शाळू दिवस, तो मुळीं पुरतच नाहीं,— तर मी म्हणतें कीं आज देखील ह्या सगळ्या मंडळीला—तसंच मी म्हणतें कीं, लो. टिळक, ना. जोशी, वासुदेवशास्त्री खरे, भाऊशास्त्री लेले, गजाननराव वैद्य, राजवाडे, नाथमाधव, सीताराम केशव दामले वगैरे मंडळींना असायला काय हरकत होती ? तस्सं ह्या मंडळीचं झालं! लेडबीटर म्हणे ८२ वर्षं वयाचे आहेत—आणि तस्संच जर बघितलं, तर चांगलीं टुणटणीत आहेत हीं सारीं. आमच्यांत आगरकर, टिळक, गोखले असते, तर कदाचित् ह्यांच्याहिपेक्षां लहानच असते. पण ह्यातारें माणूस टिकतें आहे कुठें आपल्या देशांत ? आपल्या देशांत लगीनघाई आणि मरणाची पण घाईच. मी तर म्हणतें कीं, आपल्या ह्या महाराष्ट्रांत लगीनघाईपेक्षां मरणघाईच जास्ती. किती दुःखाची गोष्ट बरं ही! मला किनई हें अस्सं आठवलं, म्हणजे रडूं कोसळतं भावजी. पण करायचं काय ? अल्पायुष्याचा रोग आपल्या देशाच्या मागचा सुटेल तेव्हां ना ?

हो, खरेंच काय लिहीत होतें मी ? हां! आगरकरांच्या मागें कर्वे झाले, आणि त्यांनीं बायकांच्या प्रश्नाला आपलें सारें आयुष्य वाहिलें.

कर्व्यांचें हें चरित्र म्हणजे किती पुण्यवान आहे भावजी ! हजारों मुली त्यांच्यामुळें सन्मार्गाला लागल्या 'अन्' त्या सगळ्या सुखानें नांदताहेत. ह्या सगळयांचे आशीर्वाद मिळाले असतील त्यांना. खरोखर कर्व्यांना पाहयलं म्हणजे मला पूर्वीच्या वसिष्ठ—वाल्मीकींची आठवण होते. आणि पूर्वीचे ऋषी हिन्दुस्थानांतून अजूनहि कांहीं नाहींसे झाले नाहींत, असें वाटतें. शिवाय, भावजी ! वसिष्ठवाल्मीकींच्या प्रमाणें कर्व्यांनीं अलीकडें दाढीहि वाढविलेली आहे. त्यांचा फोटो मी त्यांच्या चिरंजीवांच्या जवळ पाहयला ! 'इश्श ! आण्णांना ही दाढी कधीं आली ?' मी मनांत म्हटलें आणि अण्णांनीं ही दाढी कशासाठीं वाढविली ? पण कांहीं म्हणा भावजी, ही दाढी देखील त्यांना त्यांच्या "आश्रमा" प्रमाणेंच शोभते हो ! आतां किनई, हे आपले वाल्मीकी चीन, जपान, कोरिया, अमेरिका वगैरे नवखंड पृथ्वी फिरून, तिथून आपल्या आश्रमाला मदत आणणार आहेत ! किती अचाट उद्योग हा ! आणि केवढ्या मोठ्या वयांत ?

पण आतां कर्वे देखील मागें पडतील, इतकी बायकांच्या विषयींची काळजी सर्वांना लागलेली आहे. अहो जवाहिरलाल नेहरू म्हणजे सर्वांत नवतर आणि लहान ! पण त्यांच्याहि भाषणांतनं बायकांची काळजी दिसून येते! परवां ते मुम्बईंत आले ना ? त्या वेळीं मला वाटतें कीं प्रत्येक भाषणांत ते बायकांच्या विषयीं बोलले. त्यांनीं त्या दिवशीं काँग्रेस हाऊसमध्यें किती उत्तम उपदेश केला म्हणतां ? तो ऐकतांना आमच्यापैकीं प्रत्येक जणीला गहिंवर आला व असें वाटलं कीं, घरसंसार सर्व सोडावा आणि स्वातंत्र्य—सैन्यांत जाऊन उभें राहावें !

भावजी, मला किनई ह्यासंबंधानं पुष्कळ बोलायचं आहे. अलिकडें बायकांच्या विषयीं प्रत्येकाला आलेला उमाळा हा कांहीं चांगला नाहीं ! आणि कांहीं कांहीं पुरुषांचं आणि बायकांचं वागणं—इश्श ! चांगलं का तें ? मला तर तें अगदीं नापसंत आहे ! तरी पण भावजी, बायकांच्या कळकळीची आलेली एवढी लाट, ही कांहीं सामान्य आहे असं समजूं नका व ही कारणाशिवाय आली आहे, असंहि पण नाहीं बरं का ! परमेश्वराचा दरबार भावजी, अगदीं न्यायाचा असतो. त्यांत कोणतीहि

गोष्ट विनाकारण घडत नाहीं. जी जी गोष्ट घडते, त्यांत सृष्टीचा कांहीं तरी हेतु असतो ! मी तर म्हणतें कीं पुढं कांहींतरी चांगलं व्हायचं असेल, ह्मणून बायकांच्या विषयींच्या कळकळीची ही लाट आलेली आहे ! जसा पुढं श्रीकृष्ण व्हायचा म्हणून अगोदर माया उत्पन्न झाली, अथवा श्रीशिवाजीमहाराज जन्माला यायचे, त्याचे अगोदर श्रीभवानी अवतरली त्याप्रमाणं भावजी, लौकरच हिंदुस्थानला स्वराज्य लाभणार, ह्याची ही शुभ शकुनवंती आहे ! मी तर भावजी, बायकांच्या प्रश्नाच्या ह्या लाटेला ' जयभवानी ' च समजतें, व भवानीमातेला हळदकुंकू वाहून असं विनवितें कीं, ' जय भवानी ! आमचे अपराध पोटांत घाल, आमच्यावर कृपा कर, आणि जसे अमेरिकन, जपानी, इटालियन, इंग्रज हे आपापल्या देशांत स्वतंत्र आहेत, तसे जय भवानी ! आह्मांलाहि आमच्या देशांत स्वतंत्र कर ! तूं असें करशील तर आह्मीं हिंदुस्थानांतल्या सर्व बायका तुझा नवरात्राचा उत्सव करूं व देवी भवानी ! खणांनारळांनीं तुझी ओटी भरून तुझा कीर्ति–नगारा वाजवूं !'

आपली,

**सौ. वत्सला वहिनी.**

---

## महाराष्ट्राची जबाबदारी !

महाराष्ट्राचा ज्ञानेश्वर म्हणजे तुम्ही कोण समजतां ? तिकडे व्यासांनीं देह ठेवला, आणि इकडे ते ज्ञानेश्वर बनले ! तिकडे शुकाचार्यांनीं समाधि लावली आणि इकडे तुकाराम अवतरले, तिकडे अर्जुनानें शस्त्रसंन्यास केला आणि इकडे श्रीशिवप्रभूंची बालमूर्ति आपल्या काळ्या घोड्यावर एटीनें बसली. हिंदुस्थानच्या इतिहासांत महाराष्ट्राचें जर एखादें कार्य असेल, महाराष्ट्राचें जर एखादें अवतारकृत्य असेल, महाराष्ट्राचें जर एखादें मिशन असेल तर तें हें आहे. हिंदुस्थानचा इतिहास पुढें चालविणें ही महाराष्ट्राची जबाबदारी आहे, ही महाराष्ट्राची कामगिरी आहे.

युगांतर—ता. ३० मार्च १९२४.

# * मुण्डावळी बांधून बसले !

रा. रा. संदेशभावजी ह्यांसः—

दिवाळी जवळ आली म्हणजे सोंगट्यांचे डाव सुचावे हें बरोबरच आहे. दिवाळी म्हणजे खेळण्याचा दिवस ! सगळा आनंद करायचा तो दिवाळींत करावयाचा. अमुक एक करावं, तमुक तऱ्हेनें मन रमवावें, असं जें कांहीं मनांत सांचून राहृयलं असेल, तें सगळें दिवाळीच्या वेळीं साधून घ्यायचं ! स्वतःकरितां कांहीं करायचं असलं तरी तें दिवाळीच्या दिवशीं, स्नेही, इष्ट, मित्र, संबंधी, आप्त, ह्यांना भेटी परतभेटी द्यायच्या असल्या तरी त्या दिवाळीच्याच दिवशीं, जांवई यायचा असला तरी तो दिवाळीच्याच दिवशीं, भाऊ भेटायला यायचा असला तरी तो दिवाळीच्याच दिवशीं, असं सगळं दिवाळीच्या दिवशीं करण्याची आमच्यांत रीत पडलेली आहे. भावजी, लक्ष्मीपूजन हें आपलं धार्मिक अर्चनाला एक नांव आहे झालं, पण खरं म्हटलं म्हणजे, त्या दिवशीं प्रेमळ पति आपल्या हृदयलक्ष्मीचें कसं पूजन करावं, ह्याच लाडक्या चिंतेंत असतो, आणि प्रेमळ पत्नीहि पण आपल्या हृदयस्वामीचं पूजन कसं करावं ह्याच गोड फिकीरींत असते. मिळून काय, भावजी, कुणीकडनं घेतलं तरी तें लक्ष्मीपूजनच ! आणि त्यांत जर का नवीन लग्न झालेलं असलं, तर मग, तर कांहीं पुसूंच नका ! ब्रम्हानंदच तो ! स्वर्गसुखच तें ! पण त्याला स्वर्गसुख तरी म्हणायचं कसं ? भावजी, नवीन लग्नाचा जो कांहीं आनंद आहे, त्याला स्वर्ग-सुखाची सुद्धां कांहींच उपमा नाहीं. तो आनंद कुणाला वर्णनच करतां यायचा नाहीं. कालिदास त्यापुढें थकतील, मोरोपंत त्यापुढें टेंकीस येतील, बेहरे ह्यापुढें हात टेंकतील, फार काय सांगावं भावजी, गडकऱ्यांच्या पुण्याचा सुद्धां तिथें कांहीं प्रभाव चालायचा नाहीं.

यंदाची दिवाळी, भावजी, फार मौजेची व्हावयाची आहे. यंदाच्या दिवाळ-सणाकरितां सहा नवरे मुलगे मुण्डावळी बांधून बसलेले आहेत. पहिला

---

* संदेश ता. २४ सप्टेंबर १९१६.

नवरा मुलगा–भावजी, सांगूं ना त्याचं नांव ? नाहींतर रागवाल माझ्याघर ! तुम्हीं म्हणाल, एवढे दादासाहेब करंदीकर आणि त्यांना मी एकवचनी शब्द लावतें हें काय ? पण भावजी, लग्नाचा प्रतापच असा आहे कीं माणूस मुण्डावळ बांधून बसला कीं तो एकवचनी झालाच, मग तो साठ वर्षांचा असो कीं अठरा वर्षांचा शिकणारा मुलगा असो, दोघेहि नवरे मुलगेच, एकाच 'ग्रेड' चे ! एकाच 'रांके' चे ! तिथें, भावजी, दादा करंदीकर नाहीं, जुवेकर नाहीं न् कुणीं नाहीं ! आजच पहाना, कुठें दादा करंदीकर, कुठें उपासनी, कुठें हरिभाऊ आपटे, कुठें पाटणकर, कुठें धुळेकर, पण आज सारे एका पंक्तींत उभे आहेत. इतर वेळीं कुणाच्यासमोर कुणाची गोष्ट काढायची सोय नाहीं ! प्रत्येकजण आपल्याच गुणांवर भर देत बसलेला असेल ! दादासाहेब म्हणत असतील, हा हरिभाऊ लिहीत असेल यमीची न् ठमीची गोष्ट ! पण कोर्टांत साक्षीदारांना रडवावें अस्मादिकांनींच ! एकदां एक मी मी म्हणणारा ऑफिसर साक्षीच्या पिंजऱ्यांत उभा राहिलेला होता ! पण म्हटलं, बच्चाजी ! जातां कुठं ? दादासाहेब करंदीकरांशीं गांठ आहे समजलांत ! आणि शेवटीं तस्सं झालं ! त्याची जी फें फें उडाली ती कांहींच्या बाहींच ! हरिभाऊ म्हणत असतील कीं कोर्टांत खेटे घालण्यानं कुठं नामदारी नसते मिळत ! त्याला डोकं लागतं डोकं ! वकीलीचा म्हणजे 'पेटी फ्लॉगिंग' चा धंदा ! वकील आणि ठाकुरद्वारचा भिक्षुक सारखाच ! कुणाचं श्राद्धपक्ष कुठं आहे इकडे सारा डोळा ! मग कुणाचा बाप नि कुणाची आई असली तरी मंत्र म्हणायला तयारीच. माझ्या मनांत असतं तर मी नसतों कां वकील झालों ? पण म्हटलं ही हमालकी जन्मभर करायची, अन् शेवटीं काय ? तर जे कांहीं 'घट तीन धनानें भरले' असतील तेवढेच ! पण त्यात देशाचं काय हित ? त्यापेक्षां आपली सर्व बुद्धि लिहिण्यांत खर्च केली तर देशाचें 'वाङ्मय' तरी वाढेल ! 'पण लक्षांत कोण घेतो ?'

उपासनी म्हणत असतील, दादान् हरिभाऊंनां खुशाल मनांत मांडे खाऊं द्या ! पण आमचा अनुभविकपणा, पोक्तपणा वगैरे जो आहे तो आमचा आम्हांलाच ! तो कांहीं दुसऱ्या कुणाला साधायचा नाहीं. अहो,

कसं झालं तरी दोन वर्षें कौन्सिलांत काम केलं आहे! सरकारी पेन्शनर असून लोककार्यें जीं करावयाचीं तीं अशीं करावीं लागतात. नाहींतर कुणी सरकारी नोकरी करायला भितात, कुणी सार्वजनिक कामांत पडायला भितात! पण आम्हीं? आम्हीं सरकारी नोकरी करायला तिळमात्र भ्यालों नाहीं! अगदीं पुरीं तीस वर्षें सरकारची नोकरी केली! आणि नोकरी संपली कीं सार्वजनिक कामांत पडलों. नाहींतर दुसरे पेन्शनर! सरकारी नोकरी संपली कीं, घरांत तरी खो खो करीत बसायचे, नाहीं तर वाई, नाशिक येथें राहून देवळांच्या पायऱ्या तरी झिजवायचे. जहालांची एवढी प्रांतिक सभा झाली, तिथें जायची होती कुणा पेन्शनरची छाती? पण आम्हीं नाहीं असल्या गोष्टींना भीत! टिळक आमचे बाळमित्र ही गोष्ट आतां 'ओपन सीक्रेट' सारखी आहे. पण त्याची डर कुणाला? जो कांहीं करीत असेल त्याला! पण ज्याला कर नाहीं त्याला डर कशाची?

ह्या तिघांचे तीन विचार ऐकून बाकीचे तिघे 'मुलगे' आपल्या मनांत असेच हंसत असतील! पाटणकर म्हणत असतील, आम्ही एवढे नाशिकचे सुप्रसिद्ध गृहस्थ, कुणाहि पक्षकाराला विचारा, कीं त्याला आमचं नांव पाठ! शिवाय आतां ऐसा टोलेजंग बंगला उठवून दिला आहे कीं बा:! आणि असं असतांना, नामदारीचा मान आपला करंदीकरापासनं उपासनीकडे आणि उपासनीपासनं खऱ्यांच्याकडे जावा, ह्याचा अर्थ काय? आम्हीं काय कुणीच नव्हेत कीं काय? काढा कोणताहि विषय, अन् पहा आम्हाला करंदीकर आणि उपासनीपेक्षां काय कमी येतंय् तें! मग पुन्हां पुन्हां करंदीकरच कशाला कौन्सिलांत? आम्हींहि कांहीं कमी नाहीं. एकदां कौन्सिलांत जाऊं तर द्या, ह्मणजे फटाका देतों उडवून! त्यापुढें उपासनींचं र-ट-फ आणि दादा करंदीकरांचे एकशें सतरा प्रश्न काय पदार्थ? दादा करंदीकरांनीं एकशें सतरा प्रश्न विचारले तेव्हां टाइम्सनं त्यांची कसली थट्टा उडविली! प्रश्न विचारायचे तरी त्यांत कांहीं 'कॉमनसेन्स' लागतो कीं नाहीं? कौन्सिलांतलें काम म्हणजे किती धोरणाचं असतं! तिथें माझ्यासारखा वक्ता पाहिजे. म्हणजे कितीहि अवघड प्रश्न असो, त्याचें पंधरा मिनिटांत इतकं सुंदर विवेचन

होईल कीं, गव्हर्नरसाहेबांना वाटेल, गोखलेच परत जिवंत होऊन आले ! कौन्सिलांत काम करायचें तर असं केलं पाहिजे ! पण लोकांची दुसऱ्यांच्याच जवळ काय मिरास पुरली आहे कुणाला ठाऊक ? पुन्हां पुन्हां आपले त्यांना निवडून देतात. जाऊं द्या, मूर्ख कुठले ! आपण आपलं प्रत्येक निवडणुकीला ऊभं रहायचं कर्तव्य करावं अन् पलीकडे सरावं ! जिथं गुणांची पारख नाहीं तिथें तळमळून उपयोग काय ?

तिकडे ते खानदेशचे "नवरे मुलगे" असंच म्हणत असतील ! धुळ्याचे आपटे सार्वजनिक कामांत फारसे कुणास माहीत नाहींत. धुळयांत ते मोठे आहेत, पण आपल्या स्वतःच्या गांवांत कोण मोठा नसतो ? बाहेर मोठं व्हायला तसंच एखादं सार्वजनिक कृत्य अंगावर घ्यावं लागतं. आतां पहा, अंमळनेर म्हणजे केवढंसं गांव आहे, पण तिथले जावडेकर जितके प्रसिद्ध आहेत तितके कांहीं जळगांवचे जुवेकर प्रसिद्ध नाहींत. अन् ह्याचं कारण असं कीं, जळगांव जरी जिल्ह्याचं ठिकाण असलं, तरी पैसाफंड म्हणा, रेल्वेच्या तक्रारी म्हणा, प्रांतिक सभा म्हणा, अंमळनेरचे जावडेकर जसे प्रत्येक वेळीं आपल्या अंगावर जोखीम घ्यायला तयार असतात तसे कांहीं जुवेकर न् आपटे नसतात. आपटे जर कांहीं प्रसिद्ध झालेच असले तर त्याच्याबद्दल एकदां केसरीनं केलेल्या चुकीमुळं होय ! भावजी, ती चुकी अशी कांहीं चमत्कारिक होती कीं, तिच्यामुळं रडणं आणि हंसणं अशा दोन्ही गोष्टी झाल्या. आपट्यांच्या संबंधानें ती चुकी ( अथवा चुकी कसली ? चुकीची बातमी. ) जेव्हां प्रसिद्ध झाली, तेव्हां त्यांचे दूरदूरचे स्नेही धाई धाई रडले असतील ! पण जेव्हां केसरीतच प्रसिद्ध झालं कीं ती बातमी खोटी होती, तेव्हां हंसतां हंसतां मुरकुंडया वळल्या ! नरसोपंतांनीं "सुभाषित आणि विनोद" लिहिला आहे ना, पण त्या पुस्तकांत सुद्धां इतकी गंमतीची गोष्ट सांगितली नसेल ! हो ! पण शेवटीं जुवेकर राहिलेच ! जुवेकर कोणत्या कारणामुळं उभे रहाणार ? दादा करंदीकर, हरिभाऊ आपटे, पाटणकर, उपासनी, ह्या सर्वांना कौन्सिलाकरितां उभें राहण्याचा 'अधिकार' पोंचतो व त्यांत राष्ट्रीय पक्षाला दादासाहेब निवडून यावे व नेमस्त पक्षाला हरिभाऊ निवडून यावे अशी इच्छा आहे. पहावं ह्यांत कुणाचं 'लक्ष्मीपूजन' होतं तें ! यंदाची

अच्युतरावांनीं निर्मिलेलें नाट्यकला-न्यायनिकेतन-सन १९३०.



दिवाळी त्या लक्ष्मीपूजनावर फार अवलंबून आहे. दादा करंदीकर राष्ट्रीय पक्षाचे असले तरी लक्ष्मी त्यांचेवरच प्रसन्न आहे. तेव्हां लक्ष्मीपूजनाचे वेळेसहि लक्ष्मी त्यांचेवरच प्रसन्न झाली तर त्यांना शोभेशीच आहे. आई भवानी कृपा करो व यंदा लक्ष्मीपूजनाचा मंगल प्रसाद सातारला मिळो ! पण जुवेकर म्हणतील कीं, 'मीही पण एक नवरा मुलगा आहें, आणि राष्ट्रीय पक्षाचे दादा करंदीकरानांच आशीर्वाद असले तरी मीहि मुंडावळी कां बांधूं नयेत ? लग्न हा एक 'जुगार' आहे, हा एक 'जवा' आहे. मध्यें एकदां गरुड अशाच एका 'जुव्यांत' नामदार होऊन गेले. लग्नं जुळतात तीं सारख्या सारख्या वधूवरांत थोडींच जुळतात ? मुलगी सुंदर तर नवरामुलगा कुरूप, नवरामुलगा देखणा तर नवऱ्या मुलीला रूप नाहीं, नवरामुलगा साठ वर्षांचा तर नवरी मुलगी गुडघ्याएवढी, नवरी मुलगी थोराट हाडापेरानं चांगली, तर नवरामुलगा पाप्यांचा पितर ! अशीं तर सारीं लग्नं ! योग्य 'मुला'ला योग्य जोड मिळाली, असं कधीं होत असतं ? ब्रह्मदेवाला सर्व जग घडवितां येतं, पण गुणानं, रूपानं, स्वभावानं सारखं असं दांपत्य कांहीं त्याला घडवितां येत नाहीं ! लग्नासारखा जुगार कुठं नाहीं ! मग सर्व जगभर जर असा लग्नाचा जुगार चाललेला आहे तर आम्हीं 'जुवा' कां खेळूं नये ? कदाचित् दान पडूनहि जाईल ! भावजी, खरं नाहीं का हें ? मला तर भावजी, एखादे वेळेस असं वाटतं कीं, कौन्सिलच्या निवडणुकीकरितां इतक्या खटपटीन् इतके श्रम करण्यापेक्षां साऱ्या "नवऱ्या मुलांना" एकत्र जमवून, फांसे टाकावे आणि ज्याच्या नांवानं दान पडेल, त्याला टाकावं नामदार करून झालं ! नाहींतर, भावजी, पूर्वीची हत्तीच्या सोंडेंत माळ देऊन राजा निवडायची पद्धति ह्याहूनहि सुरेख ! हत्तिणीच्या सोंडेंत नामदारीची माळ अडकविली म्हणजे इंदुप्रकाशला हरिभाऊ आपट्यांची तरफदारी करायला नको, व जुवेकरांना आपण कां उभे राहिलों हें 'एक्स्प्लेन'हि करायला नको, सगळी सोय होऊन जाईल. शिवाय भावजी, हत्तिणीच्या सोंडेंत माळ दिली म्हणजे नवरे मुलगे सहा असोत नाहींतर आठ असोत, प्रत्येकाला वाटेल कीं लक्ष्मीपूजनाचे वेळीं माझ्याकडे गजान्त लक्ष्मीच चालत येणार !

आपली,

**सौ. वत्सलावहिनी.**

# * सोमवारची कहाणी

रा. रा. संदेशभावजी यांसः—

ऐका परमेश्वरा, सोमवारा, तुमची कहाणी. एक आपलं आटपाट नगर होतें. तिथें एक ब्राम्हण रहात असे. ब्राम्हण आपला स्नानसंध्याशीळ होता. वर्तनानें धुतल्या तांदळासारखा, दुधासारखा सोज्वळ, पाण्यासारखा नम्र, खिरीसारखा सर्वांशीं गोड, अग्नीसारखा तेजस्वी, बैलासारखा कधीं कुणाच्या आध्यांत ना मध्यांत असा होता. देवावर त्याची फार श्रद्धा होती. देवाची सेवा मनोभावानें करायची, आत्मचिंतनांत वेळ घालवायचा, शिष्यांना पाठ द्यायचे आणि परोपकारांत आयुष्य घालवायचें हा आपला त्याचा सांप्रदाय. त्याची ही अशी शुचिर्भूत वृत्ति पाहून त्या नगरांतले आणि पाटांतले लोक त्याला फार मानीत असत. त्या नगराच्या एका पाटांत मोठमोठे लक्षाधिश व्यापारी होते, दुसऱ्या पाटांत कारागिर, कारखानदार, कसबी, हुन्नरी, अशा लोकांची वस्ती होती. तिसऱ्या पाटांत, वाणी उदमी, धान्यवाले यांचीं दुकानें होतीं. चवथ्या पाटांत सराफ, सावकार ह्यांच्या पेढ्या होत्या, पांचव्या पाटांत कापडचोपड, कोऑपरेटिव्ह स्टोअर्स, जनरल मर्चन्ट्स, कमिशन एजंट्स हे सर्व रहात असत. सहाव्या पाटांत वकील, बॅरिस्टर, दुभाषी, ऑडिटर ह्यांच्या “ फर्म्स ” असत, सातव्या पाटांत नाच, रंग, गाणीं, नाटकें, सिनेमा ह्यांची गर्दी असे, आणि आठव्या पाटांत, स्मॉल कॉज कोर्ट, मॅजिस्ट्रेट कोर्ट, हायकोर्ट वगैरे वगैरे सर्व कांहीं असे. आठ पाटांच्या मध्यावर एक मोठें वर्तूळ असे, व तिथें नगररक्षक, पोलीस, डिटेक्टिव्ह ह्यांचीं मोटमोठालीं ऑफिसें बांधलेलीं होतीं. राजाचा राजवाडा नगरापासून चार योजनांवर एका किल्यांत होता. त्याच्याच उलट दिशेला चार योजनांवर हाहि ब्राह्मण, एका वृक्षातळीं, नदीच्याकाठीं, आपले शिष्य घेऊन पढवीत वसत असे. ह्या ब्राह्मणाचें पढविणें फार पवित्र असे. जो तो आपल्या मुलाला ह्या ब्राह्मणाकडे विद्येकरितां पाठवी. ह्या

---

✱ संदेश ता. १६ ऑगस्ट १९१५.

ब्राह्मणाची ह्या नगरांत प्रतिष्ठा वाढली ती ह्याचमुळें. शेट असो, सावकार असो, गरीब असो, सरदार असो, ज्याच्या मनांत ह्या ब्राह्मणाविषयीं पूज्यबुद्धि नाहीं असा कुणीच नव्हता. महिन्यांतून एक दिवस खुद्द राजा त्याच्या दर्शनास जायचा. तो ब्राह्मणहि त्या राजाला आशिर्वाद देऊन अभीष्ट चिंती. इतकें होतें तरी ब्राह्मण अगदीं निर्लोभी होता. कुणाच्या जवळ जन्मांत कधीं हात पसरायचा नाहीं. त्याला स्वतःचा संसार नव्हताच. लोकांचे संसार सुखी झाले ह्मणजे त्याला आनंद. तो असें ह्मणे कीं, माझी धावळी हेंच माझें त्रैलोक्य आहे. ही माझी धावळी देवानें माझे जवळ ठेवली ह्मणजे मला आनंद आहे. मग मला कांहीं एक नको. ह्या ब्राह्मणामुळें त्या नगराला मोठें भाग्य आलें होतें. ब्राह्मण मात्र शेवटपर्यंत गरीबच होता.

ह्या ब्राह्मणाचे शिष्य पुष्कळच होते. त्या साऱ्यांना तो सारख्याच ममतेनें शिकवी. पण त्या साऱ्यांत एक शिष्य मोठा नेमिष्ठ होता. त्यानें सकाळीं उठावं, स्नान करावें, शंकराची पूजा करावी, गुरुभक्ति साधावी, तिवोटी लंगोटी लावावी, खांदीं कुऱ्हाड घ्यावी, वनास जावें, वनचीं फळें आणावीं, त्याचा उत्तम पाक करावा, त्याचे पांच भाग करावे, गुरूचा भाग गुरुला द्यावा, देवाचा देवास द्यावा, अतिथीचा अतिथीस द्यावा, गाईचा गाईस द्यावा आणि उरलें सुरलें आपण खावें. असें करतां करतां नखं रुपलीं, बोटं खुपलीं, अंगीं रोम वाढिन्नले, मस्तकीं जटा वाढिन्नल्या, बारा वर्षें तपास भरलीं. एवढें तप कशाकारणें करतो? शंकराच्या प्रसादाकारणें करतो. गुरुजीनीं पाहिलं. गुरुजी झटकन् उठले. पायीं खडाव्या घातल्या, मस्तकीं धावळ गुंडाळली, शिष्याजवळ जाऊन उभे राहिले. शिष्यास बोलले, भल्या ब्राह्मणा, चरणीं तर चालतोस, मुखीं तर वदतोस, एवढें तप कशा कारणें करतोस? शंकराचा प्रसाद व्हावा ह्याकारणें करतों. बारा वर्षें झालीं, अजून शंकराचा प्रसाद नाहीं झाला? 'गुरुजी, नाहीं झाला. आपली कृपा होणार नाहीं तोंपर्यंत शंकराचाहि प्रसाद होणार नाहीं.' 'नाहीं रे बाबा, तुझें कांहींतरी चुकतें आहे. सांग सांग, रोज कसं कसं घडतं सांग.' "गुरुजी, मी रोज नदीवर जातों, स्नान करतों, शंकराची पूजा

सारतों, आपल्या पायांचें वंदन करायला परत फिरतों, तों वाटेंत वेळूचं बेट लागतें. त्या वेळूच्या बेटांतून "मी येऊं", "मी येऊं" असा ध्वनि उठतो. तो ध्वनि ऐकला कीं माझी घाबरगुंडी वळते. मी मागें पहातों तों मागं कुणीच नसतें. मग मी भीतीनें पळूं लागतों. गुरुजी, आज बारा वर्षं अस्सं चाललेलं आहे.

शिष्याचं बोलणं ऐकून गुरुजींना हसूं आलें. त्यांनीं शिष्याचे तोंडावरून हात फिरवला, त्याचा घाम पुसला, त्याला आपल्याजवळ बसवून घेतलें. म्हणाले '[शिष्या, देवाची सेवा नुसत्या भक्तीनें होत नाहीं. देवाचा प्रसाद व्हायला भक्ति, सेवा, प्रदक्षिणा, बेलाचीं पानें, अभिषेक हें हवेंच, पण अंगांत "सेल्फ–कॉन्फिडन्स' हि पाहिजे. नुसत्या वेळूच्या बेटांतून ध्वनि निघाला एवढ्यावरनंच तूं घाबरून गेलास, तर तुझ्यावर ईश्वराचा प्रसाद होऊन तरी काय उपयोग ? तुझ्यासारख्या भेकडभटापर ईश्वरानें प्रसाद केला तर ईश्वरालाच पश्चात्ताप करण्याची पाळी येईल.] अरे, असं घाबरूं नये, ईश्वराच्या सेवेचा मार्गच ध्वनींचा मार्ग आहे. ईश्वराच्या सेवेला लागलें कीं चोहोंकडून ध्वनीच ध्वनी ऐकूं येतात. कुणी म्हणतात हा आततायी आहे, कुणी म्हणतात हा लबाड आहे, कुणी म्हणतात हा मतलबी आहे. आपण त्या ध्वनीकडे लक्ष देऊं नये. आपला जो मार्ग आपण ठरविला असेल त्या वाटेनें आपण जावें. ईश्वराची सेवा ही सोपी नाहीं. ह्यांत मुख्य अवघडपणा आहे तो ध्वनींचाच आहे. ह्या ध्वनीला जो भ्याला तो परमेश्वाच्या सेवेला मुकलाच. शिवाय, ईश्वराच्या सेवेच्या मार्गानें जायला लागलें म्हणजे सारेच ध्वनि वाईट असतात असें नाहीं. अरे, ईश्वरच मुळीं ध्वनिरूप आहे. "शब्द-ब्रम्ह" हें केवढें तरी ब्रम्ह ! ईश्वराला हजारों शिरें आहेत. त्याला हजारों मुखें आहेत. ईश्वराला भक्ताशीं बोलायचं झालं म्हणजे ह्या हजारों मुखांपैकीं तो हव्या त्या मुखानें बोलतो. कारण ईश्वर सर्वत्र भरलेला आहे. तो वेळूच्या बेटांत आहे, तो नदीच्या प्रवाहांत आहे, तो फुलांच्या ताटव्यांत आहे, तो भुंग्यांच्या गुणगुण्यांत सुद्धां आहे. वेळूच्या बेटांतून निघालेला ध्वनि, त्याला तूं भ्यालास कशाला ? अरे, कदाचित् शंकरसुद्धां तुझ्याशीं वेळूच्या ताटव्यांतून बोलत असेल. ईश्वर खरोखरच

असा दयाळु आहे. तो कधीं नदीच्या खळखळीमधून बोलतो, तो कधीं मेघाच्या गर्जनेतनं बोलतो, तो कधीं वाऱ्यांच्या सुस्कारांतून बोलतो. शिष्या, तुला किती सांगावं ? वाघाच्या किंकाळीतनं अथवा तोफेच्या भडिमारातनं सुद्धां ईश्वर बोलतो. शंकराची भक्ति करायची तर कोणते कोणते ध्वनि कुठें कुठें निघतील इकडे पाहूं नये, सरळ डोळे मिटून सत्याच्या मार्गानें जात असावें म्हणजे ईश्वराची कृपा प्राप्त होते. आत्म-विश्वास नसला कीं मनुष्य शंकराच्या प्रसादाला मुकलाच. ह्याकरितां शिष्या, आत्मविश्वास धर, आत्मविश्वासाच्या बळावर तूं कार्यसिद्धि करशील. उद्यां नदीवरनं येतांना वेळूच्या बेटांतनं "मी येऊं", "मी येऊं असा ध्वनि ऐकलास म्हणजे धीर धर. आणि म्हणावें "ये". तें संकट असलें तर शंकराच्या भयानें त्याची रक्षा होईल. तें शंकराचंच कांहीं देणें असलं, तर तुझें भाग्य उघडेल. पण मागं पाहूं नये. ईश्वराच्या सेवेंत कधीं मागें पाहूं नये. नेहमीं पुढें पहात असावें. मागें पाहिलें कीं भीतीचें ठिकाण दिसायला लागतें, आणि पुढें पाहिलें कीं आशेचें ठिकाण दिसायला लागतें. डोंगर चढतांना पुढचें शिखर पहावें. मागच्या दऱ्या पाहूं नयेत. मागं पहाणं म्हणजे केलेले प्रयत्न फुकट दवडण्यासारखें असतें. पुढें पहाणें म्हणजे तपाचें फळ जवळ करण्यासारखें असतें. तर भय टाक व कुणी केव्हांही तुला "मी येऊं ?" असें विचारलें कीं त्याला खुशाल 'ये' असें बोलवीत जा.

गुरूचा उपदेश शिष्याला पटला. शिष्य रोजच्याप्रमाणें स्नानाला गेला, पूजा सारून येऊं लागला. "मी येऊं ?" असा ध्वनि झाला. "ये, ये" असा जबाब दिला, पण कांहीं मागें पाहिलें नाहीं. चालत्या पावलीं घरीं आला. गुरुजींनीं पाहिलें तों बरोबर एक मुलगी आहे. त्या दोघांचें लगीन् लावलें. राजानं त्यांना एक घर दिलं. त्यानंतर काय झालं ? श्रावणी सोमवार आला. बायकोला म्हणूं लागला, 'माझी वाट पाहूं नको. उपाशीं राहूं नको. तूं सुसंस्कृत आहेस. नवऱ्याकरितां उपाशी राहणें ही रानटी चाल आहे, ही रूढी मोडली पाहिजे. सुधारलेल्या बायकांनीं नवऱ्याकरितां उपाशी राहूं नये. नवरे कुठं बायकांकरितां

खोळंबतात ? जितकं नवरे करीत असतील तितकं बायकांनीं केलं तरच बायकांचा सुशिक्षितपणा. नाहींतर पुरुष आणि बायका त्यांचे सारखे हक्क कुठं राहिले ? बायकांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावें ह्या मताचा मी आहें. तुला जरी हा हक्क नको असला तरी मी तो तुला दिल्याशिवाय राहणार नाहीं. मागें मी वेळूच्या बेटाला भीत होतों, म्हणून तूं मला भित्रा समजत असशील, पण ते दिवस गेले. आतां कोणत्याहि बायकोला मी भिणार नाहीं; तर तूं मुकाट्यानें जेवायला बैस. बायकांना पूर्ण "स्वातंत्र्य" द्यावें अशा मताचा मी आहें. म्हणूनच मी तुला हुकूम करतों कीं, माझ्याकरितां उपाशी रहाण्याचें स्वातंत्र्य तुला नाहीं. मी तुला उपाशी राहूं देणार नाहीं.

त्या बिचारीला ह्यांतला कांहींच अर्थ कळला नाहीं, कारण ती आपली साधीभोळी, वेळूच्या बेटांतली होती. तिनें थोडी वाट पाहिली, आणि सैंपाक करून भीतीनें जेवायला बसली. एक घांस तोंडांत घातला. इतक्यामध्यें पति आला. अग, अग, दार उघड. पुढचें ताट पलंगाखालीं लोटून दिलें, हात धुतला, दार उघडलं, पति घरांत आले. नित्यनेम करूं लागले. पुढें दुसरा सोमवार आला. त्या दिवशीं असेंच झालें. पुढें सरता सोमवार आला, रात्रीं नवल झालें. पलंगाखालीं उजेड दिसला. 'हा उजेड कशाचा ?' 'ताटीं भरल्या रत्नांचा.' 'हीं रत्नें कोठून आणलीं ?' मनांत भिवून गेली. "माझ्या माहेरच्यांनीं दिलीं." "तुझें माहेर कुठें आहे ?" "वेळूच्या बेटीं आहे." "मला तिथें घेऊन चल" पतीसह चालली. मनीं शंकराची प्रार्थना केली. "शंकरा, लज्जा राख." तों वेळूचं बेट एक मोठा राजवाडा झाला. कोणी ह्मणे माझा मेहुणा आला, कोणी म्हणे माझी नणंद आली, कोणी म्हणे माझी बहीण आली. दासीबटकी राबताहेत, शिपाई पहारा करताहेत, बसायला पाट दिला, भोजनाचा थाट केला, जेवणं झालीं. दोघं एकांतांत गेलीं. नवरा मनांत थक्क झाला. इथें बारा वर्षे मी वेळूचं बेट पहात होतों, आजच राजवाडा कोठून आला ?

बायको म्हणाली, ऐकत असाल तर सांगतें. चारी सोमवारीं हांक ऐकली, जेवतीं ताटं ढकलून दिलीं, रत्नांनीं भरलीं, सोन्याचीं झालीं. तीं

मला देवानं दिलीं. आपण विचारूं लागला, तेव्हां भिऊन गेलें, माहेरचीं म्हणून सांगितलें. शंकराची प्रार्थना केली. त्यानें लाज राखली व वाडा निर्माण केला.

इतक्यांत खडावा ऐकूं आल्या. दोघेंहि बाहेर आलीं. तों गुरुजी उभे. गुरुजींनीं आशिर्वाद दिला. उपदेश केला कीं बाबा, राष्ट्राला सुखी करायला आत्मविश्वास लागतो, व घर सुखी करायला सद्‌गुणी बायको लागते. ज्या राष्ट्रांत आत्मविश्वास उत्पन्न झाला त्याचेवर परमेश्वराची कृपा ठेवलेली व ज्या घरांत सद्‌गुणी स्त्री, तिथें वेळूच्या बेटांत सुद्धां राजवाडा होतो. झाली ना तुझी खात्री ?

शिष्यानें गुरुजीच्या पुढें साष्टांग नमस्कार घातला. तो म्हणाला, गुरुजी ! मी मूर्ख. आपली विद्या मी शिकलों पण ती मला वाणली नाहीं. वेळूच्या बेटांत देखील मी भ्यालों व माझ्या स्त्रीला भलभलत्या कल्पना शिकविल्या. मला क्षमा करा. गुरुजी ह्मणाले, तुला क्षमा आहे. शंकरानें दोन वेळां तुझी इच्छा पुरविली. पुढेंहि ती अशीच पुरवो.

जसा त्यांना शंकर पावला, तसाच तुम्हा-आम्हाला पावो. ही साठा उत्तराची कहाणी, पांचा उत्तरीं सुफळ संपूर्ण.

---

## लो. टिळकांच्या कीर्तीचें कारणः--

लो. बाळ गंगाधर टिळक ह्यांची आज जी त्रिखंड ख्याती आहे, त्याचें कारण त्यांचें सार्वजनिक आयुष्य हेच होय. किंबहुना टिळकांचें सर्व जाणतेपणाचें आयुष्य हें सार्वजनिक आयुष्यच आहे. खाजगी आयुष्याचा त्यांत फार थोडा भाग आहे. टिळकांनी आपल्या सार्वजनिक आयुष्यास सुरवात केली, त्यावेळीं महाराष्ट्रांतील राजकारण अनुद्‌गारी होतें. चालू परिस्थितीवर खूप संतापावयाचें, पण त्याचा उच्चार फारसा करावयाचा नाहीं, असें त्यावेळीं राजकारणाचें रानडेशाही वळण होतें. कदाचित् बोलण्याचा प्रसंग आलाच तर तें भीडमर्यादा राखून नम्रपणानें बोलावयाचें अशी त्यावेळीं पद्धति होती. ही मुळमुळ पद्धति टिळकांनीं बदलली व बोलावयाचें तर तें धडाक्यानें बोलावयाचें ही नवीन पद्धति सुरू केली.

( युगांतर ता. २७ जुलै १९२४. )

# * ज्योतिषविद्या आणि भविष्यकथन.

हें जग म्हणजे कार्यकारणाची एक विलक्षण सांखळी आहे. जिथें कारण तिथें त्याचें कार्य व जिथें कार्य तिथें त्याचें कारण—असाच संबंध ह्या जगांत चोहोंकडे दृष्टोत्पत्तीस येतो. ही पृथ्वी वाटोळी कां? ही धनधान्याची जननी कां? हिच्यांत भिन्न भिन्न ऋतू कां? अमुक ठिकाणीं जास्त ऊष्णता कां? अमुक ठिकाणीं जास्त थंडी कां? अमुक ठिकाणचे लोक काळे कां?—ह्या सर्वांस कारणें आहेत व एकहि कारण असें नाहीं कीं ज्याचें कार्य घडत नाहीं. अग्नि असला कीं ऊष्णता असणार; ऊष्णता असली की अग्नि असलाच पाहिजे.

जगनाची सुधारणा करणारी शक्ति कोण? तर हा 'कां?' !! जग जों जों सुधारत जातें तों तों 'अमुक कां?' 'तमुक कां?' असें मनुष्याचें मन एकसारखें विचारीत सुटतें व जों जों हें असें जास्त विचारीत सुटतें तों तों हें जास्त सुधारत जातें! विसाव्या शतकांत एकोणीसाव्या शतकापेक्षां जास्त 'कां?' आहेत. एकोणीसाव्या शतकांत अठराव्या शतकापेक्षां जास्त 'कां?" होते. अठराव्या शतकांत सतराव्यापेक्षां जास्त होते व सतराव्या शतकांत सृष्टियुगाच्या आरंभकालापासून हजारों—लाखों—पटींनी जास्त 'कां?' होते. ही 'कां?'ची संख्या वाढायला लागली म्हणजे समजावें कीं जग सुधारत आहे. अत्यंत प्राचीन युगांत 'कां?' असें नव्हतेंच! कोठून असणार? ज्या वेळीं मनुष्य व पशू असे अरण्यांत सारख्याच अज्ञान स्थितींत रहात होते त्या वेळीं 'कां?'चें साम्राज्य नसायचेंच! वनसम्राट केसरी जरी आपल्या विजयी गर्जना करीत सैराट धांवत सुटला व घनगर्जनेपेक्षांही आपल्या गर्जनेची भीषणता जास्त भासवीत असला तरी घन कां गर्जतात हा प्रश्न त्याचे मनांत कधींही उत्पन्न व्हावयाचा नाहीं. मनुष्य ज्यावेळीं पशुस्थितीत होता त्यावेळीं त्यांचेही मनांत हा प्रश्न उभा रहात नव्हता. ज्यावेळीं असले

---

* रत्नाकर, ऑक्टोबर १९२५.

प्रश्न त्याचे मनांत उभ्दवूं लागले त्यावेळीं तो पशु–अवस्थेमधून सुटला व जों जों हे प्रश्न जास्त होत गेले तों तों त्याची जास्त सुधारणा होत चालली !

कांहीं एक कांकूं न करतां सृष्टीकडे पहात राहणें म्हणजेच पशु-अवस्था होय. पण तेच डोळे जास्त चिकित्सक होऊन ' असें कां ? ' ' असें कां ? , ' ' असें कां ? ' हा प्रश्न प्रत्येक वस्तूविषयीं विचारायला लागले म्हणजे सुधारणेचें युग आलें. ' कां ?' ' कां ?' ' कां ?' असें विचारून आपलें मन आपणांस दमवायला लागलें म्हणजे तीं उन्नतीचीं शुभ लक्षणें होत. आणि प्रत्येक प्रश्नाचें उत्तर आपणांस समाधानकारक देतां येऊं लागलें म्हणजेच ती ज्ञानाची प्रभा होय. ही प्रभा आपणांस समर्थ बनविते–ही प्रभा आपणांस युक्ति सुचविते–ही प्रभा आपणास कल्पक व शोधक करून सोडते.

कल्पक लोक म्हणून ज्यांची ख्याति आहे असे एडिसन्, बोस, किंवा कौंट झेपलीन घ्या. त्यांच्यांत आणि आपल्यांत कोणतें अंतर असतें ? हेंच कीं, आपल्यापेक्षां अनेक ' कां ?' त्यांचे मनांत उद्भवलेले असतात व त्यांचीं उत्तरें त्यांनीं माहीत करून घेतलेलीं असतात. कांकूं केल्याशिवाय जगांत रहाणें हें जंगलीपणाचें लक्षण होय. ' कां ?' ' कां ?' ' कां ?' असें एकसारखें विचारण्याची संवय मनास जडवून देणें हें भाग्याचें लक्षण होय. मनानें आपणांस एकसारखे प्रश्न विचारले पाहिजेत व त्यांचीं उत्तरें आपण एकसारखीं शोधीत चाललें पाहिजे. श्रीशंकराचार्यांसारख्यानीं—

का ते कान्ता कस्ते पुत्रः ॥

*  *  *  *

कोऽहं कस्त्वं कुत आयातः ॥

*  *  *  *

ही स्त्री पत्नी तव कां झाली ?
ह्याचि सुतातें ती कां व्याली ?

*  *  *  *

कां मी येथें ? तूं येथें कां ?
कां ही भूमी ? जन्महि हा कां ?

*  *  *  *

असे हजारों प्रश्न उपस्थित करून ह्यांचीं उत्तरें शोधा, ( तत्वं चिंतय तदिदं भ्रातः ) असें सर्वांस बजावलें आहे.

झाडावरून फळ खालीं कां पडलें ? हा एक प्रश्न उपस्थित करून त्याचें उत्तर शोधून काढणाऱ्या न्यूटनचें जर आपण इतकें कौतुक करतों तर वरीलप्रमाणें प्रश्न उपस्थित करणाऱ्या श्रीशंकराचार्यांचें आपण किती कौतुक केलें पाहिजे ?

आतां आचार्यांची प्रश्नमालिका आपण पुन्हां घेऊं.

ही स्त्री पत्नी तव कां झाली ? ह्याचि सुतातें ती कां व्याली ?
कां मी येथें ? तूं येथें कां ? कां ही भूमी ? जन्महि हा कां ?

ही प्रश्नमालिका आपल्यापुढें ठेऊन आचार्यांच्याच आज्ञेनुसार त्या प्रश्नमालिकेचीं उत्तरें आपण शोधावयास लागलों म्हणजे आपण अचानक ज्योतिषशास्त्रांत ( Astrology त ) येऊन पडतों. कारण ज्योतिष शास्त्र म्हणजे दुसरें काय ? तर कांहींएक नाहीं. केवळ आचार्यांच्याच ह्या प्रश्नांचीं उत्तरें ! ज्योतिषशास्त्रांत ह्याशिवाय काय आहे ?

ज्योतिषशास्त्रांचा मुख्याधार कुंडली आहे हें कुणास सांगायला नकोच ! ह्या कुंडलींत तनुस्थान, धनस्थान, भ्रातृस्थान, पितृस्थान वगैरे अनेक स्थानें असतात व त्या प्रत्येक स्थानावरून प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न करण्यांत येत असतो. “ ही स्त्री पत्नी तव कां झाली ? ” ह्या प्रश्नाचें उत्तर आपणांस जायास्थानांत सांपडतें. नवग्रहांपैकीं त्या स्थानांत जो ग्रह असेल त्या ग्रहावरून त्या प्रश्नाचें उत्तर आपणांस देतां येतें. त्या स्थानांत जर चंद्र किंवा शुक्र असेल तर एका विशिष्ट स्वभावाची स्त्री आपणांस मिळते. त्या स्थानांत जर मंगळ असेल तर त्या दोहोंहूनही निराळा परिणाम आपले वांट्यास येतो. आणि जर तेथें शनि असेल तर त्या परिणामाविषयीं बोलावयासच नको, मग अगदींच निराळे चमत्कार आपल्या अनुभवास येतात.

आणि हें जसें जायास्थानाचें तसेंच इतर स्थानांचेंही आहे. “ त्याचि सुतातें ही कां व्याली ? ” या प्रश्नाचें उत्तर देण्यास कुंडलींतील पुत्रस्थान बसलेलें आहे. ‘ कां मी येथें ? ’ याचें उत्तर भाग्यस्थान देईल. तूं

येथें कां?' याचें उत्तर पितृस्थान देईल. 'कां ही भूमी?' याचें उत्तर धनस्थान देईल व 'जन्महि हा कां?' याचें उत्तर तनुस्थानांत मिळेल.

ज्योतिषशास्त्रांत (Astrology मध्यें) तनुस्थानास अत्यंत महत्त्व देण्यांत आलेलें आहे. इतकें महत्त्व दुसऱ्या कोणत्याहि स्थानास नाहीं. प्रत्येक प्राचीन व अर्वाचीन ज्योतिष-ग्रंथांत तनुस्थानाचें विवरण अतिशय असतें. किंबहुना ज्योतिष-शास्त्रांतील कुंडलीचा पाया तनुस्थान आहे असें म्हटलें तरी चालेल. हें स्थान एकदां नीट समजलें म्हणजे बाकीचीं स्थानें सहज समजूं लागतात. पण ह्या स्थानास इतकें महत्त्व कां आहे? ह्याचें कारण हेंच कीं 'जन्महि हा कां?' ह्या प्रश्नाचें उत्तर त्यांत दिलेलें असतें. आपला जन्म उच्च कुलांत किंवा नीच कुलांत कां? आपण गरिबींत किंवा श्रीमंतींत कां उत्पन्न झालों? आपली तनु कृश किंवा सुखलालित कां? आपला स्वभाव शांत किंवा संतापी कां? आपला वर्ण कृष्ण अथवा गौर कां? आपली यष्टि उंच किंवा ठेंगू कां? ह्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें आपणांस तनुस्थानामध्यें मिळतात. मग तनुस्थानाला महत्व कां येऊं नये?

तेव्हां ज्योतिषशास्त्र म्हणजे कांहीं भयंकर शास्त्र आहे—तिथें कांहीं अकल्पित गडबडगुंडा आहे—तिथें कांहीं अचाट गौडबंगाल आहे—अशी जर कुणाची कल्पना असेल तर ती चूक आहे. शंकराचार्यांसारख्या बुद्धिमंत शोधकांनीं जे प्रश्न लोकांचेपुढें मांडले व ज्यांचीं उत्तरें मिळविण्याचा प्रयत्न करण्याबद्दल त्यांनीं आग्रहानें उपदेश केला, तसल्याच प्रकारचे प्रश्न ज्योतिषशास्त्रानें आपल्यापुढें ठेवलेले आहेत. ज्योतिषशास्त्रानें ह्यापेक्षां निराळें असें कांहींएक केलेलें नाहीं. निदान अशी कोणतीहि पातकी गोष्ट ज्योतिषशास्त्रानें केलेली नाहीं, कीं तिचेबद्दल विद्वान लोकांनीं ज्योतिषशास्त्रावर नाकें मुरडावीं, व्यावहारिक लोकांनीं त्यांस कमी प्रतीचें लेखावें किंवा विद्यापीठांनीं त्यास आपल्या अभ्यासक्रमांत घेऊं नये. आचार्यांसारख्या विद्वन्मणींनीं जगाच्या विचारजागृतीसाठीं त्यांचेपुढें ठेवलेले प्रश्न ज्योतिषशास्त्रानें विचारासाठीं घेतलेले आहेत व आपल्या सामर्थ्यानुरूप त्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न ज्योतिषशास्त्रानें केलेला आहे.

जे लोक पुनर्जन्म मानीत नाहींत (व असे कोटयवधि लोक ह्या जगांत आहेत), त्यांची गोष्ट अगदीं निराळी! त्यांच्याशीं ज्योतिषशास्त्राची

चर्चा जराशी निराळ्या पद्धतीनें केली पाहिजे. परंतु जे आपण लोक पुनर्जन्म मानतों ( व असेहि आपण कोट्यवधी लोक ह्या जगांत आहोंत ), त्यांना ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे कीं, सध्यांचा आपला जन्म कांहीं अंशीं तरी आपण पूर्वजन्मीं केलेल्या सदसत्कृत्यांवर अवलंबून आहे, व ह्या जन्मांत जीं सदसत्कृत्यें आपण करूं त्यांचेवर आपला पुढील जन्म कांहीं अंशीं अवलंबून राहील. अर्थात्च ह्या जन्माचे ह्या विचाराप्रमाणें दोन भाग ठरतात. एक भाग म्हणजे पूर्वजन्मावरून ह्या जन्माचा जो भाग निश्चित केला गेला असेल तो व दुसरा भाग म्हणजे ह्या जन्मांत जीं कांहीं नवीन कृत्यें आपण करीत असूं तीं! व ह्या नवीन कृत्यांचा कांहीं भाग आपण इथल्या इथेंच भोगतों व कांहीं भाग शिलकींत राहून पुढील जन्माच्या रचनेसाठीं उपयोगांत येतो. ज्याप्रमाणें आपण आज १०० रुपये मिळविले व त्यापैकीं ९० रुपये खर्च झाले तर उद्यांच्या शिल्केंत १० रुपये जातात, त्याप्रमाणेंच मनुष्यानें ह्या जन्मांत केलेल्या नवीन कृत्यांचा जमाखर्च होऊन शिल्लक बाकी पुढील जन्माच्या हिशोबांत ओढली जाते. तात्पर्य काय कीं, ह्या जन्मांतलीं सर्व सुखदुःखें आपण केवळ ह्या जन्मांत करीत असलेल्याच कृत्यांचा परिणाम नाहीं. त्यांपैकीं कांहीं त्यांचा परिणाम आहेत व कांहीं आपण पूर्वजन्मांत केलेल्या कृत्यांचा परिणाम आहेत.

उदाहरणार्थ, आपण चुलीवर भात ठेवला व तो शिजून तयार झाला तर तो त्या जन्मांतील कृत्यांचा परिणाम आहे. परंतु आपण हिंदुस्थानांत जन्मास आलों–महाराष्ट्रांत जन्मास आलों–ब्राह्मणेतर किंवा ब्राम्हण जातींत जन्मास आलों तर तो कांहीं आपल्या या जन्मांतील कृत्यांचा परिणाम नव्हे. तो परिणाम पूर्वजन्मांतील कृत्यांचा आहे. आपण ह्या जन्मांत श्रीमंतीमध्यें लोळतों किंवा भिकेला लागतों हा बराचसा त्या जन्मांतील कृत्यांचा परिणाम असेल; परंतु आपण श्रीमंताच्या पोटीं जन्माला येतों किंवा गरिबाच्या पोटीं जन्माला येतों हा या जन्मांतील आपल्या कृत्यांचा परिणाम खास नव्हे. आपण आपल्या हातानें आपलें नाक कापलें किंवा डोळा फोडला तर आपल्या कृत्यांचा तो परिणाम समजला जाईल, परंतु जन्मतःच आपलें नाक नकटें असलें किंवा डोळा गेलेला असला तर त्याबद्दल आपणांस कोणी

जबाबदार समजणार नाहीं. आपण ह्या जन्मांत कोणाचा खून केला तर त्याबद्दल आपण दोषी ठरूं; पण आपण जन्मल्याबरोबर किंवा आपल्या जन्माच्या योगानें जर आपली आई मृत्यु पावली तर त्याबद्दल आपलीं या जगांतलीं कृत्यें दोषार्ह नाहींत. त्यांची दोषर्हता बघायला आपणांस पूर्व-जन्माकडेच गेलें पाहिजे.

ह्या जन्मांत आपण जीं सुखदुःखें भोगतों त्यांत याप्रमाणें कांहीं या जन्मांतल्या कृत्यांनीं व कांहीं पूर्व जन्मांतल्या कृत्यांनीं उत्पन्न झालेलीं असल्यामुळें त्यांचें प्रमाण किती, हा फार प्राचीन कालापासून वादविवादाचा एक मोठा विषय झालेला आहे. दैववादी व प्रयत्नवादी हे भेद ह्यामुळेंच पडलेले आहेत. वास्तविक प्रकार असा आहे कीं, दैववाद व प्रयत्नवाद हे दोन्ही खरे असून त्यांची एकमेकांशीं सहकारिता आहे. "विना पुरुषकार्येण दैवं न सिध्यति" ह्या वाक्यांत हें तत्व उत्तम रीतीनें प्रस्थापित केलेलें आहे. परंतु भांडखोर प्रयत्नवादी सर्व श्रेय प्रयत्नांनाच देतात व दैवाला तुच्छ करून टाकतात. उलटपक्षीं, अतिमनस्वी दैववादी दैवावरच सर्व हवाला ठेवून प्रयत्नांची किमत कवडीमोल समजून चालतात. परंतु हे दोन्ही पक्ष चुकलेले आहेत. केवळ प्रयत्न हाच मुख्य असता तर अनेक युक्ति-प्रयुक्तींनीं मराठी राज्याचें तारूं वांचविणाऱ्या नाना फडणविसांच्या प्रयत्नांवर पाणी पाडण्याकरितां सवाई माधवरावांनीं कारंजावर उडी घेतलीच नसती, आणि जर दैव हेंच मुख्य असतें तर महायुद्धांत पराभव पावल्यानंतर देखील आपल्या तरवारीच्या बळावर केमालपाशानें तुर्कस्थानचें डळमळणारें साम्राज्य जें सांवरून धरलें तें त्याला कधींहि सांवरतां आलें नसतें.

तेव्हां दैव, प्रयत्न हीं मनुष्याच्या जीवनाचीं दोन निदानें आहेत, ही गोष्ट निर्विवाद आहे. प्रश्न एवढाच कीं, त्यांचें प्रमाण कोणतें ? मनुष्याचें जीवन जर १०० अंशांचें मानलें तर त्यांत दैव किती अंश आहे व प्रयत्न किती अंश आहे ? ह्या अवघड प्रश्नाचें उत्तर देण्याची आतांच आवश्यकता नाहीं, तूर्त आम्हीं एवढेंच सांगतों कीं, मनुष्याची जों जों प्रगति होत जाईल तों तों दैवाचा अंश कमी कमी होत जाऊन प्रयत्नांचा विषय (Scope) वाढत जाईल. परंतु अजून ह्या परिपक्वतेला अवकाश आहे, तोंपर्यंत दैवाचें प्राबल्य मनुष्याचे जीवनक्रमांत सध्यांप्रमाणेंच राहणार हें उघड आहे.

ह्या दैवाचें स्वरूप वर्णन करतांना त्याच्या उग्रतेचें स्वरूप कोणाला भयावह वाटूं नये म्हणून आधुनिक विद्वानांनीं त्यास परिस्थिति असें नाजूक नांव दिलेलें आहे. परंतु परिस्थिति म्हणजे दुसरें तिसरें कांहींएक नसून मनुष्याच्या आटोक्यावाहेर असलेली दैवशक्तिच होय यांत संशय नाहीं. ही दैवशक्ति त्यांस नाचवीत असते, गांजीत असते, त्यांस निस्तेज व निष्काम करून टाकीत असते. पुष्कळ वेळां तो नको नको म्हणत असतांहि ती त्यास प्रकाशांत ओढते, त्याचेवर सुखांचा वर्षाव करते, त्यानें कोणत्याही प्रकारचा हेतुपुरःसर प्रयत्न केला नसतांहि त्याला जय, सिद्धि व यश देत असते. अशा रीतीनें परिस्थिति मनुष्याला मारते व परिस्थितिच मनुष्याला तारते. मनुष्याचें आयुष्य ती चमत्कृतिपूर्ण व अतर्क्य बनवीत असते. पण त्या वेळीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, परिस्थिति ही अद्भूत अशी एखादी शक्ति नसून केवळ पूर्वजन्मार्जित कृत्यांचाच तो परिणाम असतो. आपण जें पूर्वी केलें तीच परिस्थिति. जें पूर्वी आपण संपादून ठेवलें तेंच दैव ! नशीव म्हणजे काय ? तर आपल्या पूर्वजन्मींच्या कृत्यांवरून आपल्यासाठीं जें ठरविलें गेलें तें फळ !

हें फळ आपणांस अज्ञात असतें; पण तें आपण जन्मास येण्यापूर्वीच ठरविलें गेलें असतें यांत संशय नाही. एखादा आरोपी कोर्टांत येण्यापूवी तो सुटणार कीं शिक्षा पावणार हें त्याला माहीत नसतें. पण जरी त्याला तें माहीत नसलें तरी त्याच्या मुकदम्यांत न्यायाधीशानें तें लिहिलेलेंच असतें. आरोपीला तो खात्रीनें भविष्यकाळ असेल. पण न्यायाधीशाला तो भूतकाळच असतो. न्यायाधीशानें फैसल्ला वाचायला घेतल्याबरोबर आरोपीच्या अंगाला कांपरें भरत असेल व त्यावेळीं तो आपल्या दैवाची पारख करीत असेल; पण त्याच्या दैवाची पारख अगोदरच झालेली असते ! त्याची शिक्षा किंवा मुक्तता अगोदरच निश्चित होऊन गेलेली असते. न्यायाधीशाच्या कारकुनांशीं किंवा त्याच्या प्रेमांतल्या मुलाशीं आरोपीची ओळख असेल तर कोर्टांत येण्यापूर्वीच त्याला आपला फैसल्ला माहीत करून घेतां येईल आणि मग फैसल्ला ऐकतांच थर थर कांपण्याचे ऐवजीं त्याला अगोदरच पेढ्याचे पुडे किंवा जामिनगिरीसाठीं ऐपतदार माणसें कोर्टांत आणून ठेवतां येतील.

तेव्हां ज्याला आपण भविष्यकथन म्हणतों तें भविष्यकथन नसून भूतकथन असतें हें उघड आहे. एखादा ज्योतिषी हातांत कुंडली घेऊन ज्या वेळीं तुम्हांला 'पुढें' अमुक अमुक होईल असें सांगायला लागतो त्या वेळीं आपल्याविषयीं 'मागेंच' जो काय निर्णय ठरून गेलेला आहे त्याचेंच कथन तो करीत असतो. ज्योतिषशास्त्रांतील 'कथन' हा शब्द फारच फसवा आहे, किंबहुना ज्योतिषशास्त्रांत 'भविष्य' कथन आहे. ज्योतिषशास्त्र काय सांगतें? तर आपलेसंबंधानें जें कांहीं होऊन गेलेलें आहे तेंच सांगत असतें. मात्र असें सांगत असतांना पुढील गोष्ट सांगण्याचा तें आव आणतें, व त्यास भविष्यकथन असें नांव देतें. न्यायाधीशाच्या कारकुनानें फैसल्ल्याचे कागद घरीं वाचून ठेवून आरोपीपुढें गंभीरपणाच्या नाटकी मुद्रेनें भविष्यकथनाचा डौल आणण्यासारखेंच हें आहे. ह्यांत भविष्यकथन कसलें? जें होऊन गेलें तें सांगण्यांत भविष्याचें काय कथन आहे?

आपल्या आयुष्याचे दोन भाग आहेत हें वर सांगितलेंच आहे. त्यांतील एक भाग निश्चित स्वरूपाचा असतो व एक भाग अनिश्चित स्वरूपाचा असतो. अनिश्चित स्वरूपाचा जो भाग तो प्रयत्नाचा प्रान्त! तो सुखावह करणें किंवा दुःखदायक करणें हें आपल्या हातांत आहे, परंतु त्यांतील जो निश्चित भाग—हेंच दैव, हीच परिस्थितीची भवितव्यता! ही भवितव्यता म्हणजे निसर्गाच्या न्यायाधीशानें आपल्याविषयीं लिहिलेला फैसल्ला! आपण जन्मास येण्याचे पूर्वीच निसर्गाच्या न्यायाधीशाचा त्याचेवर सही-शिक्का झालेला असतो व मग त्यांतलें एक अक्षर देखील कुणाला बदलतां येत नाहीं. कोर्टाची 'डिक्री' आणि ही 'डिक्री' सारखीच, आणि म्हणूनच त्यास 'Decree of Fate' (दैवाचा हुकूमनामा) असें इंग्रजीमध्यें नांव आहे. Decree of Fate च्यापुढें कुणाचें चालायचें नाहीं. तिचेपुढें मान वांकवलीच पाहिजे.

परंतु ज्याप्रमाणें न्यायाधीशाचा फैसल्ला अगोदर समजला तर आपणांस आगाऊ तजविजी करून ठेवतां येतात, त्याप्रमाणें Decree of Fate जर अगोदर समजली तर त्याप्रमाणें आपणांस अगोदर तजविजी

करून ठेवायला सांपडतील. भवितव्यतेचा हुकूमनामा अगोदर समजल्यानें आपण जे प्रयत्न करीत असतों त्या प्रयत्नांवरचीं कितीतरी संकटें आपणांस टाळतां येतील! भवितव्यतेचा हुकूमनामा अगोदर समजून घेण्यानें आपल्या प्रयत्नांना दुजोरा आणतां येईल—मानवी कर्तबगारी आपणांस जास्त समर्थ व कमी संकटग्रस्त करून दाखवितां येईल. भवितव्यता समजून घेणें हा निसर्गाचा अपमान नव्हे, ज्ञानाचा दुरुपयोग नव्हे, किंवा परमेश्वराविरुद्ध बंडखोरीहि नव्हे. हा तर उन्नतीचाच एक प्रकार आहे व ह्यास ज्योतिषशास्त्र सहाय्यभूत होत असेल तर त्याचा उपभोग करून घेतलाच पाहिजे.

कोर्टाच्या हुकूमनाम्यांत प्रत्येक तपशील ज्याप्रमाणें स्पष्ट शब्दांत लिहिलेला असतो त्याप्रमाणें Decree of fate मध्येंहीं प्रत्येक गोष्ट स्पष्टपणें लिहिलेली असते. आपणांस कोणाचे पोटीं जन्म येणार, आपला जन्मदेश कोणता होणार, आपली विद्या कोठपर्यंत होणार, आपण कोणता धंदा करणार, आपली जन्माची सोबतीण कोण होणार, व तिचेपासून आपणांस किती सुख होणार वगैरे सर्व गोष्टी स्पष्ट लिहिलेला हुकूमनाम्याचा कागद बरोबर घेऊन आपण या जगांत प्रवेश करतों. हा हुकूमनाम्याचा कागद आपण उलगडला कीं,

**ही स्त्री पत्नी तव कां झाली ?**
**ह्याची सुतातें ही कां व्याली ? ॥**
**कां मी येथें ? तूं येथें कां ?**
**कां ही भूमी ? जन्महि हा कां ? ॥**

हें सर्व आपणांस समजतें; पण हें समजून घेण्यास श्रीशंकराचार्यांसारखी तीव्र जिज्ञासा आपल्या अंगीं पाहिजे. निसर्गाच्या न्यायाधीशाचे बारनिशी-कचेरींत जाऊन त्याच्या हुकूमनाम्याचा कागद वाचण्याची हिंमत अंगांत पाहिजे. ज्या प्राचीन ऋषींचे अंगांत ही हिंमत होती व ज्या अर्वाचीन शोधकांनीं ही हिंमत धरली ते बुद्धिशक्तीनें सूर्यावर गेले; मंगळावर चढले, शनीवर अधिष्ठित झाले, हर्शल नेपच्यूनच्या डोक्यावर जाऊन बसले व तेथून Decree of fate हुकुमाचे आदेश त्यांनीं जमा केले. कारण अंतर आणि अवधि ह्यांची जरी मनुष्याला आडकाठी असली तरी निसर्गाला

त्यांची आडकाठी नाहीं ! आणि मनुष्याला तरी त्यांची आडकाठी कोठपर्यंत आहे ? तर त्याचे शरीरापर्यंत आहे—मनुष्याचे मनाला ही आडकाठी लागू नाहीं. विचक्षण बुद्धीनें निसर्गापुढें उभें राहून जर प्रत्येक अज्ञात प्रश्नासंबंधानें तो कां ? कां ? कां ? कां ? असे प्रश्न निसर्गाला विचारीत जाईल तर निसर्गही त्याचे बुद्धीस रविचंद्रांचे प्रांत मोकळे करून देईल; एवढेंच नव्हे तर सर्व अपर्याप्त विश्व खुल्या दिलानें आपल्या गूढांवरील झांकण त्याचेपुढें उकलील; परंतु तितकी ज्ञानतृषा त्याला पाहिजे. आजपर्यंत ज्योतिषशास्त्र जें बनलेलें आहे तें अशा ज्ञानतृषेमुळेंच बनलेलें आहे आणि उत्तरोत्तर ज्योतिषशास्त्राला जर पूर्णावस्था यायची असेल तर तीही अशा ज्ञानतृषेमुळेंच येईल.

येणेंप्रमाणें ज्योतिषशास्त्राचा पाया आहे. ज्योतिषशास्त्राची उत्पत्ति जिज्ञासेमुळें झालेली आहे. निसर्गाच्या व्यापक अवलोकनामुळें त्याची वाढ झालेली आहे व त्यांतील भविष्यकथन हें वस्तुतः भविष्यकथन नसून भूत वस्तूंचेंच कथन आहे. प्रयत्नवादाशीं ज्योतिषशास्त्राचा विरोध नाहीं. प्रयत्नवादास तें सहाय्यभूतच आहे—किंबहुना निसर्गाच्या अफाट विस्तारामध्यें निर्भयतेनें प्रवेश करून भवितव्यतेचीं आज्ञापत्रें वाचण्याचा हा अत्यंत छातीठोकपणाचा प्रयत्न आहे. आतां प्रश्न एवढाच आहे कीं, हा ' प्रयत्न ' आहे, ज्योतिषशास्त्रानें आजपर्यंत कांहीं तरी सत्यसिद्धांत काढले असतील तरच या प्रयत्नाला शोभा आहे, नाहीं तर हा प्रयत्न अस्थानीं आहे असें म्हणावें लागेल हें उघड आहे. तेव्हां या शास्त्राच्या सांगोपांग विचारासाठीं ज्योतिषशास्त्राचा एकेक सिद्धांत घेऊन त्याच्या उपयुक्तता—अनुपयुक्ततेचा निःपक्षपात दृष्टीनें विचार केला पाहिजे. ह्या सर्व सिद्धांतांचा साकल्यानेंहि विचार करणें जरूरीचें आहे. ह्या दोन्ही तऱ्हेनें ज्यावेळीं या शास्त्राचें परीक्षण करावें त्याचवेळीं त्याचेविषयींची चर्चा पूर्ण होईल. ज्योतिषशास्त्राची ह्या दोन्ही तऱ्हेनें चर्चा करण्याचा आमचा विचार आहे; परंतु मासिकाची पृष्ठमर्यादा संभाळणें आवश्यक असल्यामुळें हा लेखांक येथेंच पुरा करतों.

---

# * लालबदामची तिरीं !

:o:

आपण या हिंदुस्थान देशांत जन्मास आलों हें आपलें खरोखर भाग्य होय. हा हिंदुस्थान देश जन्माला येण्यास योग्य आहे. या देशांत जन्मास येणें फार दुर्मिळ आहे असें पूर्वी मानीत असत, आणि नभोवितानांत स्वतःस लटकावून घेणारा सूर्य जरी लक्ष वेळां या देशांतील सौंदर्यरस आटवून गेलेला आहे, तरी या देशाची चारुता तिळमात्रहि कमी झालेली नाहीं. हवामानांतील ज्या अत्युत्कट विरोधी दशा भूपृष्ठावरील इतर भागांत आपणांस आढळून येतात, त्यांनीं या हिंदुस्थानांत मधुर समेट केलेला आहे. अति उष्ण नाहीं, अति शीत नाहीं, अशी उत्तम मध्यमावस्था या देशांतील प्रकृतिमानानें ठरल्यामुळें सर्व विलासी जनांना निवास करण्यास योग्य असा हा देश झालेला आहे. पूर्वकालीन आर्य लोक उत्तर ध्रुवाजवळील आपलीं बर्फमय घरें सोडून या हिंदुस्थानांतच रहावयास आले. सेमिरामीस राणीला आपला देश पुरेसा न वाटून हिंदुस्थान देश आपल्या विलासाकरितां असावा, अशी हौस वाटली. शिकंदर बादशहाची, सर्व जग जिंकूनसुद्धां, तृप्ति झाली नाहीं. त्याला असें वाटलें कीं, सर्व जग जरी आपल्या ताब्यांत असलें आणि हा हिंदुस्थान देश आपल्या करग्रहणाच्या बाहेर राहिला तरी आपलें जीणें व्यर्थ होय. महंमदाच्या पायापाशीं एकनिष्ठतेच्या शपथा घेऊन निघालेले मुसलमान वीर जितक्या प्रेमानें हिंदुस्थानांत शिरले, तितक्या प्रेमानें जिब्राल्टरच्या सामुद्रधुनींत देखील ते घुसले नाहींत. एका हरिणशिशूचा प्राण वांचवून हरिणाला संतुष्ट केल्याबद्दल अल्लानें सबक्तगीनास जो उत्तमोत्तम आशिर्वाद म्हणून दिला तो हाच कीं, 'तुला हिंदुस्थानचें राज्य प्राप्त होईल.' तीन बोटी, आणि नाखुष नावाडी हे घेऊन जेव्हां कोलंबस जगत्–शोधास निघाला, त्या वेळीं त्याला अशीच आसोशी होती कीं, हिंदुस्थान देश माझ्या नजरेस पडावा. वास्को-डि-गामा पोर्तुगीज देशांतून ज्या वेळीं निघाला, त्या वेळीं

---

* संदेश, २० जुलई १९१५.

त्यानें अशीच येशुप्रार्थना केली कीं, हिंदुस्थान देश मी आपल्या डोळ्यांनीं पाहिला पाहिजे. क्लाइव्ह आणि हेस्टिंग्ज अशांसारख्या कार्यकर्त्या पुरुषांनीं इंग्लंडांतील आपल्या भगिनींची भाऊबीज सार्थ करण्याकरितां, त्यांच्या तबकांत अपूर्व देणगी टाकली ती हिंदुस्थान देशाचीच होती. लॉर्ड कर्झन, यांनीं इंग्लंडच्या अपार वैभवाचें वर्णन करतांना इंग्लंडच्या देदिप्यमान राजमुगुटांतील कोहिनूर-हिऱ्याची उपमा हिंदुस्थान देशासच दिली. आज आणीबाणीच्या वेळीं हिंदुस्थान देशच इंग्रजी साम्राज्याच्या चिरस्थायीपणाकरितां शोण नदीप्रमाणें आपल्या शरीरांतून, आपल्या स्नायूंतून, शोणिताचे प्रवाह वाहवीत आहे. आपल्या अंकित असलेल्या सर्व प्रदेशांत हिंदुस्थान देशच पंचम जॉर्ज बादशहांस अत्यंत प्रिय आहे. आणि प्रबल इंग्रज सरकारशीं अविचारानें युद्धाकरितां कंबर कसीत असतांना महत्त्वाकांक्षी कैसरसुद्धां हिंदुस्थानकडेच सापेक्ष नेत्रकटाक्ष फेंकीत असला पाहिजे. असा हा हिंदुस्थान देश अत्यंत थोर योग्यतेचा आहे. कैलासनाथाच्या पवित्र चरणरजांनीं पूनीत झालेल्या हिमनगानें आपल्या अंकावर हिंदुस्थान देशास लाडानें घेतलेलें आहे. रत्न-भांडारांत कुबेरशाहीशीं स्पर्धा करणाऱ्या चतुःसमुद्रांनीं या हिंदुस्थान देशास प्रेमानें विळखा घातलेला आहे. मलय पर्वतापासून निघालेले व सुगंधानें डवडवलेले सुखकर वारे या हिंदुस्थान देशास विंझणा घालीत आहेत. अनेक रम्य वल्ली, अनेक पल्लव-लतिका, अनेक मृदु कुसुमें आणि अनेक सुकुमार वल्लरी यांनीं ह्या हिंदुस्थान देशांत नंदनवनाचा थाट उडवून दिलेला आहे. या हिंदुस्थान देशास पाहिल्याबरोबर प्रेमानें द्रवलेल्या मेघमंडलास, पर्जन्यरूपानें प्रकट होणाऱ्या प्रत्येक आनंदाश्रूबरोबर वनस्पति, वृक्ष आणि कुंजनिकुंज हे जोराचें प्रत्युत्तर देत आहेत. वनराज केसरीपासून तों, 'तृणावर उपजीविका करून आपल्या गोरसाची लयलूट करणाऱ्या पयस्विनींपर्यंत सर्व प्राणीवर्ग ह्या हिंदुस्थान देशास नटवीत आहे. पर्जन्य–नक्षत्रांतील अंबुकणांकरतां तरल होणारे चातकपक्षी, आपल्या चारुचित्रित पिसाऱ्यामुळें इंद्रधनुष्याचीहि शोभा हरण करणारे मयूर, अबलाजनांचा दुःखपरिहार करण्याकरितां संतापानें लाल होऊन रावणासारख्या बलाढ्य दानवाशीहि झुंज खेळण्यास प्रवृत्त होणारे गृध्र, आपल्या कलकंठानें गंधर्वांनाहि खालीं पहावयास

लावणारे कोकिल आणि आपल्या प्रियकरिणीपासून क्षणाचाहि वियोग झाला असतांना अधीर होणारे चक्रवाक् यांनीं ही भूमि भूषविलेली आहे. या हिंदुस्थान देशास पूर्वीं सूवर्णभूमि असें जें नांव होतें, तें अत्यंत अन्वर्थक होतें. या भूमीचा वर्ण अत्यंत सुंदर आहे. येथील वर्णव्यवस्था अत्यंत सुंदर होती. येथोल वर्णमालिका अजूनहि अत्यंत सुंदर ठरत आहे, आणि सुवर्णाचे निधि, सुवर्णाचे प्रासाद, सुवर्णाचीं अद्रिशृगें आणि सुवर्णतंतूंनीं भूषविलेलीं येथील लोकांचीं महावस्त्रें यांनीं तर या देशांतील सुवर्णाचा सुकाळ सर्वांचे दृष्टोपत्तीस आणिलेला होता. खरोखर या देशासारखा सुंदर देश दुसरा कोणताहि नसेल. अशा देशांत जन्मास येणें यापेक्षां दुसरें भाग्य कोणतें ?

अशा या देशावर प्रेम करणारे सध्यां त्याच्या प्रेमाचे तीन अधिकारी आहेत. यांपैकीं पहिले अधिकारी हिंदुस्थान देशांतील सरकार हें होय. सरकारचें हिंदुस्थान देशावर अत्यंत प्रेम आहे. हिंदुस्थान देश सरकारास हवा आहे. हिंदुस्थान देशावांचून सरकारास करमावयाचें नाहीं. इंग्रज राज्यकर्त्यांपैकीं कित्येकांनीं तर असेहि उद्‌गार काढलेले आहेत कीं, आमचें सर्वस्व गेलें तरी पत्करलें, परंतु आम्हीं हिंदुस्थान देश आपल्या हातचा जाऊं देणार नाहीं. इतकें अलोट प्रेम राज्यकर्त्यांचें हिंदुस्थानावर आहे. या हिंदुस्थानचे भूमीचा अभिमान धरून रेल्वेरूपी वेण्यांचे गोंडे हिंदुस्थान सरकारनें हिंदसुंदरीच्या पाठीवर झळकावयास लावलेले आहेत. हिंदुस्थानकरितां इंग्रज सरकारनें जय्यत फौज ठेवली असून हिंद–सुंदरीचे नखासहि कुणाचा स्पर्श होऊं नये, म्हणून तिच्या उशाशीं अफगाणिस्थानचे अमीराप्रमाणें दक्ष पहारेकरी बसवून ठेवलेला आहे. हिदुस्थानचे तर्तूदींत एकंदरींत यत्किंचित्‌हि न्यूनता येऊं नयें या उद्देशानें इंग्लंडांतील अति हुषार अधिकारी हिंदुस्थान सरकार प्रत्यहीं आणीत असून त्यांना हिंदुस्थान देशांतील दक्ष अधिकाऱ्यांचीहि अमोलिक जोड दिलेली आहे. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें या रत्नाचा उज्ज्वल खडा साम्राज्यसरकारनें आपल्या मुगुटांत बसविला असून तो कधींहि पडणार नाहीं अशी खबरदारी इंग्रज सरकार घेत आहे.

हिंदुस्थानवर निःसीम प्रेम करणारा आणखी एक वर्ग म्हटला म्हणजे, राष्ट्रीय पक्ष हा होय. हिंदुस्थान देश यास फार प्यारा आहे. हिंदुस्थान हें नांव

उच्चारलें कीं, या पक्षाच्या अंतःकरणांतील सर्व वृत्ती थरारून जातात. हिंदुस्थान देशाकडे पहातांना, त्याची कीर्ति श्रवण करतांना, त्याच्या भाग्योदयाचीं रम्य कल्पना-चित्रें काढतांना राष्ट्रीय पक्षाचीं सर्व गात्रें प्रेममय झालेलीं दिसतील ! हिंदुस्थान देशाचा उत्कर्ष हें राष्ट्रीय पक्षाचें ध्येय आहे. हें ध्येय साधीत असतां, आपली काया कुरवंडून टाकावी आणि आपले प्राण त्या ध्येयावरून ओंवाळावे असें या पक्षास वाटत असतें. हिंदुस्थान देशाच्या निरक्षेप सेवेचें कंकण बांधून राष्ट्रीय पक्ष सरसावलेला आहे. या सेवेपुढें, मातृभूमीच्या या अर्चना-पुढें त्यास सौख्य, विलास आणि उपभोग यांपैकीं कशाचीहि किंमत वाटत नाहीं. राष्ट्रदेवतेच्या ध्यानांत निमग्न असतांना त्याच्या प्रेमाच्या ऊर्मि इतक्या तदाकार होऊन जातात कीं, त्यांचेपुढें तहानभूकहि हरपून जाते. भक्त जितक्या भक्तीनें आराध्य-देवतेची उपासना करतो, वत्स जितक्या मायेनें आपल्या आईस बिलगतो, सेवक जितक्या स्वामिनिष्ठेनें स्वामीकार्यासाठीं स्वहिताची आहुति देण्यास तयार होतो, तितक्याच निष्ठेनें, तितक्याच अनन्यगतिकत्वानें राष्ट्रीय पक्ष राष्ट्राची सेवा करण्यास सिद्ध होतो. राष्ट्राचा व्यवहार हाच राष्ट्रीय पक्षास आपला व्यवहार वाटतो, राष्ट्राची काळजी हाच राष्ट्रीय पक्षास त्याचा संसार झालेला असतो, राष्ट्राचें जीवन यांतच राष्ट्रीय पक्ष आपलें जीवन मानतो. राष्ट्राच्या प्रेमांतूनच राष्ट्रीय पक्षाचा जन्म झालेला अस-ल्यामुळें आणि राष्ट्राच्या प्रेमांतच त्याचें अवसान व्हावयाचें ठरल्याकारणानें राष्ट्रीय पक्षाचें शरीर म्हणजे राष्ट्रप्रेमाचा मूर्तिमंत आदर्शच बनलेला आहे. ह्या आदर्शाच्या कोणत्याहि भागांतून पाहिलें तरी राष्ट्रप्रेमाचें प्रतिबिंबच नजरेस येतें व हें प्रतिबिंब पाहून प्रेक्षकाची दृष्टीहि राष्ट्रप्रेमानेंच प्रेमगुणित होऊन जाते. हिंदुस्थान देशाच्या कल्याणाशिवाय राष्ट्रीय पक्षास निराळें आयुष्य नाहीं. आणि हें आयुष्य किती दीर्घ असावें यासंबंधानेंहि राष्ट्रीय पक्षानें राष्ट्रास मर्यादा ठरवून दिलेली नाहीं. " मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु " हें भगवंतांनीं गीतेंत दिलेलें आज्ञापत्र शिरसावंद्य मानून राष्ट्रीय पक्षानें या भारतभूमीस असें विनविलें आहे कीं, ' हे मातृभूमि, माझें चित्र तुझ्या स्वाधीन आहे, मी तुझा भक्त आहें, माझ्या आत्महिताचें तुझ्या प्रीत्यर्थ यजन करण्यास मी तयार आहें. तुझ्या चरणी माझा सदोदित प्रणिपात असो.

हिंदुस्थान देशावर प्रेम करणारा तिसरा वर्ग म्हणजे नेमस्तपक्ष हा होय. याचा उगम कै. महादेव गोविंद रानडे अशांसारख्या थोर व्यक्तींपासून झाला आणि हा पक्ष स्वतःस जरी नेमस्त म्हणवीत असला तथापि त्याचें स्वदेशावरील प्रेम खरोखर निर्मर्याद आहे. हिंदुस्थान देशाची सध्यांची असंस्कृत स्थिति नाहींशी होऊन तिची सर्व बाजूनें उन्नति व्हावी, अशी न्या. मू. रानड्यांनीं आजन्म चिंता वाहिली, आणि याच चिंतेचा सशब्द प्रवाह कै. उमेशचंद्र बानर्जी, कै. मनमोहन घोष, ना. सुरेंद्रनाथ बानर्जी, आणि पं. मदनमोहन मालवीय यांच्या चित्तांतून अखंड वाहिला. ना. फेरोजशहा मेहता यांचेहि केंस राष्ट्राच्या चिंतेनें पांढरे झालेले आहेत. आणि आज वार्धक्यामुळें त्यांची कितीहि मूकवृत्ति झालेली असली, तथापि तो दुर्बलतेचा परिणाम होय, प्रेमशिथिलतेचा परिणाम नव्हे, अशी ग्वाही देण्यास हिंदुस्थानांतील वाटेल तो मनुष्य पुढें येईल. राष्ट्रप्रेमाची ही नेमस्तपक्षाची परंपरा अत्यंत उज्ज्वल आहे, आणि हिचा हिंदुस्थान देशाच्या पुनर्भाग्योदयावर ढळढळीत ठसा उमटेल याबद्दल आम्हांस संशय नाहीं.

सरकार, राष्ट्रीयपक्ष आणि नेमस्तपक्ष, अशी ही एक मजेदार "तिर्री" आहे, आणि ती हिंदुस्थान देशरूपी लालबदामाच्या सुंदर पानावर बसलेली आहे. हिचा परस्परसंबंध प्रेमाचा आणि उपयुक्ततेचा असला पाहिजे. हे तीन प्रेम-निर्झर एकाच राष्ट्रप्रेमसंचयास जाऊन मिळाले पाहिजेत. ह्या तिघांत सुसंवादित्व पाहिजे, विरोध असतां उपयोगी नाहीं. या तिघांचें एकमेकांस सहाय्य होऊन जेव्हां प्रयत्नांचा एक प्रचंड ओघ बनेल तेव्हांच भाग्योदयाचा दिवस जवळ येईल. या तिघांत परस्परांविषयीं जितका गैरसमज, द्वैतभाव, अथवा दूरीकरणाचा हेतु असेल तितका हिंदुस्थानच्या अंतिम उत्कर्षास अवकाश लागलाच पाहिजे. या तिघांत प्रत्येक जण व्यक्तिशः कितीहि प्रबल असला, तथापि खरें प्राबल्य या तिघांच्या मिलाफांत आहे, तुटकेपणांत नाहीं. एकाच हेतूच्या सिध्यर्थ जर हीं तिन्हीं सामर्थ्ये एकवटली, तर जर्मनच्या कैसर बादशहासच काय? परंतु कुणालाहि हिंदुस्थानकडे व त्यामुळें ब्रिटिश साम्राज्याकडे डोळा वर करून पहाण्याची छाती होणार नाहीं. सरकार, राष्ट्रीयपक्ष आणि नेमस्तपक्ष हे राष्ट्र-कल्याणरूपी शंकराचे तीन नेत्र आहेत. या तिन्ही नेत्रांनीं आपला दृष्टिक्षेप जर एकाच

विषयाकडे लावला तर हां हां म्हणतां संकटांची रक्षा होऊन जाईल. या तिघांतील संबंध, त्रिकोणाच्या तीन कोपऱ्यांप्रमाणें असला पाहिजे. हे तीन पक्ष म्हणजे एकाच देवालयांत राष्ट्रदेवीची उपासना करणाऱ्या तीन भजकांप्रमाणें असले पाहिजेत. एकाच स्त्रीवर प्रेम करणाऱ्या तीन प्रणयी पुरुषांप्रमाणें त्यांनीं एकमेकांसंबंधानें मात्सर्य अथवा हेवादावा बाळगतां उपयोगी नाहीं. सध्यां विश्वाची भवितव्यताही निरनिराळ्या राष्ट्रांच्या पत्त्यांचीं पानें बाहेर काढून तीं पिसण्याच्या बेतांत आहे. हा पत्यांचा डाव जोंपर्यंत भवितव्यता–देवीच्या हातांत आहे तोंपर्यंत ही लालबदामची तिर्री सर्वांच्या वर येऊन आपलें प्रेमवर्चस्व गाजवील तर फार उत्तम होईल. [1]लाल बदामाच्या तिर्रीचा चित्रपट छत्तीस हजार फूट लांब आहे असें म्हणतात. परंतु आमची तर खात्री आहे कीं, भवितव्यतेच्या हातांतील पत्याच्या डावांत जर हिंदुस्थानच्या उत्कर्षाची लाल बदामाची तिर्री वरती येईल तर छत्तीस हजार वर्षेंच काय पण हिंदुस्थानचें राष्ट्र अनंत काळपर्यंत टिकणारें होऊन त्याच्या भाग्योदयास मर्यादाच रहाणार नाहीं.

१ त्यावेळीं लोकप्रिय झालेल्या एका चित्रपटाचें नांव.

## जगांत वागावें कसें ?

जगांतले व्यवहार आपण इतके मन लावून करावे कीं जणूं कांहीं सर्व जग कायमचें टिकावयाचें आहे, आणि हे व्यवहार करीत असतां आपण मनांतून इतकें अलिप्त रहावें कीं, हे सर्व व्यवहार कोसळले तरी आपल्या मनाला जणूं कांहींच त्याची बाधा होणार नाहीं. जग ही कायमचें प्रेम करण्याची जागा नव्हे; कारण त्यांतली एकही वस्तु अशी नाहीं कीं, जी कायमची आहे. पण जग ही इतकी मिथ्या वस्तु खास नाहीं कीं जिचेकडे कानाडोळा केला तरी चालेल. ती खरी मानावी तेव्हां तिच्यांतले व्यवहार सार्थ होतात, व ती मिथ्या मानून चालावें तेव्हां स्वतःला अलिप्त करून घेतां येतें. तेव्हां सोन्यासारखा नियम असा कीं, जगांतले व्यवहार दक्षतेनें केले पाहिजेत, जगांतल्या व्यवहारांत कधींहि चुकतां उपयोगी नाहीं. जगांतले व्यवहार इतके चोख केले पाहिजेत कीं जग हेंच जणूं आपलें ध्येय आहे.

युगांतर—ता. २३ मार्च १९२४.

# * कोळसा, लोखंड आणि बर्फ !

इंग्लंडची हवा अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं तिथें कांहीं गोष्टी अतिशय स्वस्त व कांहीं गोष्टी अतिशय महाग आहेत. इंग्लंडमधील अतिशय स्वस्त चीज म्हणजे इंग्लंडमधील कोळसा ही होय ! इंग्लंडमधील लोक अतिशय गोरे आहेत; इंग्लंडमधील लोक पांढरे चक्क आहेत. परंतु इंग्लंडमधील कुदरतीचा असा कांहीं दोष आहे कीं, तेथें साहजिकच रीतीनें सांपडणारी वस्तु अतिशय काळी आहे ! विशेष गंमत अशी कीं ही काळी जिन्नस बाहेर रहात नाहीं, ती खाणींत असते, भूगर्भात राहते. ती जमिनीच्या अंतरंगांतील कभिन्न अशी स्थिति फारशी स्पृहणीय नव्हे. ही स्थिति वाईटच ! ही स्थिति एका प्रकारें लाज उत्पन्न करणारीच असते. परंतु इंग्लंडमधील कुदरतीचाच तो दोष आहे. त्याला जणुं कांहीं उपायच नाहीं. इंग्लंडची जमीन किती पांढरी असते ! इंग्लंडमधील शुभ्र भूमि पाहिली म्हणजे असें वाटतें कीं सृष्टिसुंदरीच्या आगमनाकरितां इंग्लंडच्या आर्जवी मुत्सद्यांनीं जणूं कांहीं परीटघडीच्या पायघड्याच घातलेल्या आहेत. जणूं कांहीं हिच्यापासून ह्या मुत्सद्यांना एखादें मोठें घबाड मिळायचें आहे आणि पूर्वी दिल्लीच्या बादशहाकडे ते जसे आर्जवानें व नम्रतेच्या वहाण्यानें गेले त्याचप्रमाणें जणुं कांहीं सृष्टिसुंदरीला पाहुणचारानें गारेगार करण्याचा ह्यांनीं संकल्प केलेला आहे. ह्यांतही ज्यावेळीं इंग्लंडच्या जमिनीवर बर्फाचा नाजूक थर पडतो त्यावेळीं तर असें वाटतें कीं, जन्मकुमारी राणी एलिझाबेथ आपल्या प्रत्येक प्रियकराकडे पाहून गालांतल्या गालांत जें हंसत होती त्याचा तर हा थर नव्हे ना ? जेम्स पदच्युत झाल्यानंतर त्याची राणी ज्यावेळीं घाईघाईनें गलबतांत बसावयाला निघाली त्यावेळीं तिचें तें भ्यालेलें सौंदर्य तर इथें विरून पडलें नसेल ना ? अथवा सर्वांगसुंदरी राणी अलेक्झांड्रा ह्रिच्या राज्यकर्तृत्वाची गोमटी आशा एडवर्ड बादशहांच्या आकस्मिक दुखण्यामुळें कंपायमान झाली त्यावेळीं त्या आशेचे नाजूक सर

---

* युगांतर ३० मार्च १९२८.

तर इथें तुटून पडले नसतील ना ? पण असे उमदे उमदे विचार मनांत यावे तों एकदम अंतःकरणांत चर्र होतें व अशी आठवण होते कीं अरे, ह्या पांढरेपणाखालीं काळाकुट्ट काळेपणा आहे. ह्या पांढरेपणाच्या हृदयांत कोळशांच्या खाणींचा काळेपणा पसरलेला आहे.

काय त्या कोळशाच्या खाणी ! मैलोगणती लांब व मैलोगणती रुंद ! एखाद्यानें पाहिलें तर त्याला भयच वाटावयाचें ! कारण तेथें सगळें काळें, काळें, काळें ! तिथें शुभ्रतेला जणूं अवकाशच नाहीं. असें वाटतें कीं कुदरतीनें इंग्लंडच्या पोटांत इतका काळेपणा भरून तरी केव्हां ठेवला ? तिनें हें काम किती दिवस चालविलें होतें व ह्या कृष्णकर्मांकरितां ती किती रात्री खपत होती ? दिवसाचे उजेडांत असलें काळें कृत्य कुणाला करतां येणेंच शक्य नाहीं. हें कृत्य सूर्य मावळल्यानंतरच केलें असलें पाहिजे. हें कृत्य अंधारांतच केलें असलें पाहिजे. काय अंधारी कृत्य हें ? ह्या कृत्यांचा वास लागल्यामुळें कीं काय, सूर्य इंग्लंडवर पूर्ण तेजानें प्रकाशायला लाजतो व आपल्या प्रकाशनासाठीं ब्रिटिश साम्राज्यांतलीं इतर ठिकाणें शोधीत असतो. इंग्लंडमध्यें आलें म्हणजे सूर्याचें तेज निम्मे कमी होतें असें म्हणतात! कसें नाहीं होणार ? एखाद्या मोहोरेदार नटमोगरीचा म्हातारा नवरा जरी लफ्फेदार पीतांबर नेसून सत्यनारायणाच्या वेळेला तिच्याजवळ जाऊन बसला तरी त्याचें तेज पडत नाहीं, कारण त्याच्या जरतारी पीतांबरांत जितकी झळाळी झळकते तितकीसुद्धां त्याच्या चेहऱ्यावर झळकत नाहीं. इंग्लंडमध्यें सूर्याची अशीच गत होते. तो तिथें कोणत्या तोंडानें प्रकाशणार ? कारण त्या भूमीच्या अंतरंगांत त्या काळेपणाच्या खाणी आहेत ना ? चंद्रावर थोडासा डाग दिसला, त्याबरोबर शास्त्रज्ञांनीं आणि कवींनीं तोंड गोरेंमोरें केलें. मग जिथें अंतरंगांत काळेपणाच्या खाणी तिथें सूर्याचा दिल खुला कसा होणार?

बरें, इंग्लंडच्या भूमीच्या उदरांत हा एवढाच काळेपणा असता तरीहि कांहीं हरकत नव्हती. पण तसेंहि नाहीं. कारण कोळशांच्या खाणींच्या बरोबर लोखंडाच्या खाणी हृदयांत भरलेल्या आहेत. लोखंड झालें तरी तेंहि काळेंच. जितका कोळसा काळा तितकेंच लोखंडहि काळें ! त्यांच्यांत जास्ती काळें कोण ह्याची जणूं कांहीं स्पर्धा लागलेली ! बाळाजीपंत नातू जास्ती नीच

कीं मिरजाफर जास्ती नीच ह्यांतलाच जणूं कांहीं प्रकार! कोळसा उगाळावा तितका काळा अशी म्हण आहे. पण लोखंडाचे बाबतींत तेंहि नाहीं. कारण तें उगाळतांच येत नाहीं. किती कठीण! हॉर्निमनचे बाबतींत मुंबई कौन्सिल जितकें कठिण. तितकें तें कठिण! नारायणरावाचें बाबतींत आनंदीबाईचें हृदय जितकें कठिण, तितकेंच तें कठिण! रामाचे बाबतींत कैकयीचा आग्रह जितका कठिण, तितकेंच तें कठिण! तें उगाळणार कुठून व कोणत्या बाजूनें?

अशी ही इंग्लंडची स्थिति आहे. ही स्थिति फार चमत्कारिक आहे. ही स्थिति फार घोटाळ्याची आहे. लोकांना चकविणारी ही स्थिति आहे! बाहेर स्वच्छता व आंतून काळेकुट्टपणा! बाहेर सफेती आणि आंत काळेकुट्ट डाग! बाहेरून स्वच्छ चादर आणि आंतून काळेंच काळें! काय हा दुहेरीपणा! कुदरतीचा हा केवढा दोष! पण हा दोष इंग्लंडचे मागें लागलेला आहे. बाहेरून बर्फाचा स्वच्छ रुजामा पसरून आंत लोखंड व दगडी कोळसा ह्यांच्या खाणी उत्पन्न करणाऱ्या कुदरतीनें इंग्लंडमधील डकम् डकम् (Sea-Saw)चा जणुं खेळच मांडलेला आहे! तिथें कुदरतीनें जणुं कांहीं ऊन–पावसाची क्रीडाच चालविलेली आहे! कुदरतीनें जणुं कांहीं इंग्लंड हें विरोधाभासाचें मुख्य मकाणच बनविलेलें आहे! गोपींनीं पूर्वी श्रीकृष्णाला जेव्हां शिव्या दिल्या, त्या वेळीं तूं बाहेरून जसा काळा आहेस तसाच आंतूनहि काळा आहेस असें त्या म्हणाल्या. त्यांच्या मतानें श्रीकृष्णाची जी चूक होती ती ही कीं, तो अंतर्बाह्य एक होता. आंत एक असावें व बाहेरून एक दिसावें ही कला त्याला माहीत नव्हती. बाहेर निराळें आणि आंत निराळें ही खुबी गोपींचे मतानें श्रीकृष्णाला साधलेली नव्हती. पण गोपींचे मतानें श्रीकृष्ण जिथें "फेल" झाला तिथें कुदरतीनें इंग्लंडला पूर्ण केलें! गोपींचें मतानें श्रीकृष्णाचें जिथें चुकलें तिथें कुदरतीनें इंग्लंडला सांवरून घेतलें! गोपींचे मतानें श्रीकृष्णाचें जिथें घसरलें तिथें कुदरतीनें इंग्लंडचें साधून घेतलें. मुत्सद्दीपणाच्या कलेची कुदरतीनें इंग्लंड ही जणू कांहीं सुधारून वाढविलेली आवृत्तीच काढली आहे. तिथें डकम् डकम् आहे, तिथें ऊन–पाऊस आहे. विरोधाभासाची जणू रंगलूट

आहे. तिथें खुबी आहे. तिथें कला आहे. तिथें मयसभा आहे. तिथें दुहेरी-पणा आहे, दुबोलीपणा आहे, दुटप्पीपणा आहे. तिथें कपटविद्या कुदरतीनें भरून ठेवलेली आहे. तिथें आंतून कोळशाच्या खाणी आहेत व बाहेरून बर्फाचें दुधासारखें शुभ्र पाणी आहे, तिथें आंतून लोखंडाचे पट्टे आहेत, व बाहेरून दंवाच्या झिरझिरीत रेशमाचें दुपट्टे आहेत! आंत कोळसा, बाहेर बर्फ! आंत लोखंड, बाहेर दंव! होय, इंग्लंडचे लोक अंतर्बाह्य उमदे आहेत पण कुदरतीनें बनविलेली इंग्लंडची भूमी मात्र अशी गमतीची आहे!

---

## जगांतली गंमत!

आपल्या बालपणाकडे हळूच डोळा टाका. लहानपणीं आपण जीं जीं माणसें पाहिलीं, तीं तरी माणसें आज आहेत काय? ह्याचा विचार करावा? तीं तीं माणसें कशाला? ती परिस्थिति तरी आज आहे काय? छे: कुठली ती परिस्थिति! ती परिस्थिति केव्हांच पालटून गेली. अगदीं साधें उदाहरण घ्यायचें म्हणजे त्यावेळचा रांगणारा मुलगा आज मिशीवर पीळ देऊन चालत आहे व त्यावेळीं मिशांवर पीळ देणारा जवान आज एखाद्या लांबच्या प्रवाशासारखा दमलेला दिसत आहे. जगांत जी काय गंमत आहे ती हीच! कालचें आज नाहीं व आजचें उद्यां नाहीं. प्रत्येक निमिषाला जग पालटत आहे. प्रत्येक मिनिटाला नवें जीर्ण होत आहे व अगदीं नवीनच दृश्य त्याचे जागीं दिसत आहे.

युगांतर—२३ मार्च १९२४.

# * गणेश पुराण !

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः । श्री गुरुभ्योनमः ॥
ॐ जयाजी लम्बोदरा । विघ्नहारका विश्वोद्धारा ।
सन्देश स्पेशल–अंक पुरा । करीं कृपाप्रसादें ॥
नाहीं मजला अधिकार । कीं काव्यरचना चतुर ।
कैसें गांठूं पैल तीर । ह्या स्पेशल अंकाचें ॥
वाग्देवते, शारदामाते । करीं प्रसाद अपुल्या हातें ।
तुझिया कृपाकटाक्षपातें । सन्देशातें या पाहीं ॥
आतां वंदूं कवीश्वर । लहान मोठे, सान थोर ।
जिहीं काव्यचमत्कार । केला थोर आजवरी ॥
नाहीं मजला अभिमान । कीं हा नूतन पुरातन ।
प्रसवे जो कां काव्यरत्न । त्या त्या वंदन माझें पैं ॥
कीं तो असो केशवसुत । किंवा वामन, मोरोपंत ।
'बी', सुमंत, दासोपंत । टिळक, वामन, मोगरे ॥
वाङमयांत अभिमान । जो वागवी नर कृतघ्न ।
गजाननाचें शुण्डादण्डन । शीघ्र व्हावें त्यालागीं ॥
आतां परिसा परमोदार । संदेश–वार्षिक–वर्गणीदार ।
विसरूं कैसा मुख्याधार । तुमचा कवनीं आजि ह्या ॥
प्रेमें सहामाही तिमाही । वर्गणी भरती आणोनि गेहीं ।
अथवा व्ही. पी. घेती त्यांहीं । वंदन माझें अनुरागें ॥
होती चुका वेळोवेळीं । परी आपुली कृपा सांभाळी ।
नाहीं तरी रसातळीं । केव्हांचि सन्देश जाता जी ॥
वेळीं अंक नाहीं पोंचले । अथवा मार्गी येतां चुकले ।
पत्ते नाहीं बदलले । तरी माफी देतां कीं ॥
परी सांगतों आपणां गुज । मी आपुला चरणरज ।
क्लार्कांहातीं काम रोज । घ्यावें लागे संदेशा ॥

---

* संदेश, ता. २ सप्टेंबर १९१९.

करिती बहु खटपट । नाहींत आळशी उद्धट ।
परी व्हावें तैसें चोखट । सदा काम होईच ना ॥
आपुल्या चरणीं सादर । मांडिती हिशोब बरोबर ।
विघ्न येवो बेहेत्तर । तरी बेइमान ना होती ॥
खाती आपुलें अन्नपाणी । कैसे होतील बेइमानी ।
तरी चुकीस पात्र मानवप्राणी । अन्यथा म्हणी ही कैशी ॥
म्हणूनि करा क्षमा यांतें । संदेश ओळखुनी आपुलें नातें ।
प्रमाद कधीं न हो हातें । ऐसा प्रयत्न करील कीं ॥
आतां रोजचे आश्रयदाते । अर्धा आणा देती मातें ।
करूं साष्टांग प्रणिपातें । वंदन त्यांतें ह्या वेळीं ॥
रोज अंक पारखतां । बरवें त्यास बरवें म्हणतां ।
भाजी घ्याया जातां येतां । अंक विकत घेतां कीं ॥
तुमची रोज कृपा होते । म्हणोनि सर्वां ईर्षा येते ।
किट्टीमामा कीं लळितांतें । चढे स्फुरण लिहावया ॥
तुमचे मानितों आभार । भव्य वाचक–संभार ।
हाचि संदेश-अलंकार । असे साचार सर्वमतें ॥
आतां नमूं जाहिरात-खातें । रौप्यमुद्रिकांचे दाते ।
ज्यांचेनि आधारें पोंचतें । संदेश–तारूं पैल तीरा ॥
नसता जाहिरातींचा शेला । तरी संदेशा बसता झोला ।
जेव्हां कागद महाग झाला । अपरंपार युद्धमिषें ॥
हेच वाङ्मयाचे नेते । हेचि राजकारण–प्रणेते ।
करिती बहु उपकारांतें । आश्रयदात्यांवरी पहा ॥
असती नुसतीच वर्गणी । नसती जाहिरात–जोडणी ।
तरी वर्तमानपत्रश्रेणी । यम–राजधानी गांठती ॥
आतां वंदूं एजण्ट–श्रेणी । करिती अंकांची मागणी ।
वाचकवृन्दा वाढवोनि झणीं । करिती प्रसार सर्वत्र ॥
अंक कमती येतां त्वरें । करिती गाऱ्हाणीं उत्तरें ।
ऐसे झटती सर्व तऱ्हे । सन्देश–कार्यी कारणें ॥

सांगतों समस्तां ऐकाच आतां । होती उपकार, वाहतां चिन्ता ।
परी कागद अजुनी पुरता । सस्ता नाहीं झाला कीं ॥
विश्वास नसेल मद्वचनीं । घ्या [1]मगनलालजींस विचारोनी ।
देती कागद पुरे वजनी । देती सौलत भावांत ॥
तरी महाग असे अद्यापि । दिवाळीपर्यंत कदापि ।
तीन आण्यांचिये मापीं । येईल वाटे कागद ॥
ऐसें होतां ईश्वरकृपें । पार्सलें पाठवूं अमूपें ।
तोंवरी मी फार जपें । होईल खर्च म्हणोनी ॥
एजण्टहो, अशीच कृपा । ठेवा, वाढवा सन्देश–रोपा ।
ज्ञान–प्रसार–मार्ग सोपा । करून लोकां दाविल हा ॥
आतां कृष्ण–बापू–मुळे । भोगिती जाग्रण–सोहाळे ।
परी हा निघे त्यांचेचिमुळें । नित्य 'ताजा' सन्देश ॥
सर्वांआधीं गांवोगांवीं । जाई, नूतन वार्ता वदवी ।
वाचकांची वाचन–चवी । वाढवावया हा झटे ॥
त्याचें करितां आजि स्मरण । वामन–सीताराम–गुण ।
वर्णितां हरिती सर्व शीण । प्राणचि ते माझे कीं ॥
त्यांची उडली असती भक्ति । किंवा गलित होती शक्ति ।
तरी सन्देश–प्राणज्योति । मालवलीच असती कीं ॥
काशीनाथ–राजाराम । झटती उल्हासें गुलाम ।
रात्रीं अपरात्रीं सर्व काम । करिती आराम सोडोनी ॥
एकदंता शूर्पकर्णा । ठेवी दासांचिया स्मरणा ।
सद्यत्नांची प्रतारणा । होऊं नेदी सर्वथा ॥
इति श्रीगणेश–प्रसादग्रंथ । आभारप्रदर्शनापर्यन्त ।
परिसोत सज्जन सावचित्त । प्रथमोध्याय गोड हा ॥

---

१ सुदामा–पेपर–मार्टचे मालक.

## अध्याय दुसरा

आतां वदतों राजकारण । ऐका ध्यान देऊन ।
कैझरें सोडिलें रणांगण । हें अद्भुत झालें कीं ॥
ज्यां वाटे हा झुजार वीर । करील पराक्रम अपार ।
त्यांना अपयश आलें थोर । तुर्क त्यांतचि आले कीं ॥
श्रीगजाननाची कृपा अमित । त्यानें पळविले हूण–दूत ।
नातरी हिंदवी क्षय पावत । हाचि निश्चय जाणावा ॥
आधीं मुसलमान उताविळ । त्यांत कैझर होतां प्रबळ ।
हिंदु–संस्कृति समूळ । संकटांत कीं ती येती ॥
हिंदु जात परम शांत । नेतां कान्ता नेतां वित्त ।
कधीं परावर नुचली हात । बोटें मोडिती स्वगृहीं ॥
जरी होता कैझर विजयी । भीति तुर्कां नुरती कांहीं ।
हीन दीन करुनी मही । सर्व आक्रांत ते करिते ॥
इकडे पेटतां काबुल । तिकडे इराणां चढलें बळ ।
त्यापुढें हिंदु सोज्ज्वल । कैसे टिकाव ते धरिते ॥
यादवी झाली द्वापारीं । पृथ्वीराजास महंमद घोरी ।
करोनि हतसामर्थ्य समरीं । कंठनालहि छेदिला ॥
हिंदु संस्कृति सरे मागें । यावेळीं सत्ता 'बढे आगे' ।
बघती रजपूत रागें रागें । तरी यावनी नाटपे ॥
कधीं संग बांधी चंग । दावी प्रताप प्रताप–रंग ।
परी यावनी अभंग । वृद्धी पावत चालली ॥
सरे विजयानगरी पुढें । प्रकटी शौर्य अती गाढें ।
तरी न यावनी सत्ता उडे । पडे विजया अपजयी ॥
श्रीशिवराज परम चतुर । स्थापी हिंदवी राज्य थोर ।
परी पानिपती युद्ध अघोर । अनर्थ हिंदु भोगिती ॥
हिन्दवीचें तेज मन्द । होतां मार्ग दिसे बन्द ।
इतुक्यांत इंग्रज शिबन्द । महाराष्ट्रीं पातले ॥
झालें सुनें गेलें पुणें । इंग्रजें सर्वत्र दिधलें ठाणें ।
हिन्दु तेज होई उणें । रावराणे शरणागत ॥

परी इंग्रजीचा आसरा । कोणी न झटे द्रव्य-दारा ।
नाहीं तरी हिंदवीस थारा । त्रैलोक्यांत नुरता कीं ॥
कुस्तुंतुनिया तुर्कांकडे । इराणांतहि शहा वडे ।
काबुलीं अमीर-प्रस्थ वाढे । पत्रें धाडी द्या पैसा ॥
इतुक्यांत उठला कैसर । उचलिती तुर्क समशेर ।
करिती संयुक्ताशीं वैर । म्हणती हार नेणोंची ॥
जुंपला हुणाग्लांचा झगडा । हिंदुदेश पडला उघडा ।
तुर्की-जर्मनांचा जोडा । आंग्ल आधार हिंदुत्वा ॥
ईश्वरा हिंदुत्वाची काळजी । म्हणूनि कैसर हटला गाजी ।
नातरी खाते करुनी भाजी । हिंदुत्वाची निःशंक ॥
हिंदुत्व वांचलें यादवीं । हिंदुत्व वांचलें म्लेच्छ-पैरवीं ।
हिंदुत्व वांचलें शिवसंभवीं । वांचलें हिंदुत्व पानिपतीं ॥
फिरुनि हिंदुत्व वांचलें । जर्मन युद्धीं तें न जळे ।
हिंदुत्व-चैतन्य या वेळे । नवीन आलें कीं वाटे ॥
होता कैसराचा जय । हिंदुत्वाचें उपजतें भय ।
हें ओळखोनी चित्तीं पाय । ईश्वराचे स्मरावे ॥
आला रक्षणा चक्रपाणी । म्हणोनि अघटित झाली करणी ।
बुद्धि उपजली विल्सनीं । न्यावे सेनानी फ्रान्साकडे ॥
हिंदुत्वा आला विषमज्वर । त्यांत आजि झाला उतार ।
ह्याचा घेती लाभ नर । तेचि चतुर बोलले ॥
ऐसा हा राजकारणाध्याय । संतीं परिसावा सान्वय ।
येथोनि पुढें करणें काय । पुढील अध्यायीं बोलिले ॥

---

## अधःपात कां करून घेतां ?

या जगांत आपल्याला सागर सांपडतील, पर्वत सांपडतील, नद्या सांपडतील, गिरिशिखरें सांपडतील, झुळझुळु वहाणारे ओढे सांपडतील, घनदाट अरण्यें सांपडतील, किलबिल करणारे पक्षी सांपडतील, रत्नांच्या खाणी सांपडतील, सोन्याच्या खाणी सांपडतील, इंद्र सांपडेल, चंद्र सांपडेल, स्वर्ग सांपडेल, परंतु केव्हांहि आणि कोठेंहि सुख असें सांपडणार नाहीं. मग जी वस्तु मुळांत नाहींच तिची कल्पना करून आपला अधःपात कां करून घेतां ?

युगांतर—६ एप्रील १९२४.

# * माधवाश्रमांत शिवाजी !

एका सकाळीं सूर्योदयाचे सुमारास एक गृहस्थ एकटाच माधवाश्रमांत शिरला. त्याचा वेष अंमळ विचित्र दिसला, म्हणून सकाळीं क्रॉनिकल वाचण्याकरितां जमलेले सगळे लोक त्याचेकडे टकमक टकमक पाहूं लागले. त्या गृहस्थाचें तिकड लक्ष होतें, पण दुर्लक्ष केल्यासारखें दाखवून तो थेट मॅनेजरचे टेबलाजवळ गेला.

मॅनेजरांनीं विचारलें, 'आपलें नांव काय ?'

पाहुण्यानें सांगितलें, 'माझें नांव शिवाजी.'

पाहुण्याचा विचित्र वेष पाहून इतरांप्रमाणें मॅनेजरांचेंहि त्याचेकडे अगोदर लक्ष गेलेलें होतेंच. त्यांत जेव्हां त्यानें आपलें नांव 'शिवाजी' सांगितलें, त्यावेळीं मॅनेजर मनांत थोडेसे चपापले. पण तें बाहेर न दाखवितां, ते पाहुण्यांना म्हणाले, 'आपलें सबंध नांव सांगा.'

"ठीक आहे" पाहुणा म्हणाला, "माझें नाव शिवाजी, माझ्या वडिलाचें नांव शहाजी, आडनांव भोंसले."

झालें ! मॅनेजरची गाळणच उडाली. त्यांना पक्का संशय आला कीं, हा पाहुणा मनुष्यकोटींतला नाहीं. त्यांत कांहींतरी मानवी प्रकाराच्या पलीकडची गोष्ट आहे. त्यांना संशय आला कीं हे गृहस्थ शिवाजीमहाराजच होत ! माधवाश्रम हें ठिकाण जिवंत लोकांना उतरण्याकरितां आहे, मेलेल्या लोकांसाठीं नाहीं, असें त्या गृहस्थांना सांगण्याचें मॅनेजरच्या ओठांवर आलेलें होतें, पण पाहुण्याकडे दृष्टि जातांच त्यांचा तो विचार बदलला व त्यांनीं पुन्हा विचारलें, "आपण कुठनं आलां व कुठें जाणार ?"

"कुठनं आलां ?" पाहुण्याची ह्या प्रश्नाला उत्तर देण्याची तयारी नव्हती असें दिसलें. तथापि क्षणार्ध विचार करून पाहुणे म्हणाले, "मी अमरावतीहून आलों. येथें कांहीं दिवस राहून मग पुन्हां मी अमरावतीलाच जाणार आहें."

---

* संदेश ता. १० फेब्रुवारी १९२३.

मॅनेजरच्या जीवांत जीव आला. यांना असें वाटलें कीं, ह्या विचित्र पुरुषाच्या विचित्र पोषाखाप्रमाणेंच त्याची भाषाहि विचित्र आहे. आणि म्हणून त्यांनीं आपले पुस्तकांत "अमरावती" असें न लिहितां, "उमरावती" असें लिहिलें. त्यांना असें वाटलें कीं हा वऱ्हाडचा कुठला तरी पाटील आहे, व वऱ्हाडच्या पद्धतीप्रमाणें ह्यानें हा चमत्कारिक पोषाख केलेला आहे.

मॅनेजर नोकरास म्हणाले "रूम नं. ३५ !" नोकरानें त्याचें सामानसुमान घेतलें व "चला माझे मागोमाग" असें म्हणत तो पाहुण्यांना खोली नं. ३५ कडे घेऊन चालला. तथापि क्रॉनिकल वाचणाऱ्या लोकांत कुजबूज उडालीच. ते एकमेकांस म्हणायला लागले, 'शिवाजी आला !, शिवाजी आला !'

* * *

ही कुजबूज थोडक्यांत थांबली नाहीं, ती पसरतच चालली. माधवाश्रमांतून सँढर्स्टरोड, सँढर्स्टरोडवरून लॅमिंग्टन रस्ता, लॅमिंग्टन रस्त्यावरून गिरगांव ह्याप्रमाणें भायखळा, दादर, फोर्ट, कुलाबा—ह्या साऱ्या भागांत ही वातमी पसरली कीं शिवाजी आलेला असून तो माधवाश्रमांत उतरलेला आहे.

* * *

इकडे रूम नं. ३५ मध्यें तो पाहुणा आपलें सामान लावीत होता. त्याला कांहींच अडचण पडली नाहीं. त्यानें तें काम फार चलाखीनें केलें. "चलाखी" हा त्या पाहुण्याचा विशेष गुण दिसला. सामान वगैरे लावून त्यानें स्वच्छ स्नान केलें, देवीची पूजा केली आणि मग आपल्या बेडिंगवर तो स्वस्थ येऊन बसला. पुढें काय करावें ह्या विचारांत तो निमग्न झाला असावा असें दिसलें. तो मनांत म्हणाला, 'मी स्वतःला प्रगट करूं कीं नको ? मी प्रकट झाल्यानें ह्या लोकांना आनंद होईल कीं नाहीं ?'

छेः ! व्यर्थ संशय हा. शिवाजीला संशयांत पडायचें कांहींच कारण नव्हतें ! कारण ह्या प्रश्नाचें उत्तर साऱ्या मुंबईभर प्रत्यक्षच देण्यांत येऊं लागलें होतें.

कारण "शिवाजी आला" ह्या वातमीनें एकाहि मनुष्याला आनंद झालासें दिसलें नाहीं.

* * * *

प्रथमतः ‘ घाटी ’ लोक फार घाबरले. कुणाला वाटलें कीं हा आतां पुन्हां आपल्याला लढाईवर घेऊन जाणार ! आपण कसे सुखानें भांडीं घांशीत व गिरण्या फिरवीत बसलेलों आहों ! आतां ह्या भांडीं घासण्याच्या सुखाला व गिरण्यांतल्या सुखकर काबाडकष्टांना आम्हीं मुकणार ! आतां आमच्या बायकांच्या मजुऱ्या व ‘ खानावळी ’ बंद होणार !

* * * *

कांहीं मराठे म्हणाले कीं आम्हीं नुकतेच शिवस्मारकाची लढाई खेळत आलेले आहोंत. पण हा शिवाजी म्हणणार कीं ही लढाई हवी कशाला ? मी स्वतःच तुमच्यांत आलेलों आहें. आतां एक व्हा व शत्रूवर चला ! हर ! हर ! आतां हा शिवाजी आमच्यांतलीं सगळीं भांडणें बंद करणार व आम्हाला आपल्या पाठीमागें ओढणार ! आतां आम्हीं भांडावें कशासाठी ? व कोणत्या मुद्यावर एकमेकांचीं डोकीं फोडावीं ? हा शिवाजी आल्यानें एकमेकांचीं डोकीं फोडण्याच्या स्वर्गसुखाला आम्हीं अंतरणार त्यापेक्षां हा स्वर्गांतून आला नसता तर फार चांगलें झालें असतें !

* * * *

शिवाजी आल्यामुळें इतिहासकारांचीं तोंडें अगदीं गोरींमोरीं झालीं ! त्यांना भय वाटलें कीं, आतां हा मारवाडी विद्यालयांत लेक्चरें देणार, व घडलेलें सर्व सांगत सुटणार ! ह्या इतिहासकारांना खरा इतिहास नको होता. त्यांना स्वतःचे सिद्धांत जगापुढें आणावयाचे होते. कोणी शिवाजीपेक्षां जिजाबाईला शहाणी ठरविली होती, कोणी शिवाजीऐवजीं शहाजीकडेसच स्वराज्यसंस्थापना सोंपविलेली होती. कोणी शिवाजीला निरक्षर ठरविलें होतें, कोणी त्याचेकडून वळणदार अक्षर काढून घेतलेलें होतें. कोणी त्याची व रामदासांची गांठ १६४८ मध्यें घालून दिलेली होती. कोणी १६७३ पर्यंत दोघांची दृष्टादृष्ट होऊं दिली नव्हती. कोणी त्याला ब्राम्हणाळलेला ठरविलें होतें, कुणी त्याच्या बायकोकडून त्याला विषप्रयोग करविला होता ! अशा सत्रा इतिहासकारांच्या सत्रा कल्पना होत्या. शिवाजी आला असें समजल्याबरोबर हे सारे लोक घाबरले व सर्वांना एकदम “ ऊर्ध्व ” झाला.

* * *

नाटककारांची अशीच त्रेधा उडाली. शिवसंभवांतली जिजाबाई हिंव भरल्यामुळें कांपायला लागली, शिहा–शिवाजींतल्या शिवाजीची दाढी गळून पडली, स्वराज्य–तोरणांतला तानाजी घसा बसल्यासारखे बोलूं लागला, व चंद्रग्रहणांतला हिकमतराव हिकमती विसरून गेला. प्रत्येक नाटककार मनांत प्रार्थना करायला लागला, 'हे देवि भवानि, त्या शिवाजीला जर तूं माधवाश्रमांतून हालवशीस तर नाटक कंपन्यांपासून घेतलेल्या एका मोनॉपोलीचे पैसे मी तुला देईन.'

* * *

तिकडे चाफळहून सरदारगृहरांत तार आली कीं बापूसाहेब महाराजांना वांती सुरू झालेली आहे. शिवाजी माधवाश्रमांत आल्याची बातमी चाफळला इतक्या लौकर कशी गेली हें एक मोठें कोडेंच आहे. तथापि ती गेली हें खास! सरदार–गृहांतील तारेंत असें लिहिलें होतें कीं, 'बापूसाहेब स्वामीमहाराज आपली बूटप्यांट घालून गव्हर्नरांचे भेटीस जावयाचे विचारांत होते, पण इतक्यांत शिवाजी आल्याचें त्यांना समजलें व त्यांच्या चारी बायका त्यांना दिसायला लागल्या! त्यांनीं लगेच आपली विजार काढून ठेवली, पण तिकडे परटाकडून अशी तक्रार आली कीं बापूसाहेब महाराजांची विजार नेहमींप्रमाणें स्वच्छ नव्हती.'

* * *

शिवाजी माधवाश्रमांत आला हें समजल्याबरोबर बँकांवर 'रश' झाला. जो तो आपले पैसे मागायला लागला. वॉर–लोनचे भाव एकदम उतरले. त्यांतहि कांहीं लोकांनीं अशी बातमी उठवली कीं, सरकारचें कर्ज नाकबूल करण्याचा ठराव शिवाजी प्रथम हातांत घेणार आहे. त्यामुळें तर जो तो येईल त्या भावानें वॉरबाँड विकीत सुटला.

* * *

माधवाश्रमांत शिवाजी उतरला, त्याच सुमारास इकडे जमनादास मेहता यांच्या पोटांत कळ उठली! ती कळ कांहीं केल्या थांबेना! †ज्या संपादकवर्गांचे ते प्रमुख होते त्यांपैकीं प्रत्येक संपादक ढोंगीपणानें त्यांच्या समा-

† त्या वेळीं श्री. जम्नादास 'राष्ट्रसेवक' हें दैनिक चालवीत होते.

चाराला गेला पण त्यांच्याशीं बोलण्याइतकी जमनादासांना शक्ति नव्हती. ते त्यांच्याकडे केवळ करुण मुद्रेनें पहात व परत जमिनीवर लोळायला लागत ! पण त्यांच्या मुद्रेवरून हें स्पष्ट दिसत होतें कीं, आपल्याला कौन्सिलांत कोण जाऊं देणार, ह्याची चिंता त्यांना पडलेली होती.

* * *

पण काँग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांनाहि शिवाजी आल्याबद्दल फारसा आनंद वाटला नाहीं. शिवाजी आला हें ऐकून सरोजिनी नायडूचें तोंड उतरलें. त्यांना असें वाटलें कीं आतां जो तो शिवाजीला पहायला धांवेल, व माझ्या लेक्चराला कोणीहि येणार नाहीं. खाडीलकरांना वाटलें कीं, आपल्या खारकांचें वर्तमान ह्यांना खास कळलें असेल व त्याबद्दल हा शिवाजी आपल्या डोक्याच्या मलबारी नारळावर खारका दिल्याशिवाय कधींहि राहणार नाहीं. इतर पुढाऱ्यांना वाटलें कीं हा शिवाजी कायदे-भंगाला खरीच सुरवात करील आणि मग टिळक–स्वराज्य–फंड तसाच राहील ! कुणाला असें वाटलें कीं हा शिवाजी गांधींना सोडवून आणील व मग आपल्याला पुढारी म्हणून मिरवायला यायचें नाहीं. पण शिवाजी आल्याबद्दल विशिष्ट वर्गाला मात्र आनंद झाला. आणि तो कुणाला ? तर डिटेक्टिव लोकांना ! शिवाजी माधवाश्रमांत आला हें ऐकल्याबरोबर जो तो धांवपळ करीत माधवाश्रमाकडे चालला ! उद्देश हा कीं, आपण सर्वांच्या अगोदर ही बातमी सरकारच्या कानावर घालावी व प्रमोशन मिळवावें !

* * *

पहिला डिटेक्टिव्ह माधवाश्रमांत आला त्या वेळीं शिवाजीमहाराज जेवून विडा खात बसलेले होते. खालीं डिटेक्टिव्ह मॅनेजरजवळ जाऊन चौकशी करूं लागला.

त्यानें विचारलें कीं, 'येथें शिवाजीमहाराज उतरले आहेत काय ?'

'इथें शिवाजीमहाराज कुणी नाहींत, इथें एक पाहुणे आलेले आहेत, त्याचें नांव शिवाजी शहाजी भोंसले !'

'पाहूं त्याचं नांव ?' डिटेक्टिव्ह म्हणाला.

'हें पहा !' असें म्हणून माधवाश्रमाच्या मॅनेजरनीं आपलें रजिस्टर उघडलें. पण त्यांत शिवाजी शहाजी भोंसले असें मुळींच नव्हतें. मॅनेजर घाबरला! पण त्यांत घाबरण्याजोगें काय होतें? कारण तिथें नं. ३५ ची खोलीहि नव्हती, तिथें तुम्हींहि नव्हतां, मीहि नव्हतों, कुणीहि नव्हतें.

* * *

"तुरुंगाचे दारांत" नाटक पहात असतां मला जी डुलकी आली त्या अवधींत हें सगळें स्वप्न मला पडलेलें होतें. मी जागा होऊन पहातों तों पडदा पडला व जाग्रण न होतां मी घरीं निजायला गेलों.

---

## * तरुण मनुष्या, ऊठ !

तरुण मनुष्या ऊठ, तुझी मातृभूमि तुला पालवीत आहे.

० ० ०

तुझे मातृभूमीस पारतन्त्र्याचा डाग लागलेला आहे. तूंच मनांत आणशील तर हा डाग पुसशील. तूं मनांत आणशील तर आपले मातृभूमीस आनंदित करशील.

* * *

दारिद्र्य पुरवलें, अज्ञान पुरवलें, सर्व जन्म कष्ट पुरवले, तापलेल्या तेलाच्या कढईत टाकलेलें पुरवलें, संभाजीप्रमाणें अंग सोललेलें पुरवलें, परंतु पारतन्त्र्याचे क्लेश केवळ असह्य होत. कोणीं आपणांस वाटेल त्या हीन नांवांनीं संबोधावें, पण "पारतंत्र्य" ह्या हीन नांवानें आपणांस कोणी संबोधूं नये.

* * *

परंतु तरुण मनुष्या, तुझे मातृभूमीवर ती पाळी आलेली आहे. "अंकित"-पणाचा डाग तुझे मातृभूमीस लागलेला आहे. तुझी मातृभूमि इंग्लंडची अंकित

---

* युगांतर ११ मे १९२४.

आहे. तिचे हातपाय अंकितपणाच्या रज्जूनें बांधलेले आहेत. अंकितपणानें जखडली गेल्यामुळें तिची हालचाल बंद पडलेली आहे.

* * *

तूं जिवंत असतां तुझे मातृभूमीवर अंकित म्हणवून घेण्याची पाळी यावी? तूं जिवंत असतां अंकितपणांत तिनें दिवस कंठावेत? तूं जिवंत नसतांना हें झालें असतें तरी हरकत नव्हती; पण तूं जिवंत असतांहि जर तुझी मातभूमि अंकित राहिली तर मग तूं जिवंत कशाला राहिलास?

* * *

ज्यानें आपली मातृभूमि अंकित झालेली पाहिली, ज्यानें आपल्या मातृभूमीचें पारतंत्र्य सहन केलें, ज्यानें आपल्या मातृभूमीचे बंध तोडण्याचा प्रयत्न केला नाहीं–आपल्या मातृभूमीची पारतंत्रता पाहून ज्याला दुःख झालें नाहीं, संताप चढला नाहीं, तो मनुष्य जिवंत कसला? तो मनुष्य मेलेला! तो जिवंत मनष्य नव्हे, तें मनुष्यतेचें मढें आहे, तें मनुष्यतेचें लाजिरवाणें प्रेत आहे!

* * *

तूं रोज खातोस, पितोस, चैन करतोस, तूं रोज धंदा–रोजगार पाहतोस–रोज कुटुंबाची चिंता वाहतोस–मातृभूमीची चिंता तुला वाटत नाहीं काय? तुला आठवणच नाहीं कीं आपली मातृभूमि पारतंत्र्यांत आहे?

* * *

असें असेल तर शरमेची गोष्ट आहे. जर तुला मातृभूमीची कधींच आठवण होत नसेल तर तुझ्या या कृत्याइतकी लज्जास्पद गोष्ट दुसरी नाहीं. जर तूं मातृभूमीची कधींच आठवण करीत नसशील तर तूं अत्यंत नीच आहेस. जगांतील सर्व दंडांना तूं पात्र आहेत.

* * *

नीचा, मातृभमि परतंत्र असतां तुला घांस गिळवतो? नीचा, मातृभूमि परतंत्र असतां तुला झोंप येते?

* * *

काय? तूं इतका नीच नाहींस? मातृभूमीचे पारतंत्र्यासाठीं तुझा आत्मा तळमळत असून तुला फक्त मार्ग सांपडत नाहीं? मग मित्रा, क्षमा कर,

तुझेविषयीं विनाकारण वाईट कल्पना आम्ही मनांत आणल्या ! तुझेविषयीं विनाकारण आम्हीं गैरसमज करून घेतला.

* * *

काय ? तुला मार्ग सांपडत नाहीं ? मातृभूमीला पारतंत्र्यांतून सोडवायची तुझी इच्छा असतांहि तुला मार्ग सांपडत नाहीं ? छे; असें कसें होईल ? कारण जिथें इच्छा असते तिथें मार्ग सांपडतोच !

* * *

हिंदुस्थानांत जन्म पावलेला प्रत्येक मनुष्य हिंदु आहे. हिंदुस्थानांत जन्म पावलेला प्रत्येक मनुष्य पवित्र आहे. हिंदुस्थानांत "अस्पृश्यता" नाहीं. हिंदभूचे पवित्र उदरीं जन्म घेतलेला तिचा पुत्र अस्पृश्य कसा असेल ?

* * *

हिंदुस्थानांत जन्म पावलेला प्रत्येक मनुष्य स्वतंत्र आहे. त्यास परतंत्रता नाहीं. त्यास परतंत्र करण्याचा कोणास अधिकारहि नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांना परतंत्र केलें अशी जर कोणाची कल्पना असेल तर ती चुकीची आहे. आपण परतंत्र झालों अशी जर हिंदुस्थानांतील लोकांची कल्पना असेल तर तीहि चुकीची आहे.

---

# *राजसंन्यास व त्याचा कर्ता !

राजसंन्यास नाटक हें सर्व मराठी नाटकांतील अत्युत्कृष्ट नाटक आहे. हें अपुरें राहिलेलें आहे. कै. गडकरी यांनीं तें ५।६ वर्षांपूर्वी लिहावयास घेतलें. पण तें त्यांचे हातून तडीस गेलें नाहीं. लेखणीच्या फटकाऱ्याबरोबर तडीस नेण्याजोगें तें नाटकच नव्हे. अत्यंत प्रतिभावान् कवीलाहि तें तडीस नेणें अशक्य होतें. कमी प्रतिभेच्या लेखकांस त्यांतील भाषा साधण्यास एक एक वर्ष अध्ययन करावें लागेल. त्यापेक्षां कमी स्फूर्तीच्या लेखकांनीं ताजमहालप्रमाणें, इजिप्तमधील मनोऱ्यांप्रमाणें, अथवा अबूचे

* संदेश ता. २४ ऑगस्ट १९२२.

पहाडावरील लेण्यांप्रमाणें त्याकडे थक्क होऊन पहात बसावें ! त्यांतील एकहि कल्पना वठवून दाखविण्याची त्यांची प्राज्ञा नाहीं.

* * *

राजसंन्यास नाटकांतील एक एक वाक्य भरजरी आहे, रत्नजडित आहे, पाचूंचें व हिऱ्यांचें बनविलें आहे. सामान्य वाङ्मयांत असलीं श्रीमंत, थाटदार व राजविलासी कल्पनांचीं वाक्यें उतरणें शक्यच नाहीं. कुबेराच्या भांडाराप्रमाणें खच्चून भरलेला वैभवशील कल्पनांचा हा अमर्याद खजिना मराठी वाङ्मयास अत्यंत भूषणप्रद झालेला आहे. मराठी वाङ्मयाचें भाग्य कीं असलें अलौकिक नाटक मराठी भाषेंत निर्माण झालें. इतर कोणत्याहि भाषेंत हें निर्माण झालें असतें तर त्याबद्दल मराठी भाषेस हेवा वाटला असता. इतर कोणत्याहि भाषेंत हें निर्माण झालें असतें तर, 'काय तुमची भिकार मराठी भाषा' असें आमच्यांतीलच परप्रकाशी लोकांनीं मराठी भाषेस जन्मभर हिणवलें असतें.

* * *

ग्रंथ अपुरा असल्याबद्दलचीं उदाहरणें इतिहासांत फारच थोडीं आहेत. त्यांपैकीं अत्यंत प्रसिद्ध उदाहरण म्हणजे बाणभट्टाच्या कादंबरीचें होय. हा ग्रंथहि अपूर्व व अलौकिक आहे, भरजरी आहे, किनखापी आहे. कल्पना, भाषा, वैभव, सौंदर्य, रम्यता व कारागिरी ह्या सर्व दृष्टींनीं बाणभट्टाची कादंबरी व गडकऱ्याचें राजसंन्यास ह्यांत फार साम्य आहे. फरक इतकाच कीं बाणभट्टानें ही कादंबरी बनविल्यामुळें त्याच्या वर्णनाच्या भरारीस आणखी अवसर सांपडला व कै. गडकरी ह्यांनीं आपल्या कथानकास नाटकाचें स्वरूप दिल्यामुळें त्यांना नाटकाच्या सुटसुटीतपणाकडे लक्ष द्यावें लागलें.

* * *

तथापि कै. गडकरी हे त्या मर्यादेमुळें धबकले नाहींत. कादंबरीकाराप्रमाणें त्यानीं आपल्या कल्पनेस खूप उड्डाण करूं दिलें आहे. पतंग उडविणारा उल्हासी खेळाडू ज्याप्रमाणें आपला पतंग जितका वर जाईल तितका त्यांत जास्तच रमतो, त्याप्रमाणें कै. गडकरी हे अनेक वेळां आपल्या कल्पनेंत दंग झालेले आहेत. कल्पना सुचली आणि आवरली असें ह्या नाटकांत

सहसा झालेलें नाहीं. राजसंन्यास हें कै. गडकरी ह्यांचें राजस बाळ आहे. तें जिथें जिथें दुडुदुडु धांवत गेलें तिथें तिथें त्याच्या घुंगुरवाळ्याच्या नादाचें कौतुक करीत गडकरी त्याच्यामागेंच गेले. त्याच्या ललित लीलांना नुसत्या दृष्टिक्षेपाचाहि बांध त्यानीं घातला नाहीं.

*   *   *

असलें हें अपूर्व नाटक, प्रतिभेची ही अपूर्व लीला, वाङ्मयाचें हें अपूर्व विलसन, नवरसांचें हें अपूर्व मिश्रण, कल्पनाचातुर्याचें हें अपूर्व नर्तन मराठी भाषेस प्राप्त झालेलें आहे. हें अपुरें राहिलेलें आहे. हें बिन उकललेलें कोडें आहे व हें रसिकांपुढें शाश्वत आनंदाकरितां ठेवलेलें आहे.

---

# * नवरा–बायकोमधील नोटीस !

रा. रा. मोहनदास करमचंद गांधी राहणार दुनिया, हल्लीं मुक्काम मुरादाबाद, संयुक्तप्रान्त, प्रॉव्हिन्शियल कॉन्फरन्सचा मंडप, डेलीगेट कॅम्प, यू. पी., इंडिया ह्यांसः—

खालीं सही करणार इंडियन होमरूल लीग, भ्रतार मोहनदास करमचंद गांधी, राहणार फोर्ट, मुंबई ( हिंदुस्थान ) इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही माझे लग्नाचे नवरे असून तुम्हीं गेल्या दोन महिन्यांपासून मला आपले घरीं नांदणेस नेत नाहीं. मला माझे भाऊ महंमदअल्ली जिना वगैरे माझ्या माहेरच्या माणसांनीं लोकांचें कर्ज काढून पन्नास हजार रुपये खावयास घातलेले आहेत. माझे वडील दादाभाई नवरोजी आणि माझी आई कलकत्त्याची १९०५ ची कॉंग्रेस, ह्या दोघांचीं मी सुस्थळीं पडावें अशी इच्छा होती. माझी आई सुरत येथें वारली तेव्हां तिनें मला माझे बाबा दादाभाई नवरोजी ह्यांच्या स्वाधीन केलें व त्यांनींही मरणाचे वेळीं माझे वडील बंधु महंमदअल्ली जिना वगैरे मायाळू आप्तांना माझ्या लग्नाची काळजी करण्यास सांगितलें. महंमदअल्ली जिना यांनीं माझ्याकरतां पुष्कळ

खर्च केला व पुष्कळ स्थळें पाहिलीं. एकदां तर त्यांनीं माझें लग्न ॲनीबेझण्ट नांवाच्या व्यक्तिशींच लावून दिलें, पण पुढें ही व्यक्ति स्त्री आहे, पुरुष नव्हे, अशी शाबिदी झाल्यावरून तें माझें लग्न रद्द ठरलें. पुढें त्यांनीं तुमचें कुलशील व तुमची कीर्ति ऐकून माझें तुमच्याशीं लग्न लावून दिलें. परंतु करीब दोन महिने झाले तुम्ही मला नांदणेस नेत नाहीं व स्वराज्य-सभा नांवाच्या एका दुस-या औरतेच्या नादीं तुम्ही लागलां आहां असें माझ्या भावास खात्रीपूर्वक कळलेलें आहे. ह्या औरतेचा नाद सोडून द्या असें त्यांनीं तुम्हाला नाना प्रकारानें सांगितलें, पण तुम्ही तो नाद सोडून देत नाहीं. तुम्ही ब्रिटिश राज्यछत्राखालींसुद्धां राहण्यास तयार नाहीं असें माझे भाऊ मला सांगत आहेत. हें खरें असेल तर तो तुमच्या नांवाला बट्टा आहे. निदान मला तरी तुम्ही ब्रिटिश राज्यछत्राबाहेर रंगढंग करीत अस-तांना तुमच्याबरोबर एकटीला रहाणें शक्य नाहीं. शिवाय तुमची दुसरी औरत स्वराज्यसभा हिला तुम्ही सोडायला कबूल नसाल तर मला तुमचे-बरोबर रहाणें अशक्य आहे, कारण ती म्होतुराची असल्यामुळें माझ्यापेक्षां तिचा दर्जा कमी आहे व तिचीं लुगडां धुवून राहण्याचा तुम्ही मला हुकूम करणार आहांत असें माझे दूधभाऊ जमनादास द्वारकादास, मावजी गोविन्दजी वगैरे मण्डळी मला सांगत आहेत. परंतु तिचीं लुगडीं धुवून तुमच्याजवळ राहायला मी कबूल नाहीं. मी आतां वयांत आलेली आहें व संसार करून दोन मुलेंबाळें व्हावीं असें मला वाटणें साहजिक आहे. माझे भाऊ महंमद अल्ली जिना ह्यांनीं आजवर माझ्याकरितां फार खर्च सोसलेला आहे. आतां ह्यापुढें माझ्याकरितां तसदी सोसण्याची त्यांची ऐपत नाहीं. व मलाही आतां यापुढें त्यांना तकलीफ द्यायची इच्छा नाहीं. मला कोणी स्वतंत्रपणानेंहि कर्ज देत नाहीं. ह्यासाठीं मला दुसरा संबंध करून माझ्या जन्माचें सार्थक करणें भाग आहे. तरी ही नोटीस पोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत वरील रक्कम पन्नास हजार रु. देऊन मला नान्दविणेस घेऊन जावें. शिवाय तुम्हीं ठेवलेली दुसरी औरत स्वराज्यसभा हिला ह्यापुढें घरांत ठेवणार नाहीं व ब्रिटिश साम्राज्याचे बाहेर रहायला जाणार नाहीं अशाबद्दल पंडित मदन मोहन मालवीय व बाबू बिपिनचंद्र पाल असे दोन लायक जामीनहि द्यावे. तुमच्याजवळ अलीकडे मौलाना महंमदअल्ली

व मौलाना शौकतअल्ली असे दोघे इसम रहात असतात असेंहि मला कळलें आहे, आणि विशेषतः त्यांच्याच नादानें तुम्ही बिघडलेले आहां. नाहींतर पूर्वीं तुमचें माझ्याशीं व जगाशीं वर्तन चांगलें होतें. ह्या दोघां-शिवाय दुसरी जामिनगिरी तुम्ही द्याल तर मी ती कबूल करणार नाहीं. तुम्ही जामीन द्याल तर ते मदनमोहन मालवीय व बिपिनचंद्र पाल हे दोघेच दिले पाहिजेत. तसें न कराल तर हीच सोडचिठ्ठी समजून मी दुसरा नवरा करीन. मग मजवर तुमचा नवरेपणाचा कोणताही हक्क चालणार नाहीं. कळावें, ता. ४–१०–१९२० इ.

निशाणी बांगडी इंडियन होमरूल लीग
भ्रतार मोहनदास करमचंद गांधी इची असे.
दस्तुर बॅरिस्टर अज्ञाद, मुंबई.

---

# * चहा, चिवडा, चिरूट.

'अग ए', मी तिला म्हटलें, 'अग चहा झाला का? मी इकडे केव्हांचा कपडेबिपडे घालून बाहेर जायच्याकरितां बसलों आहें, आणि अजून तुझ्या चहाचा पत्ता नाहीं.'

० ० ०

'इश्श! अजूनसुद्धां कां चहा मागायचा?' माझी ती चूलसुंदरी चूल फुंकीत मला म्हणाली. ह्या वेळीं ती फारच सुंदर दिसत होती. ती ओण-व्यानें फुंकर घालीत होती. त्या फुंकराबरोबर कांहीं राख तिच्या वदनकम-लावर उडत होती. लांकूडवाला लुच्चा! त्यानें ओलींच लांकडें ह्या खेपेला आमच्या गळ्यांत बांधलीं होतीं. पण त्यामुळेंच माझ्या चूलसुंदरीला मला अतिशय सुंदरपणांत पहायला सांपडलें, अहाहा विधात्या! कायरे इचें रम-णीय रूप! तोंडावर इतकी राख उडत असतांना सुद्धां

**'अति राखयुक्त होय परी। सुखवते मला॥'**

० ० ०

---

* संदेश ता. ४ ऑक्टोबर १९२०.

अरे, पण तुम्हांला चहाची गोष्ट सांगायची राहिलीच ! स्पेशल कॉंग्रेसला गेलों आणि नॉन-को-ऑपरेशनमध्यें पडलों अशांतलीच माझी गत झाली ! चहांत शिरलों आणि राखेंत उतरलों ! पण कांहीं हरकत नाहीं. मुत्सद्दी लोकांनीं कन्सिस्टण्ट राहिलेंच पाहिजे असें नाहीं.

० ९ ०

'इश्श ! अजूनसुद्धां चहा मागायचा कां ?' माझी ती मला म्हणाली.

० ० ०

'अजूनसुद्धां म्हणजे ?' मी आपला तुमचा तो हा म्हणालों, 'अग अजूनसुद्धां म्हणजे काय ? अजून म्हणजे काय उशीर झालाय् ! का आठ वाजले आहेत ? का उन्हें पडलीं आहेत ? झालें काय त्याला ? अजूनसुद्धां म्हणजे ! तूं शुद्धीवर नाहींस वाटतं ?'

० ० ०

'हें पहा शुद्धि–बिद्धीची तेवढी मात्र गोष्ट काढायची नाहीं अं ?' माझी आपली ही म्हणाली, 'आम्ही बायका नेहमीं शुद्धीवर असतों. शुद्धीवर नसतें कोण ? पुरुष !'

० ० ०

'काय ? आम्ही पुरुष शुद्धीवर नसतों काय ?' हें म्हणतांना तरी तूं शुद्धीवर आहेस का ? अग, ते आपले हे—नांव मी घेणार तों इतक्यांत ती बिजलीसारखी राखेजवळून उठली आणि माझ्या तोंडावर हात ठेवून म्हणाली, मी सांगूं का एकेक ? आतां शुद्धीचीच गोष्ट निघाली म्हणून सांगतें कीं मी सगळेंच जर सांगत बसलें तर जड जाईल फार !

० ० ०

अग, विषयावर ये, विषयावर ये ! बायका झाल्या म्हणून त्यांनीं विषयांतर करावें कीं काय ? छे: बोवा ! स्त्रिया आणि लॉजिक यांचें कधींच जमायचें नाहीं. ए वुमन् रियली नोज् नो लॉजिक !

# * बोंबाबोंब !

कोणाला वाटेल कीं हें एक शिमगाकाव्य आहे—पण नो—हें शिमगा-काव्य नव्हे ! हें एक अत्यंत समयोचित असें काव्य आहे. पण अहाहा ! यांत इंग्लिश संस्कृतीचें इतकें सुंदर वर्णन केलेलें आहे कीं कांहीं पुसूं नका !

० ० ०

गेल्या शंभर वर्षांत इंग्लिश संस्कृतीनें काय केलें बरें ? इंग्लिश संस्कृतीनें हिंदु समाजांतील लोकांना शूर शिपाई बनविलं काय ? बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांतील तंटे मिटविले काय ? बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें, हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्याला गेल्या शंभर वर्षांत साक्षर केलें काय ? बोंब !

गेल्या शंभर वर्षांत इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील अस्पृश्यता काढून टाकली काय ?—बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें गेल्या शंभर वर्षांत हिंदी लोकांना युरोपियन लोकांच्या लेव्हलला आणलें काय ? बोंब ?

इंग्लिश संस्कृतीनें युरोपियन लोकांचा रिझर्व डबा काढून टाकला काय ?—बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदी लोकांना हाडापेरानें तरी मजबूत बनविलें काय ?—बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांना स्वातंत्र्याचें तरी शिक्षण दिलें काय ?—बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांना इतर स्वतंत्रता तरी दिली काय ?—बोंब !

---

* संदेश बोंबाबोंब स्पेशल अंक सन १९२८.

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांना अमेरिकेंत जायची तरी परवानगी दिली काय ?—बोंब ! कानडामध्यें जायची तरी परवानगी दिली काय ?—बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांना जास्त निरोगी तरी बनविलें काय ?—बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांना पोट भरण्याचीं जास्त साधनें उपलब्ध केलीं आहेत काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांतील बेकारी तरी बंद केली आहे काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांची भाजी–भाकरी जास्त सुलभ केली आहे काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें पूर्वीच्या वैद्याइतकी डॉक्टरची फी स्वस्त केली काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांची नीतिमत्ता सुधारली काय ?–बोंब!

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील नवरा–बायकोचे संबंध जास्त पवित्र केले आहेत काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांची दारू पिण्याची संवय कमी केली काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें परमेश्वराविषयीं आस्तिक्यबुद्धि जास्त वाढविली आहे काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांना जास्त श्रीमंत तरी केलें आहे काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें चोरांचें व दरोडेखोरांचें भय कमी केलें आहे काय? बोंब!

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांना पठाणी हल्ल्यापासून सोडवलें काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें शेतसारा कमी केला काय ?–बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें करांचें ओझें कमी केलें आहे काय ? बोंब !

इंग्लिश संस्कृतीनें हिंदुस्थानांतील लोकांची दीर्घायुष्यता वाढविली आहे काय ? बोंब !

आणि हें सर्व एके बाजूला ठेवलें आणि शेवटीं एकच प्रश्न विचारला कीं पांडवांचीं लेणीं, जयपूरची बांधणी अथवा ताजमहालसारखी जडणी ह्यांसारखी एखादी इमारत इंग्लिश संस्कृतीनें उठविली आहे काय ?–नाहीं, त्याच्याहि नांवानें बोंब ! म्हणजे काय ? सर्वत्र बोंबच ! बोंबाबोंब ! बोंबाबोंब !! उजवीकडून बोंब, डावीकडन बोंब., वरून बोंब खालून बोंब, हिमालयाकडून बोंब, आणि सीलोनकडून बोंब ! ब्राम्हणांमधून बोंब ! आणि अब्राम्हणांकडून बोंब ! स्पृश्यांकडून बोंब ! अस्पृश्यांकडून बोंब ! ख्रिस्त्यांकडून बोंब ! मुसलमानांकडून बोंब ! अलीकडे गंगा तरी बोंब ! पलीकडे गंगा तरी बोंब ! अलीकडे दिवा तरी बोंब ! पलीकडे दिवा तरी बोंब ! बोंबाबोंब ! बोबाबोंब !!

## ✳ पहिली रात्र.

मी आंत गेलें तों स्वारी झोपाळयावर मन्द मन्द झोके घेत बसलेली होती. वर चंद्रबिंब दिसत होतें. जणूं कांहीं माझ्या प्रियकराचें मुख तें मला दाखवीत होतें. तें जणूं कांहीं प्रियकराकडे मला घालवीत होतें. वरोबर डोक्यावर आलेलें तें चंद्रबिंब पाहून खात्रीनें तिथें रत्नाचें झुंबरच टांगलेलें आहे कीं काय असं वाटत होतं. मी जवळ गेलें. गाला-वर एक टिचकी मारली. हातांत श्रीहिंददेवीचं एक सुंदर चित्र होतें तें मला दाखवावयाचं झालं. तें चित्र राजा रविवर्म्याचं होतं व त्यांत सर्व लोकोत्तर अलंकारांनीं सजलेली श्रीहिंददेवी काढलेली होती. वरचा हिमालयाचा अलक–प्रदेश, चरणींची अकलंक लंका, दक्षिण हाताकडील सिंधु , वाम पार्श्वाकडले भागीरथीचे अमृतबिंदु, तिच्या अन्तरात्म्याजव-ळील तो महाराष्ट्र, तो तिचा कलिजा–तो तिचा शिवछत्रपतिरूपी हृदय-भाग–हे सर्व त्या चित्रांत स्पष्ट उमटले होते.

" विभावरी "–माझा प्रियकर म्हणाला–(बवन, मी त्यांची विभावरी

✳ 'पहिली रात्र' या नांवाच्या चटकदार गोष्टीचा शेवट.

आहें, पण तुझी बाबलीच आहें)–" विभावरी, आजच्या ह्या मंगल समयीं ह्या मंगल प्रतिमेला नमन कर. आपलीं सर्व सुखं हिन्दमातेच्या कृपेचीं आहेत, हिंदमातेच्या करतांच तीं आहेत. तिला सुखी करण्याकरितां आपल्याला सुखी व्हावयाचं आहे–आपण सुखी होऊन तिला सुखी करायचं आहे. ह्यावेळीं हिच्या चरणावर मस्तक ठेव आणि शपथ घे कीं कोणत्याही सौख्यकालीं, हिन्दमातेचा परकीय सत्तेचा कलंक पुसून टाकणं ह्या गोष्टीचा विसर मला पडणार नाहीं. विभावरी, आजच्या सकाळच्या प्रकारावरून हाच बोध आपण घेतला पाहिजे, हृदयावर ठसविला पाहिजे. ह्या देशाचे आपण मालक असतां आपल्या मुलुखांत आपलाच अपमान ? विभावरी, परदास्याचा हा परिणाम आहे. जे हिंदपुत्र हें परदास्य लयाला नेतील–त्यांचंच तारुण्य खरं, त्यांनींच विलास भोगले–त्यांचाच शृंगार सफल झाला. विभावरी, चल आपण ही शपथ घेऊं या, आपल्या नवीन जीवनास सुरवात होण्याचे अगोदर आपण ही शपथ घेतलीच पाहिजे.

एका सोनचाफ्याचे झाडावर आम्ही ती प्रतिमा ठेवली व तिचेपुढें उभयतांनीं शपथ घेतली. मला फार आनंद झाला. तिकडच्याबद्दल मला विलक्षण अभिमान वाटायला लागला. मी निश्चय केला कीं युरोपियन् लोक वरिष्ठ व आम्ही त्यांचे दास ही परिस्थिति मी कधींहि टिकूं देणार नाहीं.

---

# * दुसरी रात्र.

असाच तो आमचा प्रवेश होता ! अशा स्थितींत मदनाचं शरसंधान फारच चालत असतं असं म्हणतात ! आमच्याही दृष्टीपुढें त्याचे सज्ज केलेले चापबाण दिसायला लागले. पण माझ्यावर तो धनुष्यबाणाचा नेम धरणार तोंच मी भगवान् कुसुमायुधाला विनंति केली कीं जगत्सम्राटा, तुझ्या शरसंधनाचं बक्षीस हिंदमातेचे जे एकनिष्ठ सेवक असतील त्यांनाच

---

* 'दुसरी रात्र' या चटकदार गोष्टीचा शेवट.

अर्पण कर व हिन्दुस्थानांतील तरुण–तरुणींचा शृंगार–विडा हिन्दुस्थानास स्वतंत्र्य करण्याची जयशाली निशाणा होऊं दे ! देवी स्वतंत्रते, सर्व सुखं हीं तुझ्या भात्यांतले बाण आहेत. सर्व शृंगार हीं त्या बाणांचीं टोकं आहेत आणि तरुण–तरुणी ही तुझी जयसेना आहे ! जो आपल्या राष्ट्रास स्वतंत्र करण्याची इच्छा करील तोच खरा तरुण आणि आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्य–युद्धासाठीं आपलं शिरकमलही तुझ्या चरणकमलावर जी अर्पण करील तीच खरी तरुणी ! देवी स्वतंत्रते, ह्या "दुसऱ्या रात्री" स तो निश्चय माझे मनांत पेटीव ! दर्पशोभन कंदर्पा, तोच निश्चय तुझ्या गोड विलासांतही विलसूं दे.

# *त्याचीच जात श्रेष्ठ !

बत्तीस कोटी लोकांनीं स्वतःस अंकित म्हणवावें व मूठभर इंग्रज लोकांनीं त्या देशाचे मालक म्हणवून घ्यावें ह्याची लाज वाटणारा कोणी नाहीं काय ?

असें कसें झालें ? पूर्वीच्या काळीं असे लोक नसत, मग ते आत्तांच कुठून आले ?

आजकाल हिंदुस्थानांत जातीचा अभिमान बोकाळलेला आहे. प्रत्येकाला वाटतें कीं, माझी जात श्रेष्ठ ! पण जो आपला देश पारतंत्र्यांत ठेवायला राजी आहे, त्याची जात श्रेष्ठ कुठली ?

तो अत्यंत कनिष्ठ जातीचा ! ज्याला स्वदेशाच्या पारतंत्र्याची चीड येत नाहीं, त्याच्याशीं भाषण करूं नये, त्याला शिवूं नये, त्याच्या पंक्तीला बसूं नय, त्याचा शब्द ऐकूं नये, त्याचें दर्शनहि घेऊं नये.

तो अभद्र, तो अपवित्र, तो अमंगळ, तो पतित, तो अधम ! सूर्यानें त्याचेवर प्रकाशूं नये, तारकांनींहि आपला मंगल प्रकाश त्याचेवर पाडूं नये.

परमेश्वरा, असले लोक हिंदुस्थानांत जन्माला घालूं नकोस ! येथें प्रत्येक मनुष्यास पारतंत्र्याचा तिटकारा येऊं दे, व त्यांच्या सामुदायिक प्रयत्नानें हा हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊं दे.

---

* संदेश, ता. १२ नोव्हेंबर १९२२.

# * तोच मनुष्य धन्य !

" जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा. "

—रामदास.

रोज रात्रीं निजतांना देशाच्या पारतंत्र्यामुळें विव्हल होऊन ज्याच्या दुःखाश्रूंनीं त्याची शय्या भिजून चिंब होत असेल, तोच मनुष्य धन्य !

—प्रातःकालीं सृष्टि प्रसन्न होते, फुलें विकसित होतात, पण त्या विकसितपणामुळें ज्याचें मुख देशाच्या पारतंत्र्यासाठीं दुप्पट म्लान होतें तोच मनुष्य धन्य !

—अहोरात्रीं प्रत्येक कृत्यांत, ज्याला स्वदेशाची आठवण होते व मातृभूमीच्या पारतंत्र्यास्तव ज्याच्या प्रत्येक क्षणाचा विरस होतो तोच मनुष्य धन्य !

—देशाच्या पारतंत्र्याकडे पाहून ज्याला साखर गोड लागेनाशी होते, बगीच्यातील वारा तापकारक वाटतो व मधुर गायन त्रासदायक वाटूं लागतें तोच मनुष्य धन्य !

—ज्याला प्रत्येक रम्य वस्तूंत पारतंत्र्यग्रस्त मातृभूमीची बापुडवाणी मुद्रा दिसते, व ज्याच्या ऱ्हदयांतून ती कधींहि हालत नाहीं तोच मनुष्य धन्य !

—ज्यास हें जग पराक्रमाचें स्थळ वाटतें व संकटें ह्या पौरुषाची परीक्षा द्यायच्या शाळा वाटतात तोच मनुष्य धन्य !

—तरुण पत्नी व चिमकुला पुत्र यांचा विळखा पडला असतांना जो देशाकरितां तुरुंगांत जायला तयार होतो तोच मनुष्य धन्य !

—ज्याला विषमता पाहून उद्वेग वाटतो, ज्याला अन्याय पाहून त्वेष चढतो व ज्याला पक्षपात पाहून संताप चढतो तोच मनुष्य धन्य !

---

* संदेश ता. १२ नोव्हेंबर १९२९.

# * महात्मा गांधींचा जयजयकार !

स्वातंत्र्यदिनमणे महात्मा गांधी, तुझे चरणांस आमचे शतशः प्रणाम असोत. स्वातंत्र्यकल्पकुसुमा मनमोहना, तुझे चरणांस आमचे शतशः प्रणाम असोत. स्वातंत्र्यसुगंध–गंधवाहा, राष्ट्रप्राणदायका, तुझे चरणांस आमचे शतशः प्रणाम असोत. तुझ्या मुक्ततेनें आम्हांस अत्यंत आनंद झालेला आहे. तुझ्या मुक्ततेनें राष्ट्रमातेचें वदन प्रफुल्लित झालेलें आहे. तुझ्या मुक्ततेनें दशदिशा प्रमुदित झालेल्या आहेत. तुझ्या मुक्ततेनें चराचर सृष्टि प्रसन्न झालेली आहे. तुझ्या मुक्ततेनें वस्तुमात्रावर हास्याची लकेर आलेली आहे. तुझ्या मुक्ततेनें स्वातंत्र्यसुमनें टवटवीत झालेलीं आहेत. तुझ्या मुक्ततेनें राष्ट्रचैतन्य भरारलेलें आहे, तुझ्या मुक्ततेनें अन्तः-करण थरारलेलें आहे. तुझ्या मुक्ततेनें स्वातंत्र्यानें आपलें विजयी निशाण उभारलेलें आहे.

आणि तें कसें ? महात्मा गांधींच्या मुक्ततेचा आणि स्वातंत्र्याच्या विजयी निशाणाचा काय संबंध ? होय, त्यांचा निकट संबंध आहे, त्यांचा अत्यंत निकट संबंध आहे. ते एकमेकांत एकजीव झालेले आहेत, ते एकमे-कांत एकरूप झालेले आहेत, ते एकमेकांत एकदिल झालेले आहेत. महात्मा गांधींची मुक्तता म्हणजेच स्वातंत्र्याचें ध्वजारोपण होय आणि स्वातं-त्र्याचें ध्वजारोपण म्हणजेच महात्मा गांधींची मुक्तता होय. हिंदुस्थान स्वतंत्र झाला आणि महात्मा गांधी तुरुंगांतच राहिले हें शक्य आहे काय ? नाहीं, आणि हें जसें शक्य नाहीं तसेंच महात्मा गांधी मुक्त झाले आणि हिंदुस्थान स्वतंत्र झाला नाहीं हें ही शक्य नाहीं. हिंदुस्थानास स्वतंत्र करण्याकरितां महात्मा गांधींनीं जन्म घेतलेला आहे, हिंदुस्थानास स्वतंत्र करण्याकरितां महात्मा गांधी हिंदभूमींत आलेले आहेत. हिंदुस्थानास स्वतंत्र करण्या-करितां महात्मा गांधी संकल्पबद्ध झालेले आहेत. महात्मा मोकळे असल्यावर हिंदुस्थान स्वतंत्र झाला नाहीं असें कसें होईल ? सूर्यबिंब निरभ्र असल्यावर प्रकाश पडणार नाहीं ? अग्नि प्रदीप्त झाल्यावर बर्फ वितळणार नाहीं ?

---

* युगान्तर, १० फेब्रुवारी १९२४.

औषध घेतल्यानंतर आरोग्य येणार नाहीं ? कांचन जवळ असल्यावर दारिद्य जाणार नाहीं किंवा गुलाब फुलल्यावर सुवास दरवळणार नाहीं असें कसें होईल ? स्वातंत्र्यसुगंध दरवळविण्याकरितांच गांधीजींचा जन्म आहे आणि म्हणूनच गांधी मोकळे असल्यावर हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळालें नाहीं असें होणें अशक्य आहे.

भवितव्यतेच्या उदरांत काय काय रत्नें भरलेलीं आहेत हें आज सांगणें अशक्य आहे, कारण बहुरत्ना वसुधरेच्यापेक्षांही भवितव्यता जास्त रत्नवती आहे; परंतु तिच्या रत्नांची मोजदाद करणें जरी आज अशक्य नसलें तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं हिन्दुस्थान लवकरच स्वतंत्र होणार आहे. आतां हिन्दुस्थान स्वतंत्र झाल्याशिवाय खास रहात नाहीं. तो ह्यापुढें पारतंत्र्यांत रहाणें अशक्य आहे; पण हिन्दुस्थानास हें जें स्वातंत्र्य मिळणार तें कसें मिळणार ? ते इंग्रज लोक आपखुषीनें देणार ? कीं तें आपणांस त्यांचेपासून घ्यावें लागणार ? तें मित्रतेच्या गुदगुल्या करून मिळणार कीं असहकारितेची मात्रा उगाळून मिळणार ? पण हा सर्व तत्कालीन बनावांचा प्रश्न आहे. ज्या वेळीं जसा डाव पडेल तशा डावानें तें स्वातंत्र्य हिन्दुस्थानाकडे येईल; तें येणार हें मात्र निश्चित ! स्वातंत्र्याचे मार्गांत हिमालय पर्वत जरी उभा राहिला तरी हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणार ह्यासंबंधानें संशय नाहीं. गांधींची आकस्मिक मुक्तता हा त्याचाच शुभशकून आहे आणि म्हणूनच ह्या शकुनाचे वेळीं आम्ही महात्मा गांधींस शतशः प्रणाम करीत आहोंत.

गांधींना कुणीं सोडलें ह्याबद्दल कुणी कितीहि चर्चा केली, तरी ही गोष्ट खरी आहे कीं, हिंदुस्थान स्वतंत्र होण्यासाठीं गांधी सुटलेले आहेत. आतां लवकरच पारतंत्र्याचा काळा दोरा हिंदुस्थानच्या गळ्यांतून तुटणार ! आतां हिंदुस्थानच्या तोंडाला लागलेली पारततंत्र्याची काळोखी पुसली जाणार ! आतां हिंदुस्थानच्या पायांत पडलेली पारतंत्र्याची बेडी निखळून पडणार ! ह्यापुढें परतंत्र देशाच्या लज्जास्पद मालिकेंत हिंदुस्थानचें नांव राहणें शक्य नाहीं. तें त्यांतून निघणार आणि त्याचें जर एखादें पूर्वचिन्ह हवें असेल तर तें गांधीजींची मुक्तता हें आहे. ह्यावेळीं महात्मा

गांधींसंबंधानें आपलें कर्तव्य करण्यास प्रत्येक हिंदवासीयानें तयार झालें पाहिजे. ह्यावेळीं गांधींना स्वातंत्र्याचें अवभृथस्नान घातलें पाहिजे. ह्यावेळीं स्वातंत्र्याचा रत्नजडित मुकुट त्यांचे शिरावर चढविला पाहिजे. ह्यावेळीं स्वातंत्र्याचा शुभतिलक त्यांचे भालप्रदेशीं लावला पाहिजे. ह्यावेळीं स्वातंत्र्याची मन्दारमाला त्यांचे कण्ठांत घातली पाहिजे. ह्यावेळीं स्वातंत्र्याची अबदागीर त्यांचेवर धरली पाहिजे. ह्यावेळीं स्वातंत्र्याचीं मोर्चेलें त्यांचेवर उडविलीं पाहिजेत. ह्यावेळीं स्वातंत्र्याचीं गीतें त्यांचेपुढें गायलीं पाहिजेत. ह्यावेळीं स्वातंत्र्याचीं वाद्यें त्यांचेपुढें वाजविलीं पाहिजेत. ह्यावेळीं स्वातंत्र्य ह्या एकाच वातावरणाची रचना त्यांचे भोंवतीं केली पाहिजे.

आणि म्हणूनच गांधीमुक्ततेप्रीत्यर्थ हिंदुस्थानला स्वतंत्र करण्याचा निश्चय करा व हिंदुस्थानला स्वतंत्रतेचें नन्दनवन बनवा. स्वातंत्र्याचे विचार चालवा, स्वातंत्र्याच्या कल्पनेंत रहा, स्वातंत्र्याच्या सुखस्वप्नांत असा, स्वातंत्र्याचे श्वास घ्या व स्वातंत्र्याचे निश्वास सोडा. गेलीं शंभर–दोनशें वर्षें पारतंत्र्याच्या कुजक्या दुर्गंधीनें बिघडलेली हिंदुस्थानची हवा स्वतंत्र्याच्या निर्मळ लहरींनीं शुद्ध करा व त्यासाठीं पश्चात्तापाचे कर्पूर घरोघरीं पेटवा. जगांत 'जित' म्हणवून घेणें ही मोठी शरम आहे, पण हें तरुण पिढीचे मनावर बिंबवा आणि ही शरम निदान त्यांचेवर तरी येऊं नये ह्याची सावधगिरी बाळगा. स्वतत्रंता हा निसर्गाचा नियम आहे. स्वतंत्रता हा निसर्गाचा कायदा आहे. कुणालाही दुसऱ्याला परतंत्र करण्याचा अधिकार नाहीं. कुणीही कुणावर पारतंत्र्याचा बोजा लादूं नये. कुणीही कुणाचा पारतंत्र्याचा बोजा मान्य करूं नये. दुसऱ्यावर पारतंत्र्याचा बोजा लादणारा व दुसऱ्यानें लादलेला पारतंत्र्याचा बोजा मान्य करणारा हे दोघेही नीतिदृष्टचा गुन्हेगार आहेत. ह्या अनीतिमत्तेंत सामील होऊं नका. ह्या अनीतिमत्तेंत इंग्रजालाही सामील होऊं देऊं नका. विश्वांतील प्रत्येक व्यक्ति स्वतंत्र आहे व तुम्ही हिन्दमातेचे पुत्रही स्वतंत्र आहांत. स्वतंत्रतेनें जगांत वावरा, समता द्या व समता घ्या. प्रेम करा व प्रेम करवा. निर्भय व्हा व अभयदान द्या. अन्यायाचा विध्वंस करा. श्रीरामांनीं ह्यासाठींच अवतार घेतला. तुमच्यांत

राम असेल तर तुम्हीही प्रत्येकजण रामाचेच अवतार आहांत. अन्यायाचा विध्वंस हें आर्यभूचें कुलव्रत आहे. ह्या कुलव्रतामुळें ती धर्मभूमि झाली. ह्या कुलव्रतामुळेंच तिची पवित्रता वाढली. तिला तिची पवित्रता पुन्हां द्या. सत्याच्या आखाड्यांत उडी घ्या. तेथें तुमचा विरोध करणाऱ्यांची पर्वा करूं नका. त्यांचेबरोबर दंड थोपटा. असें कराल—सत्याचे आखाड्यांत उडी घ्याल—सत्याचा आग्रह धराल—सत्याग्रह कराल—तर महात्मा गांधी व गांधींचेही राजकीय गुरु लो. टिळक ह्यांचा जयजयकार करण्यास पात्र व्हाल.

---

## आमचें ब्रीद !

युद्ध कोणी करावें ?—युद्ध ग्रीक लोकांनीं करावें, रोमन लोकांनीं करावें, जर्मन लोकांनीं करावें, इंग्रज लोकांनीं करावें, अरब लोकांनीं करावें—आम्हीं हिंदुस्थानांतील लोक, आमची दानत युद्ध करण्याची नाहीं. आम्हां हिंदुस्थानांतील लोकांचा युद्ध करणें हा धर्म नाहीं, आमचा धर्म शांतता हा आहे. असेल तें संकट डोक्यावर घेऊन, वाटेल तो अन्याय पोटांत घालून, होईल तो जुलूम सहन करून, अगदीं संथपणानें, शांतपणानें, धिमेपणानें, पाऊल न उचलतां, दृष्टी वर न करितां आपला योगक्षेम चालविणें हें आमचें ब्रीद आहे !!!!

युगांतर—ता. १३ एप्रील १९२४.

## हिंदु कोण ?

ह्या हिंदभूचें पवित्र स्तन्य ज्यानें प्राशन केलें असेल तो हिंदु ! ह्या हिंदमातेचे पवित्र अंकावर जो लोळला असेल तो हिंदु ! ह्या हिंदमातेच्या चरणधूलीची तीट ज्याचे भालप्रदेशास एकदां तरी लागली असेल तो हिंदु ! तो मुसलमान असला तरी तो हिंदु, तो ख्रिश्चन असला तरी तो हिंदु, तो पार्शी असला तरीहि तो हिंदुच ! हा हिंदुस्थान देश हिंदुंचा आहे. ह्या हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्य हिंदु आहे. तो रामाला भजो, नाहींतर रहिमाला भजो; तो अल्ला म्हणो, किंवा ॐ म्हणो; तो सन्ध्या करो किंवा नमाज पढो, तो हिंदुच आहे. युगांतर—ता. १९ मे १९२४.

# * कवितेचा कैवारी !

( चाल:—अंबरगत परि पयोधरांतें. )

रुधिरमुखा मम मत्कुणमित्रा जागविसी कां मला ? ।
असा कां छळ माझा मांडिला ? ॥ धृ० ॥

निद्रारमणी उत्सुक होउनि शयनीं मज पालवी; ॥
यामिनी सूर्यदीप मालवी ॥
वायु-लहरिचा सुखद विंझणा वृक्षराजि हालवी; ॥
चंद्रिका शीतवृष्टि चालवी ॥

(चाल) मग जाउनि मंचकिं पडे देह भागला; ।
क्षण जीव विश्रमे दिनभर वैतागला ! ।
त्या सुखद अवसरीं डोळा जंव लागला; ।
इतुक्यामध्यें मज उठवाया प्रसंग त्वां साधिला ! ।
कोणता विजय तुला लाधला ? ॥ १ ॥

दिवसां निद्रा रात्रिं अलोचन जाग्रण ऐशी स्थिति ।
यदुवरें वर्णिलि पार्थाप्रती ॥
परी गडया ती योगिजनांची असे उग्र पद्धति ।
पाड तो मज गरिबाचा किती ? ॥

(चाल) तुज भगवद्गीता सांग कुणीं शिकविली ? ।
तूं तत्त्व नेणतां मान कशी तुकविली ? ।
तव गुरुनें हरहर ! बुद्धी तुझि चकविली ! ॥
विषसम होते विद्या त्याची अर्थ न ज्या उमगला, ।
वदे जरि ' पंडित मी चांगला ' ॥ २ ॥

---

* अभिनव–काव्य–माला.

कीं स्वस्त्रीची प्रेमसफलता करावया कामुका ।
पढसि हें दंतव्रणशास्त्र कां ? ॥
मजवरती परि कां करिसी हा प्रयोग त्याचा फुका ? ।
आंधळ्या, कितितरि करिसी चुका ॥

(चाल) तव दाह जाहला मदनसायकव्रणें, ।
मी पहा पोळलों तव दन्तव्रणगुणें ! ।
मग कोण जाणता विदग्ध तुजला म्हणे ? ।
स्वदु:ख शमवावया पाहिजे मार्ग असा योजिला, ।
ज्यांत कीं परतापहि मोजिला ॥ ३ ॥

दिनभरि असतों स्वव्यवसायीं निमग्न, न सुचे दुजें; ।
सुभाषित मनांतलें मनिं थिजे ॥
जरि रात्रींही काव्यदेविला मी न आळसें भजें !
स्फूर्तिचें बीज कसें मग रुजे ॥

(चाल) ही काय वाटली चिंता तुज अंतरीं ? ।
जणुं काव्यवृद्धिचा भार असे तव शिरीं ! ।
तूं जगतीं नसतां पळेल कविता दुरी ! ।
क्षमा करीं मज, मत्कुणराया व्यर्थ दोष तुज दिला ॥
म्हणुनि हें काव्य अर्पितों तुला ॥ ४ ॥

**अ. ब. कोल्हटकर**, बी. ए., एल्एल्. बी.

# * कोण पाहिजे ? टिळक कीं विवेकानन्द !

श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण याची पारख जर करावायाची असेल तर त्याच्या तीन कसोटया आपलेपुढें ठेवीत जा असें आह्मीं मागें एका अंकांत सांगितलें आहे. त्या तीन कसोटया हृया कीं तो पुरुष संसाराचा भार अंगावर कितपत पेलतो, तो राष्ट्राच्या जवाबदाऱ्या कितपत अंगावर घेतो व तो परमेश्वरासंबंधीं कर्तव्यें कितपत उचलण्यास समर्थ असतो. संसार, स्वदेश व सर्वेश्वर हृया तीन कसोटयांवर पुरुषाचें श्रेष्ठत्व नेहमीं पारखलें पाहिजे. हृयांपैकीं एखादे कसोटीवर जो कमी ठरेल तो त्या मानानें कमीच समजला पाहिजे. कोण कुणापेक्षां कमी व कोण कुणापेक्षां जास्त हृयाची चर्चा करीत असतां कुणाची स्तुति व कुणाची वृथा निन्दा करण्याचें कांहींच कारण नाहीं. कुणाविषयीं भीड अथवा संकोच धरण्याचेंही कांहीं कारण नाहीं. हृया तीन कसोटयांवर त्याची पारख करीत जा आणि त्यांत श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण हें बेलाशक ठरवीत जा.

हृया तीन कसोटया जर आपण आपणांपुढें ठेवल्या तर टिळक श्रेष्ठ कीं विवेकानन्द श्रेष्ठ हृया गोष्टीचा निर्णय आपणांस करतां आलाच पाहिजे. हृया निर्णयाकरितां मग आपणांस दुसऱ्याचे तोण्डाकडे पहायला नको. टिळक आणि विवेकानंद हृयांपैकीं संसार, स्वदेश व सर्वेश्वर यांविषयींची तिन्ही कर्तव्यें कुणी केलीं ? जर टिळकांनीं स्वतःचा संसार दक्षतेनें केला असेल, जर त्यांनीं स्वदेशासंबंधानें सर्व कर्तव्यें यथासांग केलेलीं असतील, आणि जर गीतारहस्य वगैरे ग्रन्थ लिहून त्यांनीं सर्वेश्वरासंबंधानेंही आपलें कर्तव्य योग्य रीतीनें पार पाडलें असेल तर निःसंशय टिळक हेच श्रेष्ठ ! जर विवेकानंदानींही संसार नीटपणें केला असेल, स्वदेशासंबंधानें सरकारशीं दंड थोपटून संग्राम केले असतील आणि सर्वेश्वराचे चरणीं तल्लीन होऊन जगताला स्वोद्धाराचा मार्ग दाखविला असेल तर मग विवेकानंदही श्रेष्ठ !

---

* युगांतर, ता. ३ फेब्रुवारी, १९२

दोघे जर तिन्ही विषयांत पास होत असतील तर त्यांत ज्यास्त ज्यास्त मार्क ज्याला मिळतील तो श्रेष्ठ ! जो तिन्ही विषयांत पास होत असेल तो श्रेष्ठ व तीन विषयांत ज्याचेकडून कांहीं विषय गळले असतील तो कनिष्ठ !

असें समजूं नका कीं संसार करणें हें फार कमी प्रतीचें आहे. संसार, स्वदेश व सर्वेश्वर हे सर्व सारखेच कठीण आहेत आणि त्यांपैकीं एकाचा बडेजाव करून दुसऱ्याकडे दुर्लक्ष करण्याचा आव आणणें हें कमजोरीचें दर्शक आहे. आम्ही काय देशभक्त, पोटासाठीं आम्हांला भीक मागायला हरकत नाहीं असें जो समजतो जो मनुष्यतेचीं जीं तीन मुख्य तत्त्वें, त्या तीन तत्वांपैकीं एका मुख्य तत्वांत कमी आहे असें मानलेंच पाहिजें. संसाराकरितां स्वदेशाची राखरांगोळी करणारा मनुष्य जितका नीच, तितकाच स्वदेशाची सबब सांगून लोकांपुढें भीक मागणारा मनुष्य नीच आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. लो. टिळकांचे चरित्रांत जी गोष्ट अत्यंत महत्वाची आहे ती ही कीं देशाकरितां त्यांचेवर अनेक दुर्धर संकटे आलीं तरी त्यांनीं पोटाकरितां किंवा मुलांबाळांकरितां कधींही भीक मागितली नाहीं. मी स्वदेशभक्तींत गर्क झालेलों आहे, माझ्या उदरपोषणाकरितां मला भीक वाढा, अशी आपल्या आपत्तीचे प्रसंगीं जर त्यांनीं भीक मागितली असती तर लो. टिळकांना ती भीक सहज मिळाली असती ! पण संकटाच्या यमयातना भोगीत असतांहि त्या बहाद्दराचे तोंडांतून स्वतः-संबंधानें किंवा पोरांबाळांसंबंधानें एक शब्दही कधीं चुकून निघाला नाहीं. सरकारकडून एकीकडे वाटेल तितका छळ होत असतांही दुसरीकडे त्यांनीं अत्यंत स्वाभिमानानें आपल्या घरादाराचा व मुलांबाळांचा बोजा संभाळला. इतकें धीरोदात्त उदाहरण दुसरीकडे कुठें सांपडेल ?

आणि जें स्वदेशासंबंधानें तेंच सर्वेश्वरासंबंधानेंही खरें आहे. स्वदेशा-संबंधानें बडेजाव सांगून आपलें पोषण लोकांचे अंगावर टाकणारे लोक जसे वाईट, त्याचप्रमाणें परमेश्वरभक्तीचा डांगोरा पिटून संसाराकडे दुर्लक्ष करणारे अथवा परमेश्वरभक्तीच्या गाजावाजापुढें स्वदेशभक्तीला तुच्छ मानणारे लोकही तितकेच कनिष्ठ हें लक्षांत ठेवलेंच पाहिजे. आम्ही काय

नारायणस्वरुपीं निमग्न, आम्हांस स्वदेशी काय किंवा परदेशी काय सारखेंच, असें म्हणून स्वदेशीची अवहेलना करून परदेशीला उत्तेजन देणारे किंवा भजनरंगांत दंग झाल्याचें अवसान आणून महिनेन् महिने भक्तजनांचे घरीं पुख्खा झोडीत बसणारे पुरुष हेही तितकेच गौण होत. परान्नाचा विटाळ ज्याचे मुखास लागला तो मनुष्य अपवित्रच! त्यानें सत्रा हजार वेळां परमेश्वराचें नांव घेतलें तरी त्याचा तो विटाळ कधींही जाणार नाहीं.

विवेकानंदांनीं स्वपोषणासाठीं भीक मागितली नाहीं ही गोष्ट स्तुत्य आहे. विवेकानंदांनीं भक्तवर्ग जमवून उदरपूर्तीसाठीं परमेश्वरभक्तीचें ढोंग माजविलें नाहीं, हेंही स्तुत्य आहे. विवेकानंदांनीं सर्वेश्वरसेवेपुढें स्वदेशसेवा क्षुद्र मानली नाहीं ही गोष्टही सुप्रसिद्धच आहे. किंबहुना, विवेकानंदांचे हृदयांत स्वदेशभक्तीची जागती ज्योत वास करीत होती ही गोष्टही निर्विवाद आहे. पण त्याचेबरोबर हेंही खरें आहे कीं, लो. टिळकांनीं ज्याप्रमाणें संसाराचा प्रत्यक्ष बोजा उचलला त्याप्रमाणें स्वामी विवेकानंदांनीं उचलला नाहीं आणि लो. टिळकांनीं स्वदेशासाठीं जशा प्रत्यक्ष जबाबदाऱ्या अंगावर घेतल्या त्याप्रमाणें विवेकानंदांनीं घेतल्या नाहींत. संसार, स्वदेश व सर्वेश्वर ह्या तिघांसंबंधींच्या तिन्हीं जबाबदाऱ्या लो. टिळकांनीं हंसतमुखानें व सारख्याच दक्षतेनें सहन केल्या. लोकमान्यांचें हें यश अद्वितीय नाहीं असें कोण म्हणेल ?

---

# वाघिणीचे जाळींत !

रामदास आणि शिवाजीमहाराज ह्यांच्या अनेक अद्‌भुत गोष्टी प्रचारांत आहेत. ह्या गोष्टींचा छडा अजून इतिहासानें लावलेला नाहीं. आणि अलीकडे तर इतिहासांत जातिभेद डोकावूं लागलेला आहे. इतिहासांत जातिभेद शिरला म्हणजे मग सर्वच आटोपलें! इतिहास एवढीच काय ती सत्याला रहायला निवाऱ्याची जागा!! ती जागाहि गेली म्हणजे सत्याला जगांत थाराही उरला नाहीं !

* * *

पण श्रेष्ठ पुरुषांकडे जातिभेदाचा पडदा दूर सारून पाहिलें पाहिजे. जातिभेदाच्या पडद्यापलीकडे उभें राहून श्रेष्ठ पुरुषांचीं श्रेष्ठ कृत्यें अवलोकन केलीं पाहिजेत.

* * * *

एके वेळीं रामदासांची तब्येत नादुरुस्त झाली. त्यांना पोटदुखीची व्यथा जडली व त्या व्यथेपुढें व्याकूळ होण्याचा प्रसंग आला. अशा प्रकारच्या पोटदुखीवर त्यांना औषध माहीत होतें. तें औषध म्हणजे वाघिणीचें दूध !

* * * *

पण हें औषध कोण आणून देणार ? वाघिणीच्या स्तनाला कोण हात लावणार ? ज्याला वाघाची भीति नसेल त्याच्याच हातून हें काम होणार, इतर लोक वाघिणीचें दूध कसलें आणून देतात ?

* * * *

श्रीसमर्थ ह्या विचारांत आहेत तोंच शिवाजीमहाराजांची स्वारी त्यांचे भेटीस आली. महाराजांनीं रामदासांना कुशलवृत्त विचारलें. त्यांनीं आपणास कोणती व्यथा आहे तें कळविलें. 'पण मग ह्यावर उपाय काय ?' महाराजांनीं विचारलें. 'ह्यावर उपाय वाघिणीचें दूध ! पण तें मिळणार कसें ?' रामदास म्हणाले.

* * * *

हो ! तेंही खरेंच ! श्रीशिवाजीमहाराज शांतपणानें बोलले. पुढें दोघांचें आणखी संभाषण होऊन शिवाजीमहाराजांची स्वारी उठली. पण गडाखालीं आल्यावर ते लवाजम्यासह राजधानीकडे निघाले नाहींत; तर एकटे रानांत जावयास निघाले.

* * * *

ही वेळ संध्याकाळची होती. सूर्य नुकताच अस्ताला गेलेला होता, अंध:कार पसरूं लागण्याचीं चिन्हें दिसत होतीं. पक्षी घरट्यांत जाऊन बसले होते. एखाददुसरें चुकून राहिलेलें घरगुती जनावर गांवाकडे पळत सुटलेलें होतें व दिवसभर घोरत पडलेलीं क्रूर श्वापदें आपआपल्या झाडींत चळवळ करूं लागलीं होतीं.

* * * *

ह्या वेळीं घोड्यावर बसून श्रीशिवाजीमहाराज एकटे चाललेले होते. शेवटीं एका जाळीकडे त्यांचें लक्ष गेलें. त्या जाळींत एक वाघीण पाठमोरी उभी होती व तिचीं पिल्लें तिचे अंगावर पीत होतीं.

*   *   *   *

शिवाजीमहाराज घोड्यावरून उतरले. त्यांनीं आपला घोडा तसाच सोडून दिला. तो त्यांचा आज्ञांकित होता. त्यांचे हुकमावांचून तो कधीं जात नसे. शिवाजीमहाराजांनीं आपली तरवार उपसली व पावलें न वाजवितां ते हळूंच जाळींत शिरले. त्यांची सर्व भिस्त त्यांच्या तरवारीवर होती. ह्या तरवारीनें त्यांना कधींही दगा दिलेला नव्हता.

*   *   *   *

शिवाजीमहाराज गेले आणि त्यांनीं एकदम वाघिणीचा कान पकडला. वाघिणीनें डुरकणी फोडली, हिसडा दिला, डोळे लाल केले, पंजा उगारायचा प्रयत्न केला. पण शिवाजी महाराजांची पकड इतकी बळकट होती कीं, तिला हालचाल करतां येईना. महाराजांनीं तिचे नजरेला नजर लावली. तिनें आपली नजर खालीं केली. महाराजांचे हातांतली तलवार तिचेपुढें तळपत होती.

*   *   *   *

शिवाजीमहाराजांना जें पाहिजे होतें तें झालें. त्यांनीं हेरलें कीं ही वाघीण आतां गाय बनलेली आहे! त्यांनीं वाघिणीवरचा हात काढला, तिचीं पोरें आपल्या खांकेंत धरलीं व खालीं शेला पसरला. त्यांना पाहिजे होतें तितकें दुध त्यांनीं शेल्यांत पिळून घेतलें.

शिवाजी महाराज निघाले, घोड्यावर बसले, गडावर पोंचले तरी ती वाघीण एकसारखी स्तब्ध उभीच होती. तिचीं पोरें आतां पिणें आटपून तिचेपुढें बागडूं लागलीं होतीं.

'कां शिवबा, पुन्हांसा आलास ?' रामदासस्वामीनीं विचारलें.

"आपणांकरितां वाघिणीचें दुध आणलें आहे."

"तरीच माझा शिवबा!" स्वामी गहिंवरले. "ह्या महाराष्ट्रांत वाटेल ते पराक्रमी पुरुष निपजतील, पण वाघिणीचें दुध काढणारा माझा शिवबाच!"

कै. दे. भ. अच्युतराव कोल्हटकरांच्या तेजस्वी
लेखसंग्रहाचा त्यांच्याच तेजस्वी शब्दांत
*स्मारकग्रंथाचा समारोप !

# आजपासून हाच निश्चय.

( रामदासनवमी दर वर्षी येते आणि जाते. ती जशी आली तशीच जाऊं दिली तर ती आल्याचा कांहींच उपयोग नाहीं. म्हणून यंदाच्या दासनवमीप्रीत्यर्थ पुढील निश्चय करण्याविषयीं आम्हीं प्रत्येक महाराष्ट्रीयास सांगत आहोंत. )

( १ ) कोणत्याही युरोपियन् मनुष्यास मी आजपासून " साहेब " म्हणणार नाहीं. मी जसा मनुष्य आहें तसाच तोही मनुष्य आहे. माझेपेक्षां तो कोणत्याही तऱ्हेनें श्रेष्ठ नाहीं.

( २ ) कोणत्याही हिंदी मनुष्यास मी आजपासून " अस्पृश्य " समजणार नाहीं. मी जसा मनुष्य आहें तसाच तोही मनुष्य आहे. माझे-पेक्षां तो कोणत्याही तऱ्हेनें " कनिष्ठ " नाहीं.

( ३ ) देशाचें स्वातंत्र्य हा माझा धर्म आहे. माझा माझ्या धर्मावर विश्वास असेल तर माझ्या हिंदुस्थान देशास मी स्वतंत्र करीन.

( ४ ) हिंदुस्थान देश माझा आहे. त्याचेवर माझा वारसा आहे. जगांतल्या इतर देशांना जितका स्वातंत्र्याचा हक्क आहे तितकाच माझ्या हिंदुस्थान देशासही स्वातंत्र्याचा हक्क आहे.

---

* अच्युतरावांचे लेख किती तेजस्वी, कसे जळजळीत आणि केवढे हृदयस्पर्शी ! त्यांच्या लेखसंग्रहांतील उच्च विचारांचें संकलन म्हणजेच त्यांच्या स्मारकग्रंथाचा समारोप ! ! हा समारोप त्यांनींच ' युगांतरां'तील एका लेखांत पंधरा कलमांत नमूद करून ठेवलेला आढळला—हाच त्यांच्या स्मारकग्रंथाचा त्यांच्याच तेजस्वी शब्दांत संकलित केलेला अत्युत्कृष्ट समारोप होय ! ! !

—संपादक.

( ५ ) स्वातंत्र्य ही देण्याघेण्याची वस्तु नव्हे. ती विकण्याची किंवा गहाण टाकण्याचीही वस्तु नव्हे. आपल्या देशाचें स्वातंत्र्य कोणासही हरवितां येत नाहीं. कोणासही दुसऱ्यांच्या देशाचें स्वातंत्र्य हिरावून घेतां येत नाहीं.

( ६ ) लांच देणारा आणि लांच घेणारा हे दोघेही ज्याप्रमाणें दोषी, त्याचप्रमाणें आपल्या देशाचें स्वातंत्र्य हरविणारा आणि दुसऱ्याच्या देशाचें स्वातंत्र्य हिरावून घेणारा हे दोघेही दोषी होत.

( ७ ) माझ्या वाडवडिलांनीं जरी देशाचें स्वात्रंत्र्य गमावलेलें असलें तरी तें मला बंधनकारक होत नाहीं. अनीतीचे करार कधींही बंधनकारक नसतात. दुसऱ्यास आपल्या देशाचें स्वातंत्र्य देणें हा अनीतीचा करार होय.

( ८ ) मी स्वतंत्र आहें. माझा देश स्वतंत्र आहे. स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.

( ९ ) प्रत्येक मनुष्य स्वतंत्र आहे. प्रत्येक देश स्वतंत्र आहे. स्वातंत्र्य हा प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे.

( १० ) पारतंत्र्याच्या करारपत्रावर मी कधींही सही करणार नाहीं. माझा प्राण गेला तरी मी पारतंत्र्याच्या करारपत्रावर सही करणार नाहीं.

( ११ ) मला परतंत्र म्हणणें म्हणजे मला मोठी शिवी देणें होय. माझ्या देशाला परतंत्र म्हणणें म्हणजे माझे आईबाप उद्धरणें होय.

( १२ ) मी वाटेल तो उपमर्द सहन करीन, पण माझा देश परतंत्र आहे, हा अपमान मी कधींही सहन करणार नाहीं.

( १३ ) माझें सर्वस्व घ्या, पण माझ्या देशाचें स्वातंत्र्य घेऊं नका. मी माझें सर्वस्व खुषीनें देईन, पण माझ्या देशाचें स्वातंत्र्य मी कधींही देणार नाहीं.

( १४ ) मी माझें सर्वस्व घालवीन, पण माझ्या देशाचें स्वातंत्र्य मी घालविणार नाहीं. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं मी माझ्या घरादारावर तुळशीपत्र ठेवीन.

( १५ ) स्वातंत्र्य हेंच माझें राजकारण. ज्या राजकारणांत देशाचें स्वातंत्र्य नाहीं, त्या राजकारणास मी ओळखीत नाहीं.

6392 — समाप्त —

REFBK-0004352